# स्वाध्याय मनोबोध

**(मनोबोधावरील प्रवचने)**

**व**

# श्री दासबोधांतर्गत दशबोध

*'स्व' म्हणिजे आत्मा जाण। ते ठायीं नित्य अनुसंधान।*
*तो 'स्वाध्याय' म्हणती सज्ञान। ज्ञानविचक्षण निजद्रष्टे॥*

(एकनाथ भागवत १७-३३३)

**प्रवचनकार : कै. मा. डॉ. रा. द. तथा दादासाहेब प्राणी,**
M.B.B.S. **मिरज**

**प्रकाशक :**
डॉ. भास्कर केशव प्राणी,
माधवपेठ, पाण्याच्या टाकी जवळ,
मिरज - ४१६ ४१०
दूरध्वनि : ०२३३-२२२०७१७

**पुनर्मुद्रण :**
दि. ३ जुलै, २०१२ (गुरुपौर्णिमा)

© सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.

मुल्य - १७०/- रू.

**मुद्रक :**
ज. प्र. महाबळ
गजानन मुद्रणालय,
मिरज - ४१६ ४१०
दूरध्वनि : ०२३३-२२२२६४५

☼ या ग्रंथातील लेखनाचे पुनर्मुद्रण, भाषांतर इत्यादी कारणांसाठी वापर, उताऱ्यांचा अन्य ग्रंथात समावेश आदी कोणत्याही कारणासाठी उपयोग करावयाचा झाल्यास डॉ. भास्कर केशव प्राणी यांची लेखी पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

## ❊ प्रकाशकाचे मनोगत ❊

'स्वाध्याय मनोबोध' या पुस्तकाची मुलभूत संकल्पना आणि मांडणी माझे आजोबा कै. डॉ. रा. द. उर्फ दादा प्राणी यांची होती. वैद्यकिय क्षेत्रात कार्यरत असून सुद्धा संतवाङःमयाचा त्यांचा चांगला आभ्यास होता. शिवाय या विषयांवर ते प्रवचनही करत होते. याच दरम्यान, झालावेदांत प्राईज मिळवलेले कै. ह.भ.प. श्री. हरेरामपंत बोडस यांच्या प्रवचनमाला, मैदान दत्त मंदिर, मिरज येथे आयोजीत केल्या जात असत, साधारण १९६० सालाच्या दरम्यान, प्राकृतीक अस्वास्थ्यामुळे कै. बोडस यांना प्रवचनांमधे अडथळे जाणवू लागले. श्री. बोडस यांचे ज्या विषयावर प्रवचन चालू होते, तोच विषय कै. दादांच्याकडे सुपूर्त करण्याचा निर्णय घेतला. कै. दादांनी तो विषय अत्यंत सचोटीने जनमानसासमोर मांडून पुर्णत्वाला नेला. शिवाय दासबोध, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव आणि मनोबोध यासारख्या अनेक ग्रंथांवर प्रवचने झाली. मनोबोधावर प्रवचन करताना, कै. दादांनी 'स्वाध्याय मनोबोध' या पुस्तकाचे लेखन हाती घेतले.

वंदनीय कै. दादांचे बद्दल लिहावे तेवढे थोडेच आहे. त्यांचेबद्दल ह. भ. प. बोडस गुरूजींनी म्हटले होते : डॉ. प्राणी स्वतः कर्म उपासना, ज्ञान, वैराग्य-विचार, या विचारांचे धनी असूनहीं स्वतःला 'धन्याचा हमाल' 'फुले गुंफणारा फुलारी' इत्यादि नम्र रूपकांचा आश्रय करून आत्मनिवेदन करतात. पण ते भवरोग बरा करण्यास निमित्त झाले असल्याने **'निमित्ताचा धनी केला असे प्राणी'** हे रूपकच त्यांना शब्दशः लागू पडते! भजन-कीर्तन-प्रवचन या त्रिविध साधनानी त्यांनी जनतेत परमार्थ विषयक जागृती केली व आपल्या मधूर व भावपूर्ण भजनाने भक्तीरस चाखविला.

सर्वसाधारण व्यावहारिक जीवनपद्धती अवलंबत असताना, मोक्षापर्यंत केलेली वाटचाल आणि त्या अनुषंगानी, मनुष्याची विचारधारणा आणि त्याचे होणारे दुरगामी परिणाम, असा अतिशय अवघड विषय, मार्मिक आणि सोप्या शब्दात, श्री. समर्थांनी जनमनावर रुजवला आहे. त्याची रचना 'स्वाध्याय मनोबोध' या पुस्तकातून दिसते.



या पुस्तकाच्या माध्यमातून, मनुष्याची स्वाभाविकवृत्ती आणि आयुष्याकडे बघण्याचा दृष्टीकोन, जीवनासाठी योग्य की अयोग्य आणि त्यासाठी आपली विचारधारा कशी असावी आणि ती तशीच अखंड वाहती ठेवण्यासाठी आध्यात्मिक आचरण कसे असावे, याची पुर्ण ओळख करून दिली आहे. अध्यात्माचा वापर केवळ वैयक्तीक सुखासाठी किंवा इच्छापुर्तीसाठी शस्त्र म्हणून न करता, मनाचे समाधान आणि परमेश्वराशी जवळीक साधण्यासाठी करावा, हे फारच उत्कृष्ठ पद्धतीने सांगीतले आहे. 'ब्रह्म सत्यं जगन्मीत्थ्या' या महावाक्याचा खऱ्या अर्थाने व्यावहारिक जीवनात अवलंब करणे आणि त्यायोगे उत्तमोत्तम विचारांची जोपासना करणे, या गोष्टी सहजतेने मांडल्या गेल्या आहेत.

या संकल्पनेमुळे आज अनेक दासबोध अभ्यासक व समर्थ प्रेमी मंडळीमधे या ग्रंथाची मागणीही सतत वाढत आहे, परिणामी, त्याची पुर्तता करण्यासाठी ग्रंथाचे पुनर्मुद्रण करीत आहोत.


अल्पावधीत उत्कृष्ट ग्रंथ छापण्याचे काम श्री. जयंत प्र. महाबळ यांनी केले तसेच त्या कामात माझे मित्र श्री. नंदकिशोर द. भट यांनी त्यांना मदत केली त्यांचे आभार.

श्री समर्थ कृपेने ''स्वाध्याय मनोबोधाच्या'' या पुनर्मुद्रित आवृत्तीचे दासबोध अभ्यासक व समर्थ प्रेमींचे कडून स्वागत होवो ही प्रार्थना !

**डॉ. श्री. भास्कर केशव प्राणी**
**सौ. सानिका भास्कर प्राणी**

❊❊❊

# कै. दादांचे निवेदन



श्री मैदान दत्तमंदिर या ठिकाणी ''स्वाध्याय मंडळाचे वतीनें दर रविवारी प्रवचनाचा कार्यक्रम गेली वीस वर्षे चालू आहे. ग्रंथ सांगणेचा झाला कीं त्याचा अभ्यास होतो हा हेतू मनांत धरून मिरज येथील प्रसिद्ध नागरिक व माझे मित्र ह. भ. प. श्री. हरेरामपंत बोडस एम्. ए., बी. टी. यांनी या मंडळाची स्थापना केली. एकमेकांच्या सहकार्यांने ज्ञानेश्वरी, तुकोबांचे काही अभंग, नाथ भागवत, दासबोध, प. पू. श्री वासुदेवानंद सरस्वती यांचे दत्तमहात्म्य इत्यादि ग्रंथ सांगून झाले. त्यानंतर मनाचे श्लोकांवर प्रवचने चालू करावीत असे वाटू लागले व या विचाराला काही मित्रांकडून प्रोत्साहनही मिळाले. मनाचे श्लोकांचे महत्त्व व चालू परिस्थितीत त्यांची आवश्यकता या संबंधीचा विचार पहिल्या प्रास्तविक प्रवचनांत मी मांडला आहे.

मनात पुष्कळ येते, पण ते कृतीत येणे अवघड जाते. मनाचे श्लोकांवर श्री. देव, श्री. तुळपुळे, श्री. आठल्ये, श्री. अवधूत स्वामी श्री लिमये इत्यादी



सज्जनांचे लिखाण उपलब्ध असल्यामुळे ते पाहिले. बहुतेकांनी आपापल्या मतानुसार केवळ श्लोकार्थच दिला आहे. म्हणून मार्गदर्शनार्थ श्री. देव यांनी दिलेले शब्दार्थ व आधारभूत उतारे ग्राह्य मानून संत सज्जनांच्या विचारानेच श्लोकांना सजवून त्यांचा विस्तार करावा असे वाटले. हे सांगण्यातील हेतू एवढाच आहे, की हे मनोबोधरूपी सूत्रात संत सज्जनांच्या वाङ्मयरूप बागबगीच्यातील बरी वाटलेली पुष्पे वेचून ही प्रवचनमाला गुंफण्याचे केवळ फुलाऱ्याचे काम लेखकाने केले आहे. माला सुंदर, उठावदार, सुगंधी न वाटल्यास तो दोष फुलाऱ्याचा आहे, पुष्पांचा अगर तंतूचा नव्हे.

पहिले प्रवचन दि. २८ फेब्रुवारी १९६५ रोजी झाले व आजपर्यंत ७६ श्लोक सांगून झाले. ७६ श्लोकांत 'प्रभाते मनी राम चिंतीत जावा' हे सदर पूर्ण होते. पुनः तोच विषय आलेल्या अशा काही ठिकाणी विवेचनात अथवा स्पष्टीकरणार्थ दिलेल्या आधारांत पुनरुक्ती असल्याची जाणीव लेखकास आहे. पुनरुक्ती हा दोष समजला जातो. परंतु प्रवचनांत श्रोत्यांना पूर्व विषयाचे पुनः स्मरण करून द्यावे लागते. आणि तत्त्वज्ञानासारखा विषय ठसणेसाठी पुनरुक्ती करावी अशी समर्थांची पद्धत आहे. **तैसें श्रवण मनन । केलेंचि करावें ।।** (दा. ७-८-४७) **विवरलेंचि विवरावें । पुन्हा निरूपणीं ।।** (दा. ११-५-१) म्हणून काही ठिकाणी प्रवचनात आलेली पुनरुक्ती पुस्तकात तशीच ठेवली आहे. स्वतःचा अभ्यास या हेतूनेच मनोबोधावरील प्रवचने चालू आहेत. लोकांना ज्ञानदान करणे इतपत लेखकाची पात्रता नाही.

मनोबोधावर प्रवचने सुरू करताना ती छापून पुस्तक रूपाने प्रसिद्ध होण्याचा योग येईल हे स्वप्नीही नव्हेत. पण मिरजेतील अध्यात्मप्रेमी नागरिकांचे अंतःकरणात स्फुरलेली प्रसिद्धीकरणाची ही प्रेरणा पाहून व काही घडून आलेल्या घटनांवरून कर्ताकरविता एक परमात्माच असून निमित्ताचा धनी केला असे प्राणी ही तुकोबांची सत्यवाणी मात्र प्रत्ययास आली.

**तरी न्यून तें पुरतें । अधिक तें सरतें ।।**
**करूनि घेयावें हें तुमतें । विनवितु असें ।।** (ज्ञा. १-८०)

कार्तिक शु॥ ८ शके १८८८
दि. १३-११-६६
मिरज.

**रा. द. प्राणी**

वंदनीय श्री. गुळवणीमहाराज यांचा

पूर्वीच्या भाग १ व २ साठी

## आशीर्वाद

*॥ श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ॥*

**भाग १**

**मना चंदनाचे परी त्वां झिजावे । परी अंतरी सज्जना नीववावे ॥**

या समर्थांच्या आदेशाप्रमाणें, जीवन कृतार्थ करणारे माननीय दादासाहेब प्राणी, यांचा सत्कार व त्यांच्या मनोबोधावरील प्रवचनांचे प्रकाशन, ही सत्कार्ये मिरज येथील विद्वत्सत्कार समितीकडून घडून येत आहेत, हे तिच्या नांवाला उचित असेच होत आहे. ईशकृपेने गुणी व गुणज्ञ यांचा समन्वय या कार्याचे रूपाने घडून येत आहे, ही समाधानाची गोष्ट आहे.

**'सर्वःकान्तमात्मीय पश्यति'** या वाक्याने दर्शविलेला **'आत्मवंचना'** हा महादोष, हालाहल विषाप्रमाणे सर्वत्र पसरून राहिला आहे. राष्ट्रघातक अपराध करूनही न्यायालयात आपण निर्दोषी ठरलो, म्हणजे झाले या वृत्तीमुळे सूक्तासूक्त वाटेल त्या उपायाने आपले निर्दोषत्व भासवले जात आहे. यात लोकवंचना व आत्मवंचना आपल्या हातून घडत आहे, इकडे कोणाचे लक्ष नाही. देहबुद्धीचाच विकास अधिकाधिक होत आहे. अशा भयानक स्थितीत मनोबोधसारख्या संतांच्या सर्व लोकोपकारक ग्रंथाचा व अशा ग्रंथाचे नित्य मनन करणाऱ्या सज्जनांच्या विचारांचा प्रसार सर्वत्र करणे, हेच खरे राष्ट्राचे हित साधणारे कार्य आहे. हे कार्य करीत असणाऱ्या विद्वत्सत्कार समितीस मनःपूर्वक धन्यवाद !

श्री. दादासाहेबांना ईशकृपेने दिर्घायुष्य लाभून त्यांच्याकडून या पुढेही सद्विचार प्रसाराचे कार्य अव्याहत चालू राहो, आणि, **मना वासना वासुदेवी वसो दे । मना कामना कामसंगी नसो दे ॥ मना कल्पना वाऊगी ते न कीजे । मना सज्जना सज्जनी वस्ति कीजे ॥** या श्रीसमर्थांच्या परममंगल आदेशाचे नित्य पालन समष्टी मनाकडून होत राहो हीच सर्वांतर्यामी श्रीवासुदेवाजवळ अखंड प्रार्थना.

आश्विन पौर्णमासी १८८८ — सज्जनविधेय

शनिवार दि. २९-१०-६६ — **वा. द. गुळवणी**

श्रीवासुदेव निवास कर्वे पथ, पुणे ४.



**भाग २**

**श्रीगुरो तुझी मानवी तनू । हंसरूपिणी सिद्ध आसन् ॥**

**दंड पात्र काषाय अंबर । अंतरीं वसो दे निरंतर ॥**

श्रीमान् भगवद्भक्तिप्रवण श्री. दादासाहेब प्राणी यांच्या मनोबोधावरील प्रवचनाचा पहिला भाग तीन वर्षापूर्वी विद्वत्सत्कार समितीकडून प्रकाशित झाला असून आज हा दुसरा भाग प्रकाशित होत आहे. हाही भाग त्यांच्या देखत प्रकाशित होण्याचा योग जमला नाहीं ही एक न्यूनता, व्यवहारदृष्टीनें कदाचित् विषादजनक वाटली तरी, तीं रूपापेक्षा नामाचे अभंगत्व दर्शवून राहिली आहे, हेंही एक वैशिष्ठ्यच घडून येत आहे, असें मानण्यास हरकत नाहीं. **'निमित्ताचा धनी केला असे प्राणी'** याप्रमाणे भक्त जरी आपल्या कृतीबद्दल उपेक्षा दाखवीत असला तरी **'नुपेक्षी कदा रामदासाभिमानी'** याप्रमाणें दासाभिमानी भगवान् भक्तकार्याबद्दल उपेक्षा, भक्ताची इच्छा असली तरी, कधींच करीत नाहीं, हेंच सिद्ध होत नाही काय ?

**'मना सज्जना राघवीं वस्ति कीजे'** हा समर्थांचा मनाला मुख्य बोध आहे. पण **'अति काम त्या राम चित्तीं वसेना'** असेंही समर्थ सांगतात. काम हा तर फार मोठा दोष आहे. भगवत्साक्षात्कारानंतरही याला भिऊन **'कामांना हृद्यसंरोहं भवतस्तु वृणे वरम्'** असा वर श्री प्रल्हादजींनीं प्रभूजवळ मागितला आहे. तथापि **'मुखीं राम त्या काम बाधूं शकेना'**, असा या दोषाचा प्रतिबंधक उपायहीं समर्थांनी दाखविलेला आहे. याप्रमाणे प्रतिबंधक दोष व तो दूर करण्याचें साधन सांगून राघवरूपी मनाची स्थिरता हें फल मनोबोधांत सांगितलें आहे. **'चित्तैकाग्रय तु सल्लक्ष्ये समाधानमितीरितम्'** असें समाधानाचें स्वरूप श्री शंकराचार्यही सांगतात. आणि **'परो हि योगो मनसः समाधिः'** असे याचें महत्त्व श्री भगवान् व्यक्त करतात. मनुष्य जन्मांतच समजणारा हा सर्व विचार या विवरणांत डॉ. प्राणी यांनी सप्रमाण, मननपूर्वक मांडलेला आहे. याचा अभ्यास जिज्ञासु साधकांकडून होत राहण्याच्या दृष्टीनें हे प्रकाशन अत्यंत उपयुक्त ठरणारें आहे यांत संशय नाहीं.

**क्रमी वेळ जो तत्त्वचिंतानुवादें ।**
**न लिंपे कदा दंभवादे विवादें ।**
**करी सूखसंवाद जो ऊगमाचा ।**
**जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥**

या श्लोकांत समर्थांनी सांगितल्याप्रमाणें वागून आपल्या जन्माचे सार्थक करणारे

श्री. दादासाहेब प्राणी यांचा ग्रंथ या श्लोकांत वर्णिलेल्या व त्यांनी संपादन केलेल्या सर्वोत्तमदास लक्षणाचेच फळ आहे, हे लक्षात आणून वाचकांनींही तें संपादन करण्याकरिता प्रयत्नशील राहून धन्य व्हावें, हीच त्या सर्वोत्तम प्रभूजवळ प्रार्थना.

श्रीवासुदेव निवास, कर्वेमार्ग, पुणे ४. सदन्तेवासी,
चैत्र शुध्द प्रतिपदा, भौमवार, १८९२ **वा. द. गुळवणी**

---

॥ श्रीराम ॥

मिरजेचे डॉ, प्राणी यांचा स्वाध्याय मनोबोध पूर्वीच वाचून पूर्ण केला होता. मनोबोधाचा अतिशय उत्कृष्ट अर्थ त्यांनी दिला आहे. आश्‍चर्य असे की तो ग्रंथ त्यांनी माझ्याकडे बघावयास पाठविला आणि मी काही त्यांना निरोप देण्यापूर्वीच त्यांनी ईहलोकीचा निरोप घेतला. मनोबोधावर खूप जणांनी लिहिले आहे. डॉ. प्राणी यांचे विवेचन अतिशय मार्मिक आणि तर्कशुध्द झाले आहे. मी कांही दोन शब्द त्याबद्दल लिहावे असा निरोप आला, तेव्हा मी हॉस्पिटलमध्ये होतो. आजही आजारी आहे. त्यामुळे मला फार कांही लिहिता आले नाही. तरी स्वाध्याय मनोबोधासारखे ग्रंथ समाजाच्या सर्वांगीण उन्नतिसाठी आणि पारमार्थिक विचारांसाठी अत्यंत आवश्यक असे आहेत. ह्या ग्रंथाबद्दल त्यांना धन्यवाद देऊ तितके थोडेच आहेत.

दि. १५-१२-९१ आपल्या सर्वांचा विनीत,
**स्वामी माधवनाथ**



॥ श्री पांडुरंग प्रसन्न ॥

**धुंडामहाराज देगलूरकर**
पंढरपूर - ४१३ ३०४
देगलूर - ४३१ ७१७

# अभिप्राय

कै. डॉ. दादासाहेब प्राणी हे चिंतनशील व्यक्तिमत्व होते. अध्यात्मिक उध्दोध करण्याचे कार्य त्यांनी आपल्या प्रवचनांच्या द्वारे मिरजेमध्ये निष्ठेने केले. श्रीसमर्थांच्या मनोबोधावरील त्यांचे मूलग्राही विवेचन साधकांच्या दृष्टीने फार उत्कृष्ट असे झाले. त्यांनी या विषयावर केलेली प्रवचने तर लोकप्रिय झालीच पण ती प्रवचने **'स्वाध्याय मनोबोध'** या नांवाने ग्रंथाद्वारे प्रसिध्द करून जे कार्य करण्यात आले ते फार मोलाचे झाले. श्रीसमर्थांचा मनोबोध हा माणसाच्या व्यक्ती व समाज म्हणून होणाऱ्या दुर्गतीवर एक प्रभावी औषध आहे. श्लोकाश्लोकातून थोडक्यात सूत्रमय पध्दतीने व्यक्तिगत व सामाजिक जीवन कार्यप्रवण, दक्ष, शुध्द व विवेकसंपन्न करण्याचे पाठ ह्यातून देण्यात आले आहेत. त्यांचे चिंतन आपल्याला नित्य सावध ठेवणारे आहे. ते कसे करावे त्याचे उत्तम मार्गदर्शन कै. डॉ. श्री. दादासाहेब प्राणी यांच्या 'स्वाध्याय मनोबोधांतून' होते.

या ग्रंथाच्या प्रथम प्रकाशनाचे समयी मी उपस्थित होतो. त्यामुळे या ग्रंथाची द्वितीय आवृत्ती प्रसिध्द होत आहे व ग्रंथ लोकप्रिय होतो आहे याचा मला आनंद झाला. साधकांनी श्री समर्थांनी दाखविलेल्या मार्गाने आपल्या मनालाही सन्मार्गाकडे वळवावे. या कार्यात श्री. प्राणी यांचा हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त ठरेल असा मला विश्वास आहे.

श्रीसमर्थ वाङ्मयप्रेमी ज्या मंडळींनी हे प्रकाशनाचे कार्य हाती घेतले त्यांना धन्यवाद व शुभेच्छा.

श्री क्षेत्र पंढरपूर.
भाद्रपद शु. ११, शके १९१३ **धुंडा महाराज देगलूरकर**

पुष्प १ ले ''स्वाध्याय मनोबोध'' वरील

## प. पू. गोळवलकरगुरूजी, नागपूर

यांचा

# अभिप्राय

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, डॉ. हेडगेवार भवन
केंद्र नागपूर. नागपूर २.
पत्र क्र. ९६४ दि. २०/७/६७

**भाग १**

मान्यवर डॉ. पटवर्धन यांसी-
प्रेमपूर्वक सा. न. वि. वि.

दिनांक १३/७ ला आपली माननीय डॉ. दादासाहेब प्राणी यांचेसमवेत भेट झाली होती. 'मनोबोधा'वरील त्यांचे प्रवचनांचा पहिला भाग, श्लोक १ ते ७६ पर्यंतचा आपण मला दिला होता. प्रवासांत तो संपूर्ण वाचून काढला. विस्तार टाळण्यास्तव झालेल्या प्रयत्नांतून कांहीं ठिकाणीं थोडा तुटकपणा आलेला असला, तरी एकूण विवेचन ''जिवंत व प्रेरणाप्रद'' उतरलें आहे. छापील विवेचन मूळ भाषणांचे मानाने थोडेंच असणार. तेंहि इतके उद्बोधक आहे, तेव्हां ज्यांनी प्रत्यक्ष त्यांच्या तोंडून हीं प्रवचनें ऐकलीं त्यांना किती स्फूर्तिप्रद विवेचन ऐकण्याचें भाग्य लाभलें असेल याची कल्पना करतां येते.

ही प्रवचने छापून पुस्तकरूपाने असंख्य वाचकांना उपलब्ध करून देऊन आपण मोठा उपकार केला आहे.

श्री समर्थ वाङ्मयाचें गंभीर अध्ययन केलेलें, श्री समर्थांच्या उपदेशाचें मर्म आपल्या ओघवतली वाणीने विषद करण्यांत सिद्धवाचक असलेले वाचस्पति श्री. विष्णूजी क्षीरसागर यांचे हस्ते या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ आपण ठरविला आहे, हें अत्यंत योग्य झालें आहे.



समारंभ सोत्साहपूर्ण होवो व या ग्रंथाला अनेक वाचक लाभून समाजाचें कल्याण होवो, हीच या प्रसंगीं प्रभूचरणी प्रार्थना करीत आहे.

अधिक काय लिहिणे ? माननीय श्री. दादासाहेब प्राणी, मान्यवर श्री. विष्णूजी क्षीरसागर, आदि सर्वांना सादर सा. न.

कळावे.

मा. स. गोळवलकर आपला
डॉ. हेडगेवार भवन **मा. स. गोळवलकर**
नागपूर २.


---

**भाग २**

प. पू. श्री. गोळवलकर गुरुजी यांनी दि. २-३-७० रोजी दुसरे पुस्तक मुद्रित होण्यापूर्वी पाठविलेल्या पत्रातील काही भाग खाली देत आहे -

''माननीय डॉ. कै. दादासाहेब प्राणी प्रगाढ अध्ययनाचे व धर्मनिष्ठ जीवनाचे सारच यातून प्रगट होईल. आधीच समर्थांची ओजस्वी वाणी, त्यात आबालवृद्धांना श्रेष्ठ जीवन व जीवनाचे सार्थक घडवून आणण्याचा उपदेशही केलेला. हा उपदेशही अनुभव व शास्त्रसिद्ध असा परिपूर्ण आणि त्यावर डॉ. प्राणींसारख्या अधिकारी पुरुषाने केलेले भाष्य हा सोन्याला सुगंध प्राप्त होण्यासारखा असाधारण सुयोग आहे.''

## ॥ श्री राम समर्थ ॥



शुकासारिखे पुर्ण वैराग्य ज्याचें।
वशिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचें।
कवी वाल्मिकी सारिखा मान्य ऐसा।
नमस्कार माझा सद्गुरु रामदासा।।

॥ श्री दत्त प्रसन्न॥

# स्वाध्याय मनोबोध

आज श्री समर्थांच्या मनाचे श्लोकांवरील प्रवचने सुरू करीत आहोत. विषयाची प्रस्तावना चार विभागात करूया.

**(१) विषय - परिचय (२) महत्व (३) मनाचे स्वरूप**

**(४) मनालाच उपदेश का ?**

**(१) विषय - परिचय :-** मनाचे श्लोकांना 'मनोबोध' असेही म्हणतात, चंचल बालकास सुविद्य करणेसाठी कधी रागाने तर कधी प्रेमाने बोलावे लागते, कधी प्रमाने पाठीवर हात फिरवावा लागतो. तर कधी धपाटाही द्यावा लागतो. मनास सुसंस्कृत करणेसाठी कधी त्याला रागाने तर कधी प्रेमाने शिकवावे लागते. असे सुसंस्कृत मन व्यवहार व परमार्थ या दोहोंतही कल्याणकारी होते. हीच मनाला दिलेली शिकवण या मनाचे श्लोकांत आढळून येते. स्थूल मानाने प्रथम श्लोक मंगलाचरणाचा, २ ते ६६ कर्मपर, ६७ ते १३५ उपासनापर, १३६ ते २०१ ज्ञानपर आहेत. २०२ ते २०४ ज्ञान दृढ होण्याचा मार्ग सांगितला असून, २०५ फलश्रुती सांगतो. **आधी ते करावे कर्म। कर्ममार्गे उपासना। उपासका सापडे ज्ञाने। ज्ञान मोक्षचि पावणे।** असे समर्थ शिकवणीचे सूत्र आहे. याशिवाय मुख्य देव कोण, सद्गुरूकृपा, उपासनेत येणारी विघ्ने, इत्यादि विषय यांत आहेत.

**(२) महत्व :-** मनाचे श्लोक हे सूत्रात्मक विवेचन आहे. भुजंगप्रयात हे वृत्तही आकर्षक असे असूनही फारच थोडे लोक याचा अभ्यास व मनन करतात हे दुर्दैव. पुस्तक छोटे, किंमतही अल्प, काही वेळा फुकटही मिळते. असा हा सवंग सौदा होत असलेमुळे अर्थाकडे मन आकर्षिले जात नसावे. अतिपरिचयादवज्ञा होते. काही श्लोक पाठ होतात. काही कानावरून जात असतात, आणि मग 'मनाचे श्लोक ना, आहेत ठाऊक' अशी समजूत होऊन पुस्तक कोठेतरी कोनाड्यात पडलेले असते. अर्थाचा विचार दूरच राहतो, **लोहाची मांदूस केली। नाना रत्ने साठविली। अभाग्याने टाकिली। लोखंड**

**म्हणोनि ।।** (दा. ७-१-३३) समर्थ कालात ह्या श्लोकांनी महाराष्ट्रात फार मोठा प्रभाव गाजवला आहे. विरक्त शिष्यांनी स्पष्ट उच्च स्वरात हे श्लोक म्हणावेत, भिक्षा थोडी स्वीकारावी, लोकांचे चित्त वेधावे आणि सदाचार वाढून राम उपासनेचा प्रसार व्हावा, असा हा साधासुधा डोळस संप्रदाय होता.

**सदाचार** हा या डोळस संप्रदायाचा पायाच असल्यामुळे राष्ट्राची नैतिक पातळी उंचावून ह्या श्लोकाधारे पूर्वजांनी आक्रमिलेल्या परमार्थ मार्गाकडे समाजाचे लक्ष वेधले गेले. तो काल गेला, संप्रदाय क्षीण झाला, आणि समाजाचे नैतिक व धार्मिक अध:पतन मात्र झपाट्याने वाढू लागले. म्हणून आज लोकांनी कोनाड्यांत धूळ खात पडलेले मनाचे श्लोक, उराशी बाळगले पाहिजेत. सतत वाचून मननही केले पाहिजे व भोवतालचे लोकांवरही त्यांचा संस्कार केला पाहिजे. तरच काही तरणोपाय. सुसंस्कृत मनामुळेच समाज- उध्दार व अंत मोक्ष. ह्या दृष्टीने श्लोक - फलश्रुती सांगतात. **मनाची शते ऐकतां दोष जाती। मतीमंद ते साधनायोग्य होती। चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगी। म्हणे दास विश्वासता मुक्ति भोगी।** (मनाचे श्लोक-२०५)

**(३) मनाचे स्वरूप :-** मनालाच बोध का केला हे समजणेसाठी त्याची स्थिती प्रथम समजली पाहिजे. मन ही काय चीज आहे ? निर्विकल्प नित्य शुध्द सर्वसाक्षी अशा आत्मस्वरूपी कल्पना भेद नसताना अज्ञानाने दृश्यरूपी भेद-सृष्टीचा उठाव, तेच मन. **आत्म्याच्या शेजारी। राहोनि वस्तुमात्राचा संकल्प करी। तेचि मन जाण सर्वापरी। रावणारि जाण पा। (यो. वा. सा.) हे असे कसे होत ? जैसें उदक तळी निश्चळ। त्याच्याच ठाई लहरी मेळ। उठी तैसा भेद कल्लोळ। आत्मा निर्मळ जैसा तैसा।। मन हे वायाचि नाव। एऱ्हवी हे कल्पनाचि सावेव।।** निश्चल आत्मरूपी चंचल द्वैत कल्पनांचा भास उत्पन्न करून निरनिराळे भेद ओळखण्याचे जे स्वाभाविक सामर्थ्य तेच मन. म्हणून 'इंद्रियाणां मनश्चास्मि' स्वप्नात आपलेच मरण व दहन पाहिले जाते. असे हे द्वैताचे मूळ अपूर्ण अंतरिंद्रिय आहे हे विरोधी गुणांनी युक्त आहे. हे मन जसे सुष्ट तसे दुष्ट, जसे मलिन तसे निर्मळ, चंचल तसे निश्चल, शत्रु तसे मित्र, भ्याड तसे धीट, मऊ तसे क्रूर आहे. फुंकाऱ्याने वह्नी पेटतोही, फुंकाऱ्याने वह्नी विझतो असे हे उपकारी तसेच घातकी इंद्रिय आहे. हे जिवाला संसृतीत गुंतवतेही व सोडवतेही. शरीराचे अंतर्बाह्य सर्व व्यापारांवर याचेच नियंत्रण. म्हणून याला ''मनोदेव'' म्हणतात. याचे सामर्थ्य पाहा. **नवल लाघवी कैसें मन। शुध्दि उपजवी मीपण। चिद्रुपा लावूनी जीवपण। सुखदु:खें जाण भोगवी।।** (ना. भा. २३-६०७) येवढे हे सामर्थ्य व विरोधी गुण स्वभाव याचे ठिकाणी आला कसा ? त्याची उत्पत्ती पंचमहाभूतांच्या सात्विक गुणांपासून असलेमुळे. (आई - बापाचे गुणदोष मुलात उतरतात तसे) **पृथ्वी -** मशागत केली तर अन्न वाढ करते. आपटल्यास हाड मोडते. **आप -** तहान भागवते, पण वेळी बुडवतेही. **तेज -** अन्न पक्व करते पण वेळी भाजतेही. **वायु -** श्वसनास मदत करतो पण वादळाने सर्व व्यवस्था उध्वस्तही करतो. आकाश - वस्तीला स्थान देते, पण धरणीकंपाने सर्व गडप्पही करते. अगदी हेच परस्परविरोधी गुण मनालाही चिकटले. सत्त्व गुणामुळे त्याला देवपण, राजेपण मिळाले असा विचार केला म्हणजे मग प्रश्न पडतो की -

**(४) मनालाच उपदेश का ? :-** एखाद्या पंचभूतांपैकी भूताला अपकार न होवू देता काही विशिष्ट तंत्रानें जसे आपण स्वाधीन करून घेतो तसे काही विशिष्ट तंत्रानेच मनाला वश करावे लागते. उदा. वीज, आपण विशिष्ट तंत्रानेच वीजेला स्वाधीन करून ठेवली आहे. तसेच मन, मनाला विवेकाचे संस्कार देऊन उपकारी गुण वाढवून त्याला वश करण्यासाठी सारा प्रपंच - म्हणूनच ''मनाला बोध'' **मनोबोध**. मन एकदा का वश होऊन मित्र झाले की ते स्वत: मरून तुम्हांला अमर करते, समर्थ म्हणतात **मनास बुध्दी सांगणें। जनास काय सांगणें।** एकाने समर्थांना विचारले, आपण अधिकारी आहात, मग लोकांना उपदेश करण्याऐवजी मनाला उपदेश का ? ते म्हणतात **'म्हणे दास लोकास मी काय सांगो। तराया जनी मीचि कासेसि लागो। बरी साक्षपे औषधे वाढवावी। जया लागला रोग तेणेंचि घ्यावी।'** कारण - **मन एव मनुष्याणां कारणं बंध मोक्षयो:। मी जीव मज बंधन। मज आहे जन्ममरण।** या भावनेने बध्दता आणि **आपण वस्तू मूळ एक। ऐसा ज्ञानाचा विवेक।** झाला की मुक्तता, समर्थ म्हणतात, **'जनीं मनावाचुनि सूख नाहीं। मनेंचि लाभे गुज सर्व काही। परंतु तें स्वाधीन हो करावें। निरूपणें मानस आवरावें। ब्रह्मादिकां मानस आवरेना। नाना उपाई मरतां मरेना। तें निर्गुणी पांगुळतां मरावें। निरूपणें मानस आवरावें।'** (करूणाष्टके)

दुसरे महत्वाचे कारण सर्व अंतर्बाह्य व्यापार मनाचे स्वाधीन. त्यामुळे स्वस्वरूप ओळख होईपर्यंत मनुष्य मनाशी एकरूप होऊन तो नाचवेल तसे नाचतो. आपण कसे आहो ? मनासारखे.. मन कसेही असो. मी जो स्वतंत्र, त्याने मनाच्या रंगात का रंगावे ? पण याचे भानही न राहता आपण तद्रूप होतो. मनोबोधाने नकळत आपण त्याचेपासून अलग होत जातो आणि आपली अलिप्तता दृढ होत जाते.

समर्थांनी राघवाचा पंथ दाखविणेसाठी जरी हे श्लोक लिहिले, तरी व्यवहाराला अनुसरूनही वागण्याचे कांही नियम, आचार, विचार, उच्चार यांची एकवाक्यता, इंद्रियदमन व वितंडवाद इत्यादि विषयही सांगितले आहेत. कारण प्रापंचिक सदाचाराशिवाय, परमार्थ साधनाला पुष्टी येत नाही हा सिध्दान्त आहे. **प्रपंची जो सावधान। तोचि परमार्थ करील जाण। प्रपंची जो अप्रमाण। तो परमार्थी खोटा।।** (दा. १२-१-९). सारांश, वेदाचे जे गुह्य, शास्त्रांचे जे सार ते अत्यंत सोप्या शब्दांत समर्थांनी सांगितले आहे.

* * *

**गणाधीश जो ईश सर्वांगुणांचा।**
**मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा।**
**नमूं शारदा मूळ चत्वार वाचा।**
**गमूं पंथ आनंत या राघवाचा ।।१।।**

ग्रंथाचा उपक्रम व उपसंहार म्हणजे आरंभ व शेवट पाहून मुख्य विषय ठरवावा लागतो. या न्यायानें पहिल्या श्लोकात **गमू पंथ आनंत या राघवाचा** अनादी राघवाचा पंथ जाणूया असा प्रारंभ करून २०० व्या श्लोकात **तो गे तोचि गे राम सर्वत्र पाहे** असे दुसऱ्यास सांगून **कदा वोळखी माजि दूजे दिसेना** असा आत्मप्रत्यय सांगून शेवट केला आहे. या मंगलाचरणाच्या श्लोकांत प्रथमच्या तीन ओळीत **गणेश, शारदा** यांचे रूप सांगून त्यांना नमन केले आहे व राघवाचा मार्ग जाणूया असा उद्देश सांगितला आहे.

येथे गणेश हा शब्द **ईश्वरवाचक** शारदा **मायावाचक** व आनंत व राघव हे शब्द **ब्रह्मवाचक** आहेत. हा श्लोक पुढील तत्त्वविवेचनाचा पाया आहे. तो नीट समजून घेतला पाहिजे. यासाठी समर्थांचे काही सिध्दान्त व काही शब्दांच्या व्याख्या नीट समजणे आवश्यक आहे. ब्रह्म म्हणजे निर्मळ, निश्चल, शुध्द चैतन्य त्याला माया म्हणजे कल्पना हिचा विटाळ नाही. आत्मा, अंतरात्मा-आत्माराम = कल्पनेची किंवा मायेची उपाधी असलेले ब्रह्मचैतन्य. हाच ईश्वर, हीच जाणीवशक्ती, पुरूष. माया = कल्पनेचे स्फुरण, हीच शब्दसृष्टी:, आनंत = अनंततत्त्व. राघव = शुद्ध ब्रह्म. समर्थ सिद्धान्त - **देव अन्तरात्मा सगूण। सगुणे पाविजे निर्गुण।। सगुणी भजावे। निर्गुणी अनन्य व्हावे।। स्तवन, भजन, भक्तीभाव, मायेवाचूनि नाही ठाव।।**



**श्लोकार्थ :-** षड्गुणैश्वर्यसंपन्न भगवान् ईश्वर हाच सर्व शिवगणांचा किंवा इंद्रियगणांचा स्वामी गणेश. मायेचा स्वीकार करून अंतरात्माच ईश्वर व गणेशरूपाने नटतो. हा षड्गुणसंपन्न आहे. **भगवान् - ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशस: श्रिय:। ज्ञानवैराग्ययोश्चेति, षण्णां भगइति स्मृति: ।। ऐश्वर्य** म्हणजे जिवाला खरे वाटण्याइतके माया कल्पनेने उभारलेले अघटित घटनापटुत्व. **धर्म** - समत्व, सदयत्व - सर्वसाक्षी. दयाळू सर्व विश्वाच्या चलकत्वामुळे **यश, श्री** म्हणजे, माया, लक्ष्मी. तृष्णाराहित्य: **ज्ञान** म्हणजे बुध्दिवृत्तिप्रकाशकत्व व **वैराग्य** म्हणजे सृष्टिमिथ्यत्वामुळे अलिप्तता. असा हा ईश्वर - **आत्माराम** तोच **गणेश**. ज्ञानेश्वरांनी - ज्ञानेश्वरीत **देवा (आत्मारूपा) तूच गणेशु** असे वर्णन केले आहे. **गणाधीश -** ब्रह्माचे पहिले सगुण रूप. निर्गुणाला सगुणत्व प्राप्त झाले ती प्रथम भूमिका. **मुळारंभ - जो कर्तृत्वास आरंभ। मूळ पुरूष मुळारंभ। जो परात्पर स्वयंभ। आदि अंती।।** (दा. ७-१-६) असे गणेशास नमन करून मग शारदेस नमन केले आहे.

**शारदा :-** शब्दमूळ वाग्देवता माहंमाया **तिही वाचा अन्तरी आले। ते वैखरिया प्रगट केले। म्हणून कर्तृत्व जितुके जाले। ते माया गुणे।।** ज्ञानेश्वरांनी **आतां अभिनव वाग्विलासिनी। जे चातुर्यार्थ कलाकामिनी। ते शारदा विश्वमोहिनी। नमस्कारिली मियां।।** ह्या शब्दांत शारदास्तवन केले. गणेश शारदेचे स्पष्ट स्वरूप-निर्गुण निराकाराचे ठिकाणी बहुविध व्हावे, अनंत रूपांनी नटावे, हे जे स्फुरण तीच मूळ माया. स्फुरण म्हणजे वायु + जाणीव. वायू = प्रकृती, शक्ती, शारदा व जाणीव = पुरूष, ईश्वर, गणेश. उभयतापासून त्रिगुण, सत्व = जाणीव, रज = जाणीव नेणीव व तम = नेणीव - म्हणजेच विष्णु-ब्रह्मा-शंकर.

इतके नमन करून मग उद्देश सांगितला - गमू पंथ आनंत. यातील आनंत हा शब्द पंथ व राघव या दोन्हीकडे घेता येईल. अनादि असा परमार्थ पंथ - अनंत राघव - **सत्यं ज्ञानं - अनंतं ब्रह्म** असा राघव देशकाल वस्तु परिच्छेदरहित म्हणजे मर्यादारहित - अमर्याद. मनाचे श्लोक १४६ ते १५० **मना संत आनंत शोधून पाहे** असे राघव स्वरूप सांगतात. आनंत राघव याचा स्पष्ट खुलासा श्लोक १६९ त आहे. समर्थांचे उपास्य दैवत सगुणब्रह्म दाशरथी राम, पण ते तेथेच थांबत नाहीत. कारण **प्रकृती मधील देव। तो प्रकृतीचा स्वभाव ।। राम हा कालचा सुत दशरथाचा अनंतयुगीचा आत्माराम:।।** म्हणून सगुणरामरूपाचा आश्रय करून, त्याची कृपा संपादन करून, चंचल देवतेच्या

आधारे  निश्चळ ब्रह्म अनुभविण्याचा मार्ग जाणूया असे ते म्हणतात.

सारांश - ब्रह्म विद्येचा अनादि पंथ जाणणेसाठी हे मनाचे श्लोक आहेत. **उपासना म्हणिजे ज्ञान। ज्ञान पाविजे निरंजन। योगियांचे समाधान। येणे रिती॥** (दा. २०-४-२२) एकवचनी, एकबाणी, एकपत्नी इत्यादि गुणधर्म प्रकृतीचे. ते बाजूस सारून ज्यावर ते गुण नांदले ते खरे रामरूप, रामाचे खरे रूप मायातीत आहे. **मायातीत अनन्ताची। संत सोय सांगती॥** राघव पंथ म्हणजे काय ? स्व. स्वरूपापासून भ्रष्ट झालेल्या जिवास ब्रह्मज्ञान होईपर्यंत सात अवस्थांतून जावे लागते. (रामगीता)

(१) **अज्ञान -** आपण  ब्रह्म  याचा विसर. जीव, जगत्, ईश्वर यांचा विचारही नाही.

(२) **आवरण -** अज्ञानाच्या आवरणशक्तीमुळेच मूळ रूप झाकले जाणे.

(३) **विक्षेप -** पदार्थ आहे तसा न भासता निराळा भासणे. जीव कर्ता भोक्ता आपणच असे वाटणे. या तीन अवस्थांमुळे बंध.

(४) **परोक्ष ज्ञान -** डोळ्याआड वस्तूचे शाब्दिक ज्ञान.

(५) **अपरोक्ष -** प्रत्यक्ष अनुभव ज्ञान.

(६) **तृप्ती -** योग ज्ञानामुळे होणारे समाधान.

(७) **शोकापगम** - समाधानाने प्राप्त होणारी निर्भयता, शोकनाश, दु:ख निवृत्ति, चिरंतन सुख.

***

**मना सज्जना भक्ति पंथेचि जावें।**
**तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावें।**
**जनीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें।**
**जनीं वंद्य तें सर्व भावें करावें॥२॥**

(१) राघव पंथ म्हणजे ब्रह्म प्राप्तीचा मार्ग. तो आक्रमण करताना जिवाला  सात अवस्थांतून कसे जावे लागते हे सांगून शेवटी दु:ख निवृत्ती व आत्यंतिक सुखप्राप्ती यासाठी मनाला उपदेश, असे प्रास्ताविक करून ह्या श्लोकापासून मनाला उपदेश सुरू केला आहे. हा उपदेश, मुमुक्षु व साधक यांचे मार्गदर्शनासाठी आहे; असे कोणी म्हणतात. परंतु फलश्रुतीच्या २०५ व्या श्लोकावरून,  तो  केवळ त्यांच्यापुरता मर्यादित नसून इतरही या उपदेशास पात्र



आहेत. **मानत मानत न्यावें पैलीकडे.** अशी ही शिकवण आहे. २) मनाला सज्जन का म्हटले,चंचल मनाला गोड गोड शब्दांनी आळवून, उत्तेजन देऊन, भक्तिमार्गाकडे वळविणेसाठीच हा गौरव. **दुर्जन प्राणी समजावे। परिकळोचि नेदावें। सज्जना परीस आळवावे। महत्त्व देउनी॥** (दा. १९-९-२३) पण मन दुर्जन तरी कसे ? - याचा व्यापक अर्थ लक्षात न घेता, ते वाईट, चंचल समजून पारमार्थिक साधक हिरमोड पावतात. सूक्ष्म विवेकाने ते दुर्जनाचे सज्जन ठरवावे. एखादा घरंदाज मनुष्य दुर्दैवाने खाली आला, तरी त्याच्या गुणावरून  तो दुर्जन ठरत नाही. उमदे घोडे पागेत राहील ? सिंह प्रेते उकरील ? मन सुख असेल तेथेच उडी घेते. त्याला सर्वकाल चांगलेच आवडते. खेळकर पोराप्रमाणे ते कोठेही आनंद शोधते. त्याचा जन्म आनंदसागरात. मनाचे मूळ पहिले अहंस्फुरण. लाट म्हणजे समुद्र-पाणीच ना ? मन म्हणजे भगवद्विभूती ना ? मग ते दुर्जन कसे असेल ? ब्रह्माचा अंश जो जीव, तो आपल्या पित्याप्रमाणे आनंदात राहणारा शूरवीर असेल म्हणून हे चाकरीस राहिले. पण मालक जीव विषय विषच पीत असलेला पाहून मनही विषयातच आनंद शोधू लागले. जीव ब्रह्मानंद चाखेल व मनालाही तो झरा दाखविल तर मनही आनंदात राहील. त्याला आनंद दाखविणे हे जिवाचे काम. ते जिवाला सोडत नाही. पण जीवच त्याचे मागे धावतो, म्हणून ज्ञानोबा यथार्थतेने म्हणतात, **'का या मनाचे एक निके। जे देखलिया गोडी ठाई सोके। म्हणूनि अनुभवसुखचि कौतुके। दावित जाईजे॥'** **तुकाराम म्हणतात, 'मन करारे प्रसन्न। सर्वसिध्दीचें कारण। मोक्ष अथवा बंधन। सुख समाधान इच्छाते। साधक वाचक पंडित। श्रोते वक्ते ऐका-मात। नाहीं नाहीं आन दैवत। तुका म्हणें दुसरें॥'** (गा. ३७३३)

असे हे मन दर्जन कसे ? सज्जनच. म्हणून (३) मना सज्जना भक्ति पंथेचि जावे. येथे चकार घालून काय साधले ? (१) **माया म्हणिजे भगवच्छक्ति। भगवद्भजनें तिची निवृत्ति। आन उपाय तेथें न चलती। भक्त सुखें तरती हरिमाया॥** (ना. भा. २-४६४) राजाचे हुकमानेच बेडी पडते व हुकमानेच बेडी निघते. (२) अन्य मार्गापेक्षा अधिक सोपा मार्ग. **सा तु  कर्मज्ञान-योगेभ्योऽप्यधिकतरा फलरूपत्वात्।** ( ना. भ. सूत्र २६ ) ईश्वर प्राप्तीच्या  अन्य तीन  मार्गापेक्षा - कर्मज्ञान  योगापेक्षा  भक्ती  श्रेष्ठ. इतर मार्गात मर्म न समजले तर खळगे फार ! कर्माचा कर्मठपणात, ज्ञानाचा अभिमानात व योगाचा दंभात परिपाक पुष्कळ वेळा दिसतो. कर्मज्ञान योगात अभिमान होतो.

ईश्वराला अभिमान सहन होत नाही. **मीपण कोणासीच न साहे। तो भगवंती कैसे नि साहे। म्हणोनि मीपण सोडून राहे। तोचि साधू।** (दा. ७-७-५०) देवाला दीनता आवडते. ती भक्तीत असते म्हणून **'भक्त्या हमेकया ग्राह्य:'** दुसरी गोष्ट म्हणजे भक्ती फलरूपिणी आहे. ती केवळ साधन नाही तर साध्य आहे. भक्ती हेच भक्तीचे फळ.जोंधळा पेरावा - कणीस घ्यावे. प्रेमानें प्रारंभ, प्रेमाने प्रगती, व प्रेमात शेवट. देवाला भजावे आणि देव व्हावे. यात जात, वय, परिस्थिती कशाचीही अपेक्षा नाही. अन्त:करणपूर्वक देव हवासा झाला की तो भक्तकोटीत प्रविष्ट झालाच. देवाला जाणावयाचे ते भक्तीनेच. **भक्ती ज्ञानाची माउली। करी कृपेची साउली। जिणे नामरूपा आणिली। ब्रह्ममूर्ती भली अनायासे।।** म्हणून भक्ति पंथेचि जावे.

(४) **स्वभावे** - सहज, अप्रयासाने **मुक्ति: स्याद प्रयासेन भक्ति मार्गानुवर्तिनाम्।** सहज मुक्ति किंवा सहज देव का पावतो ? भक्तिचा फलरूपिणी स्वभाव व रंगेल तेथे तद्रूप होण्याच्या मनाच्या स्वभावामुळेच.

(५) **जनी निंद्यते** - वंद्य व निंद्य म्हणजे चांगले व वाईट. याबद्दल सामान्यजनात एकवाक्यता नसते. एकाला बरे वाटणारे दुसऱ्याला वाईट वाटते. म्हणून जनी जनार्दन अनुभविलेल्या सज्जनांनी, म्हणजे शास्त्रांनी जे बरे म्हटले ते करावे व जे वाईट म्हटले ते त्यागावे. कारण सर्व सज्जनात सत् व असत्चा विचार एकच असतो. **तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्य व्यवस्थितौ। कार्याकार्य विवेकी। शास्त्रेचि करावी पारखी। अकृत्य कुडे ते लोकी। वाळावे गा।।** राजाचे भेटीस स्वच्छतेने जावे लागते. ईश्वर भेटीस अंतरंग स्वच्छ आवश्यक असतो.

(६) हा समर्थ उपदेश लिहिताना समर्थांचे मनात गीतेतील **दैवी ह्योषा गुणमयी मम माया दुरत्यया।** (भ. गी. ७-१४) व **न मां दुस्कृतिनो मूढा:** (भ. गी, ७-१५) हे दोन श्लोक आले असावेत. ज्ञानेश्वरांनी ह्यावर भाष्य करताना **येथ येकचि लीला तरले। जे सर्व भावे मज भजले। तयां ऐलीच थडिये सरलें मायाजळ।।** (ज्ञा. ७-९७) व दृष्कृती - मनुष्य निंद्य कर्म करताना **ते वेळीं नियमांचे वस्त्र नाठवे। पुढील अधोगतीची लाज नेणवे। आणि करितात जें न करावें। वेदु म्हणे।** (ज्ञा. ७-१०४) असे उद्गार काढले आहेत. वंद्य स्वीकारावे का, निंद्य टाळावे का, याचे उत्तर वरील भाष्यात सापडते. **म्हणोनि ते माते चुकले।** (ज्ञा. ७-१०८) हिंसा, असत्य, दुराचार इत्यादीत प्रवृत्त होणारे पापी लोक भगवन्निष्ठ होऊ शकत नाहीत. म्हणून **जनी निंद्य ते सर्व सोडूनि द्यावे।**



**जनी वंद्य ते सर्व भावे करावे।**

(७) **सर्व भावे करावे :-** भाव हा शब्द श्रद्धा, प्रेम, भक्ती, विश्वास अशा अनेक अर्थी वापरतात. येथे भाव म्हणजे श्रद्धा. जे वंद्य, करण्यास योग्य असेल ते श्रद्धेने करावे. हे करण्यात कल्याणच होणार असा विश्वास असावा. श्रध्दा हे परमार्थात महत्त्वाचे भांडवल आहे. **श्रद्धावान् लभते ज्ञानं।।** कोणतेही कार्य श्रध्देने केले तर फलद्रुप होते. **अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तपं कृतं च यत्। असदित्युच्यते पार्थ न च तत प्रेत्य ना इह।** (भ. गी. १७-१८)

***

**प्रभातें मनीं राम चिंतीत जावा।**
**पुढें वैखरीं राम आधी वदावा।**
**सदाचार हा थोर सांडूं नये तो।**
**जनीं तोचि तो मानवीं धन्य होतो।।३।।**

(१) भक्ती पंथानेच जावे असें ठरल्यानंतर नवविधा भक्तींपैकी कोणते साधन स्वीकारावे हे सांगतात. एकाच ध्येयाच्या अनेक वाटातील सोपी व जवळची वाट दाखवितात. ह्या प्रभावी साधनांवर सर्व संतांची एकवाक्यता आढळते. याला स्थल - काल - मर्यादा नाही. सर्वांना अधिकार. ते साधन म्हणजे नाम. **सोपे सर्वाहूनी नाम तेचि तत्त्व।।** येथे जो प्रथम चरण आहे तोच शेवटी ठेऊन श्लोक ६७ ते ७७ दाशरथी सगुणरामरूप सांगून नाम महात्म्य सांगितले आहे. नवख्या साधकास भगवंताचे अजत्वे जन्मणे, अक्रियत्वे कार्य करणे इत्यादि विभूतिमत्व तत्वत: थोडेच माहित असते ? म्हणून चिंतीत जावा याचा अर्थ सगुण शामसुंदर रामरूप आठवून त्याचे नाम घ्यावे. दिनकर गोसावी चिंतन याचा अर्थ मनाने नाम घेणें असा करतात. नाम घेणेचे प्रकार चार. **स्मरण म्हणिजे जे मुखे नाम उच्चारावे। चिंतन जे निज अंतरीच स्मरावे। अनुसंधान ते चालतसे स्वभावे। इडा पिंगळा संयोगे। चौथे निजध्यासन म्हणिजे एकात्मता। नाहं पणे सहज स्थिति ब्रह्मीं ऐक्यता।** पहाटे नाम मनात स्मरावे. त्यावेळी सर्व वृत्ती शांत असतात. बाहेरही स्तब्धता असते. मन लगेच एकाग्र होते. चिंतनानंतर वाणीने नाम चालू ठेवावे. आधी ह्या शब्दामुळे कांहीही भाषणापूर्वी असा कोणी अर्थ करितात. असे नाम चालू असता दुर्गुणांचा त्याग व सद्गुणसंपादन हे आवश्य आहे. कारण दुर्गुणामुळे जेथें व्यवहार नासतो तेथे परमार्थ कसा नांदणार ? दुराचरणी हा शांतचित्त, समाधानी राहू शकत

नाही. सद्गुणावाचून दैवी संपत्तीविना ईश्वरप्राप्ती नाही, असे सर्व संत एकमुखानें सांगतात. सर्वदा विषय चिंतन करणाऱ्या मनाला ईश्वर चिंतन कसे होईल ? शुध्दचरण व नामस्मरण याने मनुष्याला धन्यत्व प्राप्त होते म्हणून सदाचार हवा. **अनाचारस्तु मालिन्यं। अत्याचारस्तु मूर्खता। विचाराचार संयोग:। सदाचार: स उच्चते।। विवेके क्रिया आपुली पालटावी। अती आदरे शुध्द क्रिया धरावी.** भ्रष्ट तो वेदांती नव्हेच. तो करंटा पाखंडी, अगदी बोध झाला तरी **विषयी विसर पडिला नि:शेष। अंगी ब्रह्मरस ठसावला** ही स्थिती प्राप्त होईपर्यंत सदाचार, भजन, पूजन साधन सोडताच येत नाही. परमार्थ एकदेशी नको. शुध्द सत्वगुणाने. सर्व क्रियेत राहून अलिप्त राहिले पाहिजे. सदाचाराविना लीनता नाही. **अर्जुना तव वरी युक्त साधन। देहेंद्रिया की जें दमन। जव हाताशी चढें आत्मरत्न। निजवस्तू।।** नाहीतर तेलही गेले तूपही गेले हाती आले धुपाटणे म्हणून **बाह्य विभागू। कर्मे धुतला चांगू। ज्ञाने फेडिला व्यंगू अंतरीचा।।** असे अंतर्बाह्य निर्मळ व्हावे लागते. कर्माचे प्रकार दोन. **उचित** - ज्यानें ध्येय प्राप्ती होते व **अनुचित** - ध्येय प्राप्ती न होता उलट अपायच होतो. जे कर्म ईश्वरप्राप्तीला सहायक होते तेच सत्कर्म, तेच पुण्य, तेच करणीय, तोच सदाचार, **कर्मचैव तदर्थीयं सदित्ये वा भिधीयते।** जन्म पूर्व कर्म परमेश्वर जाणे. मेल्यानंतरही तोच जाणे. जन्मापासून मरेपर्यंत तेवढे आपण जाणकार काय ? **निमित्ताचा धनी। केला असे प्राणी। माझे म्हणुनी व्यर्थ गेला।।** आलिया संसारा सर्व खेळ विश्वकर्त्याचा. **करणे का न करणें। हे आघवे तोचि जाणे। विश्व चळतसे जेणे। परमात्मेनी।।** अध्यात्माची सर्व बैठक ह्या निश्चित बुध्दीवर आहे. बुध्दीचे आत्म्याशी लग्न लावणे हाच परमार्थ. ती बुध्दी कुलवती व्हावी यासाठी सदाचार. म्हणून संतांच्या मोक्ष विचारानेच कर्म चालले पाहिजे. ज्ञान्याची कर्म बैठक **अंत:स्त्यागी बहि:संगीच** असते. अंतरी निर्मळ असेल त्याचे **गळा माळ असो नसो.**

परमेश्वराने नरदेह दिला. म्हणून त्याचे उत्तराई होण्यासाठी सत्कर्म केले पाहिजे. त्यानेच तो तृप्त होतो. **स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिध्दिं विंदति मानव:।** (भ. गी. १८-४६) **तया सर्वात्मका ईश्वरा। स्वकर्म कुसुमांची वीरा। पूजा केली होय अपारा। तोषालागी** (ज्ञा. १८-९१७) यानेच प्रपंच वैराग्यसिध्दी होते. समर्थ म्हणतात, गृहस्थाश्रमीचा यातच त्याग आहे, यानेच वैराग्य वाढ होते. **सन्मार्ग तो जीवी धरणे। अन मार्गांचा त्याग करणे। संसारिका त्याग येणे। प्रकारे ऐसा। कुबुध्दी त्यागेवींण कांही। सद्बुध्दी लागणार नाही। संसारिका त्याग**



**पाही। ऐसा असे।।** (दा. ५-१०-२,३) म्हणून चित्तावर लक्ष पाहिजे. **न कर्मणा न प्रजया धनेन त्यागेनैकेन अमृतत्वम्.** विहित स्वीकारावे. **जनी तोचि तो मानवी धन्य होतो** - अशा सदाचाराने चालू मानवी जीवनाला धन्यत्व प्राप्त होते. म्हणजे मनुष्य म्हणवून घेण्याची पात्रता येते. नाहीतर तो पशूच. **नरदेह परम पावन। पावोनि न साधी ब्रह्मज्ञान। तो लांडा गर्दभ जाण। पुच्छेवीण दुपायी।।** म्हणून जेणे प्रकारे हरीची प्राप्ती होईल असा कर्मेंद्रियाने सदाचार, मुखाने नामोच्चार व ज्ञानेंद्रियाने सद्विचार करून हरीला आळवणे उचित. त्यायोगे मानवी जीवन धन्य.

★ ★ ★

**मना वासना दुष्ट कामा न ये रे।**
**मना सर्वथा पापबुध्दी नको रे।**
**मना धर्मता नीति सोडूं नको हो।**
**मना अंतरी सारविचार राहो ।।४।।**

श्लोक संगती :- बाह्य सदाचाराबरोबर अंतरंगही शुध्द पाहिजे. नाहीतर तो मिथ्याचार होतो. **कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन्। इंद्रियार्थान् विमूढात्मा मिथ्याचार: स उच्यते।।** (भ. गी. ३-६) म्हणून मनात- अंत:करणात दुष्ट वासना असता कामा नये. दैवी संपत्तीस पोषक अशाच वासना हव्यात. वासनेचे स्वरूप काय ? **तरी पूर्व कर्माचे नि संस्कारे। जे जे वृत्तीसी पदार्थ स्फुरे। ते ते जाणावी निधारे। वासना चतुरे इयापरी। तोचि संस्कार वासना रूपे।।** (यो. वा) ही वाढते कशी ? स्वस्वरूप विसरून. ''अहंदेह'' हा संकल्पच वासना वाढ करणारा आहे. स्वसुख गोडी माहीत नसल्यामुळे देहसुखार्थ विषय- वासना म्हणजे संस्कारानुरूप आवडत्या वस्तूंची इच्छा हवेपणा. हिच्या तीन अवस्था आहेत. **आस** - केवळ हवीशी वाटणे; **हव्यास** - ती नेहमी जवळ असावी व कितीही मिळाली तरी संतोष नसणे; **ध्यास** - वस्तूशिवाय दुसरे कांही न सुचणे. ही वासना अग्नीसारखी आहे. अग्नीमुळे स्वयंपाक होऊन अन्न मिळते, पण तोच घरही जाळतो. वासनेचे दोन प्रकार आहेत. मलिन किंवा दुष्ट म्हणजे विषयवासना व शुध्द किंवा सुष्ट वासना. त्यात पुन्हा तर - तम भेद आहेत. शुद्धतर - स्नान, संध्या, देवतार्चन इत्यादि. शुध्दतम - वेदान्त विचार, महावाक्य श्रवण, समाधि इत्यादि. विषयाकडे वासना वळली की दु:खाला कारण होते व भगवंताकडे वळली की सुखाला, आनंदाला

कारण होते. भगवत्पदाशिवाय (कारण पूर्णत्व) ती कोणत्याही उपायाने नष्ट होत नाही. **'वासना'** - विषयाजवळ वास नको. स्थूलदेह येथे पडला तरी ती सूक्ष्म देहाबरोबर येते व दुसरा जन्म भोगवते. **जन्म घेणे लागे वासनेच्या संगे।** म्हणून विषयावासना दुष्ट. हवे नको याचा आग्रह सुटला की ती मरते, म्हणून वासना पुष्ट होऊ न देण्यास उपाय एकच - **तरी स्वरूपाचे नि विस्मरणे। जो संकल्प उठ देहपणे। तो उठो नेदावा सावधपणे। वासना जेणे प्रौढ नव्हे।।** यासाठी अखंड रामनाम. सर्वथा - म्हणजे केव्हाही मुळीच पापबुध्दी नको. पाप - शास्त्र विरूध्द निषिध्द कर्माकडे प्रवृत्ती - विपरीत कर्म. **पाप त्याचे नाव न विचारी नीत। भलतेच उन्मत्त करी सदा।।** पाप तीन प्रकारचे असते. **कायिक** - मोबदल्याशिवाय वस्तू स्वीकारणे, अभक्ष भक्षण, अपेय पान, परदारारति. **वाचिक** - कठोर किंवा असत्य भाषण, असंबध्द प्रलाप. **मानसिक** - अपहार-वासना, अहित चिंतणे, मत्सर. या पाप वृत्तीचे कारण काय ? ही जीवाची सहजप्रवृत्ती आहे. **वेदें न करितां प्रेरणा। विषयांवरी सहज वासना। स्वभावें सकळ जनां। सदा जाण सर्वांसी।** (ना.भा. ५-२०८) **अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरूष:** (भ. गी. ३-३६) ह्या अर्जुनाच्या प्रश्नाला श्री भगवान लगेच उत्तर देतात. **काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भव:** (भ. गी. ३-३७) **तरी हे काम क्रोधू पाहीं। जयातें कृपेची साठवण नाही। हे कृतांताचां ठायीं। मानिजती।।** (ज्ञा. ३-२४०) स्वाभाविक विषयासक्ती, इंद्रिय निग्रहाचा आभाव, त्यामुळे पापप्रवृत्ति या सर्वांस कारण हे मनोविकारच. रजोगुणात्मक मन 'हे भोग्य हे सुखकर' असा संकल्प करते. त्यामुळे पापप्रवृत्ति. म्हणून मनाला उपदेश.

धर्माला अनुसरून असलेला आचार किंवा नीती सोडू नको. नीती हा शब्द व्यापक अर्थी योजिला जातो. नीती शब्दाचा अर्थ वागण्याची रीत किंवा आचार येवढाच आहे. व्यवहाराने, लैंगिक अर्थाने तो बहुधा वापरला जातो. पण धर्माला अनुसरून वागणे - **धर्मनीती.** राजकारणातील आचार- **राजनीती,** युध्दातील - **युध्दनीती.** डावपेच - **कुटिल नीती.** असा हा व्यापक अर्थी शब्द आहे. येथे धर्मता नीती म्हणजे धर्मनिष्ठेने होणारा आचार सोडू नको. असे म्हटले आहे. धर्माचार म्हणजे वर्णाश्रमविहित आचार. गीतेत तो स्पष्ट केला आहे. **शमो दमस्तप:शौचं....** (भ. गी. १८-४२) इत्यादि ब्राह्मणांचा, **शौर्यतेजो....** (भ. गी. १८-४३) इ. क्षत्रियांचा. **कृषिगोरक्ष्य वाणिज्यं .....** (भ. गी. १८-४४) इत्यादि वैश्यांचा व **परिचर्यात्मक कर्म** -



शूद्रांचा धर्म होय. परंतु व्यक्ती व समाज दोघांच्याही कल्याणार्थ मनूने दशलक्षणात्मक धर्म सांगितला आहे तो ''धर्मतानीति'' सोडू नको या उपदेशाला अनुसरून सर्वही काली युक्त होय. **धृति:क्षमादमोऽस्तेयं शौचमिंद्रिय निग्रह:। धीर्विद्या सत्यमक्रोधो दशकं धर्म लक्षणं।** धी = स्वधर्मात अविचल, निश्चल अशी बुध्दी, विद्या = वेदविद्या - ब्रह्मविद्या. क्रोध = दुसऱ्याचे वाईट करण्याची वृत्ती.

सर्व सृष्टी जर ब्रह्मरूप तर सार-असार अशी निवड का ? भौतिक पदार्थात अस्ति, भाति, प्रिय, नाम आणि रूप असे पाच अंश प्रतीत होतात. पहिले तीन ब्रह्मरूप अंश आहेत व शेवटचे दोन कल्पित आहेत. व्यवहारात शाश्वत वस्तू इष्ट वाटते. मग परमार्थात तशी का नको ? वागण्यात भेद ठेवणे व सर्व ब्रह्म म्हणणे विपरीत नाही का ? साधे मडकेसुध्दा वाजवून घेण्याचा प्रघात आहे. **माती सांडूनि सोने घ्यावे। धोंडे सांडूनि अन्न घ्यावे। आणि अवघेची सार म्हणावे। बाष्कळपणे।। म्हणोनि हा विचार करावा। शाश्वत सत्य ते सार।।** तेच परब्रह्म हे ध्येय गाठावयाचे स्मरण अंतरी असावे.

म्हणून **पिंडीं नित्यानित्य विवेक। ब्रह्मांडी सारासार अनेक। सकळ शोधूनियां येक। सार घ्यावें।।** (दा. १८-५-३१)

★ ★ ★

**मना पापसंकल्प सोडूनि द्यावा।**
**मना सत्यसंकल्प जीवीं धरावा।**
**मना कल्पना ते नको वीषयांची।**
**विकारें घडे हो जनीं सर्व ची ची ।।५।।**

मागील श्लोकात दुष्टवासना नको, पापबुध्दी नको, धर्मनीती असावी, सार वस्तूंचे ग्रहण करावे, असे सांगितले. पण हे सारे संकल्पावर अवलंबून आहे. सर्व प्रवृत्तींचे कारण - काम म्हणजे वासना, त्या कामाचे कारण संकल्प. संकल्पाचा त्याग म्हणजे वासनेचा त्याग. दुष्ट संकल्पापासून दुष्टवासना उद्भवते. **संकल्प प्रभवान् कामांस्त्यक्त्वा सर्वांनशेषत:।** (भ. गी. ६-२४) पापबुध्दी नको असेल तर पापसंकल्प सोडून दिला पाहिजे. **पाप संकल्प** - अशुध्द, मलीन, अज्ञान, द्वैतकल्पना, का होतो ? अनादि, अज्ञान व तत्संस्कारजनित विषयासक्ती यामुळेच पापसंकल्प होतो. अध्यात्मशास्त्र सांगते की, देहेंद्रियाचे ठिकाणी 'अहंममत्व' म्हणजे देह व इंद्रिये म्हणजे मी असे

वाटणे - हाच पापसंकल्प हा संकल्प दृढ असतो. देहाची व इंद्रियांची जाणीव सुषुप्तीत नसते. म्हणून त्या अवस्थेत विषय प्रवृत्ती नाही. जागृतीत देहतादात्म्य आले की विषयासक्ती आलीच. म्हणून देह म्हणजे मी असा संकल्प हेच पापसंकल्पाचे लक्षण होय. नाथ म्हणतात, **'मी देह म्हणता ब्रह्महत्या कोटी। येऊनिया पाठी थोपटीती ॥' 'देह मी वाटे ज्या नरा। तो जाणावा आत्महत्यारा। देहाभिमानें येरझारा। भोगिल्याच भोगी॥'** (दा. ५-६-१५) बोलतांना मात्र मनुष्य आपण देहमनाहून भिन्न असे बोलतो, पण घोर अज्ञानामुळे त्याची जाणीव बुध्दीत येत नाही. माझा देह, माझा डोळा, माझे मन या शब्दांनी मी या सर्वाविगळा आहे असेच तो सूचित करीत नाही का ? **माझा देह ऐसे म्हणतो। तरी देहा वेगळाचि तो। मन माझे म्हणतो। तरी तो मनही नव्हे॥** देह इंद्रियादिकांचे तादात्म्यामुळे असे बोलत असूनही जाणत नाही हेच पाप. श्रुति म्हणते, **'अन्यथा संतमात्मानमन्यथा प्रतिपद्यते। किं तेन न कृतं पापं चोरेणात्मापहारिणा।'** आत्माचौर्य हेच घोर पाप ! सारांश, स्वरूपाचे अज्ञानामुळे देहबुध्दी, त्यामुळे विषयासक्ती व त्यामुळे अशुभकर्म - म्हणजे पाप. अशी ही पाप - संकल्पाची प्रवृत्ती आहे. म्हणून 'मना पाप' संकल्प सोडून द्यावा.' मग 'सत्य संकल्प जीवी धरावा' म्हणजे सत्य संकल्पाचा जिव्हाळा ठेवावा. **अद्वैत कल्पी ते शुध्द। द्वैत कल्पी ते अशुध्द॥** सत्य संकल्प म्हणजे शुध्द कल्पना जागृत ठेवावी. ती म्हणजे **'सोऽहं'** तोच मी परमात्मा असा सत्यब्रह्माचा संकल्प. **सोऽहं आत्मा स्वानंदघन। अजन्मा तो तूचि जाण। हे साधूचे वचन। सुदृढ धरावे।** (दा. ८-८-३३) आत्मसाक्षात्काराविना उगीच मी आत्मा आहे असे चिंतन करून काय उपयोग असे वाटेल. पण संत म्हणतात, की तसे अट्टाहासाने चिंतन करा. तोंडाने तरी वरचेवर तसे म्हणा. श्री वासुदेवानंद म्हणतात - **'मी ब्रह्म न संसारी। हे चिंतिजे अंतरी। हे चिंतन न घडे तरी। वाक्य उच्चारी हे नित्य॥'** या अभ्यासाने **भ्रमर कीटवत। ब्रह्मभाव होय निश्चित। संशय सोडून सतत। करावा निश्चित अभ्यास हा॥** कारण मी देही जीव हा अज्ञानाने अंत:करणावर बसलेला चिवट संस्कार, सोऽहं ह्या संस्काराचे माऱ्याशिवाय दूर होत नाही. **कल्पनेनें कल्पना सरे। ऐसी जाणावी चतुरें। सबळ गेलिया नंतरे। शुध्द उरली॥** (दा. ७-५-३८) मी देह हा असत्य संकल्प, मी ब्रह्म ह्या सत्य संकल्पाने पुसून टाकायचा. हे आत्मचिंतन कसे केले जाते हे रामगीतेत राम लक्ष्मणाला सांगतात - **'प्रकाशरूपो ऽहमजो ऽ हमद्वयो सकृद्विभावोऽहमतीव निर्मल: ॥'** या सत्य संकल्पाने आपले स्वरूप निश्चित होते



आणि विषय संकल्पात मन गुंतले तर हाल विचारू नका. म्हणून **मना कल्पना ते नको वीषयांची** - कल्पनेवाचून प्राण्याची हालचालच नाही. तो निजला तरी ती डोक्यात राहते. जीव गेला तरी वासनारूपाने ती जिवंत राहते. सुख, दु:ख, बंध, मोक्ष या द्वैताला कारण तीच. आत्मज्ञान झाले म्हणजे जिवाबरोबर ती सती जाते. आचार, उच्चार, विचार या सर्वांचे मूळ कल्पनाच. विषय कल्पना का नको ? कारण विषयातील अनित्यता हीच दु:खाला कारण आहे. वास्तविक विषयांमुळे जे सुख झालेसे वाटते. ते विषयातील सुख नसून, क्षणिक वृत्ति स्थिर झाल्यामुळे आत्मसुखच असते. पण अज्ञानामुळे याची जाणीव नसते. विचाराअंती विषय दु:खरूप हेच प्रतीतीला येते. ही दु:खे चार प्रकारची आहेत. (१) **परिणाम दु:ख** - इंद्रियशिथिलता. भोगान्ती प्रतिक्रियारूप मनस्ताप, व अनुताप (२) **ताप दु:ख** - रोगोत्पत्ती जरा, अकाली मृत्यू. **अधिकारिया रिगतां गांवो। होय जैसा उत्साहो। कां ऋणावरी विवाहो। विस्तारिला॥** (ज्ञा. १८-७९५) (३) **संस्कार दु:ख** - जसजसे विषयसेवन होत जाते, तसतसे संस्कार निर्माण होऊन अधिक विषय प्रवृत्ती होते. शेवटी तृप्ती नाही ती नाहीच. **विषय सेविता कोण तृप्त झाला। इंधने निमाला अग्नी कोठे॥ (४) गुणवृत्ती विरोध** - विषय सात्विक असेल तर राजस-तामस वृत्तीचा विरोध. **ये हि संस्पर्शजा भोगा दु:खयोनय एव ते। आद्यन्तवन्त: कौंतेय न तेषु रमते बुध:।** (भ. गी. ५-२२) **म्हणोनि विषय - भोगीं जे सुख। तें साद्यंतचि जाण दु:ख।परि काय करिती मुर्ख। न सेवितां न सरे।** (ज्ञा. ५-१२०) **सांडूनि राम आनंदघन। ज्याचे मनी विषय चिंतन। त्यासि कैसे समाधान। लोलंगतासी॥** (दा. ३-१०-६२) विषयवासनेने मन विकारी होऊन जगात फजितीच होते. म्हणून **'विकारे घडे हो जगीं सर्व ची ची.'** मनाचे विकार पंचवीस आहेत. काम, क्रोध, लोभ, मद व मोह, मत्सर हे त्यात प्रभावी आहेत. म्हणून ह्यांना षड्रिपू म्हणतात. त्यांचे योगे कसे अध:पतन होते हे गीतेत सांगितले आहे. **ध्यायतो विषन्पूस:।** (भ. गी. २-६२,६३)

★ ★ ★

**नको रे मना क्रोध हा खेदकारी।**
**नको रे मना काम नानाविकारी।**
**नको रे मदा सर्वथा अंगिकारू।**
**नको रे मना मत्सरू दंभभारू॥६॥**

मागील श्लोकात विषयाकडे धावणारे मन विकारी होऊन प्राण्याची फजिती किंवा अवनती कशी होते हे सांगितले. विषयाचे ध्यान लागले की मनाने त्याची संगती होते. संगतीमुळे काम उद्‌भवतो. त्यातून क्रोध - मोह स्मृतिभ्रंश - बुध्दीनाश व शेवटी अध:पतन अशी ही विकार परंपरा संभवते. त्या षड्रिपूंचेच आता विवेचन समर्थांनी सुरू केले आहे. प्रथम पाच रिपूंचाच उल्लेख त्यांनी केला आहे. कामाची पूर्तता जशी वाढत जाते तसा लोभ वाढतो. कामपूर्ती, वासनापूर्ती म्हणजेच लोभाचा उदय असल्यामुळे कामात लोभाचा अंतर्भाव होतो. श्लोकात क्रोधाचा उल्लेख प्रथम केला आहे, पण कामातूनच क्रोध उत्पन्न होत असल्यामुळे गीतेच्या संगतीप्रमाणे या रिपूंचा विचार करूया.

काम म्हणजे वासना हेच सर्व विकारांचे मूळ. काम म्हणजे आवडत्या विषयाचा अभिलाष किंवा इच्छा. हा क्षुधितांचा राजा आहे. ह्याची हाव दांडगी असते. मनू म्हणतो 'प्राणी ज्या ज्या चेष्टा करतो त्या कामचेष्टाच होत. इंद्रियांनी घेतलेला भोग कामाचाच. शब्द वासनेमुळे किंवा नाद वासनेमुळे ऐकणे, स्पर्श वासनेमुळे स्त्री-पुत्रादि सुखाची हाव, रूप-वासनेमुळे पाहण्याची उत्सुकता, रस वासनेमुळे जिव्हालौल्य व गंध - वासनेमुळे सुवासिक पदार्थाचा भोग. अशा या **पंचविषय वासनार्थ** सर्व प्राण्यांच्या **चेष्टा** होतात - (क्रिया).

या कामविकारातील मुख्यत्वे तीन विकारांमध्ये मनुष्य जास्त गुरफटतो आणि त्यांच्या तीव्र वासनांमुळे जन्मपरंपरा ओढवून घेतो. या तीन विकारांवर मात करता आली, तर मनुष्याला मरणाचीही भीती नाही. ते विकार म्हणजे आचार्य म्हणतात, **''कांताच जिव्हा-कनकं च तानि रूणद्धियस्तस्य भयं न मृत्यो:''** काम विकारापासून उत्पन्न झालेल्या देहात कामाचे ठाणे असणे स्वाभाविकच आहे. पुरूषाचे ठिकाणचा गुप्त काम उद्दीपित करण्याचे ईश्वरनिर्मित शस्त्र म्हणजे स्त्री. लक्ष्मणाचे मांडीवर सीतामाई झोपली असता, श्रीराम पोपटरूपाने प्रश्न विचारतात. **मनोधावति सर्वत्र मदोन्मत गजेंद्रवत्। अंके स्थिता परस्त्री चेत् कस्य नोच्चलते मन:।।** लक्ष्मणाचे उत्तर - **ज्ञानांकुशे समुत्पन्ने तस्य नोच्चलते मन:।।** नाथ म्हणतात, ''टक्कर खाणारा पुढचा विचार न करता बेगुमान बेसावध होऊन धावतो. तद्वत् तारूण्यात जन्म, मृत्यु, जरा व्याधी यांचा विचार न करता स्त्री मोहाने मनुष्य बेभान होतो. तर जिव्हालौल्यामुळे मनुष्य अभक्षभक्षणादि पापे करतो.

कनक म्हणजे द्रव्य त्याचे १५ अनर्थ आपण अनुभवतोच. **स्तेयं,**



**हिंसा, अनृतं, दंभ:, काम:, क्रोध:, स्मय:, मद:** इत्यादि. असा हा कुमार्गाकडे बलात्काराने प्रवर्तविणारा एक कामच आहे. व्यावहारिक शत्रू, साम-दाम-दंड-भेद वगैरे उपायांनी नाश पावतो. तसा हा छुपा शत्रू बाह्य उपायांनी नाश पावत नाही.

काम प्रतिहत झाला म्हणजे चित्तवृत्ती जलनात्मक होते, ह्या क्षुब्ध वृत्तीलाच क्रोध म्हणतात. कामपूर्ती झाली की, लोभ व काम अपूर्ण राहिला, की क्रोध पुढे होतो. **जेथ कामु। उपजला। तेथ क्रोधू आधींचि आला।।** (ज्ञा. २-३२२) वैराग्य, भक्ती, ग्रंथज्ञान, सात्विकवृत्ती सारे काही यांच्यापुढे लटके पडतात व त्यांचा ऱ्हास होतो. हाच शेवटी खेद उत्पन्न करतो व पश्चातापाला कारणीभूत होतो. **क्रोध हा खेद संपादी जेथे तेथे चहूकडे। विवेक पाहता कैचा शुध्दी तेथे असेचि ना।।** आपण काय करतो याचीच मुळी शुध्दी उडते. अशी भूल पडली की मग विवेक कुठला, रागाचे भरात जे होईल ते होईल. दुसरा सुखी पाहिल की डोक्यात तिडीक उठते, अंगाची लाही होते.

मद = उन्मत्तपणा, गर्विष्ठपणा, अहंकार. पूर्व सुकृतानुसार वासनांची परिपूर्तता होऊ लागली की मनुष्य माजतो.

**ईश्वरोहमहं भोगीसिध्दोहं बलकान्सुखी।।** इत्यादि याचेच वर्णन. यामुळेच मनुष्य वाटेल तो अन्याय करण्यास प्रवृत्त होतो. हा मत्त असुर होय. म्हणून याचा कधीही अंगीकार करू नये.

**मत्सर** = आपल्यापेक्षा दुसरा उच्च स्थितीत असलेला न पाहवणे. याने स्वत:चा फायदा न होता दुसऱ्याबद्दल अनादर वाढतो. आणि मनुष्य स्वत:च मनस्ताप ओढवून घेतो. दुसऱ्यास जे वाईट चिंतावे तेच स्वत:चे बोकांडी बसते. **कोण्याही जीवाचा न घडो मत्सर।।** मत्सराप्रमाणेच दंभही श्रेष्ठ शत्रू आहे. **दंभ** = मुळात काहीच नसताना सत्याचा देखावा व तोही उगीचच. दंभाचा वापर स्वत:चे प्रतिष्ठेसाठी. **तरी तयाचि आसुरां। दोषां-माजी जया वीरा। वाडपणाचा डांगोरा। तो दंभु ऐसा।।** (ज्ञा. १६-२१७) दांभिक, विशेषत: आपण फार धार्मिक आहो असे भासवतो. डांगोरा पिटतो. ज्ञानोबा म्हणतात - परतीराला पोचविणारी नाव डोक्यावर घेतली तर ती बुडविते: जगविणारे अन्न त्याचे फाजील सेवन केल्यास विषाप्रमाणे मारक ठरते. तसे इहपरलोक साधून देणारा धर्म, त्याचा केवळ फाजील पुकारा केल्यास तो तारक असूनही मारक ठरतो. पोकळ बडबडीने त्याचे अधर्मात रूपांतर होते. म्हणून हा दंभ नको.

असे हे षडरिपू रजोगुणात्मक असून यांचे तावडीत सापडलेल्या

लोकांना परलोक दूरच, इहलोकही सुखावह होत नाही. आचार्य म्हणतात- **''क: शूर: ? यो ललना लोचन बाणैर्न व्यथित:।''** गीतेतही **'त्रिविधं नर कस्येदं द्वारं॥'** असे म्हटले आहे. **पोटीं बांधोनि पाषाण। समुद्रीं बाहीं आंगवण। का जियावया जेवण। काळकूटाचें॥ इहीं काम क्रोध-लोभेंसीं। कार्य सिध्दी जाण तैसीं। म्हणोनि ठावोचि पुसीं। ययांचा गा॥** (ज्ञा. १६-४३६,४३७)

त्यातल्या त्यात काम रिपूरवरच अधिक लक्ष पाहिजे. कारण त्याच्या अस्तित्वामुळेच इतर पंचरिपू निर्माण होतात. हाच तो ज्ञानीजनांच्या ज्ञानाला झाकणारा शत्रू. याच्या योगानेच **रूपहानी शक्तिहानी द्रव्यहानी परोपरी। यातिहानी कुळहानी सर्व हानीच होतसे। त्तस्मात्वमिंद्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ।** (भ. गी. ३-४१)

एकटा हा रिपू जिंकला की यातूनच निर्माण होणारे क्रोधादि वैरी सहज नाश पावतात. या कामनाशार्थ उपाय एकच - **मना सत्य संकल्प जीवी धरावा.** स्वरूप सुखापुढे कामसुख फिके पडते.

★ ★ ★

**मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावे।**
**मना बोलणें नीच सोशीत जावें।**
**स्वयें सर्वदा नम्रवाचें वदावें।**
**मना सर्व लोकांसि रे नीववावें॥७॥**

मागील श्लोकात कामक्रोधादि आसुरी वृत्तींचा नाश करणेस सांगितले. या श्लोकात, परमार्थाला पोषक अशा काही दैवी गुणांचा आश्रय करण्याचा मनास उपदेश आहे. या श्लोकात धृति, क्षमा व अपारूष्य म्हणजे मर्मभेदक शब्द न उच्चारणे या दैवी गुणांचा विचार सांगतात.

**''आघाती उपजे धारिष्ट ते श्रेष्ठ धारिष्ट.''** आघात आले असता त्यांना सुखाने झेलण्याची जी समर्थ वृत्ती - श्रेष्ठ धारिष्ट. हिम्मत नसेल, घाबरटपणा असेल तर प्रपंच नीट होत नाही, नुकसानीचा होतो. प्रापंचिक आघातांना फारच धैर्याने तोंड द्यावे लागते.गडबडून, धीर सोडून भागत नाही. मैत्रीत वितुष्ट येते. पण पटत नसेल तेथे मित्रत्व राखणे, हे धाडसाने, सहनशीलतेने होते. वाईट छंद, विषय, धैयाने रोखावे लागतात. प्रारब्धाने जडलेल्या रोगास धैर्याने तोंड द्यावे लागते. प्रिय वस्तूचा वियोग झाल्यास धीर सोडून चालत नाही. अप्रिय वस्तू प्राप्त झाली तर ती बाजूला होईपर्यंत धीराने सहन करावी



लागते. अध्यात्मिक, अधिभौतिक व आधिदैविक या त्रिविध तापांना धीराने तोंड द्यावे लागते, टक्कर द्यावी लागते, **ऐसे चित्र क्षोभाचां अवसरी। उचलूनि धैर्या जें चांगावें करी।** (ज्ञा. १६-१९६) असे धारिष्ट प्रपंचाला लागते. **यं ही न व्यथयन्ते ते पुरूषं पुरूषर्षभ। सम दु:खं सुखं धीरं।** (भ. गी. २-१५) मध्यम साधकासाठी प्रपंचाचा पाठपुरावा करणारे समर्थ म्हणतात, **''आधींच तकवा (हिंमत) साडिला। मध्येंच धिंवसा सांडिला। तरी संसार हा सेवटाला। कैसा पावे।** (दा. १९-१०-२७) **धीर सांडिता काय होतें। अवघें सोसावें लागतें।''** (दा. १९-१०-३०) एवीतेवी सोसावे लागते.मग खिन्न मनाने सोसण्यापेक्षा, हसत खेळत ते का सोसू नये ? यासाठी धैर्य. **''जैसी स्थिती आहे तैशापरी राहे''** हे एकनाथांचे वाक्य ऐकून संत आळशीपणा शिकवतात,असा काही टीकाकार आरोप करतात. पण हा आळशीपणा नसून मनाच्या मेहनतीने वृत्ती स्थिर करण्याचा यत्न आहे. हे मानसिक युध्द आहे. ही सोपी गोष्ट नाही. **तुका म्हणे तोचि संत। सोशी जगाचे आघात॥** या सर्व प्रापंचिक आघातांना बाजूला सारून, ईश्वरप्राप्तीचे ध्येय पुढे ठेवून त्यासाठी झगडणे हेच श्रेष्ठ धारिष्ट आहे.

**धृत्या यया धारयते मन: प्राणेंद्रियक्रिया:। योगेना व्यभिचारिण्या॥**(भ. गी. १८-३३) **परी परमात्मया चक्रवर्ती। उगणिती जंव हातीं। तव लांचू न घेता धृती। धरिजती जिया॥** (ज्ञा. १८-७४३)

**न मिळो खावया न वाढो संतान। परि हा नारायण कृपा करो॥** अशी जिद्द ठेवणे येरागबाळाचे काम नव्हे. कोणीही काहीही वाकडे बोल बोलू दे, ते सहन करावे, असा का उपदेश केला ? एवढ्याचसाठी की बोलणाऱ्यालाच पश्चाताप व्हावा. यात एक वर्म आहे. आपण मात्र अंतर्बाह्य शुध्द व निरपराधी असले पाहिजे. आपण अशुध्द, दोषी असून दुसरा टाकून बोललेले आपण सहन केले तर तो कोडगेपणा, निर्लज्जपणा होय. त्यात आपला काहीच फायदा नाही. पण आपण शुध्द, निर्दोषी असून दुसरा बोलला, तर ते त्याच्या पश्चात्तापास कारण होते. **धके चपेटे सोसावे। नीच शब्द साहात जावे। प्रस्तावोन परावे। आपले हाती॥** (दा. १५-६-२२) दुसरा टाकून बोलला तर ते सहन करावें हे खरे, पण त्यास उत्तर द्यावे की स्वस्थ बसावे ? समर्थ म्हणतात, 'मुळीच स्वस्थ बसू नये. उत्तर द्यावे' पण ते असे **नेमकेचि बोलावें। तात्काळचि प्रतिवचन द्यावें। कदापि रागास न यावे। क्षमारूपे॥** (दा. १२-१०-१०) **उदंड धि:कारूनि बोलती। परी चळों नेदावी शांती। दुर्जनास**

**मिळोन जाती। धन्य ते साधू।।** (दा. १२-१०-१६) आपण केसांना धारण करतो याची दाद देहाला नसते. तसे कोणताही आघात मी सहन करतो, याचा अहंकार उत्पन्न न व्हावा, अशी सहजक्षमा असावी. हा उपदेश परमार्थ साधकास आहे, संसारिकास नाही, हे लक्षात ठेवावे. या क्षमेमुळे अहंकार नाश होतो व शांती लाभते. **शांती परते नाही सूख। येर अवघेचि दु:ख। म्हणउनी शांती धरा। उतराल पैलतीरा।।**

नम्र वाचा हा एक महत्त्वाचा गुण आहे. वाणी गोड असली तर तो जगमित्र होतो. **जगामधें जगमित्र। जिव्हेपासीं आहे सूत्र।** (दा. १९-२-१९) याचा अर्थ गोड गोड थापा मारणे नव्हे. व्यावहारिक भाषा असो अगर एखादे सत्यकथन असो ते सौम्य शब्दातच व्हावे. **नाना जनांचे हृदये। मृदुशब्दे उकलावे।** एखादे सत्यकथन ते केवळ सत्य आहे, म्हणून कठोर वाणीने सांगू नये. 'राजा व त्याचा मृत राघू' ह्या गोष्टीतील विनोद सोडा. पण सत्यकथन सौम्य शब्दांतच व्हावे. वाणी नम्र का असावी ?

(१) स्वानुभवाने तशी ती असावी असे वाटते. कारण **कठीण शब्दें वाईट वाटतें। हें तों प्रत्ययास येतें। मग वाईट बोलावें तें। काय निमित्त्य।।** (दा. १२-१०-२३)

(२) दुसऱ्याचे कठीण शब्द जसे आपणांस झोंबतात. तसेच आपलेही त्याला झोंबतील म्हणून **जे दुसऱ्यास दु:ख करी। ते अपवित्र वैखरी। आपणास घात करी। कोणी एके प्रसंगी।।** (दा. १२-१०-२५) दुष्टवाणीने अंत:करणावर होणाऱ्या जखमा मरेपर्यंत बऱ्या होत नाहीत. त्यामुळे घराण्या - घराण्यातील वितुष्ट, द्वेष निर्माण झाल्याचे इतिहास सांगतो.

(३) गोडवाणी हे वाङ्मय तप आहे. **अनुद्वेग करं वाक्यं सत्यं प्रियहितंचयत्** या चार विशेषणांत एकही उणे असेल तर ते वाङ्मय तप म्हणता येणार नाही. म्हणून नम्र वाचे वदावे. दुसऱ्यास आपल्या सहवासाने सुख होईल असेच वागावे. **दुसऱ्याचे दु:खें दुखवावें। परसंतोषें सुखी व्हावें। प्राणिमात्रास मेळवून घ्यावे। बऱ्या शब्दें।** (दा. १२-१०-७) **वेड्यास वेडें म्हणों नये। वर्म कदापि बोलों नये। तरीच धडे दिग्विजये। निस्पृहासि।।** (दा. १३-१०-२६) सर्वांना समान लेखून त्यांची अंत:करणे शांत करावी. **ऊंचनीच म्हणो नये। सकळांचे निववावे हृदय।** या योगाने आपणांस शांती मिळून दुसराही सुखी होईल.

★ ★ ★



**देह त्यागितां कीर्ति मागें उरावी।**
**मना सज्जना हेचि क्रीया धरावी।**
**मना चंदनाचे परी त्वां झिजावें।**
**परी अंतरी सज्जना नीववावें।।८।।**

श्लोक ७ मध्ये लोकास नीववावे या श्लोकांत ''सज्जना नीववावे, दुष्ट वासना धरू नये, पापसंकल्प सोडावा, सत्यसंकल्प जागवावा, षड्रिपू रोखावे, लोकास संतोष द्यावा'' इत्यादि पूर्व श्लोकातील उपदेशानंतर इतका खटाटोप कशांसाठी, याचे कारण या श्लोकात सांगितले आहे. मानवी जीवनाचे सूत्र कोणते याचा विचार येथे झाला आहे. सर्व योनीतं नरदेह श्रेष्ठ, कारण नरदेहाचे ठिकाणी असलेले ज्ञान होय. **मनुष्य-देहींचेनिं ज्ञाने। सच्चिदानंद - पदवी घेणें। एवढा अधिकार नारायणें। कृपावलोकनें दीधला।।** (ना. भा. ९-३३०) येवढा जर मानवाला श्रेष्ठ अधिकार आहे, तर त्याचेकडून कार्यही श्रेष्ठ दर्जाचे झाले पाहिजे. नाहीतर तो नुसता नावाचा मानव किंवा मानवच नव्हे. **मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्या: पार्थ सर्वश:** (भ. गी. ३-२३) **आणि मी बोलतो श्रीपती। की सर्व मनुष्य माझ्या मार्गे वर्तती। तेंव्हा जे माझ्या सन्मार्गी वर्तती। तेचि मनुष्य।।** (वामन पंडित य. दी. ३ - ३७१) कीर्तीस पात्र एक मानवच आहे. म्हणून समर्थ म्हणतात, **''देह त्यागिता कीर्ति मागे उरावी।।''**

यासाठी आपली वागणूक अशीच असावी की ज्यायोगे आपला नावलौकिक मरणानंतरही मागे राहावा. लोकेषणेसाठी म्हणजे लोकांनी बरे म्हणावे म्हणून बरे वागायचे नसून, भाग्याने नरदेह प्राप्त झाला आहे, म्हणून माणुसकीला शोभेल असे सन्मार्गाने वागले पाहिजे. म्हणजे कीर्ति आपोआप उरतेच. प्रयत्नाने कीर्ति होत नाही. नि:स्पृहपणे आपले कर्तव्य केले. म्हणजे आपोआप कीर्ति मागे लागते. कीर्ति करणे अवघड.

मनुष्याने झिजावे कसे, यासाठी तिसऱ्या चरणात चंदनाचा दृष्टांत दिला आहे. 'कीर्ति मागे उरावी' हे समजण्यास सुगंधी फुलाचा दृष्टांत योग्य होईल. मानवी जीवन सुगंधी फुलासारखे असावे. सुगंधी फूल इतरांना वास देतेच. पण त्याच्या या गुणामुळे ते देवाच्या पायावर, उरावर नव्हे, तर डोकीवर जाऊन बसते. निर्माल्य म्हणून त्याला बाजूला टाकले, तरी देव्हाऱ्यात ते आपला सुगंध ठेवून जाते. देह हा नश्वर असल्यामुळे उपजला प्राणी मरणारच. पण आपली आठवण मागे नांदेल अशी कृती जीवनात व्हावी. निर्गंध फूल

सुंदर असेल तर दृष्टीसुख देईल. पण मागे वास राहणार नाही. आले तसे वाळून जाईल दुर्गंधी फुलाच्या वाऱ्यालाही कोणी उभे राहणार नाही. या बिचाऱ्या दोघांनी काय करावे ? परमेश्वराने एकात वासच ठेवला नाही. दुसऱ्यास वास ठेवला पण तो दुर्गंध, पण प्राणिसृष्टीरूपी ईश्वराच्या बागेतील मानव फूल मोठे विचित्र आहे. ते सुगंधी होते. दुर्गंधी होते किंवा निर्गंधही राहते. ईश्वराने त्याच्या ठिकाणी ठेवलेले मन - विचित्र चंचल. मन जर दैवी वृत्तीत नांदू लागेल तर हे फूल सुगंध बाहेर फेकते. आसुरी वृत्तीत नांदू लागेल तर दुर्गंध सोडते व केवळ प्रापंचिक वृत्तीत राहिले तर निर्गंध राहते व शेवटी वाळून जाते. **कीर्ती करून नाही मेले। ते उगीच आले आणि गेले।** हे मन दैवी वृत्तीतच नांदावे म्हणून पापबुध्दी नको, हा उपदेश. **ऐसे जाणोनियां जीवें। याचे सार्थकचि करावें। जनी मरोनी उरवावें। कीर्ति-रूपें।।** (दा. ३-९-४४) **मरोनि कीर्ति उरवावी नुरवावी अपकीर्ति ते। धन्य धन्य म्हणे लोक। सत्क्रिया करिता बरी।** (स्फु. प्र. ३-१९)

कीर्तिसंबंधी समर्थांची काही सिध्दांत वचने आहेत. कीर्ति केव्हा होते ? **कांही एक उत्कटतेवीण। कीर्ति कदापि नव्हे जाण।।** (दा. १९-३-२४) एखादा उत्कृष्ट गुण अंगात असल्याशिवाय कीर्ति होत नाही. न्याय देणारे रामशास्त्री, राजकारण - धुरंदर नाना फडणीस, ध्येयासाठी रानावनात हाल सोसणारा राणा प्रताप, गोब्राह्मण प्रतिपालक श्री छत्रपति अशा अनेक व्यक्तींचे नाव अद्यापही गाजत आहे. तसेच उत्कट भक्ती, उत्कट ज्ञान, वैराग्य, शांती इत्यादि गुणांनी महाराष्ट्र संतांनीही, आपली कीर्ति गाजविली आहे. 'ग्यानबा तुकाराम'' जय जय रामदास माऊली'' वगैरे घोषणांनी अद्यापही महाराष्ट्र गर्जून राहिला आहे.

**कीर्ति पाहता सुख नाही। सुख पाहता कीर्ति नाही।।** (दा. १९-१०-२५) **झिजल्यावांचुनि कीर्ति कैंची। मान्यता नव्हे कीं फुकाची।।** (दा. १९-३-२४) उत्कृष्ट गुण अंगी बाणण्यासाठी कष्ट करावे लागतात. झिजावे लागते. चंदने झिजते, पण जसजसे झिजते, तसातसा त्याचा सुगंध सर्वत्र दरवळतो. नाहीतर इतर जळाऊ लाकडातच ते जमा झाले असते. **जंवरी चंदन झिजेना। तंवरी सुगंध कळेना। चंदन आणि वृक्ष नाना। सगट होती।।** (दा. १२-२-१७) **जंव उत्तम गुण न कळे। तों या जनास काय कळे। उत्तम गुण देखता। निवळे जगदांतर।।** (दा. १२-२-१८)

चंदनासारखे मनाने झिजावे म्हणजे काय ? देहाच्या सर्व क्रिया मनाच्या अधीन असल्यामुळे, **अवघेची सुखी असावे। ऐसी वासना।** मनाने



ठेवणे हे मनाने झिजण्यातील तत्व आहे. काया, वाचा, मने, सत्क्रिया करून लोकास सुख द्यावे. **शरीर परोपकारी लावावे। बहूतांच्या कार्यास यावें। उणें पडो नेदावें। कोणी-येकाचें।।** (दा. १२-१०-५)

श्लोकाचे शेवटी काया, वाचा, मने झिजण्यातील एक वर्म सांगितले आहे. मना तू झीज पण सज्जनांना संतोष दिल्याशिवाय राहू नकोस. सज्जन कोणास म्हणावे याची व्याख्या करताना **आतां वंदीन सज्जन। जे परमार्थांचें निधान। जयांचेनी गुह्यज्ञान। प्रकटे जनीं।** (दा. १-५-१) कोणाच्या 'अधात नाही मधात नाही' तो सज्जन नसून, तत्वज्ञानी संत म्हणजे सज्जन. संत सत्कृत्याने संतुष्ट होतात. त्यांना **व्यावराहिक-लौकिक** कीर्ति मान्य नसते. कारण ती थोडी दिवस टिकते आणि त्यामुळे पुनर्जन्म टळत नाही. **लोकिक बरा संपादिला। परी अंतरी जागा नाहीं जाला। मुख्य देवास चुकला। तो आत्मघातकी।।** (दा. ९-१०-९) **सकळ केलीयांचे सार्थक। देव वोळखावा एक। आपण कोण हा विवेक। पाहिला पाहिजे।।** (दा. ९-१०-१३)कारण ह्यातच नरदेहाचे सार्थक आहे म्हणून समर्थ बजावतात, की तुम्ही परोपकार,मृदुभाषण, दुसऱ्याचे समाधान सर्व कराच पण मुख्यत्वे हे लक्षात ठेवा. **मरणाचे स्मरण असावें। हरिभक्तीस सादर व्हावें। मरोन कीर्तीस उरवावे। येणें प्रकारें।।** (दा. १२-१०-१३) यानेच सज्जनांना - संतांना - संतोष होतो.

देह आला तसा जाणार. पण आत्मस्वरूपाने तू मागे उरावेस. म्हणजे तू आत्मज्ञान करून घ्यावेस. हे ज्ञान संतकृपेने होते. म्हणून त्यांना प्रणिपात करून परिप्रश्न, सेवा इत्यादि मार्गानी संतुष्ट ठेवावे. मागील श्लोकात **सर्व लोकांसि रे नीववावें** यात **'सज्जना नीववावे.'**

★ ★ ★

**नको रे मना द्रव्य तें पुढिलांचें।**
**अतीं स्वार्थबुध्दि न रे पाप सांचें।**
**घडे भोगणें पाप तें कर्म खोटें।**
**न होता मनासारिखे दु:ख मोठे।।९।।**

सर्व लोकांस समाधान दिल्याने व्यवहार सुरळित होतो. सज्जनांना समाधान दिले तर परमार्थ सुखाचा होतो. स्वार्थ व परमार्थ सुरळित चालणेसाठी आणखी एका मनोविकाराचा त्याग करावा लागतो. तो म्हणजे **'परद्रव्यापहार'**. पूर्वीच्या श्लोकात पाच विकारांचे वर्णन आले आहे. लोभाबद्दल

या श्लोकात विवेचन.

प्रपंचात द्रव्यांची आवश्यकता घडोघडी आहे. त्याविना मानवाचा निर्वाहच होत नाही. **प्रपंची पाहिजे सुवर्ण। परमार्थी पंचीकरण।** स्वत:सकट कोणालाही न फसविता पूर्ण ऐहिक सुख प्राप्त करून घेणे - प्रपंच साधणे. पुरूषार्थ म्हणजे प्राप्तव्य वस्तूची इच्छा. इच्छा प्रेमामुळे, प्रेम सुखामुळे, सुख विषयामुळे व विषय द्रव्यांमुळे म्हणून द्रव्य प्रिय व ते प्राप्त करून घेणे हा पुरूषार्थ. पण धर्माकडे लक्ष न देता अर्थ तो अनर्थ. द्रव्य प्राप्तीसाठी स्वार्थ राहणारच. पण तो अती स्वार्थ नसावा. स्वद्रव्यावर खुशाल निर्वाह करावा पण परद्रव्यावर बाजीराव होऊ नये. दुसऱ्याच्या द्रव्यापहाराने पाप उत्पन्न होते. ज्या कर्माने पाप उत्पन्न होते ते कर्म खोटे - वाईट घातकी. म्हणून त्याज्य. अती स्वार्थ साधला तर पाप,जर साधला नाही तर या जन्मीच दु:ख भोगावे लागते. उदा. **मोठा पगार असून घेतलेली लाच.** असा हा परद्रव्यापहाराचा खेळखंडोबा आहे.आपले आपल्याला झेपत नाही मग दुसऱ्याचे घोंगडें कशाला घेतोस ? **मा गृध: कस्यचिध्दनम्** (ईशावा). स्वद्रव्य कसे छळते याचे नाथांनी वर्णन केले आहे **धनागमनी अतिकष्ट। धनरक्षणी कलह श्रेष्ठ। धननाशें होय हृदय स्फोट। इहलोकीं कष्ट धनलोभ्या।।** (ना. भा. २३-१७६) हे समाधान करते, म्हणून त्याला न शिवावे तर हाल व मरण. अन्न ब्रह्मापेक्षा धन ब्रह्म श्रेष्ठ, कारण धनाशिवाय अन्नच मिळत नाही. एकवेळ आजन्म ब्रह्मचारी राहता येईल पण उपाशी कसा राहणार ? राहिला तरी कसा जगणार ? म्हणून द्रव्य हवे. जगातील सर्व व्यवहार याचे जोरावर. समर्थांनी **नको रे मना द्रव्य ते पुढिलांचे** असा उपदेश केला आहे. पण आपला सर्व व्यवहारच परद्रव्यावर चालणारा. वैद्याचे द्रव्य रोग्याकडून, वकीलास अशिलाकडून, व्यापाराचे गिऱ्हाइकाकडून, चाकरांचे मालकाकडून असा पदोपदी सर्व व्यवहार चालतो. मग वरील उपदेशाशी मेळ कसा बसायचा ? यासाठी स्वद्रव्य-परद्रव्य याचा नीट उलगडा करून घेऊ. उचित किंवा योग्य मोबदला देऊन जे द्रव्य घेतले जाते. ते स्वद्रव्य व अनुचित, अपुरा मोबदला देऊन स्वीकारलेले द्रव्य ते परद्रव्य. आज व्यवहारात, गुळात धोंडे, सोन्यात तांबे, धान्यात खडे, पगार असून लाच हे सारे परद्रव्यच. त्यामुळेच खून, दरोडे, जाळपोळ यांचा सर्रास वापर. त्यामुळे पापसंचय. **जोडोनिया धन उत्तम वेव्हारे** प्रामाणिकपणाने स्वद्रव्य संचय करा. जिज्ञासूस अशी शंका येणे स्वाभाविक - जो बेछूट, बेगुमान परद्रव्यापहार करतो, तो व्यावहारिक जगात भरभराटीला आलेला आढळतो. याचे उत्तर



असे , की दिसणारी भरभराट पूर्व पुण्याईची असते व होणारे पाप पुढे भोगावे लागते. **य: शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते काम कारत:। न स सिध्दिमवाप्नोति न सुखं न परां गतिम्।** (भ. गी. १६-२३)'शास्त्राबाह्य किंवा अनुचित कर्माने सुटका होत नाही,श्रेष्ठ गती नाही व ऐहिक सुखही नाही' हा सिध्दांत आहे. पापाचे फळ केव्हातरी मिळणार हे निश्चित. परद्रव्यापहार हे मोठे पाप आहे. **परद्रव्य परनारीचा अभिलाष। तेथूनिया ऱ्हास सर्व - भाग्या। घटिका दिवस मास, वर्षें लागे तीन। बांधले पतन गाठोडीस। पुढे घात त्याचा रोकडा शकून। पुढें करी गुण निश्चयेसी।। तुका म्हणे एका तडताथवड। काळ लागे नाड परीखरा।।** (गा. ३४३६) म्हणून समर्थ उपदेश करतात. परद्रव्य नको.

स्वद्रव्यात सुख मानून राहणेत फलप्राप्ती काय ? जितका पैसा तेवढ्यातच जम बसवायचा असा एकदा निश्चय झाला की हळूहळू छानछोकीवर नियंत्रण येते.त्यामुळे अनेक विषयांचा त्याग होतो. विषय जसजसे सुटू लागतील, तसतसे वैराग्य बाळसेदार होऊ लागते. तीव्र वैराग्याने निस्पृहता बाणते. निस्पृहता बाणली की तो साधक भगवंताला प्रिय होतो व त्याच्या कृपाप्रसादाने परमार्थ साधतो. **ज्यासी लक्ष्मीची निरपेक्षता। त्याची नित्य वस्ती माझे माथां। त्याहीहोनि पढियंता। आणिक सर्वथा मज नाही।।** (ना.भा. १९-११४) **जेथ निस्पृहता समूळ सांग। त्याची नांव दृढ वैराग्य। हे परमार्थाचे निजभाग्य। येणे श्रीरंग सापडे।** (ना. भा. २५-६४)

पण परद्रव्यापहाराची बुध्दि झाली की अध:पतन ठरलेलेच. काम, क्रोध, लोभाप्रमाणे परद्रव्य, परदारा व परनिंदा हीही तीन नरकाची द्वारेच होत. **(त्रिविधं नरकस्येदं) परद्रव्य-परदारा-रती। परापवादाची वदंती। ही नांव गा 'नारकी गती'। जाण निश्चितीं उध्दवा।।** (ना. भा. २०-११२) म्हणून पापाला व दु:खाला कारणीभूत होणारी परद्रव्यापहार बुद्धि हिचा त्याग कर.

★ ★ ★

**सदा सर्वदा प्रीति रामीं धरावी।**
**दु:खाची स्वयें सांडी जीवीं करावी।**
**देहे दु:ख तें सूख मानीत जावें।**
**विवेकें सदा स्वस्वरूपी भरावे।।१०।।**

आतापर्यंतच्या श्लोकांचा विचार केल्यास, भक्तीपंथानेच जाणेचे ध्येय मनापुढे ठेवले. त्यासाठी प्रभाती रामचिंतन व वेळोवेळी नामोच्चार हे

साधन सांगितले. या श्लोकात सगुणरूपाने नटलेला जो श्रीराम अंतरात्मा त्यावरच प्रेम करावे व त्याच्याशी एकरूप होऊन जावे असे सांगतात. कारण आपलेही तेच रूप आहे. पूर्व साधनेमुळे मनाला स्वरूपाकार होण्याची पात्रता येते. दुष्टसंकल्प त्याग, सत्यसंकल्प स्वीकार, लोकांचे समाधान, सज्जन सेवा करून त्यांना संतोषविणे, परद्रव्याचा अभिलाष सोडणे, ह्यामुळे वैराग्य उत्पन्न होऊन अन्तःकरण शुध्द होते, सात्त्विक बनते. अन्तःकरण शुध्द झाले की साधक नामस्मरणावरून हळूहळू सख्य भक्तीच्या पायरीवर येतो व पुढे एकरूप होतो. देवाशीं सख्यत्व कसे राखावे व आत्मारामी कसे मिसळून जावे यासाठी हा श्लोक सांगितला **सगुणी भजावें। निर्गुणी अनन्य व्हावे।** हे या श्लोकाचे सार म्हणता येईल।

समर्थ मनाला म्हणतात, ''बा मना, प्रेम करायचे ते देहावर करू नकोस, तर हृदयस्थ जो शामसुंदर रामप्रभू त्याचेवर कर. निर्गुणाशिवाय सगुण खरे नाही हे खरे पण सगुण खरे धरल्याशिवाय निर्गुणाला पोहचताच येत नाही. **नातुडे मुख्य परमात्मा। म्हणोनि करावी लागे प्रतिमा।** म्हणून हृदयस्थ जो अन्तरात्मा त्याचेवर प्रभू रामचंद्राची भावना करून त्याचेवरच प्रेम ठेव. हा अंतरात्मा जसा अनामी तसाच सहस्रनामी असून भावाचा भुकेला आहे. म्हणून प्रेमाने त्याचे भजन कर. तोच तुझा जन्मोजन्मीचा सोबती आहे. केवळ स्वार्थी किंवा स्मशानापर्यंत येणारा हा सोबती नव्हे. जिवावर प्रेम कसे करावे हे यालाच समजते. **देव प्रीति राखों जाणे। देवासी करावें साजणें। जिवलगे अवघी पिसूणें। कामा न येती॥ सख्य देवाचें तुटेना। प्रीति देवाची विटेना। देव कदा पालटेना। शरणागतांसी॥** (दा. ४-८-२९,३०) म्हणून प्रीती रामी धरावी, हा आग्रह.

देवावर हे प्रेम इतके जडावे की त्यापुढे देहदुःखाची आठवणही होऊ नये. उदा :- सतीचे प्रेम. **सांडूनी आंपुली संसारवेथा। करीत जावी देवाची चिंता। निरूपण कीर्तन कथा वार्ता। देवाच्याच सांगाव्या॥** (दा. ४-८-७) **आपुलें अवघेची जावें। परी देवासीं सख्य राहावें। ऐसी प्रीती जीवें भावे। भगवंती लागावी॥** (दा. ४-८-९) दुःखाची आठवण होऊ नये, येवढेच नव्हे तर देहदुःख हे उलट सुखच वाटले पाहिजे. देहाला आपदा आली की देव आठवतो.आपदेचे हे महत् उपकारच नव्हेत काय ? म्हणून देहाला दुःख झाले. किंवा संकटे आली तरी त्यातच आपले कल्याण आहे असे जाणून सुख मानावे. प्रपंचात आपण असे वागतो मग देवासाठी का नाही ? **आपदः संतुनः**



**शश्वत्** हा कुंतीने मागितलेला वर सर्वश्रुत आहे.

शेवटच्या ओळीत विवेकाने रामरूपी म्हणजेच आत्मस्वरूपी मिसळत जावे. असे समर्थ सांगतात. कारण तेच आपले स्वरूप असून तेच परब्रह्मही आहे. **आत्मा ब्रह्मैव ना परः॥** विवेक हा शब्द फार महत्वाचा. प्रापंचिक विचारापासून उत्पन्न होणाऱ्या वृत्तीला विचार म्हणतात. आत्मानात्म विचारालाच विवेक असे म्हणतात. परमार्थात विवेकाला फार महत्व आहे. **विवेकामध्ये सापडेना। ऐसे तो काहीच असेना॥** या श्लोकातील विवेक शब्दाचा अर्थच मनाचे श्लोकातील सर्व ठिकाणी लागू आहे. रामरूप हे विवेकाने जाणून घ्यावे. विवेकाने दुःख सोडावे. विवेकाने देहदुःख सुख मानावे आणि विवेकानेच स्वरूपी भरावे.

आत्मारामावर प्रेम जडले की साहजिकच त्याची कृपा होते व योग्य तो विवेक होऊन स्वरूपज्ञान प्राप्त होते. **ददामि बुध्दिं योगं तं येन मामुपयांति ते॥** असे भगवान् स्वतःच सांगतात. प्रेमानंतर विवेक काय करावा ? तो हा **सद्रूप, चिद्रूप आणि तद्रूप। स्वस्वरूप म्हणिजे आपलें रूप। आपलें रूप म्हणजे अरूप। तत्त्व-निरसना उपरी॥** (दा. १३-३-३०) **तत्त्वांचे गाठोडे शरीर। याचा पाहतां विचार। येक आत्मा निरंतर। आपण नाहीं॥** (दा. ६-२-३३) अखंड, ज्ञानघन, हृदयस्थ आत्मारामाचे जे स्वरूप तेच माजे स्वरूप होय. पंचभौतिक देह बाजूला केला म्हणजे देह निरास झाला की मी असा कोणी दिसत नाही. एकचैतन्य घन आत्मरूपच उरते, तेच आपले स्वरूप. मी मी म्हणून जो आपला देहाहंकार उठतो, तो त्या आत्मारामाचे अस्तित्वावरच. **माणसाची देव चालवी अहंता। मीच एक कर्ता म्हणोनिया॥ संविन्मात्र स्थितश्चाहमजोऽस्मि किमतः परम्॥** मी या माझ्या जाणिवेने मला सर्व- काही कळून येते. देहाचे, सृष्टीचे ज्ञान होते. माझ्यात सर्व प्रथम मी हे भान निर्माण होऊन या भानानेच सर्व मला समजते. सुषुप्तीत मी ही जाणीव लीन झाली असता, काहीच कळून येत नाही. सर्वांचे ज्ञान करून देणारे माझे भान जर इतके ज्ञानस्वरूप आहे, तर सुषुप्तीत कोणतेच दृश्य नसता, ज्या माझ्यात ते विरते, तो मी ज्ञेयशून्य केवळ ज्ञानमात्र आनंदघनच आहे. असा हा विवेक भगवत्प्रीतीने होतो. मी ही उठणारी वृत्ती, सुषुप्तीप्रमाणे जागृत अवस्थेत आत्मस्वरुपात नाहीशी करणे, हेच स्वरूपी भरणे होय. **मी नाहीच** सर्व तो आत्माराम यासाठी साधन या श्लोकात सांगितले आहे.

**पहिले साधन - 'प्रीतिरामी धरावी'** - सगुणी भजावे. सगुण भजनात देहाचा विसर पडला की एकीकडे मी नाहीसा होतो व शेवटी निरूपाधिक

परमात्मरूपच शिल्लक उरते, तेच आपले स्वरूप.

**दुसरे साधन -** विवेकानें चित्तवृत्ती निरोध करणे. **निर्गुणी अनन्य व्हावे। यासाठी शिष्या एकांती बैसावे। स्वरूपीं विश्रांतीस जावें। तेणें गुणें दृढावे। परमार्थ हा।।** (दा. ५-६-५८) झालेला विवेक दृढ करून स्वरूपानुभवासाठी अभ्यास करावा - वृत्तीनिरोध करावा. **जेथें ध्यान धारणा सरे। कल्पना निर्विकल्पीं मुरे। केवळ ज्ञप्ति- मात्र उरे। सूक्ष्म ब्रह्म।।** (दा.८-८-५९) संत तुकाराम महाराज यांचा हा अभंग पाहा. **अंतरींचें ध्यान। मुख्य या नांवें पूजन। उपाधिते अवघें पाप। गोड निरसतां संकल्प। आज्ञा पाळावी हा धर्म। जाणते हो जाणा वर्म। तुका म्हणे वृत्ति। अविट हे सहज स्थिती।।** (गा. २२७८)

असा हा अभ्यास अखंड चालू पाहिजे. सकाळी उठल्यापासून पुन: झोपेपर्यंत स्वरूप तादात्म ठेवावे. **निद्राया लोकवार्तायाः कामा देहात्म विस्मृतेः। कचिंन्नाव सरं दत्वा चिंतयेत्मानमात्मीन।।**

निद्रा, नसती उठाठेव, लोकनिंदा, स्तुती, आत्मविस्मृतीस कारण होणारे कोणतेही कामादि विकार यांना वाव मिळू न देता, अखंड ध्यानी मग्न असावे. हाच मोक्षधर्म. गीतेत, **आत्मसंस्थं मन: कृत्वा न किंचिदपि चिंतयेत्।।** या श्लोकात सांगितला आहे.

समर्थ - **सकळ धर्मांमध्ये धर्म। स्वरूपी राहणे हा स्वधर्म।।** यासाठी एक क्षणही न दवडिता, **याचि जन्में येणेंचि काळे। संसारी होई जे निराळें। मोक्ष पाविजे निश्चळें। स्वरूपाकारें।।** (दा. ६-९-२९) असे स्पष्ट बजावले आहे.

★ ★ ★

**जनीं सर्वसूखी असा कोण आहे ?।**
**विचारें मना तूंचि शोधूनि पाहे।**
**मना त्वांचि रें पूर्वसंचित केलें।**
**तया सारिखें भोगणें प्राप्त जालें।।११।।**

मागील श्लोकाला पूरक असा हा श्लोक आहे. देहदु:खाचा विचार करू नको. उलट दु:ख ते सुख मानीत जा असा जो मनाला उपदेश केला. तो ठसविणेसाठी, **दृढ होणेसाठी** या श्लोकात कर्मविचार सांगितला आहे. जगात दु:खासाठी कोणाचीही मागणी नाही, तरी प्रत्येकाचे मागे दु:ख आहेच. सुखासाठी सर्वांची धडपड असताही सुख प्राप्त होत नाही असे का ? याची दोन कारणे आहेत. सुखाचे खरे स्थान मनुष्याला माहीत नाही. म्हणून सदा



स्वस्वरूपी भरावे असे बजावले. दुसरे, आपलेच कर्म आपणास भोवते. म्हणून ह्या ठिकाणी कर्मविचार मांडिला. बा मना, या जगात सर्वथैव सुखी कोण आहे ? कोणी नाही. वरवर पाहता बरीच माणसे सुखात वावरत असून आपण मात्र दु:खात आहोत असे वाटते. पण हा भ्रम आहे. थोडा विचार व चौकसपणा दाखवला तर जगात सर्व बाजूने सुखी कोणीच नाही, असेच दिसेल. भरपूर संपत्ती तेथे वारसा नाही, अठरा विश्वे दारिद्र्य तेथे पोरांचे लटांबर, भारी भूक तेथे अन्नाचा तुटवडा, भरपूर धान्य तेथे भूकच नाही, तीक्ष्ण बुध्दी पण तिला वाव नाही, सर्व सोई तेथे बुध्दिमांद्य, असे सर्रास पहावयास सापडते. असे सर्वत्र असमाधान का ? (१) आपली वृत्ती परिस्थितीत अडकलेली असते आणि परिस्थिती सारखी बदलत असते. त्यामुळे आपली वृत्ती चंचल राहते. सुख वृत्ती - स्थैर्यात आहे. स्थिर वृत्ती होत नाही म्हणून असुख. (२) आज आहे त्यापेक्षा उद्या काही निराळे असावे अशी नाविन्याची आवड. कपडा नवीन, खाणे नवीन, देखावा नवीन, अशी नाविन्याची आवड म्हणजे असुख. (३) सुख किंवा समाधान हा पूर्णत्वाचा स्वभाव आहे. अल्प जगात परमात्म वस्तूच पूर्ण असून तेच सुखाचे स्थान आहे. ठेविल्याजागी शोधले तर ती वस्तू सापडणार. अन्यत्र कोठेही ती सापडणार नाही. जेव्हा सुखरूप परमात्म्याशी एकरूप व्हावे, तेव्हाच आणखी काही नको अशी अवस्था येते. ते सुखाचे निधान आहे. आपल्याजवळच अगदी हृदयात, पण आपला शोध चालला आहे. इतरत्र बाह्य विषयात. म्हणून असुख: **हृदयामध्ये मी रामू। असता सर्व सुखाचा आरामू। भ्रांतासी कामू विषयावरी।।** आंधळ्याने साखर समजून मीठ खाल्ले तर ते गोड कसे लागणार ? सर्व दु:खाचे मूळ कशात असेल तर देहबुध्दीत आहे. असुख होण्याला, मनाला पटेल असे साधे कारण म्हणजे **हवे ते न येणे आणि नको ते येणे** हे आहे. ही दोन्ही कारणे आपले हातची नाहीत. दु:ख व संकटे जर अपरिहार्य तर मग चिंता कशासाठी ? संचितानुसार जे होणार असेल ते होईल असे जाणून राम भजनी लागावे. त्याच्या कृपेने स्वस्वरूपी भरावे. **आता होणार तें होये ना कां। आणि जाणार तें जाये ना का। तुटली मनांतील आशंका। जन्ममृत्याची।** (दा. ६-२-४४) समर्थ म्हणतात. **जनीं संचितें पिंड निर्माण झाला। मनीं तेंचि भोगावया जीव आला। शुभाशूभ होणार कांही कळेना। पुढे प्राप्त ब्रह्मादिकांही टळेना।** (करूणा २४ -१) सुख दु:ख भोगवणारे आपले संचित. ह्या संचिताविषयी अविचार शेवटच्या दोन ओळींत आढळतो. कालाला अनुसरून

कर्माचे तीन प्रकार आहेत. **संचित, क्रियमाण व प्रारब्ध.** अनेक जन्मातील पाप पुण्यादि कर्म जे भोगल्यावाचून साठून राहते ते **संचित,** ते संस्काररूपाने अज्ञानासह - देहबुध्दीसह सूक्ष्मरूपात राहते. चालू असलेल्या देहाकडून होणारे नित्य, नैमित्तिक कर्म ते **क्रियमाण.** या कर्मातूनच संचित व प्रारब्ध निर्माण होते. या चालू कर्मातील काही कर्म, भोगण्यासाठी होत असते व काही कर्म, पुढील प्रारब्धभोग बनविण्यासाठी म्हणजे संचितासाठी राहते. क्रियमाण कर्मच संचित व प्रारब्ध यात वाटले जाते. चालू कर्माची भर पडून संचित साठत जाते, तसेच आले प्रारब्धही फल पदरी पडेपर्यंत बनत जाते. मनुष्य आपले प्रारब्ध आपल्याच कर्माने बनवतो. म्हणून मनुष्याने प्रारब्धाची सबब न सांगता संचितात चांगल्या कर्माची भर टाकल्यास प्रारब्धही चांगले बनते.

कर्म विचारासंबंधी दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, ईश्वराने मनुष्याला कर्मस्वातंत्र्य दिले. पण फलस्वातंत्र्य आपले हाती ठेवले आहे. कोणत्या कर्माचे कोणते फल व ते केव्हा द्यावयाचे हे ईश्वराधीन. **कर्मण्ये वाधिकारस्ते....**(भ. गी. २-४७) याचे कारण असे की, फलभोग मनुष्याचे स्वाधीन ठेवला तर, स्वभावत:च तो स्वार्थी असल्यामुळे स्वसुखार्थ तो दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर घाला घालील. ईश्वरी दरबारचा न्याय समतोल आहे. जे पेरावे ते उगवावे. जे करावे ते भरावे. **जसे करावे तसे भरावे शब्द कुणावर ठेऊ नये ।। आल्या दिवसा सादर व्हावे खेद कदापि करू नये । हा संसार मिथ्या याजवर विश्वास धरू नये ।। कोणी कुणाचे नाही सखे गोत्री आपले मानू नये । आत्मानात्म विचार करूनिया नित्य असावे मरू नये ।।** बा मना, तुझेच कर्म तुला भोगावे लागत आहे. तेव्हा स्वकर्माने ईश्वरास संतुष्ट केलेस तर तो कृपाळू देव स्वरूपी नांदावे अशी बुध्दी निश्चित देईल.

★ ★ ★

**मना मानसीं दु:ख आणूं नको रे।**
**मना सर्वथा शोक चिंता नको रे।**
**विवेकें देहबुध्दि सोडूनि द्यावी।**
**विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी।।१२।।**

मनाचे श्लोक अर्थाला फार सोपे पण अनुभविण्यास गहन असे आहेत. मागील श्लोकात सांगितले की ''मना तुझेच कर्म तुला भोवते. तुझ्या कर्मानुसार सुख:दु:ख वाट्याला येते. ते केव्हा येणार हे ईश्वर ठरविणार. मग



जी गोष्ट तुझ्या स्वाधीन नाही, तुला भोगावी लागणारच, त्याबद्दल निष्कारण दु:ख, शोक, चिंता करून काय उपयोग ? विचाराने निमूटपणे ती सोसणे हेच शहाणपण.'' म्हणून पहिल्या दोन ओळीत दु:ख आणू नको, चिंता करू नको, हा उपदेश.

दु:ख किंवा शोक याचे मूळ कारण - देहबुध्दी किंवा देह अहंकार. म्हणून विवेकाने ही देहबुध्दी कशी नष्ट करता येईल इकडे लक्ष दिले पाहिजे. देहबुध्दी म्हणजे काय ? **तेचि काया मी आपण हे देहबुध्दीचे लक्षण ।।** शरीर म्हणजे मी हा अहंकार घातक आहे. यामुळेच विषय मला म्हणजे शरीराला सुख देतील या आशेने मनुष्य विषयांमागे धावतो. ते विषय प्राप्त करून घेणेसाठी बरेवाईट कर्म करतो व कर्मानुसार बरेवाईट भोग भोगतो. भोगासाठी देह व देहामुळे कर्म या कर्म कचाट्यातून सुटण्याचा एकच मार्ग. तो म्हणजे - आपण कोण ? आपले स्वरूप काय ? याचे विवेकाने ज्ञान प्राप्त करून घेणे. **यथै धांस मिध्दोऽग्निर्भस्मसात्कुरूतेर्जुन ।।** (भ. गी. ४-३७) आत्मस्वरूपाच्या प्रत्यक्ष ज्ञानाने संचित कर्म नाश पावते. याच ज्ञानामुळे देहबुध्दी सुटून कर्मापासून आपली अलिप्तता समजते व क्रियमाण बाधक होत नाही. प्रारब्ध भोगून संपते, आत्मज्ञानाने त्रिवर्ग कर्म समूह नष्ट होतो.

यावर एक अशी शंका येईल की, ज्ञानालासुध्दा जर प्रारब्धभोग सुटत नाही, भोगावाच लागतो तर हे प्रारब्ध नष्ट होते असे कसे म्हणता येईल व भगवंत **''ज्ञानाग्नि: सर्व कर्माणि भस्मसात्कुरूते''** असे कसे म्हणतात ? इतर अज्ञानी जनांना ज्ञानी सुखदु:खादि प्रारब्ध भोग भोगतो असे वाटते, पण ज्ञानाचे दृष्टीने त्याचे स्वप्रारब्ध नष्टच झालेले असते. कारण सुखदु:खादि प्रारब्ध भोग शरीराला असून, त्या शरीरापासून आपण अगदी निराळे आहो, असा त्याचा अनुभव असतो. (प्रारब्ध देहाला-आत्म्याला नाही, हे ज्ञानी अनुभवाने जाणत असतो) म्हणून त्याचे स्वत:चे दृष्टीनें प्रारब्ध नष्टच झालेले असते. **साधूचा देह खितपतला । अथवा श्वानादिकीं भक्षिला । हे प्रशस्त न वाटे जनाला। मंदबुध्दीस्तव ।।** (दा. ७-१०-२६) आपण मात्र प्रकृतीच्या गुणाकडून म्हणजे देहाकडून होणारी कर्मे मी कर्ता ह्या देहाहंकारामुळे आपल्या उरावर घेतो, म्हणून प्रारब्धही आपल्या बोकांडी बसते. **''प्रकृते: क्रियमाणानी गुणै: कर्माणि सर्वश:। अहंङ्कारविमूढात्मा कर्ताहमिति मन्यते।** (भ. गी. ३-२७) ज्ञान्याचा देहापासून अलिप्त असल्याचा अनुभव आपल्यासारख्या अज्ञानी जनांना नसल्यामुळे,

ज्ञानी प्रारब्ध भोग भोगून संपवितो. असे आपले समजुतीसाठी म्हटले जाते. **ज्ञान्यांचे दृष्टीने ज्ञानाग्नि:सर्व कर्माणि** हेच भगवंताचे म्हणणे सार्थ होय.

कर्मकचाट्यातून सुटणेचे असल्यास सर्व दु:ख, शोक, चिंता सोडून ज्ञान प्राप्त केले पाहिजे. **ऐक ज्ञानाचें लक्षण। ज्ञान म्हणजे आत्मज्ञान। पहावें आपणासि आपण। या नांव ज्ञान॥** (दा. ५-६-१)

मी कोण ? दिसणारा देहच मी की, अन्य कोणी आहे ? याचा शोध घेतला पाहिजे, म्हणून समर्थ शेवटच्या दोन ओळींत त्याचे विवेचन करतात. आत्मानात्म विवेकाने, आपण देहाहून अगदी वेगळे आहोत, सच्चिदानंद ब्रह्मरूप आहो, असा अनुभव घेऊन देहातीत होऊन राहावे. हाच मुक्तीचा सोहळा. देहबुध्दी सुटणेसाठी आत्मानात्म विवेक करावा कसा ? समर्थ म्हणतात,**''आपुलिया स्वानुभवें। आपणास निवेदावें। आत्मनिवेदन जाणावें। ऐसें असे॥''** (दा. ८-८-८) मी हा अनुभव जाणीवरूप आहे. यातच आपले निराकार, अद्वितीय, ज्ञानानंदस्वरूप प्रकट होते, हे विवेक्याला समजते. मी हे भान देहाला होत नाही हे थोड्या विचारांती कळेल. मी हे भान देहापासूनच निर्माण होत असेल, तर शवात का दिसून येत नाही ? शवातून मी हे भान नाहीसे झालेले असते, मी या जाणिवेने असलेले चैतन्य देहात असेपर्यत देहचेतना असते आणि ते देहाला सोडून गेले म्हणजे देह अचेतन होऊन पडतो. जीर्ण झालेला कपडा टाकून आपण नवीन वापरतो, त्या प्रमाणे जीर्ण देह सोडून चैतन्य नव्या देहाचा आश्रय करते. **वासांसि जीर्णानि यथा विहाय।** (भ. गी. २-२२) देह ज्यापासून झाला त्या रजरेताला व त्यापासून होणाऱ्या रक्त, मांस, त्वचा, अस्थि, केस वगैरे वस्तूंना कोणी मी म्हणत नाही. हे पदार्थ बाहेर फेकले जातात तेव्हा मी फेकला गेलो, असे वाटत नाही. कातडी फाटली असता मी फाटलो असे वाटत नाही. डुलकी येऊन देहाचे क्षणभर विस्मरण होते व देह पडतो. पण भानावर आले की समजते. यावरून देहाहून मी हे आत्मीय स्फुरण अगदी वेगळे आहे हे कळते. देह हा अन्नापासून झाला. पण अन्नाला कोणी मी म्हणत नाही. मी अन्न घेतो व सोडतो असा अनुभव असतो. या अनुभवाच्या ओघाने अन्नापासून झालेला देह मी घेतो, मी सोडतो असा अनुभव असणे साहजिक आहे, म्हणून हा देह-मी नव्हे. माझ्यात व देहात जमीन अस्मानाचा फरक आहे. (१) देह दृश्य, मी ही जाणीव अदृश्य (२) देह अनेक म्हणजे सप्तधांतूनी युक्त, मी ही जाणीव एकच. (३) स्वप्नात देहाचे भान नसते. दुसराच देह दिसतो. पण मी स्वप्नात असतोच. देहच मी



असतो तर मी असून त्या देहाचे भान नष्ट होणार नाही. (४) स्वप्नात ह्या देहाचा व जागृतीत स्वप्नदेहाचा विसर पडला, तरी त्याबरोबर मी हे भान नष्ट होत नाही. (५) सुषुप्तीत तर कोणताच देह आहे, असे वाटत नसून आपण (मी) विश्रांती घेतो, सुखरूप असतो, आनंद अनुभवितो.

मग हा आनंद आपणाशिवाय एकटाच कसा राहू शकेल ? **तेथे आत्माही नाहीं म्हणावा। तरी आनंद कैसा गणावा। बुध्दीने तेथील आनंद जाणावा। जागृतीत त्याच आत्मयाकरिता।** (य. दी. ३-८४९)

वरील सर्व कारणांमुळे मी हे भान देहाहून अगदी निराळे आहे, हे स्पष्ट होते. दुसऱ्याचे देह मला जसे दृश्य आहेत, तसाच माझा देह मला दृश्य आहे. वस्त्र पाहणारा वस्त्राहून वेगळा असतो. तसा मी ज्ञानरूप द्रष्टा ज्ञेय देहाहून वेगळा आहे. एकाच कापसाचे सुताने बंडी व कोट निर्माण होतो. अन्नाच्या रजरेताच्या न्युनाधिक्याने झालेले स्त्रीपुरूष नाममात्र असून मी त्यापासून निराळा येवढेच खरे. देहाचे पांघरूण वस्त्र व माझे पांघरूण देह. यामुळे मी देहाहून वेगळाच आहे. माझ्याप्रमाणे इतर सर्व देहाहून भिन्न ज्ञानानंदरूपच आहेत. माझ्यासकट सर्वांचे रूप एक परमात्माच आहे. **अहमयमिदंच वासूदेव:॥ समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तं परमेश्वरम्। विनश्यत्स्व-विनश्यन्तं य: पश्यति स पश्यति॥** (भ. गी. १३-२७) म्हणून **जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत॥ आत्मानात्म विवेक करावा। करून बरा विवरावा। विवरोन सदृढ धरावा। जीवामध्यें।** (दा. १३-१-१) **देहबुध्दीनें बांधला। तो विवेकें मोकळा केला। देहातीत होतां पावला। मोक्षपद॥** (दा. ६-२-३६)

★ ★ ★

**मना सांग पां रावणां काय झालें।**
**अकस्मात तें राज्य सर्वें बुडालें।**
**म्हणोनी कुडी वासना सांडि वेगीं।**
**बळे लागला काळ हा पाठिलागी॥१३॥**

मागील श्लोकात - विवेकाने देहबुध्दी सोडून विदेहीपणे मुक्त स्थितीत राहावे असे सांगितले. पण देहबुध्दी सुटली नाही तर काय अनर्थ होतो, हे रावणाचे उदाहरण घेऊन या श्लोकारंभी सांगितले आहे. जसजशी देहबुध्दीची तीव्रता वाढत जाते, तसतशी आसुरी वृत्तीही वाढत जाते. असूरप्रजेला खाणे - पिणे आणि ग्राम्य व्यवहार करणे ह्याशिवाय काही माहीत

नसते. कारण ती प्रजा देह हाच आत्मा मानीत असते. त्यामुळे व्यभिचारादि अनीतीचे व्यवहार राजरोसपणे ती करते, गीतेत आसुरी संपत्तीत जन्म पावलेल्या मनुष्यात दांभिकपणा, मस्ती, क्रोध, निष्ठुरता व अज्ञान हे गुण असतात असे सांगून ती बंधनाला कारणीभूत होते, असे भगवंतानी सांगितले आहे. (भ. गी. १६-४)

समर्थांनी येथे जे रावणाचे उदाहरण दिले आहे. ते मोठे मार्मिक आहे. कारण रावण हा आसुरी वृत्तीचा असलेमुळे त्याचे ठिकाणी दर्प होता, अभिमान होता. कर्तव्याकर्तव्याचे अज्ञान होते. पण तो देवभक्त होता. त्याने तपश्चर्या केली व शंकराचे प्रेम संपादन केले. तो वेदांना मानणारा होता. यजनशील होता. संध्यादि नित्य कर्मानुष्ठान करणारा होता, या दैवी गुणांबरोबर अज्ञानामुळे तीव्रस्वरूपाची देहबुध्दी त्याचे ठिकाणी होती. देहबुध्दीमुळे देहाला जे सुख ते मला सुख असे वाटते. या सुखार्थ विषयोपभोग व ऐश्वर्य यांचे ठिकाणी आसक्ती उत्पन्न होते व तत्प्राप्त्यर्थ कर्म घडते. विषयासक्तीमुळे वेदांचे रमणीय अर्थ खरे वाटू लागतात. अन्त:करणात आत्मबुध्दी उत्पन्न होत नाही. **भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम्।** (भ. गी. २-४४) **दैवें अमृतकुंभ जोडला। तो पायें हाणोंनि उलंडिला। तैसा नासिती धर्मु निपजला। हेतुकपणें।** (ज्ञा. २-२५२) रावणाने शिवभक्ती केली, पण का ? देवांना पालथे घालून वैभव भोगण्याचे हेतूने, हा हेतु का ? देह अहंकारामुळे. म्हणून देहबुध्दि वाईट. देहबुध्दीत धर्माचरण चालू असले तरी विषयासक्ती राहतेच. म्हणून समर्थ म्हणतात, 'मना! रावणासारख्या धर्मिष्ठ, पराक्रमी पुरूषाची देहबुध्दीमुळे काय अवस्था झाली याचा विचार कर.' एकाएकी, ध्यानीमनी नसता पापाचा घडा भरल्याबरोबर पटकन सर्व राज्य हातातून गेले. त्याचे सामर्थ्य काय कमी होते काय ? सर्व देवांना बंदिशाळेत डांबणारा, चौदा चौकड्याचा राजा. त्याचे उद्गारही कसे अहंकारयुक्त होते पाहा. **मज रावणासारिखा कोण आहे। समरांगणी काळ भीडो न राहे।।** कर्दन- काळासारखा काळही मजसमोर चार हात करू शकत नाही. मग इतर मानवांची काय कथा ? अशी त्याची घमेंड. पण वेळ आल्याबरोबर राज्यासकट साफ झाला. एवढ्या सामर्थ्यसंपन्न राजाची ही अवस्था. मग आपल्यासारख्या सामान्य जीवाची काय शाश्वती ? रावणाचे उदाहरण देण्यात दोन हेतु साध्य झाले. दुष्टवासनेमुळे त्याचा नाश झाला. म्हणून मना दुष्ट वासना धरू नको हा उपदेश व प्रत्येक वस्तूवर कालाची सत्ता असते. योग्य समय आला की तो



ती वस्तू आपल्या पोटात गडप करतो. मी मी म्हणणारे नाहीसे होतात. ही मनाला भीती.

दृष्ट वासनेचा मूळ गड्डा कोणता असेल तर तो देहवासना, देहबुध्दी, देहाहंकार हा होय. भ. गीतेत १६ व्या अध्यायातील १३-१४-१५ श्लोकात आसुरी संपत्तीची लक्षणे विशद केली आहेत. ही देहबुध्दीचीच लक्षणे आहेत. अमुक स्त्रीपासून मला सुखोपभोगप्राप्ती होईल, या बुध्दीतून सीताहरण झाले. परद्रव्य, परनारीचे हरण झाल्यानंतर ऱ्हास हा ठरलेलाच. म्हणून समर्थ मनाला सांगतात, **परद्रव्य आणीक कांता परावी। यदर्थी मना सांडि जीवीं करावी।। नको रे मना द्रव्य ते पुढीलांचे।।** रावणाचे उदाहरणाने परस्त्रीमुळे घात कसा होतो हे या श्लोकात सांगतात. विवेके देहेबुध्दी सोडूनि द्यावी असा मागील श्लोकात उपदेश करून ती न सोडली तर रावणासारखी अवस्था होते, हे या श्लोकात विशद केले. ही वासना किंवा देहबुध्दि का सोडावयाची याचे विवेचन या श्लोकाच्या शेवटच्या चरणात केले आहे.

मना, तुझ्यामागे काळ टपून बसला आहे. सावध राहा. हा चोर काळ दिसत नाही, याची पाउलें वाजत नाहीत. पण घडीघडीने आयुष्य खात तो एकदम मानगुटी पकडतो, **काळ जवळिच उभा नेणा। घालीं झांपडी खुटीं काना।। कैसा हुशार सावध राहीं। आपुला तू आपुले ठायीं।। काळे पुरविली पाठी। वरूषे झाली तरी साठीं।। तुका म्हणे काळा। कर्म मिळतें तें जाळा।।** (गा. ३६१२) काळ कर्मावर पोसला जातो. जन्ममरणाची धगधग जळती ठेवतो. इंधन चालू असेपर्यत अग्नी धगधगीत राहतो. पण तें थांबविले की अग्नी शांत होतो. कर्माचा ओघ चालू आहे तोपर्यंत काळाचा ताप दाहक राहतो. कर्म भस्म होऊन संपले की कालसत्ता संपली. हे कर्म ज्ञानाने म्हणजे स्वरूपाच्या जाणिवेनेच भस्म होते आणि ज्ञान, **विवेके देहेबुध्दी सोडूनि द्यावी।।** अशा देहबुध्दी सुटल्यानेच होते. देहबुध्दी सुटण्याचे कार्य नरदेहातच होते. अन्य कोणत्याही जन्मात होत नाही म्हणून **बळे लागला काळ हा पाठिलागी** हे ध्यानात ठेवून स्वस्वरूपी स्थिर व्हावे.

★ ★ ★

**जिवां कर्मयोगे जनीं जन्म जाला।**
**परी सेवटीं काळमूखीं निमाला।**
**महा थोर ते मृत्युपंथेचि गेले।**
**कितीएक ते जन्मले आणि मेले।।१४।।**

मागील श्लोकात काळाबद्दल इशारा दिला. काळाकडे लक्ष देऊन वाईट वासना - देहबुध्दि त्वरित सोड; जिवंत आहेस तेवढ्या वेळात सोडणेची धडपड कर, असा उपदेश केला. काळाबद्दल सावधान, जागरूक राहणेचा उपदेश संत अट्टाहासाने करतात. तुकोबा म्हणतात, **नाशवंत देह जाणार सकळ। आयुष्य खातो काळ सावधान॥** तवा तापलाय तोपर्यंतच भाकरी भाजून घेणारा शहाणा. नरदेह आहे तोवर आत्महित साधणारा चतुर. नाथ म्हणतात, **''या इतुके श्रेष्ठ चातुर्य नाही'' चतुरांचे चातुर्य गहन। या नांव बोलिजे गा आपण। मिथ्या देहे करूनि भजन। ब्रह्म सनातन स्वये होती॥** (ना. भा. २९-४०६) यासाठी समर्थ येथून पुढील २-४ श्लोकात काळाचा प्रभाव सांगून मानवी देह किती क्षणभंगुर आहे हे स्पष्ट करतात. हेतु येवढाच की मनुष्याने नेहमी मरणाचे स्मरण ठेवून ऐहिक वैभवास न भुलता, आपल्या हयातीत आत्मकल्याण साधावे. **रामदास म्हणे स्वहित करणे। निर्धारे मरणे मागेपुढे॥** (स्फु. प्र.)

जिवाचे कर्म, हे त्याच्या जन्माला कारणीभूत आहे. मनुष्य हा प्रकृती पराधीन आहे. **कार्य ते ह्यवश: कर्म सर्व: प्रकृतिजैगुणै:॥** (भ. गी. ३-५) सत्व, रज, तम गुणामुळे कर्मवासना, ते इष्टानिष्ट कर्म करणेसाठी शरीर, शरीरामुळे कर्म व कर्मामुळे शरीर असे हे चक्र चालू असते. **क्रिया शरीरोद्भव हेतुरादृता, प्रियाप्रियौतौ भवत: सुरागिण:॥**

बरे, जन्माला आल्यानंतर तरी स्वस्थता आहे काय ? नाही. जन्मापाठोपाठ मृत्यूचे भय आहेच. शरीरापाठोपाठ जसे कर्म तसेच जन्मापाठोपाठ मृत्यू. कालाची विश्वावर अबाधित सत्ता आहे, हे स्पष्ट अनुभवास येत नाही. का ? त्याच्या तडाक्यातून कोणीही सुटू शकत नाही. आपली गोष्ट तर सोडाच. अमृतप्राशनामुळे अमर झालेले देवही त्याच्या सत्तेतून सुटले नाहीत. **अमर अमृतपान करिती। तेही मरणार्णवीं बुडती॥** (ना. भा. २८-७०३) **शरीर रक्षावे हा धर्म बोलती। काय असे हाती तयांचिया॥ क्षणभंगूर हे जाय न कळता। ग्रास गिळी सत्ता नाही हाती॥**

सामान्य मनुष्य जन्माला येतो, खातो, पितो आणि आला तसा जातो. आहार, निद्रा, भय, मैथुन या चार विषयातच पशूप्रमाणे रंगून जातो व पशूप्रमाणे अज्ञानातच मरतो. समर्थ वर्णन करतात. **निजेलें असताचि मेलें। पुन्हा उपजतांच निजेले। ऐसे आले आणि गेले। बहूत लोक॥** (दा. ७-१-२४) हे झाले सामान्य मनुष्याचे. पण ज्यांनी काही लौकिक कर्तबगारी केली, किंवा काही पराक्रम गाजवला, अथवा अध्यात्मिक साधन केले असे ही लोक शेवटी



मृत्युच्या दाढेत चूर होऊन गेलेच. सामान्य असो की विशेष असो, मृत्यू कोणालाही चुकला नाही. कालाची संगति नित्य असल्यामुळे केव्हा, कोठे, काय होणार कळत नाही. कर्माप्रमाणे प्राणी देशी किंवा विदेशी मरतो. **प्राणी संसारासी आला। माया जाळी गुण्डाळिला। अंती एकलाचि गेला। हात झाडुनि॥** राजा असो, रंक असो, आस्तिक असो, नास्तिक असो, कर्मठ असो, भक्त असो, पंडित असो, मूर्ख असो, शास्त्रज्ञ असो, मंत्रज्ञ असो, सिध्द असो, साधक असो, वैद्य असो पंचाक्षरी असो, स्त्री असो पुरूष असो, इच्छा असो नसो, मृत्यू कोणालाच टळत नाही. **मृत्याभेणें पळो जातां। तरी मृत्यू सोडिना सर्वथा। मृत्यास न ये चुकवितां। कांही केल्या॥** (दा. ३-९-३८)

अशी ही जबरदस्त कालसत्ता असली व त्यामुळे प्रत्येक जीव कालाल भीत असला, तरी नरदेह ही अशी और चिज आहे, की तिचा योग्य उपयोग केल्यास विवेकाने कालावरही मात करता येते. तो विवेक हा-कालाची सत्ता मर्यादित वस्तूंवर असते. नित्य अमर्याद वस्तूवर ती नसते. आत्मा अमर्याद, अमर असून आपण आत्मस्वरूप आहो असे ज्ञान झाले, व अनुभवाने निर्धार झाला, तर मरणाची व कालाची भीती कोठे उरली ? **आपणासी ठावचि नाहीं। जन्ममृत्यू कैंचें कांई॥** (दा. ६-२-३४) घाणेरडा नाशवंत देह मी असूच शकत नाही. मग मृत्यु कोणाला ? असा विवेक करणारा ज्ञानी कालाच्याही पलीकडे आत्मरूपाने उरतो, ब्रह्मरूप होऊन जातो. **असो ऐसे सकळही गेले। परंतु येकचि राहिले। जे स्वरूपाकार जाले। आत्मज्ञानी॥** (दा. ३-९-५९)

तसेच दुसरी लक्षात ठेवणेची गोष्ट म्हणजे ईश्वर भजनात गेलेल्या वेळेवर कालाची सत्ता नाही. **सदा काळ गणना करी आयुष्याची। कथेचे वेळेची आज्ञा नाही॥** (तुकाराम) ज्ञानोबा आपल्या हरीपाठात म्हणतात, **''नित्य सत्यमित हरीपाठ ज्यासी। कळीकाळ त्यासी नातळती॥''** कालाविरूध्द नामस्मरणाची ही अमोघ शक्ती आहे. **अवघाचि आकार ग्रासियेला काळे। एक ते निराळे हरीचे नाम॥** कारण नाम आणि नामी यांचा अभेद असतो. ते एकच. अनन्य होऊन नामजप करणारा नामाच्या बळाने हरिरूप-ब्रह्मरूप होऊन 'मी' ला विसरतो. **नाम जपयज्ञू तो परम। बाधूं न शके स्नानादि कर्म॥** (ज्ञा. १० - २३३) अमृताने मृत्यू येत नाही. मग नाम तर परमामृत. तेथे मृत्यू कोठचा ? **तुका म्हणे आम्ही जिंकोनिया काळ। बैसलो निश्चळ होऊनिया॥ न मे भक्त: प्रणश्यति। तेषां अहं समुद्धर्ता मृत्यु संसार सागरात्॥** ही तर

भगवंताची ब्रीदवाक्ये आहेत. हरीकृपेने काल जिंकला जातो. विवेकाने निर्गुणाशी अनन्य व्हावे किंवा भजनाने सगुण खुंटा धरावा. **नाही देहाचा भरवसा। केंव्हा सरेल वयसा। प्रसंग पडेल कैसा। कोण जाणे।। याकारणे सावधान असावें....** (दा. १९-६-२५/२६)

★ ★ ★

**मना पाहतां सत्य हे मृत्यूभूमी।**
**जिता बोलती सर्वही जीव मी मी।**
**चिरंजीव हे सर्व ही मानिताति।**
**अकस्मात सांडूनिया सर्व जाती।।१५।।**

मागील श्लोकात जन्माला आलेला प्राणी, थोर असो सामान्य असो मरणारच - हा सृष्टीचा अबाधित नियम सांगितला. ऐहिक व पारमार्थिक दृष्ट्या कोणतेच श्रेष्ठत्व प्राप्त करून न घेता जे केवळ जन्माला आले, आले तसे गेले अशा सामान्य लोकांचे जीवन ह्या श्लोकात सांगितले आहे. सत्य हे मृत्यूभूमी हा अबाधित नियम. या नियमाकडे पिंड ब्रह्मांडाच्या अज्ञानामुळे दुलर्क्ष होऊन सामान्य लोक विपरीत भावनेने कसे नांदतात हे सांगतात व शेवटच्या चरणात अज्ञानाचा परिणाम काय होतो, याचे वर्णन करितात.

वास्तविक हा मृत्युलोक. येथे उत्पन्न होते ते नाश पावते. क्षणिकत्व हा संसाराचा स्वभाव आहे. भगवंतानी अश्वत्थ वृक्षाचे उदाहरणाने याचे क्षणिकत्व मनावर बिंबवणेचा प्रयत्न केला आहे. (भ. गी. १५-२) **तरी श्व: म्हणजे उखा। तोंवरि एकसारिखा। नाहीं निर्वाहो यया रूखा। प्रपंचरूपा।।** (ज्ञा. १५-१११) दुसरा दिवस उजाडे पर्यंतही हा आहे त्या स्थितीत न टिकणारा असा प्रपंच वृक्ष आहे, मेघाचे रंग क्षणोक्षणी बदलावेत तसे याचे आहे. पण याच क्षणिक वृक्षाला अव्यय म्हणण्यात येते. वास्तविक तो अनित्य, पण भ्रमामुळे नित्य वाटणारा म्हणून अव्यय म्हणतात. सागर एका बाजूने मेघांच्या रूपाने बाहेर पडतो, आणि दुसरीकडे नद्यांचे रूपाने भरत असतो. पण ही मेघांची व नद्यांची चाललेली कर्मे लक्षात येत नाहीत, म्हणून समुद्र जसाचा तसा भरलेलाच आहे असे वाटते. प्रलयकाळी जुनी सृष्टी उन्मळून पडते, तर कल्पारंभी नवी सृष्टी बनते. दिवस उगवतो - मावळतो - पुन्हा उगवतो. वर्ष संपले की दुसरे सुरू होते. एक देह पडला की दुसरा जन्माला येतो. असा हा कारभार अव्याहत ओघाने चालू असल्यामुळे सर्व सृष्टी नित्य आहे असेच



वाटते. गरगर फिरणारा भोवरा स्थिर आहे असा भास होतो. **जैसें वाहतें पाणी जाय वेगें। तैसेचि आणिक मिळे मागें।।** (ज्ञा. १५-१३३)

जशी सृष्टी अव्यय, नित्य तसे आपणही नित्य असे वाटते. मारूती, बिभीषणाप्रमाणे आपणही चिरंजीवच असे वाटते. देहातील अनेक परमाणू घटत असतात, नवीन उत्पन्न होतात, देह झिजत असतो. शरीरातील पालट प्रत्यक्ष दिसत असतो. जरा आपले रूप दाखवित असते. तथापि मनुष्याला वाटते की आपण आहोत तसेच आहो. म्हातारा म्हटले की राग येतो. **तुझीच तूजचि देखतां। काळे गिळिली बाल्यावस्था। तारूण्याचा ग्रासिला माथा। वार्धक्याभंवता लागला असे।।** (ना. भा. ७-२२२) भोवऱ्याप्रमाणे झपाट्याने जाणाऱ्या आयुष्यामुळे आपण स्थिर आहोत, असेच वाटते. अहंकाराने मी, माझे या भ्रमांत नाचू लागतो व मी म्हणजे देहभाव मरेपर्यंत घट्ट धरून बसतो. पिंड व ब्रह्मांडदृष्ट्या अहंकार कसा उत्पन्न होतो पाहू. पूर्व कल्पातील जीवांची बीजभूत कर्मे व पाप - पुण्यात्मक संस्कार, त्यांना अनुसरून सृष्टी उत्पन्न व्हावी हा ईशसंकल्प असतो. **सोऽकामयत। बहुस्याम् प्रजा येयेति। सतपोऽतप्यत। सतपस्तत्वा इदं सर्व असृजत।** (तैतिरीय उप.) **एकोऽहं बहुस्याम्** या संकल्पातच ''अहं'' आहे. व तोच सृष्टीत जिवापर्यंत पोहोचतो. **माणसाची देव चालवी अहंता। मीच एक कर्ता म्हणोनिया।।** ह्या ''अहं'' चे अस्तित्व ईश्वराला तापदायक नसते. कारण त्याचे ठिकाणाचा अहंकार चैतन्य स्वरूपाला अनुसरून असतो. पण जीव देहाशी तादात्म्य पावून ईश्वरी अहंकार त्याचा त्याचे स्वाधीन न करिता, अज्ञानाने नश्वर देह म्हणजेच मी अशी अहंता धरतो म्हणून सुख - दु:खाच्या परंपरेत सापडतो. मी देह हे आवरणरूप अज्ञान हाच अहंकार. ईश संकल्पात उत्पन्न झालेला व जिवापर्यत आलेला जो अहंभाव, तो स्वरूपाकार, चैतन्याकार झाला की, कैवल्य व देहाकार झाला की **संसार, नाथ म्हणतात, ''अहमिति प्रथमाध्यासें । जीवासी जीवत्व आभासे। तो जे जे तत्वीं प्रवेशे । तें मी ऐसें म्हणतचि ।। तेथे मी देही म्हणतां। तत्काळ जाय पूर्णता...''** (ना. भा. १२-३०९,३१० ) हा देह मर्यादित अहंकार जिवाला नाचवतो. मी देखणा, मी कुरूप , मी धनवान, मी गरीब, मी पंडित, मी खुळा, मी जन्मतो, मी मरतो इत्यादि कल्पनांनी जिवाचा नाच सुरू होतो. पंचीकृत पंचभूतांना देहाकार आला की अहंकार सर्व शरीर व्यापतो. जिवाला 'थै थै' नाचवितो. हा अहंकार वाटेल त्या वस्तूवर झडप घालतो व नको त्या वस्तूशी तादात्म्य पावतो. माझे घर, माझी स्त्री, माझे पुत्र, माझी जमीन असे सर्व

माझे माझे म्हणत सुटतो. पण आश्चर्य हे की,हा आत्म्याशी तादात्म्य पावत नाही. कारण त्यात त्याचे मरण आहे. **देह हाडांची मोळी। मी म्हणोनि पोटाळी। तो अहंकार गाळी। पदार्थ हा।।** (अमृता. ७-१०९) हा पदार्थ म्हणजेच आत्मा, मी मी म्हणणारा देह अग्नीत किंवा जमिनीत गडप्प होतो व माझे माझे म्हटलेले सर्व येथेच राहते.

★ ★ ★

**मरे एक त्याचा दुजा शोक वाहे।**
**अकस्मात तोही पुढें जात आहे।**
**पुरेना जनीं लोभ रे क्षोभ त्यातें।**
**म्हणोनी जनीं मागुता जन्म घेतें ।।१६।।**

मागील श्लोकात काळ आयुष्य खात चाललाय याची जाणीव न ठेवता आपण जणू चिरंजीव आहोत, या समजुतीत सर्व आयुष्य जाते आणि अकस्मात मृत्युची झडप पडून मनुष्य मृत्युमुखी पडतो असे सांगितले. स्वत:च्याच मृत्यूची स्वत:स जाणीव नसते. पण तोच दुसऱ्याचे ठिकाणी पाहून तरी मनुष्याने सावध व्हावे की नाही ? दुसऱ्याचे पाहूनही मनुष्य बेसावध राहतो. तो का राहतो हे या श्लोकात सांगतात.

बा मना, अरे दुसऱ्या जिवलगाचा मुत्यू पाहून तू रडतोस ना ? शोक करतोस ना ? मग हीच पाळी एके दिवशी आपणावरही येणार हे तुला कसे समजत नाही ? एवढ्याने तू जागा का होत नाहीस ? उलट स्वत:स चिरंजीवच समजतोस आणि मृत्युमुखी पडतोस. हे केवढे आश्चर्य ! हीच माया. हाच भ्रम. **पहातो जनाला किती एक जाती। तनू टाकिताहे पुढे ते पहाती। गताच्या कथा काढितो अल्प काहीं। पुढे लोक ते काढिती आमुच्याही।।** आपल्यापुढे मृत झालेली माणसे आपण पाहतो. त्याचेसंबंधी आपण बोलतो. पण आपणही मरणार व आपल्यामागे लोक असेच आपणाविषयी बोलणार, याची जाणीव येत नाही. मृत शरीर अग्नीमुखी पडताना मनाला चटका बसून मन विरक्त बनते. पण हे स्मशानवैराग्य घरी येईपर्यंतच. **एक पहातसां एकांची दहनें। सावध त्या गुणें कां रे न व्हा ?** (गा. ३४१७) ''मृत्युचा धगधगता निखारा अस्तनीत असता गप्प कसे बसता ? देह पडला नाही तोवर सावध व्हा व देवाला नाव घेऊन हाका मारा आणि आपले कल्याण साधा. पुढे येणाऱ्या संकटाची आगाऊ चाहूल मिळूनही जो सावध होत नाही तो ऐनवेळी जळत्या घरात



सापडलेल्या माणसास स्वसामर्थ्याने विहीर खणता येत नाही व तो जळून मरतो, तसा मृत्युमुखी पडेल''. मनुष्य बेसावध का राहतो हे पुढे सांगतात.

मनुष्याचा विषयलोभ इतका जबरदस्त आहे, की तो कमी तर होत नाहीच पण उलट वाढतच जातो. तो खादाड आहे. **विषय सेविता कोण तृप्त झाला। इंधने निमाला अग्नी केवी।।** (तुकाराम) या क्षुब्ध वासनामध्ये तो इतका धुंद व गुंग होतो की त्याला मरणाचे स्मरणही रहात नाही व क्षुब्ध वासनामुळेच जन्म घ्यावा लागतो हेही कळत नाही. यामुळेच तो जन्म - मरणाचे फेऱ्यात अडकतो. काळाचे स्मरण न राहता तो विषयात कसा गुंगून जातो ह्याबद्दल ज्ञानोबाराय म्हणतात. ''**अगा मर हा बोलू न साहती। आणि मेलिया तरी रडती। परी असतें जात न गणिती। गहिंसपणें।। दर्दुर सापे गळिजतु आहे उभा। कीं तो मासिया वेटाळी जिभा। तैसे प्राणिये कवणा लोभा। वाढविती तृष्णा।**'' (ज्ञा. ९-५१३, ५१४) मनाचे श्लोक ९ मध्ये द्रव्यलोभ नको असे सांगितले. श्लोक १३ मध्ये परस्त्रीलोभ वाईट असे म्हटले आणि या श्लोकात विषयलोभाबद्दल सांगत आहेत. तृप्ती न होणे हाच ज्याचा स्वभाव तो लोभ. याचा जन्मआहे रजोगुणापासून. ''**सत्वात्संजायते ज्ञानं रजसो लोभ एव च।।** (भ. गी. १४-१७) रजो गुणाचे प्राबल्याने कोणती चिन्हे दिसतात याचेही भगवानांनी वर्णन केले आहे. **लोभ: प्रवृत्तिरारंभ: कर्मणामशम: स्पृहा। रजस्येतानि जायंते विवृध्दे भरतर्षभ।।** (भ. गी. १४-१२) रजोगुण प्रबल झाला की लोभ, त्यामुळे विषयाकडे प्रवृत्ती, त्याप्रीत्यर्थ कर्माला प्रारंभ व तो प्राप्त होईपर्यंत अशांती राहते. प्राप्त झाल्यास अति तृष्णा अशी ही परंपरा आहे. कर्माची धुमाळी माजते व त्यामुळे स्वैरसंचार चालू होतो. **हा ठायवरी लोभु। करी स्वैरत्वाचा राबु। वेंटाळितां अलाभु। तें तें उरे।।** (ज्ञा. १४-२३०) लोभिष्टपणामुळे स्वैर वर्तन बोकाळते, अप्राप्य तेवढेच सुटते.

ज्या रजोगुणापासून लोभ उत्पन्न होतो, तो रजोगुण-विषय तृष्णा व विषयासक्ती याचे कारण असल्यामुळे तो रंगेल आहे. ''**रजो रागात्मकं विध्दि तृष्णास गसमुद्भवम् । तन्निबध्नानि कौन्तेय कर्मसङ्गेन देहिनम्**'' (भ. गी. १४-७) हा जिवात्मा देहाचे ठिकाणी कसा बध्द होतो पाहा. रजोगुण जिवाला रंगेल बनवितो. त्यामुळे विषयलोभ, कामवासना उत्पन्न होतात. इंद्राचे ऐश्वर्य प्राप्त झाले तरी तृप्ती नाही. वासनाप्राबल्यामुळे हातचा भोग संपल्यावर पुढे काय ? याची विवंचना सुरू होते. भोग सतत रहावयासाठी जिवाचा आटापिटा. भोगवासना नेहमीच अतृप्त राहिल्यामुळे पुन: जन्म घेणेची पाळी. क्षणभर

विषय कल्पना सोडून हा जीव स्वस्थ म्हणजे आपल्या स्वरूपी स्थिर होण्याचा अभ्यास करेल तर किती मौज होईल ! पण वृत्ती स्थैर्याची गोडीच त्याला माहीत नसलेमुळे क्षणिक विषयसुखलोभाने पुन: गर्भवास स्वीकारतो. **ऐसा देहीं देहावेगळा। ते तृष्णेचिया साखळा। खटाटोपू वाहे गळां। व्यापाराचा।। हे रजोगुणाचें दारूण। देहीं देहियासि बंधन।** (ज्ञा. १४-१७२-१७३)

★ ★ ★

**मनी मानव व्यर्थ चिंता वाहातें।**
**अकस्मात होणार होऊनि जाते।।**
**घडे भोगणें सर्वही कर्मयोगें।**
**मतीमंद तें खेद मानी वियोगें।।१७।।**

मागील श्लोकात रजोगुणामुळे उत्पन्न होणाऱ्या लोभामुळे जीवात्मा वासनातृप्तीसाठी पुन: जन्म घेतो, असे सांगितले. गर्भाचे हाल सोसून जन्मानंतर तरी स्वस्थता प्राप्त होते काय ? नाही. जन्मापासून मृत्यूपर्यंत चिंता सुटतच नाही.

मनुष्याचे क्षुद्रत्व दाखविणेसाठी नपुसकलिंगी प्रयोग केला आहे. व्यर्थ चिंता वाहतो, असा शब्दप्रयोग हवा; पण वाहाते, हा शब्दप्रयोग योजला आहे. सर्व मानवी जीवन चिंतेत जाते. कसे होईल ? काय होईल ? कसे करू ? काय करू ? अशी अखंड चिंता लागून राहते. ही चिंता का ? याचा विचार केल्यास हरदासाची कथा जशी मूळ पदावर येते, तसे चिंतेचे मूळ देह-लोभ बुध्दीवर येऊन टेकते. या देहबुध्दीची आई आहे वासना व पिता आहे अहंकार. हे दोघे जिवाला मोहात पाडून चिंतेत टाकतात. चिंता म्हणजे जणू चिताच, ही होरपळून काढते. तिने स्वर्ग, मृत्यू, पाताळ व्यापिले आहेत. **पाताळाहूनि निम्न। जियेचिये उंचिये सानें गगन। जें पाहतां त्रिभुवन अणुही नोहे।।** (ज्ञा. १६-३३१) पाताळापेक्षाही खोल, उंचीला जिला आकाशही ठेंगणे व जिच्या विस्तारापुढे त्रिभुवनही अणू येवढे नाही, अशी चिंता त्रिभुवनाचेच पाठी लागली आहे. वास्तविक जिवाने चिंता वाहणे व्यर्थच. सृष्टी जिवाची की शिवाची ? अर्थात शिवाची. ऋतुमान, दिवस, रात्र, उत्पत्ती, स्थिती, संहार वगैरे व्यवस्था पाहणारा ईश्वर आहे, जीव नाही. **फुटे तरूवर उष्ण काल मासी। जीवन तयासि कोण घाली।।** (तुकाराम) म्हणजे सृष्टीचा व्यवस्थापक ईश्वर आपण जीव सृष्टीतले. मग जो सृष्टीची काळजी वाहतो त्याला आमची



काळजी नाही काय ? **तेणे तुझी काय नाही केली चिंता।** (तुकाराम) म्हणून समर्थ म्हणतात, **सर्व कांही चिंता केली भगवंते। आपुले चिंतेने काय होते।।**

जे घडायचे तेच घडणार, तुझ्या इच्छेवर काही अवलंबून नाही, जे घडणार त्यातील काही गोष्टी तुला अनुकूल अशा होतील, काही प्रतिकूल होतील. हा सृष्टी-व्यवहारच आहे. जग हे आपले नसून परमेश्वराचे आहे. कोणाला पुढे आणायचे, कोणाला मागे टाकायचे, याची सूत्रे त्याचे हाती. आमच्या कर्मगतीचे चक्र सृष्टीच्या कर्मचक्रात घड्याळाप्रमाणे निगडित आहे. जिवाला सृष्टीक्रमानुसार कर्मगती असून शिवाय प्रारब्धकर्माच्या आसाभोवती फिरण्याची गती आहे. सृष्टीचा ओघ प्रारब्ध कर्माला अनुकूल असतो तेव्हा प्रयत्न सिध्द होतो. जेव्हा नसतो तेव्हा प्रयत्न फोल ठरतो. अनुकूल ओघ असेल तर पोहणारा परतीराला योग्य त्या ठिकाणी पोहोचतो. पर ओघ प्रतिकूल असेल तर कला असूनही तो भलतीकडे लागतो किंवा बुडतो. **हानी मृत्यु लाभ होणार जाणार। सर्वही संसार संचिताचा।।**

असा हा सर्व आपल्या कर्माचा खेळ आहे. सृष्टीचा क्रम ठरविणारा ईश्वरच. कर्माचे फल देणारा ईश्वरच. तो आपल्या कर्मानुसार फल देतो. **लल्लाटी लिहिले होउनिया गेले। संचित भोगले पाहिजे ते।।** पण अहंकारी व अज्ञानी जिवाला आपल्या मनाप्रमाणे गोष्ट घडली नाही किंवा एखाद्या जिवलगाच्या मृत्युमुळे वियोग घडला म्हणजे खेद उत्पन्न होतो व दु:ख झाले म्हणजे ईश्वराच्या नावे ओरडतो किंवा प्रारब्धाला दोष देतो. पण आपल्या पूर्वकर्माचा मात्र त्याला विसर पडतो. ईश्वर कृपाळू आहे, न्यायी आहे, हेही तो विसरतो. यावर वाचक अशी शंका घेतील की सर्व सुखदु:खोपभोग जर ईश्वराधीन आहेत, तर निग्रह कशाला ? **सकळ ईश्वर, मन का आवरावे।।** किंवा एखादा ''प्रारब्धात असेल तर होईल परमार्थ'' असा मतलबसिंधूचा आधार घेऊन परमार्थाबद्दल उदासीन राहील. म्हणून कर्मविपाकातील **प्रारब्ध प्रयत्नवाद** नीट समजून घेतला पाहिजे.

हा वाद अज्ञान दशेतच राहतो. अधिष्ठान ब्रह्माचे ज्ञान झाले की प्रारब्ध देहाचे माथी मारून ज्ञानी मोकळा होतो. म्हणून मतिमंद खेद करतो असे म्हटले आहे. अज्ञान दशेतला हा वाद अनादिकालापासून आहे. **रज्जूरूपे परिज्ञाते सर्प खंडं न तिष्ठति। अधिष्ठाने तथा ज्ञाते प्रपंच: शून्यतां गत:।।१।। देहस्यापि प्रपंचत्वात् प्रारब्धावस्थिति: कुत:। अज्ञान जनबोधाय प्रारब्धं वक्तिवैश्रुति:।।२।।** प्रयत्नवादच खरा मानला तर प्रयत्नाने फल न दिल्याबद्दल

व दैववादच खरा मानला तर विना प्रयत्न फल दिल्याबद्दल ईश्वर पक्षपाती किंवा अन्यायी आहे, असे म्हणावे लागेल. पण ईश्वर तसा नाही, हे पटविण्यासाठी हा वाद आहे. प्रयत्नवादी काय किंवा प्रारब्धवादी काय, दोघांचीही कर्मे चालूच असतात. फल मिळाले तर मिळाले, नाही तर नाही, असेच दिसते. भेद फक्त वाद करणाऱ्यांतच. वास्तविक सर्व मिश्रवादीच. काही वेळा कोणाच्या तरी प्रयत्नाने कोणाचे तरी नशीब उघडते. एकाचे प्रयत्नावर अनेकांचा हक्क असतो. एकाचा प्रयत्न दुसऱ्यास जसा फळाला येतो, तसाच तो हानिकारकही होतो. ब्राह्मण दारू प्याला की सर्व जातीस काळोखी. काही वेळा एकाची हानी, तोच दुसऱ्याचा लाभ, व्यवहारात नेहमी याची उदाहरणे दिसतात. आमची यात्रा तर टांगेवाल्याची चंगळ, गावात रोग तर लाकूडवाला सधन, प्रजेला महागाई तर व्यापाऱ्याची खैरात, धान्याची टंचाई - काळाबाजारवाल्यांची चंगळ.

आईवडिलांचे प्रयत्नाने जन्म मिळाला. त्यांच्याच कष्टाने तारूण्यापर्यंत वाढही झाली. स्वप्रयत्नाने काही दिवस जगतो न जगतो तो वृध्दपणी पुन: दुसऱ्याचे प्रयत्नावर जगणे अवलंबून. एवंच आपल्या देहात, किंबहुना विश्वकुटुंबात प्रारब्ध आणि प्रयत्न समसमान नांदतात. प्रारब्धाशिवाय प्रयत्न नाही, प्रयत्नाशिवाय प्रारब्ध नाही. प्रारब्ध व प्रयत्न शब्द दोन भिन्न असले तरी मागून पुढून कर्मच. ज्ञानी असो, अज्ञानी असो, उभयतांच्यामागे ते लागले आहे. ज्ञानी स्वरूपानुसंधानाने आघात सहन करतो आणि **मतिमंद ते खेद मानी.**

प्रयत्नानंतरच दैव, नशीब इत्यादि शब्दांचा उच्चार होतो. प्रारब्ध हा शुभाला व अशुभाला आदळण्याला एक टेकू आहे. बाकी सर्व प्रयत्नच. मनुष्य मानतो नशीब, करतो प्रयत्नच.

ब्रह्माच्या ठिकाणी पहिले स्फुरण झाले तो प्रयत्नच, तो सर्व प्रथम म्हणून श्रेष्ठ. **आहे निराकार, निर्मळ, निश्चळ। तेथूनि चंचळ प्रेत्न झाला। प्रेत्न झाला आधी म्हणोनिया थोर। प्रारब्ध विचार ऐलिकडे।।**

★ ★ ★

**मना राघवेवीण आशा नको रे।**
**मना मानवाची नको कीर्ति तूं रे।**
**जया वर्णिती वेद शास्त्रें पुराणें।**
**तया वर्णितां सर्वही श्लाघ्यवाणें।।१८।।**



मागील श्लोकात मानव व्यर्थ चिंता करीत राहतो. जे घडणार ते वेळी घडतेच. पण जे घडते ते आपल्या कर्मानुसार घडते, म्हणून प्रयत्नपूर्वक चांगलेच कर्म करीत जावे, व्यर्थ चिंता करू नये, असे सांगितले. वास्तविक चिंताच करायची तर ती देवप्राप्तीची करावी, त्यासाठी सत्कर्म करावे. नर देहासारखा अलभ्य लाभ झाला असता, आपले जीवित संपणेपूर्वी ईश्वरी अनुग्रह आपल्यावर कसा होईल, याची सारखी चिंता पाहिजे. लौकिक किंवा नश्वर देहाची-विषयांची आशा धरून काही उपयोग नाही, असा उपदेश या श्लोकात समर्थांनी केला आहे.

बा मना, आत्माराम राघवाची कृपा प्राप्त करून घेणेशिवाय दुसरी कसलीही इच्छा ठेवू नकोस. विषय कामना वाईट पण **काम असावा ईश्वर भजनी। क्रोध असावा इन्द्रियदमनी।।** षड्रिपूंचा ओघ ईश्वरप्राप्तीसाठी वळविणेत कल्याण आहे. पुष्कळ लौकिक साधला, पण हृदयस्थ ईश्वराची ओळख पटली नाही तर जन्म व्यर्थ. **लौकिक बरा संपादिला। परी अंतरी जागा नाहीं जाला। मुख्य देवास चुकला। तो आत्मघातकी।।** (दा. ९-१०-९) राघव हा तुझा अखंड सोबती. मानव देह असो की कीटक असो तोच तुझा सोबती. **देव प्रीती राखों जाणे। देवासि करावें साजणे। जिवलग अवघी पिसूणें। कामा न येती।।** (दा. ४-८-२९) श्रीराम सोडून गणगोत, विद्या, लक्ष्मी, सोयरेधायरे, शेजारीपाजारी इत्यादिकांची आशा धरू नकोस. **जन हे सुखाचे दिल्या घेतल्याचे। बा अंतकाळींचे कोणी नाही।।** समर्थ स्वत:चा अनुभव सांगतात. **''सेवकू मानवीयांचे कष्टती बहूतांपरी। सेविला देव देवांचा। तेणे मी धन्य जाहलो।। नीच हे मानवी प्राणी। नीचाश्रय कामा न ये। महत्कीर्ति श्रीरामाची। फावला महदाश्रयो।।''** ईश्वर त्रैलोक्याचा उद्धार करणेस समर्थ, तर मानव स्वत:चाही उद्धार करणेस असमर्थ. ईश्वराचे ठिकाणी समत्व तर मानव आपमतलबी. ईश्वर सदय. मानव स्वार्थासाठी निर्दय. मानव कसाही वागला तरी लोकनिंदेला पात्र, चारित्र्यसंपन्न श्रीराम ह्या लोक-निंदेतून सुटले नाहीत. मग आपली काय कथा ? **लोक फार वाखा अमंगळ झाला । त्याचा त्याग केला पांडुरंगा । लोकमान देह सुख। संपत्ति उपभोग अनेक । विटंबना दु:ख । तुझीये भेटी वाचून ।।** (तुकाराम) म्हणून सर्व आशापाश तोडून कोणाचीही स्तुती न करता बा मना, राघवाचेच गुणगान करावे व त्याचीच आसक्ती धरावी. प्रेमाचा एक कायदा आहे. जड वस्तूवर प्रेम केले किंवा त्यात आसक्त

झाल्यास ती वस्तू तुमचेजवळ राहत नाही. अनात्म वस्तूवर प्रेम करून तिच्या विरहाचे दु:ख टाळता येत नाही. जडापासूनच आपल्या प्रेमास सुरुवात होते पण ते तेथेच थबकू न देता पुढे जा. वरच्या भागावर न थांबता तळापर्यंत जा. म्हणजे नामरूपावर न थांबता अंतस्थ परमात्म्यापर्यंत ते न्या. कारण शुध्द चिरंतन प्रेमस्वरूप असा एक परमात्माच आहे. तेच सर्व सुखाचे आगर आहे. स्थूलाकडून सूक्ष्माकडे, साकाराकडून निराकाराकडे असा हा आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग आहे. **अर्जुनपण न घेतां। मी ऐसें पंडुसुता। उठतसे तें तत्त्वता। तयाचें रूप।।** (ज्ञा. १८-१३१५) म्हणून मानवी देहाची स्तुती करू नको. त्यास खेळविणाऱ्या अंत:स्थ राघवाची स्तुती कर.

**जया वर्णिती वेदशास्त्रे पुराणे।।** वेद चार आहेत - ऋग्, यजू, साम, अथर्व. एकाच वेदाचे हे चार भाग व्यासांनी केले. प्रत्येक विभागाचे संहिता व ब्राम्हण असे दोन भाग असतात. मंत्र सूत्रांना संहिता म्हणतात. आरण्यके हा वेदाचाच एक भाग आहे. वेद ही अमानवी देववाणी आहे. **अपौरूषेयवाक्यंवेद:।।** जगदुत्पत्तीचे वेळी सर्वप्रथम उत्पन्न झालेल्या प्रजेला इहपर सुख-साधनाचा बोध परमात्म्याशिवाय दुसरा कोण सांगणार ? मानवाला चिरंतन सुख प्राप्त व्हावे यासाठी त्यांचे प्रयोजन. वैदिक प्रार्थना इहपर सुखार्थच आहेत. 'परमेश्वरा तुझे ब्रह्मतत्व जाणणेसाठीच मी तुझी प्रार्थना करतो. विपुल पर्जन्य, धान्य सुप्रजा, सदाचार, अभ्युदय, गोधन, इत्यादि सर्व तुझ्या कृपेने निश्चल व निर्दोष असावे. सारांश, सर्व वेद परमेश्वर कृपेसाठी त्याचीच स्तुती करतात. **ऐके वेदींचा तात्पर्यार्थ। मुख्य मी भजावा भगवंत।। वेद अनंत बोलला। अर्थ इतुकाचि साधिला। विठोबासि शरण जावे। निज निष्ठे नाम गावे।।**

वेद - ४, ऋग्, यजु, साम, अथर्व. (प्रत्येकात संहिता, ब्राह्मण आरण्यक, उपनिषद हे चार प्रकार असतात. **संहिता** - देवता-मंत्रसंग्रह रूपाने असतात. याचा यज्ञात उपयोग. **ब्राह्मण** - यात सर्व यज्ञविधीची चर्चा असते. काही आख्यायिका, शब्द व्युत्पत्ती असतात. **आरण्यके उपनिषदे** - यात तत्वज्ञान उपदेश असतो. हे चार पुरूषार्थ प्रवृत्ती-निवृत्ती, धर्मलक्षण, आत्मविचार इ. सांगतात.) शास्त्रे - ६. न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्व मींमांसा व उत्तर मीमांसा. गीता हेही एक शास्त्र आहे. **ज्याच्या नि:श्वासी। जन्म जाले वेद राशी। तो सत्य प्रतिज्ञ पैजेसी। बोलिला स्वमुखे।।** सर्व शास्त्रांचे तात्पर्य साक्षात् किंवा परंपरेने हरीस्वरूप विवेचनार्थच आहे. कोठे सगुण कोठे निर्गुण इतकेच. शुकदेव म्हणतात, **आलोढ्य**



**सर्व शास्त्राणि विचार्यच पुन: पुन:। इहलोके सुनिष्पन्नं ध्येयो नारायण: सदा।।** पुराणे १८ - **पुरा परंपरांवक्ति पुराणं तत् प्रकीर्तितम्।।**

पुराणात पूर्वपरंपरा सांगितलेली असते व गूढवेदार्थ साध्या भाषेत प्रकट करून लोकांस भावी मार्गाकडे वळवणे, हा हेतु मुख्य. पुराणात एका देवाची स्तुती, तर एका देवाची निंदा, असे वरवर दिसते. पण तिचे तात्पर्य निंदा स्तुतीत नसून स्तुत्य इष्ट देवतेच्या अव्यभिचारी भक्तिसाठी आहे. उडत्या पक्ष्याप्रमाणे कामनेने निरनिराळ्या देवामागे धावणे इष्ट नाही. **एको देव: केशवो वा शिवो वा।।** असे असावे. ज्ञानेश्वर म्हणतात. **माझे अधिष्ठान धरीं। आणि वोवसे आनाचे करीं। पितृकार्यांवसरी। पितरांचा होय।।** (ज्ञा. १३-८१६) **ऐसा अखंड भजन करी। उगा नसे क्षणभरीं। आघवेनि गांवद्धारीं अहेव जैसी।।** (ज्ञा. १३-८२१) अशी व्यभिचारी भक्ती असू नये. एक भक्त असावे म्हणून तर, **धरियेली सोंगे। येणे अवघी पांडुरंगे।।**

तात्पर्य,वेद, शास्त्रे, पुराणे या सर्वांचा हेतू एकच-ब्रह्मप्रतिपादन. **वेदे रामायणें, शास्त्रे पुराणेषुच वै तथा। आदौमध्ये तथाचांते। हरि: सर्वत्र गीयते।।** म्हणून समर्थ म्हणतात, मानवाची स्तुती करण्यापेक्षा परमेश्वराचेच गुणगान कर.

★ ★ ★

**मना सर्वथा सत्य सोडूं नको रे।**
**मना सर्वथा मिथ्य मांडू नको रे।**
**मना सत्य तें सत्य वाचे वदावें।**
**मना मिथ्य ते मिथ्य सोडूनि द्यावे।।१९।।**

मागील श्लोकात श्रुतिपुराणादिकांनी ज्याची स्तुती केली, त्या आत्मस्वरूप राघवाचेच चिंतन कर, त्याचीच स्तुती गा, इतर विषयाचे चिंतन नको, असे मनाला सांगितले. असे का ? त्याचे कारण ह्या श्लोकात विशद केले.

बा मना, राघवाचीच स्तुती कर, त्याचीच आशा धर, असे तुला बजावतो. याचे कारण तोच एक सत्य आहे. इतर सर्व जग मिथ्या आहे. वेदातात मिथ्या शब्द आला, की मनुष्य बिचकतो. तो शब्द त्याला खटकतो. प्रत्यक्ष दिसणारी वस्तू मिथ्या कशी, असे त्याला वाटते. म्हणून ह्या शब्दाचा अर्थ समजून घेतला पाहिजे. ज्या वस्तूला स्वतंत्र किंवा पृथक अस्तित्व नसून,

काही काल भासून जी आपल्या कारणात लीन होते, नाहीशी होते, ती वस्तू **मिथ्या** असे म्हणतात. उदा. घट - घटापूर्वी - घट तयार झाल्यावर व घट फुटल्यावर केवळ मातीच; म्हणून माती सत्य व घट मिथ्या. सत्य केवळ परमात्म वस्तूच. त्या व्यतिरिक्त इतर सर्व नाम - रूपात्मक भास - माया. येथे समर्थांनी सत्य म्हणजे ब्रह्म व मिथ्या म्हणजे माया, अशा अर्थी शब्द - योजना केली आहे. **सत्य म्हणजे स्वरूप जाण। असत्य माया हें प्रमाण ।।** (दा. १०-१०-५५)

सृष्टीपूर्वी निर्भेळ, निर्मळ, आनंदस्वरूप ज्ञानमात्र कारण रूप ब्रह्म एकच होते - परब्रह्म. तेथे गुण नव्हते, संकल्प नव्हता, क्रिया नव्हती, नामरूप उपाधीही नव्हती, तिन्ही काळीही एकरूप असणाऱ्या सत्य स्वरूपात, वर्तमान, भूत, भविष्य ही कालगणनाही नव्हती. हे सृष्टीपूर्वीचे शुद्ध स्वरूप झाले. पण सृष्टीच्या कार्यकारणाचा संबंध लावणेसाठी सृष्टी - कार्याचेच ते कारण होऊन पुढचा उपक्रम सुरू होतो. घट दिसतो. मग तो कसा झाला हा कार्य कारणाचा विचार. कार्य भासते म्हणून कारण सांगावे लागते, कल्पित वंशावळीचा मूळ पुरूष कल्पितच असणार. तसे कार्यकारण शून्य अशा स्वरूपाचे ठिकाणी सृष्टीचा केवळ आरोप ठरतो. या आरोपित कार्यकारण परंपरेला मूळ स्वरूपाचे अज्ञान हेच कारण आहे. **वांझेचिया लेका। कैची जन्म पत्रिका।** (ज्ञा. १५-२३४) म्हणून ते आरोपापूर्वी होते असे श्रुति सांगते. सृष्टीपूर्वी अतिगूढ असे तम मायारूपी होते, त्याला अव्यक्त म्हणतात. त्यातच सृष्टी विलीन होती. तमोरूप मायेने अवगुंठीत जे चैतन्य होते, ते संकल्प करून पुढे विश्वरूपाने आकारले. गूढता हाच ह्या मायेचा स्वभाव. या चैतन्याच्या आवरणालाच **माया अथवा प्रकृती** म्हणतात. सूर्यापासून निर्माण झालेले ढग सुर्याला आच्छादिल्यासारखे वाटतात. तसेच हे संपर्क नसता संपर्क म्हणून मूळ स्वरूपाचे अज्ञानच मायेचे रूप. **या मा सा माया। जे प्रत्यक्ष पाहाता आडळे। विचार घेतां जरी नाडळे। जयेचा पार न कळे। ब्रह्मादिकासी।।** (दा. १-३-७) म्हणून अनिर्वचनीय. मुळात नसून भासणे. सूर्य उष्णतेशिवाय ढग निर्मिती नाही आणि ढगाशिवाय पाऊस नाही. तसेच ब्रह्मसत्तेविना माया नाही मायेविना जग उत्पन्न होत नाही. मायोपाधीमुळे शबल ब्रह्मत्व **मायोपाधिर्जगद्योनिः सर्वज्ञत्वादिलक्षणः ।।** हेच सर्वज्ञादि लक्षणयुक्त शबल ब्रह्म. **बहुस्यां प्रजायेय** मी बहु व्हावे म्हणून अनेकरूप झाले. परमात्म्याला संकल्प झाला. मनाच्या या संकल्पाने सृष्टी करण्याची प्रवृत्ती झाली. अस्ति - नास्ति



याहून विलक्षण अशी ही अनिर्वचनीय माया आहे. **मायाच तमोरूपा।।** म्हणून ब्रह्मज्ञानानेच या मायेतून म्हणजेच अज्ञानातून सुटका होते. म्हणून समर्थ म्हणतात की, सत्य ब्रह्माची कास धर, मिथ्या मायेच्या नादी लागू नकोस. सर्वथा सत्य म्हणजे त्रिकालाबाधित सत्य - निरूपाधीक ब्रह्म. सर्वथा मिथ्या म्हणजे मुळातच जे नाही ते. अजातवाद लक्षात घेऊन ह्या दोन चरणांची मांडणी केली असावी व शेवटच्या दोन चरणांत जे सत्य तेच वाचे वदावे व मिथ्या सोडून द्यावे असा मनाला उपदेश करतात.

प्रवृत्तीत सत्यच सत् शब्दाने ओळखले जाते - सद्धर्म, सच्छास्त्र इत्यादि. निवृत्तीत सत्यच तत् शब्दाने दर्शित केले जाते. सत्य म्हणजे सत्यवाणी असा अर्थ मनात आणल्याशिवाय 'सत्य' याचा नीट उलगडा होणार नाही. **सत्यंवद** - म्हणजे जसे आपणांला माहीत असेल तसे वाणीने बोलणे, म्हणजे सत्यवाणी म्हणजेच सत्य. केवळ वाणीने सत्य बोलणे सत्य होणार नाही किंवा वाणीने असत्य बोलणेही सत्य ठरेल. 'आला बाऊ' ही छोट्यास घातलेली भिती मरणाचे पंथास लागलेल्या रोग्यास दिलेला वैद्यबुवांचा धीराचा शब्द. म्हणून केवळ शब्दांच्या उत्तानार्थाकडे लक्ष न देता, हेतूकडे लक्ष देऊन सत्यासत्याचा निर्णय केला पाहिजे. म्हणून **सत्यंवद** असे सांगून **धर्मंचर** असे म्हटले आहे यासाठी सत्य. म्हणजे - सद्धर्माला धरुन असते व वाणीनेही तसेच बोलले जाते ते सत्य. जे ऐकण्याला गोड, जे परिणामी सत्य व विकाररहित असेल त्या बोलण्यास सत्य म्हणतात. **तैसे श्रवणसुख चतुर। परिणमोनि साचार। बोलणें जे अविकार। तें सत्य येथें ।।** (ज्ञा. १६ - १२४)

काही प्रसंगी, विवाह - प्राणसंकट वगैरे, खोटे बोलणे चालेल, असे कर्ण पर्वात सांगितले आहे. पण हे प्रसंग संकटसमयी स्वसंरक्षणार्थ वापरण्याचे आहेत. दुसऱ्यास बुडविण्यासाठी नव्हे. जड व नाशवंत देह गेला तरी चालेल पण सत्य सोडू नये.

आपल्या प्रामाणिक मताप्रमाणे वागणे व बोलणे हाच धर्म व तेच सत्य असे काहींना वाटते. मनुष्याचा स्वाभाविक कल विषयसुख व द्रव्य लोभाकडे असलेमुळे सदसद्विवेक बुद्धिचा कलही असत्याकडे वळतो व असत्यच सत्य वाटू लागते. म्हणून सदसद्विवेक बुद्धी ही काही सत्याची कसोटी ठरत नाही. सत्य म्हणजे प्रिय असून न फसविणारे आणि सत्य असून न दुखविणारे ते सत्य भाषण.

**सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् न ब्रूयात् सत्यमप्रियम् ।।**

★ ★ ★

**बहू हिंपुटी होइजे मायपोटीं ।**
**नको रे मना यातना तेचि मोठी ।**
**निरोधें पचे कोंडिलें गर्भवासीं ।**
**अधोमूख रे दु:ख त्या बाळकासी ।।२०।।**

मागील श्लोकात सत्य ब्रह्माला विसरू नकोस, मिथ्या मायेच्या नादी लागू नकोस, वाचेने सत्य तेच बोल, खोटे बोलू नकोस, हा विचार मनाला का सांगितला ? मानवी देहात स्वस्वरूपाचे ज्ञान जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत मी म्हणजे देह हे अज्ञान दूर होत नाही. ही देहबुद्धी, अज्ञान जोपर्यंत दूर होत नाही तोपर्यंत वासनाक्षय नाही. वासनाक्षय होत नाही तोपर्यंत गर्भवासाचा त्रास चुकत नाही. म्हणून ह्या श्लोकात गर्भवासाचा त्रास कसा असतो हे सांगितले आहे.

गर्भयातनेचे किळसवाणे स्वरूप लक्षात येऊन मनाला वैराग्य उत्पन्न व्हावे यासाठी या श्लोकात व ते वैराग्य टिकवणेसाठी पुढील श्लोकात उपदेश केला आहे.

बा मना, आईच्या पोटच्या गर्भातील वास्तव्य फार कष्टाचे आहे. हाल करणारे आहे. किती फिरावे लागते पाहा. मरणानंतर हा भूलोक सोडून पर्जन्यात वास्तव्य करावे लागते, पावसाचे द्वारा अन्नात यावे लागते, अन्नातून पितृशरीरात प्रवेश, तेथे तीन महिने रेतरूपात वास्तव्य करावे लागते, कामाग्नीने रेत तप्त झाले की, आईच्या शरीरात प्रवेश. पितृरेत व आईचे रक्त मिळून अस्थि, मांस, स्नायू, रक्त इ. अमंगल पदार्थांनी देहाची बांधणी होते. आईचे उष्ण मूत्र, उष्ण विष्ठा, जठराग्नी इत्यादि सर्व बाजूंनी धगधगत्या अशा गर्भाशयात तो मोदकाप्रमाणे उकडत असतो. **वोका नरकाचे रस झिरपती। ते जठराग्नीस्तव तापती । तेणे सर्वही उकडती । अस्थिमांस ।।** (दा. ३-१-३०)

दुसऱ्या महिन्यात डोके तयार होते. सहावे महिन्यात नवद्वारे उद्भवतात. सातव्या महिन्यात चेतना प्रवेश. गर्भाच्या हालचालीची मातेला जाणीव होते. मातेने खाल्लेले अन्न रक्ताद्वारे नाळेमधून गर्भाला पोचते. त्यामुळे गर्भाचे पोषण व रक्षण होते. मातेच्या आहाराचा परिणाम गर्भाला भोगावा लागतो.

गर्भाचे तोंड बंद असल्यामुळे व डोके जड असल्यामुळे तो 'खाली डोके वर पाय' अशा स्थितीत लोंबकळत राहतो. वर मातेचा मूत्राशय व खाली विष्ठेने भरलेला नळ अशा कैचीत गर्भाचा कोंडामारा होत असतो. **ऐसिये कारागृही वस्ती। नवमास बहुलया विपत्ती ।।** (दा. ३-१-२९)



आपल्याच कर्माने जन्माआधीच असा नरकवास भोगीत असतानाही दयाळू ईश्वर आईच्या स्तनात दुधाची उत्पत्ती करीत असतो. जन्मणाऱ्या जिवाच्या पोषणाची तरतूद करून ठेवतो. केवढे हे प्रेम! पण याची आठवणही न ठेवता जीव गर्भयातना सहन करत असतो. नवमास पूर्ण झाले, की मग याला देव आठवतो. आपल्या पूर्वकर्माचे स्मरण होऊन मग तो देवाला आळवायला लागतो. **देवा कर्म केले गहन। त्याचे हे दु:ख दारूण। भोगविले त्वां मज लागून। पुरे शिक्षण आता हे।। दुर्गंधीने कंटाळलो। जठराग्नीने पोळलो। ह्या नरकात लोळलो। शिणलो आता सोडवी मज।। निज कर्मे नाना योनी। येथे आलो भोगुनी। वाटे मला नरकाहूनी। गर्भवास हा महाकष्ट दे। आता सोडवी येथून। या वरी पाप न करीन। देवा तुझे भजन करीन। तुला विसरे न कधीही।।** (दत्त म. अ. ११-२०-२३)

नऊ महिने नऊ दिवसानंतर जीव प्रसूतीवाताने जणू किड्यासारखा बाहेर येतो. पण बाहेर वारे आले की स्वत:चे पूर्वकर्म भगवंत यांचा विसर पडतो. **सोहं विसरूनिया पोत। राहे रडत कोऽहं कोऽहं।।** (२५ उ.) समर्थ म्हणतात. ''**दु:ख वरपडा होता झाला। थोरा कष्टीं बाहेरी आला । सवेच कष्ट विसरला । गर्भवासाचे ।।**'' (दा. ३-१-४८) विसरलेल्या यातनांची आठवण देऊन गर्भाप्रमाणे वैराग्य प्राप्त व्हावे, हाच या श्लोकाचा उद्देश.

बरे, गर्भवास फक्त मानवयोनीतच हे तरी कोण सांगणार ? जिवाची जन्म - मरण परंपरा चुकण्याचा संभव फक्त नरदेहातच. हा दरवाजा चुकला की अंधाच्या गोष्टीसारखी स्थिती. अंध = अज्ञानी जीव. शहराचा कोट = ८४ लक्ष योनी. दरवाजा = मनुष्य देह. गजकर्ण = विषय सुख. शहराचे कोटातून दरवाज्याकडे चाचपडत येणाऱ्या अंधाला ऐन दरवाज्याजवळ गजकर्ण खाजवावेसे वाटते. तेवढ्यात दरवाजा चुकतो व पुन: फेरा. पशुदेहात तर हालांचा विचारच करायचा नाही. **जातो बालो युवा वृद्धौ मृतो जात: पुनस्तथा।। बभ्रमत्येष संसारे। घटी यंत्र समोऽवश:।।** ही दु:खपरंपरा वरचेवर आठवून मनास दु:ख व्हावे, या आपल्या दु:खाचा परिहार कसा होईल, याची काळजी उत्पन्न व्हावी म्हणून या श्लोकाद्वारे मनास उपदेश. **पशुदेही नाहीं गती। ऐसें सर्वत्र बोलती। म्हणोनि नरदेहींच प्राप्ती। परलोकाची।।** (दा. १-१०-२१) देह **परमार्थी लाविलें। तरीच याचें सार्थक जालें। नाहीं तरी हे वेर्थचि गेलें। नाना आघातें मृत्यू पंथें।।** (दा. १-१०-६१)

★ ★ ★

**मना वासना चूकवीं येरझारा।**
**मना कामना सांडिं रे द्रव्यदारा।**
**मना यातना थोर हे गर्भवासीं।**
**मना सज्जना भेटवीं राघवासी ॥२१॥**

गर्भातील यातनांची आठवण जिवाला देऊन, त्याने सावध व्हावे, भ्यावे व वैराग्य अंगीकारावे, म्हणून मागील श्लोकात गर्भवासाचे हाल मनापुढे ठेवले. स्मशान वैराग्य, ज्याप्रमाणे घरी परतले, मन संसारात लागले, की नाहीसे होते ; तसेच गर्भदु:खाची मनाला आठवण दिली तरी विषय वासनांच्या जंजाळात गुंतलेले मन ती लगेच विसरते. वासनांची ओढ इतकी जबरदस्त असते की, त्यापुढे जन्ममृत्यूच्या दु:खाची पुसट कल्पनाही येत नाही, अशी ही वासनांची ओढ जबरदस्त आहे. म्हणून वासनांचा क्षय करणेचा मनाला उपदेश. वासना चुकवी म्हणजे वासनेच्या येरझाऱ्या थांबीव असा मनाला उपदेश. वासनाच जन्म - मृत्यूला कारणीभूत आहे. **वासनेचे मूळ छेदिल्या वाचून। नव्हे या खंडण गर्भवासा॥** वासना निवृत्ती म्हणजेच मोक्ष. या वासनांचा एका मागून एक असा ओघ चालू असतो. प्रथम कल्पनेचे स्फुरण. ती तीव्र झाली की वासना. आणि अति तीव्र झाली की कामना. मानवी मनात कल्पनेचा ओघ सतत चालू असतो. आचार, उच्चार व विचार या सर्वांचे मूळ कल्पना. एका कल्पनेतून दुसरीचा जन्म. असा हा शरीररूपी रथ, निद्रा सोडून बाकीचे वेळी धावत असतो. **मनश्चित्त तुरंगाभ्याम् शरीरं स्यंदनायते । काल चक्रेण वैयाति पूर्व कर्मच सारथि ॥** मोटारला ब्रेक असतो. वाटेल तेथे ती थांबते. मनाला ब्रेक नाही. मात्र कल्पनारूपी पेट्रोल संपले की ती थांबते. **म्हणौन सर्वांचे मूळ । ते हे कल्पनाचि केवळ। इचें केलियां निर्मूळ। ब्रह्मप्राप्ती॥** (दा. ७-५-२६) म्हणून वासनेच्या येरझारा चुकव. संसारात अती तीव्र वासना कशाची असेल तर द्रव्य व दारा या दोन वस्तूंची. या अती तीव्र वासनांना काम म्हटले आहे. लैंगिक वासना स्वाभाविक व द्रव्याशिवाय पदोपदी नडते. दुसऱ्या चरणातील कामना शब्दही मार्मिकपणे योजिला आहे. स्त्री विरहित एखादा ब्रह्मचारी राहू शकेल. पण पोट भरण्यासाठी द्रव्य हवेच. प्रपंची पाहिजे सुवर्ण. **प्रपंच सांडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खायाला । मग तया करंट्याला । परमार्थ कैचा ॥** ( दा. १२-१-३) म्हणून द्रव्याची वासना हवी. पण बा मना, त्याबद्दल आसक्ती नको. प्रारब्ध भोगानुसार जे मिळेल त्यात समाधान असावे. **यदृच्छालाभसंतुष्टो** असावे. कायिक कर्म हे बंधनकारक नसून, कर्माबद्दलची वासनात्मकबुद्धीच



बंधनकारक आहे.

या वासनेमुळे गर्भवास. गर्भवासाचे हाल मागे वर्णन केले आहेतच. मग प्रश्न असा की, गर्भवासाचे कारण अशी ही वासना सुटावी कशी ? अनेक साधनांनी ती नष्ट होत नाही. म्हणून मना भेटवी राघवासी हा उपदेश. बा सज्जन मना, तू राघवाची भेट घडवून आण. आजपर्यंत सुखासाठी अनेक स्थळे फिरलास, पण स्थिर सुखाचे स्थान तुला कोठेच मिळाले नाही. यासाठी आत्मारामाची भेट करीव.

या राघवाचा नामाने शोध घे. साधा माणसांचा पत्ता विचारपूस करून आपण शोधतो. राघवाने आपला पत्ता जगजाहीर केला आहे. आपण तिकडे लक्षच देत नाही, भेटीची इच्छाच नसते. गरज पडली की धावाधाव सुरू. **येषांहृदिस्थो भगवान् मंगलाय - तनं हरि:॥** नामघोषात तल्लीन होऊन तू अंत:करणाकडे धाव घे. कान काही ऐक म्हणेल, डोळे काही पाहा म्हणतील, रसना काही चाख म्हणेल, पण दुर्लक्ष करून नामासरसा तू हृदयात घूस. **नामा सरिसाच हरी। रिघे हृदयामाझारीं। तेणें धाकें अभ्यंतरी। हो लागे पुरी हृदयशुद्धी॥ तेव्हा प्रपंच सांडोनी 'वासना'। जडोनि ठाके जनार्दना। 'अहं' कारू सांडोनि अहंपणा। 'सोऽहं सदनामाजीं रिघे॥** (ना. भा. २ - ७७६, ७७७) मग त्या वासनेला दुसरे स्थानच नाही. **आणिक दुसरे नये माझे मना। राहिली वासना तूझे पायी॥** (तुकाराम)

सारांश, अहं जे हे मोहाने, ममत्वाने जगात गुंतले आहे, ते आत्मानुसंधानाने, आत्मस्वरूपी रंगले पाहिजे. अहंकार ज्याच्या अस्तित्वावर नांदतो तोच राघव. **सर्वांच्या हृद्देशी। मी अमूका ऐशी। बुद्धि स्फुरे अहर्निशी। ते वस्तूगामी॥** स्वरूप विस्मरणामुळे अहं देह हा संकल्पच प्रथम वासनांची वाढ करणेस मूळ आहे. **तरी स्वस्वरूपाचेनि विस्मरणे। जो संकल्प उठी देहपणे। तो उठो ने दावा सावधपणे। वासना जेणे प्रौढ नव्हे।** (रंग. यो. वा. ८९१) पण हा चित्तवृत्तीनिरोधाचा योगमार्ग सामान्यजनांच्या आवाक्याबाहेर म्हणून समर्थांनी भक्तीमार्गच सांगितला आहे.

★ ★ ★

**मना सज्जना हीत माझें करावें।**
**रघूनायका दृढ चित्तीं धरावें।**
**महाराज तो स्वामि वायूसुताचा।**
**जना उद्धरी नाथ लोकत्रयाचा ॥२२॥**

अनेक वासना, द्रव्यदारादिक कामना यांचे मागे लागून गर्भवासाच्या यातना सोसण्यापेक्षा राघवाची भेट करीव, असे मनाला आळवले. या राघवाची भेट कशासाठी घ्यायची, त्याने काय साधते हे या श्लोकात समर्थांनी सांगितले आहे.

बा सज्जन मना, या जन्मात माझे कल्याण व्हावे, हित व्हावे, असे जर तुला वाटत असेल, तर तू इतर वासनांना न चिकटता, आत्माराम राघवाला घट्ट चिकटून राहा. त्याचेच चिंतन ठेव. एकच चिंतन ठेव. एकाच विषयाचे चिंतन जेव्हा मन चालू ठेवते तेव्हा तेच चित्त होते. **चित्तचतुष्टयचमत्कार। मन बुद्धि चित्त अहंकार। हीं एकचि परी भिन्न प्रकार। जैसा व्यापार तैसें नांव॥** (ना. भा. २२-३५१) म्हणून मनाला उपदेश की राघव हाच तुझ्या चिंतनाचा विषय असू दे. त्यातच मानवी जीवनाचे हित आहे. ज्याला ज्या विषयाची आवड त्या विषयात तो गुंगून जातो व त्यातच हित मानतो. आवडीचे प्रकार अनेक म्हणून हिताच्या कल्पनाही अनेक. थोडे थांबून कल्याण कशात आहे, हे पाहणेस मनुष्य तयार नाही, विचार तर दूरच. तुकोबा म्हणतात. **वाटे या जनाचे थोर बा आश्चर्य। न करिती विचार का हिताचा॥** प्रत्यक्ष परमेश्वर पुढे उभा राहिला व वर माग म्हणाला तर ''गर्भवास चुकीव, मला मुक्त कर'' असे तो म्हणेल काय ? नाही. **धन, धान्य, पशुवृद्धी** असेच तो मागणार. सर्व हित यातच हीच भावना. कोणती गोष्ट हिताची व कोणती अनहिताची हे तीन कसोट्या लाऊन पहावे लागते.

**(अ) आत्मप्रचिती :-** खाणे, पिणे, निद्रा घेणे, प्रजोत्पादन, मरणाला भिणे हे सर्व योनीत स्पष्ट दिसते. आपण सर्व बुद्धीने श्रेष्ठ आहो, हा अनुभव मनुष्याला आहे. अनेक योनीं हिंडून नरदेहात आल्यावर अनेक विषय भोगून अनुभव काय येतो ? **दुःखाचे डोंगर लागती सोसावे। ते सर्व ठावे सकळासि॥** असा अनुभव असूनही विचारजागृति नाही. म्हणून झालेले संत सद्गुरू काय उपदेश करतात ते पाहू.

**(ब) गुरूप्रचिती :-** वरील गोष्टी लक्षात घेऊन गुरू असा विवेक सांगतात. **पश्वादियोनींच्या ठायीं। विषयांवाचोनी आन नाहीं। तोचि विषयो नरदेहीं वाढविल्या काय हित झालें।** (ना. भा. ९-३४६) **जीवा जे जे योनीं जन्मगती। तेथ तेथ विषयासक्ती। तेचि मनुष्यदेहीं विषय - स्थिती। तैं परमार्थप्राप्ती कोवणे देहीं॥** (ना. भा. १७-५३२) **तुका म्हणे हित होय तो व्यापार। करा फार काय शिकवावे॥**



भांडवलावर नफा लाभला तर व्यापार लाभला म्हणायचे. भांडवलात तूट आल्यास तोटा. भांडवल कायम राहिल्यास नफा तोटा काही नाही. नरदेह हे भांडवल. नराचा नारायण हा फायद्याचा व्यापार. तसेच नराचा पशू, कीटक झाल्यास तोट्याचा व्यापार. पुनः नरदेह मिळाला, भांडवल कायम समजावे. **हित ते करावे देवाचे चिंतन। करूनिया मन एकविध॥** (तुकाराम) तसेच समर्थही म्हणतात, **''हाट भरला संसाराचा। नफा पहावा देवाचा। तरीच या कष्टाचा। परियाये होतो॥''** (दा. १२-८-३४) पण हा संतांचा अनुभवही मानव लक्षात आणित नाही.

**(क) शास्त्र प्रचिती :-** नरदेह ही अशी एकच जागा आहे की जेथे मनुष्याला आपला उद्धार करून घेता येतो. मनुष्यात ज्ञान ही सर्वश्रेष्ठ गोष्ट आहे. **मनुष्य देहिचेनि ज्ञानें। सच्चिदानंद पदवी घेणे.** केवढा अधिकार प्राप्त झाला पाहा. विषय सर्वच योनींत आहेत. पण ज्ञान हे फक्त मनुष्य योनीतच. म्हणून भगवान म्हणतात, या ज्ञानाने माझा शोध घे. सर्व विषय बाजूस सारून माझे भजन कर. (भ. गी. १८ - ६६) **सर्व सांडोनि धुंडा मजला। ऐसे देवचि बोलिला॥ जेथ चहूकडे जळत वणवा। तेथूनि न निगिजे केवी पांडवा। अंगा माते न भजावया लागी। कवण बळ पा आपुले अंगी।** (ज्ञा. ९ - ४९२, ४९३) **म्हणूनी केवळ देह मरण। हे जाणे उघडी नागवण। या लागी येथ अंतः करण झणी देसी॥** (ज्ञा. ३ - २०९) असा निष्कर्ष शास्त्र काढते. देह भरण शब्दाने मानवी जीवनातील वर्म ज्ञानेशांनी सांगितले. देह भरणासाठी आहार, विहार, चेष्टा, निंदा वगैरे व्यवहार लागतोच. पण त्यासाठी केवळ विषयभोग हेच जीवित कार्य मानणे वेडेपणाचे ठरते. **प्रपंच सुखेचि करावा। परी काही परमार्थ वाढवावा।** रघूनायके दृढ चित्ती धरावे. हा रघूनायक - वायूसुत हनुमंताचा मालक. तिन्ही लोकांचा उद्धार करणेचे सामर्थ्य याचे अंगी आहे. हनुमंताप्रमाणेच दृढ चिंतन करावे. तुकारामासारखे संतही भक्तीमार्गाची वाट हनुमंताला विचारतात. हनुमंताच्या रामभक्तीतील वर्म हे की कर्मात असायचे तेव्हा स्वामिकार्य म्हणून करायचे आणि कर्मात नसायचे तेव्हा त्याचे ध्यानात असायचे.

★ ★ ★

**न बोलें मना राघवेंवीण कांही।**
**जनीं वाउगें बोलतां सूख नाहीं।**
**घडीने घडी काळ आयुष्य नेतो।**
**देहांतीं तुला कोण सोडूं पहातो ? ॥ २३॥**

त्रैलोक्यनाथ, हनुमंताचा स्वामी जो रघुकुलटिळक राघव, त्याचे दृढ अनुसंधान, माझे चित्तात राहील, एवढे माझे हित, बा मना, तू घडवून आण, असे मागील श्लोकात सांगितले. मना, तू म्हणशील, हे राम भक्तीने होणारे कल्याण सावकाश साधता येईल ! त्याची इतकी का घाई ? प्रपंचात पैसा अडका झाला, पोरेबोळे झाली - ती कर्तीसवरती झाली, सेवानिवृत्ती होऊन थोडे स्वास्थ्य लाभले की मग 'हरी - हरी' म्हणता येईल. त्याला इतकी घाई कशाला ? पण नाही ; ही रामभक्ती अशी फावल्या वेळात करून उपयोग नाही, तातडीनेच हे काम व्हायला पाहिजे. ती का हे या श्लोकात मनाला पटवून देतात.

घडीघडीने आयुष्य घटत जाते आहे, वाढत नाही. घोड्यावरून भरधाव चालले की रस्ता तुटत जातो, तसे **संसार म्हणिजे सवेंच स्वार। नाही मरणास उधार। मापीं लागलें शरीर। घडीनें घडी।।** (दा. ३-९-१) वाटेल ते जंग पछाडले, कोट्यावधी धन दिले, तरी गेलेली घटका परत मिळणार नाही. केव्हा मरण येईल, हेही समजत नाही. **येचिक्षणि मरोनि जासी। तरी रघूनाथ भजनी अंतरलासी।।** म्हणून घाई केलीच पाहिजे. प्रपंचाला इंद्रिये शाबूत हवीत मग परमार्थाला का नकोत ? पेन्शनर परमार्थाला लायक कसा होणार ? **ब्रह्मज्ञान जरी कळे उठा उठीं। तरी का हिंपुटी वेदशास्त्रे।।** ते ज्ञान होण्यासाठी ; जप, तप, ग्रंथावलोकन, नामसंकीर्तन ही साधने वापरायला शरीर इंद्रियसमूह धड नको का ? आयुष्याचा प्रत्येक क्षण पदरात पाडून घेतला पाहिजे. **मढे झाकोनिया करतीं पेरणी।** (तुकाराम) आयुष्याचा प्रत्येक क्षण पदरात पडू दे. म्हणून श्लोकारंभी उपदेश **न बोले मना...।** राघवाची कथा, कीर्ति, नाम, यातच वाणीचा उपयोग कर. वायफळ गप्पात वाणी खर्चू नकोस. तुला जी चटक लागते त्यात तू रमतोस. वायफळ बोलण्यात जसा तू रंगतोस, तसा भजनात रंगून जा. नव्हे - नव्हे भजनातच रंगून जा. वायफळ गप्पा टाकून दे. यातच तुझे स्वहित आहे. प्रथम तुला भजनात गोडी वाटणार नाही. तरी तू स्वस्थ बैस, मौन स्वीकार, वायफळ बडबडीने राम कृपेला मुकशील. जिव्हेला मात्र उगाच शीण. **हरी हरी बोला । नाहीतरी अबोला । व्यर्थ गलबला करू नका ।।** तुकाराम महाराज म्हणतात, **''दिनरजनी हाचि धंदा। गोविंदाचे पवाडे। कीर्तिमुखे गर्जे तुका। करी लोका सावध।।''** प्रापंचिक बडबडीने काही व्यवहारज्ञान होते. पण अखंड रामनामाने कोणते सुख मिळणार, काय हित साधणार ? असे तुला वाटेल. पण मना, थोडा विवेक कर. प्रापंचिक ज्ञान पुनः गर्भवासाला



कारण होते. त्यात क्षणिक सुख वाटले तरी ते चिरंतन नसते. पण राम भजनाने **लागता सूर्याचे किरण। घृताचें नासे कठिणपण। तेवीं मी प्रकटल्या नारायण। न फोडितां जाण लिंग देह नाशे।।** (ना. भा. २०-३७६). जसजशा वासना कमी होतात, तसतसे विषयवैराग्य होऊन अन्तःकरण शुद्ध होते व भजनात गोडी वाटू लागते. त्यामुळे त्याची चटक लागते. सतत भजनाने पाप नाश होतो. पुण्य वाढते. भजक स्वतः सुखी होतो व इतरांनाही सुखी करतो. **सततं कीर्तयंतो मां यतन्तश्च दृढव्रताः।।** (भ. गी. ९-१४) **ऐसे माझेनि नाम घोषे। नाही करिती विश्वाची दुःखे।।**

भजनानंदाबरोबरच देवाबद्दलचे प्रेम वाढू लागते. जेथे सुखोत्पत्ती तेथे प्रेम ठरलेलेच. या प्रेमसुखाची परिणती शेवटी इतकी होते की भक्त केवळ देवाचे जिवावर नांदू लागतो. **जन्म मृत्यूची भाख। हारपोनि जाय निःशेख। आत बाहेरी महासूख। वाढोचिलागे।।** (ज्ञा. ९-१९८)

या अनन्य भक्तीमुळे, देव भक्ताला मातेप्रमाणे चिकटून राहतो. **सततं कीर्तयन्तो** (भ. गी. ९-१४) **परी तयांपाशी पांडवा। मी हारपला गिंवसावा। जेथ नामघोषु बरवा। करिती ते माझे।।** (ज्ञा. ९-२०८) असे असताही देव - कृपा सोडून तू प्रापंचिक बडबड करीत राहिलास तर, देहाचे अंती, मरण - समयी तुझा पाठिराखा कोण ? यमराजाचे दाढेतून तुला सोडवणार कोण ? **काळाची ये उडी पडेल बा जेव्हां। सोडविना तेव्हा मायबाप।। तुका म्हणे तेव्हा सोडवीना कोणी। एका चक्रपाणी वाचोनिया।। जयासी नाही उपासनेची पाठी। तयास भलताच कुटी। या कारणे उठाउठी। भजन करावे।।**

मना, तू शंका काढशीलच की राघव भजनाने जन्म मरणाचा फेरा चुकतो हे कशावरून ? अरे, असा भगवंताचाच जाहीरनामा आहे ना! **तेषामहं समुद्धर्ता मृत्यूसंसारसागरात्। भवामिनचिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम्।।** (भ. गी. १२ - ७) म्हणून श्लोकारंभीच मनाला बजावतात **न बोले मना राघवे वीण काही !**

★ ★ ★

**रघूनायकावीण वायां सिणावें।**
**जनासारखे व्यर्थ कां वोसणावें ? ।**
**सदा सर्वदा नाम वाचें वसों दे।**
**अहंता मनीं पापिणी ते नसों दे ।। २४।।**

घडीने घडी घटत जाणाऱ्या आयुष्यात, वेळ वायफळ बडबडीत घालविण्यापेक्षा, रामभजनात घालवावा ; उद्धार करणाऱ्या ईश्वराची जोपर्यंत कृपा होत नाही, तोपर्यंत जीवन मरणाच्या फेऱ्यातून सुटका नाही. म्हणून सामान्य जनापेक्षा वेगळा व विशेष असा साधन मार्ग पत्करणे विषयीचा उपदेश ह्या श्लोकात आहे. बहुजन समाजाला भक्ती, ज्ञान, वैराग्य इ. पारमार्थिक साधनाबद्दल आवड नसते. भक्ती करायची नाही, करावयाची झाली तर व्यावहारिक लाभासाठी. **जनाचा लालची स्वभाव। आरंभीच म्हणती देव। म्हणिजे मला कांही देव। ऐसीं वासना॥ कांहीच भक्ति केली नस्तां। आणी इच्छिती प्रसन्नता॥** (दा. १८-७-१, २) भक्ती केलीच तर लाभासाठी, नाहीतर निव्वळ गप्पागोष्टीत वेळ काढणे हा बहुजन स्वभाव.

वासनाच करायची तर नरदेहात देव प्राप्तीचीच इष्ट. इतर विषय - वासना व्यर्थ श्रमाला कारणीभूत आहेत. त्यात अहंकाराची वाढच. **रामेविण जे जे आस। तितुकी जाणीव निराश। माझें माझें सावकाश। सीणचि उरे॥** (दा. ३-१०-६०) सर्व सुख आत्मारामच आहे. सर्व विषय सुखांच्याद्वारे जीवमात्र आत्मसुखाचाच अनुभव घेतात. **सुखरूप ऐसा दुजा कोण सांगा। माझ्या पांडुरंगा सारिखा तो॥**

प्रवृत्तीत कितीही उपाय सुचविले तरी केव्हा कसे वागायचे हे सुचविणे कठीण. म्हणून योग्य वेळी योग्य प्रेरणा होण्यासाठी बुद्धीचा प्रेरक जो ईश्वर, त्याला शरण गेल्याशिवाय सुबुद्धि सुचत नाही. न्याय - अन्याय समजत नाही. योग्य स्मृती होत नाही. मानव प्रयत्नाला ईश्वरी सहाय्याची जोड हवीच. पांडवांनी प्रयत्न व ईश्वरी साहाय्य याचे जोरावरच यश संपादन केले.

आपण इच्छा करतो एक व होते भलतेच. यावरून बुद्धीचा चालक अन्य कोणी आहे. तोच बुद्धीला प्रेरणा करतो. वैयक्तिक असोत किंवा सामुदायिक असोत, अनपेक्षित दु:खे विवक्षित वेळी विवक्षित मनुष्यावरच का यावीत ? ती ईश्वराने आणली म्हटले तर त्याचे अस्तित्व सिद्ध होते. ज्याच्या त्याच्या कर्माने ती आली असे मानले तर कर्माचे नियंत्रण करणारा कोण ? मनुष्य की ईश्वर ? मनुष्य मानले तर तो आपणहून स्वत:वर संक्रटे आणवणार नाही. तेव्हा कर्म नियंत्रण करणारी अदृश्य शक्ती ईश्वर - ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणे बुद्धीला प्रेरणा देऊन तसतसे वागायला लावते. कर्माचे तसतसे फलही त्याला मिळते. चांगली प्रेरणा होण्यासाठी ईश्वराला ओळखून त्याची



भक्ती केली पाहिजे. ईश्वरभक्तीचे सर्वात सोपे, साधे साधन म्हणजेच नाम संकीर्तन. **मंथुनि नवनीता तैसे घे अनंता॥** दुधातून लोणी जसे काढतात तसे विवेकबुद्धीरूप रवीने वेदशास्त्राचे मंथन करून नामरूप नवनीत घे. कारण हे लोणी खाऊनच तू पुष्ट होशील. नाम घेताना देहाचा विसर पडेल, अशा एकाग्रतेने, प्रेमाने नाम घे.

माझ्या हृदयस्थ रामाच्या अस्तित्वावर माझे शरीर चालत असून मी असा स्वतंत्र कोणी नाही. मी म्हणून उठणारा अहंकार तो त्याचाच आहे अशा भावनेने बा मना, त्याचे नाव घे. म्हणजे तुला देहअहंकार बाधक होणार नाही. **कर्ता जगदीश हे तो खरे। परि विभाग आला पृथकाकारें। तेथे अहंतेचें काविरें। बाधिजेना॥** (दा. २०-४-२७) माझ्या शरीराचीच काय पण सृष्टीतील वस्तुमात्रांची हालचाल त्याचेमुळे आहे. **सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयाचे। परंतु तेथे भगवंताचे। अधिष्ठान पाहिजे।** (दा. २०-४-२६) दासबोधातील आत्मनिरूपण समास सर्वच अभ्यासावा.

परमेश्वराचे मूळ संकल्पातच हा 'अहं' आहे. हा अहंभाव तापदायक नाही. पण तो बुद्धीच्या शहाणपणाने वागू लागला की अहंकार होतो व देहाशी तादात्म्य पावून सुखदु:खे भोगतो. जिवाचे अहं स्फुरण हे प्रथन निजात्मसत्तेमुळे परिपूर्ण असते. परंतु मायेमुळे देहात्मतेशी तादात्म्य पावते. म्हणून वाईट. **गौण नाव त्याचें अज्ञान। येऱ्हवीं मुख्यत्वें देहाभिमान॥** (ना. भा. २२ - ४०६) या देहाभिमानामुळेच विषमत्व उत्पन्न होऊन द्वैतभावना दृढ होते. **अभेदाना ची वाढवी भेद। तेहे अहंता।**

म्हणून हा घातक अभिमान नाहीसा होऊन आत्मसुखाचा लाभ पाहिजे असेल तर त्यासाठी एकच उपाय. नाथ म्हणतात, '**तत्काळ जावया देहाभिमान। अखंड माझे नामस्मरण। गीत नृत्य हरि कीर्तन। सर्वांभूती समान मद्भावो॥**'' (ना. भा. १३ - ४४२) म्हणून **सदा सर्वदा नाम वाचे वसो दे।**

★ ★ ★

**मना वीट मानूं नको बोलण्याचा।**
**पुढें मागुता राम जोडेल कैंचा ?।**
**सुखाची घडी लोटतां सूख आहे।**
**पुढें सर्व जाईल कांहीं न राहे॥ २५॥**

मागील १९ व्या श्लोकापासून २४ व्या श्लोकापर्यंत, सत्याची कास

धर, मिथ्याचार सोड, वासनांचे नादी लागू नको, रामभजन कर, वगैरे उपदेश केला. या श्लोकात मनाला गोंजारले आहे. बा मना, माझ्या बोलण्याचा कंटाळा वाटू देऊ नकोस असे बजावण्याचे कारण मनाला दोन तऱ्हेची बोलणी पटत नाहीत. (१) दुर्गुणाचा त्याग करून सद्‌गुणाकडे वळवणेची भाषा कंटाळवाणी वाटते. जन्मोजन्मी विषयाची चटक लागलेल्या मनाला विषय त्यागाची भाषा कशी रूचावी ? खेळकर मुलाला खेळू नको म्हटलेले आवडत नाही. दारूबाजाला दारू सोड, हा उपदेश कंटाळवाणा वाटतो. पण हितेच्छु माणसाला कल्याणार्थ ती वरचेवर बोलावी लागते. मना, तुझ्या कल्याणार्थच हा उपदेश करावा लागतो, त्याचा कंटाळा मानू नको. (२) कल्याणार्थ असले तरी पुन: पुन्हा सांगितलेले मनाला आवडत नाही. त्याकरिता समर्थ म्हणतात. अरे व्यसनापासून, अनहितापासून परावृत्त करण्याचे झाल्यास तेच तेच पुन्हा सांगावे लागते. **सेविलेंचि अन्न सेवावे। बोलिलेचि बोलावे। ऐकलेचि ऐकावे। पुन: पुन्हा।।** शरीर सुस्थितीत ठेवण्यासाठी जसे खाल्लेले अन्न, पुन: पुन्हा खावे लागते, तसे सद्‌बुद्धीसाठी तेच तेच बोल तुला ऐकलेच पाहिजेत. त्याचा कंटाळा करून चालणार नाही. ऐकलेले ज्ञान आचारात येण्यासाठी ते पुन: पुन्हा घोटीत राहावे लागते. कडू कंटाळवाणे औषध पण बरे वाटेपर्यंत घेत राहिलेच पाहिजे.

काही लोक बोलण्याचा म्हणजे नामस्मरणाचा कंटाळा करू नकोस असाही अर्थ करतात. पण पुन: पुन्हा बजावण्याचा कंटाळा हे कारण मनाला पटणारे आहे. बोलणे म्हणजे नामस्मरण हा फक्त शब्दार्थ होईल. समर्थ पुढे म्हणतात, ''बा मना, अशी अमोल संधी पुन: येणार नाही. किती कष्टाने हा नरदेह मिळाला. येथे संत समागम, भगवत्प्रेम, सद्‌गुरूकृपा, अशी चिरंतन सुख प्राप्त करून घेणेची संधी. कदाचित् प्रत्यक्ष भगवत्‌भेट होण्याची शक्यता. ही वेळ गेली की फसलास. हा सुयोग वाया गेला तर पुन: प्रभूचरण दिसतील की नाही कोण जाणे ! भाविकांनी या देहाचा योग्य लाभ करून घेतला. बहुतेक जसे आले तसे जातात व वेडेपणाने पुन: जन्म - मरणाचे चक्रात फिरु लागतात. **बहुतेक आवर्ती पडिले। प्राणि वाहतचि गेले। जेहिं भगवंतासी बोभाईलें। भावार्थ बळे।।** (दा. ३-१०-८) बहूजनासारखा तू वाहत जाऊ नये, म्हणून तुला वरचेवर बोलून जागे करावे लागते. त्याचा वीट मानू नकोस.

पूर्व सुकर्मानुसार काही काल सुखाचा जातो हे खरे. पण काल थांबत नाही. तो सारखा बदलत असतो. **कोण समय येईल कैसा। याचा न कळे कि**



**भर्वसा।। तैसे वैभव हे सकळ। कोण जाणे कैसी वेळ। पुत्र कळत्रादि सकळ। विघडोन जाती।।** (दा. ३-१०-३९- ४०) आज लखपती तर उद्या भिकपती, आज प्रेम तर उद्या काडीमोड, आज घरात तर उद्या बाहेर, हे दृश्य तुला दिसत नाही काय ? तुझ्या भोवतीचे नातेवाईक तरी कायमचे आहेत काय ? **जे योनीं जों जीव देहधारी। तेथें तेचि योनींची सोयरीं। ऐशी अनंत जन्मे संसारी। तै अमित सोंयरी जीवाची।।** (ना. भा. १७ - ५००) कायम कोण आहे ? **कर्म योगें सकळ मिळालीं। येके स्थळी जन्मास आलीं। तें तुवा आपुलीं मानिलीं। कैसीं रे पढतमूर्खा।** (दा. ३ - १०-५२) मना, कठोर बोलतो म्हणून रागावू नकोस. कंटाळाही करू नकोस. नीट विचार कर. नातेवाईक जाऊ देत. ते तर देहाने दुसरे आहेत. पण जे शरीर स्वत:चे म्हणून तू हक्क सांगतोस ते तरी तुझे ऐकते का ? तुझ्या मनाप्रमाणे काम देऊन तुला सुखी ठेवते का ? डोळा म्हणतो आता मी रजा घेणार, कान म्हणतो बस ऐकणे पुरे, अर्धांग म्हणते आता मी स्वस्थ पडून राहणार, तुम्ही हवे तर मला हलवा, मी नाही हलणार. आपले म्हटलेल्या स्वत:च्या शरीराची ही अवस्था. **तुझे तुज नव्हे शरीर। तेथे इतरांचा कोण विचार।।** (दा. ३ - १० - ५३) आताची सुखाची घडी कधी बदलेल नेम नाही काल सर्व भक्षक. रामाशिवाय काहीच शिल्लक राहणार नाही. सर्वांचा नाश अटळ आहे. सावध हो. म्हणून **''आता एक भगवंत साचार। धरी भावार्थ बळे।।''** तो नित्य शुद्ध - बुद्ध आत्मारामच तुझा सखा. त्याची करूणा भाक. पोटासाठी मालकाचे भजन करायचे तुला ठाऊक आहे. त्याची मर्जी संपादन कशी करावी हेही तू जाणतोस मग **जो अन्न देतो उदरासी। शरीर विकावें लागे त्यासी। मां जेणे घातले जन्मासि। त्यासि कैसे विसरावें।।** (दा. ३ - १० - ५५) म्हणून **सदा सर्वदा नाम वाचे वसो दे।**

★ ★ ★

**देहेरक्षणाकारणें यत्न केला।**
**परी शेवटीं काळ घेवोनि गेला।**
**करीं रे मना भक्ति या राघवाची।**
**पुढें अंतरीं सोडिं चिंता भवाची ।। २६।।**

जोपर्यंत आपल्या पूर्वकर्मानुसार सुखाची वेळ असते तोवर सुख असते. पण काल संपला की देहासकट सर्व नाशवंत असलेमुळे नाहीसे होते. म्हणून उपदेशाचा कंटाळा न करता, देह आहे तोवर रामकृपा संपादन कर,

अन्य जन्मात तेही शक्य नाही असे मागील श्लोकात मनाला बजावले. पण केवळ देहभरण, पोषणच करीत राहशील तर, जसा वहात आलास तसाच फुकट वहात जाशील, व निष्ठेने रामभजन करशील तर मात्र सर्व चिंतेतून मुक्त होशील, असे ह्या श्लोकात बजावले आहे.

ज्या देहरक्षणार्थच तू आयुष्यभर कष्ट करतोस तो आहे तरी कसा, त्याचा उपयोग काय, याचा नीट विचार कर, नाहीतर एके दिवशी काळाच्या जबड्यात सापडून देह नाहीसा होईल व तू पिंड हत्यारा ठरशील. **पिंड पोसावे हे अधमाचे ज्ञान। विलास मिष्टान्न करूनियां। क्षणभंगूर हे जाय न कळता। ग्रास गिळी सत्ता नाही हाती।।** ज्या देहाचे कोडकौतुक तो कसा आहे पाहा - जड, अप्रकाश, पूर्व कर्माने बद्ध, सुखदु:खाचे माहेरघर, विकारवंत, मांस, रूधिर, विष्ठा, मूत्र वगैरे पदार्थांनी बनलेला, क्षुधा, तृष्णा, शोक, मोह, जरा, मृत्यूचे अधीन, अशा नश्वर देहाला मी म्हणून कवटाळणे हे केवढे अज्ञान, हा केवढा आत्मघात ! **येकदा मेल्यानें सुटेना। पुन्हा जन्मोजन्मी यातना। आपणांस मारी जो वांचविना। तो आत्महत्यारा।।** (दा. १८-७-९)

मना, परोपकारी तत्वज्ञानी संतांचा देहाचा निवाडा ऐक. स्थूल ३३, सूक्ष्म ३३, कारण ८, महाकारण ८, अशा एकूण ८२ तत्वांचा हा देह आहे. **तत्वें तत्व मेळविले। त्यासी देह हे नाम ठेविले।।** (दा.६-३-२०) **विवेके देहाकडे पाहिले। तों तत्त्वें वोसरिले।।** (दा. ६-३-२२) नाशवंत तत्वांना कवटाळावयाचे व ती तत्त्वे ज्या आत्म्यावर नाचतात, जगतात त्याला विसरायचे, हा केवढा मूर्खपणा!

केवळ पिंडपोषण करणाऱ्या मानवाला संत सज्जन, अधम, अज्ञानी, आत्महत्यारा असे का म्हणतात ? याला कारणे दोन.

(१) देहरक्षणार्थ प्रयत्न कर असे कोणत्याही जिवास शिकवावे लागत नाही. ती नैसर्गिक प्रवृतीच आहे. मानव इतर जीवापेक्षा ज्ञानाने अधिक, मग त्याला काय हे शिकवावयास पाहिजे ? शिकवायला पाहिजेच असेल तर हा क्षणभंगूर देह ईशभक्तीसाठी परमार्थ साधनेसाठी धड ठेव. भोगासाठी नको. विषय भोगातच तो संपला की व्यर्थ. म्हणून सज्जन लोक मनावर सारखा संस्कार करतात. **देह जाईल जाईल। यासी काळ बा खाईल। का रे नुमजसी दगडा। कैचे हत्ती घोडे वाडा।।** म्हणून राघवावीण काही बोलू नकोस हा मनास उपदेश.

(२) देह आणि देहासंबंधी यांची निंदा केल्याने, मी आणि माझे हा घातक अहंकार झाडला जातो व औदासिन्य प्राप्त होते. म्हणजे हा देह ही



केवळ उपाधी याची जाणीव होते. **आपला आपण शोध घेतां । आपली तों माईक वार्ता। तत्त्वांती उरलें तत्वता। निर्गुण ब्रह्म।।** (दा. ६-३-२३) देहाची ८२ तत्त्वे ज्या अधिष्ठानावर चालतात ते एकच चिरंतन सत्य, दुसरे मी म्हणावयास अन्य कोणी नाही. आजवर मी माझे म्हणत आलो ते या चैतन्यस्वरूप आत्मारामाचे आधारावरच. जडतत्त्वे केव्हा ना केव्हा नष्ट होणारच. अखंड, नित्य हा आत्माराम मात्र राहणार, तोच मी. असा आत्मबोध होणेसाठी आत्मारामाची कृपा, अनुकूलता लागते, त्याविना हे ज्ञान होत नाही व आत्मघातही टळत नाही. यासाठीच रामभक्ती, राम भजन. **देव अनुकूळ नव्हे जया। स्वयें पापी तो प्राणीया। भवाब्धी न तरवे तया। आत्महत्यारा बोलिजे।।** (दा. ८-७-२३)

म्हणून उत्तरार्धात समर्थ मनाला सांगतात, बा मना! या राघवाची भक्ती कर. म्हणजे तुला जन्म-मरणाची, देहबुद्धीची म्हणजेच मायेची चिंता करण्याचे कारण उरणार नाही. राघवाची कृपा नाही तोवर मनुष्याने कितीही यत्न केले तरी यश नाही. कर्ममार्ग अतिसूक्ष्म न गहन आहे. योग कष्टाचा असून सिद्धीत साधक अडकतो व अहंकार शिल्लक राहतो. म्हणून ईश्वरी कृपेसाठी तू राघवाची भक्तीच कर. भक्तीने त्याची कृपा झाली म्हणजे आत्मज्ञान सहजासहजी होईल. मग अज्ञानरूपी मायेचा पाड काय ? कारण **माया म्हणिजे भगवच्छक्ति। भगवत्‌भजने तिची निवृत्ती।।** हा परमार्थातील सिद्धान्त आहे. स्वत: भगवानच गीतेत सांगतात. **दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया। मामेव ये प्रपद्यन्त्ये मायामेतां तरन्ति ते।।** (भ. गी. ७-१४) माया नदीचे वर्णन करताना ज्ञानेश्वर म्हणतात, **''जे गुणघनाचेनि वृष्टिरे। भरली मोहाचेनि महापूरें। घेऊनि जात नगरें। यमानियमांची।।** (ज्ञा. ७-७१) **किंबहुना हे दुवाड मायानदी।** (ज्ञा. ७-७९) **येथ येकचि लीला तरले। जे सर्वभावे मज भजले। तया ऐलीच थडी सरलें। मायाजळ।।''** (ज्ञा. ७-९७) अहंकाराने कोणी कितीही स्वउद्धारासाठी यत्न केले तरी ईश्वरी शरणागती नाही तोवर भवनदीतून पार होता येणार नाही. यासांठी मना! राघव भक्तीच कर म्हणजे तुला पुढे संसार चिंताच राहणार नाही.

★ ★ ★

**भवाच्या भयें काय भीतोस लंडी।**
**धरी रे मना धीर धाकासि सांडीं।**
**रघूनायकासारिखा स्वामि शीरीं।**
**नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी।।२७।।**

तुझा देह कालाचे भक्ष्य होणार. काल कोणाच्या देहाची पर्वा करीत नाही. म्हणून देहाचा सदुपयोग करणेसाठी राघवाची भक्ती कर, असे मागील श्लोकात सांगितले. भक्तकोटीत गेले की निर्भय स्थिती कशी प्राप्त होते हे या श्लोकात सांगून मनाची पाठ थोपटून धीर देतात. भक्तीमार्गात गाढ निष्ठा उत्पन्न होणेचे दृष्टीने साधकाला हा श्लोक फार महत्वाचा आहे. या श्लोकापासून पुढील जवळ जवळ दहा श्लोकांचा शेवटचा चरण एकच आहे, **नुपेक्षी कदा राम दासाभिमानी.** भक्तवत्सल राम आपल्या भक्ताची कधीच उपेक्षा करीत नाही. तो भक्तांचा अभिमानी आहे हे पटवण्यासाठी हा सारा खटाटोप.

अरे घाबरट भित्र्या मना, या भवसागराला असा डरतोस का? राघवाचे कृपाछत्र तुझ्या शिरावर असताना तू भ्याड का? सज्जनगडावर श्री समर्थ समाधीचे शिरावर प्रभू रामचंद्राचे मंदिर आहे, अशीच खऱ्या भक्तावर कृपा असते. तू रामभजन करतोस ना? तू त्याचा भक्त म्हणवतोस ना? मग भितोस का? भव सिंधूची तुला वाटणारी भीती दोन कारणामुळे आहे. (१) तू राम भजक असलास तरी रामावर जितकी गाढ निष्ठा हवी तितकी तुझी नाही. तुझ्या देहावरच तुझी निष्ठा आहे. प्रपंचात धक्के बसले, अडचणी आल्या की रामाने धावावे, असे तुला वाटते. रामासाठी तुला राम नको. जे घडते ते रामकृपेने, अशी अजून तुझी खात्री नाही. प्रपंचात सुख येवो, दुःख येवो ती रामाची इच्छा, अशी तुझी भावना नाही. निर्धार नाही. अरे मना, निर्धार हे गाढ निष्ठेचे वर्म आहे. **निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म। निर्धार हें वर्म चुकों नये। निष्काम, निश्चळ विठ्ठलीं विश्वास। पाहो नये वास आणिकांची ।।** (गा. २०८८) (२) दुसरे कारण म्हणजे भवसिंधूचा भयानक ओघ. भक्तालाही तो भीती उत्पन्न करतो. आशा, मोह, ममता या लाटांनी खळखळणारा, कामक्रोधादि भयानक जलचरांनी व्यापिलेला, सुखदुःख, पापपुण्य, जन्ममृत्यू इ. द्वंद्वांनी भरलेला असा हा भवसिंधु भक्तालाही भिववितो. **तुज दिला देह। अजुन वागवितो भय। ऐसा विश्वास घातकी। घडली कळतां हे चुकी ।। बोलतो जे तोडें। नाही अनुभविले लंडे। दंड लाहे केला। तुका म्हणे जी विठ्ठला ।।** प्रत्यक्ष भगवंतही म्हणतात, ''**भवसिंधुचेनिमाजे। कवणासी धाकू नुपजे। येथ जरी कीं माझे। बिहिती हन ।। म्हणोनिया पांडवा। मूर्तीचा मेळावा। करूनि त्यांचिया गांवा। धावतु आलो ।।**'' (ज्ञाने. १२-८८,८९) म्हणून समर्थ म्हणतात, 'अभक्त असतास तर तुला भीतीला जागा होती. पण भक्त झाल्यावर भवसागर



कितीही भयानक असला तरी तुला भ्यायचे काय कारण?'' **देवासी भक्तांचा विसरू। पडणार नाही ।।**

पण तू म्हणशील, देवाला जरी भक्ताचा विसर पडला नाही तरी भवसिंधूच्या गटांगळ्या खाव्या लागतात त्याची काय वाट? पण मना, अरे धीर धर. गटांगळ्या बसतील, धकेचपेटे बसतील पण तू त्यात बुडणार नाहीस. नवशिक्या पोहणाऱ्याला गुरूजवळ असूनसुद्धा गटांगळ्या बसतात. इतकेच नव्हे तर गुरूच मुद्दाम पाण्याची भीती घालवणेसाठी गटांगळी देतो. पण तो शिष्याला बुडू देत नाही. आपल्याला बुडू न देणारा वस्ताद जवळ आहे, या निष्ठेनेच नवशिका मनुष्य गटांगळ्या खात खात पोहावयास शिकतोच ना? प्रापंचिक अडचणींना धीराने तोंड दे, भिऊ नकोस. माझा उद्धार करणारा श्रीराम माझ्याजवळ आहे, तो मला खासच तारेल यावर विश्वाव ठेव.

**(४) नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी –** या चरणाचे दोन अर्थ होऊ शकतील. दंडधारी या शब्दाचा काळ किंवा यमराज असा अर्थ घेतल्यास - प्रत्यक्ष अक्राळविक्राळ असा कालरूपी यमराज जरी तुझ्यावर रागानं धाऊन आला, तरी हा रघुराज त्याला दरडावून थोपवून धरेल आणि तुझे रक्षण करील. तो भक्ताची उपेक्षा म्हणजे हयगय कधीच करीत नाही, असा एक अर्थ होईल.

पण याच अर्थाचे चरण पुढील श्लोकात आहे ते असे - 'पुढे देखता काळ पोटी थरारी' शिवाय हा श्लोक भवाची (मृत्यूची नव्हे) भीती सोड हे मनाला पटविण्यासाठी आहे. भवाची भीती दाखविणारा ईश्वर आहे, यम नव्हे. आणि शेवटी भक्त होऊनही ईश्वरी छत्राखाली संसाराचे धकेचपाटे सोसायचे ते का? हा प्रश्न येतोच. कारण पुष्कळ भक्तांनाही संकटातून जावे लागल्याची उदाहरणे आहेत. म्हणून दंडधारी या शब्दाचा अर्थ यम असा न घेता जगाचा कर्म फलदाता, शास्ता, आत्माराम राम असा अर्थ घेऊन या चरणाचा अर्थ लावणे बरे असे वाटते. तो अर्थ असा -

संसारातील धकेचपाटे सोसताना हा ईश्वरी कोप आहे असे वाटून तुला भीती वाटेल. तुझ्या कर्मानुसार रामाला कधी कधी रागवणेही भाग पडेल. शासनकर्ता म्हणून तो रागावेल पण तुझी उपेक्षा मात्र करणार नाही. **देवे भक्त कोण वधिला। कधीं देखिला ना ऐकिला। शरणागतासी देव जाला। वज्रपंजरू ।।** (दा. ४-८-२५) मुलगा चुकल्यास बाप थप्पड देतो. पण ती कृपाळूपणे असते. देव जसा कृपाळूपणे अल्पधारिष्ट पाहतो, तसा कृपाळूपणे रागावतोही. भक्ताला वैराग्य उत्पन्न व्हावे, विवेक यावा यासाठी अडचणी उत्पन्न करून

तो रागावल्यासारखे दाखवितो. **भक्तीचे हरावया चित्त। हरी हरितो त्याचे वित्त। वित्त त्यागे करूनि सुचित। दे विवेकयुक्त वैराग्य।।** (ना. भा. २३-४४२) तात्पर्य, हे की देव भवावर रागवो की भक्तावर रागवो, नुपेक्षी कदा हे कायमच आहे. स्वत: भगवंतच याची ग्वाही देतात. **परी भक्तांचेनि नांवें। चतुष्पादादि आघवे। वैकुंठीचिये राणिवे। योग्य केले।। म्हणोनि गा भक्तां। नाहीं एकही चिंता। तयातें समुद्धर्ता। आथि मी सदा।।** (ज्ञा. १२-९३,९४) म्हणून मना! धीर धर, भीती सोड.

★ ★ ★

**दिनानाथ हा राम कोदंडधारी।**
**पुढें देखतां काळ पोटीं थरारी।**
**जना वाक्य नेमस्त हें सत्य मानीं।**
**नुपेक्षीं कदा राम दासाभिमानी ।।२८।।**

देव भवावर रागवो किंवा भक्तावर रागवो, तो उपेक्षा करणार नाही हे सत्य, असे मागील श्लोकात सांगितले. त्याच रामप्रभूचे वर्णन पुढील नऊ श्लोकांत केले आहे. प्रत्येक श्लोकाचे शेवटी ''नुपेक्षी कदा राम दासाभिमानी'' असे पालूपद ठेऊन दासाभिमानी राम भक्ताची कधीच उपेक्षा करीत नाही हा संस्कार दृढ करतात.

हा धनुर्धारी राम, दीनांचा स्वामी आहे, दीनांचा कैवारी आहे. या भक्तवत्सल रामापुढे, सगळ्या जगाचा ग्रास करणारा, सर्व जिवांना मरणाचे भय दाखवणारा यम थरथर कापतो. व्यवहारात दीन हा शब्द गरीब, भित्रा, दुबळा, लाचार ह्या अर्थी वापरला जातो. त्यामुळे व्यवहारिक दीनतेत क्षुद्रतेचा वास येतो. पारमार्थिक दीनता श्रेष्ठ दर्जाची आहे. यात एक ईश्वरच आपला वाली-तोच नाथ- तोच सर्व काही अशी भावना असते. **''कृष्ण माझी माता कृष्ण माझा पिता। बहीण बंधु चुलता कृष्ण माझा। तुका म्हणे माझा श्रीकृष्ण विसावा। वाटे न करावा परता जीव।।** (गा. ५२५) परमेश्वराच्या कर्तुअकर्तु अन्यथाकर्तुम् शक्तीवर ज्याची पूर्ण निष्ठा आहे, जिवाच्या असहाय्यतेची ज्याला जाणीव आहे, म्हणून ज्याने आपला सर्व अहंकार, सर्व भाव परमेश्वराचे आधीन केला आहे, तो हा दीन. थोडक्यात आपल्या दैवी गुणांनी व निर्व्याज प्रेमाने परमेश्वराचे ठिकाणी दयेचा पाझर फोडणारा, तो दीन भक्त. ह्या दीन भक्तात एक विशेष आढळतो - म्हणजे - दीन भक्ताचे ठिकाणी अहंकाराचा



लेशही असत नाही. देवाला अहंकाराचे वावडे. **मीपण कोणासीच न साहे। हे भगवंती कैसे नि साहे। म्हणोनि मीपण सांडूनि राहे। तोचि समाधानि।।** (दा. ७-७-५०) **ईश्वरस्याप्यभिमानद्वेषित्वादैन्यप्रियत्वाच्च।।** (ना. भा. सू. २७) **देव सोयरा दीनांचा।** हा दीन मनुष्य सर्व स्वामित्व देवाकडे देऊन, देवापायी नम्र होऊन, सर्व देवाचेच म्हणून राहतो. देवाचीही कृपादृष्टी त्याचेवर होते. **त्यांचा भार वाहे माथा। करी योगक्षेम चिंता।।** हा दीन भक्त म्हणजेच अनन्य भक्त. आईसाठी आई ही जशी बालकाची वृत्ती असते, तशीच देवासाठी देव ही प्रेमाची जात असते.

यावर एक शंका उत्पन्न होणेजोगी आहे. देव जसा दीनांचा कैवारी तसाच जे दुष्ट, वैरी, अहंकारी अशा कंस, हिरण्यकश्यपू, रावण आदि दुष्टांचाही कैवारी आहे. कारण त्याने ह्या दुष्टांचाही उद्धार केला आहे. मग दीन म्हणून जगणेपेक्षा ताठर वृत्तीने जगणे काय वाईट ? **आणि भलतिया जाती जन्मावें। मग भजिजें का विरोधावें। परी भक्त कां वैरिया व्हावें। माझियाचि।** (ज्ञा. ९-४७२) मग दीन भक्तच देवाचा लाडका कसा ? याचा नीट विचार केला पाहिजे.

(१) शेवट गोड झाला की, ती गोष्ट बरी, असे आपण व्यवहारात म्हणतो पण ज्या पद्धतीने ती गोष्ट होते, तिचा विचार केला तर कडू, गोड, सरस, निरस ही विशेषणे लावावीच लागतात. वरच्या वर्गात पास होणे व प्रमोट होणे. खडी फोडण्याचा हातोडा दगडावर पडण्याऐवजी परिसावर पडल्यामुळे त्याचे जसे सोने व्हावे, तसे विरोधी भक्ताचा विरोध परमात्म्याशीच झाला म्हणून त्याला भक्ती हे नाव प्राप्त झाले. वास्तविक ती भक्ती नव्हेच, भक्तीची व्याख्याच मुळी **सात्वऽस्मिन परमा प्रेमरूपा।।** अशी आहे आणि विरोधी भक्तीत तर प्रेमाचा पूर्ण अभाव.

(२) विरोधी भक्तांची जी उदाहरणे आहेत ती सर्व शापित भक्तांची. शापामुळे त्यांना दिव्यातून जावे लागले एवढेच.

(३) विरोधी भक्ती ही भगवंत अवताररूपाने भूलोकी वावरत असतानाच शक्य आहे. देवाची सोन्या चांदीची भांडी अगर खुद्द सोन्या-चांदीचे देव लुटून आम्ही विरोधी भक्ती केली असे कोणी म्हणेल तर ते पापाचरण. ती भक्ती नसून पापाची भरती. म्हणून दीनांची भक्ती हीच श्रेष्ठ. म्हणून जना किंवा मना ! श्रीराम हा दीनांचा नाथ व दासाची उपेक्षा न करणारा आहे ह्या गोष्टी सत्य मान. नेमस्त याचा अर्थ अपवादरहित सत्य. **देव भक्तांचा कैवारी। देव पतितांसि तारी। देव होय साहकारी। अनाथांचा।। देव अनाथांचा कैपक्षी।**

**नाना संकटापासून रक्षी। धाविन्नला अंतरसाक्षी। गजेंद्राकारणें॥** (दा. ४-८-२६, २७)

★ ★ ★

**पदी राघवाचें सदा ब्रीद गाजे।**
**बळें भक्तरीपूशिरीं कांबि वाजे।**
**पुरी वाहिली सर्व जेणें विमानीं**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥२९॥**

श्रीराम हा दीनांचा कैवारी आहे, अभिमानी आहे, तो भक्ताची कधीच उपेक्षा करीत नाही, हे अपवादरहित सत्य आहे. असे मागील श्लोकात सांगितले. त्याच रामाचे भक्त रक्षणाचे ब्रीद कशा प्रकारचे असते व भक्तरिपूंना तो शासन कसे करितो याचे वर्णन हया श्लोकात आहे.

श्रीरामाचे पायात तोडर असतात. त्याचा रूमझूम असा आवाज होतो. हा आवाजच भक्तरक्षणाचे ब्रीद दर्शवितो. ब्रीद म्हणजे बाणा किंवा प्रतिज्ञा. हे ब्रीद दोन प्रकारचे (१) **ब्रीदावली पदी वसे। विशेष दुसरा नसे। विबुध बंध तोडिले। अनंत जीव सोडिले॥** (स्फु. प्र.) भक्तांना आत्मज्ञान देऊन संसार बंधातून मुक्त करणे. (२) दुर्जनांचा नाश करून सज्जनांचे रक्षण करणे व धर्मस्थापना करून जगाची घडी बसवणे. **परित्राणाय साधूनां।** कांबि वाजें- म्हणजे धनुष्याच्या कांबीचा टणत्कार. रामायणात भक्तांच्या शत्रूच्या मस्तकी कांबी वाजवण्याचे प्रकार अगदी बालवयापासून श्रीरामचंद्रांनी केले. प्रभूच्या पदाला जो शरण जातो त्याचे रक्षण झाले नाही, असे कधीच घडले नाही. अशी त्याच्या चरणाची थोरवी आहे. तोडराचा आवाज ब्रीददर्शक आहे. भक्तीप्रेम श्रेष्ठ की ज्ञान श्रेष्ठ, याचा विचार केल्यास अनन्य भक्त होण्यातली मौज निर्गुण ज्ञानात नाही, असेच म्हणावे लागते. ज्ञान होण्यासाठी भक्ती व ज्ञानोत्तरही भक्तीच. **सांडील सगुणभजनासी। तरी तो ज्ञाता परी अपेसी। म्हणौनिया सगुणभजनांसि। सांडूचि नये॥** (दा. १०-७-१८)

ज्ञान झाले तरी शरीर आहे तोवर खायला - प्यायला लागते, कपडा लागतो, देहाचे विधी पाळावे लागतात. हे जर चालू राहते तर रामाचे दास म्हणवून घेणेत लाज का वाटावी ? त्याचे भजन का टाकावे ? **ज्ञान विवेकें मिथ्या जालें। परंतु अवघेची नाही टाकिले। तरी भजनेचि काय केलें। सांग बापा॥** (दा. ६-७-१८) आपण जोपर्यंत मूर्तिमंत मूर्तस्वरूपात वावरत आहोत, तोवर



सगुणास सोडताच येत नाही देवाचे स्वरूप निर्गुण असल्यामुळे निर्गुणाचे ज्ञान व आपण मूर्त असल्यामुळे सगुणांचे ध्यान यातच खरी मौज आहे.

ज्ञानी हा देव होतो व भक्त हा देवाचा होतो. देव होणे व देवाचा होणे यात देवाचे होण्यात जास्त लाडिकपणा आहे. बाप होणें बरे की बापाचा होणे बरे. बापाचा होऊन जशा त्याचे जिवावर उड्या मारता येतात तशा बापाची जबाबदारी आल्यावर मारता येत नाहीत. देव होण्यात मोठी जबाबदारी आहे. देव झाला की द्वंद्वाशी खेळ खेळावा लागतो. **परित्राणाय साधूनाम्॥** ही जबाबदारी येते. दुष्ट - सुष्ट भाव लक्षात घेऊन वागावे लागते. देव भक्ताला जवळ करीत असतो. **तानहं द्विषतः क्रूरान् संसारेषु नराधमान्॥** (भ. गी. १६-१९) मी, माझा अगर माझ्या भक्तांचा द्वेष करणाऱ्या नराधमांना सुष्टीतील अमंगल अशा जन्मामध्ये कायमचा ढकलतो, असे भगवान म्हणतात. भक्ताला द्वंद्वे देवावर टाकून द्वद्वांतीत बनता येते. **गुणदोषयाति न विचारता कांही। ठाव दिला पायी आपुलीया॥** असे समर्थ होता येते. म्हणून देव होण्यापेक्षा देवाचा होणे बरे. श्रीकृष्ण गोकुळात भक्तांचे रक्षणासाठी स्वतः झुंजले. त्यांचे आधारावर सारे गोकुळ-श्रीकृष्ण भक्त आनंदात नाचत होते.

सृष्टीचे कायदे देवानेच केल्यामुळे ते त्याला पाळावेच लागतात. भक्तासाठी बाजूस सारावे लागतात. हिरण्यकश्यपूने घातलेल्या अटी देवास पाळाव्या लागल्या. नरसिंहरूप घ्यावे लागते. प्रल्हादाचे बाबतीत **नैनं छिंदन्ति शस्त्राणि।** हा चमत्कार घडवून आणावा लागला. अग्नी शितल झाला, शस्त्रे बोथट झाली, विष अमृत बनले. प्रल्हाद मात्र जणू काही घडलेच नाही ह्या थाटात हात जोडून उभाच. बाप देवाची पूजा करताना कडक सोवळे पाळतो, इतरानाही कटाक्षाने पाळायला लावतो. पण त्याचे पोर कपडे घालून देवाना उलथे पालथे करीत असते ते मात्र तो कौतुकाने पाहतो.

शत्रूंना श्रीरामाची अशी दहशत असल्यामुळे सारी अयोध्यानगरी प्रभू चरणांशी नम्र होती. स्वतः राम एकवचनी, एकबाणी, गुणवान, शीलवान व बलाढ्य असल्यामुळे खऱ्या अर्थाने त्याने रामराज्य केले, जेथे कामक्रोधादि राक्षसांचा ठाव नाही, सर्व धर्ममय, प्रेममय, आनंदमय अशी अयोध्यानगरी थाटली. आपल्याबरोबर सर्व नगरीचाच उद्धार केला.

भक्तीची सत्यता पटणेसाठी, श्रद्धा वाढविणेसाठी, संशय नष्ट होणेसाठी, समर्थानी रामरायांचेच उदाहरण देऊन असे म्हटले आहे. **पुरी**

**वाहीली सर्व जेणे विमानी। नुपेक्षी कदा रामदासाभिमानी॥**

★ ★ ★

**समर्थाचिया सेवका वक्र पाहे।**
**असा सर्व भूमंडळी कोण आहे ?।**
**जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही।**
**नुपेक्षीं कदा राम दासाभिमानी॥३०॥**

भक्तरक्षण ही श्रीरामाची प्रतिज्ञाच असलेमुळे भक्त शत्रूंना तो आपल्या आयुधाने शासन करतो. दासाभिमानी राम भक्तांची उपेक्षा करीत नाही, असे मागील श्लोकात सांगितले. असा हा रामाचा दरारा असल्यामुळे अशा समर्थाचे दास्यत्व पत्करणाऱ्या भक्तांना ह्या त्रिभुवनात तरी कोणी भीती दाखविणारा नाही. असे ह्या श्लोकात आश्वासन दिले आहे. श्रीरामाच्या दासाकडे वाकड्या नजरेने पाहणेची ताकद कोणामध्ये असणार ? कोणामध्येच नाही कारण ज्याचे दास व्हायचे तो राम साधा मालक नाही, जगाचा मालक आहे. **आत्माराम सकळा पाळी। आवघे त्रैलोक्य सांभाळी। तया एकेंविण धुळी। होय सर्वत्रांची॥** (दा. १६-१०-२४) श्रीराम जगाचां जिव्हाळा आहे. समर्थाचे लक्षण - **जितुके कांही उत्तम गुण। ते समर्थाचे लक्षण।** (दा. १९-४-३१) रामचंद्रप्रभू सर्व गुणांचा साठा. उत्तम पुत्र, उत्तम पति, उत्तम बंधू, उत्तम राजा. सर्वच उत्तम. अशा उत्तमोत्तमाचे दास होणे साधे भाग्य नव्हे. **धर्म - मार्ग चरित्रेण ज्ञानमार्गच नामत:। तथा ध्यानेन वैराग्यमैश्वर्य स्वस्य पूजनात्॥** (श्रीराम पू. ता. ऊ.) श्रीराम आपल्या चरित्राने धर्म मार्गाची, नामस्मरणाने ज्ञान मार्गाची, व ध्यानाने वैराग्याची, आणि पूजनाने ऐश्वर्याची, प्राप्ती करून देऊन भक्ताची सर्वांगीण उन्नती करून देतात, असा या मंत्राचा अर्थ आहे. सकळ त्रैलोक्य सांभाळणारा हा श्रीराम त्याचे प्रेम भक्तावरच का ? व इतराकडे दुर्लक्ष का ? असे प्रश्न, अशा शंका मनात येतील. त्याचे ठिकाणी विषमता नसते, आम्हांलाच त्याची गरज भासत नाही. तो सर्वानाच कृपाळूपणे सांभाळतो. सज्ञान झालेला मुलगा बापाला मान देईल, त्याचे सल्ल्याने वागेल तर बाप त्याच्याकडे प्रेमाने लक्ष देतो. बापाला काय विचारायचे ? अशा घमेंडखोर मुलाकडे बाप दुर्लक्ष करतो म्हणजे मुग्ध राहतो व कधी संकट समयी त्याने विचारले तर प्रेमाने सल्ला देतो. इतर योनीपेक्षा 'ज्ञान' हा भाग विशेष असलेल्या नरजन्मात ईश्वराबद्दल आदर बाळगून जो त्याची भक्ती करतो, त्याला देव



बुद्धीयोग देतो, ज्या बुद्धीमुळेच तो देवासमीप जाऊ शकतो. **तेषां सतत युक्तानाम्।** (भ. गी. १०-१०)

अशा श्रीरामाचे श्रेष्ठत्व वर्णन करताना समर्थ म्हणतात. शंकराने शतकोटी रामायण तीन लोकांत वाटून दिल्यामुळे रामाच्या लिलांचे वर्णन तीन लोकात होत आहे.

एक गोष्ट अवश्य लक्षात असावी. जरासे नामजपाचे साधन झाले की आपण मोठे भक्त झालो, असे वाटू लागते. पण रामाचा दासही सोपी गोष्ट नाही. रामाचा दासही तितकाच समर्थ असावा लागतो. एखाद्या राजाचा दास होणेचे असेल-तर नम्रता असावी, उर्मट भाषा सोडावी, स्वच्छता राखावी, मौन राखावे अशी पथ्ये पाळावी लागतात. मालकाच्या सेवेचा ध्यास धरावा लागतो. मग तीन्ही लोकी ज्याची कीर्ती निनादते त्याचे दास्यत्व पत्करायचे असेल तर अनेक सद्गुण अंगी बाणावे लागतील. समर्थ रामाचा दास कसा असावा याचे वर्णन समर्थांचे शब्दातच देत आहे.

**भव्य रूप अति सुंदर दीक्षा। रामनाम स्मरणे करि भिक्षा। वृत्ती होईल उदासिन जेंव्हा। रामदास म्हणणे मग तेव्हा॥१॥ नाठवे धन सुतालय जाया। मृगजळा परि भावित काया। परवधू जननी सम जेंव्हा। रामदास म्हणणे मग तेव्हा॥२॥ शुद्ध भक्त हरीची करी पूजा। विश्व पाहे आपणासम वोजा। शांती पूर्ण बरवी धरि जेंव्हा। रामदास म्हणणे मग तेव्हा॥३॥ नित्य नेम बरवा जगी ज्याचा। प्रतिदिनी हरीचे भजनाचा। गुरूपदी रचना असे जेंव्हा। रामदास म्हणणे मग तेव्हा॥४॥ सर्व लोक भजना प्रतिलावी। लालुचि धनि कदापि नसावी। बोलणे सम क्रिया घडे जेंव्हा। रामदास म्हणणे मग तेव्हा॥५॥ करी कथा परि न वांच्छित कांही। चित्तवृत्ती अवघी हरी पायी। कल्पना समुळ तोडिल जेव्हा रामदास म्हणणे मग तेव्हा ॥६॥ विमलज्ञान वदे जगी स्पष्ट। ब्रह्म निर्गुण कळे जगी श्रेष्ठ। सर्व माईक असे कळे जेव्हा। रामदास म्हणणे मग तेव्हा॥७॥ बोलणे प्रचितिचे जगी मान्ये। निवउं जो सकळा प्रति जाणे। वांछिती जन सज्जन जेव्हा। रामदास म्हणणे मग तेव्हा ॥८॥ निश्चये करी राम उपासना। रामनवमी रघोत्तम पूजना। तृप्त होति द्विज याचक जेव्हा। रामदास म्हणणे मग तेंव्हा॥९॥ यत्न साधुनि करी पुढे पाठ। अर्थ जाणुनि वदे जगी स्पष्ट। मागिले उजळणी करी जेव्हा। रामदास म्हणणे मग तेंव्हा॥१०॥** इतके गुण ज्याचे अंगी असतील त्यानेच रामदास म्हणवून घ्यावे अशा दासाची राम कधीच उपेक्षा करणार नाही. समर्थ श्रीरामाचा भक्तही अशा समर्थ गुणांचा असेल तर राम त्याची

कधीच उपेक्षा करणार नाही.

★ ★ ★

**महासंकटी सोडिले देव जेणें।**
**प्रतापें बळें आगळा सर्व गूणें।**
**जयातें स्मरे शैलजा शूलपाणी।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी।।३१।।**

ज्या ज्या वेळी देव - दैत्याचे झगड्यात देवांवर संकटे आली तेव्हा अवतार धारण करून प्रभूने देवांचे रक्षण केले आहे. समर्थ, रामावतारी कोणते देव सोडविले याचे वर्णन करितात. **समीर लोटितो खडे। वरूण घालितो सडे। मयंक साऊली घरी। मळीण पावकू हरी। विधी विधीस धाकतो। सुरेंद्र बाग राखतो। करावयासि निग्रहो। भूमंडळासि विग्रहो। अखंड चाकरी करी। सदा वरूचि भादरी। सटी आरंधळी दळी। गणेश गाढवे बळी। बहू कठीण काळ हो।** (रामदास कविता) जिवावरील नव्हे, देवावरील संकटेही दूर करणारा असा हा प्रतापी राम आहे. जसा तो प्रतापी आहे, तसाच तो विशिष्ट गुणसंपन्नही आहे. श्रीरामाचे ठिकाणी एकवटलेले सर्व गुण, एकाच व्यक्तीमध्ये दिसणे दुर्मिळ म्हणून **'आगळा सर्व गूणे'** असे श्रीरामाला म्हटले आहे. प्रभू गुणगानाने चित्ताला समाधान मिळते तसे अन्य कोणत्याही साधनाने नाही. रामाचे विशेष गुण.

**(१) कठोर कर्तव्यनिष्ठा :-** स्वकर्तव्य चोख करून त्यांनी बंधू सुहृद यांनाही कर्तव्याचा उपदेश केला. इतकेच काय, गुरूसमान मातापित्यांनाही केला. एवढेच नव्हे तर सर्वश्रेष्ठ कुलगुरू श्रीवसिष्ठ ऋषी यांनाही त्यांनी कर्तव्याची जाणीव करून दिली. दशरथाने रामास एक रात्र तरी राहा असा, वनवासास जाणेपूर्वी आग्रह धरिला. पण श्रीरामचंद्र म्हणतात. ''आज्ञापालनाचे दृष्टीने आज जाण्यात जो लाभ तो उद्या जाण्यात नाही. पिता हे माझे दैवत आहे. त्याने (कैकयीला) दिलेल्या वचनास कमीपणा येणार नाही. याच बुद्धीने मी ही कठोर आज्ञा पालन करीत आहे. आपण शोक आवरात. आपण अयोध्येचे राजे आहात. आपण लोकांचे सांत्वन करणार की स्वत: शोक करणार ?'' कौसल्यामाता पुत्रमोहाने रामाबरोबर वनवासात निघणेबद्दल बोलू लागली, तेव्हा राम म्हणतात, ''पत्नीने पतीचा त्याग करणे उचित नाही. पतिसेवेनेच पत्नीला उत्तम गती मिळते. मग एकवेळ देवांनाही नमस्कार



करण्यास ती विसरली तरी चालेल.'' **पतीचिया मता। अनुसरोनी पतिव्रता। अनायासें आत्महिता। भेटेंचि ते।।** (ज्ञा. १६-४५६) गुरूदेव श्रीवसिष्ठांनी वनवासापासून निवृत्त होणेचा उपदेश केला. तेव्हा श्रीराम म्हणाले, ''आईबापांच्या उपकाराची फेड कोणालाही करता येणार नाही. हे उपकार स्मरून पित्याचे वचन मी खोटे ठरविणे अशक्य.''

**(२) नेतृत्व व असामान्य वजन :-** बिभीषण शरण आल्यावर त्याला अभय देऊन लंकेचे राज्य स्वाधीन केले. एकट्या हनुमंताची ह्या गोष्टीला संमती होती. ज्या सुग्रीवाचे जीवावर लंकेची स्वारी यशस्वी झाली, तोही ह्या गोष्टीस अनुकूल नव्हता. हनुमंत हे कुशल हेर होते. त्यांनी सर्व भावात बिभीषणाची रामप्रभूंनी केलेली निवड योग्य असा निर्वाळा स्वानुभवाने दिला.

**(३) सीतात्याग :-** सीतेच्या शोधास राम निघाले तेव्हा 'सीतेची माहिती ज्या कोणास असेल त्यांनी ती न सांगितल्यास त्यांचा मी वध करीन. मग तो देव, दानव, गंधर्व, राक्षस कोणीही असो' अशी प्रतिज्ञा करणारे श्रीराम सीताप्राप्तीनंतर तिला अग्निदिव्य करावयास लावतात. हेतू एवढाच की राज्याची सम्राज्ञी तावून सुलाखून निघालेल्या सोन्याप्रमाणे पवित्र असावी. ह्या शिवाय मागील श्लोकाप्रमाणे उत्तम गुण म्हणून पुत्र, बंधु, स्नेही, राजा या सर्वच नात्याने श्रीराम हे पुरूषोत्तम होते, असे स्पष्ट होते. म्हणून, समर्थ म्हणतात **''प्रतापे बळे आगळा सर्व गूणे।।''**

सत्त्वशील व धर्माने वागणाऱ्या भक्ताचे जाणिवेच्या रूपाने आंतर, व शत्रूदमनाने बाह्या असे आंतर्बाह्य रक्षण श्रीराम करतात. पूर्णवैराग्यशाली तपस्वी शंकर व त्यांची धर्मपत्नी, हिमराज कन्या पार्वती दोघेही हे रहस्य जाणून श्रीरामाचे स्मरण करतात.

★ ★ ★

**अहिल्या शिळा राघवें मुक्त केली।**
**पदीं लागतां दिव्य होऊनी गेली।**
**जया वर्णितां शीणली वेद वाणी।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी।।३२।।**

राम गुणवर्णनासाठी एका कथेचा आधार ह्या श्लोकात घेतला आहे. ''अहिल्योद्धार'' हे श्रीरामचंद्रांच्या पूर्वायुष्यातील प्रकरण सुर्वश्रुत आहे. वाल्मीकि रामायणात मुळात असलेली कथा व समाजात अहिल्योद्धार म्हणून

प्रसृत पावलेली कथा यात महदंतर आढळते.

(१) अहिल्या ही अपराधी होती. पतिवेषाने येणाऱ्या इंद्राची तिला जाणीव होती. इंद्राने तिचे पाणिग्रहणार्थ पृथ्वी प्रदक्षिणेत भाग घेतल्यामुळे तिचे मनात त्याचेबद्दल कुतुहल होते. इंद्राचे सहवासानंतर ती त्याला स्पष्ट सांगते, ''माझे पती लवकरच स्नान करून येतील, त्याचे रोषातून स्वत:ला वाचीव.'' का ? वाल्मिकीने तिला **दुर्मती** असे म्हटले आहे.

(२) अहिल्या दगड झाली नव्हती. दगडाप्रमाणे जड होऊन पडली होती. कारण गौतममुनींनी तिला ''तू अन्नविना केवळ वायू भक्षण करून कोणासही न दिसता भस्मात एक हजार वर्षे पडून राहशील'' असा शाप दिला होता.

(३) श्रीरामाच्या पदस्पर्शाने ती मुक्त झाली असे मानले जाते, पण ते तसे शक्य आहे ? विश्वामित्राबरोबर राम, लक्ष्मण मिथिला नगरीस जात असता, गौतम मुनींचा ओस पडलेला आश्रम त्यांना दिसला. हा आश्रम कोणाचा असे त्यांनी विश्वामित्रांना विचारले, तेव्हा विश्वामित्रांनी सर्व हकिकत त्यांना सांगितली व आश्रम दाखविणेस आत नेले. कोणालाही न दिसणारी साध्वी अहिल्या रामप्रभूंच्या नेत्रांना दिसली. वडील व एक ऋषीपत्नी म्हणून रामांनी हाताने तिच्या पाऊलांना स्पर्श केला. प्रत्यक्ष परमेश्वराच्या स्पर्शाने पावन झाल्यामुळे दिव्य देह प्राप्त झाला - ती शाप मुक्त झाली. नंतर दोघा पतीपत्नींनी रामाचे स्वागत केले असा मूळ वाल्मिकि रामायणात कथाभाग आहे. आपल्यापेक्षा वडील व एका ब्राह्मण ऋषीपत्नीस श्रीराम पाय लावतील हे कसे शक्य आहे ?

अज्ञानाने किंवा मोहाने मनुष्याचे हातून अनुचित कर्म घडणे साहजिक आहे. देव अपराध घडला. म्हणून रागवत नाही, तो तसाच चालू ठेवला तर रागवतो. मनुष्याला पश्चाताप होऊन सन्मार्गाला लागणेचे दृष्टीने तो जर त्याला शरण गेला तर प्रभू शरणागताचा वाली आहे. त्याची भक्ती करणे हाच सन्मार्ग, त्याचे आचरणाने तो साधू होतो. **अपिचेत् सुदुराचारो भजते मामनन्यभाक्।** (भ. गी. ९-३०) **यालागीं दुष्कृती जऱ्ही जाहाला। तरी अनूतापतीर्थी न्हाला। न्हाउनि मजआंतु आला। सर्वभावे॥ तरी आतां पवित्र तयाचेचि कुळ। अभिजात्य तेंचि निर्मळ। जन्मलेया फळ। तयासीच जोडले॥** (ज्ञा. ९-४२०, ४२१) श्रीभगवंताच्या हया वाणीला अनुसरून पश्चातापाने दग्ध होऊन हजार वर्षे खडतर तपश्चर्या करणाऱ्या अहिल्येला पापनाशिनी



पंचकन्यकात प्रथम स्थान प्राप्त झाले. अहिल्येप्रमाणे कित्येकांचा उद्धार केल्यामुळे श्रीरामांना पतितपावन म्हणतात. अशा प्रभूचे वर्णन करताना वेदानांसुद्धा शीण यावा-वेदवाणी अपुरी पडावी, तेथे मानव किती व काय बोलणार ?

**रामएव परं ब्रह्म रामएव परंतप: रामएव परंतत्त्वं श्रीरामो ब्रह्मतारकम्॥**

असे हे तारक ब्रह्म भक्ताचे अभिमानी असल्यामुळे त्याची उपेक्षा करीत नाही.

★ ★ ★

**वसे मेरूमांदार हे सृष्टीलीळा।**
**शशी सूर्य तारांगणे मेघमाळा।**
**चिरंजीव केले जनीं दास दोन्ही।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥३३॥**

मागील श्लोकात अहिल्योद्धार कथा सांगितली या श्लोकात भक्त कैवारी रामाने आपल्या दोन भक्ताना चिरंजीवपद दिल्याची कथा सांगतात.

परमेश्वराने पृथ्वीची रचना मोठी सुंदर केली. मेरू, हिमालय वगैरे उंच उंच शिखरे असणारी पर्वतराशी, चंद्रसूर्य हे तेजोमय गोलक, चकाकणारे असंख्य तारे, मेघमंडल इत्यादीमुळे सृष्टिशोभा मनाला आल्हाद देते. **हे प्रभो विभो अगाध किती तव करणी** ह्या काव्यात कवीने ह्या सृष्टीचे फारच मनोहारी वर्णन केले आहे. **चांदवा नभाचा केला । रविचंद्र लटकती त्याला। जणु झुंबर सुबक छताला। वर अंथरली ही धरीणी।** अशी ही सुंदर सृष्टी एक दिवस लयाला जाणारच अशा या सृष्टीत रामचंद्रांनी हनुमान व बिभीषण हे आपले दोन भक्त चिरंजीव केले. श्रीराम बिभीषणाला उद्देशून म्हणतात, **''यावचंद्रश्च सूर्यश्च यावत्तिष्ठति मेदिनी। यावन्ममकथा लोके तावद्राज्यं करोत्यसौ॥''** (अध्यात्म रामायण.)

**म्हणे गा विरा त्वां पुरीमाजि जावे। धृवाचे परी राज्य सूखे करावें। शशी सूर्य तारांगणे अंतराळी। असावे सुखी भोगिजे सर्वकाळी॥** (समर्थकृत युद्धकांड ११-५१)

★ ★ ★

**उपेक्षा कदा रामरूपीं असेना।**
**जिवां मानवां निश्चयो तो बसेना।**
**शिरीं भार वाहेन बोले पुराणी।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी॥३४॥**

जवळ जवळ दहा श्लोकांचा शेवटचा जो चरण **नुपेक्षी कदा राम दासाभिमानी** ह्या पालूपदाचे वर्म ह्या श्लोकात सांगितले आहे.

रामाचे ठिकाणी उपेक्षा हा शब्दच शब्दकोषात सापडायचा नाही. तो त्याचा स्वभावच नाही परन्तु जर कांही उणीव असेल तर ती भक्ताचे निष्ठेत किंवा श्रद्धेत असते. राम आपली उपेक्षा करणारच नाही, असा दृढ निश्चय मानवाने केला नाही तर त्याला काय म्हणावे ? लहान मूल आईकडे खाण्यास मागते तेव्हा तिच्याकडे काही आहे की नाही हा विचारही त्या बालकाचे मनात येत नाही असा संशयरहित भाव भक्ताचे ठिकाणी हवा. तसा तो असत नाही. हीच भक्तीतली उणीव आहे. देवाचे भजन भीतीने होते, प्रेमाने नाही. तो आपला मायबाप असे वाटत नाही. अशी श्रद्धा नाही. त्याला देवाने काय करावे ?

**निश्चय, निष्ठा, भाव, श्रद्धा** हे पर्यायवाची शब्द आहेत. मनुष्य म्हटला की त्याची कोठे ना कोठे श्रद्धा असायलाच पाहिजे. श्रद्धेशिवाय जगताच येत नाही. **सत्त्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत। श्रद्धामयोऽयं पुरूषो यो यच्छ्रद्धः स एव सः** ॥ (भ. गी. १७-३) **जैसे जीवनचि उदक । परी विषीं होय मारक । का मिरयामाजीं तीख । ऊसी गोड** ॥ (ज्ञा. १७-६८) **ऐसेनि हा सकळु । जगडंबरू निखळू । श्रद्धेचाचि केवळु । वोतला असे** ॥ (ज्ञा. १७ - ७२) गुणानुसार मनुष्य श्रद्धेवरच जगतो. श्रद्धेमध्येही तीन प्रकार आढळतात. **सात्त्विक, राजस व तामस.** नास्तिक मनुष्याची तामसी श्रद्धा असते. समर्थांचा भाव हा की राजस व तामस श्रद्धा मनुष्यात नांदते पण परमार्थाला उपयोगी अशी सात्त्विक श्रद्धा जीवात नसते म्हणून ते देवापासून दुरावतात. **आपुले आवघेचिं जावें। परी देवासीं सख्य राहावें। ऐसी प्रीती जीवेंभावें । भगवंतीं करावी** ॥ (दा. ४-८ -९) हे सात्त्विक श्रद्धेचे लक्षण आहे. अशी सात्त्विक श्रद्धा तर दूरच पण व्यवहारात डॉक्टर, मोटार ड्रायव्हर वगैरेंवर जी श्रद्धा आपण ठेवतो तेवढी भगवंतावर ठेवली तरी काम भागेल. परमार्थ हा श्रद्धेशिवाय साधणारच नाही. सद्गुरू, शास्त्र, देव कोठे तरी गाढ श्रद्धा हवीच. **येक गुरू येक देव । कोठे तरी असावा भाव । भावार्थनस्तां वाव । सर्वकाहीं** ॥ (दा. १०-७-१५) परमार्थात श्रद्धा हे भांडवल समजले जाते. **न सांडी रे भावो टाकी रे संदेहो । रामकृष्णी टाहो नित्य फोडीं** ॥ (ज्ञा. ह. पा. २४) सत्य पदार्थावर नितांत प्रेम किंवा गाढ निष्ठा हे पारमार्थिक श्रद्धेचे प्रमुख लक्षण. ती असेल



तरच ज्ञान व शांती, नाहीतर अध:पतन होते. **श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेद्रिंयः। ज्ञानं लब्ध्वा परां शांतिमचिरेणाधिगच्छति** ॥ (भ. गी. ४-३९) ज्ञानेश्वर म्हणतात, ''आत्म सुखाची चटक लागल्यामुळे जो सर्व विषयांना विटतो, ज्याच्या ठिकाणी इंद्रियाचा बडेजाव नसतो, जो कशाचीच इच्छा मनात येऊ देत नाही, जो कर्माचे कर्तृत्व आपणाकडे घेत नाही, श्रद्धेच्या उपभोगाने जो सुखी झालेला असतो, अशा माणसाकडे - शोध घेत घेत ज्ञान आपणहून येते. त्या ज्ञानात निर्भेळ शांती असते''. **तयातेंचि गिवसित । हे ज्ञान पावे निश्चित** ॥ (ज्ञा. ४-१८९) पण जर ह्या ज्ञानाची आवड नसेल, अश्रद्धा असेल तर **अज्ञश्चाश्रद्धानश्च संशयात्मा विनश्यति**॥ अज्ञानी, अश्रद्ध व संशयित यांचे अध:पतन ठरलेले असते. त्यातल्या त्यात संशयिताचे फार हाल. समर्थ म्हणतात, **जिवा मानवा निश्चयो** - माणसांचा माणसावर कधी विश्वास नसेल, पण शास्त्र पुराणांतरी असलेल्या भगवत् वाणीवर तरी विश्वास ठेवा. भगवंत म्हणतात, **''शिरी भार वाहेन, बोले पुराणी ॥''** भक्त अनन्य होऊन मजकडे आला तर त्याचा सर्वभार मी शिरावर घेईन पांडवादिकांचा सर्व भार वाहिला आहे. नाथांचे घरी पाणी वाहिले आहे. कबिराचे शेले विणले आहेत. एवढेच नव्हे तर **जनाईची धुतली लुगडी चंद्रभागेच्या तीरीं** ॥ हल्लीच्या चिकीत्सक बुद्धीला पुराणांतरीचे दाखले पटत नसतील तर तिने प्रस्थानत्रयीत अंतर्भाव असलेल्या भगवद्वाणीवर विश्वास ठेवावा. गीतेत आपण भक्त कैवारी कसे आहोत हे अनेक वचने देऊन भगवंतानी सांगितले आहे.

**(१) तेषां नित्याभियुक्तांना योगक्षेमं वहाम्यहम्** ॥ (भ. गी. ९-२२)

**(२) ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयांति ते** ॥ (भ. गी. १०-१०)

**(३) तेषांमहं समुद्धर्ता मृत्यूसंसारसागरात्** ॥ (भ. गी. १२-७)

**(४) अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षायिष्यामि मा शुचः** ॥ (भ. गी. १८-६६)

**(५) मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम्** ॥ (भ. गी. १८-५६)

ही झाली भगवंताची वचने. प्रत्यक्ष रामप्रभूचे वचन पाहा. रामायणात ते म्हणतात, **''संकृदेव प्रपन्नाय तवास्मीति याचते । अभयं सर्व भूतेभ्योददाम्यमेतत् व्रतं मम ॥''** जो एकदाच येऊन मी आपलाच आहे असे म्हणेल त्याला अभय प्रदान करणे हे माझे व्रत आहे. (यु. का. स. १८) इतकेच नव्हे तर समर्थ म्हणतात, **''दयाळूपणे देव राजाधिराजे । शिरी वाहिजे सर्वही भक्त ओझे । जनी दास देखोनिया दैन्यवाणा । मनामाजि वोसावतो देवराणा ॥''** माझ्यासारखा

भक्ताचा सर्व भार शिरी वाहणारा पाठिराखा असतांना भक्ताने दैन्यवाणे होऊन का फिरावे, बेवारश्यासारखे हिंडावे, याचा देवाला विषाद वाटतो.

परमेश्वर आपले ब्रीद कधीही सोडणार नाही, दोष सर्वथा जीवाकडे असतो. त्याची श्रद्धा दृढ नसते.

★ ★ ★

**असे हो जया अंतरी भाव जैसा ।**
**वसे हो तया अंतरी देव तैसा ।**
**अनन्यास रक्षीतसे चापपाणी ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३५।।**

श्रीराम भक्ताची कधीच उपेक्षा करीत नाहीत. भक्ताच्या ठिकाणीच दृढ भावना नसते असे मागील श्लोकात सांगितल्यानंतर दृढ भावना ठेवणाऱ्यांना जसा भाव तसा देव होतो. हे या श्लोकात सांगतात.

या श्लोकात भक्ती मार्गातील एक सिद्धांत सांगितला आहे. **ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहं** ।। (भ. गी. ४-११) भाव तसा देव. गीतेतील या श्लोकावरूनच समर्थ म्हणतात, "**जया अन्तरी भाव होईल जैसा । तयालागि तो देव पावेल तैसा । मनी भावना भक्त लोकासि जैसी । तया सारिखी देव रायासि तैसी ।।**" माया पतीचे स्वरूप, जशी आपण कल्पना करू तसे आहे. परम पुरूषाचे वास्तविक स्वरूप निराकार, निर्गुण असल्यामुळे ते कल्पना करता येणार नाही असे कल्पनातीत व अचिंत्य आहे. बीजगणितात उत्तर शोधण्यासाठी अ-ब-क चा आधार घ्यावा लागतो, तसे भक्तीमार्गात परम- पुरूषाचे स्वरूप प्रथम कल्पावे लागते. गणितात आधारभूत घेतलेले अक्षर हे जसे ५२ मातृका बाहेरचे असू शकत नाही. तसे परमेश्वर रूपाची जी जी कल्पना आपण करू ती सर्व व्यापक व सकल सत्ताधीशाच्या सत्तेच्या बाहेरची असूच शकत नाही. त्याच्या सत्तेतच आपले मन, आपली कल्पना आहे. म्हणून जे स्वरूप आपण कल्पू तसा तो होणेची त्याची सत्ता आहे. पण मनात येईल ती कल्पना करण्यापेक्षा काही आधारभूत कल्पना करणे केव्हाही उत्तम. भाव पाहिजेच पण तो विवेकपूर्ण असावा. **विवेकेवीण जो भाव तो भावचि अभाव** ।। (दा. १८-८-१६) मृगजळ किंवा आकाश नीलिमा यांची दृढ भावना केली तरी त्याचा साक्षात्कार होणार नाही. म्हणून अवतार रूपाची कल्पना साधक दृढ धरून ठेवतात.



शरीरवानास देवाच्या अशरीरी रूपाचे अवलोकन फार कठीण पडते. **क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् । अव्यक्ताहि गतिर्दुखं देहवद्भिरवाप्यते** ।। (भ. गी. १२-५) देहधाऱ्यांना अव्यक्त ब्रह्माच्या प्राप्तीचा मार्ग कष्टाने साध्य होतो. **सगुणाचेनि आधारे, निर्गुण पाविजे निधारे** ।। (दा. ६-६-५५) असा समर्थांचा दंडक आहे.

यासाठी मन तात्काल स्थिर होईल व प्रेम भक्तीने ज्याचे निरंतर स्मरण करता येईल असे त्या भगवंताचे शामसुंदर, सुहास्यवदन स्वरूप, तेजोमय अशा हृदय गुहेत पाहण्याचा अभ्यास करावा. मग ते स्वरूप राम, कृष्ण, शंकर, विष्णु इ. कोणाचेही असो. मूर्तीचे रूप प्रथम चर्मचक्षूत भरून घेऊन ते दृढ करावे. नंतर मनाचे दृष्टीनेच ते हृदय प्रदेशात पाहावे व त्यावर नितांत प्रेम करावे.

रूपासंबंधी देव जसा भावनेला प्रतिसाद देऊन भावनेप्रमाणे रूपवान बनतो. तसेच भावनेने जे नाते आपण त्याच्याशी जोडावे तसे सख्य तो ठेवतो. **नातरी कडेयातळवटीं। जैसा आपुलाचि बोलु किरटी। पडिसादू होऊनि उठी। निमित्तयोगें।। तैसा समस्तां या भजनां ।। मी साक्षिभूतु पै अर्जुना । एथ प्रतिफळे भावना। आपुलाली** ।। (ज्ञा. ४-७५,७६) असा भावनेचा प्रताप आहे. तुम्ही त्याला पिता म्हणा की तो पिता होतो. माता म्हणा माता होतो, बंधू होतो, मित्र होतो, मालक होतो, मूल होतो, जे म्हणाल ते होतो, त्यांचे ठिकाणी लहान थोर गरीब श्रीमंत हा भेद नाही, तुम्ही त्याला काय अर्पण करता हेही तो पाहात नाही. तो फक्त प्रेमाचा भुकेला आहे. **पै भक्ति एकी मी जाणें। तेथं सानें थोर न म्हणें। आम्ही भावाचे पाहुणे। भलतेया ।। येर पत्र पुष्प फळ। तें भजावया मिस केवळ । वांचूनि आमुचा लाग निष्फळ । भक्तितत्व** ।। (ज्ञा. ९-३९५-९६) ही देवाची आवड लक्षात घेऊन अनेकांनी त्याच्याशी सख्य केले. निरनिराळी नाती जोडली व आपला ऊद्धार करून घेतला. अर्जुन उद्धवादिकांनी त्याला मित्र मानले, द्रौपदी त्याला बंधु मानीत होती. गवळ्यांचा तो खेळगडी होता. देवकीचा पुत्र होता. असा हा बहुरूपी, बहुरंगी जगाचा मालक सर्व स्वतंत्र असूनही भक्तप्रेमात अडकतो. कोरड्या काष्ठांचे पीठ करून टाकणारा भ्रमर, लुसलुशीत पुष्प कलिकेत अडकून पडावा अशी ही भक्तिप्रेमाची और जात आहे. समर्थ म्हणतात, "**सदा सर्वदा देव दासाभिमानी । कृपा भाकिता शीघ्र पावे निदानी । तया अंतरी थोर लहान नाही। परी पाहिजे दृढ भावार्थ कांही।।**"

भावाप्रमाणें देव होतो. पण हा भाव अनन्य हवा. हे त्यातील वर्म होय. अनन्यत्व म्हणजे एकत्व. तोच एक सर्व. मी नाहीच. मनाला अशी शंका येणे साहजिक की कर्तुमकर्तुम् शक्ती असणारा सृष्टीचा मालक केवढा व मी नश्वर असमर्थजीव केवढा ! दोघांत जमीन अस्मानाचे अंतर ! मग दोघांचे एकत्व कसे साधावे ? पुरुष आणि प्रकृति दोघात जमीन अस्मानाचे अंतर असले तरीही दोघांत अनन्यत्व असू शकते. साम्यता नसता अनन्यत्व कशात असते ? प्रेमात असते. हे अनन्य प्रेम अनुभवाला केव्हा येते ? एकांतस्थळी, इच्छाकाळी, व आनंदाचे वेळी, तेथे विषमता पार नाहीशी होते. पण हे होते कशाचे जोरावर ? **पुरूष इच्छेमध्ये प्रकृती । प्रकृतिमध्ये पुरूषव्यक्ती ।।** (दा. १६-७-४०) केवळ इच्छेच्या जोरावर इच्छेत अनन्यता असते म्हणून. पतिपत्नीची अनन्यता इच्छेवर अवलंबून, पण जीवन परमात्म्याची अनन्यता सहज आहे. अज्ञानामुळे ती कळत नाही. भक्ती ही ज्ञानाची माउली असलेमुळे ती जसजशी तीव्र, उत्कट होईल, तसतशी ही अनन्यता अनुभवास येते. अशा अनन्य भक्ताचे रक्षण धनुर्धारी राम सर्व प्रकारे करतो. राम भावाचा भुकेला आहे. त्याची भूक प्रेमाचे नैवेद्याने शमते. तो नैवेद्य अर्पण करणे हे भक्ताचे काम **जैसें जयाचें भजन । तैसाचि देव ही आपण । म्हणौन हें आवघें जाण। आपणाचि पासीं ।।** (दा. ४-८-१४)

★ ★ ★

**सदा सर्वदा देव सन्नीध आहे ।**
**कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे ।**
**सुखानंद - आनंद - कैवल्य - दानी ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३६।।**

जसा भाव तसा देव होऊन अनन्य भक्तीचे रक्षण रामप्रभू करतो असे मागील श्लोकात सांगितले. पण अनन्याचे रक्षण करणारा देव आहे तरी कोठे ? त्याची भेट घ्यायची झाल्यास कोठे घ्यावी, म्हणजे साक्षात्काराचे स्थान कोणते हे या श्लोकात सांगितले आहे. **नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।** ह्या श्लोकमालिकेनंतर **मना सज्जना राघवी वस्ती कीजे** ही श्लोकमालिका सुरू होते. राघवी वस्ती करणेचे झाल्यास, त्याचे निश्चित स्थान कळले पाहिजे, पत्ता पाहिजे, या दृष्टीने हा श्लोक व पुढील श्लोक महत्त्वाचा आहे.

देव अखंड अगदी जवळ आहे. मी म्हणून तू जेथे छातीला हात



लावतोस तेथेच हृदयकाशात देव आहे. पण त्याला पाहण्यात आपली भूल होते, त्यामुळे तो जवळ असूनही सापडत नाही. मनुष्य त्याला देहाबाहेरच धुंडत राहतो. समर्थ म्हणतात,

**बहू काळ गेला देवासी धुंडिता । देव पाहो जाता जवळीच ।।१।।**
**जवळीच असे पाहता न दिसे । सन्निधचि वसे रात्रंदिस ।।२।।**
**रात्रंदिस देव बाह्य अभ्यंतरी । जीवा क्षणभरी विसंबेना ।।३।।**
**विसंबेना परी जीव हे नेणती । जाती अधोगती म्हणोनिया ।।४।।**

त्याने स्वत: आपला पत्ता गीतेत दिला आहे. तोही कोणी पाहात नाही. कोणाला कोठे शरण जावे हे सांगताना **ईश्वर: सर्व भूतानां हृद्देशेर्जुन तिष्ठति । तमेवं शरणं गच्छ ।।** (भ. गी. १८-६१-६२) **सर्व भूतांचां अंतरी । हृदमहाअंबरी । चिद्‌वृत्तीचां सहस्त्रकरीं । उदयाला असे जो । असो रूपक हे तो ईश्वरू । सकल भूतांचा अहंकारू । पांघरोनि निरंतरू । उल्हासत असे ।।** (ज्ञा. १८-१२९९, १३०२) सर्व भूतांच्या अहंकाराचे पांघरूण घेऊन राहतो. हा कोठे नाही असे नाही. सर्व ठिकाणी सर्व भूतात हा आहे. पण त्याची प्रत्यक्ष भेट मानवी हृदयातच होते. अन्य कोठेही नाही म्हणून नरदेह श्रेष्ठ.

जमिनीत गाडला गेलेला जोंधळा, मुळात, पानात, खोडात किंवा फुलात दिसत नाही. कणसात मात्र दिसेल. खोड पान फुलात तो नाही म्हणूनच कणसात दिसतो. असे का आहे ? इतर ठिकाणीही तो आहे पण अव्यक्त. कणसात मात्र व्यक्त. साक्षात दिसतो. समर्थ म्हणतात, **''मायावल्ली फांपावली । नाना देहेफळीं लगडली । मुळींची जाणीव कळों आली । फळामधें ।।''** (दा. १९-५-१५) जोंधळ्याची जाणीव कणसात पटते. तसेच आपण मूळचे ज्ञान स्वरूप आहो ही ओळख मानवी फळात म्हणजे हृदयात होते हीच देवाची भेट. ब्रह्मांडात आत्मारामाची सत्ता आहे. पण त्याची भेट मानवी हृदयात होते. **देव जवळी अंतरी** म्हणून समर्थ म्हणतात. देव सन्निध आहे.

आणखी एक उदाहरण घेऊ. भारताच्या पंतप्रधानांचे वास्तव्य दिल्लीत एका बंगल्यात आहे. भारत त्यांचे सत्तेखाली. भारतातील प्रजा त्यांचीच अधिकारी वर्ग त्यांचाच. म्हणजे सत्तरूपाने वास्तव्य भारतभर व प्रत्यक्ष शरीराने दिल्लीत - बंगल्यात. सत्तारूपाने ते भारताचे प्रतिपालन करतात. भारतीयात सामान्य सत्ता. अधिकारी वर्गात त्यांची विशेष सत्ता. अधिकाऱ्यांना आपण नमन करतो ते ह्या विशेष सत्तेमुळेच. त्यांच्याशी आपण नम्रतेने वागतो. रावसाहेबी गेली की नमन बंद. वास्तविक नमस्कार सत्तेला असतो,

माणसाला नव्हे पण आपण मानतो मात्र माणसाला. हीच माया हीच भूल. वरील उदाहरणाप्रमाणेच उपासनेचे आहे. भगवंताच्या अनेक विभूतींना अवतारांना केलेले नमन, हे वास्तविक आहे ईश्वराच्या सत्तेला. पण आपण मानतो मात्र अवतारांना, देवाला. अधिकारी वर्ग ही जशी राजाची सत्ता स्थाने, तसेच अनेक देव. **सर्व - देव नमस्कार: केशवं प्रतिगच्छति।** मगाचाच दृष्टान्त पुढे पाहू. राजाची भेट आपण अधिकाऱ्यामार्फत घेतो. त्यासाठी आपण अधिकाऱ्याशी संधान बांधतो, त्याला खूष ठेवणेचा प्रयत्न करतो. सर्वस्वही अर्पण करणेची आपण तयारी करतो. राजाचे खोलीत पाऊल पडले की अधिकाऱ्यांची सत्ता संपली. तसेच उपासनेचे. आपण अधिकारी अशा उपास्य देवतेला मानतो. त्याची पूजा करतो. पण त्याला बाहेरच ठेवतो. पांडुरंग पंढरीतच राहतो व देव देव्हाऱ्यातच राहतात. अधिकारी उपास्य देवतेच्याद्वारा मुख्य देवाची भेट हेच आपण विसरतो. **सगुणाचेनि आधारें । निर्गुण पाविजे निर्धारें ।** (दा. ६-६-५५) म्हणून उपास्य देवतेच्या हातात हात घालून हृदय मंदिरात घुसले पाहिजे. उपास्य देवतेची सत्ता मुख्य देव्हाऱ्याच्या उंबऱ्यापर्यंत. तो ओलांडला की उपास्य देवतेचा हात सुटतो. येथे उपासना संपते. **महत्तत्त्व महद्भूत । तोचि जाणावा भगवंत । उपासना हे समाप्त । येथून जाली ॥** (दा. १५-५-३१) अहंकार उपास्य देवतेत विरला पाहिजे व देवतेचा अहंकार अहं ब्रह्माऽस्मि या मुख्य आत्मराजात विरला पाहिजे. उपास्य देवतेमुळे हा लाभ. म्हणून आत्माराम दर्शनापूर्वी व नंतर भजन - भक्तीच राहते.

भक्ताकडून ही उपासना होत असता, भक्ताची निष्ठा किती, हे तो पारखून पाहतो. आपण जर थोडे धैर्य दाखवले, थोडे कष्ट सहन केले तर तो लगेच (भावाप्रमाणे) व्यक्तही होतो. गाई पुढे टाकणेची भीती माता आपल्या बालकास दाखवते, तो किती धीट आहे हे पाहातो. प्रत्यक्ष हातातून सोडित नाही. तसे देव कृपाळूपणे श्रद्धेची कसोटी पाहते. अंत पाहत नाही. **मातेचे हृदय कोमल। नोळखोनी भयभीत बाळ। तेवी श्रीराम कृपाळ । भक्त परीक्षा आरंभी ॥१॥ संकटा मागे संकट। येता धैर्य चोखट । तरी भक्तासी दीर्घ काळ वाट। पाहाणे नलगे ॥२॥ ऐसा कृपाळू देवाधिदेव । पाहे शरणागताचा भाव। परी हेतू तद्रक्षणी सर्व । मातेपरी मुळी होनी ॥३॥ मायबाप रामराय। ज्याचे दास नित्य गाय । तेचि धरी घट्ट पाय । आलियारे ॥४॥**

त्याच्या कसोटीला उत्तरले की तो चिरंतन सुख, आनंद मोक्ष देतो.



हृदयस्थ भगवंताला स्मरून संसारावर मात करणेचे थोडे धैर्य जरी दाखविले, तरी तो संतुष्ट होऊन कृपा करतो.

★ ★ ★

**सदा चक्रवाकासी मार्तंड जैसा ।**
**उडी घालितो संकटी स्वामी तैसा ।**
**हरी भक्तिचा घाव गाजे निशाणीं ।**
**नुपेक्षीं कदा राम दासाभिमानी ॥३७॥**

हा ह्या गटातील शेवटचा श्लोक. गेले दहा श्लोकात राम भक्ताची कधीच उपेक्षा करणार नाही हे वेगवेगळे दाखले घेऊन सांगितले. मागील श्लोकात देवाचे हृदयातील स्थान सांगून भक्तांना तो सुख, मोक्ष देतो असे सांगितले. ह्या श्लोकात एक मार्मिक दृष्टान्त देऊन देव केवळ मोक्षदाताच नसून संकटकाली भक्ताला साहाय्यकही आहे असे सांगतात.

चक्रवाक पक्ष्याचे उदाहरण घेतले आहे. चक्रवाक पक्षी हे नेहमी जोडीने नर - मादी राहतात. ते अलग नांदत नाहीत. नर्मदा काठी फार पाहवयास सापडतात. अंधार पडला की त्यांना दिसत नाही, चुकून जर त्यांची ताटातूट झाली तर - नदीच्या एका तीराला नर व दुसऱ्या तीराला मादी राहिली तर रात्रभर विरहाने व्याकूळ होतात, दु:खी होतात. पण सूर्योदयाबरोबर दृष्टी आली की एकमेकांना भेटतात, दु:ख संपते. हीच अवस्था भक्ताची होते. भक्ताच्या संकटकाली देव धावत येऊन त्याची सुटका करतो. भक्त प्रेमळ असतो, निष्काम असतो. कामनेसाठी देवाला तो त्रास देत नाही. काही वेळा प्रारब्धानुसार तो अपरिहार्य संकटात सापडतो, त्यामुळे त्याला देवाचा धावा करावा लागतो, टाहो फोडावा लागतो. शिवरायाच्या रक्षणार्थ कीर्तन प्रसंगी तुकोबांनी टाहो फोडला होता. ते म्हणतात, **''पडता जड भारी । दासो आठवावा हरी । मग तो होऊ नेदी सीण । आड घाली सुदर्शन ॥''**

भक्ताला असह्य होणारी संकटे दोन प्रकारची. **प्रापंचिक व पारमार्थिक - प्रापंचिक** (१) स्वत:चा काही दोष नसताना होणारा दुर्लौकिक - **संभावितस्यचा कीर्तिर्मरणादतिरिच्यते।** ''परनारीला माऊलीसमान मानणाऱ्या तुकोबावर वेश्यागमनाचा व वेश्येपोटी गर्भ राहिल्याचा आरोप व्हावा हे केवढे दुदैव ? दुष्काळपीडितांना धान्य वाटले म्हणून संत दामाजीला अटक व्हावी !

देव मामलेदारांना स्वत: जामीन राहून गरिबांना मदत केली म्हणून पैसे खाल्ल्याच्या आरोपाला तोंड द्यावे लागावे! अशा प्रसंगी भक्तांना मानसिक यातना होणे साहजिकच. कबीर वर्णन करतात. **जान जाकर इजत रहे तो जान जाना मुष्क है। जान रहे पर इजत गयी तो जान रहना पष्म है।।**

(२) दुसरे संकट म्हणजे देहयातना. योगमार्गाने शरीराचे भानच नाहीसे करणारा योगी विरळाच. भक्त अनन्य असला तरी त्याला देहदु:ख आहेच. **ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनी।** असा अनुभव असणाऱ्या तुकोबारायांचे अंगावर लोहगावला एका बाईने आधणाचे पाणी ओतले तेव्हा ते म्हणतात. **''जळो माझी काया लागला वोणवा। धावरे केशवा मायबापा। तुका म्हणे माझी तू होसी जननी। आणिक निर्वाणी कोण राखे।।''** अशी प्रापंचिक संकटे देवकृपेने दूर होतात किंवा सह्य होतात. भक्ताला असह्य पारमार्थिक असे कोणते संकट असेल तर ते संसृतीचा फेरा. **किती वेळा जन्मा यावे। नित्य व्हावे फजीत। थोर गर्भीची यातना। आठविता थरकाप मना। भगद्वारे जन्म जाणा। परम यातना जीवासी।।**

या महान संकटाला अनुसरूनच समर्थ चक्रवाकाचा दृष्टान्त देतात. मूलत: जीव व शिव एकच, पण अज्ञान अंधकारामुळे तुटी झाली. त्यामुळे दोघांनाही दु:ख प्रकृतीचे गुण अलिप्त आत्म्यावर परस्पर लादले जातात. जेव्हा सद्गुरूरूपाने देवकृपा होते व ज्ञानसूर्य ऊगवतो, तेव्हा जीवशिवाचे ऐक्य होऊन परमानंद प्राप्त होतो हेच सर्व भक्तीचे महात्म्य आहे. हेच महात्म्य आज सर्व जगतात गर्जत आहे. तिसऱ्या चरणाचा अर्थ निस्साण नावाचे नगाऱ्यासारखे एक वाद्य आहे. ह्या नगाऱ्यावर हरिभक्तिरूप टिपरू सारखे वाजत आहे. असा एक होतो. अशा वाद्याचे अभावी हरिभक्तीचे निशाण सारखे फडकत आहे, असाही अर्थ होईल. दोन्हीचे तात्पर्य एकच. समर्थ म्हणतात, **''प्रगट रामाचे निशाण। आत्माराम ज्ञानघन। विश्वंभर विद्यमान। भाग्येंकळे।''** (दा. २०-४-१४) हा आत्माराम देवभक्तांची संकटे दूर करून त्यांची चिंता किंवा भय हरण करतो व त्यांना निजपद देतो. असा डंका संतसज्जन सारखा वाजवित आहेत. भक्तीचे निशाण सारखे फडकत आहे. भक्तीइतके दुसरे श्रेष्ठ साधन नाही. **संकट आपले निशाण, झेंडा पुढे करून झगडण्यास येईल, तेव्हा न घाबरता त्यावर हरिभक्तीचा घाव घाला** असा श्री. आठल्यांचा अर्थ बरा वाटतो.

भक्ती हे सुगम साधन आहे. या साधनास विघ्न नाही. अगदी डोळे



झाकून जावे. पडण्याची भीती नाही. जो भक्तीपंथाने गेला तो कधी माघारी फिरला नाही. त्याची प्रगतीच होत जाते. भक्ती हे व्यापक स्वरूपाचे साधन आहे. **सकळासि आहे येथे अधिकार** लहान थोर, गरीब श्रीमंत, अंध, पंगू, शूद्र कोणालाही अधिकार आहे व सर्वांना फल प्राप्तीही एकच. **जोका भक्ती पंथ जातो। त्याते श्रीराम भेटतो। निजधामाते अंगे नेतो। कष्ट कांही न होता।**

भक्ताबद्दल भगवंतांनी हमी घेतली आहे. ही अन्य कोणत्याही साधनात नाही हेच भक्तीचे श्रेष्ठत्व. **मी अवाप्तसकळकाम। परी प्रेमळा लागीं सदा सकाम। देखतां प्रेमळांचा भाव परम। मी आत्माराम उडी घालीं।** (ना. भा. १४-१५७)

भक्तांच्या प्रेमासाठी जो उडी घेतो, तो भक्त संकटात असता स्वस्थ कसा राहील ? भगवंत म्हणतात, मला भक्तांचे प्रेम पाहिजे, बाकी कांही नको. **पैं भक्ती एकी मी जाणें। तेथ सानें थोर न म्हणे। आम्ही भावाचे पाहुणे। भलतेया।। येर पत्र पुष्प फळ।** (ज्ञा. ९-३९५-३९६)

तुकोबा शपथपूर्वक सांगतात. **याविण नाही आणिक साधन। वाहतसे आण विठोबाची।** भक्ताच्या संकटकाली उडी घेणारा, भक्ताच्या प्रेमाचा भुकेला श्रीराम भक्ताची उपेक्षा कशी करेल ?

★ ★ ★

**मना प्रार्थना तूजला एक आहे।**
**रघूराज थक्कीत होऊनि पाहे।**
**अवज्ञा कदा हो यदर्थी न कीजे।**
**मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ।।३८।।**

गेल्या दहा श्लोकात प्रभू रामचंद्रांचे श्रेष्ठत्व व सामर्थ्य वर्णन केले. सृष्टीचा पालक, दीनांचा नाथ, नव्हे नव्हे, देवांचाही आधार असा हा श्रीराम आपल्या अगदी जवळ आहे. हृदयस्थ आहे. भक्ताचा जो भाव असेल ते रूप तो धारण करतो. संकटात भक्त रक्षणार्थ धावतो. भक्ताला सुख, आनंद व कैवल्य देतो. भक्ताची कधी उपेक्षा करीत नाही. हे सर्व ज्या भक्तीमुळे होते त्या भक्तीचे स्वरूप ह्या श्लोकात सांगितले आहे.

बा मना, तुला माझी हात जोडून एक विनंती आहे की, राघवाची भक्ती कर, अखंड भक्ती कर. बा मना, भक्ती अशी कर की (१) रघुराजाने थक्क होऊन जावे. जशी हनुमंतांनी रामरायाची भक्ती केली. जशी गोपींनी

कृष्णाची भक्ती केली. अशी भक्ती कर. (२) तुझ्या भक्तीने आश्चर्याने थक्क करून सोडणारे भगवन्ताचे स्वरूप पाहून तू त्यात इतका रंगून जा, गुंग होऊन जा, की, सर्व प्रपंचाचाही तुला विसर पडावा. **आश्चर्यवत् पश्यतिकाश्चिदेनं॥ एक अंतरी निश्चळ। जे निहाळितां केवळ। विसरले सकळ। संसारजात॥** (ज्ञा. २-१७२) (३) कांही लोक थकित याचा थकित होऊन - दमून - श्रमून - थकून असा अर्थ लावतात. विषयाचा पूर्ण कंटाळा येऊन, त्याचा शीण वाटून रामाकडे पाहा, म्हणजे परत विषयाकडे बुद्धी फिरणार नाही, कोणताही अर्थ गृहीत धरला तरी भक्ती उत्कट, तीव्र असावी हाच भाव.

व्यक्ती तितक्या प्रकृती यामुळे अमुक तऱ्हेने भक्ती करावी. असे सांगता येणार नाही. म्हणून नवविधा, बहुविधा असे भक्तीचे स्वरूप सांगितले आहे. ज्याचा जसा अधिकार तसा त्याला निश्चित मार्ग दाखविणे हे एक सद्गुरूच जाणे. **भक्तीचा तो सारांश। करणे नलगे काया क्लेश। आपला होईल जगदीश। भाव ऐसा धरावा।** (वि. सागर) **भक्ती कैसी म्हणता पाही। दिगंतरी तो पदार्थ नाही। भक्ती देवाजीचे पायी। जीवे भावे आवडी॥**

बालकाचे मातेबद्दलचे प्रेम वर्णन करता येणार नाही. त्याचे स्वरूप बाल भावातच दिसणार. मूल रडले, खेळले, नाचले तरी त्याचे लक्ष्य माताच. अशी देवाजीची आवडी पाहिजे. **भक्ती तीतेच म्हणावे। ईश्वर प्राणापरीस आवडे स्वभावे। सकाम भक्तीत त्यजावे। शंका कांही न धरावी। देवाचिये चाडे आळवावे देवा।** (तुकाराम)

भक्ती केवळ देवाच्याच प्रेमाने करावी हेच प्रेम देवाला आवडते व कळते. **याचा सुक्ष्म परिणाम। सर्व जाणे आत्माराम। लोकासि ते काय काम। सुखे निंदा सर्वथा॥** लोक कांहीही म्हणोत. अंतस्थ भगवान सर्व जाणतो. समर्थ म्हणतात, ''**मनी धरावें ते होतें। विघ्न अवघेंचि नासोन जातें। कृपा केलियां रघुनाथें। प्रचिती येते॥ रघूनाथभजनें ज्ञान जालें। रघूनाथभजनें महत्व वाढले। म्हणौनियां तुवां केले। पाहिजे आधीं॥** (दा. ६-७-३०,३१) देव तृप्त झाला पाहिजे. तृप्त झाल्यामुळे तो उपचाराकडे पाहात नाही. क्रियेकडे पाहात नाही, भाव पाहातो. **अंतर्बाह्य क्रीया जाणा। कैसा का ती असेना। क्रियेकडे तो पाहिना। देव भोक्ता भावाचा॥** भक्ती, शुद्ध, प्रेममय असावी. बा सज्जन मना, माझ्या विनंतीचा अनादर करू नकोस.

या उत्कट प्रेमाने तू रघुनाथाचे ठिकाणी सतत वास्तव्य कर म्हणजे तुझे प्रेम जसे उत्कट असावे तसे ते अखंड असावे. आज आहे, उद्या नाही



असे नको. ''**वस्ती कीजे**'' म्हणजे अखंड राघव स्वरूपी राहा. निरपेक्षता असेल तरच अशी वस्ती होते. सकाम भक्ती अपेक्षाभंगामुळे सुटते. नदीचा ओघ जसा सतत समुद्राकडे वाहातो तसा तुझा निष्काम प्रेमाचा ओघ राघवाचे ठिकाणी अखंड असू दे, आमरण राहू दे. प्राणाचा वावर ज्याप्रमाणे कंठात मरेपर्यंत अखंड राहतो, त्याप्रमाणे राघवाचे स्मरण चित्तात मरेपर्यंत सदैव राहू दे.

हे सज्जना मना, भक्ती उत्कट निरपेक्ष असावी व अखंड असावी. मन हे शत्रू आहे तसे ते मित्र आहे. त्याला गोंजारून चांगली वाट दाखवली की ते मित्र होते. त्याला योग्य छंद लावणे हे जीवाचे काम आहे. नाथ म्हणतात, ''**ऐसी मनाशी करिता मैत्री। मन परम उपकारी। जीवातें धरूनि निजकरी। स्वानंदसागरी बुडी दे॥ ऐसें मैत्रिसी मन सादर। जवळी असता निरंतर। त्याते वोसंडूनि पामर। प्राकृत नर मित्र करिती॥**'' (ना. भा. २३-७४७-७५०)

★ ★ ★

**जया वर्णिती वेद शास्त्रें पुराणें।**<br>
**जयाचे नि योगें समाधान बाणें।**<br>
**तयालागि हें सर्व चांचल्य दीजे।**<br>
**मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ॥३९॥**

बा मना, माझ्या विनंतीचा अनादर न करता रामस्वरूपात रममाण होऊन राहा, असे मागील श्लोकात सांगितले ते कशासाठी ? राघव स्वरूपात राहणेचा उद्देश काय व त्यामुळे फलप्राप्ती कोणती होते, हे येथे सांगितले आहे व सर्व कर्मसमर्पणाचा उपदेशही आहे.

वेद, शास्त्रें, पुराणे या सर्वांनी राघवाचे वर्णन केले आहे. ज्यांनी एकाग्रचित्ताने राघव स्वरूपात वस्ती केली, त्यांना त्यामुळे समाधिसुख लाभले. समाधान प्राप्त झाले. मूर्च्छेप्रमाणे देहाला काही न कळणे व काष्ठवत् होऊन पडणे म्हणजे समाधी नव्हे. संदेहरहित मन होऊन जेव्हा ते आत्मस्वरूपाशी तादात्म्य पावते व सुखरूप होते, तेव्हा त्या स्थितीला समाधी म्हणतात. **जेथे शमली मनाची आधी। ते जाणावी 'परमसमाधी'। समाधी घेणे ते देह बुद्धी। काष्ठ ते त्रिशुद्धी मूर्च्छितप्राय॥** (ना. भा. २-४३८) ज्या मनाचे समाधानासाठी सर्व जगाची धडपड ते समाधान राघवरूपी होते. मना, तू पळवाट काढशील, की राघवस्वरूपी सुखशांती असेल ? पण माझा स्वभाव चंचल आहे. जे जे

दिसते किंवा भासते त्यात तोंड घालणेचा माझा स्वभाव. असा मी राघवस्वरूपात स्थिर कसा नांदणार ? पण थांब यालाही उपाय आहेत.

बा मना, त्या राघवालाच तुझे कायिक, मानसिक, सर्व चांचल्य समर्पण कर, हे चांचल्य अर्पण कसे करायचे हेच कळत नाही, ही अडचण आहे. या अडचणीतून मार्ग कसा काढावा हे भगवंतांनी गीतेत सांगितले आहे.

मानवी जीवन मनाची प्रेरणा व तद्नुसार कर्म या दोन गोष्टीवर चालते, एखाद्या विषयासंबंधी प्रथम भावना किंवा प्रेम उत्पन्न होते. तद्नुसार कर्म घडते. या भावना सारख्या बदलत असतात. आज जे हवे ते उद्या नकोसे वाटते. नाविन्याकडे मन धावत असते. हेच मनाचे चांचल्य. प्रथम नास्तिक असलेली व्यक्ती आयुष्यात केव्हातरी सोवळे नेसून गुरूचरित्र पारायण करताना आढळते. प्रथम देव देव करणारी माणसे, यात कांही अर्थ नाही असे वाटून सर्व साधन सोडून स्वस्थ बसतात. असे हे मनाचे चांचल्य दिसून येते. चांचल्य समर्पणासाठी भगवंतांनी गीतेत भाव व कर्म समर्पण विधी सांगितला आहे.

**भावसमर्पण :-** तुझे बरे वाईट सर्व भाव, मला अनुलक्षून कर **मां हि पार्थ व्यपाश्रित्य।।** (भ. गी. ९-३२) ह्या श्लोकावर भाष्य करताना ज्ञानोबा म्हणतात. ''तुझा जन्म अधम योनी, दैत्य योनी अगर उच्य योनी, कोठेही असू दे, तुला मी हितकर्ता वाटो किंवा शत्रू वाटो. तू विद्याहीन दगड असलास अगर विद्वान असलास, तुझा भाव बरा असू दे अगर वाईट, कोणत्याही भावनेने तुझे चित्त माझे ठिकाणी पूर्णपणे जडून मद्रूप झाले की मागील सर्व आचरण व्यर्थ होते. **तेंचि भलतेणे भावें। मन मजआंतु येतें होआवें। आलें तरी आघवें। मागील वावो।** (ज्ञा. ९-४५७) गंगेला मिळेपर्यत ओढे, नाले यांचे स्वरूप पण एकदा गंगेला मिळाल्यानंतर गंगारूप. असाच भगवंताचाही महिमा आहे. **एवं अर्जुना जो मजला। कोण्या निमित्ते जरी भजला। तो मोक्षातेचि पावला। सहज महिमा हाचि माझा।।** (य. दी. ७-६९९)ज्ञानोबांनी सुंदर दुष्टान्त दिला आहे. फोडण्याच्या उद्देशाने लोखंडाचा घण परिसावर पडला तरी देखील परिसाचे स्पर्शाने घण सोनेच बनून जाईल. भगवंत अर्जुनाला म्हणतात, ''अर्जुना मी सर्व मार्गाच्या मुक्कामाचे शेवटचे ठिकाण आहे. वाटेल त्या मार्गाने मजकडे येता येते. भक्तीने अथवा विषय बुद्धीने, वैराग्याने अथवा वैराने तुझे चांचल्य कितीही असू दे. तुझ्या भावाचे जर मी लक्ष्य झालो तर तू सुखरूप होशील. तू आर्त हो, जिज्ञासू हो, अर्थार्थी हो, शत्रू हो, मित्र हो, सर्व भावांचा



ओघ माझेकडे असू दे. यालाच **भावसमर्पण** म्हणतात.

**कर्मसमर्पण :- अभ्यासेऽप्यसमर्थोसि मत्कर्मपरमो भव।** (भ. गी १२-१०) ज्ञानेश्वर म्हणतात, ''ध्यानादि अभ्यास तुझ्या हातून होत नसेल, तर जसा आहेस तसाच राहा, इंद्रियांना कोंडू नको, स्वजातीचा अभिमान सोडू नकोस. भोग भोगावयाचे ते भोग. कुलधर्माचे पालन कर. निषिध्द कर्म करू नको. अगदी सुखात राहा. पण एक कर. **परी मनें वाचा देहे। जैसा जो व्यापारू होये। तो मी करितु आहें। ऐसे न म्हणे।।** (ज्ञा. १२-११७) होणाऱ्या सर्व कर्माचा फुंज धरू नकोस. मी केले असेही म्हणू नकोस. विश्व चालक परमात्मा त्याचेवर सर्व सोपव. करणे न करणे त्याचे अधीन ठेव. पाटाचे पाणी माळी नेईल तिकडे जाते. तसे तुझे जीवन निरभिमान होऊ दे. प्रपंचाचा किंवा परमार्थाचा कोणताच हट्ट धरून अहंकाराचे ओझे डोक्यावर वाहू नकोस. सरळ जाते की आड वाटेला, याची फिकीर गाडीला नसते. हाकणाऱ्यावर ती जोखीम असते. त्याप्रमाणे सर्व माझ्यावर सोपीव. माझे चिंतन ठेव. माझा नामोच्चार कर. दृष्टीपुढे माझे रुप ठेव. मनात माझा विचार, कानात माझे गुण वर्णन, ज्ञानाला दुसरा विषयच नाही, असा तू हो. म्हणजेच मना राघवी वस्ती कर.

★ ★ ★

**मना पाविजे सर्वही सूख जेथें।**
**अती आदरें ठेविजे लक्ष तेथें।**
**विवेकें कुडी कल्पना पालटीजे।**
**मना सज्जना राघवी वस्ति कीजे।।४०।।**

ज्या राघवाचे ठिकाणी वस्ती केल्याने चित्ताचे समाधान होते, अशा राघवाला मनाचे व शरीराचे सर्व व्यापार समर्पण कर असा मागील श्लोकात मनाला उपदेश केला. हा समर्पणाचा खटाटोप का करायचा व कसा करायचा याचे विवेचन ह्या श्लोकात केले आहे. पहिल्या दोन चरणांत समर्पण खटाटोप का करायचा त्याचेविषयी विवेचन आहे. राघव हे एकच सर्व सुखाचे आगर आहे. जगात एकच ध्येय आढळते - ते म्हणजे सुख प्राप्ती. **यः कश्चित्सौख्यहेतोस्त्रिजगति यतते नैव दुःखस्य हेतोः।।** दुःख कोणालाच नको. सुख मात्र ब्रह्मांडाला पाहिजे. सुखाचे ध्येय साऱ्यांचे एकच, पण ते प्राप्त करून घेणेचे मार्ग मात्र दोन प्रकारचे आहेत. **प्रवृत्ती मार्ग व निवृत्ती मार्ग.** प्रवृत्ती मार्गाने विषयसुख व निवृत्ती मार्गाने आत्मसुख प्राप्त होते. **विषयसुख** इंद्रियगम्य

असून क्षणिक आहे. पण सदैव दु:खरूपच आहे. विषय प्राप्तीसाठी प्रथम कष्ट करावे लागतात. विषय प्राप्त झाला तरी तो टिकेल की नाही याची हूरहूर असते. विषय टिकला तर तो भोगान्ती देह इंद्रियादिकांची शक्ती कमी करतो व तो हातचा गेला तर त्याच्या विरहाने दु:ख होते. आदि अंती दु:खच. हे सुख वासनांच्या जंजाळामुळे जन्ममरणाला कारणीभूत होते. म्हणून यालाच संसारसुख असे म्हणतात.

**आत्मसुख** हे याहून अगदी विरूद्ध गुणांचे आहे. ते देहेंद्रियांचे पलीकडे असते. निर्विषय असते. ते अखंड जवळ असते. ते आनंदरूप असते. त्यामुळे दु:खाचा लवलेशही नसतो. अंती मोक्ष देते म्हणून त्याला मोक्षसुख असेही म्हणतात. विषयसुखाला प्रेम व आत्मसुखाला श्रेय अशी उपनिषदात नावे आहेत.

यापैकी कोणते निवडावे असे जर श्रुतिमातेला विचारले तर ती येवढेच सांगते, 'श्रेय प्राप्त करून घेणाऱ्यांचे कल्याण होते व त्याला सर्व सुखाचा लाभ होतो. आत्मसुख हेच सर्व सुख. **मना पाविजे सर्वही सूख जेथे** असे सांगून त्या सर्वसुखावरच सर्व लक्ष केंद्रित करणेचा उपदेश करतात. सर्वसुख म्हणजे काय ?

सर्व सुखांचा ज्यात अंर्तभाव होतो, जे प्राप्त झाले असता दुसऱ्या सुखाची अपेक्षा रहात नाही. ज्यात दु:खाचा अंशही नसतो, तेच सर्वसुख. यानेच जीव सुखरूप होतो. ज्ञानोबा म्हणतात, **तरी सूख तें गा किरीटी। दाविजेल तुज दिठी। जें आत्म्याचिये भेटी। जीवासि होय।।** (ज्ञा. १८-७७३) **सुख आणि महादु:ख। दोनीतें ग्रासोनियां देख। प्रकटे स्वानंद स्वाभाविक। या नाव 'सुख' उद्धवा। जेथ दुजियाची चाड नाही। इंद्रियांचा पांग न पडे कांही। विषयावीण आनंद हृदयी। 'निजसुख' पाहीं या नांव।।** (ना. भा. १९-५१५-५१६)

सर्व सुख म्हणजे परमात्मसुखच. **'सुखंस्यादात्मनोरूपं'** विषय सुखाच्या द्वारे सर्व आत्मसुखाचाच अनुभव घेतात. पण अज्ञानामुळे त्याची जाणीव नसते. म्हणून समर्थ म्हणतात, त्या आत्मस्वरूपावर आदराने लक्ष ठेव. दुसरा कोणताही विचार आड येऊ देऊ नकोस, **शनै:शनैरूपरमेत्। आत्मसंस्थं।** (भ. गी. ६-२५) मना, तू म्हणशील आत्मस्वरूपी बुद्धी स्थिर होत नाही. संकल्प विकल्प आड येतात. समर्थ म्हणतात त्याला उपाय आहे. तो पुढील दोन चरणात स्पष्ट करतात. कुडी कल्पना म्हणजे वाईट कल्पना, दुष्ट मिथ्या



अशुद्ध व परमार्थाला घातक कल्पना. समाधानाला काय, किंवा पतनाला काय कारण कल्पनाच आहे. सर्वच जर कल्पना तर तेथे शुद्ध अशुद्ध हा भेद कसा कळावा ? **अद्वैत कल्पी ते शुद्ध। द्वैत कल्पी ते अशुद्ध ।।** (दा. ७-५-३५) **अद्वय निश्चयाचें ज्ञान। तेचि शुद्ध कल्पना।।** (दा. ७-५-३४) म्हणून नित्यानित्य विवेकाने अशुद्ध कल्पना शुद्ध केली पाहिजे. मी जीव नव्हे आत्मा, मी मर्त्य नव्हे शाश्वत, मी दु:खी नव्हे सदैव सुखी इत्यादि. अशुद्ध कल्पना शुद्ध कल्पनेने प्रथम नाहीशी करावी. अशुद्ध नाहीसे झाल्यावर उरलेली शुद्ध कल्पना स्वरूप-चिंतन करता करता तद्रूप होते. अशुद्ध घालवणेसाठी शुद्ध, तद्रूप होऊन शुद्ध कल्पनाही नाहीशी झाली की शेवटी सहजच आत्मसुख शिल्लक राहिले. काट्याने काटा काढून दोन्हीही फेकून द्यावयाचे, म्हणजे सुख. **असो ऐसी हे कल्पना। साधनें दे समाधाना। येरवी हे पतना मूळचि कीं।। म्हणौनि सर्वांचे मूळ। ते हे कल्पानाची केवळ। इचें केलियां निर्मूळ। ब्रह्मप्राप्ती।।** (दा. ७-५-२५,२६)

स्वात्मसुखाव्यतिरिक्त सर्व सुख म्हणजे दु:ख कल्पना-भासच. अनात्म वर्ग सर्व कल्पनाच. महाकारण देह म्हणजे ज्ञान, कारण देह म्हणजे अज्ञान, लिंग देह म्हणजे वासना, मिळून ज्ञान, अज्ञान व वासनांचे मिश्रण हे सर्व कल्पनामयच. जे प्रकृति अधीन त्यांना कल्पना बाधा होते. म्हणजे संसार बंध होतो. पण जे आत्माराम रुप झाले त्यांना संकल्प बाधा नाही. कारण तेथेच संकल्प किंवा कल्पना संपते. म्हणून समर्थ मनाला सांगतात, बा मना, शुद्ध कल्पनेने अशुद्ध कल्पना नाहीशी कर व शुद्ध कल्पना नाहीशी करणेसाठी राघवी वस्ती कीजे.

★ ★ ★

**बहू हिंडता सौख्य होणार नाही।**
**शिणावे परी नातुडे हीत कांही।**
**विचारें बरें अंतरा बोधवीजे।**
**मना सज्जना राघवीं वस्ति कीजे।।४१।।**

मागील श्लोकाला पूरक असा हा श्लोक आहे. अशुद्ध कल्पना शुद्ध कल्पनेच्याद्वारा नाहीशा कर, सर्व सुखाचे असे आत्माराम रूपी जे स्थान तेथेच सर्व लक्ष केंद्रित कर, एकाग्र कर असे मागील श्लोकात सांगितले. आत्माराम स्वरूपीच एकाग्रता का करायची ? याचे कारण ह्या श्लोकात

समर्थ सांगतात. समर्थ मनाला बजावतात, राघव रूप सोडून अन्य ठिकाणी तू कोठेही, कितीही धडपडलास, तरी तुला सर्व सुख प्राप्त होणार नाही. त्यात तुझे हितही साधणार नाही. मानवी जीवनातील परमार्थ प्राप्ती हे जे एकमेव हित तेही साधणार नाही. फक्त कष्ट व शीण मात्र पदरात घेशील. **देही असोनिया देव। वृथा फिरतो निर्दैव। देव आहे अंतर्यामी। व्यर्थ हिंडे तीर्थग्रामी।।** (तुकाराम) वास्तविक परिभ्रमण हे समर्थ संप्रदायाचे लक्षण. अखंड चाळणा पाहिजे हा त्यांचा निस्पृहाला उपदेश. ते म्हणतात, **'नित्य नूतन हिंडावें। उदंड देशाटन करावें।।** (दा. १४-२-८) **येके ठाई बैसोन राहिला। तरी मग व्यापचि बुडाला। सावधपणे ज्याला त्याला। भेटि द्यावी।।** (दा. १५-१-३४) असे म्हणणारे समर्थ **बहू हिंडता सौख्य होणार नाही** असा मनाला का उपदेश करतात ? समर्थांचा परिभ्रमणाचा उपदेश परमार्थ साधनात पूर्ण झाले अशा महंताना आहे. परमार्थ साधकाला हा उपदेश नाही. लोकसंग्रह, समाजसेवा या गोष्टी हिंडण्यानेच साध्य होतात. पण परमेश्वर प्राप्ती हा हेतू हिंडण्याने साध्य होत नाही. त्यासाठी **ठाईच बैसोनी करा एक चित्त। आवडी अनंत आळवावा।।** हेच साधन केले पाहिजे. समर्थांनी उदंड देशाटन केले पण केव्हा ? आत्म साक्षात्कारासाठी एक तप टाकळीस एकांतात, भिक्षा मागून राघवी वस्ती केल्यावरच. समर्थांचा लोकसेवेचा व्याप व तीर्थाटण याबद्दल पुष्कळ लोक बोलतात, पण त्यांच्या घोर तपाचे महत्त्व विसरून. आत्मसुख उगीच वणवण हिंडून होत नाही. ईश्वरप्राप्तीसाठी अनेक लोक निरनिराळे अनुभव आपापल्यापरी सांगतात. पण ते विचाराने पारखून घेतले पाहिजेत. एकाचे मत संसारात राहून परमार्थ नाही, त्यासाठी एकांतच पाहिजे. दुसरा म्हणतो चित्तात संसार आहे तोवर एकांतही कुचकामाचा. एक म्हणतो वैराग्य पाहिजे तर दुसरा म्हणतो केवळ हेकांडपिसे वैराग्य काय कामाचे. त्यामागे विवेक पाहिजे. एक म्हणतो पोटासाठी प्रपंच हवाच. तो वर्णाश्रमविहित निष्काम कर्म करून केला म्हणजे पुरे. दुसरा म्हणतो, प्रपंचात डुंबून कसे चालेल ? तीर्थक्षेत्रे, यात्रा, दान, धर्म, पुण्य इ. झाले पाहिजे. **येक म्हणती हे अटाटी। पाणीपाषाणाची भेटी। चुबकुळ्या मारिती हिंपुटी। कासाविस व्हावें।।** (दा. ८-१०-१८) हेच खरे. यात शीणच. मानवी जीवनात ज्याला खरे हित म्हणतात, ते या व्यापांनी साध्य होणार नाही. (श्लोक २२ वा मुद्दाम पुन्हा साधकांनी वाचावा.) **रघूनायका दृढ चित्ती धरावे** हेच हित.

मग हे हित कशाने प्राप्त होणार असे जर तू विचारशील तर



एकांतात शांतपणे नित्यानित्य विचार करून आत्मारामाचा शोध घेतला पाहिजे. **येकांती विवेक करावा। आत्माराम वोळखावा।।** (दा. १९-६-३०) विचार न करता उगीच काहीतरी करणे, हे श्रमाला कारण होते. पदरात काही पडत नाही. **विचार न करितां जें जें केलें। तें तें वाउगें व्यर्थ गेले। म्हणोनि विचारीं प्रवर्तले। पाहिजे आधीं।** (दा. १०-९-२७) विवेकाचे आटोक्यात न येणारी अशी कोणतीच गोष्ट नाही. **विवेकामधें सांपडेना। ऐंसे तो कांहींच असेना।।** (दा. १९-६-२८) विचारात डोळसपणा असतो, पारख असते. विचार न करता काही करणे म्हणजे अंधारात चाचपडण्यासारखे आहे. **विचार आणि अविचार। जैसा प्रकाश आणि अंधकार।। विचार पाहे तो पुरूष। विचार न पाहे तो पशू।।** (ज्ञा.) **संसार त्याग न करितां। प्रपंचउपाधी न सांडितां। जनामध्यें सार्थकता। विचारेंचि होय।।** (दा. ६-९-२४) स्वत:चे जन्माचे पारमार्थिक वा प्रापंचिक सार्थक करून घ्यायचे असल्यास विचार करावाच लागेल. बरे-वाईट, शुद्ध-अशुद्ध, नित्यानित्य सर्वच गोष्टींचा विचार केला पाहिजे.

सज्जन किंवा पंडितांची क्रिया ही ज्ञानपूर्वक होत असलेमुळे ती शुद्ध स्वरूपाची असते आणि सामान्य जनाची क्रिया ही प्रवाहपतित असते, अशुद्ध बाह्यकर्मावर दृष्टी असणारी असते. **लोक नाना देह देखती। विवेकी देहांत पाहाती। पंडित समदर्शनें घेती। येणें प्रकारें।।** (दा. ११-१-२४) पंडिता: समदर्शिन: ।।

सामान्य माणसाचे लक्ष बाह्य विविध नामरूपाकडे असते, तर सज्जनाचे लक्ष सर्व ठिकाणी भरलेल्या एका अंत:स्थ आत्मारामाकडे असते. म्हणून ते अद्वैत स्थितीत सुखात राहतात व आम्ही-सामान्य माणसे द्वैत बोधात दु:खात नांदतो. समर्थ मनाला म्हणतात, **''विचारे बरे अंतरा बोधवीजे.''** सारासार विचाराने ब्रह्मांडाचा व नित्यानित्य विवेकाने पिंडाचा विवेक करून त्या आत्मारामाचा अंत:करणात बोध करून, ठसवून घे व तो अनुभविण्यासाठी राघवाच्या स्वरूपात सदैव राहा. तुझे हित होईल व तू चिरंतन सुख उपभोगशील.

★ ★ ★

**बहुतांपरी हेंचि आतां धरावें।**
**रघूनायका आपुलेसें करावे।**
**दिनानाथ हे तोडरी ब्रीद गाजे।**
**मना सज्जना राघवी वस्ति कीजे ।।४२।।**

ह्या गटातील हा पाचवा शेवटचा श्लोक आहे. पाचही श्लोकात भक्तीचे स्वरूप सांगितले. ३८ व्या श्लोकात, भक्तीची उत्कटता सांगितली. राम भजनात इतका रंगून जा - निष्काम प्रेमाने रंगून जा - की बाह्य प्रपंचाचा विसर पडावा. हा झाला **ध्यानयोग**. ३९ व्या श्लोकात चित्ताचे चांचल्य सोडून मन एकाग्र करणेस सांगितले. ४० व्या श्लोकात कल्पना क्षय किंवा मनोजय सांगितला. ४१ व्या श्लोकात विवेकाने आत्मशोध घेणेस सांगितले. शेवटी ह्या श्लोकात सर्व सार - **रघूनायका आपुलेसे करावे** ह्या वचनाने सांगितले आहे. हे मना, काय पाहिजे ते कर पण प्रथम रघूनायकाला आपलासा करून घे. मग पाहिजे ते इतर व्याप कर. दीन भक्तांचे रक्षण करणे हे त्याचे ब्रीद आहे. गजेंद्रासारख्या पशूचाही अंतरसाक्षी रूपाने तो उद्धारक होतो तर दीन मानव भक्ताबद्दल तो किती कृपाळू असेल ? २९ व्या श्लोकात **पदी राघवाचे सदा ब्रीद गाजे** असे चरण आहे येथे **'दिनानाथ हे तोडरी ब्रीद गाजे'** असे चरण आहे, दोन्हीचा अर्थ एकच.

काय पाहिजे ते करून रघुनाथाला आपलासा कर. कोणीही आपलासा कशाने होतो ? प्रेमाने, सख्य केल्याने. समर्थ म्हणतात, **''देवासि परम सख्य करावें। प्रेम प्रीतीने बांधावे।''** (दा. ४-८-२) **भाव धरा रे। आपुलासा देव करा रे।** हे प्रेम किती उत्कट पाहिजे ? अर्थात प्राणापलीकडे उत्कट पाहिजे. देवाचे सख्यत्वासाठी कोणतीही अडचण आली तरी त्याची पर्वा करू नये. आपल्या प्राणासाठी कोणतेही मोल द्यावे लागले तरी ते देऊन त्याचे रक्षणार्थ आपण झटतो. तसाच देव हाच आपला प्राण वाटला पाहिजे. हेच खरे प्रेम. **देव म्हणिजे आपुला प्राण। प्राणासी न करावें निर्वाण। परम प्रीतीचें लक्षण। तें हें ऐसें असे।।** (दा. ४-८-१०) असे देवासी सख्य झाले की त्यालाही भक्ताची चिंता उत्पन्न होते व तो सर्व साहाय्यक होतो. समजा संकटात तो साहाय्यक झाला नाही, तरीही ह्याबद्दल विषाद न वाटता प्रेम कायम राहिले पाहिजे तर ते निष्काम, उत्कट व निर्व्याज प्रेम. या प्रेमाला कामनेचे व्याज नसते. **मेघ चातकावरी वोळेना। तरी चातक पालटेना। चंद्र वेळेसि उगवेना। तरी चकोर अनन्य।।** (दा. ४-८-१६)

मुख्य मुद्द्याचा प्रश्न हा येतो की देवाशी सख्यत्व असावे हे खरे, पण ते राखावे कसे ? ही मुख्य अडचण साधकाला येते. दिसणाऱ्या व्यक्तीशी सख्य होईल. न दिसणाऱ्या देवाशी सख्यत्व कसे करावे ? हा बिकट प्रश्न आहे. देव निराकार, हृदयस्थ, अलिप्त आहे अशी भावना करता येईल. पण



न दिसणाऱ्या देवाशी सख्यत्व ठेवावे कसे हा प्रश्न राहीलच. यातील वर्म समर्थ सांगतात. **आपण मिथ्या साच देव। देव भक्त अनन्यभाव। या वचनाचा अभिप्राव। अनुभवी जाणती।।** (दा. ४-९-२२) **जिभेवीण आत्मा न बोलें। परी त्याच्या सत्तेने ती जीभ हाले। शब्द शब्द जे निघाले। ते आत्मसत्तेने। आत्मा अबोलणा स्वये। परी तोचि बोलतो म्हणावा निश्चये। की त्यावाचून इंद्रिये। अवघी वृथा।।** (य. दी. ४-३०६,७)

वास्तविक आपण मी या स्वरूपाने कोणी निराळे आहो काय ? एक स्थूल, सूक्ष्म जड शरीर व त्यांना चेतना देणारे, हलवणारे दुसरे हृदयस्थ चैतन्य, या दोघा प्रकृती पुरूषाविना तिसरा अन्य पदार्थच नाही. एक अखंड चैतन्य व दुसरी अंगभूत शक्ती. या अखंड चैतन्यालाच, भक्त भगवान म्हणतात, ज्ञानी ब्रह्म म्हणतात व योगी परमात्मा म्हणतात. या एका वस्तूचाच सर्व कारभार. मग आता निराळा भक्त कोठून आणायचा ? देव तोचि भक्त व भक्त तोचि देव, ही वस्तुस्थिती नाही का ? सृष्टीतील सर्व हालचाल त्याच्याच सत्तेमुळे. **आहे ते सकळ, कृष्णासी अर्पण। नेणोनिया मन दुजे भावी।। ज्याचें त्या वंचलें आठव न होतां। दंड या निमित्ताकारणें हा।। तुका म्हणे काळें चेपियेला गळा। मी मी वेळोवेळा करीतसे।।** (गा. ३९७५) **त्या चैतन्याची चित्सत्ता। सर्व काळ आठवे चित्ता। तरीच बोलिजे अनन्यता। येरवी सर्व विफळ।।** (ना. भा. ९)

जे जे माझेसाठी करतो, ते ते वास्तविक देवासाठी आहे, माझ्यासाठी नाही अशी दृढ भावना पाहिजे. माझी आंघोळ तेच देवाचे स्नान, माझे भोजन तोच देवास नैवेद्य. माझे अच्छादन तेच देवाचे वस्त्र प्रावरण, माझी वस्ती तेच देवाचे घर. माझे बरेवाईट विचार तोच देवाशी संवाद, हाच व्यवहाराला अनुसरुन वेदान्त, यानेच देवाशी ऐक्य होते. सख्यत्व जडते व देव आपलासा होतो. **म्हणोनि सख्य देवासीं करावें। हितगुज तयाशीच सांगावें। आठवे भक्तीचें जाणावें। लक्षण ऐसें।।** (दा. ४-८-३१)

देव आपलासा होणे, म्हणजे आपला सर्व अहंकार किंवा मीपणा नाहीसा होऊन तोच एक सर्व असा वरचेवर विचाराने अनुभव घेणे. हीच राघवी वस्ती.

★ ★ ★

**मना सज्जना येक जीवीं धरावे।**
**जनीं आपुले हीत तुवां करावें।**
**रघूनायकावीण बोलों नको हो।**
**सदा मानसीं तो निजध्यास राहो ।।४३।।**

दीन भक्तांचा कैवारी श्रीराम त्याला तू आपलासा करून घे, हे मागील श्लोकात सांगितले. त्याला आपलासा का करून घ्यायचा हे या श्लोकात सांगतात. अरे मना, या जगात नरजन्माला येऊन परमार्थ प्राप्ती म्हणजेच आत्मप्रसाद, हेच हित साधावयाचे आहे, याचा तू विसर पडू देऊ नकोस. प्रतिक्षणी तू जागा राहा. तरच नरदेहाची सफलता. याच प्रकारचा उपदेश श्लोक २२ व २३ ह्यामध्ये आला आहे. साधकांनी तो पुन्हा अभ्यासावा व नंतर ह्या श्लोकातील शेवटच्या चरणाचा भावार्थ पाहावा. रघुनायकाशिवाय तुझ्यापुढे जाणण्याचा अन्य विषयच नको, सारखा त्याचाच ध्यास तुला असू दे. आत्मस्वरूपाचा साक्षात्कार होणेपूर्वी श्रवण, मनन व निदिध्यास या एकाहून एक श्रेष्ठ पायऱ्या साधकाला चढाव्या लागतात.

कोणत्याही गोष्टीचा एकदम ध्यास लागत नाही. ध्यास लागणेसाठी त्या वस्तूची चटक असावी लागते, ती चटक लागण्यासाठी, त्या वस्तूचे ज्ञान व्हावे लागते. पूर्णज्ञानासाठी त्या वस्तूचे साधक बाधक रीतीने चर्वितचर्वण करावे लागते व माहिती व्हावी लागते. म्हणून प्रथम श्रवण, नंतर मनन, नंतर निदिध्यास व शेवटी साक्षात्कार असा हा परमार्थाचा चढता सोपान आहे. **श्रवणापरीस मनन थोर। मननें कळे सारासार। निजध्यासें साक्षात्कार। नि:संग वस्तू।।** (दा. ११-१-४१)

**(१) श्रवण :-** परमार्थात श्रवण भक्तीला आद्य स्थान आहे. कारण श्रवण हे सर्वांचे मूळ आहे. मूल प्रथम ऐकते व मग बोलते, इतर व्यवहार करते. **श्रवणें आशंका फिटे। श्रवणें संशय तुटे। श्रवण होतां पालटे। पूर्वगुण आपुला।। श्रवणें आवरे मन। श्रवणें घडे समाधान । श्रवणें तुटे बंधन। देहबुद्धीचे।।** (दा. ७-८-५,६) श्रवणाने निरनिराळे विचार कळतात, ज्ञान वाढते, चित्त शुद्धी होते व सद्वस्तूचा निश्चय होतो.

सगळ्या वनस्पतींना जसे एकच जीवन, सर्व सृष्टी प्रकाशक जसा एक रवी, सर्वांच्या वस्तीचा आधार एकच पृथ्वी. तसे सर्व जाणिवेला एकच श्रवण आहे. **ऐकल्याविण कळेना। हें ठाऊकें आहे जना। या कारणें मूळ प्रेत्ना। श्रवण आधीं।।** (दा. ७-८-१९)



ग्रंथ वाचन हे श्रवणच होय. कानाचे द्वारे शब्द उमटले काय, दृष्टीचे द्वारे उमटले काय, ते श्रवणच. येथे एक मात्र जरूर लक्षात ठेवले पाहिजे की पारमार्थिक कल्याणाचे दृष्टीने काय ऐकावे व काय वाचावे याचाही विचार करावयास हवा. **तें वक्तृत्व त्यागावें। जे माईक स्वभावें। जेथें निश्चयाच्या नांवे। शून्याकार।।** (दा.७-९-३) माईक याचा अर्थ भ्रम उत्पन्न करणारे. **ग्रंथ बहुत असती। नाना विधानें फलश्रुती। जेणे नुपजे विरक्ती भक्ती। तो ग्रंथचि नव्हे।।** (दा. ७-९-३५) दुसऱ्याचे ऐकणे असो की स्वत:चे वाचन असो ते तत्वज्ञानासंबंधीच असावे.

**(२) मनन :-** श्रवण कितीही झाले तरी त्याचे मनन आवश्यक, तरच त्या श्रवणाचा उपयोग. श्रवणाचा विचार म्हणजे मनन. **या नाव जाणावे मनन। अर्थालागी सावधान।।** ऐकलेल्याचा अर्थ कळला, म्हणजे संशय निवारण होते, बुद्धीचा निश्चय होतो. बुद्धी निश्चित झाली की मनाचे चांचल्य संपते, आणि समाधान होते. **बोलिल्याचा अर्थ कळे। तरीच समाधान मिळे। अकस्मात अंतरीं वोळे। नि:संदेहता ।।** (दा. ७-८-४०)

**(३) निदिध्यास :-** श्रवण, मनन झाले तरी निश्चित झालेल्या वस्तूचे पुन्हा विस्मरण होऊ नये, ती दृढ राहावी म्हणून निदिध्यास - म्हणजे निश्चित झालेली गोष्ट पुन:पुन्हा स्मरण करून अंतरी जागती ठेवणे. श्रवण मननाने रघूराजाचे स्वरूप ऐकून, नित्यानित्य विचाराने ते निश्चित करावे. तोच आपला आत्मा असा निश्चय झाला की अखंड स्मरणाने ध्यास धरावा. म्हणजे मग त्या स्वरूपाचा-आत्मस्वरूपाचा साक्षात्कार होईल. **श्रवण मननाचा विचार। निजध्यासें साक्षात्कार। रोकडा मोक्षाचा उधार। बोलोंचि नये।।** (दा. १७-३-३) गुरू मुखाने महावाक्याचे अर्थाचा निश्चय म्हणजे श्रवण. श्रवण केलेला शास्त्रार्थ सत्य आहे हे युक्ति - प्रयुक्तीने स्वत:शी ठरवणे म्हणजे मनन. श्रवण, मननाने निश्चित झालेल्या ठिकाणी एकाग्रता म्हणजे निदिध्यास.

★ ★ ★

**मना रे जनीं मौन्य मुद्रा धरावी।**
**कथा आदरें राघवाची करावी।**
**नसे राम तें धाम सोडोनि द्यावें।**
**सुखालागि आरण्य सेवीत जावें।।४४।।**

या जगात जर तुला पारमार्थिक कल्याण साधावयाचे असेल तर

रघूनाथ स्वरूपाचा सारखा ध्यास ठेव, असे मागील श्लोकात सांगितले. पण जगात वावरत असताना अंतरंगात स्वरूप ध्यास राहणे अवघड आहे. यासाठी कोणत्या उपायांनी हा ध्यास अखंड राहील हे या श्लोकात व पुढील श्लोकात सांगतात. ते उपाय दोन (१) वाणीवर नियंत्रण (२) दुष्ट्संग त्याग. पहिला उपाय ह्या श्लोकात सांगतात.

मनुष्याचा बराच काल गप्पा मारण्यात, बडबड करण्यात जातो. म्हणून जीवनाला आवश्यक तेवढेच बोलावे, इतर वेळी मौन राखावे. पुष्कळ लोक मौनव्रत स्वीकारतात, पण त्यातले फारच थोडे ते काटेकोरपणे पाळतात. पुष्कळांना त्यातील वर्म समजत नसते. केवळ काही न बोलता मुखस्तंभ राहणे म्हणजे मौन नव्हे. कारण मुखाने काही बोलले नाही तरी संकल्प विकल्प रूपाने अंतरवाणीत बोलणे चालूच असते. मुखाने ते स्पष्ट होत नाही इतकेच. काही लोक मौन स्वीकारतात, पण पाटीवर आपला हेतू लिहून दाखवितात. हे पण खरे मौन नव्हे. कारण तोंडाने स्पष्ट होणारे शब्द हातांनी पाटीवर स्पष्ट झाले पण अंतरंगात पश्यंतीवाणीत उमटलेच. म्हणजे स्पष्ट वाणी जरी नाही तरी सूक्ष्म वाणी उपयोगात आलीच. मनात मनोराज्य करीत राहणे किंवा तोंड बंद ठेवून हातांनी शब्द लिहिणे ही मौन मुद्रा नव्हे. **येकांती मौन्य धरून बैसे। सावध पाहातां कैसें भासे। सोहं सोहं ऐसे। शब्द होती।।** (दा. १७-५-७) **ते शब्द सांडून बैसला। तो मौनी म्हणावा भला। योगाभ्यासाचा गल्बला। याकारणें।।** (दा. १७-५-९) अनेक शब्दावरून दोन शब्दावर वृत्ती स्थिर करायची. नंतर ह्या दोन-शब्दांचा अर्थ लक्षात घेऊन त्यावर वृत्ती स्थिर करून ते दोन्हीही शब्द सोडतो तो अनिर्वाच्य नि:शब्द म्हणावा, खरा मौनी हाच. अंतरंगात शब्दरूपाने मागचे कांही स्मरण नसावे व पुढचे चिंतन नसावे. शब्द सोडून अनिर्वाच्य ब्रह्मात वृत्ती राहणे हा भला नि:शब्द मौनी.

वाचेवर बंधन का ठेवायचे याला कारण आहे. त्यामागे शास्त्रीय तत्त्व आहे. वाचेची देवता अग्नी. जसजसे सरपण टाकावे तसतसा अग्नी प्रदीप्त होतो. जसजसे जास्त बोलावे किंवा वायफळ बडबडावे तसतसा वाचेतील अग्नी प्रदीप्त होतो, वाचा संयमाने वाढणारे आत्मिक तेज क्षीण होते. वाणीतून निघालेले किटाळ, कोणाला किती व कसे तापदायक होईल हा भाग निराळाच. म्हणून मौन हे परमार्थात महत्त्वाचे साधन आहे. **मौनं चैवास्मि गुह्यानाम्।** ज्ञानादि अनेक गुह्यातील मौन म्हणजे माझी विभूती आहे. **आता गुह्येही बहू फार। त्यात परेचे मौन गुह्य थोर। जेथुनि मनासह शब्द विकार।**



**घेऊनि वाचा मागे परतती ।।** (य. दी.) ज्ञानोबा मौनाचे श्रेष्ठत्व वर्णन करताना म्हणतात, **आघवियाचि गूढां। आंतु मौन तें मी सुहाडा। म्हणोनि न बोलतयां पुढां। स्रष्टाही नेण होय।।** (ज्ञा. १०-२९८) मौनी पुरूषापुढे सृष्टी-उत्पत्ती-कर्ता जो ब्रह्मदेव, तोही अज्ञानी ठरतो.

पण जेव्हा असे मौन धरणे अवघड वाटत असेल तेव्हा जीवनाला आवश्यक तेवढेच बोलावे. वायफळ बडबड न करता राघवाचे गुणगान गावे. **कळहो करील शब्द रे। अनंत तो नि:शब्द रे। तुम्ही अनंत का नव्हा। वेवादिता अवासवा।।** (स्फु. श्लोक) वाया बडबडीतून कलहच निर्माण होतो. पण कथेत रंगून गेल्यास ते मौनच ठरते. ज्या राघवाचे कीर्तन करावयाचे त्याचे वास्तवरूप अनंत, नि:शब्द असेच आहे. कथेत स्वत:चा विसर पडतो. एरवीचे बोलण्यातून वाचेतून अभिमान बाहेर पडतो. तो मग कोणाला कसा दुखवील सांगता येत नाही. **म्हणोनिया आळा जिव्हेसी घालावा। वाव मुळी न द्यावा अनर्थाला।।** हा अनर्थ टाळण्याला उत्तम उपाय म्हणजेच हरी कीर्तन. **भगवंतास कीर्तन प्रिये। कीर्तने समाधान होये। बहुत जनासी उपाय। हरी कीर्तने कलीयुगीं।।** (दा. ४-२-७) त्यातच पुढे म्हणतात **कीर्तने अव्यग्रता घडे। कीर्तने संदेह बुडे। श्रोतयांवक्तयांचा।।** (दा. ४-२-२९) जगाचे वाईट संस्कार आपणावर होऊ नयेत, पण आपले भक्तीप्रेमाचे संस्कार जगावर व्हावे.

पण ज्या स्थानात मंगल संस्कार नाहीत, जेथे राम नाम गाइले जात नाही, जेथे त्याचे भजनपूजन होत नाही, त्याच्या अस्तित्वाची जेथे जाणीव नाही. त्याचे संबंधी आदर नाही. अशा ठिकाणी क्षणभरही राहू नये, त्यापेक्षा वनवास पत्करला तरी चालेल. देवाबद्दल आदर नसलेल्या एखाद्या सुंदर स्थानापेक्षा निर्जन अरण्यही सुखाचे होईल. कारण तेथे एकांत मिळतो. एकांतात विवेक सुचतो. ध्यान धारणादि साधन जमते. लोकव्याप्त स्थानापेक्षा वनातील सृष्टीसौंदर्य भक्तीला पोषक असते. **वृक्ष वल्ली आम्हा सोयरी वनचरे। पक्षीही सुस्वरे आळविती।।** (तुकाराम) म्हणून समर्थ म्हणतात सुखालागि आरण्य सेवीत जावे.

★ ★ ★

**जयाचेनि संगे समाधान भंगे।**
**अहंता अकस्मात येऊनि लागे।**
**तये संगतीची जनीं कोण गोडी।**
**जिये संगतीने मती राम सोडी।।४५।।**

मागील श्लोकात मौनव्रताचे महत्त्व सांगितले. मौन व्रत, हरी कथा किंवा एकांतवास या तीन साधनांतच साधकाने का राहावे, याचे कारण ह्या श्लोकात सांगितले आहे.

बहुजन समाजात तमोगुणाचे प्राधान्य जास्त असलेली माणसे असतात. त्यामुळे चित्तचांचल्याला वाव मिळून समाधानवृत्ती भंग पावते. येथे समर्थांना कोणाची संगतच करू नये असे सांगायचे नसून, कोणाची संगत केली असता फायदा होतो हे दाखवायाचे आहे. ते म्हणतात - ज्यांच्या सहवासामुळे मनाची एकाग्रता नष्ट होऊन चित्ताचे समाधान भंग पावते अशांची संगती नको. ज्यांच्या सहवासाने समाधान वाढते अशांची संगत धरावी, **मना सर्वही संग सोडून द्यावा। अती आदरे सज्जनांचा धरावा॥** (म. श्लोक २०३)

ज्यांच्या संगतीमुळे चित्ताचे स्वास्थ्य नष्ट होते असे लोक कोण ? ते म्हणजे दुष्ट, दुर्जन, विशेषत: द्रव्य लोभी, स्त्रैण, नास्तिक किंवा असंत. अशांची संगत घातक, अध:पतन घडवणारी आहे. हा दुष्ट दुर्जन समजावा कसा ? दुष्ट आचार, दुष्ट विचार, दुर्बुद्धी व साहसप्रियता ही असंत लक्षणे होत. या लक्षणांनाच गीतेत आसुरी संपत्ती म्हटले आहे. तमोगुणाचे प्राबल्य, त्याला देवाचेही वावडे. देव त्याला धोंडा वाटतो. चुकूनही तो देवाचे नाव घेत नाही, संतांचा उपहास करतो, वेदशास्त्रे तो प्रमाण मानीत नाही. तो म्हणेल तेच खरे तात्त्विक गोष्टही त्याला पटत नाही. अशांचे संगतीत समाधान कसे लाभणार ? समाधान दूरच, पण कधी कधी आपलाच अहंकार फोफावतो. अशी एक शंका येणे स्वाभाविक की दुर्जन स्वत: दुष्ट असेल, पण त्याचे संगतीत सज्जन कसे बिघडतात ? त्यांचा अहंकार का वाढावा ? साधनामुळे साधकाचे अंत:करण सात्त्विक होत असते, स्वच्छ होत असते. स्वच्छ कापडावर एखादा डाग जसा उठून दिसतो, त्याप्रमाणे मलीन शब्दाने स्वच्छ अंत:करण लवकर पालटते. त्यामुळे असमाधान उत्पन्न होते. दुर्जनात असलेल्या लक्षणात सर्वात घातक असे कोणते लक्षण असेल तर ते वाचाळपणा. **घोकुनी अक्षरे। वाद छळणा करीत फिरे॥ मिठे वीण काय आळणी हे बोल। कोरडीच फोल घसघस॥** (तुकाराम) निष्कारण घातलेल्या वादामुळे साधकाचा चित्तक्षोभ होतो. त्याचे क्षणिक समाधान झाल्यास आपण मोठे ज्ञानी असा अहंभाव साधकाचे ठिकाणी उत्पन्न होतो. हा वाचाळ दुर्जन एक वेळ परवडला, कारण तो जे बडबडेल त्याला खरे आहे म्हणून मूक संमती दिली की वाद



थांबतो. पण परमार्थाला घातक असा कोणता सहवास असेल तर तो स्त्रीचा व स्त्रैण संगतीचा. **माझे विध्वंसोनि ध्यान। माझे प्राप्तीआड विघ्न। साधकांसी अतिबंधन। स्त्री आणि स्त्रैणसंगती॥** (ना. भा. १४-३६५) **इतर विषय आहाति। परी एकेक लोभविती। सर्वेंद्रियासि गोविती। ऐसे बळ नाही तया॥ स्त्री विषय जरी एकला। तरी सर्व इंद्रियासी चटावी भला। प्राणी एकदा वश झाला। की तो गेला रसातळी॥** (ना. भ. सूत्र ६३) म्हणून दुर्जन संगती ही हानिकारकच. कारण ह्या संगतीने आपलाही लाभ नाही व तोही सुधारत नाही. तुकाराम म्हणतात ''**म्हणवुनी संग न करिता भला। धरिता अबोला सर्व हीत॥**'' म्हणून साधकाने संगतीचे धोरण कसे ठेवावे याचा ऊहापोह समर्थ पुढील दोन चरणांत करतात.

ज्या संगतीने मनुष्य रामभक्तीपासून दुरावतो, आत्महितापासून भ्रष्ट होतो अशा संगतीत सुख कोणते ? म्हणून ज्या संगतीने राम भक्ती वाढेल, आत्महित साधेल अशीच संगती असावी. जशी संगत तसा मनावर संस्कार होत असतो. मनुष्याची दुष्ट वा सुष्ट स्वरूपाची घडण, त्याचे कल्याण अगर अकल्याण, त्याची सुगती अगर दुर्गती, त्याचे आत्महित अगर अनहित हे संगतीवर अवलंबून आहे. **संगें वाढे शीण। संगे वाढे भजन। त्रिविध हे जन बहू देवा॥** (तुकाराम)

सहवासावरून मनुष्याच्या चारित्र्याची कल्पना येते. संगतीचा मनावर होणारा प्रबल संस्कार ध्यानी घेऊनच समर्थ म्हणतात, ''**कदा वाजटाचा नको संग देवा। धिटा उद्धटामाजि पाषांड ठेवा। जेणे वृत्ती हे ढासळे साधकांची। त्यजा रे त्यजा संगती बाधकांची॥**'' नारद भक्ती सूत्रात '**दु:संग: सर्वथैवत्याज्य:**' असे म्हटले आहे. **कामक्रोधमोहस्मृतिभ्रंशबुद्धीनाशसर्वनाशकारणत्वात्॥** (ना. भ. सू. ४४) कुसंगतीच्या संस्कारामुळे काम, क्रोध, मोहादि षड्रिपू बळावतात. स्मृति भ्रंश होतो, बुद्धिनाश होतो व शेवटी सर्वनाश ठरलेला.

★ ★ ★

**मना जे घडी राघवेंवीण गेली।**
**जनीं आपुली ते तुवां हानि केली।**
**रघूनायकावीण तो शीण आहे।**
**जनी दक्ष तो लक्ष लावूनि पाहे॥४६॥**

रामभजनाने होणाऱ्या मनाच्या एकाग्रतेमुळे जे समाधान होते ते बिघडू नये म्हणून वाचाळ दुर्जनांची संगत नको. त्या संगतीमुळे रामाचे

अनुसंधान तुटते व त्यात सुखसमाधान नसते, असे मागील श्लोकात सांगितले. रामाच्या विस्मरणात जाणारा काळ ही नरदेहातील मोठी हानी आहे, असे या श्लोकात सांगतात.

हे मना, राघवाच्या चिंतनावाचून गेलेला काळ फुकट गेला. आयुष्याचा तितका नाश झाला असे समज. रामभजनात जरी काळ गेला नाही तरी प्रापंचिक कर्तव्यात जातोच. मग ती हानी का मानावी ? आपल्या विचारे ती हानी नसेल, पण सज्जनांचे विचारे ती मोठी हानी होय. याचे कारण संत व संसारी यांच्या विचारदृष्टीतच मुळात फरक आहे. संतांचा विवेक चिरंतन सुखाला अनुसरून, आत्मज्ञानाच्या बैठकीवरून होतो आणि संसारी मनुष्याचा विचार क्षणिक सुखावर दृष्टी ठेवून व्यावहारिक बैठकीवरून होतो. हा दोघांचे विचारात मोठा फरक आहे. या विषयासंबंधी संतांची विवेकदृष्टी काय आहे ते पाहू.

केवळ आयुष्याचे मोजमाप केल्यास परमार्थप्राप्तीसाठी वेळ किती थोडा उरतो हे सहज कळेल. भारतातील सरासरी आयुर्मान ६० वर्षांचे आहे. त्यातील २० वर्षे झोपेत जातात. एकतृतीयांश काल बालपणातील अज्ञानात जातो. साधारण १८ ते २० वर्षे वयाचा मनुष्य सज्ञान झाला असे मानतात. प्रपंचात पोटासाठी खटपट, रोगराई, उतारवय ह्यात १०-१५ वर्षे जातात. शेवटी शिल्लक राहतात ५-७ वर्षे. त्यातलाही बराच काल वायफळ गप्पात गेला तर परमार्थप्राप्तीला वेळ होणार केव्हा ? **जीवा जे जे योनी जन्मगती। तेथ तेथ विषयासक्ती। तेचि मनुष्यदेहीं विषयस्थिति। तैं परमार्थ प्राप्ती कोणे देहीं।।** (ना. भ. १७-५३२) मानवेतर कोणत्याही देहात विषयभोगावाचून अन्य काही नाही. मानव देहात जो काय थोडा काल उरला तोही विषयभोगात घालविला तर या जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटका केव्हा व्हायची ?

पण कोण म्हणेल की विषय सेवनात थोडे फार सुख आहे ना ? ते भोगायला मिळते ना ? पण त्यावर संतांचे म्हणणे असे आहे की विषयात वाटणारे क्षणिक सुखही विषयात नसून चित्तस्थैर्यात आहे. चित्त-शांती हे सुखाचे कारण आहे. ते आत्मसुखच आहे. विषयाशी तादात्म्य असलेमुळे ते सुख विषयापासून आहे असे भासते. एरवी विषय हे दु:खरूप आहेत, कारण विषय सुखात परिणाम दु:ख, ताप दु:ख, संस्कार दु:ख, गुणवृत्ति विरोध, ही असतात. म्हणून ते विषय दु:खरूपच आहेत. परिणाम दु:ख - इंद्रिय शैथिल्य, पश्चातापादि मानसिक प्रतिक्रिया, ताप दु:ख - आध्यात्मिक ताप,



रोगादिकांची उत्पत्ती, संस्कार दु:ख - म्हणजे जसजसे भोग होतात तसतसे संस्कार होऊन विषयाकडे अधिक हाव. जसजशी अधिक हाव तसतशी अधिक अशांती, गुणवृत्ती विरोध-विषय सात्विक असेल तर राजस, तामस वृत्तींचा विरोध. **ये हि संस्पर्शजाभोगा दु:खयोनय एव ते। आद्यंतवंत: कौंतेय न तेषु रमते बुध:।। म्हणोनि विषयभोगीं जे सुख। ते साद्यंतचि जाण दु:ख।।** (ज्ञा. ५-१२०) **पुढती जन्म पुढती मरण। हे विषयास्तव घडे जाण। संसाराचे सबळ पण। विषयाधीन उद्धवा।।** (ना. भा. २२-१६३) विषय भोग, नव्हे तर त्याची स्मृतीही घातक, कारण ती मनस्ताप उत्पन्न करते.

मायिक विषय दु:खरूप आहेत, आणि आत्माराम सुखस्वरूप आहे. **सांडून राम आनंद घन। ज्याचे मनीं विषय चिंतन। त्यासी कैंचैं समाधान। लोलंगतासी।।** (दा. ३-१०-६२) सुरवातील विषय गोड वाटतात. पण अंती ते तापदायक असतात, असा ज्याचा दृढ विचार असतो तो दक्ष. **गळ गिळितां सुख वाटे। वोढून घेतां घसा फाटे।।** (दा. ३-१०-६६) ही त्याला पूर्ण जाणीव असते. म्हणून विचारी साधक त्या राघवस्वरूपी मन एकाग्र करून आनंद लुटतो. **'सर्व परवशं दु:खं। सर्वं आत्मवशं सुखं।।' 'पर' म्हणिजे माया जाण। जो झाला तिचे आधीन। त्यासि सुखाचे न दिसे स्वप्न। दु:ख संपूर्ण सर्वदा।।** (ना. भ. ११-५६८) मोठमोठे राजे, ज्यांना सर्व ऐहिक सुखाची सुलभता, तेही आपल्या राज्यावर लाथ मारून वनांतरी गेले, ते का वेडे होते ? म्हणून ,ऐहिक सुख हे सुख या संज्ञेसच पात्र नाही.

जिवाला विषय पाहिजेत. पण त्यामागून येणारे दु:ख नको. दु:ख-रहित विषयांची सोय व्हावी ही सर्वांची आवड. पण हे असे कधीच घडत नाही, हा सर्वांचा अनुभव आहे. भोगामागे दु:ख ठेवलेलेच. संत सांगतात, दु:खाची आत्यंतिक निवृत्ती व निरतिशय आनंद ही आत्माराम राघवस्वरूपीच आहेत. म्हणून विवेकी सावध साधक सर्व आळस सोडून एकाग्रमनाने त्या आत्मस्वरूपातच रमतो. **तैसी विषयसुखाची गोडी। गोड वाटे परी ती कुडी। म्हणोनियां आवडी। रघूनाथीं धरावी।।** (दा. ३-१०-६७)

ज्याच्याकरिता जे कर्तव्य नियत आहे, ते न करता, इतर अनियत असे कितीही व कोणतेही कर्म केले तरी त्या क्रियेतील घडी रिकामीच गेली असे समजावे. मनुष्य देहाचे कर्तव्य राघवभक्ती हेच आहे. मज न भजता भरवसा सुखाचा कोण ? असे देव म्हणतात.

★ ★ ★

**मनीं लोचनीं श्रीहरी तोचि पाहे ।**
**जनीं जाणता भक्त होऊनि राहे ।**
**गुणीं प्रीति राखे क्रमूं साधनाचा ।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥४७॥**

यापूर्वीच्या चार श्लोकात मानव जीविताचे हितार्थ, रामस्वरूपाचा ध्यास अखंड कसा असावा, त्यासाठी मौनव्रताचे महत्त्व काय, दुर्जनसंग कसा टाळावा, प्रत्येक क्षण राघव चिंतनात कसा घालवावा, इ. विचार सांगितले. अशा साधनक्रमाने भक्ताची घडण कशी होते, त्याला धन्यत्व कसे प्राप्त होते, तो कृतार्थ असा रामाचा श्रेष्ठ दास कसा बनतो, हे या श्लोकापासून दहा श्लोकात सांगतात. **'जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा'** ह्या चरणाने शेवट होणाऱ्या दहा श्लोकांचा हा एक गट आहे. गीतेत दुसऱ्या अध्यायात **'स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव'** 'या अर्जुनप्रश्नाचे निमित्ताने स्थित-प्रज्ञाची लक्षणे सांगितली. तशीच येथे रामदास - कृतार्थ रामदासाची लक्षणे सांगतात. त्याचे देवासंबंधी वागणे कसे असते हे या श्लोकात सांगितले आहे.

**'मनी लोचनी श्रीहरी तोचि पाहे'** या चरणातील श्रीहरी हा शब्द अत्यंत मार्मिक आहे. अंतरात्मा तोच हरी, तोच राम. एका अनाम्याचीच सहस्र नावे. या आत्मारामालाच हरी का म्हणतात ? **सकळ पातका संहारी । या लागी बोलिजे नामे हरी । पुण्य पाप तिळ भरी । आत्मसाक्षात्कारी उरेना ।** याचे साक्षात्काराने शुद्ध पुण्य पदरी पडते. म्हणजे आत्मरूप प्राप्त होते. ज्याच्या मनाला म्हणजे अंतरदृष्टीला व लोचनी म्हणजे बाह्यदृष्टीला हरीशिवाय काही दिसतच नाही. तो धन्य होय. डोळे मिटले तर तो हरीरूप होतो. डोळे उघडले तर सर्व सृष्टी त्याला हरीरूप दिसते. **जिकडे पाहे तिकडे हरी । हरीविण दुजे नाही ॥** या अनुभवात तो मग्न असतो. त्याला अन्वय व व्यतिरेक दोन्ही प्रकारचे ज्ञान असते. ध्यानात मायोपाधिरहित शुद्ध आत्मरूपाशी अनन्य होणे हे व्यतिरेक ज्ञान, तेच आत्मरूप उपाधीने नटलेले विश्वात पाहाणे हे अन्वय ज्ञान. **व्यतिरेके आत्मा समजोनी । अन्वये ब्रह्मचि सर्वउमजोनी । भास म्हणावा माया म्हणोनी । ते भक्त भगवद्रुपे पाहाती ॥** (य. दी. ९-४२४) रूपे नसताना ती दिसणे ही त्या सगुण ब्रह्माची अघटित घटना पटुत्वशैली. हा ऐश्वरयोग, हे ज्ञान त्याला असते. बुद्धीने सोने काय ते समजले. डोळ्याने दागिना तो सोन्याचाच हे उमजले म्हणजे त्यात त्याज्यांश तो कोणता ? कोणताच नाही. सर्वच सोने. याप्रमाणे हा भक्त सर्वच हरीरूप पाहातो. असा हा ज्ञानी



असूनही **जनी जाणता भक्त ......** जगात वागताना तो आपण कोणी एक सिद्ध पुरूष आहो, या अहंकाराने वावरत नाही. आपण हरिभक्त आहो या नम्र भावनेने तो वागतो. म्हणजे ज्ञान असूनही सेवक भावनेत वागून ज्ञानोत्तर भजन चालू ठेवतो. **माझा राम अवघाची आपण । दुसरे नाही त्याचीच आण । हे स्थिती न मोडता स्वामी सेवक पण । दिधले ऐसा उदार ॥** आपण आत्मरूप हे ज्ञान तर असायचेच, पण देह उपाधीमुळे आपणाला नाव, रूप, पदवी, नातेगोते आहे, तर भक्त हे नाते राहिले तर बिघडते कोठे ? याप्रमाणे ब्रह्म होऊन **देह दृष्ट्यातुदासोऽहं** ह्या नात्याने तो भक्त किंवा सेवक या नात्याने वागतो.

गुणी प्रीति राखे - राखे म्हणजे रक्षण करतो, मुद्दाम ठेवतो. जे पूर्वी असेल त्याचेच रक्षण शक्य. पण जे नाहीच, त्याचे रक्षण काय करणार ? समर्थ याचे उत्तरही देतात. सगुण प्रीति राखे आणि साधनी क्रमू राखे. ज्ञानोत्तर सगुण भजन व साधन चालू ठेवतो. **यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानव:। आत्मन्येवच संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ॥** (भ. गी. ३-१७) जो आत्मतृप्त असतो, त्याला शास्त्रविहित कर्तव्य नसते. या दृष्टीने ह्या भक्ताला सगुण भजन किंवा साधनाची आवश्यकता नसते. पण हे दोन्ही राखतो, चालू ठेवतो, कारण (१) ज्या षड्गुणैश्वर्य सगुण भगवंताचे भजनामुळे त्याला आत्मज्ञान झाले, ते सोडणे म्हणजे कृतघ्नपणा होय. (२) एकदा इंद्रियांना वळण पडलेमुळे तो भजन व साधन सोडू म्हणेल तरी सुटत नाही. (३) लोकसंग्रहार्थ त्याची आवश्यकता असते. कारण ज्ञानीच जर वाटेल तसा अशास्त्रीय वागू लागेल तर अज्ञानी जनांना मार्गदर्शन कोण करणार ? **आचार उपासना सोडित । ते भ्रष्ट अभक्त दिसती । जळो तयांची महंती कोण पुसे ॥** (दा. ५-२-५६) **ज्ञानविवेकें मिथ्या जालें । परंतु अवघें नाहीं टाकिलें । तरी मग भजनेंचि काय केले । सांग बापा ॥** (दा. ६-७-१८) सिद्धपणाच्या घमेंडीत जो साधन सोडतो तो बद्धच. **साधन न मने ज्याला। तो सिद्धपणें बद्धचि जाला ॥** (दा. ५-६-७३)

आता साधनक्रम कोणता ते पाहू. समर्थ म्हणतात. **उपासनामूर्तीध्यानीं । अथवा आत्मानुसंधानी । नाहींतरी श्रवण मननीं । निरंतर ॥** (दा. १४-७-१६) या चत्वार साधनमार्गातच त्याचा काळ जातो. ज्याला अंतर्बाह्य हरिदर्शन घडते, जो ज्ञानी असून भक्त कोटीत राहातो, जो ज्ञानोत्तरही सगुण प्रेमतंतूना न तोडता, सिद्धपण न मिरविता, साधक स्थितीत

राहून साधनमार्ग चालू ठेवतो तो जगी धन्य होय. सर्वोत्तम जो श्रीराम त्याचा हा दास धन्य होय. **सर्वामध्ये जो उत्तम। त्या नाव सर्वोत्तम।।** तो सत् आहे म्हणून त्याला कालमर्यादा नाही. चित्-ज्ञानरूप आहे, सर्वात्मा आहे. प्रत्येक पदार्थाचे स्फुरण हे त्याचे स्वरूप. म्हणून तो वस्तु परिच्छिन्न नाही. तो सुखरूप आनंदघन आहे. स्थल, काल मर्यादारहित सच्चिदानंद स्वरूप या लक्षणांनी युक्त असे अन्य कोणी नसल्यामुळे हा सवोत्तम आहे.

अशा रामाचा जो दास तो धन्य होय. कारण त्याने पाप, पुण्य जिंकले. शुद्ध पुण्य जोडिले. ईशकृपा संपादिली. इतकेच नव्हे तर स्वत: नराचा नारायण होऊन ज्याने स्वपर उद्धार केला असा हा भक्त धन्य होय.

★ ★ ★

**सदा देव काजीं झिजे देह ज्याचा।**
**सदा रामनामें वदे नित्य वाचा।**
**स्वधर्मेचि चाले सदा उत्तमाचा।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।४८।।**

धन्य अशा दासाला स्वत:त व विश्वात एक हरिरूपच अनुभवाला येते. तसेच तो ज्ञानी असूनही सगुणावर त्याचे प्रेम असते व तो आपल्या साधन मार्गात निमग्न असतो, असे त्याच्या अंतर्बाह्य भक्तीचे स्वरूप मागील श्लोकात सांगितले. या श्लोकात त्याचा नित्यक्रम सांगितला आहे.

समर्थ म्हणतात की त्याला ७ वी भक्ती घडते, म्हणजे दास्य भक्ती घडते. देवाची सेवा करण्यात, दास होण्यात त्याला प्रेम वाटते. कायमच्या स्वरूपाची देवार्चनादिकाची संपूर्ण सोय होईल असे मंदिर बांधावे, पुष्पवाटिका लावाव्यात, साधकांचे अभ्यासासाठी ओवऱ्या बांधाव्यात, भोजनशाळा असाव्यात, जयंत्या, पर्वे, महोत्सव थाटाने करावेत, भंगलेल्या देवालयाचा जीर्णोद्धार करावा, आणि हे सर्व करण्यात, तेथे पडेल ते हलकेसलके कामही नम्र होऊन करावे असे त्याला वाटते. शिवाजी राजे सज्जनगडावर झाडलोट करण्यात आनंद मानीत. जगाचा जो मालक, जो पालक त्याची सेवा करण्यात लाज कसली, असे त्याला वाटते. मंदिरातील मूर्ती हे प्रत्यक्ष जागृत दैवत तेथे वास करते अशी त्याची गाढ निष्ठा असते. **पडिलें कार्य तितुके करावें। चढते वाढतें वाढवावे। भजन देवाचें।।** ही त्याचे ठिकाणी हौस असते. ही झाली मंदिरातील देवाची भक्ती. परंतु या दासाला अंतर्बाह्य हरिरूप दिसत



असल्यामुळे केवळ मंदिरातील देवतेचेच तो दास्य करीत नाही. तर जनतेत असलेल्या जनार्दनाचेही तो दास्य करतो. समर्थ म्हणतात, **''देहावेगळी पूजा पावेना। देहाविण पूजा फावेना। जनीं जनार्दन म्हणोनी जना। संतुष्ट करावें।।''** (दा. १८-४-३५) व्यापक निराकार देवाला देहाशिवाय पूजा स्वीकारता येत नाही आणि भक्ताला देहाविना पूजा घडत नाही, अशी स्थिती आहे. मग प्रतिष्ठापना केलेल्या मंदिरातील स्थिर देवाची जर सेवा निष्ठेने करावयाची तर देहरूपी देवळातील चालत्या बोलत्या चैतन्य देवाचा अधिक सन्मान करायला नको का ? **सकळांचे करावें पारपत्य। आल्यांचे करावें आतिथ्य। ऐसीहे जाणावी सत्य। सातवी भक्ती।।** (दा. ४-७-२५) दास्यभक्तीचे हे खरे वर्म आहे. या धन्यदासाची भक्ती केवळ मंदिरातील मूर्तीपुरती मर्यादित नसते तर ती विश्व व्यापक असते. यावर एक शंका अशी येईल की एखादा मंदिराचा मालक किंवा पुजारी वरीलप्रमाणे दास्य भक्ती करू शकेल. पण अशी सोय नसेल तेथे काय करावे ? समर्थ म्हणतात, प्रत्यक्ष न घडे तरी मानसपूजा करावी. मनाने देवाचे दास्यत्व पत्करून आपण आपल्या देवतेचे पुजारी या भावनेने वरीलप्रमाणे पूजा करावी. बाह्य पूजेत मन इकडे तिकडे वावरते, पण मानसपूजेत ते लगेच एकाग्र होते, व ईश्वरप्रसाद लवकर होतो. शिवाय मानसपूजेत कशाचीच वाण नसते. पाहिजे ते मनाने कल्पिता येते. बडोद्याचे बाळा महाराज मानस - पूजेत जे अत्तर लावीत त्याचा सुगंध बाहेर सुटे. अशी ही श्रेष्ठ पूजा आहे. देवाला भक्ताचे प्रेम पाहिजे, बाह्योपचार नको. संत म्हणतात, **मानसपूजा करिता जाण। एकाग्र होते मन। संतुष्ट होतो नारायण। हृदयासनी पूजिता ।।** (वि. सागर अ. ९)

हा भक्त दास्यभक्ती करतो तशीच तो स्मरणभक्तीही करतो. ही भक्ती फार उपकारक असून ती अखंड होऊ शकते. समर्थ म्हणतात, **''नामे होय चित्तशुद्धी। नामे तुटे देहबुद्धी। नामे होय कार्यसिद्धी। निजध्यासे।। नामे स्वहित फावे। नामे निश्चयी दृढावे। नामस्मरणे शीघ्रचि पावे। देवाधिदेवो।। ऐसे हे रामनाम। परम गुह्य विश्राम धाम। मंथूनि काढिले वर्म। शतकोटीचे।।''**

या साधनात एका गोष्टीची खबरदारी घ्यावी लागते. **नाम स्मरावे। मनी रूप आठवावे।।** नाहीतर 'माळ फिरते हातात व मन फिरते बाजारात' अशी स्थिती. मग फल काय पदरात पडणार ? परंतु हा भक्त, एकाग्र मनानेच स्मरणभक्ती करतो. कारण जे उचित तेच तो करतो.

या दोन भक्तीसाधनांप्रमाणे वर्णाश्रम धर्माचेही तो पालन करतो.

अनुचित असे कोणतेच कार्य करीत नाही. उचित तेच करणेचे त्याला वळण असते. काही साधक, देवकार्यार्थ झिजतात व नामस्मरणही करितात. पण त्यांचे वर्णविहीत कर्माकडे लक्ष नसते. आपण नामस्मरण करितो ना ? मग आता दुसरे काही कर्तव्य नाही. जानवे, संध्यावंदनादि करणेची जरूरी काय ? असे त्यांना वाटते. खरोखर नामस्मरणात, ते नामीशी एकरूप किंवा अनन्य होऊन अखंड राहात असतील तर विहीत कर्म न झाले तरी चालेल. स्वरूपाशी अनन्य होऊन राहणे हाच श्रेष्ठ धर्म होय. समर्थ म्हणतात, **''सकळ धर्मामध्ये धर्म। स्वरूपी राहणे हा स्वधर्म।।''** पण हे अखंड अनन्यत्व जोपर्यंत साधत नाही, तोपर्यंत चित्तशुद्धी करणाऱ्या स्वधर्माकडे दुर्लक्ष करून कसे चालेल ? एखाद्या राजाचा सेवक जर असे म्हणेल की राजेसाहेब मी आपले नाव घेत आपल्याजवळ सारखा बसतो, तर हे म्हणणे राजा मान्य करील काय ? तो म्हणेल माझे स्मरण ठेव पण ज्यासाठी तुझी नेमणूक, ते तुला निवृत्त होईपर्यंत केलेच पाहिजे. आपल्या कामाकडे दुर्लक्ष करून माझे केवळ स्मरण करून कसे चालेल ? तसेच येथेही आहे. भगवान म्हणतात, समाजस्वास्थ्य व मानवाचे हित लक्षात घेऊन मी वर्णव्यवस्था केली; ती पाळण्यातच मानवाचे हित आहे व त्यातच माझा संतोष आहे. **यतः प्रवृत्तिर्भूतांना। स्वकर्मणा तमभ्यर्च।।** (गी. १८-४६) **अगा जया जे विहित। ते ईश्वराचे मनोगत। म्हणौनि केलिया निभ्रांत। सांपडेचि तो।।** (ज्ञा. १८-९११)

ज्याला जे उचित कर्म सांगितले ते त्याने करावे असे ईश्वराचे मनोगत आहे. ते कर्म केले म्हणजे वैराग्य प्राप्त होऊन निःसंशय ईश्वरप्राप्ती होते. हा भगवंताचा उपदेश लक्षात घेऊन हा धन्य भक्त स्वरूपी अनन्य तरी होतो किंवा स्वधर्माचे पालन करून उचित असे वागतो. जो अखंड देवसेवेत राहतो, जो सतत भगवंताचे स्मरण ठेवितो, जो आत्मस्वरूपी अनन्य होऊन, किंवा विहित कर्म करून स्वधर्मपालन करितो, तोच सच्चिदानंद लक्षणांनी युक्त अशा मर्यादापुरूषोत्तम रामप्रभूचा दास धन्य होय.

★ ★ ★

**सदा बोलण्यासारिखे चालताहे ।**
**अनेकीं सदा एक देवासि पाहे ।**
**सगूणीं भजे लेश नाही भ्रमाचा ।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। ४९।।**



हा धन्यदास समाजात चालतो कसा, बोलतो कसा याचा व्यवहार कसा असतो हे या श्लोकात समर्थ सांगतात.

सदा बोलण्यासारिखे चालताहे, या गुणाबद्दल समर्थांनी दासबोधात व अन्य ठिकाणी पुष्कळ सांगितले आहे. हा गुण जसा परमार्थाला तसाच तो समाजस्वास्थ्यालाही उपयुक्त आहे, उपकारक आहे. समाजात तंटे, बखेडे, अस्वास्थ्य का उत्पन्न होते ? याचे उत्तर असे आहे की माणसे जसे बोलतात तसे वागत नाहीत. ती जर बोलल्याप्रमाणे वागू लागली तर पुष्कळ व्यवहार सुरळीत चालतील. देशात सभ्यता नांदेल व दिवाणी कचेऱ्यांचे काम पुष्कळ कमी होईल. जो बोलल्याप्रमाणे वागत नाही त्याला थापेबाज, खोटा असे व्यवहारात म्हणतात.

परमार्थात तर बोलण्यासारखे फार काही नाहीच. **'गुरोस्तु मौनं व्याख्यानं'** असे आहे. आवश्यकता जर कशाची असेल तर ती कृतीची, साधनांची. पुष्कळ तत्त्वज्ञान बोलले, पण ते कृतीने जर अनुभवाला येत नसेल, जीवनात उतरत नसेल, तर पदरात काय पडणार ? काही नाही. शून्य. **बोले ब्रह्मज्ञान। परि तो कोरडा पाषाण।** निरनिराळ्या पक्वान्नांचे कितीही गोड वर्णन केले. पण जर ती तयार करून त्यांची चव घेणेचे कार्य केले नाही, तर तृप्ती, समाधान कसे व्हावे ? **बोलाचीच कढी बोलाचाचि भात। सेऊनिया तृप्त कोण झाला।।** खरे पाहता आधी कृती व मग भाषा असे पाहिजे. थोडे ज्ञान कमी असले तरी चालेल पण मनुष्याने साधनात असावे. अशानेच चित्तशुद्धीद्वारा ज्ञान उमटते, समाधान होते व शब्दाला महत्त्व येते. **जैसें बोलणे बोलावें।। तैसेंचि चालणें चालावें। मग महंतलीळा स्वभावें। आंगी बाणे।।** (दा. १२-९-२३) पण जगातील कारभार याचेविरूद्ध चालू असतो. लोक निरीक्षक समर्थ म्हणतात, **''सांगोचि जाणती सर्वे। कर्ता कोणी असेचिना। जाणते नेणते सांगो। स्वभावो लागला जनी।। करंटे मिळाले सर्वे। जो तो बुद्धीच सांगतो। सांगावे ते आपणाला। आपण करिता बरे।।''** मंत्री, पुढारी, देशभक्त बोलतात पुष्कळ, पण देशहित कोणीच करीत नाही. प्रवचने, निरूपणे धडाक्याने चालतात, पण कृतीने जीवनात परमार्थ उतरला असे फार थोडे. म्हणून समर्थ म्हणतात, **''बोलोनिया मुखे तैसी क्रिया करी। धन्य तो संसारी ब्रह्मज्ञानी।।''** प्रापंचिक असो व परमार्थी असो जी बोले तैसा चाले तो धन्य होय. तुकाराम म्हणतात **''बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले।''** केवळ शाब्दिक बडबडीला परमार्थात महत्त्व नाही. ते सज्जनांना मान्यही नाही. **ब्रह्मज्ञानी भला वर्तणूके**

**पाशी। कोरड्या शब्दासी कोण पुसे।।** म्हणून समर्थ म्हणतात, ''**सदा बोलण्यासारखे चालताहे।।**''

दुसऱ्या चरणात, पिंड व ब्रह्मांड हा त्या एका परमात्म्याचाच विस्तार आहे. ह्या अर्थी त्यांनी **अनेकी सदा एक देवासि पाहे** हा चरण घातला आहे. विविध रूपाने नटलेल्या या सृष्टीत प्रत्येक वस्तूत त्याला आत्माराम दिसतो. मग बोलणे एक, चालणे भलतेच असे ठेवून फसवायचे कोणाला ? तसे करणे म्हणजे आपणच स्वत:स फसविल्यासारखे होय. बोलण्यासारखे न चालणाऱ्यांचे मनात द्वैत असते. मी तू पण असते, ईषणा असते. हा धन्य दास, अनुभवी ज्ञानी असल्यामुळे, ईश्वर व विश्व यासंबंधी त्याचा ठाम निश्चय असतो. **देव सदोदित संचला। लोकीं बहुविध केला। परंतु बहुविध झाला। हें तों घडेना।।** (दा. ९-३-३१) **तो येकलाचि सकळां घटीं। करी भिन्नभिन्न राहाटी। सकळ सृष्टीची गोष्टी। किती म्हणोनी सांगावी।।** (दा. ११-८-४) **इतुके ठांई पुरवला। अनेकीं येकचि वर्तला।।** (दा. ११-८-२१) त्या एका देवाच्या अधिष्ठानावर सर्व जगत चालते, पण तो स्वत: सर्वाहून अलिप्तच. **एवं जगदीश तो वेगळा। जग निर्माण त्याची कळा। तो सर्वांमध्ये परी निराळा। असोन सर्वी।।** (दा. ८-१-४१)

याप्रमाणे देव हा व्यापक, निर्गुण, निराकार, अलिप्त आहे, असे ज्ञान असूनही **निर्गुण ब्रह्म वेगळे। अवघे भ्रमरूप।। मी तूं हा भ्रम। उपासना हाही भ्रम। ईश्वरभाव हाही भ्रम। निश्चयेंसी।।** (दा. १०-६-११) हे जाणूनही शरीर आहे तोवर सगुण साकार देवाचे भजन तो करतो. निर्गुणाचे ज्ञान आणि सगुणाचे भजन, ध्यान हा त्याचा बाणा असतो. १०० नंबरी सोने आहे असे ज्ञान झाल्यावर ते दागिन्याचे रूपात वापरले म्हणून बिघडले कोठे ? त्या दागिन्याला सुवास असेल तर दुधात साखर. त्याप्रमाणे निर्गुणच मायेचा आश्रय करून सगुण बनले व त्याला आकाराचा वास लागला तर बिघडले कोठे ? तत्त्वाला तरी बाध कोठे येतो ? सोन्याची लगड गळ्यात बांधणेपेक्षा त्याचा दागिनाच शोभा आणित नाही का ? सुख देत नाही का ? म्हणून नि:संदेहवृत्तीने भ्रमरहित असे या दासाचे सगुण भजन चालू असते. कारण निर्गुण तेच सगुणात उतरले आहे, याची त्याला खात्री असते. कोणत्याही रूपात आत्मपूजाच होते, हा अनुभव असल्यावर भ्रमाला जागा कोठे ?

वेदात परमात्मस्वरूपाचा उभयरूपाने निर्देश आहे. **द्वेवाव ब्रह्मणोरूपे मूर्तंच अमूर्तंच।।** (ब्रह्म. उ. ३) एक मूर्त स्वरूप व एक अमूर्त स्वरूप, म्हणूनच



साकार व निराकार, सगुण व निर्गुण, अशी ब्रह्माची दोन रूपे आहेत. म्हणूनच श्रीकृष्णांनी सगुणोपासक व निर्गुणोपासक असे दोन प्रकार सांगितले. ज्ञानेश्वर माऊली म्हणते, ''**तुज सगुण म्हणू की निर्गुण रे। सगुण निर्गुण एक गोविंदु रे।।**'' भ. गीतेतील चौथ्या अध्यायातील ६ वा श्लोक - **अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामिश्वरोऽपि सन्।।** या श्लोकावरील भाष्यात ज्ञानेश्वर म्हणतात, - ''**तैसा अमूर्तचि मी किरीटी। परी प्रकृती जैं अधिष्ठी। तैं साकारपणे नटें नटीं। कार्यालागीं।।**'' (ज्ञा. ४-४८)

परमात्मा साकार झाला तरी त्याचे निराकारित्व बाधित होत नाही. नाथ म्हणतात, ''**निर्गुणापरिस सगूण न्यून। म्हणे तो केवळ मूर्ख जाण।। तुकाराम म्हणतात, अव्यक्त हे आकारले। रूपा आले गुणवंत।।**''

वेद व संत यांचेवर गाढ निष्ठा असलेमुळे व त्यांनी प्रतिपादिलेल्या अशा परमात्मस्वरूपाचा अनुभव असल्यामुळे भ्रमनिरास होऊन 'सगुणी भजे लेश नाही भ्रमाचा' ह्या समर्थ उक्तीप्रमाणे तो असतो. मग बोलण्यासारखा चालणारा. सर्वत्र आत्मदर्शन घेणारा, निर्गुण ज्ञान असून सगुणी भजन राखणारा सच्चिदानंदस्वरूप रामभक्त धन्य नाही काय ?

★ ★ ★

**नसे अंतरीं कामकारी विकारी।**
**उदासीन जो तापसी ब्रह्मचारी।**
**निवाला मनीं लेश नाहीं तमाचा।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा।। ५०।।**

मागील श्लोकात या धन्य दासाचा लोकव्यवहार व जगाकडे पाहण्याची दृष्टी याचे वर्णन केले. या श्लोकात त्याच्या अंतरंगाचे वर्णन आहे.

त्याचे अंत:करणात काम किंवा त्यापासून उत्पन्न होणारे विकार नसतात. अंत:करणातील रागादि मलिन विकारांचे मूळ म्हणजे काम. काम म्हणजे विषयाभिलाष, विषयवासना, इच्छा नसताही बलात्काराने अहंकाराचा आश्रय करून विषय भोगविणारा व पापास प्रवृत्त करणारा तो हा काम. त्याचेच पायी वैराग्य, भक्ती, श्रद्धा इत्यादि परमार्थाला पोषक अशा सात्त्विक वृत्तीचा ऱ्हास होतो. म्हणून ज्ञानोबांनी **ज्ञाननिधीचे भुजंग। भजन मार्गीचे मांग।।** असे - भयानक वर्णन केले आहे. परंतु असा हा जबरदस्त कामही या दासाचे चित्तात विकार उत्पन्न करू शकत नाही, कारण ज्या चित्तात विकार वृत्ती

नादांवयाच्या तेच मुळी स्वरूपाकार झालेले असते. **स्वरूपीं भरतां कल्पना। तेथें कैंचीं उरेल कामना। म्हणोनियां साधुजना। कामचि नाहीं॥** (दा. ८-९-२४)

शरीर रक्षणार्थ आवश्यक असे जे काही आहारादि विषय प्रारब्धानुसार पुढे येतील, त्याबद्दलही त्याला सुखदु:ख नसते. हे मला असावे, हे नसावे, असा त्याचा आग्रह नसतो. कारण आपण शरीरापासून वेगळे आहो ही त्याला जाणीव असते. म्हणूनच तो उदासीन म्हणजेच निरूपाधिक स्थितीत, गुणातीत असा साक्षीपणे वावरतो. **उदासीनवदासीनो गुणैर्यो न विचाल्यते। गुणा वर्तन्ते इत्येव योऽवतिष्ठति नेङ्गते ॥** (भ. गी. १४-२३) उदासीन ह्या शब्दाचे अर्थ दोन. उदास व निरूत्साही. **उदासीन हे वृत्ती कोठे न लागे॥** येथे उदासीन म्हणजे दीपाप्रमाणे **तटस्थ,** निरूपाधिक हा अर्थच योग्य. **उदासीन वृत्ती कोठे गुंडाळेना। उपाधी जडेना बाह्यत्कारी॥** सुखदु:ख अवस्थारहित स्थिती, शरीर व इंद्रिये यांच्या आकाराने परिणत झालेले गुण विषयाकार गुणात प्रवृत्त होतात, खेळतात. कूटस्थ आत्मा प्रवृत्त होत नाही असे समजून आत्मस्वरूपात रमणारा असा हा उदासीन असतो. **स्थिति बाणतां स्वरूपाची। चिंता सोडिली देहाची। याकारणें होणाराची। चिंता नसे॥** (दा. ८-९-४९) असा हा देहभोगाबद्दल उदासीन असला तरी आळशी नसतो. देह योग्य कार्यार्थच झिजवतो. तो तापसी असतो. उपासतापास, शीतोष्ण सहन करणे इत्यादिकांना तप म्हणतात. पण केवळ शरीर क्लेश म्हणजे तप नव्हे. खरे तप म्हणजे श्रवण, मनन, अभ्यास इत्यादिकांनी ब्रह्मप्राप्तीसाठी झगडत राहणे, आत्मप्राप्तीसाठी शरीर, इंद्रिये, प्राण झिजवणे, हेच खरे तप. **तैसा स्वरूपाचिया प्रसरा - । लागों प्राणेंद्रियशरीरां। आटणी करणें जेंवीरा। तेंचि तप॥** (ज्ञा. १६-१०८)

हा दास जसा तापसी तसा तो नैष्ठिक ब्रह्मचारी असतो. व्यवहारात काय किंवा परमार्थात काय, ब्रह्मचर्यव्रतपालन हे साधेसुधे व्रत नाही. ते कष्टाचे तसेच प्रभावी असे श्रेष्ठ व्रत आहे. कष्टाचे का ? कारण त्यात बरेच निर्बंध आहेत. त्याने पादत्राणे वापरावयाची नाहीत. शक्य तो थंड पाण्याने स्नान करावयाचे, कामोद्दीपक आहार व विहार हा त्याला वर्ज्य. केस वाढवावयाचे, छान छोकीला फाटा, स्त्रियांशी कोणत्याही प्रकारे संपर्क टाळायचा, स्त्रियांचे ठिकाणी एक मातृभावच ठेवायचा, गुरूजनांचे आज्ञेत राहावयाचे. **जन्मतेनि प्रसंगें। स्त्रीदेह शिवणें आंगें। तेथूनि जन्म आघवें। सोंविळें कीजे॥** (ज्ञा. १७-२११) फक्त जन्माचे वेळी स्त्रीदेहाला स्पर्श. या सर्व गोष्टी



हल्लीचे रहाटीचे दृष्टीने अतिकष्टमयच नाहीत काय ? पण सर्वोत्कृष्ट फल हवे असेल तर अतिकष्ट केलेच पाहिजेत. **चणे खावे लोखंडाचे। तरी ब्रह्मपदी नाचे।** या व्रताचे फलही तसेच सर्वोत्कृष्ट आहे. कारण एक ब्रह्मचर्यव्रत - पालन झाले तर परमार्थाला पोषक अशा **स्वस्ति, श्रद्धा, मेधा, बल, आयुरारोग्य** इत्यादि प्राप्त होऊन मनुष्य तेजस्वी बनतो. रेतोधोरण हेच जीवन होय. एक वेळचे वीर्य पतन म्हणजे एक शेर रक्ताचा नाश. रेताचा एक थेंब म्हणजे रक्ताचे चाळीस थेंब होत. स्त्रीने १६ वर्षेपर्यंत व पुरूषाने २५ वर्षेपर्यंत हे व्रत पालन केले तर सर्व शरीरधातू पुष्ट होतात. शमीक ऋषीपुत्र परिक्षिती राजास 'तू सात दिवसांत साप चावून मरशील' असा शाप देतात काय व तो खरा होतो काय ? हा सारा अमोघवीर्याचा प्रभाव आहे. अशा ह्या अंतर्बाह्य शुद्ध असलेल्या दासाच्या मनात तमाचा लेशही उरत नाही.

तम म्हणजे अज्ञान. **तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनाम्।** (भ. गी. १४-८) सर्व देहांना मोह पाडणारा, अविवेकी करणारा हा तमोगुण अज्ञानापासून उत्पन्न होतो. **ज्ञानमावृत्य तु तम: प्रमादे संजयत्युत॥** हाच ज्ञानाला, विवेकाला आच्छादून प्रमादात आसक्त करतो. अज्ञानापासून उत्पन्न होणाऱ्या ह्या तमोगुणाचा या धन्य दासाचे ठिकाणी लेशही उरत नाही. कारण तो शुद्ध, सत्त्वगुणसंपन्न झाल्यामुळे त्याला अनुभवाचे प्रत्यक्ष ज्ञान झालेले असते. त्यामुळे तो नि:संदेह झालेला असतो. समाधानात असतो. **संशयरहित ज्ञान। तेंचि साधूचें लक्षण। सिद्धाअंगी संशय हीन। लागेल कैंचा॥** (दा. ५-१०-१३)

याप्रमाणे निरिच्छ, निर्विकारी, उदासीन, तापसी, ब्रह्मचारी, ज्ञानी, समाधानी असा जो सच्चिदानंद श्रीरामाचा दास हा धन्य नव्हे काय ? समर्थांचे स्मरण केल्यास या सर्व गुणांचे दर्शन आपणास खासच घडेल.

★ ★ ★

**मदें मत्सरें सांडिली स्वार्थबुद्धि।**
**प्रपंचीक नाहीं जयातें उपाधि।**
**सदा बोलणे नम्र वाचा सुवाचा।**
**जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥५१॥**

मागील श्लोकात या दासाचे ठिकाणी वासनांचे विकार नसतात व अज्ञानाचा लेशही नसल्यामुळे तो समाधान स्थिती त वावरतो असे सांगितले.

ह्या श्लोकात त्या दासाचे आणखी गुण वर्णन केले आहेत.

मद म्हणजे ताठा, घमेंड. कोणाला तारूण्यमद असतो. कोणाला सौंदर्याचा तर कोणाला स्त्रीचा, कोणाला विद्येचा तर कोणाला बलाचा मद असतो. संपत्तीच्या तोऱ्यात मी कांहीही करीन ह्या भावनेला मद म्हणतात.

मत्सर म्हणजे दुसऱ्याचा उत्कर्ष सहन न होणे. पण ह्या दोन्ही विकारांपासून हा दास मुक्त असतो. **आपुला आपण स्वानंद। कोणावरी करावा मद।।** तसेच **साधू स्वरूप निर्विकार। तेथें कैंचा तिरस्कार। आपुला आपण मत्सर। कोणावरी करावा।।** (दा. ८-९-२८-२९)

त्याचे ठिकाणी अज्ञानाच लेशही नसल्यामुळे तो अद्वैत बोधात नांदतो. सर्वच आत्मवत् पाहणारा असा हा श्रेष्ठ योगी असतो. **आत्म्यौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन।।** (भ. गी. ६ - ३२) असा हा असतो. मग त्याचे ठिकाणी मदमत्सर कसे असतील ? सर्व आपलेच स्वरूप. मग मदमत्सर कोणाशी करायचा ? **साधु वस्तु अनायासें। याकारणें मत्सर नसे। मदमत्सराचें पिसें। साधुसी नाही।।** (दा. ८-९-३०) **कोण्याहि जीवाचा न घडो मत्सर वर्म सर्वेश्वर पूजनाचे।।** याचप्रमाणे त्याला स्वार्थबुद्धी किंवा लोभ असत नाही. आपण म्हणजे कोणी निराळे नसून सर्व आपणच असा त्याचा ब्रह्मभाव असल्यामुळे **आशा धरितां परमार्थाची। दुराशा तुटली स्वार्थाची। म्हणोन नैराश्यता साधूची। वोळखण।।** (दा. ८-९-४६)

त्याचप्रमाणे त्याला प्रापंचिक उपाधीही नसते. संसार व प्रपंच हे दोन्ही शब्द आपण एकाच अर्थाने वापरतो. बायकापोरे, घरदार, शेतीवाडी इत्यादिकातील व्यवहार म्हणजे प्रपंच किंवा संसार असे आपण समजतो. पण त्याचे स्पष्ट अर्थ थोडे वेगळें आहेत. संसार म्हणजे जन्म मरणाचा प्रवाह व तो ज्याला सत्यत्वाने भासतो तो जीव असे ज्ञानोबांचे म्हणणे आहे. **उपजणे निमणे। हे साचचि जे का मानणे। तया जीव लोकू मी म्हणे। संसारूहन।।**

प्रपंच म्हणजे विचारानें असत्य ठरणारी देहसृष्ट्यादि विस्ताराची उपाधि. एके ठिकाणी असलेले धान्य व कोंडा पाखडले म्हणजे धान्य राहते व कोंडा - निरूपयोगी भूस उडून जातो. **तैसें विचारितां निरसलें। तें प्रपंचु सहजें सांडवलें। मग तत्त्वता तत्त्व उरलें। ज्ञानियांसी।।** (ज्ञा. २ - १३१)

आपली कैवल्यावस्था सोडून जागृती, स्वप्न, सुषुप्ती, लौकिक व्यवहार, इत्यादिकात पडावे लागणे हा केवळ आत्म्याचा विस्तार किंवा उपाधीच होय. पण साधूला नित्यानित्य विवेकाने सर्व दृश्य अनित्य आहे. आपण ह्या सर्व विस्तारापासून अलिप्त आहो याचा अनुभव असल्यामुळे,



प्रपंचाकडे तो आस्तिक्य बुद्धीने पाहत नाही. निरूपाधिकपणे वावरत मात्र असतो. **म्हणोनि अनित्याचां ठायीं। तया आस्तिक्यबुद्धि नाहीं। निष्कर्ष दोहींही। देखिला असे।।** (ज्ञा. २ - १३२)

समर्थ म्हणतात, ''**जेंणें दृश्य केलें विसंच। तयास कैचा हो प्रपंच। या कारणें निःप्रपंच। साधु जाणावा।।**'' (दा. ८-९-३२) यासाठी ह्या श्लोकात समर्थ म्हणतात, ''**प्रपंचीक नाहीं जयाते उपाधि**'' पुढील चरणात त्याची वागणूक वर्णन केली आहे. जगात त्याचे चालणे, बोलणे नम्रपणाचे व गोड असेच असते. आपल्या बोलण्याने त्या विश्वंभराला ढका लागू नये, त्याला सुखच व्हावे, त्याची वाङ्मय पूजा व्हावी, म्हणून हा दास मधुर भाषणच करतो. त्याच्या भाषेविषयीं समर्थ म्हणतात, ''**मृदपणे जैसें गगन। तैसें साधूचे लक्षण। याकारणें साधूवचन। कठिण नाहीं।**'' (दा. ८-९-४७)

हा स्वतःच सुखरूप असल्यामुळें 'अवघेचि सुखी असावे' अशी त्याची वासना असते. दुसऱ्याने बरे बोलले म्हणजे आपल्याला सुख होते, त्याचा अनुभव हरघडी येतो. मग आपल्याप्रमाणेच सर्व जग अशी त्याची बुद्धी असते. **बरें बोलतां सुख वाटतें। हें तों प्रत्यक्ष कळतें। आत्मवत परावें ते। मानीत जावें।।** (दा. १२-१०-२२) गोड वाणीने लोक आपलेसे होतात, शब्द मानतात, त्यामुळे लोकसंग्रह होतो. **पेरिलें ते उगवतें। बोलण्यासारिखें उत्तर येतें।।** (दा. १२-१०-२६) हा जगातील न्याय आहे. म्हणून समर्थ म्हणतात, '**प्राणिमात्रास मेळवून घ्यावे। बऱ्या शब्दे।।**' गोड नम्र भाषा जगाला वश करते. तुकाराम म्हणतात, ''**नम्र जाला भूता। तेणे कोंडिले अनंता। तुका म्हणे पाणी। पातळपणे तळाखणी।।**'' पाणी नेहमी मऊपणाने खाली वाहते व जमिनीत घुसते. त्याप्रमाणे गोड भाषा - नम्र भाषा, लोकांचे अंतःकरणात घुसते व जनता जनार्दनाला वश करिते.

मग लोभ, मदमत्सरादि आसुरीवृत्ती ज्याने झिडकारिल्या, प्रपंचात राहून ज्याला अलिप्तता बाणली, आपल्या नम्र वाणीने जनता जनार्दनाला ज्याने वश केले असा विष्णुमय जग पाहणारा सच्चिदानंद रामप्रभूचा हा वैष्णवदास धन्य नव्हे काय ?

★ ★ ★

**क्रमी वेळ जो तत्त्वचिंतानुवादे।**
**न लिंपे कदा दंभवादें विवादें।**
**करी सूखसंवाद जो ऊगमाचा।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा।।५२।।**

या श्लोकात धन्य दासाची आणखी काही लक्षणे सांगितली आहेत. हा दास आपला वेळ तत्त्व चिंतनात घालवतो, सार काय, असार काय, याचे तो चिंतन करतो. ब्रह्म हे एकच सत्य कसे आहे व त्यापासून अन्नादिकोश कसे भिन्न आहेत याचा निश्चय करतो.

जगात प्रतीत होणाऱ्या विविध प्रकारच्या वस्तू पाहून या सर्वांचे मूळ काय असावे, याचा विचार अनेक ऋषिमुनींनी केला आहे, पण या तत्त्वाबद्दल नाना मते का ? कोण म्हणतो पाच तत्त्वे तर कोणाच्या मते तीनच तत्त्वे. दुसरा म्हणतो सात तत्त्वे आहेत. असे भिन्न भिन्न विचार का ? याचे उत्तर ज्ञानोबांनी हरिपाठात दिले आहे. **सात पाच तीन दशकाचा मेळा। एक तत्त्व कळा दावी हरी॥** हरी हे एकच तत्त्व खरे पण उपाधियोगे किंवा भ्रमामुळे त्या एकाच तत्त्वावर अनेक तत्त्वांचा भास होतो. एकच दोरी पण भ्रमामुळे कोणी साप म्हणतो, कोणी मुळी म्हणतो, कोणाला भेग आहे असा भास होतो. तसेच एकाच चैतन्याला जितक्या उपाधी लावाव्या, तितक्या प्रमाणात तत्त्वसंख्येत वाढ होते. प्रकृति व पुरूष अशी दोनच तत्त्वे कोणी मानतात. गुणाचे उपाधीने कोणी तीन मानतात. पंचभूतांचे उपाधीमुळे कोणी पाच मानतात. शरीराचा विचार केला तर २५ तत्त्वांची संख्या होते. **तेवि आत्मतत्त्व एकचि जाण। अविकारी निज निर्गुण। तेथे नाना तत्त्वांचे व्याख्यान। बोलती ब्राह्मण मायायोगे॥** तत्त्वे कोणी कितीही मानोत ती सर्व कार्यरूप आहेत, आणि वेदान्त सिद्धान्त असा आहे की जे जे कार्य ते मिथ्या व जे मिथ्या ते सत्य अधिष्ठानावाचून स्वतंत्र राहू शकत नाही. तुकाराम म्हणतात, **''एक विठ्ठलचि खरा। येर तो पसारा वाउगाचि॥''** सत्य अधिष्ठान एक हरीच आहे. एका हरीरूपात सर्व तत्त्वांची प्रतीति येते. याप्रमाणे स्वत: तत्त्वविचार करून ते तो जनाला सांगतो. कोणी या चरणाचा अर्थ तत्त्वमसि महावाक्याचा स्वत: विचार करून त्याचा उपदेश तो जनाला करतो असाही करतात. सारांश, तो वेळ फुकट घालवीत नाही. त्याला काही क्रम असतो. **पुढें भोजन जालियांवरी। काहीं वाची चर्चा करी। येकांती जाउन विवरी। नाना ग्रंथ॥** (दा. ११-३-२२)

त्याचा हा तत्त्वविवेक लोकात अहंमन्यतेने मिरविण्यासाठी किंवा वादविवाद करणेसाठी नसतो. आपण फार मोठे अशी जी बुद्धी ही अहंमन्यता. तो मोठेपणा चव्हाट्यावर मांडणे हा दंभ होय. स्वरूप साक्षात्कारामुळें या दासाला अभिमानही नसतो व दंभही नसतो. आपणच सर्व मग मोठेपणा कोणी कोणापुढे मिरवायचा ? **साधू स्वरूप स्वयंभ। तेथें कैचा असेल दंभ। जेथें द्वैताचा आरंभ। जालाच नाहीं॥** (दा. ८-९-३१) म्हणून त्याचे ठिकाणी दंभाचा वादविवाद नसतो.



भक्तीमार्गात वादविवाद हे विघ्न होय, त्याची त्याला जाणीव असते. म्हणून तो त्यापासून दूर असतो. नारद भक्तीसूत्रात म्हणतात, **''वादो नावलंब्य:। बाहुल्यावकाशादनियतत्वाच्च॥''** म्हणून वाद केव्हाही घालू नये. कारण दोन्ही बाजूंनी बोलण्याला जागा असते. मोकाटपणा असतो. निकाल लागला तरी वाद पुन्हा घातला जातोच. शब्दाने शब्द वाढतो, तत्त्व बाजूलाच राहते. धरबंध न राहिल्यामुळे शेवट वैरात होतो. तत्त्वबोध राहतो बाजूला व **' वादे वादे वर्धते वैरवन्हि:'** हा अनुभव येतो. उभय पक्षी अभिमान उठतो व त्याचे पर्यावसान उखाळ्या पाखाळ्यात, मर्मभेदक शब्दात होऊन कटुता उत्पन्न होते.

स्वसंवेद्य किंवा अनुभवरूप वस्तू वादविवादाने कशी सिद्ध व्हावी ? मातेच्या प्रेमाचे स्वरूप कशा प्रकारचे असते हे वादविवादाने सिद्ध होण्याजोगे नाही. यासाठी आईच झाले पाहिजे. म्हणून हा दास वादविवादात पडत नाही. स्वरूपानुभवामुळे तो कोणाशी काय म्हणून वाद घालील. स्वानंदाची चव ज्याला माहीत आहे तो दुसरा काय म्हणतो याची चौकशी करेल कशाला ? **आपला आपण स्वानंद। कोणावरी करावा मद। या कारणे वादवेवाद। तुटोन गेला॥** (दा. ८-९-२८) पण हा वादविवाद जरी टाळीत असला तरी हितकारी सुखसंवाद मात्र करतो.

हितकारी सुख संवाद कोणता ? दोन्ही पक्षांचे जेणेकरून समाधान होते तोच सुखसंवाद. या संवादाचा विषय तरी कोणता असतो ? ऊगमाचा. उगम म्हणजे ब्रह्म ; चंचल नदी, गुप्त गंगा अशी जी माया तिच्या ऊगमाचा - म्हणजेच ब्रह्माचा. परब्रह्माच्या अधिष्ठानावर मायेचा ऊगम होतो व मायेचा प्रांत ओलांडूनच तेथे पोहोचावे लागते. **येक बळाचे निवडले। ते पोहतचि उगमास गेले। उगमदर्शनें पवित्र जाले। तीर्थरूप॥** (दा. ११-७-१०)

हा ब्रह्मविचार गुरूशिष्य, मुमुक्षु किंवा अनुभवी संत यांच्यातच मोठा सुखाचा होतो. **मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्त: परस्परम्। कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमति च॥** (भ. गी. १०-९) यावर भाष्य करताना ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, **''जैसी कमळकलिका जालेपणें। हृदयींचिया मकरंदातें राखों नेणें। दे राया रंका पारणे। आमोदाचें॥** (ज्ञा. १०-१२७) **मग तया बोधाचेनि माजें। नाचती संवादसुखाची भोजें। आतां एकमेकां घेणे दीजे। बोधचि परी॥''**

(ज्ञा. १०-१२०) ज्ञानाचे मदाने प्रश्नोत्तररूप चर्चेच्या आनंदात प्रेमाने नाचतात व एकमेकास ज्ञानच देतात व घेतात. या सुखसंवादात दंभ, अहंकार नसतो. एकमेकांच्या पारमार्थिक हिताचा कळवळा असतो. म्हणून हरीरूप एक तत्त्वाचेच चिंतन करणारा ; दंभ वादविवादापासून अलिप्त असणारा ; दुसऱ्यास समाधान देणारा हा सच्चिदानंद श्रीरामदास धन्य नव्हे का ? म्हणूनच तुकाराम महाराज देवाची आळवणी करतात. **माझिये जातीचे मज भेटो कोणी। आवडीची घणी फेडावया। आवडे ज्या हरी अंतरापासूनि। ऐसियाचे मनी आर्त माझे ।** (गा. २०२३)

★ ★ ★

**सदा आर्जवी प्रीय जो सर्व लोकीं।**
**सदा सर्वदा सत्य वादी विवेकी।**
**न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचा।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥५३॥**

मागील श्लोकांत हा दास आपला वेळ तत्वचिंतनात कसा घालवतो व वादविवादापासून दूर राहून आपल्याच जातीचा, आपल्याच स्वभावाचा जो कोणी भेटेल त्याच्याशी ब्रह्मतत्त्वाचा सुखसंवाद कसा करतो, हे सांगितले. ह्या श्लोकात त्याच्या लोकव्यवहाराची काही ज्ञानलक्षणे सांगितली आहेत.

द्वैतबुद्धी नाहीशी झाल्यामुळे व सर्व हरिरूप पाहण्याच्या अभ्यासामुळे तो आर्जवी म्हणजे मनाने सरळ असतो, म्हणून सर्व लोकांशी तो आपलेपणाने वागतो. सूर्य जसा सर्वांना सारखाच प्रकाश देतो, तसा मनाने हा सर्वांशीच सरळ असतो. आपपरभाव त्याचे ठिकाणी नसतो. श्रीमंत, गरीब, लहान, थोर वगैरे भेद न मानता हा सर्वांशीच प्रेमाने वागतो. पाण्याप्रमाणे सर्वांशीच मिसळतो. आईपासून मूल जसे काही लपवून ठेवित नाही, तसे लोकांशी मनातील गोष्ट बोलण्यास त्याला संकोच वाटत नाही. त्याचेजवळ गुप्त असे काही नसतेच व कोणाबद्दल त्याला संशयही नसतो. म्हणून त्याचे बोलण्यात डावपेच नसतो किंवा वागण्यात क्षुद्रबुद्धी ही नसते. अंत:करण सात्विक असल्यामुळे हा प्रेमळ मनाचा आहे हे आधीच समजून येते, आणि मग त्याची क्रिया घडते. **सकळ जनासी आर्जव। नाहीं विरोधास ठाव। परोपकारी वेची जीव। तो सत्वगुण॥** (दा. २ - ७ - ६४) असा हा प्रेमळ अंत:करणाचा परोपकारी असल्यामुळे तो सर्वांना हवासा वाटतो. **जेथें तेथें नित्य नवा। जनासी वाटे**



**हा असावा। परंतु लालचीचा गोवा। पंडोचि नेदी॥** (दा. १९ - ६ - २१)

याचे ठिकाणी उचित - अनुचित, आत्मा - अनात्मा यासंबंधी विवेक असतो. म्हणून कटाक्षाने तो सत्याचे पालन करतो. सत्य याचा खरा अर्थ ब्रह्म असाच आहे. **सत्या परता नाही धर्म। सत्य तेचि परब्रह्म। सत्यापाशी पुरूषोत्तम। सर्व काळ तिष्ठत॥** (मुक्तेश्वर)

सत्य तेच शाश्वत असते. जगाचा आदि - अंत तेच आहे. सत्यामध्येच भगवंताचे स्वरूप प्रकट होत असल्यामुळे 'सत्यमेव जयते' असे म्हणतात. भगवंताला सत्यप्रिय असते. कारण अंतरात्मा हा स्वत:च सत्यरूप असल्यामुळे त्याला असत्य रूचत नाही. सुपरिणामांकडे लक्ष देऊन केव्हा केव्हा प्रथम असत्य बोलावे असे सांगितले जाते. रोग्याला बरे वाटावे, लग्नकार्य जुळावे म्हणून प्रसंगी असत्य बोलले तरी ते क्षम्य असे वाटते. व्यावहारिक दृष्टीने काही वेळा हे सोईचे वाटले तरी परमार्थात हे त्रिकालाबाधित सत्य नव्हे. असत्य पेरून सत्य कसे उगवणार ? विषवृक्षाला अमृताचे फळ कोठून येणार ? यात एक धोका असा आहे की, सहज जाणून व्यवहारार्थ किंवा विनोदार्थ खोटे बोलणे, खोटा कागद करणे, खोटी साक्ष देणे, हे घडले की तीच सवय लागते. एकदा मन निर्ढावले की असत्याची भीतीच पार नाहीशी होते व मनुष्याचे अध:पतन घडते. लौकिक जातो तो निराळाच.

म्हणून परमार्थ - साधकाने आपले भाषण, आचरण सर्व व्यवहारच सत्याला स्मरून करावा. मात्र सत्य बोलताना, कडू पण हितावह अशा औषधावर जसे साखरेचे कवच असते, त्याप्रमाणे सत्य बोलताना, मृदु - मधुर भाषण ठेवून, कोणालाही दुखवू नये. कडू गोळी उलटून पाडणेचा जसा संभव जास्त, त्याप्रमाणे कठोर भाषणाने सत्याला बाध येण्याची शक्यता, म्हणून सत्य व मधुर बोलावे. ज्ञानेश्वर म्हणतात, **''किंबहुना प्रियपणें। कोणातेही झकवूं नेणे। यथार्थ तरी खुपणें। नाहीं कवणा।''** (ज्ञा. १६ - १२०) हा दास तर विवेकी असतो. सार - असार, नित्य - अनित्य, उचित - अनुचित हे सर्व तो जाणतो. म्हणून सर्वत्र हरिरूप ध्यानी घेऊन तो जगाशी नम्र होऊनच सत्यपणे वागतो व बोलतो, तेही सत्य व मधुर. मग ज्याला त्याला तो हवासा का वाटणार नाही ?

त्याच्या सत्यत्वाची उत्कटता तिसऱ्या चरणात सांगतात. तो सत्यपणे वागतो व बोलतो. इतकेच नव्हे पण स्वप्नातही त्याला खोटं बोलणे ठाऊक नसते. त्रिवाचा म्हणजे निश्चय करून जो तीन तीनदा बोलत नाही. एकदाच बोलतो पण ते अगदी निश्चयाचे व कायमचे. पुराणांतरी राजा हरिश्चंद्र हे

सत्याचे अगदी उत्कट उदाहरण आहे. स्वप्नातील वचनही त्याने सत्य केले.

या चरणाचा कोणी आणखी ही एक अर्थ करतात. एकंदर वाणीचे प्रकार चार - **उन्मेष परा ध्वनी पश्यंती। नाद मध्यमा शब्द चौथी।** (दा. १२- ५-८) - परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी ; जे तीन वाणींमधून येते ते वैखरीने म्हणजे मुखाने स्पष्ट होते. **वैखरीपासून उमटती। नाना शब्दरत्नें।**

ज्याच्या परावाणीत खोट्याचे स्फुरणच होत नाही. म्हणजे जे तीन वाणीतच नाही ते मुखातून बाहेर कसे येणार ? म्हणजे त्याचे ठिकाणी खोट्याचे स्फुरणच नसते. मग खोटे बोलणे कोठचे ? तात्पर्य, स्वप्नातही खोटे बोलावे असे त्याला वाटत नाही. सरळ वागणारा, सत्य पण प्रिय बोलणारा, स्वप्नातही खोटे न बोलणारा, सर्वांना हवासा वाटणारा असा हा सच्चिदानंद श्रीरामाचा दास धन्य नव्हे का ?

★ ★ ★

**सदा सेवि आरण्य तारूण्यकाळीं।**
**मिळेना कदा कल्पनेचेनि मेळीं।**
**चळेना मनीं निश्चयो दृढ ज्याचा।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा।।५४।।**

मागील श्लोकात लौकिक व्यवहार सांगितला. या श्लोकात वनातील विहाराविषयी सांगितले आहे. समर्थांना स्वत:लाच अरण्यातील वास्तव्याची अत्यंत आवड. **उदासीन जो तापसीं ब्रह्माचारी** तसेच **प्रपंचीक नाहीं जयाते उपाधि** हे पूर्वीच्या श्लोकातून आलेले चरण व हा श्लोक म्हणजे समर्थांचे आत्मचरित्रच होय.

श्रीरामाचा दास आपले तारूण्य सर्वकाळ अरण्यसेवनात घालवतो. तारूण्यकाळी वनवास पत्करणे ही सोपी गोष्ट नाही. त्याला पूर्वपुण्याईच लागते. तो काल म्हणजे विषय, विलास भोग भोगण्याचा, उन्मत्तपणाचा, पण अशा काळातही काही एक उच्च ध्येय डोळ्यापुढे ठेवून एकांत सेवन करावा असे वाटणे, हे तीव्र वैराग्याशिवाय घडत नाही. **ईश्वरा वीण कांही। आणीक लाहणेचि नाही** अशी ज्याची वृत्ती असते. म्हणजे ईश्वरप्राप्ती हेच ज्याचे उत्कट ध्येय असते तोच अरण्यवास पत्करू शकतो व तोही तारूण्यात. कारण तेथे चित्ताची एकाग्रता होऊ शकते. ब्रह्मांडासंबंधी सारासार, पिंडासंबंधी नित्यानित्य अशी विचाराची चाळणा होते व ज्ञानप्राप्ती होते.



**चाळणा करावी सर्वे। एकांती राहाता बरे। एकांत मानला ज्याला। त्याला साधे हळूहळू।।** (स्फु. प्र. १४.३) **जयासी एकांत मानवला। सर्वा आधी कळे त्याला।।**

लोकव्यवहारात म्हणजे नगरात राहिल्याने मधूनमधून चित्तविक्षेप होतो. नाना स्वभावाचे लोकांना तोंड द्यावे लागते. **संवाद वेवाद होता। वेवादे युद्ध होतसे। म्हणोनी लोक सोडावे। आरण्य धरिता बरे।।** (स्फुट. प्र. १४-१०)

हे अरण्य सेवन तारूण्यातच व्हावयास हवे. गात्रे गलित झाल्यानंतर, बुद्धीमांद्य आल्यावर, म्हातारपणी जेव्हा गृहातील वास्तव्य सुखाचे होत नाही, तेथे कष्टाचा अरण्यवास व ज्ञानार्थ एकाग्र अभ्यास कसा परवडेल ? छांदोग्य. उपनिषदात अरण्यवासाला ब्रह्मचर्यच म्हटले आहे. **यदरण्यायनमित्यांचक्षे-ब्रह्मचर्यमेवतत्।।** असा हा श्रेष्ठ अरण्यवास वृद्धपणी कोठून होणार ? अरण्यवास बाजूला राहू दे पण एखादा तरूण घरीच काही परमार्थ साधन करू लागला तर आईबापच त्याला म्हणतात, ''अरे बाळ्या, ह्या वयात हे काय आरंभले आहेस ? म्हातारपणी कर तुझे हे हरी हरी''. समर्थ म्हणतात, **''देहाचा भर्वसा नाही। तारूण्य चळते जनी। वृद्धापि विटंबे काया। रूप विद्रूप होतसे।।''** (स्फु.) मरण केव्हा येईल हे कोणालाच ठाऊक नसते. बरे, जगला, तरूण झाला, तरी लौकिकात पाय कोठे घसरेल याचा नेम नाही. म्हातारपणी जेव्हा शरीर विद्रूप होते, इंद्रिये धड नसतात, तेव्हा परमार्थ धड कोठचा ? **ऐसे हे दु:ख वृद्धापी। कळले पाहिजे जना। परत्र साधणे आधी। तारूणीच उठा उठी।।** (स्फु.) ज्याला परत्र साधावयाचे तो इतर कल्पनांच्या नादी लागेल कसा ?

तो विषय कल्पनेच्या घोटाळ्यात पडत नाही व सापडतही नाही. त्याची सर्व वृत्ती ब्रह्मचिंतनात गुंतलेली असते. याचाच अर्थ एकान्त, **शिष्या एकांती बैसावें। स्वरूपीं विश्रांतीस जावें।।** (दा. ५-६-५८) स्वस्वरूप चिंतनात ज्याचे चित्त निमग्न झाले, त्या चित्तात ऐश्वर्य, अधिकार, लौकिक इत्यादि अन्य विषयासंबंधी कल्पना उठणार कशा ? विषयदर्शनामुळे वासनांचे जाळ्यात सापडू नये म्हणून त्याने तारूण्यात अरण्यवास पत्करलेला असतो.

काहींच्याकडून या चरणात जरा वेगळा विचार मांडला जातो. ह्या सच्चिदानंद श्रीरामाच्या दासाचे निश्चित स्वरूप व स्वभाव अन्य कोणाला आकलनच होत नाही. म्हणजे सामान्य माणसाचे कल्पनेचे टप्प्यांत न येणारे असे ते कल्पनातीत स्वरूप असते. साधूच फक्त साधूस ओळखेल, अन्य कोणी नाही, या अर्थाचे पुष्ट्यर्थ आधारही आहेत. **एवं कल्पितां कल्पेना। ना तर्किताहि तर्केना। कदापि भावितां भावेना। योगेश्वर।।** (दा. ११-१०-१३)

**लोक संकल्प विकल्प करिती। ते अवघेचि निर्फळ होती। जनाची जना लाजवी वृत्ति। तेव्हां योगेश्वर।।** (१५) पण हा अर्थ थोडा दूरचा वाटतो. कारण या चरणात योगेश्वराचे महत्त्व गौण आहे. तारूण्यात स्वीकारलेल्या अरण्यवासाचे महत्त्व दर्शवणे हा प्रधान हेतू आहे. तथापि रामदासांची धन्यता दर्शविणारा हा श्लोक असलेमुळे दोन्ही विचार बरोबरच आहेत.

पुढच्या चरणात समर्थ त्यांच्या दृढ निश्चयाबद्दल सांगतात. एकान्तभक्ती करण्याचा त्याचा निश्चय प्रापंचिक विचाराने ढळत नाही. ब्रह्मांड कोसळले तरी रामरूपावरून त्याचे सात्विक चित्त ढळत नाही. असा तो बेगुमानपणे अरण्यात वावरतो. **ज्याचे धारिष्ट्य चळेना। तो सत्व गुण।।** (दा. २-७-५९) धारिष्ट्य कोणते व कशासाठी ? **विटंबो शरीर होत का विपत्ती। परी राहो चित्ती नारायण। तुका म्हणे नाशिवंत हे सकळ। आठवी गोपाळ तेचि हित।।**

अरण्यवास ही साधी गोष्ट नाही. जीवावर उदार होऊन अरण्यवास पत्कारावा लागतो. निर्जन प्रदेशात पोटाला काय मिळतील ती फळे खायची. व्याघ्र सर्पादिकांचे ते माहेरघरच. अशात अंधारात वावरायचे, वनातील सरपणावर सर्व भागवायचे. वारा, थंडी, ऊन, पाऊस अशा बिकट परिस्थितीत रात्रंदिवस नांदायचे, हे दृढ निश्चय व धारिष्ट्य असल्याशिवाय होत नाही. परमेश्वरचिंतन हेच आपले हित. तोच आपला पाठीराखा, वाली, अशी दृढ श्रद्धा असावी लागते. **शरणागतासी देव जाला। वज्रपंजरू।।** अशी निष्ठा असावी लागते.

उदात्त ध्येय साधीत असता वेळी प्राण गेला तरी पर्वा नाही, अशा निश्चयाचा मनुष्यच अरण्यवास पत्करू शकतो. **देवाच्या सख्यत्वासाठीं। पडाव्या जिवलगांसी तुटी। सर्व अर्पावें सेवटी। प्राण तोही वेचावा।।** (दा. ४ - ८ - ८) असे धाडस असेल तोच अरण्यवास पत्करेल. देवाशिवाय चित्तात दुसरा विषय नाही व त्याचे प्राप्तीसाठी तारूण्यातही अरण्यसेवन करून प्राणावर पाणी सोडणारा, हा दास धन्य नव्हे का ?

★ ★ ★

**नसे मानसीं नष्ट आशा दुराशा।**
**वसे अंतरी प्रेमपाशा पिपाशा।**
**ऋणी देव हा भक्तिभावें जयाचा।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५५।।**



हा दास तारूण्यातच अरण्यसेवन करून, कल्पनेच्या जाळ्यात न सापडता दृढ निश्चयाने तेथे कसा वावरतो हे मागील श्लोकात सांगितले. इतके तीव्र वैराग्य त्याचे ठिकाणी कशामुळे असते ते या श्लोकात सांगतात.

त्याचे मनात नष्ट आशा, दुराशा नसते. दुराशा म्हणजे नसती आशा. आशेमध्ये विषयलंपटता व स्वार्थबुद्धी असते व तिला कामक्रोधादि षड्रिपूंचे पाठबळ असते. ही प्रत्यक्ष खादाड भिकारीण आहे. तिची तृप्ती केव्हाच होत नाही. स्वर्ग, मृत्यू, पाताळ तिन्ही लोकांना तिने व्यापिले आहे. तिचे संगतीने दु:खच पदरी येते. **आशाहि परमं दु:खं निराशा परमं सुखम्।** म्हणून तिला नष्ट म्हटले आहे. आसुरी संपत्तीचे हे एक श्रेष्ठ लक्षण आहे. **आशापाश शतैर्बद्धा: काम क्रोधपरायण:।** आशा हेच मुळी शेकडो पाश. तिनेच प्रापंचिक बद्ध होतो, हिच्यापासून विशुद्ध मनाचा योगीच मुक्त असतो. म्हणून हा दास निरिच्छ असतो. शरीरधारणेसाठी जे पुढे येईल तेवढ्यावर निर्वाह. काही नच आले तर ? **झाडें वोरपोनि खाऊनिया पाला। आठवी विठ्ठला वेळोवेळा। लोकमान वमनासमान मानणें। एकांती राहणें विठोसाठीं। ऐसा हा निर्धार करी जो मनाचा। तुका म्हणे त्याचा पांग फिटे।।** (गा. ३७१०) इतका जो नि:स्वार्थी आणि निरिच्छ तो नष्ट आशेत कसा सापडेल ? त्याचे ठिकाणीही दुष्ट आशा नसते. मानवाला योग्य असा इष्ट आशापाश असतो तो कोणता ? हा प्रश्न मनात येतो. दुसऱ्या चरणात समर्थ म्हणतात, **वसे अंतरी प्रेम पाशा पिपाशा।** पिपाशा म्हणजे तृष्णा, तहान हा दास भगवत्प्रेमाबद्दल ताहनेला असतो. देवाबद्दलच्या नितांत व निष्काम प्रेमामुळे त्याला देवाच्या दर्शनाची तहान असते. दासाच्या ह्या वृत्तीबद्दल समर्थ म्हणतात, **''माझे सर्व जावे देवाने रहावे। देवासी पहावे भक्तपणे।।''** देवाचे दर्शन व्हावे व स्वरूपात प्रेमाने गुंग होऊन राहावे येवढाच त्याचा इष्ट आशापाश असतो. संतांचे ध्येय, संतांची तळमळ, त्यांचा आशापाश. हा एवढा एकच असतो. सगुणस्वरुप साक्षात्काराची तृष्णा हाच तो आशापाशा. **काय तुझें वेचे मज भेटो देता। वचन बोलतां एक दोन। काय तुझें आम्हा करावे वैकुंठ। भेवों नको भेट आतां मज। तुका म्हणे तुझी नलगे दसोडी। परी आहे आवडी दर्शनाची।** (गा. १३४८) या निष्काम प्रेमात मागणी तर काही नाहीच, पण उलट प्रेमाची देणगी भक्त देतो. देवाचे चरण गहाण असलेमुळे भक्ताच्या पाशातून तो सुटत नाही. त्याला प्रेमाचे व्याज द्यावेच लागते. तुकाराम म्हणतात, **''भक्ती ऋण घेतले माझे। चरण गहाण आहेत तुझे। प्रेम व्याज देई हरी। माझा हिशेब लवकरी करी।।''** या भक्तीमुळे देव सहजच

ऋणी होतो. राजाकडे कांही मागणीसाठी गेले की भेट लांबते, पण नजराणा नेला की भेट लगेच होते. तसेच ह्या निष्काम भक्तीत आहे. कामनेने फळ मिळते पण निष्काम प्रेमाने देव मिळतो. सकाम व निष्काम भजनात येवढे जमीन - अस्मानाचे अंतर आहे. काहीच मागणी नसल्यामुळे लाचारी नाही. उलट सामर्थ्य वाढते. **नि:काम भजनाचे फळ आगळें। सामर्थ्य चढे मर्यादेवेगळे। तेथें बापुडी फळें। कोणीकडे।।** (दा. १०-७-२२) **नि:काम बुद्धीचिया भजना। त्रैलोकीं नाहीं तुळणा।।** (दा. १०-७-१९) या भक्ताला दुष्ट कामना कोणती नसतेच. देवावर निष्काम प्रेम करावे येवढीच त्याची इच्छा असते. **म्हणुन माझे नि कामे सकाम। माझे नि प्रेमे सप्रेम।।** असे भगवंत म्हणतात.

आपल्यात प्रेमभाव असतो, पण तो प्रपंचाचा, नात्यागोत्याचा, इष्ट मित्राचा, हे प्रेम स्वार्थी असते. देवावरील प्रेमात स्वार्थ नसतो. कारण आपण देवाचेच अंश आहोत. **अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थित:।** (भ. गी. १०-२०) देवावरील प्रेम म्हणजे आपले आपणावरच प्रेम होय. तेथे कामना कशाची ? पण हे कळत नसल्यामुळे आपण देवावर प्रेम न करता देहावर प्रेम करितो व म्हणून नाशवंत होतो. देवाचे शुद्ध स्वरूप प्रेम हेच होय व भक्ताचे पूर्णत्वही प्रेमातच असते. देवभक्तांचा खरा एकांतही प्रेमातच, अशा या निष्काम प्रेमामुळे द्वैतभाव मावळतो. जितके जितके गाढ प्रेम तितका तितका परकेपणा दुरावतो. जीवश्च कंठश्च स्नेही, पति - पत्नी यांचे बाबतीत आपण हा अनुभव घेतो. देव जर जीवश्च कंठश्च स्नेही झाला तर काय होणार नाही ? समर्थ म्हणतात, ''**भक्तें जें मनीं धरावे। तें देवें आपणचि करावें। तेथें वेगळें भावावें। नलगे कदा।।**'' (दा. १० - ७ - २३)

या परस्पर प्रेमामुळे जी देवाची इच्छा तीच भक्ताची व जी भक्ताची तीच देवाची असे होते. यामुळे भक्तसामर्थ्य वाढत जाते. **दोन्ही सामर्थ्ये एक होतां। काळासी नाटोपे सर्वथा।** (दा. १०-८-२४) प्रारब्धात मूल नाही असे एकाने सांगितले असता केवळ भक्तमुखाने उच्चार झाल्यामुळे मुलगा झाला. ईश्वरी कृपेने सामर्थ्य वाढते. या भक्ताचे प्रेमही तसेच चालू असते. सर्व जल-संपत्ती घेऊन भागीरथी ज्याप्रमाणे समुद्राला मिळूनच राहाते. **तैसें सर्व भारसंभारे। न धरत प्रेम एकसरें। मजमाजी संचरे। मीचि होऊन।।** (ज्ञा. ११-६८८) या प्रेमळ व निष्काम भक्तीमुळे देव त्या भक्ताचा ऋणी होतो. तो कसा ? याचा स्वानुभव समर्थ सांगतात, ''**आमुचे कुळीं रघुनाथ। रघुनाथें आमुचा परमार्थ। जो समर्थाचाहि समर्थ। देवां सोडविता।। करी दुर्जनांचा संव्हार।**



**भक्तजनासि आधार। ऐसा हा तों चमत्कार। रोकडा चाले।।**'' (दा. ६-७-२१-२९)

**मनी धरावें तें होते। विघ्न अवघेचि नासोन जाते।। रघुनाथ भजनें ज्ञान जालें। रघुनाथ भजने महत्त्व वाढले।। सकळ मिथ्या होवून जातें। हे राम भजने कळो येते।।** (दा. ६-७ मधील २१ ते ४३)

केवळ निष्काम भजनाने ज्याने याप्रमाणे देव ऋणी केला तो श्रीरामाचा दास धन्य नव्हे का ?

काही पाठात 'नसे अंतरी प्रेम पाशा पिपाशा' अशी ओळ आहे. हा दास विषय प्रेमपाशांत किंवा मायिक प्रेमात सापडत नाही. **विषय तो त्यांचा झाला नारायण** त्यामुळे सर्वत्र तो रामरूपच पाहातो. म्हणून देव ऋणी होतो.

★ ★ ★

**दिनाचा दयाळू मनाचा मवाळू।**
**स्नेहाळू कृपाळू जनीं दास पाळू।**
**तया अंतरी क्रोध संताप कैंचा।**
**जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा।।५६।।**

ह्या श्लोकाने समारोप केला आहे. मागील श्लोकात या दासाचे ठिकाणी नष्ट आशा, दुराशा नसते व तो वैराग्यसंपन्न असल्यामुळे, त्याला केवळ आत्मसाक्षात्काराची तृष्णाच असते असे सांगितले. ती तृष्णा सात्विक अन्त:करणामध्येच आढळते. **येका भगवंताकारणे। सर्व सुख सोडिलें जेणें। केले देहाचे सांडणे। तो सत्वगुण।।** (दा. २-७-५८)

या श्लोकात ह्या दासाचे अंत:करण सर्व प्रकारे कसे शुद्ध व प्रेमळ असते याचे वर्णन केलेले आहे. परमार्थ हा शुद्ध चित्ताशिवाय कळत नाही. दैवी संपत्तीशिवाय मोक्ष नाही. म्हणून दैवी व आसुरी संपत्तीची फलश्रुती भगवंतांनी अर्जुनास सांगितली व तू दैवी संपत्तीने युक्त आहेस, चिंता करू नकोस असे सांगितले. **दैवी संपद्विमोक्षाय निबन्धायासुरी मता। मा शुच: संपदं दैवीमभिजातोऽसि पांडव।।** (भ. गी. १६-५) म्हणून दैवी संपत्तीतील दया भूतेषु व मार्दव हे गुण ह्या दासाचे ठिकाणी कसे असतात, याचे ह्या श्लोकात विवेचन आहे.

दीन म्हणजे असहाय, दु:खी - कष्टी, संकटग्रस्त. अशा कोणाकडेही पाहून या दासाला कळवळा येतो व त्याचे दु:ख निवारणार्थ तो झटतो. केवळ अन्त:करणाला वाईट वाटून 'अरेरे' म्हणून स्वस्थ बसणे ही दया नव्हे.

कळवळ्याबरोबरच पीडितांचे दु:ख निवारणार्थ कृती पाहिजे. ‘**दया तिचे नाव भूतांचे पालन। आणिक निर्दळण कंटकांचे।।** (तुकाराम) कोणाचेही संकटापासून संरक्षण केले पाहिजे व ज्यामुळे ते उत्पन्न झाले ते कारणही नष्ट केले पाहिजे. दयेचे दुसरे लक्षण म्हणजे ती सर्वाबद्दल सारखी असली पाहिजे. **दया करणे जे पुत्रासी। तेचि दासा आणि दासी।।** स्वकीयाबद्दल अन्त:करणात साहजिकच कळवळा येतो व दु:ख निवारणार्थ मनुष्य झटतो. पण परकीयांबद्दल तो स्वस्थ राहतो. ही दया नव्हे हे माझे म्हटले त्यावरील ममत्व होय. पूर्णचंद्र जसा सर्वांना समाधान देऊन शांत करितो, **तैसे दु:खितांचें शिणणें।। हिरतां सकणवपणें। उत्तमाधम नेंणे। विवंचूं गा।** (ज्ञा. १६-१५५) दु:ख दिसले की मग ते कोणाचेही असो, श्रीमंत-गरीब, ज्ञानी-अज्ञानी आपपर लक्षात न घेता, ते हरण करणे ही दया होय. एकजीव होणे हे तिचे लक्षण आहे. म्हणून अशी दया अद्वैतानुभवी संतांचे ठिकाणीच असते. दया हे तर त्यांच्या परमार्थाचे भांडवलच. हे भांडवल खर्च होत असता ते स्वदेहावरही उदार होतात. **भूतांची दया हे भांडवल संता। आपुलिया ममता नाही देही।।** जगात पाण्यासारखी वस्तू स्वत: नाहीशी होते पण गवताच्याही जात असलेल्या जीविताचे रक्षण करिते. **तैसें पुढिलाचेनि तापें। कळवळलिये कृपे। सर्वस्वेसीं दिधलें आपण पे। तरी थोडेचि गमे।।** (ज्ञा. १६-१५७) पीडितांचे दु:ख निवारणार्थ त्याने सर्वस्व जरी दिले तरी ते त्याला थोडे वाटते. कारण जसे आपण तसा दुसरा. मला दु:ख नको तसे ते दुसऱ्यासही नको, अशी श्रेष्ठ आत्मैक्य भावना त्याचे ठिकाणी असते. रामाचा दास याप्रमाणे दीनाचा दयाळू असतो. जसा दयाळू तसा मनाचा ही मवाळू म्हणजे कोमल असतो. मनाचे कोमलत्व ज्याचे त्यास ठाऊक असते ते शब्दाने कसे सांगावे ? ज्ञानोबा म्हणतात या कोमल अन्त:करणाला आम्ही कापराची उपमा दिली असती. **स्पर्शे अतिमृदु। मुखीं घेतां सुस्वादु। घ्राणासि सुगंधु। उजाळू आंगें।।** (ज्ञा. १६-१७१) त्याचे स्पर्श, रूप, रस, गंध हे सर्वच कोमल, सुखावह पण तो वाटेल तेवढा घेतला तर अपाय करतो. म्हणून या उपमेला योग्य नाही. या दासाचे मवाळूपण असे निरूपम असते. ज्ञानोबांचे शब्दात सांगायचे झाल्यास ‘तो हळूवार मनाचा असल्याने भूत मात्राशी त्याची वागणूक अति कोमल असते.’ म्हणून तो जगाचा जीव बनून जातो.

तसाच तो स्नेहाळू असतो. स्नेहाळू म्हणजे सुहृद. प्रति उपकाराची अपेक्षा न करता भूतमात्रावर प्रेम करणारा असतो. कारण आत्मैक्य भावामुळे तो जगमित्र असतो. **देवांच्या संबंधे विश्वची सोइरे,** अशी त्याची भावना असते.



तो कृपाळूही असतो. म्हणजे पीडिताबद्दल त्याचे चित्त द्रवते, त्याला करूणा येते. **नवल कृपाळूत्वाचें चित्त। जीवाचा जीव जीवी स्युत। दु:ख हरोनि सुख देत। कृपा अद्भूत यापरी।।** (ना. भा. ११-८३३) असा जगाबद्दल जो स्नेहाळू, कृपाळू तो, देवाचे जें भक्त, दास त्यांचे संकटात रक्षण का करणार नाही ? हरीचे जे दास ते त्याचे देव बंधू मग त्यांचे पालन हा कसा करणार नाही ? येथे दास पाळू याचा अर्थ काहींच्या मते निराळा आहे. मी परमेश्वराचा दास आहे. ही भावना ठेवून हा दास्यत्वाचे रक्षण करितो. म्हणजे ज्ञानाने अद्वैतानुभव आला तरी शरीर आहे तोवर तू देव, मी या द्वैतात तो वागतो. पण ओघाला अनुसरून पहिला अर्थच बरा वाटतो. **दुर्बळ जो कां भगवदभ्क्त। त्यासी संरक्षी जो धनवंत। तेणे तुष्टला भगवंत। त्यातें उद्धरीत भक्ताआधीं।।** (ना. भा. २३-३९९) दिनकर गोसावी म्हणतात, ‘‘**रामदास दासा सांभाळितो कैसा। जीव प्राण जैसा तैसा पाहे।।**’’ जीव जसा प्राणाला जपतो तसा हा रामदास इतर दासांना जपतो असा हा दास दयाळू, मायाळू, स्नेहाळू, कृपाळू व दासपाळू असल्यामुळे त्याचे ठिकाणी रागीटपणा कसा असणार व तो कोणावर संतापणार ?

**पर पीडेचे वाहे दु:ख। पर संतोषाचे सुख।।** असा हा दास रागीट संतापी असेल कसा ? तो आत्मज्ञानी असल्यामुळे **जेथे नाहीं दुसरी परी। क्रोध यावा कोणावरी। क्रोधरहित सचराचरीं। साधूजन वर्तती।।** (दा. ८-९-२७)

यावर एखादा चिकित्सक शंका घेऊ शकेल. श्रीमंत असो, गरीब असो, ज्ञानी असो, अज्ञानी असो, ज्याचे त्याचे भोग पूर्वकर्मानुसार होतात. ते भोग भोगून संपले पाहिजेत. मग दया कृपा दाखवून त्या भोगांचे पारिपत्य करणे, परिहार करणे, हे फल निर्माण करणाऱ्या ईश्वराला विरोध करण्यासारखे नाही काय ? ज्याचे त्याला फलभोग भोगू द्यावे, दया दाखविणे अनुचित नाही काय ? याचे उत्तर असे की ज्या ईश्वराने भोग निर्मिले, त्यानेच सुटकेचे उपायही योजिले आहेत. फलप्राप्ती ही ईश्वराधीन असली तरी मनुष्याला कर्तव्यही ईश्वरानेच सांगितले आहे. म्हणून त्याची आज्ञा प्रमाण मानूनच वागावे. **ईश्वराज्ञा पाहोजाता। भूत मात्रीं सदयता। दु:खिता कारणे विशेषत:। अहोरात्र कष्टावे।।** (ना. भ. सू. ७८-१०३१) म्हणून काया वाचा मने करून दु:ख निवारण करावे. त्याने ईश्वर संतुष्ट होतो. दया, मार्दव, कृपा ही सामान्य लक्षणे नाहीत. भक्तीने ईश्वर-कृपा झाल्याशिवाय ती असाध्य आहेत. **दुसऱ्याचे दु:खे दु:खी होणे। किंवा इतरांचे सुखे संतोष पावणे। ही**

**सामान्य नव्हेति लक्षणे। असाध्य ईश्वरी कृपेविण।।** त्याचा परोपकार ईश्वरी आज्ञा या भावनेने होतो. असा हा निरहंकारी, दयाळू, कृपाळू, मवाळु, शांतचित्त, श्री सच्चिदानंद रामाचा दास धन्य नव्हे का ?

★ ★ ★

**जगीं होईजे धन्य या रामनामे।**
**क्रिया भक्ति ऊपासना नित्यनेमें।**
**उदासीनता तत्त्वता सार आहे।**
**सदा सर्वदा मोकळी वृत्ती राहे।।५७।।**

गेल्या दहा श्लोकांत श्री सच्चिदानंद प्रभू राम याच्या धन्य दासाची बहुविध लक्षणे सांगितली. रामदासाला हे धन्यत्व कोणत्या साधन मार्गाने प्राप्त होते याचा विचार या श्लोकात सांगतात.

या कर्मभूमीत केवळ रामनाम चिंतनाने मनुष्याला धन्यत्व म्हणजे कृतार्थता प्राप्त होते. किती प्रमाणात ? समर्थ म्हणतात, तो नराचा नारायण होतो **श्री राम जय राम जय जय राम। अखंड जो स्फुरे सप्रेम। तो स्वयेचि असे पुरूषोत्तम। म्हणौनि राम न विसरावा।।** तीर्थराज नामात कर्म, भक्ती व ज्ञान या तिन्ही मार्गांचा त्रिवेणी संगम असल्यामुळे, क्रिया, भक्ती व उपासना असे तीन शब्द समर्थांनी योजिले आहेत. नामात 'न मम' या रूपाने ज्ञान आहे. या देहात आत्मचैतन्याशिवाय मी असा कोणी नाही याचा चालक, मालक एक आत्मारामच आहे. देह हे देवाचे अशी जाणीव उत्पन्न होते. यामुळे देहबुद्धी ही सहजच आत्मबुद्धी होऊन स्वरूपाची ओळख पटते. याप्रमाणे अहंकाराचा लोप होऊन 'न मम' या रूपाने ज्ञान होते. येथे ज्ञान हा शब्द न वापरता उपासना हा शब्द योजिला आहे. उपासना म्हणजे देवाजवळ वास्तव्य. नामाने देवाजवळ वास्तव्य होते, इतकेच नव्हे तर आपल्याला आपला विसर पडून देवात वास्तव्य राहते. आत्मारामाचे सान्निध्याने अज्ञान मोह घालवून त्याची ओळख पटवून तद्रूप होणे म्हणजे उपासना. उपास्य देवाचे स्मरणात 'मी' नाहीसा होणे म्हणजे उपासना. तेच ज्ञान होय. **उपासना म्हणिजे ज्ञान। ज्ञानें पाविजे निरंजन। योगियांचें समाधान। येणें रितीं।।** (दा. २०-४-२२) याच ज्ञानाला नाथ उपासना म्हणतात. **मीच देवो मीचि भक्त। पूजोपचार मी समस्त। मीचि मातें पूजित। हे इत्थंभूत 'उपासना'।।** (ना. भा. २१-४९६) याप्रमाणे न मम या रूपाने, नामाने



आत्मारामाची ओळख पटून तेच आपले रूप होय असे ज्ञान होते. नामात ज्ञानाप्रमाणे भक्तीही आहे.

नामात मनन यारूपाने भक्ती आहे. ज्या वस्तूबद्दल आपल्या मनात प्रेम असते तीच वस्तू मनात वरचेवर घोळत राहाते. तिचेच वारंवार चिंतन होते. नामात नमन ह्या रूपाने कर्म आहे. उपासनेत साधकाला तद्रूपता प्राप्त झाली तरी देहावर आले की तू देव व मी भक्त हा भाव उठून सेवा होतेच. पतिव्रतेला पतीचे ज्ञान, पति-प्रेम व पति-सेवा या तिन्हीमुळे जसे धन्यत्व प्राप्त होते, तसेच नामात कर्म, भक्ती व उपासना या त्रिवेणी संगमात बुडी दिल्याने मनुष्यास धन्यत्व प्राप्त होते. नामात असे सामर्थ्य असल्यामुळे मोठमोठ्यांनी ते साधन स्विकारले, व मी ही त्यानेच धन्य झालो, असा स्वानुभव समर्थ सांगतात. **निवाला शिव ज्या नामे। ज्या नामे वाल्मिकी ऋषी। जे नाम सकळां तारी। ते नाम मज अंतरी।। सेवकू मानवीयांचे। कष्टती बहुता परी। सेविला देव देवांचा। तेणें मी धन्य जाहलो।।**

क्रिया भक्ती व उपासना ज्यामुळे घडते ते नाम. ते साधन पाळताना एक व्रतही त्यांनी सांगितले. ते नाम अखंड घेतले पाहिजे - **'नित्य नेमे'**, सातत्यावर समर्थांचा फार कटाक्ष आहे. सतत वाहणाऱ्या पाण्याच्या ओघाखाली एखादा काळाभोर फत्तर असला तरी ते मृदु पाणी त्या फत्तराला गुळगुळीत करते, त्याला खळगा पाडते. लहान पाषाणांचे पूजेला योग्य गुळगुळीत शाळिग्राम बनवते. त्याचप्रमाणे अनंत वासनांनी बरबटलेले चित्त नित्य नाम जपाने सात्विक बनते. ते इतके की ते चित्त, चिद् होते. **नित्य नेम धरिता चित्ती। तेणें शुद्ध चित्त वृत्ती। होऊनिया भगवंती मार्ग फुटे।।** नित्य नेम कशाचा असावा ह्यालाही समर्थांनी उत्तर दिले आहे. **मानसपूजा जप ध्यान। एकाग्र करूनिया मन। त्रिकाळ घ्यावे दर्शन। मारूती सूर्याचे।।** येथे मारूति व सूर्य हे शब्द दोन अर्थाने वापरले आहेत. साधक मंद असेल तर त्याने त्रिकाळ मारूती व सूर्याचे दर्शन घ्यावे हा एक अर्थ. मारूती म्हणजे वायू व सूर्य म्हणजे आत्मा. साधक तीव्र असल्यास त्याने त्रिकाल प्राणायाम करून मन आत्मस्वरूपी स्थिर करावे हा दुसरा अर्थ. एकाग्र नामजपाने हे साधते. या नित्य नेमाची फलश्रुतीही फार मोठी आहे. त्याचा असाहाय्य स्थितीत फार उपयोग-अगदी ऐनवेळी होतो. ऐनवेळ म्हणजे अंतकाली. **अन्तकालेच मामेव स्मरन् मुक्त्वा कलेवरम्।।** (भ. गी. ८-५) समर्थ म्हणतात, स्मरण करावे लागत नाहीच. नित्य नेमामुळे ते आपोआप होते. **(१) ऐका उपायाचे वर्म। दृढ लागलीया नित्य नेम। हाचि उपाय परम। अंतसमयी।। (२) नित्य नेमाचा**

**अभ्यास। तोचि लागे निजध्यास। चुकता कासावीस अंत समयी॥ (३) वाचा खुंटता अंतर पडे। म्हणोनि अंतरीच जप घडे। स्वामी आधीच साकडे। फेडीत गेले॥** ज्ञानोबा असेच म्हणतात, **''नित्य सेविला मी निदानी। सेवकू होय॥''** म्हणून नित्य नेम पाहिजे. हे सातत्य केव्हा राहते ? अंत:करणात विषय वृत्ती नसते, पूर्ण वैराग्य असते तेव्हा. शेवटच्या दोन चरणात समर्थांनी नित्य नेमाचे सातत्य केव्हा राहते याचे उत्तर दिले आहे.

उदासीनता म्हणजे काळजी, कोठेच मन न लागणे असा अर्थ व्यवहारात होतो, पण तत्त्वत: उदासीनता हे सार आहे असे समर्थ म्हणतात. याचा अर्थ असा की ते सत्व गुणाचे लक्षण आहे. त्यात नर जन्माची सफलता आहे. असार संसारात सार काय असेल तर ती उदासीनता. कोणत्याही गोष्टीची उपाधी न वाटणे म्हणजे उदासीनता. यदृच्छालाभ संतुष्टता ही तिची खरी व्याख्या आहे. कर्तृत्व भोक्तृत्वाचा अहंकार सुटून अकर्ता तो हा उदासीनच. सुखदु:खवृत्तीपासून अलिप्त असल्यामुळे तो निजानंदातच असतो. **म्हणे दास उदास कांही न व्हावे। बरे वोखटे सर्व साहून न्यावे॥** बऱ्या वाईटाची क्षिती नसल्यामुळे सदा सर्वदा मोकळी वृत्ती राहे म्हणजेच तो तूष्णीं स्थितीत नांदतो. समाधानी असतो. विषय विकारापासून वृत्ती मोकळी असल्याशिवाय ती आत्माकार होत नाही. आत्मपदी रत होऊन, विषयांचे ठिकाणी उदासीन राहून त्याना मारण्यात जी मौज आहे ती विषयाशी त्रागा करून त्यांना कोंडून मारण्यात नाही. सहज लीलेने मोकळ्या वृत्तीने विषय दूर झाले पाहिजेत. खरा उदासीन म्हणतो - 'बाबानो या, आलात तर घर तुमचे आहे. गेलात तरी उत्तम. माझे आत्मसुख मला समजले आहे. तुम्ही त्यापेक्षा जास्त काय सुख देणार ?' म्हणून आल्या गेल्याची क्षिती नसते व वृत्तीचा प्रकाशक असा साक्षीरूपाने हा सतत राहतो.

★ ★ ★

**नको वासना वीषई वृत्तिरूपें।**
**पदार्थी जडें कामना पूर्वपापें।**
**सदा राम निष्काम चिंतीत जावा।**
**मना कल्पना लेश तो ही नसावा ॥५८॥**

मागील श्लोकात रामनामाची धन्यता सांगून, उदासीनता म्हणजे यदृच्छालाभ संतुष्टता किंवा वैराग्य हेच परमार्थाचे सार आहे व नित्य नियमाने



क्रिया, भक्ती उपासनाद्वारा आत्मानुभवाचे अमृत चाखून सहज स्वानंदात रमावे, यातच मानवदेहाची सार्थकता आहे, असेही सांगितले.

ही उदासीनता नसल्यास मनोवृत्तीचा सर्व ओढा, विषयाकडे धावतो व मन अंतर्मुख होत नाही, म्हणून या श्लोकात वासनाक्षयाची आवश्यकता मनाला पटवून देतात. वृत्तिरूपाने विषयवासना नको म्हणजे काय हे समजणे आधी, या श्लोकातील वासना, कामना, कल्पना व वृत्ती या चार शब्दांचा प्रथम विचार करू. हे सारे मनोविकार आहेत. वासना तीच कल्पना. कल्पना तीच वासना. थोडा सूक्ष्म भेद आहे. कल्पना ही सर्व विकारांचे मूळ आहे. ईश सृष्टी व जीव सृष्टी या दोन्ही कल्पनेतून स्पष्टत्वास येतात. म्हणून कल्पनेलाच माया म्हटले आहे या कल्पनेला जे जाणवते ते काल्पनिकच. **मुळी सृष्टी कल्पनेची। कल्पना आहे मुळीची॥** कल्पनेमध्ये निश्चितपणा नसतो. खऱ्या खोट्याची खात्री नसते. तेथेच आपण कल्पना करतो. म्हणूनच मायेला अनिर्वचनीय म्हटले आहे. **प्रत्यक्ष पाहता आढळे। विचार घेता नाढळे॥** अशी ही कल्पना माया आहे.

**वासना :-** ही कल्पनेतून उदय पावते. याने सुख होईल, याने दु:ख होईल अशी कोणत्याही पदार्थाबद्दल प्रथम कल्पना निर्माण होते. मग तिला अनुसरून ज्याची आवड त्या पदार्थाबद्दल इच्छा उत्पन्न होते. याप्रमाणे कल्पनाच वासनारूपाने जन्म घेते. वासना म्हणजे हवेपणा. विचार टाकून दृढ भावनेने केलेला पदार्थाचा अंगीकार म्हणजे वासना. तिचे अनेक प्रकार आहेत. लोक वासना, शास्त्र वासना, विषय वासना व देह वासना इत्यादि.

**कामना -** म्हणजे वासनेचे तीव्र स्वरूप. ज्या विषयाची वासना होते, त्याचे प्रत्यक्ष प्राप्तीची तीव्र इच्छा म्हणजे कामना.

**वृत्ती -** अंत:करणाचा प्रकाशक परिणाम किंवा निरनिराळे तरंग म्हणजे वृत्ती. सर्व ज्ञान वृत्तीलाच होते. कल्पना, कामना, वासना हे विकार मुळात जड, पण त्यांची जाणीव ज्यायोगे होते तिलाच वृत्ती असे म्हणतात. विषय वासनेची वृत्तीरूपाने जाणीवच नको. जड विकार तसेच असू देत. त्यांचे भानच नको. कारण इंद्रिय विषय संबंधामुळे ही वृत्तीच बहिर्मुख होते. ही बहिर्मुख वृत्तीच मनुष्याला बद्ध करते. म्हणजे जन्म मृत्यूच्या चक्रात अडकविते. अनात्म पदार्थापासून ही बहिर्मुख वृत्ती काढणेची झाल्यास, विषय प्रेम तुटले पाहिजे. प्रतिकूल म्हणजे नावडीची वृत्ती तुटते, पण अनुकूल म्हणजे आवडीची वृत्ती तुटत नाही आणि तिच्या निवृत्तीशिवाय मोक्ष नाही. **वासनेचे**

**मूळ छेदिल्या वाचून। नव्हे या खंडण गर्भवासा॥**

विषयाकडे ओढा नसावा असे नुसते म्हणून भागत नाही. कारण पूर्वजन्मार्जित कर्माप्रमाणे पदार्थाचे ठिकाणी कामना म्हणजे तीव्र इच्छा होते. पूर्व कर्म पापात्मक असल्यास विषयाकडे तीव्र प्रवृत्ती नसावी असे नुसते तोंडाने म्हणून चालत नाही. विषय प्रेम तुटण्यासाठी तसा प्रयत्न पाहिजे. पूर्वजन्मी पाप घडले म्हणून या जन्मी वृत्ती विषयाकडे धावते. या जन्मी सत्कर्मात वय वेचले तर, पुढील जन्मी वैराग्य लाभेल, असा विचार करून पुण्य कर्म केले पाहिजे. इंद्रिय निग्रह केला पाहिजे. **तस्माद् यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः। इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता॥** (भ. गी. २-६८)

यावर कोणी अशी शंका घेईल की पूर्वजन्मात पाप झाले असल्याने विषयाकडे मन धावणारच. तेथे प्रयत्न करून काय होणार ? या शंकेला समर्थांचे रोख ठोक उत्तर आहे. समर्थ विचारतात, हा प्रारब्ध मतलब सिंधू तुम्हांला परमार्थात तेवढा सुचतो काय ? व्यवहारात का सुचत नाही ? पूर्व पापामुळेच जर या जन्मांत रोग, प्रकृति अस्वास्थ्य, व्यथा निर्माण होतात तर प्रारब्ध म्हणून त्या सहन करीत स्वस्थ का बसत नाही ? व्यथा घालवणेसाठी अगदी आटोकाट प्रयत्न का करता ? थोडी धुगधुगी असली तरी धावपळ करून दुसऱ्याचे रक्त विकत घेऊन ते शरीरात ठासून भरतातच ना ? मग परमार्थात तेवढे प्रारब्ध आडवे का यावे ? **प्रपंची प्रयत्न करावा। आणि परमार्थी आधार घ्यावा। तुरंमूळपणे प्रयत्न न करावा हे काय बरे॥ व्यथेसी देखोन कुसमुस वाटे। प्रयत्ना कारणे प्राण फुटे। तेंव्हा जरी प्रयत्न करणे सुटे। तरी आधार घ्यावा॥** म्हणून हा आपमतलब सोडून विषयाकडे प्रवृत्ती न होण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. कोणता प्रयत्न ? याचे उत्तर पुढील चरणात सांगितले आहे. विषयाकडे धावणाऱ्या मनास राम चिंतनात म्हणजे रामनाम स्मरणात गुंतवावे. **'जगी होईजे धन्य या रामनामे'** अशी ५७ व्या श्लोकात सुरूवात करून पुढील दहा श्लोकात नामस्मरणाने धन्यता कशी प्राप्त होते हे समर्थ सांगतात, विषयाकडे पळणाऱ्या मनास वरचेवर धरून आणून नामस्मरणात गुंतवावे. **यतो यतो निश्चरति मनश्चंचलमस्थिरम। ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत्॥** (भ. गी. ६-२६) विषयाकडे धावणाऱ्या मनास विषयाऐवजी रामस्वरूपाचे आमीष दाखवावे. चंचल मासा हा आमिषामुळे गळाला अडकतो, त्याप्रमाणे चंचल मनास अंतःकरणात स्थिर करण्याला उत्तम आमीष कोणते असेल तर ते शामसुंदर रामप्रभूचे सुहास्यवदन होय. प्रथमतः हे अवघड वाटते, पण



अभ्यासाने काही न निपजे ऐसे नाही.

पण हे रामचिंतन निष्काम असावे. कारण सकाम स्मरण हे कामाचे स्मरण असते. देवाचे नसते. त्यात देवाच्या प्रेमापेक्षा फलरूप विषयसुखाचे प्रेम असते. सकाम प्रेमाने फळ मिळते. पण निष्काम भक्तीने फलदाता देव मिळतो. कल्पतरूचा लाभ होतो. येवढे सकाम व निष्काम भक्तीत अंतर आहे. **कामनेनें फळ घडे। निःकाम भजनें भगवंत जोडे। फळ भगवंता कोणीकडे। महदंतर॥** (दा. १०-७-२०)

निष्काम भजनानें वासनांचा क्षय होऊन चित्तशुद्धी होते. शुद्ध चित्तातच भगवत्प्रवेश होतो. **नामासरिसाच हरी। रिघे हृदयामाझारीं। तेणें धाकें अभ्यंतरीं। हों लागे पुरी हृदयशुद्धी॥ तेंव्हा प्रपंच सांडूनि 'वासना'। जडोनि ठाके जनार्दना। 'अहं' सांडोनि अहंपणा। 'सोहं' सदनामाजीं रिघें॥** (ना. भा. २-७७६,७७७).

निष्काम भजनाने प्रथम चित्तशुद्धी, नंतर आत्मकृपा व शेवटी आपल्या स्वरूपाची ओळख, एवढी फलप्राप्ती होत असल्यामुळे निष्काम रामभजनचिंतन करावे. हे चिंतन करायचे तरी कोठपर्यंत. त्याचे उत्तर शेवटच्या चरणात दिले आहे. कल्पनेचा लेशही न उरावा येथपर्यंत. म्हणजे विषय कल्पनेसाठी ते मन जितके हपापलेले असते तितके ते राम रूपासाठी लाचावले पाहिजे. आता विषयकल्पना पुरे इतका तिचा वीट यावा. या स्थितीचा अनुभव तुकोबा सांगतात, **आवडे हे रूप गोजिरें सगुण। पाहतां लोचन सुखावले। लांचावले मन लागलीसे गोडी। तें जीवे न सोडी ऐसे झालें॥** (गा. १०५०) रूपाला लाचावलेल्या मनाची शेवटी काय स्थिति होते त्याचे उत्तर तुकाराम देतात, **तुका म्हणे जाले एकविध मन। विठ्ठलावाचून नेणे दुजे॥** मन स्वरूपात विराल्यामुळें अन्य कल्पनेचा लेशही नाही.

अहं हे मोहाने ममत्वाने जे जगात गुंतले आहे ते नामरूपाच्या अनुसंधानाने आत्मारामात रंगले पाहिजे म्हणजे मग **तैसें भोगाआंतूनि निगतां। चित्त मजमाजीं रिगतां। हळूहळू पांडूसुता। मीचि होईल॥** (ज्ञा. १२-१०९)

★ ★ ★

**मना कल्पना कल्पितां कल्पकोटी।**
**नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी।**
**मनीं कामना राम नाहीं जयाला।**
**अती आदरे प्रीति नाहीं तयाला॥५९॥**

मागील श्लोकात विषयवासना नको, ती पूर्व पापामुळे होते, म्हणून ती नाहीशी करण्यासाठी निष्कामपणे राम भजन कर. रामचिंतन कर, हे रामचिंतन इतके सतत राहू दे की अन्य कल्पनांचा लेशही नसू दे, असे मनाला बजावले आहे. अन्य कल्पनेचा लेशही का नसावा हे या श्लोकात सांगितले आहे. बा मना ! राम असा असावा तसा नसावा अशा तू कोट्यावधी कल्पना केल्यास तरी त्यात रामदर्शन होणार नाही. कारण जो कल्पनातीत आहे तो कल्पनेत कसा सापडावा ? उलट ह्या कल्पनांचे नादी लागल्यामुळे, त्यांच्याशी तादात्म्य झाल्यामुळे आनंदरूप अमर अशा आत्म्याचे मागे दु:खरूप जन्म मरण परंपरा लागली आहे. कल्पनेचे स्वरूप काय, हे मागील श्लोकात सांगितले श्लोक क्र. ५ मध्ये 'मना कल्पना ते नको विषयांची' याचे विवेचन करताना कल्पनेचा बागुलबोवा कसा आहे, हे थोडक्यात सांगितले होते. येथे कल्पकोटी कल्पना असे शब्द असल्यामुळे कल्पनेचा सर्वांगीण विचार पाहू.

कर्म हे दृश्य स्वरूपाला येण्यापूर्वी काम ह्या स्थितीत असते. काम म्हणजे इच्छा, वासना व त्याचे सूक्ष्म रूप कल्पना होय. या कल्पनाही अनंत आहेत व त्यांचा प्रभाव मोठा आहे.

**(१) कल्पना प्रभाव** एवढा मोठा आहे की तिचे वाचून प्राण्याची हालचाल नाही. निजला तरी डोक्यात राहाते. मेला तरी वासनारूपाने जिवंत राहाते. सुख दु:ख, बंध मोक्षालाही कारण तीच. कामवासनादि विकार तिचेच. तिने तिन्ही लोक व्यापले आहेत. प्रथम हरी संकल्पाने स्फुरण पावलेली ही कल्पना जगांत पसरली आहे व ती त्याला खेळवीत आहे.

**(२) तिचा चमत्कार** असा की विचार, आचार व उच्चार या सर्वांचे मूळ कल्पनाच. कल्पना कल्पनेला जन्म देते. **ती अचंचळी निर्माण जालीं। अधोमुखे बळे चालली। अखंड वाहे परी देखिली। नाहीच कोणी।।** सर्व कारभार तिचा पण ती दिसत नाही. ती मायाही बनते व ब्रह्मही बनते. **मुळी कल्पना दो रूपे। तेंचि जाली।।** द्वैताचे मूळ कल्पानाच. **कल्पना माया निवारी। कल्पना ब्रह्म थावरी। संशय धरीं आणि वारी। तेहि कल्पना।।** (दा. ७-५-१८) ती मिथ्या असूनही तिने जगाला वेड लावले, हा चमत्कारच नव्हे काय ?

**(३) तिचे वास्तव्य** आत, बाहेर, मागेपुढे कल्पनाच. अनात्मवर्ग सर्व तीच. महाकारण देह ज्ञान, कारण देह अज्ञान व लिंगदेह वासना, मिळून ज्ञान, अज्ञान व वासना या तीहींचे मिश्रण म्हणजे कल्पनाच. तीन देव, तीन गुण तीन भुवने सर्व कल्पनाच बनली. **अष्टधा प्रकृतींचें मूळ। संकल्परूपचि केवळ। नाना संकल्पे देह फळ। घेऊनि आलें।।** (दा. १८-४-२७) पिंड



ब्रह्मांडाचे मूळ हीच हरीची ज्ञानप्रभा, संकल्पाद्वारे फाकली. अनेक व्हावे असे त्या प्रभेला वाटले. त्यासाठी इच्छा शक्ती, क्रिया शक्ती, द्रव्य शक्ती, ज्ञान शक्ती आणि चित् शक्ती. अशा पंच शक्ती निर्माण होऊन पिंड ब्रह्मांड उभारणी झाली. समर्थ म्हणतात, **निश्चळामध्यें चंचळ। तेचि कल्पना केवळ। अष्टधा प्रकृतीचें मूळ। कल्पना रूप।।** (दा. ११-१-५) सारांश जगाला जन्म देणारी, जीवाला जन्म देणारी, चालवणारी, वळविणारी, बोलविणारी व आटणी करणारी एकच प्रकृती असून तिचे मूळ कल्पनाच होय.

एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे, ती ही, की हरीपासून अकल्पीत संकल्प झाला, तरी हरी हा कल्पनातीतच. हे अनुभवाने जाणता येते. कसे ते पहा. मी च्या अस्तित्वावर अनेक कल्पना उठतात. त्या दिसतात म्हणजे त्यांची जाणीव होते. हे जागृतीतील मनोराज्यावरून अनुभवाला येते. तसेच स्वप्नसृष्टी आपले अस्तित्वावर चालते व त्याची जाणीव होते म्हणजे ज्याला मनोराज्य अथवा स्वप्न यांची जाणीव झाली, तो मी या दोहोंच्या कल्पना खेळापासून भिन्नच आहे. त्याप्रमाणे ज्या आत्मसत्तेवर पिंड ब्रह्मांड खेळाची उभारणी झाली तो आत्माराम या कल्पना प्रकृती पासून अलिप्तच असतो. **अगा प्रकृतिपरौता। एकु आथी पंडुसुता। ऐसा प्रवादू तो तत्वता। पुरूषु हा पैं।।** (ज्ञा. १३-१०२८) आपण कल्पनातच गुंग होऊन राहिलो तर राम दूरच रहातो. कल्पनातीत आत्माराम कल्पनेचा प्रांत ओलांडून गेल्याशिवाय भेटणार नाही हे निश्चित.

आपण सर्व ईश्वराचे अंश. पण अंशच जर कल्पना भ्रमात सापडला तर मूळ पद कसे गाठणार. एका राजास तीन पुत्र होते. मैलावर असलेल्या मंदिरातील शिवदर्शन घेऊन जो प्रथम राजाला भेटेल त्याचे राज्य. ह्या मैल भराचे अंतरात मोहक वस्तूंचे प्रदर्शन असते. दोघे पुत्र प्रदर्शनात रंगतात. धाकटा मात्र प्रथम शिवदर्शन, नंतर राज दर्शन घेऊन मगच प्रदर्शनात रंगतो. जे मोहात अडकले ते राजपदाला मुकले. तसेच विषय कल्पनेत गुंग होणाऱ्या जीवास राम भेट नाही. कारण त्यांना रामापेक्षा विषय प्रीती अधिक असते. जेथे विषय प्रेम तीव्र तेथे रामाबद्दल प्रेम कोठून असणार ?

त्यांच्या स्थितीचे ज्ञानोबा वर्णन करितात, **पाहें पां शरीराचिया गांवा। जयालागीं आले पांडवा। तो कार्यार्थु आघवा। सांडुनिया।। इंद्रियग्रामींचां राजबिदीं। अहंममतेचियां जल्पवादीं। विकारांतरांची मांदी। मेळविताती।। दु:खशोकांचा घाई। मारिलियाची सेचि नाही। हे सांगावया कारण कांही। जे ग्रासिले माया।। म्हणोनि ते मातें चुकले।।** (ज्ञा. ७-१०५ ते १०८)

विषय कल्पनांच्या नादी लागल्यामुळे राम दर्शन होणार नाही. आपले स्वरूप कळणार नाही, म्हणून **संकल्पप्रभवन् कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषत:।।** (भ. गी. ६-२४) शुद्ध कल्पनांनी मलीन कल्पनांचा नाश करून शुद्ध कल्पना जेव्हा रामरूपात विराम पावतील तेव्हा राम भेट होईल. **आपुलेने अनुभवे। कल्पनेसि मोडावे। मग सुकाळीं पडावें। अनुभवाच्या।।** (दा. ७-३-४८) मानवी जीवनावर असलेल्या या कल्पना साम्राज्याची अध्यात्मिक दृष्टीने विस्तारपूर्वक माहिती पाहिजे असेल तर साधकाने श्री. पां. गो. चिंचाळकर यांचे आत्मानुसंधान हे पुस्तक अवश्य वाचावे.

★ ★ ★

**मना राम कल्पतरू कामधेनू।**
**निधी सार चिंतामणी काय वानूं ?।**
**जयाचेनि योगें घडे सर्व सत्ता।**
**तया साम्यता कायसी कोण आता ?।।६०।।**

कोट्यावधी कल्पनानी राम भेट होणार नाही. कल्पनेचा प्रांत ओलांडल्या खेरीज म्हणजे नि:संकल्प झाल्याखेरीज त्या कल्पनातीत रामाची भेट नाही, असे मागील श्लोकात सांगितले. हा कल्पनातीत राम आहे तरी कसा ? याचे उत्तर या श्लोकात दिले आहे. निरनिराळे दृष्टांत देऊन रामरूप सांगून शेवटी तो अनुपम्य आहे असे सांगतात.

अरे मना, हा राम कल्पतरूसारखा आहे. जी कल्पना करावी तिचे दान देणारा आहे. अरे तो कामधेनूही आहे. जी इच्छा करावी ती अचूक पदरात टाकणारा आहे. तो उदार दाता आहे. तो चिंतिलेली वस्तू प्राप्त करून देणारा - चिंतामणी आहे. तो सर्व वस्तूंचा ठेवा (निधी) आहे. अरे, बहूरत्ना वसुंधरा ज्याचे आधारावर नांदते. त्याचेपाशी उणीव कशाची राहणार ? इतकेच काय पण तो रामच सर्व सार आहे. म्हणजे आदि, मध्य, अवसानी चिरंतन आहे. त्याचे वर्णन तरी कसे करावे ? ज्याच्यासारखी अन्य कोणती वस्तुच नाही, त्याचे वर्णन कोणत्या पदार्थ दृष्टांताने करावे ? तो राम कल्पतरू आहे. कामधेनू आहे. चिंतामणी आहे असे कितीही वर्णन केले तरी- **परी हे हीन दृष्टान्त। केवि श्रीरामी शोभत। दृष्टान्त वस्तूसी वस्तुत्त्व। ज्याचि ये सामर्थ्ये।।** ज्या वस्तूचा दृष्टान्त द्यावा त्या वस्तूला जे रूप प्राप्त झाले तेच मुळी रामाच्या सामर्थ्यांने. मग त्या रामाचे वर्णन कोणत्या दृष्टान्ताने करावे ? पायापासून छपरापर्यंत घराला आधार आकाशाचा. आकाशात ते उठते, राहते व पडते



त्याच्याशिवाय घर उठूच शकत नाही. घरातील माणसे वावरत असतात आकाशात पण समजतात घरांत. मग घरातील कोणत्या वस्तुच्या दृष्टांताने आकाशाचे वर्णन करणार ? पाया, सोपा, माजघर, देवघर, माडी, छप्पर इत्यादिकांचे अस्तित्व आकाशामुळे. घरापूर्वी तेच, घर असताना तेच व घर पडले तरी तेच उरते. **कामधेनू कल्पतरू। निधी चिंतामणी सारू। राम सत्ता मात्रे थोरू। असता परी।। कैसी रामी बरोबरी। करिती बापुडी भिकारी। रामसत्ता अनुपम्य खरी। भुवनत्रयी।।** ज्या रामावर पिंड ब्रह्मांडाचा डोलारा अवलंबून, जो अनादी त्या आत्मारामाचे वर्णन कोणत्याही दृष्टांताने होणार नाही.

ज्याप्रमाणे आकाशाचे आधारावर नांदणाऱ्या घराच्या उत्पत्ती, स्थितीलयाचा आकाशासी कांहीही संबंध नाही, त्याप्रमाणे उत्पत्ती स्थितीलयात्मक सृष्टीचा व आत्मारामाचा अर्थाअर्थी कांही संबंध नसून, त्याचे खरे स्वरूप निराळे आहे. तो सृष्टीपूर्वी, सृष्टी असताना व सृष्टीनंतर अनादि चिरंतन असा आहे. सृष्टी वेगळाच आहे. **म्हणोनि भूताचा कर्दम। यांसी अलिप्त आत्मारामु। अविद्या गुणे मायाभ्रमु। सत्यचि वाटे।।** (दा. ८-१-४२) ज्याचे कर्तृत्व आपण परमात्म्यावर लादतो ते पदार्थ तरी सत्य कोठे आहेत. **पदार्थ वस्तू नासिवंत। हें तों प्रत्ययास येत। या कारणें भगवंत। पदार्थावेगळा।।** (दा. ८-१-४६) मग नाशवंत पदार्थ दृष्टांताने शाश्वत असे आत्मारामाचे रूप ध्यानात कसे यावे ? कल्पना त्याचे सत्तेवरच उठतात, राहतात व नाहीशा होतात. पण तो कल्पनातीत असल्यामुळे त्याचे वर्णन कल्पनेत सापडू शकत नाही. **एवं कल्पनेरहित। तया नाव भगवंत।**

असा हा कल्पनातीत,सृष्टीवेगळा, निवांत, अनुपम्य असा श्रीराम आहे. मग प्रश्न असा पडतो की, अक्षर, अव्यय अनादि सच्चिदानंद इ. लक्षणांनी ते कसे सांगितले जाते ? ब्रह्माचे लक्षण शब्दाने करता येत नाही; पण मुमुक्षूला कल्पना यावी म्हणून सत्-चित् आनंद इत्यादि सापेक्ष रीतीने त्याचे वर्णन केले जाते.

★ ★ ★

**उभा कल्पवृक्षातळीं दु:ख वाहे।**
**तया अंतरी सर्वदा तें चि आहे।**
**जनीं सज्जनी वाद हा वाढवावा।**
**पुढें मागुता शोक जीवीं धरावा।।६१।।**

कल्पतरू, चिंतामणी, कामधेनू यांचेहीपेक्षा श्रेष्ठ असे रामाचे स्वरूप

असून ते निरूपम आहे असे मागील श्लोकात सांगितले. यावर असा प्रश्न येतो की ‘असा सर्व कामना पुरवणारा देव जर आहे तर मनुष्याला दु:ख का ? त्याला न भजणाऱ्यांना दु:ख असेल पण त्याचे भजन करणाऱ्यांना ही दु:ख आहेच. असे का ? याचे उत्तर ह्या व पुढील दोन श्लोकात दिले आहे. भक्ती मार्गाला लागणाऱ्यांचे तीन प्रकार. मुमुक्षू, साधक व सिद्ध. हा श्लोक मुमुक्षूंसाठी आहे. त्याचे कारण पुढच्याच श्लोकात दिले आहे. मुमुक्षूचा प्रपंचस्वार्थ सुटला असला तरी व त्यास मोक्षाची इच्छा असली तरी देवाबद्दल किंवा साधनाबद्दल त्याचा निश्चय झालेला नसतो. कोणीतरी मार्गदर्शन करणारा मिळावा, असे त्यास वाटते **नाना तीर्थे धुंडाळिलीं। शम दमादि साधनें केलीं। नाना ग्रंथांतरें पाहिलीं। शोधूनियां॥ तेणें नव्हे समाधान। वाटे अवघाच अनुमान। म्हणे रिघों संतास शरण। या नाव मुमुक्षू॥** (दा. ५-८-३८,३९) अशा असमाधानी अनिश्चित वृत्तीच्या भांबावलेल्या मुमुक्षूला तू देवाचे सत्तेखाली नांदतोस, सर्व देवांचा देव तुझ्या अंतरीच आहे, वादाच्या भानगडीत न पडता परमार्थाला पोषक असे उचित संकल्प करीत राहशील तर ते रामकृपेने सिद्ध होतील असे ह्या श्लोकात सांगतात.

हे शरीर ज्याचे सत्तेवर चालते तो राम कल्पतरूप्रमाणे कोणताही मनोरथ पुरवण्यास समर्थ आहे. त्याचे छायेखालीच आपण उभे आहो. कल्पतरू खाली जी इच्छा करावी ती सफल व्हावी, हा त्याचा स्वभाव. सुखाची इच्छा धरली तर सुख होते. दु:खाची इच्छा धरली तर दु:ख, दारिद्र्य येते. **जया पुरूषास जें ध्यान। तयासि तेंचि प्राप्त॥** (दा. ५-६-६३) असा हा राम असल्यामुळे मनुष्य जो मनोरथ धरितो तोच त्याला प्राप्त होतो. मी दु:खी, मी पापी, मला जन्ममरण आहे. विषयापासूनच सुख होईल, असे त्याला वाटते. वासना तसे फळ, असे मनुष्य सहज बोलून जातो. दु:खरूप अशा विषयवासनेचेच जर मनात चिंतन तर तेच फळ पदरात पडते. **जैसें कल्पतरूतळवटीं। बैसोनि झोळिये पाडी गांठी। मग निदैव निधे किरीटी। दैन्यचि करूं॥** (ज्ञा. ९-३११)

पण तेच संकल्प,उचित,सत्य, शास्त्रीय असल्यास तेही पूर्ण होतात. **जैसें चित्त जयावरि। तसे जवळी ते दुरी। अवघें जाणें सूत्रधारी। कोण नाचे कोणेपरी। तुका म्हणे बुद्धि। ज्याची तेच तया सिद्धि॥** (गा. ३७६१)

जिवाला पदार्थापासून लाभणारे सुख आवडते व तेच खरे असे वाटते. पण ते परिश्रमाने मिळणारे, अनिश्चित क्षणिक, असल्यामुळे त्यापासून



दु:खच होते. कल्पवृक्षाखाली बसून दु:खाचेच चिंतन केल्यास दु:खच होणार. राम म्हणतो, तुम्हाला विषय सुखच गोड वाटते ना ? मग तेच भोगा. दु:ख झाल्यास मी जबाबदार नाही. कारण ती तुमचीच मागणी आहे. सुखरूप मी पाहिजे असल्यास तसा संकल्प करा. मी भेटण्यास हात पसरून उभा आहे. समर्थ म्हणतात, **‘‘सर्व सांडून शोधा मजला। ऐसें देवचि बोलिला। लोकीं शब्द अमान्य केला। भगवंताचा॥ म्हणोन नाना दु:खे भोगिती। सर्व काळ कष्टी होती। मनीं सुखचि इच्छिती॥ परी तें कैचें॥’’** (दा. १३-७-२३,२४)

ज्यापासून सुख मिळते त्या स्थानाचा संकल्पच नाही. दु:खकारक कल्पनांचे मात्र सतत चिंतन. मग तेच प्राप्त होणार. **श्रीराम सखा असता शिरी। जो बुडे चिंता सागरी। तेणे कल्पवृक्ष तळी। रूदन आरंभिले॥** असा प्रकार नाही का ?

मनुष्य आपले चुकते कोठे ते पहात नाही. करू नये ते करतो, वर माझेच खरे म्हणून वाद घालतो. समर्थ म्हणतात, आपलेच संकल्प आपणांस बाधक होत आहेत याची जाणीव न ठेवता, दु:ख भोगीत असताही, तो लोकांशी, सज्जनांशी वाद घालीत राहातो. सृष्टीकर्ता धर्ता सर्व देवांचा देव एक आत्माराम आहे, तो आपल्याजवळ आहे, याचा तो विचारही करीत नाही. **द्रष्टा साक्षी तीही लोकी। मुळीचा मूळ ईश्वरू। गणेश शारदा जाला। मल्हारी क्षेत्र पाळतो॥**

आपल्या देहात साक्षीरूपाने रामच आहे. तोच सर्व देवांच्या रूपाने नटलेला आहे. हे लक्षात न घेता विषय कामना पूर्तीसाठी तो अन्य देवातांचे ऊंबरठे झिजवतो. हेच बरोबर म्हणून वाद घालतो. **पाहों जातां पृथ्वीवरी। देवांची गणना कोण करी॥** (दा. ५-४-९) अनेक देव, अनेक भक्त,जो तो आपल्या देवाचा अभिमान धरून हाच श्रेष्ठ म्हणून वाद घेतो. मुख्य हृदयस्थ देव राहतो बाजूला. ज्याच्या सत्तेखाली नांदायचे त्यालाच बाजूला ठेवायचे. **आपल्या दैवतांचा। अभिमान जन घेती साचा। तेणे अनंत जगदीशाचा। विसर पडे॥ मतामतांचा गलबला। कोणी पुसेना कोणाला। जो जे मतीं सांपडला। तयास तेंचि थोर॥** (दा. ११-२-२५) वास्तविक संकल्प उठावयाचे अंत:करणात, ते पाहणारा अंत:साक्षी हृदयात. त्या अंत:साक्षीला बाजूला ठेऊन, केवळ वादाने शेवटी शोकच पदरात येणार. जन्मदात्या प्रेमळ आईला सोडून मानलेल्या आईमागे लागण्यात काय अर्थ आहे ? कोणते समाधान ? समर्थ म्हणतात वादविवादाचे भानगडीत न पडता हृदयस्थ परमात्म्यावर श्रद्धा ठेऊन योग्य संकल्प करावा. **म्हणोनि जे अविद्या। सांडून धरावी सुविद्या। तेणें**

**गुणे जगद्वंद्या। पाविजे शीघ्र॥** (दा. ५-६-६४)

★ ★ ★

**निजध्यास तो सर्व तूटोनि गेला।**
**बळे अंतरीं शोक संताप ठेला।**
**सुखानंद आनंद भेदें बुडाला।**
**मनी निश्चयो सर्व खेदें उडाला ॥६२॥**

मागील श्लोक मुमुक्षूला अनुलक्षून असावा, असे सांगितले होते. त्यासंबंधी थोडे स्पष्टीकरण करूं व मग ह्या श्लोकाकडे वळू. ५२ व्या श्लोकात **न लिंपे कदा दंभ वादे विवादे। करी सूख संवाद जो उगमाचा॥** असे धन्य रामदासाचे लक्षण सांगतेवेळी, भक्तीमार्गात वादविवाद हे विघ्न आहे, **'वादोनावलंब्य:।'** असे सांगितले होते. असे असूनही ६१, ६२ व ६३ ह्या श्लोकात 'वाद करू नये' असे पुन: पुन्हा समर्थ सांगतात. ते का ? परमार्थ उपदेशात समर्थ द्विरूक्ती हा दोष समजत नाहीत उलट, **कर्म केलेंचि करावें। ध्यान धरिलेंचि धरावे। विवरलेंचि विवरावे। पुन्हा निरूपणी॥** (दा. ११-५-१) ही त्यांच्या उपदेशाची पद्धत आहे. वाद घातक आहे सांगणेसाठी ओळीने तीन श्लोक का ? या मागे कांही हेतू असावा असे वाटते. ५२ व्या श्लोकात रामभक्त वावडा वाद करीत नाही एवढेच सांगितले, येथे व पुढील श्लोकात मुमुक्षू, साधक व सिद्ध ह्या तिनीही अवस्थेतील परमार्थमार्गीयांना वाद हितकारी नाही, असे त्यांना सांगावायाचे आहे. मागील श्लोक मुमुक्षूसाठी होता. हा श्लोक साधकासाठी आहे व पुढील श्लोक सिद्धासाठी आहे. ६४ व्या श्लोकात बद्धाचे लक्षण आहे. **संसारदु:खे दुखवला। त्रिविध तापें पोळला। निरूपणें प्रस्तावला। अंतर्यामीं।** (दा. ५-८-३) **ऐसा पोटीं पस्तावला। निरूपणे पालटला। तोचि मुमुक्षू बोलिला। ग्रंथांतरी॥** (दा. ५-८-२३) असे मुमुक्षू लक्षण आहे. प्रपंचाला विटून पश्चाताप पावून कांहीतरी पारमार्थिक हित व्हावे, मोक्ष लाभावा असे त्याला वाटते. यासाठी तो कांही श्रवण करितो. ग्रंथ वाचतो. मनन करितो. शंका समाधान करून घेतो पण सर्व संशय फिटले नसल्यामुळे त्याच्या बुद्धीचा निश्चय झालेला नसतो व साधनही निश्चित झालेले नसते. यासाठी त्याने सामान्य जनाशी अथवा सज्जनाशी वादविवाद करण्याचे भानगडीत न पडता, कल्पवृक्षासारख्या आत्मारामाचे छायेखाली परमार्थाला घातक म्हणजे अविद्यात्मक असे संकल्प न करता, परमार्थाला पोषक म्हणजे



सुविद्यात्मक असे संकल्प करीत जावे, असे मागील श्लोकात बजावले. येथे साधकाला समर्थ बजावतात की, तू जर वादाच्या फंदात पडशील तर **निजध्यास तो सर्व तूटोनि गेला। बळे अंतरी शोक संताप ठेला॥** साधकाला मुख्य देव कोण ? त्याचे स्थान कोठे ? त्याची उपासना कशी करावी ? आपण कोण ? इत्यादि ज्ञान झालेले असते. त्याचा साधन मार्गही निश्चित झालेला असतो, पण झालेले ज्ञान दृढ होण्यासाठी व साक्षात्कारासाठी, त्याचा निदिध्यासनाचा अभ्यास चालू असतो. **उपदेशिलें आत्मज्ञान। तुटलें संसारबंधन। दृढतेकारणें करी साधन। या नाव साधक।** (दा. ५-९-४) परंतू या अवस्थेत ज्ञान झाले असले व साधन ही चालू असले तरी प्रथम प्रथम कांही संशय उठत असतात. पुढे हळूहळू ते साधन अभ्यासाने नाहीसे होतात. **साधकासि संदेहवृत्ती। पुढें होतसे निवृत्ती॥** (दा. ५-१०-१२) अशा या अवस्थेत त्यानेही वाद करू नये. कारण **उपासना विस्मृति योगे। मनी संशय उपजो लागे। क्षणक्षण विक्षोभे मन भंगे। साधकाचे॥** समर्थ म्हणतात, आपल्या निजध्यासात खंड पडतो व बळे म्हणजे आपणहून आपलाच शोक संताप वाढवणेस मदत होते. वास्तविक साधकाने सतत निजध्यासात राहिले पाहिजे. म्हणजे आपण देह नाही, स्थूल कूश नाही, आपण ना मन, ना बुद्धी, ना चित्त, ना अहंकार, अशा प्रकारे विजातीय प्रत्ययांचा तिरस्कार करून आपण अमर, अक्रिय, असंग, साक्षी, सच्चिदानंद-स्वरूप आहो, अशा सजातीय प्रत्ययांचा प्रवाह मनात ठेवणे व तो स्थिर करणे म्हणजे **निजध्यास**, पण साधक जर वादविवादात पडला तर हा निजध्यास खंड पावतो, तुटून जातो.

वादात प्रतिस्पर्ध्याला जिंकण्यासाठी निरनिराळ्या अनात्म वृत्ती उठू लागतात. सर्वत्र भगवत् स्वरूप पाहणेऐवजी तो खोटा, मी खरा, असा मी तू पणा वाढून द्वैतभाव बळावतो व द्वेषबुद्धी निर्माण होते. आणि सर्वात वाईट गोष्ट म्हणजे निजध्यासाच्या अभ्यासाने कमी झालेली देहबुद्धी अहंकारामुळे पुन्हा बळावू लागते. एकदा अभिमान थै थै नाचू लागला की त्यामागून मत्सर, द्वेष, क्रोध इत्यादि षड्रिपूंची परंपरा मागे लागते व नसता शोक संताप ओढवून घेतला जातो. **एवं षड्रिपू बळावती। मन पावे अधोगती। तेणे उपासना विस्मृती। सहजचि होय॥** केवढा हा अध:पात आत्मघात! चालत्या गाड्याला आपणहून घातलेली ही खीळच नव्हे काय ? एक चित्ताने आनंदघन आत्मारामाशी तादात्म्य पावून, सुख व आनंद भोगणारा हा साधक, साधन मार्गापासून दूर लोटला जातो. याचा निश्चय डळमळतो आणि आनंदसागरात

मत्स्याप्रमाणे विहार करणारा असा हा, जगज्जीवनापासून दूर होऊन दु:खात तडफडतो. हे एवढे कशाने झाले ? **या सर्व पतनाचे मूळ। जनी वाचाळता केवळ। तरी तो कासया वहावा निर्फळ। वादवेवाद॥**

★ ★ ★

**घरीं कामधेनू पुढें ताक मागे।**
**हरीबोध सांडूनि वेवाद लागे।**
**करीं सार चिंतामणी काचखंडे।**
**तया मागतां देत आहे उदंडे ॥६३॥**

मागील श्लोकात साधकाने, वृत्ती नि:संदेह झाली नसल्याने, वादविवादात न पडता आपले निजध्यासाचे साधन चालू ठेवावे, कारण वादविवादाने उपासना विस्मृती होऊन विक्षेप उत्पन्न होतात, असे सांगितले. या श्लोकात नि:संदेह झालेल्या सिद्धाला वादविवाद न करणेचा उपदेश केला आहे. स्थिरबुद्धी झालेल्याने वादाचे अवलंबन केल्यास त्याला हीनत्व कसे प्राप्त होते, हे एक दृष्टान्त देऊन समर्थ सांगतात.

घरी कामधेनू आहे. ती असल्याची जाणीव आहे. असे असताना जर एखादा ताकासाठी दारोदार हिंडू लागेल तर ते वेडेपणाचे कृत्य होणार नाही काय ? **कामधेनू असता द्वारी। ताक मागणे घरोघरी। तेणे पढत मूर्खता पदरी। येऊ पाहे॥ शहाणे असोनी मूर्ख। तया नांव पढतमूर्ख॥** (दा. २-१०-१,२) वास्तविक हा सिद्धपुरूष केवळ शहाणाच नव्हे, तर सर्व संशय फिटून ज्याला आत्मज्ञान झालें आहे व जो स्वरूपानंद चाखणारा आहे, असा. असतो. **स्वरूप होऊनी राहिजे। तया नाव सिद्ध बोलिजे॥** (दा. ८-९-४) असा ज्याला हरीबोध म्हणजे आत्मबोध झाला आहे, जो ते आत्मसुख अनुभवित आहे, त्याला वादाची जरूर काय ?

स्वरूप स्थिती म्हणजे केवळ आनंदमय अवस्था, वृत्ती उठो, राहो वा जावो, तिचे आपण प्रकाशक, तिचा आपल्याला स्पर्शसुद्धा नाही. त्यामुळे आपल्या ज्ञानानंदात कसलाच बिघाड नाही, असा निश्चय करून त्या आनंद-मात्र स्थितीत राहणेचा अभ्यास म्हणजे स्वरूप निष्ठेचा अभ्यास. अशी ही आनंदमय स्थिती सोडून शोककारी वाद का करायचा ? **स्थितप्रज्ञ होवोनिया। श्रीराम कर्ता जाणोनिया। शोककारी वादवाया। कासया करावा॥**

वास्तविक स्वरूपानंदात राहणाऱ्या मनुष्याला कर्तव्यही काही उरलेले



नसते. **यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानव:। आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते॥** (भ. गी. ३-१७) जे तो आत्मबोधें तोषला। तरी कृतकार्यु देखें जाहला॥(ज्ञा. ३-१४७) मन शांत झालेले, रजोगुणात्मक (कामक्रोधादि) विकार नष्ट झालेले, चैतन्य सुखाचा अनुभव आलेला, अशा कृतार्थ पुरूषास वादापासून मिळवावयाचे काय ? म्हणून हरीबोध सोडून दुसऱ्याशी वाद करणे म्हणजे घरी कामधेनू असून शेजारी ताकाची भीक मागणे सारखेच होय.

चिंतलेले कार्य सिद्ध करणारा खरा चिंतामणी हाती असताना त्याचेकडे काचेचे तुकडे मागण्याप्रमाणे, हरीबोध असताना वादाची इच्छा करणे हे दरिद्री लक्षण आहे. अथवा **चिंतामणी असता करी। तया मागे काच खंडे परी। तो जन्म दरिद्री भिकारी। भागू नेणे सर्वथा॥** कल्पतरू चिंतामणी व कामधेनू या दृष्टान्तानी, मुमुक्षू असो, साधक असो की सिद्ध असो, वादामागे लागणे म्हणजे ज्ञानमार्ग सोडून, साधनापासून भ्रष्ट होऊन, आडमार्गाला लागणेसारखे आहे, असे समर्थांनी सुचवले आहे. समर्थ म्हणतात, **''तेवी श्रीसद्गुरूभक्त। करू लागता वाद वेवाद। तेणे शुद्ध ज्ञानाचा पथ। चुकोनि गेला॥ तस्माद वादवेवाद सोडावा। सुख संवाद सर्वथा करावा। ब्रह्मगोळ अवघा भरावा। श्रीरामदासे॥''**

★ ★ ★

**अती मूढ त्या दृढ बुद्धी असेना।**
**अती काम त्या राम चित्तीं वसेना।**
**अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा।**
**अती वीषई सर्वदा दैन्यवाणा ॥६४॥**

ज्याला आपले हित कशात आहे, हे समजले आहे असा मुमुक्षु, प्रत्यक्ष परमार्थ साधनेत असलेला साधक, आणि पूर्ण नि:संदेह होऊन आत्मप्रत्यय आलेला सिद्ध, या तिघांनीही वादात पडू नये, असे मागील श्लोकात सांगितले. ही तीनही माणसे स्वकल्याण जाणून योग्य मार्गाला लागलेली माणसे. अशांनी वादात पडणे म्हणजे शहाणे असून मूर्खपणा पदरी घेतल्यासरखे होते. आता ज्यांना स्वहित कळत नाही, जे घोर अज्ञानामुळे विषयासक्त होतात, अशा परमार्थापासून पराङ्मुख असलेल्या बद्धाची अवस्था कशी असते, ते या श्लोकात सांगतात.

या श्लोकात प्रत्येक चरणाचे आरंभी समर्थ अती हा शब्द योजितात. **'अति सर्वत्र वर्ज्ययेत'** किंवा 'अति तेथे माती' असे नेहमी म्हटले जाते.

कोणतीही गोष्ट बरी असो वा वाईट असो ती अति-अतिशय झाली की सर्व बिघडले. शहाणपण चांगले पण अति शहाणपण केव्हाही वाईट. मूर्खपणा वाईटच. पण अतिमूर्खपणा त्याहूनही वाईट. **पुत्र कळत्र दारा। इतुकाची मानुनियां थारा। विसरोन गेला ईश्वरा। तो एक मुर्ख॥** (दा. २-१-४०) यालाच बद्ध असेही म्हणतात. **नेत्रीं द्रव्य दारा पाहावी। श्रवणीं द्रव्य दारा ऐकावी। चिंतनीं द्रव्यदारा चिंतावी। या नाव बद्ध॥** (दा. ५-७-४०) **करी परमार्थाचा त्याग। या नाव बद्ध।** हा झाला मूर्ख किंवा बद्ध. आता अतीमूर्ख किंवा अती बद्ध कोण ? समर्थ म्हणतात, ‘‘**परम मूर्खामाजी मूर्ख। जो संसारी मानी सुख। या संसारदु:खा ऐसें दु:ख। आणीक नाही॥**’’(दा. २-१०-४०) याचे ठिकाणी तमोगुणाचे प्राबल्य असल्यामुळे, त्याची स्थिरबुद्धी नसते. इतकेच नव्हे तर विपरीत बुद्धी असते. **अधर्म धर्ममिती या मन्यते तमसावृता। सर्वार्थान्विपरीतांश्च बुद्धि: सा पार्थतामसी॥** (भ. गी. १८-३२)

ही बुद्धी धर्माला अधर्म समजते व कार्याबद्दल या बुद्धीची विपरीत, उलट समजूत असते मग अशा बुद्धीला योग्य तो निश्चितपणा कसा असणार ? दृढ बुद्धी म्हणजे व्यवसायात्मिक बुद्धी, निश्चय स्वभावाची बुद्धी. हा निश्चय कोणता ? **ईश्वरावाचून कांही। जिये आणिक लाणी नाही॥** ईश्वरावाचून जिला अन्य आश्रय स्थान नाही अशी ही बुद्धी, पारमार्थिक दृढ बुद्धी, विपरीत समजूतीचे, अति मूढाचे, ठिकाणी असत नाही, त्याची उलटीच समजूत असते. **मानिला प्रपंची आनंद। केला परमार्थी विनोद। भ्रांत मूढ मतिमंद। लोधला कामीं॥** (दा. ५-३-५७) दु:खरूप संसारात आनंद मानून तो परमार्थ थट्टेवारी नेतो आणि कामासक्त होतो. उत्कट कामनेमुळे काय होते हे दुसऱ्या चरणात स्पष्ट केले आहे. मनुष्यास उलटी प्रवृत्ती म्हणजे करू नये ते करावे असे वाटणाऱ्या बुद्धीचे बीज या कामात आहे. या कामातूनच क्रोध लोभादिविकार उत्पन्न होतात. काम म्हणजे विषय वासना. विषयाभिलाष मग तो स्त्रीसंबंधी असो किंवा अन्य कोणत्या आवडत्या विषयासंबंधी असू-दे. हा काम मनुष्याचा दुर्जय असा वैरी आहे. कारण इच्छा नसताही पाप घडविणारा हा कामच, म्हणून ज्याने काम जिंकला, त्याने जग जिंकले, अशी म्हण आहे. असा काम उत्कट जेथे असणार तेथे रामाची आठवण कोठून ? उत्कट कामाने व्याप्त अशा चित्तात रामाला थारा कसा मिळावा ? काम आहे तेथे राम नाही व राम आहे तेथे काम नाही. पुढे ८७ व्या श्लोकात समर्थ म्हणतात, ‘‘**मुखी राम त्या काम बाधू शकेना।**’’ एका म्यानांत दोन तलवारी नांदत नाहीत. **चाहे**



**चाखे प्रेमरस। चाहे राखे मान। एक म्यान मे दो खडग्। देखा सुना न कान॥** जेथे अति काम तेथे एकविध भक्ती नाही. पण जेथे अति काम तेथे अति लोभ मात्र होतो. दोघांची उत्पत्ती रजोगुणापासून होते. **लोभ: प्रवृत्तिरारम्भ: कर्मणामशम: स्पृहा। रजस्येतानि जायन्ते विवृद्धे भरतर्षभ।** (भ. गी. १४-१२) रजोगुण उत्पन्न होऊन वाढला की तो थै थै नाचवतो. स्वस्थ बसूच देत नाही. चित्त चांचल्य निर्माण करितो. त्यामुळे असमाधान वृद्धी पावते व अफाट लोभ वाढतो, **परदारादिक पडे। परी विरूद्ध ऐसें नावडे। मग शेळीयेचेनि तोडें। सैध चारी॥** (ज्ञा. १४-२२९) **हा ठायवरी लोभू॥** (२३०) अशी विषय तृष्णा वाढली-विषय सेवनाची उत्कट हाव निर्माण झाली की सर्व जीवन कष्टमय होते. **जालीं विषई वृत्ति अनावर। दृढ धरिला संसार। परमार्थचर्चेचा विचार। मळिण झाला॥** (दा. ५-३-५५)

विषयात गुंग झालेल्या मनाला परमार्थाची आठवण कशी व्हावी ? **मोड घेतला परमार्थाचा। हव्यास धरिला प्रपंचाचा। भार वाहिला कुटुंबाचा। काबाडी जाला॥** (दा. ५-३-५६)

तुकाराम महाराजही म्हणतात, ‘‘**आयुष्य वेचोनि कुटुंब पोशिले। काय हित केले सांगा बापा॥ फुकाचा चाकर झालासी काबाडी। नाही सुख घडी भोगावया॥ तुका म्हणे ऐसे आयुष्य नासिले। पाप ते संचिले पतनासी॥**’’ अति मूर्खतेमुळे किंवा अज्ञानामुळे सुख काय ते विषयातच आहे, या समजुतीने सुखरूप अशा आत्मारामाकडे दुर्लक्ष होऊन ही अनर्थ परंपरा ओढवते. दृढ बुद्धी नसल्याचा हा परिणाम. **अश्रद्दधान: पुरूषा धर्मस्यास्य परंतप। अप्राप्य मां निवर्तन्ते मृत्यूसंसारवर्त्मनि॥** (भ. गी. ९-३) अनात्मज्ञ मूढ हे आत्मज्ञानरूप धर्मावर श्रद्धा न ठेविल्यामुळे माझ्यापासून विन्मुख होऊन मृत्यू संसार मार्गात फिरत राहतात. **पाहें पां दूध पवित्र आणि गोड। यासीं त्वचेचिया पदराआड। परि ते अव्हेरूनिं गोचिड। अशुद्ध काय नेघती॥** (ज्ञा. ९-५७) कातडीच्या पदरापलीकडे असलेले पवित्र व गोड दूध सोडून आंचळावर बसलेले गोचिड रक्तच पीत नाही काय ? तसाच **तैसा हृदयामध्यें मी रामू। असता सर्व सुखाचा आरामू। कीं भ्रांतासि कामू। विषययावरी॥** (ज्ञा. ९-६०) म्हणून विषयलोलुप हा दैन्यवाणा, असे समर्थ म्हणतात, ‘‘**येहलोकींचा संचितार्थ। परलोकींचा परमार्थ। संचितेविण वेर्थ। जीत मेला॥**’’ (दा. १८-७-८)

★ ★ ★

**नको दैन्यवाणें जिणे भक्तिऊणें।**
**अति मूर्ख त्या सर्वदा दुःख दूणें।**
**धरीं रे मना आदरें प्रीति रामीं।**
**नको वासना हेमधामीं विरामीं ।।६५।।**

जो अतिमूढ असतो तो काम लोभादिकामुळे विषयासक्त कसा होतो व त्याचे जीवन कष्टमय दैन्यवाणे होते, हे मागील श्लोकात सांगितले. असे किळसवाणे जीवन का नको, मानव देहात भक्तीची आवश्यकता काय, हे या श्लोकात सांगतात.

बा मना, भक्तिहीन असे किळसवाणे जीवन नको. संसारी जीव मोहाने विषयात गुंतून लुब्ध होतो व त्यामुळे हे बहुमोल, अलभ्य मानवी जीवन पशुवत् दैन्यवाणे होते. संसारात विषयांचे नादाने दुःखाचे चटके बसत असतात, त्यांचा अनुभव येतो. निरंतन दुःख कोणालाच रूचत नाही पण ते भोगावेच लागते. असे असूनही मानवाची पापकर्मात प्रवृत्ति सहज असते. पुण्य कर्म करावे असे वाटत नाही. त्यामुळे तो दुःखच भोगीत राहतो. पाप कोणते, पुण्य कोणते, याचा थोडक्यात स्पष्ट विचार **असा पुण्य कर्म ते ईश्वरस्मरण। पाप कर्म ते विस्मरण।।** कर्म फल दाता जर ईश्वर आहे तर सत्तावानाला विसरून कसे चालेल. **जो अन्न देतो उदरासी। शरीर विकावें लागे त्यासी। मां जेणें घातलें जन्मासी। त्यासि कैसें विसरावे।।** (दा. ३-१०-५५) पोटाला अन्न देणाऱ्या मालकाची मर्जी संभाळावी लागते. त्याचे प्रेमासाठी, कृपेसाठी रात्रंदिवस राबावे लागते, त्याची आज्ञा पाळावी लागते. मग ज्याचे अस्तित्वावर जगायचे त्या ईश्वराला विसरणे, त्याची आज्ञा न पाळणे, हे काय शहाणपण झाले ? त्या परमेश्वराचे आपल्यावर किती उपकार आहेत याची जाणीवच आपणास नसते. मातेच्या उदरात असतानाच अगावू दुधाची व्यवस्था कोण करतो ? पुढे लागणाऱ्या धान्यासाठी पर्जन्यवृष्टी कोण करितो ? श्वासोच्छ्वासाचे रूपाने चाललेल्या प्राणास गती कोण देतो ? वैश्वानर रूपाने अन्नपचन कोण करितो ? झोपेतून जागा कोण करतो ? जाग आल्यावर झोप चांगली लागून समाधान झाल्याची जाणीव कोण देतो ? शरीर, इंद्रिये, मन, बुद्धी ही झोपलेली पाहणारा साक्षी तोच व जाग आल्यावर अहंकाराला जाणीव देऊन त्याचे करवी सुखाचा अनुभव वदविणारा तोच हा ईश्वर. **ऐसा साक्षी असंग चिद्रुप। ज्यासी नलगे पुण्य पाप। उपाधीचा नाही लेप। ते स्वरूप ईश्वराचे।** (ना. भ. सूत्र दे. ६३) अशा ज्या ईश्वरावर आपले सर्वस्व अवलंबून आहे,



त्याचे स्मरण नको का ? त्याचेबद्दल प्रेम नको का ? प्रेम असेल तेव्हाच स्मरण होते. प्रेम हीच भक्ती. **भगवद्भक्ती वाचून। जन्माचे सार्थक नव्हे जाण।।** भक्ती मानव जन्मातच शक्य. **मनुष्यदेहावांचोनी। पशुपक्षादि नाना योनी। त्या विषयभोगालागोनि। विषयच्छेदनीं नरदेह।।** (ना. भा. ९-३७१) इतर योनीत सामान्य भोग भोगण्याव्यतिरिक्त काही करता येत नाही. हे सामान्य भोग म्हणजे आहार, निद्रा, भय, मैथुन. हे सामान्य भोग नरदेहातही आहेत पण या सामान्य भोगज्ञानाशिवाय मानवाचे ठिकाणी पापपुण्य, बरे वाईट समजण्याचे विशेष ज्ञान असते. त्या ज्ञानाचा उपयोग करता आला नाही तर पशूत व मनुष्यात फरक कोणता ? **न साधिता आत्मज्ञान। केवळ जे विषयी जन। ते श्वानसूकरांपरीस हीन। माणुसपण त्यां नाहीं।।** (ना. भा. ९-३६९) पशूपेक्षाही हीन का म्हटले ? पशूंना विशेष ज्ञानच नाही तर त्यांनी काय करावे ? **पशु पापपुण्य काय ते जाणती। मनुष्या या रीती ठाउकीया।** ज्ञान असून पशूपेक्षा हीन होणे हेच दैन्यवाणे तुकाराम महाराज म्हणतात, ''**तरीच जन्मा यावे। दास विठ्ठलाचे व्हावे।। नाही तरी काय थोडी। श्वानशूकरे बापुडी।।**''

अति मूर्खाला दुहेरी दुःख भागावे लागते. विषयवासनेमुळे दैन्य व दुःख आणि भक्तीच्या अभावी खऱ्या सुखाची हानी असे दुहेरी नुकसान होते. चित्तशांति हे सुखाचे कारण आहे पण विषयस्पृहा ही चित्ताला शांती देत नाही व विषय विरहित, इंद्रियातीत असे जे सुख ते भक्तीशिवाय प्राप्त होत नाही. असा दुहेरी तोटा होतो. म्हणून मग समर्थ म्हणतात, 'बा मना, सुवर्ण प्रासाद, ऐष आराम, यांची वासना सोडून उत्कट भावाने रामावर प्रेम कर, तोच सर्व सुखाचे स्थान आहे.' **यो वे भूमातत्सुखं। नाल्पे सुखमस्ति।** देश, काल, वस्तू इत्यादिकांनी मर्यादित होणाऱ्या कोणत्याही पदार्थात सुख नाही. **ईश्वरावीण कामना पाहे। कालत्रयी दुःखचि आहे। कामनेचा नाश होये। तरी लाहे आनंद।।** (आ. सा. सि. १-२३) सुवर्णप्रासाद स्त्री, पुत्र, धन इत्यादि विषय जर सुखरूपच असते तर त्यात सर्वांनाच सर्वकाळी सुख झाले पाहिजे पण तसे होत नाही. हा अनुभव आहे. राजाला राजवाडा सुखाचा वाटतो तर विरक्त पुरूषाला तो नरक वाटतो. त्याला भस्म, रूद्राक्षमाला यातच आनंद वाटतो. सुशील व सुविचारी मुलापासून सुख होते.पण तोच शीलभ्रष्ट, दुराचारी झाल्यास दुःख होते. स्त्री प्रेमळ सात्विक असेल तर सुख होते. पण तीच दुराचारी बनली की दुःख होते. याप्रमाणे विषयसुख हे अल्प, मर्त्य असल्यामुळे दुःखरूपच होय. **म्हणोनि जो भूमा ते अमृत। जे अल्प ते मर्त्य निश्चित।**

यासाठी मनाला सांगतात, **नको रे मना हेम धामी विरामी।**

यावर अशी एक शंका येईल की **'कामनेचा नाश होये तरी लाहे आनंद'** असे जर आहे तर ईश्वर प्राप्तबद्दलची कामना ही तरी एक कामनाच नव्हे काय ? मन ती सुखरूप कशी ? ईश्वराचे गोड चरित्र्य ऐकावे. सुंदर रूप स्मरावे, कीर्तन करावे, अशी अपेक्षा असणे हा कामच. मग ही कामना तरी का असावी ? याचे उत्तर- वनातील झाडाचा दांडा घालून कुऱ्हाडीने वन तोडून जसा प्रकाश मिळवायचा तसेच ईश्वर कामनेने, कामना तोडून आनंद प्राप्त करून घ्यावयाचा आहे. म्हणून ईश्वर कामना ही कामना नव्हे. **संसार अरण्याचेची। काम काष्ट तरी त्याची। करिता दांडी भक्ती कुऱ्हाडीची। मनचि तोडी वन संसाराचे।। एवं विषय वासने वेगळा। तो काम मोक्षदायक मोकळा।। म्हणोनि तो न म्हणावा काम। ज्यास इच्छित आत्माराम।।** सरकारी नोकराने सार्वजनिक सभेत भाग घेऊ नये असा कायदा असला तरी मुख्य मंत्र्यांचे सार्वजनिक सत्कार सभेत नोकराने भाग घेणे बेकायदेशीर नाही. उलट भाग न घेणे हेच बेकायदेशीर.

★ ★ ★

**नव्हे सार संसार हा घोर आहे।**
**मना सज्जना सत्य शोधूनि पाहे।**
**जनीं वीष खाता पुढें सूख कैंचे ?।**
**करी रे मना ध्यान या राघवाचें ।।६६।।**

मागील श्लोकात भक्तीवीण जिणे जगू नकोस. ते दुहेरी दुःखकारक असून त्याने मूर्खत्व पदरात येते. हेमधामादि विषयात खुशालचेंडूप्रमाणे न रंगता रामावर प्रेम कर, असे मनाला सांगितले. ह्या श्लोकात विषयी-जीवनात धोका कोणता ते सांगतात.

बा मना, विषय हे क्षणिक दुःखरूपच आहेत. त्यात चिरंतन सुख नाही. त्यातच गुंतून राहिलास तर तुझ्या मागचे संसारचक्र सुटणार नाही. संसारचक्र म्हणजे जन्ममरण परंपरा. जन्माला यावे, विषय भागावे अन् मरावे, पुन्हा जन्माला यावे असे हे रहाटगाडगे आहे. समर्थ म्हणतात, **येक मरे येक रितें। रितें मागुतें भरतें। भरतेंहि रितें होतें। काळांतरी।। ऐसी हे सृष्टीची चाली। संपत्ति दुपारची साउली। वयेसा तरी निघोनि गेली। हळूहळू।।** (दा. १७-७-२७,२८) जन्माला आले की मरण आहेच. सर्व संतांनी या संसाराचे



भयानक असेच वर्णन केले आहे. समर्थ संसाराला महापूर म्हणतात, **''संसार म्हणजे महापूर। माजी जळचरें अपार। डंखूं धावती विखार। काळसर्प।।''** (दा. ३-१०-१) या संसारात आशा, ममता, कामक्रोधादि खादाड जलचरे आहेत, असा हा महापूर आहे. अशा संसारात सुख मानणारा शहाणा म्हणावा काय ? बा मना, मी म्हणतो ते खरे की खोटे याचा तूच विचार कर. या संसारचक्रातून सुटण्यास नरदेहातच संधी आहे व मार्गही एकच आहे. तो म्हणजे विवेक.

मना, सारासार विचार करून सत्य असेल ते तूं अंगीकार. अडचणीतून विचाराने बाहेर पडणाराच शहाणा. **जो कोणी समजून पाहे त्यास घडे।।** कोणत्याही गोष्टीची योग्यायोग्यता तीन गोष्टींनी पाहतात. त्या तीन गोष्टी म्हणजे शास्त्रप्रचिती, गुरूप्रचिती व आत्मप्रचिती. शास्त्र सांगते की बुद्धिमान मनुष्य इष्ट होणारे श्रेय निवडून घेतो-म्हणजे परम कल्याणकारी मार्ग स्वीकारतो. **यच्छ्रेय:स्यात् निश्चितं ब्रूहि तन्मे।** (भ. गी. २-७) असे अर्जुन म्हणतो. आणि मंद बुद्धीचा मनुष्य इंद्रिय मनाच्या ओढीला बळी पडून तात्कालिक सुख देणारे प्रेय म्हणजे प्रिय विषय स्वीकारतो. म्हणून शहाण्याने श्रेय निवडून घ्यावे. गुरूचाही हाच उपदेश असतो. समर्थ शिष्याला म्हणतात, **''जरी हा प्रपंच शाश्वत जाणतो। तरी आम्ही यासीच धरितो। हा अशाश्वत म्हणोनि रडतो। तुम्हाभोवती।।''** आम्हाला लंगोटी लावून हिंडणेची हौस का आहे ? हा शाश्वत सुख देणारा असता तर आम्हीही त्यालाच चिकटून राहिलो असतो. परंतु या संसारात, **बुडते हे जन पहावेना डोळा। म्हणोनि कळवळा येत असे।।** असे सज्जन सांगतात. आता स्वप्रचीती पाहिली तर काय दिसते ? जन्मताना दुःख आकुंचित द्वारातून येताना कोण हाल, मरताना दुःख, कारण सर्व येथेच राहावयाचे व आपण एकटेच हातपाय झाडून जायचे जिवंत असताना कसे करू, काय करू ही रड आहेच. म्हणजे जन्म, जीवन व मरण तिन्ही दुःखरूपच. हा स्वानुभव सत्य नाही का ? म्हणजे तिन्ही प्रचितींनी सत्य काय याचा शोध घेतल्यास, संसार हा घोर आहे हे सत्य प्रकट होते. विष खाल्यावर सुख कसे होणार ? हाल व शेवटी मरणच. विषय कामना हेच मुळी विष आहे. दिसायला गोड पण परिणाम विषाचा. मनुष्य वरच्या सोंगाला भुलतो. **कडू विषय वाटे गोडू। गोडू परमार्थ वाटे कडू।।** हा विषरूप विषय कामना म्हणजे संसार. **हृदयी कामनेचा जो विस्तार। तोचि जाणावा संसार। कामने करिता दुःख घोर। जन्म मरणा भोगती।।**

बहुतेक लोक ह्या पुरात वहात जातात. मग सुटतात कोण ? जे सत्य अशा आत्मारामाला आळवितात, हाका मारतात ते. तोच संसार पुरातून सोडवतो. **बहुतेक आवर्ती पडिले। प्राणी वाहातचि गेले। जोहिं भगवंतासी बोभाइले। भावार्थबळें। देव आपण घालून उडी। तयांसी नेलें पैलथडी। येर तें अभाविकें बापुडीं। वाहातचि गेलीं।।** (दा. ३-१०-८,९)

म्हणून मना, भक्त कैवारी श्रीरामाचे ध्यान कर. दासबोध द. १४ स. ८ मध्ये ध्यान कसे करावे याची सविस्तर मांडणी केली आहे. घटपटादि अनेक दृष्टांतानी ब्रह्मसिद्धान्त ठोकले तरी **ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते** म्हणून ध्यान पाहिजेच. तरच साक्षात्कार.

ज्या वस्तूचे ध्यान करायचे त्याचे ज्ञान झाल्याशिवाय ध्यान होत नाही. **आधीं देवासी ओळखावें। मग अनन्य भावें भजावें। अखंड ध्यानचि धरावें। सर्वोत्तमाचें।।** (दा. १४-८-३)

देवाचे रूप तर अव्यक्त. वर्ण नाही, रूप नाही, गुण नाही असे. ते तद्रूप होऊनच अनुभवावे लागते. अशा अव्यक्त देवाचे ध्यान होणे अवघड. कारण ध्यान करणारा ध्याता जर देहधारी सगुण साकार आहे तर ज्याचे ध्यान करायचे ते ध्येय ही सगुण साकार देहधारी असेच हवे. नारद ध्रुवाला म्हणाले, प्रसन्न वदन, साकार, चतुर्भुज आयुधे धारण करणारी अशी वासुदेवाची मूर्तीच ध्यानात आण. म्हणजे त्या मूर्तीचे द्वारा तद्रूप होऊन तू अमूर्त अशा देवाचा अनुभव घेशील. समर्थ म्हणतात - **सगुणाचेनि आधारे। निर्गुण पाविजे निर्धारे।**

**आत्माराम सकळांचा। देव दानव मानवांचा। तोचि राम आमुचा। कुलस्वामी।।** सर्वांतर्यामी जाणीव रूपाने राहाणारा, इंद्रियांना चेष्टविणारा, द्रष्टा, साक्षी, अंतरात्मा हा समर्थांचा अव्यक्त मुख्य देव व ह्याच देवाचे, सर्वोत्तम अशा दाशरथी रामरूपाने नटलेल्या स्वरूपाचे ते ध्यान सांगतात. सगुण साकार राघवाचे रूपात,नामात, गुणवर्णनात, कीर्ति श्रवणात मन एकाग्र, तल्लीन होते व असे सगुण ध्यान करता करता, ध्याता व ध्येय यांचे तादात्म्य होऊन सच्चिदानंद अशा अव्यक्त आत्मारामाचा अनुभव येतो व तेच आपले रूप कळते. **एवंच प्राणिमात्राचा। आत्मा तोचि श्रीकृष्णाचा। ऐसा सिद्धान्त मनाचा। ठाम झाला पाहिजे।।** (दासगणू)

आपणच आत्मरूप आहो याचा एकदम निश्चय होत नाही. म्हणून सर्वोत्तम राघवाचे माध्यम स्वीकारून आत्मरूप जाणावयाचे. म्हणून समर्थ



म्हणतात, करी रे मना.....

★ ★ ★

**घनश्याम हा राम लावण्य रूपी।**
**महां धीर गंभीर पूर्ण प्रतापी।**
**करी संकटी सेवकाचा कुढावा।**
**प्रभातें मनी राम चिंतीत जावा ।।६७।।**

मागील श्लोकात असार अशा भयानक संसाराचे स्वरूप सांगून त्यातून सुटणेसाठी, सगुण राघवरूपाने नटलेल्या आत्मरूपाचे ध्यान कर, असे मनाला सांगितले. या श्लोकात सगुण राघवरूपाने अवतरलेल्या श्री रामरायाचे रूप व गुण वर्णन करून त्यांना आठवून, नामस्मरण नित्य करीत जा, असे सांगतात. नामस्मरण सर्वकाळ असावे पण प्रात:काली नामचिंतन नित्य असावे असे सांगतात.

तिसऱ्या श्लोकात प्रथम चरणानेच **प्रभाते मनी राम चिंतीत जावा। पुढे वैखरी** - अशी सुरुवात समर्थांनी केली. येथे जवळ जवळ दहा श्लोकात प्रत्येक श्लोकाचा शेवटचा चरण एकच आहे, तो म्हणजे **प्रभाते मनी राम चिंतीत जावा।**

सर्व साधनात नाम हे सोपे व श्रेष्ठ साधन आहे पण त्याचे श्रेष्ठत्व कशामुळे याची, जाणीव नसल्यामुळे, हे साधन सापे असूनही त्याकडे दुर्लक्ष होते. तुकाराम म्हणतात, ''**तुका म्हणे आहे सोपे सर्वाहूनी। शहाणा तो धणी घेतो येथे।**'' ज्याला या साधनातील वर्म समजले त्याला त्याची आवड उत्पन्न होते. म्हणून नामाचे महत्व कशात आहे हे पाहू.

परमेश्वराच्या अवतारांचे रूप, गुण कीर्ति इत्यादिकांचे. श्रवण कीर्तन कशासाठी करायचे ? त्याने काय होते ? **सगुण चरित्रे परम पवित्रे हरिची वर्णावी।** पण हे का ? याचे थोडक्यात उत्तर असे आहे - संसार बंध कोठे आहे ? तो चित्तात आहे. मग मायेने व्यापिलेल्या चित्ताचा आकार जर मायापती भगवान याने व्यापिल्यामुळे भगवदाकार झाला, तर बंध कसा राहील ? **लागतां सूर्याचे किरण। घृताचें नासे कठिणपण। तेवीं प्रगटल्या नारायण। न फोडितां जाण लिंगदेह नाशे।।** (ना. भा. २०-३७६) भगवंताच्या अंत:सान्निध्याचे हे फल आहे. भगवंताचे अवतार कार्याचे सतत श्रवण कीर्तनाने त्याचेसंबंधी प्रेम उत्पन्न होते. या प्रेमामुळे, स्नेहामुळे चित्त आर्द्र होते. लाख पातळ झाली की

त्यात जो रंग मिसळावा तो ती धारण करिते, घट्ट झाल्यावरही तो ती सोडीत नाही. त्याचप्रमाणे भगवत्प्रेमाने आर्द्र झालेले चित्त सात्त्विक बनते व भगवदाकार धारण करिते. तो आकार दृढ होतो. या शुद्ध भावासच भक्तीशास्त्रात रती, राग, प्रीती अशी नावे आहेत. या शुद्ध भावात इंद्रिय सुखेच्छेचा अभाव असतो व यामुळेच स्वेद रोमांच, आनंदाश्रू इ. अष्ट सात्विक भाव उत्पन्न होतात. **अर्धोन्मीलित डोळे। वर्षताति आनंदजळें। आंतुलिया सुखोर्मीचेनि बळें। बाहेरि कापे।।** (ज्ञा. ९-५२८) संजयाच्या अवस्थेचे हे वर्णन आहे. **ऐसा महासुखाचेनि अतिरसें। जेथे आटणी होईल जीवदशे।।** असे हे बंधन तोडणारे, जीवदशा आटणी करणारे भक्ती रसायन आहे. या भक्ती सुखाला पंचम पुरूषार्थ म्हणतात. याचेमुळे होणारे महासुख इतके चविष्ट, मधुर आहे की त्यापुढे मोक्षही तुच्छ वाटतो. **मोक्ष सुखा आम्ही हाणियेल्या लाथा। तेथे या प्राकृता कोण मानी।।** (तुका.) पांडुरंगाच्या भजन समाधीत जें सुख आम्ही भोगितो, त्यापुढे मोक्षसुखही तुच्छ आहे. मग या प्राकृत विषयसुखाची काय पर्वा ?

म्हणून प्रात:काळी रामाचे चिंतन - म्हणजे रूप गुण युक्त नामस्मरण करावे नाम सतत घ्यावेच पण प्रात:कालची वेळ चुकवू नये, असा यात भाव आहे. संसार व्यापार सुरू झाला म्हणजे नाम चिंतन होईलच असे नाही. **नित्य नेम प्रात:काळीं। माध्यानकाळी सायंकाळीं। नामस्मरण सर्वकाळीं। करीत जावें।।** (दा. ४-३-३) प्रात:कालची वेळ शांत असते. भोवती गडबड नसते. पूर्व विश्रांतीमुळे मन टवटवीत असते, प्रसन्न असते. अशा वेळी चित्ताची एकाग्रता लगेच होते. म्हणून या वेळेला महत्त्व आहे. भगवदाकाराने रंगलेले मन पुढे व्यवहाराला नेटाने तोंड देते. म्हणून सकाळीच ते रामी रंगवून टाकावे. तोंडाने नाम व मन मात्र भलतीकडे भटकत आहे असे होऊ नये, यासाठी त्याला राम - गुणरूपात गुंतवून ठेवावे. रामरायाचे रूप कसे आहे पाहू.

श्रीराम हा मेघवर्णाप्रमाणे सावळा आहे. मदनालाही त्यावरून ओवाळावे असे त्याचे गोजिरे रूप आहे. आजानुबाहू, शंखाकृती कंठ, मनोहर हनुवटी, हास्य वदन, कमल नयन, विशाल वक्षस्थल, अशी ही चैतन्याची ओतीव मूर्ती आहे. **जो लावण्याचा जनक। जो सौंदर्याचा नायक। जो मार्तंड कुलदीपक। चातुर्य निधी।। सुखरूप संतोषरूप। आनंदरूप हास्यरूप। ऐक्यरूप आत्मरूप। सर्वत्रांसी।।** (दा. २-८-२५)

हे झाले त्याचे लावण्यरूप. आता तो गुणांनी कसा आहे पाहू.



बालपणी मातापित्यांचे लाडात नांदायचे, तो विश्वामित्रांचे मागणी आली. युवराज म्हणून सिंहासनावर बसणार, तो जिला सापत्न भाव असूनही मातेप्रमाणे मानले, अशा कैकेयी मातेकडून वनवासाची मागणी आली. अशा वेळीही सर्व अडचणींना हास्यमुखाने कर्तव्य म्हणून ज्याने तोंड दिले, त्या श्रीरामाच्या धैर्याचे काय वर्णन करावे ? तो जसा धीराचा तसाच गंभीर, खोल बुद्धीचा, प्रत्यक्ष माता पिता शोकाने व्याकूळ झालेले पाहून त्यांचे समाधान करणारी बुद्धी त्या बुद्धीपुढे कुलगुरूनाही हार खावी लागली. **युक्तिवंत गुणवंत वरिष्ठ। बुद्धिवंत बहु धारिष्ट्य** (दा. २-८-२९) त्याच्या प्रतापाचे वर्णन श्लोक क्र. ३१ मध्ये आलेले आहे. लहानपणी त्राटिका वध, दंडकारण्यात हजारो राक्षसांचा संहार. रकार शब्दाला मारिच घाबरे, शत्रुहेर अकंपनाने रावणास जे निवेदन केले ते - **रामोनाम महातेज: श्रेष्ठ: सर्व धनुष्मताम्। दिव्यास्त्र गुणसंपन्न: पुरंधर्म गतो युधि।** पण शत्रूचा असा थरकाप उडविणारा राम, शरण आलेल्याचा कुडावा म्हणजे रक्षण कर्ता होतो. **सकृदेव प्रपन्नाय तवास्मितीच याचते। अभयं सर्व भूतेभ्यो ददाम्येतद् व्रतम् मम।।** मी तुझा आहे म्हटले की पुरे. मग नित्य प्रात:काली त्याचे चिंतन केल्यास केवढी कृपा होईल ? समर्थ म्हणतात, **''म्हणे दास हा राम तात्काळ पावे। करी संकटी सेवकाचे कुडावे। प्रतापेचि ब्रह्मादिका सोडवीले । मही मंडळालागि आनंदविले।।''**

★ ★ ★

**बळे आगळा राम कोदंडधारी।**
**महां काळ विक्राळ तो ही थरारी।**
**पुढें मानवा किंकरा कोण केवा।**
**प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।।६८।।**

याही श्लोकात रामाचे रूप - गुण वर्णन आहे. धनुर्धारी राम हा बळाने श्रेष्ठ, विशेष आहे. सीतास्वयंवराचे वेळी अनेक बलसंपन्न, सामर्थ्यवान राजे पण जिंकण्यासाठी जमले होते. पण श्रीरामाशिवाय कोणीही शिवधनुष्य उचलू शकले नाही. मग भंग करणे दूरच. प्रतापी रावणसुद्धा निष्प्रभ ठरला. एवढे एकच उदाहरण त्याच्या श्रेष्ठतेबद्दल पुरे आहे. बळाने आगळा असा श्रीराम आहे. महाकालासारखा बलवान समर्थ कोण आहे ? कालाची या विश्वावर अबाधित सत्ता आहे हे स्पष्ट आहे. **चारी खाणी चारी वाणी। चौऱ्यांशी लक्ष जीवयोनीं। जन्मा आले तितुके प्राणी। मृत्य पावती।।** (दा. ३-९-३७) असा

हा सर्व भक्षक काल श्रीरामापुढे मात्र थरथर कापतो. क्षुद्र मानवाची काय कथा ? किंकरा कोण केवा - येथे केवा म्हणजे कथा, पाड, तुकाराम म्हणतात, **''कोण दम आहे ऐसा यांचे पोटी। का या चक्रपाणी विसरती।।''**

आम्ही देव वगैरे काही जाणत नाही असे घमेंडीत मनुष्य म्हणतो. पण हे म्हणणे म्हणजे काजव्याने सूर्य जाणत नाही म्हणण्यासारखे नव्हे काय ? समर्थ म्हणतात, **''हरिहर ब्रह्मादिक। हे जयाचे आज्ञाधारक। तू येक मानवी रंक। भजेसिना तरी काय गेले।।''** (दा. ६-७-२०)

सूर्यावर थुंकले, तर स्वत:वरच घाण उडते. तसे अहंकाराने आत्मारामाला तुच्छ गणणे हे आपले आपणच अनहित करणे होय. कालाचे उदाहरणाने नामाची शक्ती अमोघ आहे, असे समर्थ सांगतात. रामापुढे थरथर कापणारा काल त्याच्या नामालाही घाबरतो. **मद्‌भक्ता: यत्र गायंति तत्र तिष्ठामि नारद।।** आणि **'न मे भक्त: प्रणश्यति'** हे भगवंताचे ब्रीदवाक्य आहे. **तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्।।** (भ. गी. १२-७) रामकृपेनेच जीव कालाचे कचाट्यातून सुटतो. ही कृपा नामनिष्ठ भजकावर असते. **तपतेजे महाऋषी। ते काळासी आंदणी दासी। रामनामी प्रेमा ज्यासी। काळ त्या पासी कामारा।।** अनेक तपस्वी ऋषींना राक्षसांनी मारले; त्यांचे आश्रम उध्वस्त केले. पण जेव्हां विश्वमित्रांनी रामासाठी धाव घेतली, तेव्हां सर्वांचे रक्षण झाले. तुकाराम महाराज तर म्हणतात, **''काळ गुलाम करी सलाम। तुकया घरी तो नांदतो।। जगा काळ खाय। आम्ही माथा दिले पाय।।''**

★ ★ ★

**सुखानंदकारी निवारी भयातें।**
**जनीं भक्तिभावे भजावे तयातें।**
**विवेकें त्यजावा अनाचार हेवा।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।६९।।**

याही श्लोकात रामरूपवर्णन आहे. हा आत्माराम राम सुख व आनंद देणारा आहे. कारण तो स्वत:च सुख व आनंदाचा ठेवा आहे. जे ज्याच्याजवळ असते तेच तो दुसऱ्यास देऊ शकतो. जिवाला मिळणारा विषयानंद हा त्याच आनंदसिंधूचा बिंदू आहे. अज्ञानामुळे ते त्याला विषयसुख वाटते. पण ते खरे असते आत्मसुखच. **एतस्यैवानंदस्यान्यानि मात्रामुपजीवन्ति।। सुख आत्माच केवळ। अंश त्याचे विषय सुख केवळ। याच ब्रह्मानंदाचिया अंशाते।**



**भोगूनी जिती सर्व भूते। म्हणूनि ऐसी बहुते। वेदवचने ये विषयी।।** (आनंद सा.) कोणताही प्रिय पदार्थ प्राप्त झाला की दुसरी स्फूर्तीच राहात नाही. अंत:करण शांत झाल्याने, चित्ताला चिदवस्था, सहजावस्था प्राप्त होते व त्यामुळे सुखानंदाचा अनुभव येतो. दुसरी स्फूर्ती आली की तो आनंद नाश पावतो. एक स्फूरण लयास जाऊन दुसरे स्फुरले नाही, अशा मध्य संधीत जे काही उरते तोच आनंद. **सकळाची जे विस्मृती। तीच आनंदाची स्थिती।।** हे इतक्या झटदिशी होऊन जाते कि हे आत्मसुख आहे हे कळत नाहीच, पण दृश्य विषयामुळे सुख झाले, अशी विपरीत भावना मात्र होते. कोण्या वस्तूत जर आनंद असता तर तो कोणासही केव्हाही मिळाला पाहिजे. पण रोगग्रस्तास किंवा विरक्तास धनसुतदारादिकांपासून आनंद होत नाही. यावरून ईश्वरावाचून सर्व कामना दु:खरूपच आहेत, त्यांनी तळमळ जात नाही, हे स्पष्ट आहे. समर्थ म्हणतात, **''जयांचा ईश्वरीं जिव्हाळा। ते भोगिती स्वानंदसोहळा। जयांचा जना वेगळा। ठेवा आक्षै। ते आक्षै सुखें सुखावले। संसारदु:खें विसरले। विषयेरंगी वोरंगले। श्रीरंगरंगी।।''** (दा. ३-१०-३१, ३२)

हा सुखानंदकारी राम भय निवारण करितो. जीव भितो कशामुळे ? देहबुद्धीमुळे, देहावर प्रेम आहे म्हणून. ही देहबुद्धीच नष्ट झाल्यावर भीती कशाची ? देहबुद्धी रामकृपेने नष्ट होते. **आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छती:। प्रसाद म्हणजे प्रसन्नता। ज्या प्रसादे जीवन्मुक्तता। द्यावी वाटे अनंता। प्रसाद येथे या नाव।।** (य. दी.) भयानक अशा संसारसागरातून पार नेणारा हा आत्माराम रामच. म्हणून **सुखमूर्ती राम सोडू नको कदा। तुज तो आपदा लागो नें दी।।** म्हणून चिरंतन सुखानंद, निर्भय जीवन्मुक्तता पाहिजे असेल तर नरदेह प्राप्त झालेल्यांनी रामाचे प्रेमाने भजन करावे. तुमची श्रीमंती, पूजेचा थाटमाट याकडे तो लक्ष देत नाही. तो प्रेमाचा भुकेला आहे. भगवंत म्हणतात, **''पै भक्ती एकी मी जाणें। तेथ सानें थोर न म्हणें। आम्ही भावाचे पाहुणे। भलते या।।''** (ज्ञा. ९-३९५) हा एक अर्थ झाला.

समर्थांची उपासना केवळ व्यक्तिगत मर्यादित स्वरूपाची नाही. ती व्यापक आहे. **उपासना सकळा ठाई। आत्माराम कोठे नाही। या कारणे ठाई ठाई। देवे आटोपिले।।** म्हणून जनी म्हणजे सर्व लोकात राम पाहा असे त्यांचे सांगणे आहे. या दुसऱ्या अर्थानुसारच ते पुढे म्हणतात.

परमेश्वराची भक्ती करिताना विवेकशुद्ध आचार असावा व कोणाबद्दलही मत्सरबुद्धी नसावी. अनाचारामुळे स्वत:चाही अध:पात होतो व

समाज बिघडतो म्हणून 'आचार: परमोधर्म:' असे म्हटले आहे. अनाचार म्हणजे श्रेष्ठांनी, वेदांनी जे करू नये म्हणून सांगितले, ते करणे. या निषिद्ध कर्मानी निषिद्ध वासना वाढत जातात. निषिद्ध वासनामुळे पुन: निषिद्ध कर्म घडते व बुडत्याचा पाय खोलात अशी अवस्था होते आणि या अविधी कर्माने नरक प्राप्त होतो, असे श्रुति म्हणते - **'अविधिकृन्नरकमश्नुते।।'** म्हणून विशेष आचार म्हणजे वर्णाश्रम आचार जरी या काळी पाळणे कठीण असले, तरी सामान्य आचार पाळलाच पाहिजे. विशेषत: भक्ती मार्गीयाने तर तो जरूर पाळला पाहिजे. **जेणे विठ्ठल मात्रा घ्यावी। तेणे पथ्ये सांभाळावी।।** ज्या अंत:करणात रामाचे चिंतन करायचे ते शुद्ध पाहिजे. घरी एखादा पाहुणा यावयाचा असल्यास किंवा कोणी अधिकारी यावयाचा असल्यास आपण स्वच्छता राखतो. मग देवाधिदेव आत्मारामाची प्रतिष्ठापना जर अंत:करणात करावयाची तर ते शुद्ध नको का ? म्हणून भक्तानें सामान्य धर्म पाळलाच पाहिजे. मनूने सांगितलेला हा सामान्य धर्म दशलक्षण युक्त आहे. **धृति: क्षमा दमोऽस्तेयं शौचमिंद्रिय निग्रह: । श्रीविद्या सत्यमक्रोधो दशमं धर्म लक्षणं।।** कोणतीही आपत्ती आली तरी रामाचा विसर पडणार नाही, असे धारिष्ट्य पाहिजे. इंद्रियदमन पाहिजे, अंतर्बाह्य शुचिता पाहिजे. वागण्यात सत्यता पाहिजे, आत्मज्ञानाची आवड पाहिजे, क्रोधाला बळी पडता कामा नये व घडते ते सर्व ईशइच्छेने, अशी दृढ बुद्धी पाहिजे. हा सामान्य धर्म पालन करण्यास हल्लीचा काळ मुळीच आडवा येत नाही. या सामान्य धर्म - पालनास समर्थ संसारिकाचा त्याग असे म्हणतात. **सन्मार्ग तो जीवीं धरणें। अन मार्गाचा त्याग करणें। संसारिकां त्याग येणें। प्रकारे ऐसा।।** (दा. ५-१०-२) राम कृपा हवी. तर एवढा त्याग नको का ?

इतकेही होत नसेल तर भक्ती मार्गीयाने निदान तीन गोष्टी तरी पाळल्याच पाहिजेत. त्यात अनाचार बिलकुल उपयोगी नाही. तुलसीदासजींनी ह्या तीन गोष्टी सांगितल्या आहेत. त्या **सत्य वचन अरूलीनता। परस्त्री मातसमान। इन तिनोसे हरी ना मिले तो तुलसीदास जबान।।** सत्यवचन, लीनता व परस्त्री मातेसमान मानणे ह्या आचाराचे पालन करून जर परमेश्वर प्राप्ती झाली नाही तर त्याला आपण जामीन, जबाबदार राहू, असे तुलसीदास म्हणतात. यापेक्षा आपली आणखी कोणती सोय दयाळू संतांनी पाहावी ? किती पाहावी ? या तीन गोष्टींचे पालन म्हणजे आचार व उल्लंघन म्हणजे अनाचार. हा अनाचार त्यजावा. तसेच दुसऱ्याबद्दल हेवा नसावा. तुकोबा



कोणाचाही हेवा अंत:करणातच नसणे, हीच सर्वेश्वराची पूजा आहे, असे सांगतात. **कोण्याही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचे।।''** इतर वेळी हा सामान्य आचार पाळून सर्वात्मक रामभजन करावे व प्रात:काळी स्वत:तील हृदयस्थ राम स्मरावा असे समर्थ सांगतात.

★ ★ ★

**सदा रामनामें वदा पूर्णकामें।**
**कदा बाधिजेनापदा नित्य नेमें।**
**मदालस्य हा सर्व सोडूनि द्यावा।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।७०।।**

विचारपूर्वक अनाचार सोडून, मत्सररहित प्रेमाने भजन करावे असे मागील श्लोकात सांगितले. भगवन्नाम घेताना कोणते पथ्य पाळावे व ते घेतल्याने कोणता लाभ प्राप्त होतो हे या श्लोकात सांगतात.

पूर्ण कामे या शब्दाचा अर्थ कोणी निष्कामपणे असा केला आहे कोणी कामनाच नाहीसे करणारे रामनाम असा केला आहे, तर कोणी ज्या नामाने सर्व कामना पूर्ण होतात असे रामनाम असा अर्थ केला आहे. कामना पूर्ण करणारे नाम हा अर्थ बरा वाटतो. इतर पर्याय न पटणारे असे आहेत. काम ह्या शब्दाने न बिचकता. 'काम असावा ईश्वर भजनी' या अर्थानेच हा चरण जास्त स्पष्ट अर्थवाही होतो.

काम म्हणजे इच्छा, वासना, ती विषयाची असेल तर वाईट. पण नामाची असेल तर उत्तम. पूर्ण कामे म्हणजे अती तीव्र इच्छेने रामनाम वदावे असा अर्थ जास्त चांगला वाटतो. षड्रिपूमध्ये काम इतरांचा जनक आहे कारण कामामधूनच इतरांची उत्पत्ती होते. हे षड्रिपू मानवाचे वैरी मानले जातात का ? कारण कामादि विकार चित्ताला पाझर फोडतात. म्हणजे चित्त द्रवीभूत करतात आणि मानवाची सहज प्रवृत्ती विषयाकडे असल्यामुळें द्रवलेले चित्त लगेच विषयग्रहण करते. पण कामानी द्रवलेले चित्त जर नामाने भगवंताकडे वळले तर ते त्यातही रंगून जाते. म्हणून कामादिकानी द्रवणारे चित्त विषयाचे ठिकाणी कठीण ठेवणे व हरी भजनात रंगवणे. यातच मानवी प्रयत्नांची आवश्यकता आहे. **'विषय तो त्यांचा झाला नारायण।'** हे तुकोबांचे म्हणणे याच हेतूने आहे. म्हणूनच काम सदा ईश्वर भजनी असावा व इंद्रियदमनी क्रोध असावा. ईश्वर भजनाची हाव असावी, अनावर इंद्रियावर

रागवावे, भजनात मत्त, धुंद व्हावे, भक्त म्हणवून घेण्यात अहंकार वाटावा. हेच षड्रिपू मित्र बनविण्यात पुरूषार्थ आहे. ज्ञानोबा **यान्ति देवव्रता देवान्** या श्लोकावर भाष्य करताना म्हणतात, **''जे अहंकारू वाहत आंगीं। आम्ही हरीचे भूषावयालागीं। जे लोभिये एकचि जगीं। माझेनि लोभें।। जे माझेनि कामें सकाम । जे माझे नि प्रेमे सप्रेम। जे माझिया भुली संभ्रम। नेणती लोक।।''** (ज्ञा. ९-३६२-३६३) समर्थ म्हणतात उत्कट वासनेने तीव्र इच्छेने नामाचा सतत घोष ठेवावा. म्हणजे या घोषाने कोणतीही आपत्ती किंवा संकट बाधक होणार नाही. बाधिजेना हा शब्द मार्मिक आहे. श्रीराम हा भक्तकैवारी आहे. **आपदामपहर्तारं दातारं सर्व संपदाम्।** असा तो आहे. समर्थ म्हणतात, **''नामें संकटे नासतीं। नामें विघ्नें निवारती। नामस्मरणें पाविजेती। उत्तम पदें।। येवढेच काय पण, कांहींच न करून प्राणी। रामनाम जपे वाणी। तेणें संतुष्ट चक्रपाणी। भक्तांलागीं सांभाळी।।''** (दा. ४-३-११-२१) पण समजा कांही आपत्ती प्रारब्धामुळे सहन कराव्या लागल्या तरी त्याही बाधक होणार नाहीत. कारण या नामामुळे देवाबद्दलची इतकी दृढ निष्ठा उत्पन्न होते की हे संकट आपण सोसावे अशीच रामाची इच्छा आहे, असा मनात भाव उत्पन्न होतो. **देवाचे जें मनोगत। तेंचि आपुलें उचित। इच्छेसाठीं भगवंत। अंतरू नये।।** (दा. ४-८-२२) संकट निवारण झाले तरी किंवा नाही झाले करी त्याची फिकीर वाटत नाही. पण इतकी बेफिकीर वृत्ती होण्यासाठी एक पथ्य सांभाळावे लागते.

ते पथ्य म्हणजे नित्य नेमाने नाम घेणे. नित्य नेमाने साधन झाले तरच आपदा बाधक होत नाहीत. **नित्य नेमे अंतर शुद्ध। नित्य नेमे वाढे बोध। नित्य नेमे बहू खेद। प्रपंची तुटे।।** नेमाने भजन केल्यामुळे प्रथम चित्ताची शुद्धी होते. नंतर रूपाचे ज्ञान होते. ज्ञानाने तेच आपले रूप आहे हे समजते आणि शरीर म्हणजे आपण नव्हे असे समजल्याने प्रापंचिक आघातांची पर्वा वाटत नाही. नित्य नेमाने पथ्य - पालनात दोन मोठी विघ्ने येतात.

(१) मद म्हणजे ताठा किंवा गर्व (२) आळस. मनुष्य संपत्तीने, गुणाने, रूपामुळे, ज्ञानामुळे गर्विष्ठ होतो. कित्येकदा आपण मोठे नामधारक, इतर सर्व अभक्त, असा भक्तीमदही होतो. ह्या अहंमन्यतेमुळें **थोर आयुष्य मोलाचे। मदे व्यर्थचि नासिले।** असे होते. आपला अहंकार देवाचे सत्तेवर चालत असून रूप, गुण, ऐश्वर्य व ज्ञान सर्वच बाबतीत तोच श्रेष्ठ, आपले भजनही त्याचेच सत्तेवर, त्याचेच कृपेमुळे, असा नम्र भाव ठेवून त्याला



स्मरावे. **थोरपण पऱ्हा सांडिजे। व्युत्पत्ती आघवी विसरिजे। जै जगा धाकुटे होईजे तै जवळीक माझी।।**

मदाप्रमाणेच आळसही सोडावा. नित्य नेमाचे आड येणारा म्हणून तो अतिघातक आहे. अंगात शक्ती असूनही प्रतिकाराची वृत्ती मनात उत्पन्न न होणे म्हणजे आळस. पहाटेची वेळ, बाहेर थोडा झिमझिम पाऊस आहे, गार वारा आहे. अशा वातावरणात वाटते. 'कशाला आता उठा आणि साधन करा. थोडा वेळ पांघरूणात पडू मग उठू' अंगात शक्ती असते पण जरा निराळ्या हवेला प्रतिकार करायला मनुष्य कंटाळतो. **तुका म्हणे आळस करूनिया साह्य। बळे कसे पाह्य वाया जाती।।** समर्थ म्हणतात, **''आळस उदास नागवणा। आळस प्रेत्न बुडवणा। आळसें करंटपणाच्या खुणा। प्रगट होती।। म्हणौन आळस नसावा। तरीच पाविजे वैभवा। अरत्रीं परत्रीं जीवा। समाधान।।''** (दा. ११-३-१२,१३)

पोटभरू पदवीसाठी आळस सोडून कष्ट करावे लागतात, मग गुह्य परमार्थ साधनात तो कसा चालेल ? परमेश्वराने मनुष्याला ज्ञान, क्रियाशक्ती व स्वातंत्र्य दिले आहे. योग्य प्रमाणात यांचा उपयोग करून इहपर हित साधावे. **येकाग्र करूनिया मन। बळेति धरावें साधन। येत्नीं आळसाचें दर्शन। होऊंच नये।।** (दा. १८-३-१२)

★ ★ ★

**जयाचेनि नामें महादोष जाती।**<br>**जयाचेनि नामें गती पाविजेती।**<br>**जयाचेनि नामे घडे पुण्यठेवा।**<br>**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।७१।।**

आळस सोडून निरहंकारपणे नित्य नेमाने अट्टाहासाने रामनाम घ्यावे, असे मागील श्लोकात सांगितले, येथून पुढे 'नाममहात्म्य' वर्णन केले आहे. या श्लोकात नामाने देहशुद्धी होऊन पावित्र्य कसे प्राप्त होते, सद्गती कशी मिळते व पुण्यसंचय कसा होतो, हे सांगितले आहे.

दोषाचे आगर म्हणजे मानवी शरीर. या देहाला सर्वच ठिकाणी अपवित्र म्हटले आहे. **शरीर दुःखाचे कोठार। शरीर रोगाचे भांडार। शरीर दुर्गंधीचा थार। नाही अपवित्र शरीरा ऐसे।।** त्याच्या अपवित्रपणाची ही यादीच पाहा. जन्माबरोबर अशौच, त्याचे उत्पत्ती स्थान अमंगळ, त्याचे कारण बीज

शुक्र शोणित, मरणानंतर पुन्हा अशौच. स्वत: अपवित्र आहेच पण ज्या वस्तूशी त्याचा संबंध येईल ती वस्तूही अपवित्र करते. **नाना सुद्रव्यें गोमटीं जालिया शरीरी पैठीं। होऊनि ठाति किरिटी। मळुचि जेवीं।।** (ज्ञा. १८-६७७) स्थूलदेह मलमूत्रादिकांनी अपवित्र. जिकडे पहावे तिकडे अन्तर्बाह्य दोषच. सूक्ष्म देह म्हणजे मन, बुद्धी वगैरे कामक्रोधादिकांनी अपवित्र कारण - देह अज्ञानामुळे अपवित्र; यावर अशी शंका येईल की नामधारक असो की अभक्त असो, शरीर हे जर स्वभावत: अपवित्र आहे, तर ते निर्दोष व्हावे कसे ? त्यातील अपवित्रपणा जाणे म्हणजे त्याचा नाशच. याचे उत्तर असे की मांस-रक्तमय शरीर हे परमार्थाला वावडे नाही. मांस-रक्तादि घटक नसतील तर शरीराची घडणच अशक्य. मग नाम घेणार तरी कोण ? **मांस चर्म हाडे। देवा अवघीच गोडे।** म्हणून तर देव भक्ताला प्रेमाने आलिंगन देतो. म्हणजे देहातील अपवित्रता जी परमार्थाला विघातक होते ती मांसरक्तादिकामुळे नसून तत्त्वत: देहाहंकार व तज्जन्य कामक्रोधादि-विकारामुळे आहे. या विकारांना गीतेत नरकाची द्वारे - **त्रिविधं नरकस्येद** - म्हटले आहे. **या कामक्रोध लोभां। माजीं जीवें जो होय उभा। तो निरयपुरीची सभा। सन्मानु पावे।।** (ज्ञा. १६-४३१) कामक्रोधादि विकार दोषात जो जीव भावाने उभा आहे त्याला नरकपुरीत सन्मान मिळतो. यम पाप्यास दु:ख देतो. पण काम हा पुण्यवानासही अडवतो असे आचार्य म्हणतात. म्हणजे कामादि विकार जोपर्यत शरीरात आहेत, तोपर्यत तीर्थयात्रा यज्ञ यागादि कोणत्याही साधनाने देहाला पवित्रता येत नाही. **काम करवी ते करिती। क्रोध मारवी ते मारिती।** अशी स्थिती होते. सारांश, सूक्ष्म शरीर हे महादोषांचे स्थान असलेमुळे त्याची शुद्धी नामानेच होते. मन हे चिंतनशील असल्यामुळे त्याचे विषय-चिंतन स्वाभाविकपणे नित्य चालू असते. विषय-चिंतनामुळे मन विषयाकार होते. त्यातून कामक्रोधादि महादोष उत्पन्न होतात. त्या दोषामुळे आपत्ती ओढवते व दुर्गती प्राप्त होते. या विषय चिंतनाचे निवारण होण्यास ईशस्मरण हाच एक जालीम उपाय आहे. **जो करी विषयांचे ध्यान। तो होय विषयी निमग्न। जो करीं माझे चिंतन। तो चैतन्य घन मीचि होय।।** (ना. भा. १४-३४९) हे ईशस्मरण नामाने सतत राहू शकते म्हणून नामाला महत्त्व. **तुका म्हणे नाम। ज्याचे नाशी क्रोध काम। हरे भव श्रम। उच्चारिता वाचेसी।।** इतर साधनांनी चित्ताला येणारी पवित्रता पुन्हा मलीन होते व ती साधने सतत चालू ठेवता येत नाहीत. नामाने ह्या दोन्ही अडचणी दूर होतात. समर्थ म्हणतात, ‘‘**नामस्मरे निरंतर। तें जाणावें पुण्य शरीर। महादोषांचे गिरिवर। राम नामें नासती।।**’’ (दा. ४-३-२२) नामाने उत्तम गती प्राप्त होते. गती म्हणजे अवस्था. उत्तम अवस्था असे मोघम म्हटले आहे. कोणती निश्चित अवस्था हे सांगितले नाही. हे योग्यच आहे. कारण नामधारकाची गती ही अंतकालपर्यंतच्या साधनाने उत्पन्न होणाऱ्या अधिकारावर अवलंबून आहे. जसजसे नामात प्रेम वाढू लागते. तसतसे ते सातत्याने घेतले जाते. सातत्याने भगवत्कृपेचा ओघ वाढू लागतो. जसजशी भगवत्कृपेची वाढ होईल. तसतसा ज्ञानाचा उदय होऊन अज्ञानाचा नाश होतो. **जंव जंव भक्तीचें पूट चढे। तंव तंव अविद्यावंध विघडे। मायेचें मूळचि खुडे। जीवू चढे निजपदा।।** (ना. भा. १४-३४०)

अज्ञानाचा नाश झाल्यानंतर ज्याला सायुज्य मुक्तीची आवड असेल, म्हणजे पुन: जन्मच नको असेल, तो परब्रह्म स्वरूपात विलीन होतो. तुकोबाप्रमाणे ज्यांना सगुण भजनाचीच ज्ञानोत्तर आवड असेल तर तो वैष्णव वैकुंठात राहातो व जगदोद्धारार्थ एखादे वेळी मृत्युलोकात येतो व कार्य आटोपून पुन: वैकुंठी जातो. **आम्ही वैकुंठवासी। आलो याचि कारणासि।।** तुकोबा आले वैकुंठाहून व सदेह गेले वैकुंठाला. असा नामधारक एकटाच उद्धरून जात नाही, तर त्याचे पूर्वजही सरूपता मुक्तीचे अधिकारी होतात. ज्ञानोबा आपल्या हरीपाठात म्हणतात, ‘‘**हरीपाठकीर्ति मुखें जरी गाय। पवित्रचि होय देह त्याचा। मातृपितृ भ्राता सगोत्र अपार। चतुर्भुज नर होऊनि ठेले।।**’’ पण समजा ईश्वर कृपा होण्याइतकी पात्रता येण्यापूर्वीच या देहाचा अंत झाला तर ?

या जन्मात घेतलेले नाम जात नाही. त्या पुण्याईची ठेव सूक्ष्म देहात सुरक्षित राहते व पुन: नर जन्म येऊन ती पुण्याई सद्‌गती प्राप्त करून देण्याला उपयोगी पडते. मागील जन्मी जर सकाम भजन झाले असेल तर या जन्मात ती पुण्याई निष्काम भजन घडविते. **निष्काम बुद्धीचिया भजना। त्रैलोकीं नाहीं तुळणा। सामर्थ्येविण घडेना। निष्काम भजन।।** (दा. १०-७-१९)

हे सामर्थ्य म्हणजेच पूर्वजन्मातील नामाचा पुण्य ठेवा. नामाने दोषहरण होते व पदरात पुण्य पडते. म्हणून समर्थ म्हणतात, प्रभाते मनी -

★ ★ ★

**न वेचें कदा ग्रंथिचें अर्थ कांहीं।**
**मुखें नाम उच्चारितां कष्ट नाहीं।**
**महां घोर संसार-शत्रू जिणावा।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा।।७२।।**

मागील श्लोकात नामाने शरीरशुद्धी कशी होते व उत्तम गती कशी प्राप्त होते हे सांगितले. साधन अपुरे राहून अंत झाल्यास नामाने पुण्य संचय होऊन पुन: मानव देह येऊन ते पुण्य कसे उपयोगी पडते हेही सांगितले. या श्लोकात नाम फुकाचे व सुखाचे साधन कसे, हे सांगितले आहे.

नाम साधनात पदरचे कांही द्रव्य खर्च करावे लागत नाही.असे हे बिन खर्चाचे साधन आहे. **राधे कृष्ण बोल मुखसे। क्या लगेगा मोल॥** यज्ञ, याग, व्रते, तीर्थे इत्यादि साधनांत द्रव्य खर्च करावे लागते. दक्षिणा द्यावी लागते, भोजन खर्च होतो व या सार्‍यासाठी श्रम घ्यावे लागतात. तीर्थयात्रादिकांसाठी खर्च आहेच. नामात द्रव्य व कष्ट या दोन्हीची आवश्यकता नाही. **न लगती सायास जावे वनांतरा। सुखे येतो घरा नारायण॥** असे हे सुखाचे, ईश्वरप्राप्तीचे साधन आहे. वेदादी मंत्र उच्चारणे झाल्यास ते शुद्ध, स्पष्ट, स्वर मात्रा वगैरे लक्षात घेऊन म्हणावे लागतात. तसे ते न म्हटले गेले तर दोष उत्पन्न होतो. पण नाम मंत्र कसाही म्हटला गेला तरी त्यापासून दोष-उत्पन्न न होता लाभच पदरी पडतो. तो प्रेमाने म्हटला गेला म्हणजे झाले. प्रेम हेच नामाचे मोल. त्याची आवड हवी इतकेच. **माझें मुख नामीं रंगो सर्वकाळ। गोविंद गोपाळ रामकृष्ण॥ अबद्ध चांगले गाऊं भलतैसें। बाळ वदे जैसे मायबापा। तुका म्हणे मज न लावीं वाकडें। मी तुझें बोबडे बाळ तान्हें॥** (गा. ५१४) आवडीने केवळ मुखाने नाम घेण्यात कष्ट नाही व पदरचा खर्चही नाही. असे ते बिनमोल व सोपे साधन आहे. याचे फलही मोठे आहे.

या नाम साधनामुळे महाभयंकर शत्रूवरही मात करता येते. संसाराला महाघोर शत्रू असे समर्थ का म्हणतात ? संसारात त्रिविध ताप आहेत. काळजीसारखा हृद्रोग आहे. मृत्यूभय आहे व जन्ममरणाचे घातक चक्रही आहे. या संसाराला भगवंतांनी गीतेत वृक्ष म्हटले आहे. (अ. १५ वा) हा वृक्ष असा आहे की याच्याखाली शांतीची सुखाची साऊली बिलकूल नाही. असा हा छायाविरहित विलक्षण वृक्ष आहे. हा जबरदस्त वृक्षही नाम साधनाने मुळासकट उखडला जातो. **संसार सोहळे भोगिती सकळ। भक्तां त्याचें बळ विठोबाचें। भय चिंता धाक न मानिती मनीं। भक्ता चक्रपाणी सांभाळित॥** (गा. १२८९)

वास्तविक सर्व प्रपंच मनोमात्र आहे. स्वप्नी भासमान होणारा संकल्प-संसार हा जसा मन:कल्पित आहे, तसाच जागृतीतील प्रप्रंचही मन:कल्पित आहे. असा वेदान्त सिद्धान्त आहे. वसिष्ठ श्रीराम प्रभूला



सांगतात. **'चित्तमेवहि संसार:'** चित्त हेच संसार आहे. त्याचे चिद् झाले की संसार संपला. भगवन्नामाबरोबरच त्याचे ध्यानही झाले की संकल्प विकल्प बंद पडल्यामुळे मनाचे मनपणच जाते. **जेथे हें संसारचित्र उमटे। तो मनोरूपु पटु फाटे। जैसें सरोवर आटे। मग प्रतिमा नाहीं॥** (ज्ञा. ५-१५६) डबक्यात साठलेल्या घाण पाण्यात प्रथम तांबड्या रंगाचे अस्पष्ट असे प्रतिबिंब दिसते. सूर्य किरणाने जसजशी घाण खाली बसत जाते, तसतसे त्यातील प्रतिबिंब स्पष्ट होत जाते. पुढे पाणी आटते व प्रतिबिंब बिंबात समाविष्ट होते. याचप्रमाणे चित्तातील भगवतप्रतिबिंब म्हणजे जीवदशा ही नामाने हळूहळू सुसंस्कारित होत जाते व चित्तशुद्ध होऊन ज्ञान झाले की जीव प्रतिबिंब, ईशबिंबात समाविष्ट होते. चित्ताचे चिद् होते व संसार असूनही जीव संसारावेगळा होतो. **तैसें भोगाआंतूनि निगतां। चित्त मजमाजीं रिंगतां। हळूहळू पांडुसुता। मीचि होईल॥** (ज्ञा. १२-१०९) **ज्ञानदेव म्हणे सगुण हे ध्यान। नामपाठ मौन प्रपंचाचे॥** असे हे विनाकष्ट, विनामोल, असे साधन असून संसार वृक्ष समूळ नष्ट करण्याचे यात सामर्थ्य आहे. समर्थ म्हणतात, **''तुला सांगतो गूज हा बीजमंत्र। जेणें नीरसे थोर संसारशत्रु। नव्हे मिथ्य हें बोलणें सत्य वाचा। जपा अंतरीं मंत्र तेराक्षरांचा॥''** (करूणाष्टके)

शेतकर्‍यांच्या स्त्रिया शेतावर जाणेपूर्वी तान्हुल्यास अफूचे एकदोन वळसे पाजून मगच कामावर जातात. परत येईपर्यत त्या अफूच्या कैफात ते मूल शांत निजून राहते. तसेच उठल्याबरोबर प्रात:कालीच रामनाम मंत्राचे घुटके मनाला पाजले म्हणजे ते मन भक्तीच्या धुंदीत प्रपंचात निवांत राहाते. म्हणून प्रभाते मनी...

★ ★ ★

**देहेदंडणेचे महां दु:ख आहे।**
**महां दु:ख ते नाम घेतां न राहे।**
**सदाशीव चिंतीतसे देवदेवा।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा॥७३॥**

मागील श्लोकात नाम हे फुकाचे व सुखाचे साधन कसे आहे हे सांगितले. आता कष्टाची जी इतर साधने आहेत. त्यांच्याशी तुलना करून, नाम हे सुखाचे साधन कसे, हे येथे स्पष्ट करतात.

भगवत्प्राप्तीसाठी शास्त्रामध्ये अनेक साधने सांगितली आहेत.

त्यापैकी काही खर्चाची, काही पाठांतराची व काही देहाला कष्ट देणारी अशी आहेत. सातत्याने केलेल्या ह्यापैकी कोणत्याही साधनाला तप असे म्हणतात. **तैसा स्वरूपाचिया प्रसरा। लागीं प्राणेंद्रियशरीरां। आटणी करणें जें वीरा। तेंचि तप॥** (ज्ञा. १६-१०८) धूपाचा अग्नीत प्रवेश झाला की तो नाश पावतो. हिणकस सोने शुद्ध होताना वजनात घटते, वद्य पक्षाची वाढ होताना चंद्र कमी होत जातो. त्याप्रमाणे आत्मानुभवाचे विकासासाठी, प्राणइंद्रिये व शरीर यांची जी आटणी करणे - झिजवणे त्यालाच तप म्हणतात.

गीतेत ह्या तपाचे सत्त्व, रज, तमात्मक तीन प्रकार सांगितले आहेत. स्वत:चे देहादिकांना पीडा देऊन, स्वत:साठी किंवा दुसऱ्याच्या विनाशासाठी केलेले तप-तामस तप होय.

पंचाग्नी साधन, उपासतापास, हठयोग, वायुभक्षण, शुष्क पत्राशन, जलपान, चांद्रायण व्रत, प्राणायाम, इत्यादि साधने कष्टाची आहेत. या तपापासून दु:ख होते. केवळ दु:खच नव्हे 'महादु:ख' असे समर्थ म्हणतात. आधीच शरीरेंद्रिये ही रोग, पीडा, काळजी, अशा त्रिविध तापांनी व्यापलेली आणि त्यातच पुन: तामसी तपाने तापवणे हे महादु:खच नव्हे काय ? यात यातना भोगाव्या लागतात. शिवाय सर्व तपांचा नामात अंतर्भाव होऊन श्वास म्हणजे प्राण व मन यावर सुखाने विजय मिळविता येतो. मग हे सुखाने होणारे साधन का नाकारावे ?

नामसाधनाने महादु:खाचे निवारण होते, इतकेच नव्हे तर या साधनात असतानाही सुख व साधनोत्तर ही सुख, असे हे **गोड हे गोमटे इंद्रियासी वाड। केला कैवाड माझ्या चित्ते। तुका म्हणे तेथे विकाराची मात। बोलोनये हित सकळांचे॥** (तुकोबा)

यात दु:खाची आत्यांतिक निवृत्ती व चिरंतन सुखाची प्राप्ती, असा दुहेरी लाभ आहे. महादु:ख कोणते असेल तर जन्म-मरणाची पुनरावृत्ती. तेच मुळी ह्या नामाने नाहीसे होते. **मुखी नाम हाती मोक्ष। ऐसी साक्ष बहुतांची। तुका म्हणे आडकाठी। नाही भेटी देवाचे॥** नाथांचे मते शरीराचे शोषण करून तप करणे हे मुळी तप नव्हेच तर तो त्याचा प्रारब्ध भोग. **शरीरशोषणा नाव तप। ते प्रारब्ध भोगानुरूप। हृदयी वाहणे कृष्णस्वरूप। तो शुद्ध साक्षेप तपाचा॥** (ना. भा. ३-४००) असे नाम हे श्रेष्ठ व दु:खकारक आहे. देवांचाही देव जो श्रीराम त्यांचे श्रीशंकर ही नामस्मरण करितात. हालाहल वीष प्राशन करणाऱ्या शंकराचे ताप शमन रामनामाने झाले. असे हे दु:खहारक नाम आहे.



फार काय पण सृष्टीकर्त्या प्रजापतीलाही नामजपाने सामर्थ्य प्राप्त होते.

सृष्टी निर्माण करण्यापूर्वी ब्रह्मदेव देखील भांबावून गेला होता. त्याला ईश्वर स्वरूपाची ओळख नव्हती व सृष्टी निर्माण करण्याचे सामर्थ्यही त्याचे अंगी नव्हते. पण केवळ नामाच्या बळाने तो सामर्थ्य संपन्न सृष्टीकर्ता झाला. विश्व निर्माण करणेची त्याला योग्यता आली. ब्रह्मदेवास तप या शब्दाने ईश्वराने नामाचाच उपदेश केला. **मज ईश्वराते नोळखे। ना सृष्टीही करू न शके। तो थोरू केला एके। नामे जेणे॥** म्हणून नामाने श्रीरामाचे स्मरण करावे. समर्थ म्हणतात, **''राम हा देव देवांचा। देव प्रत्यक्ष सोडिले। गाजिली गोष्ट वैकुंठी माजली सचराचरी॥''**

★ ★ ★

**बहुतांपरी संकटें साधनांचीं।**
**व्रतें दान उद्यापनें तीं धनाचीं।**
**दिनाचा दयाळू मनीं आठवावा।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा॥७४॥**

मागील श्लोकात तपादि घोर साधनात कष्ट होऊन देह दु:ख कसे सोसावे लागते व नाम साधनाने जन्म मरणासारखे महादु:खही कसे नाहीसे होते हे सांगितले. या श्लोकात आणखी काही साधने सांगून, तुलनेने नाम हेच सहज,सोपे, बिनअडचणीचे साधन कसे याचे विवेचन करतात.

नाम हे साधन, बिनकष्टाचे, बिनखर्चाचे असून श्रेष्ठ फल देणारे म्हणजे संसार सुखाचा करून तो तरून जाणेचे सामर्थ्य असलेले, असे हे साधन आहे, **जन्म मृत्यूची भाख। हारपोनी जाय नि:शेष। आत बाहेरी सुख। वाढोचि लागे॥** असे हे परमामृत आहे. घोर तपे, यात्रादि साधने, कष्टाची आहेत. हल्लीच्या तुलनेने पूर्वी काशीयात्रा दुर्घट होती. द्रव्यही फार लागायचे. व्रते, दाने, उद्यापने, ह्या साधनातही खर्च व कष्ट फार.

ज्यात श्रम नाहीत, कोणतीही अडचण येणेचे कारण नाही, ज्यात द्रव्याची जरूरी नाही, ज्याला कालाची व स्थलाची मर्यादा नाही, ज्यात स्नानादि कर्मांची आवश्यकता नाही, जे कोणत्याही वाणीत कसेही घेतले तरी दोष नाही, ज्याचा सर्व वर्णांना अधिकार, जे लहानथोर, स्त्रीपुरूष, इत्यादि सर्वांना कवटाळणारे, असे हे सर्वकाली, सर्वोपयोगी, संकटमुक्त असे साधन

आहे, म्हणून सज्जनांनी ज्ञानोत्तरही याचा आश्रय घेतला. **यांसी न चले कांही विघ्न। कोणीही न करू शके भग्न। म्हणोनि नारदादी सर्वज्ञ। परी नामीच रमोनी राहिले।** या साधनाचे हे सुलभत्व लक्षात घेऊन दीनदयाघन असा **श्रीराम** याचे सतत स्मरण करावे.

ज्यांनी ह्या रामाला सारसर्वस्व मानिले, आणि निष्ठेने तोच एक आपला आधार, असे मानून त्याला जे शरण गेले, त्या सर्व दीनदुबळ्या जीवावर त्याने दयेचा, कृपेचा वर्षावच केला. कारण शरणांगताचे रक्षण करणे हे त्याचे ब्रीदच आहे. **दीनानाथा तुझी ब्रीदे चराचर। घेसील कैवार शरणागता। आपुल्या दासाचें न साहासी उणें। उभा त्या कारणें राहिलासी।। चक्र गदा हाती आयुधें अपार। न्यून तेंची पुरें करूं धांवे।।**

मागील तीन श्लोकात नामाचा मोठेपणा दाखवून हे नाम-साधनच सर्वात सोपे असे सांगितले. सर्व संतांची ह्याबाबत एकवाक्यता आहे. पण खरेच हे साधन इतके सोपे आहे का ? व हे जर इतके सोपे आहे तर मानव आपला उद्धार का करून घेत नाही ?

हे साधन सोपे आहे तसेच ते अवघडही आहे. सोपेपणामुळे त्याचे महत्त्व न कळल्यामुळे त्याचेकडे दुर्लक्ष होते. घसा धरलेला रोगी बाजारातून किंमत देऊन गोळ्या आणून उपचार करतो पण कढत पाण्यातून मिठाच्या गुळण्या टाकणे, हा साधा उपाय तो करीत नाही. का ? तर सुलभ मीठ औषधी आहे असे त्याला वाटतच नाही. तुकाराम म्हणतात, ''**तुका म्हणे आहे सोपे सर्वाहुनी। शहाणा तो धणी घेई तेथे।।**'' नामाने काय होणार, असेच सर्वांना वाटते; म्हणून तिकडे दुर्लक्ष होते.

जसे सोपे तसेच अवघडही आहे असे का म्हटले ? या साधनात कष्ट नाहीत, घ्यायला सोपे, द्रव्याची जरूरी नाही इतकेच. **पण याचि देही याचि डोळा। पाहे मुक्तीचा सोहळा।।** असा अनुभव पाहणेचा झाल्यास ह्या साधनात कष्ट फार, नाम साधन हेच ज्यांचे इतिकर्तव्य होते तेच तुकोबा, **परमार्थ नव्हे, लेकुराच्या गोष्टी। भक्ती नव्हे सोपी, सुळावरील पोळी।।** असे का म्हणतात ? सोपे असणारे हे साधन, त्याची गोडी लागेपर्यंत सतत अभ्यासावे लागते. अट्टाहासाने अभ्यासावे लागते. त्यासाठी निष्ठा लागते, निर्धार लागतो. मुख्य म्हणजे नामाबरोबर बुद्धी अंतर्मुख म्हणजे स्वरूपाकार व्हावी लागते. ही गोष्ट फार अवघड आहे.

बुद्धीला बहिर्मुख करणे हा इंद्रियांचा सहज स्वभाव जे हिताचे ते



इंद्रियांना नको असते. **विषयावांचोनि काही। आणिक सर्वथा रम्य नाही। ऐसा स्वभावचि पाही। इंद्रियांचा।।** इंद्रियदमन करून बुद्धी अंतर्मुख करणे, हे काम सोपे नाही. ज्ञानोबा म्हणतात, ''**हरी बुद्धी जपे तो नर दुर्लभ। वाचेसी सुलभ रामनाम।**'' रामनाम तोंडाने घेणे सोपे. पण बुद्धीच्याद्वारे त्याचा जप करणारा पुरूष विरळाच. **राम नाम सब कोई कहे। ठक ठाकूर और चोर। जिस नामसे ध्रुव प्रल्हाद तरे। वो नाम है कुछ और।।**

या दृष्टीतून विचार केला तर इतर साधने बरी, पण अंतर्मुख होऊन नाम घेणे अवघड. समर्थांचे वडील बंधू म्हणतात, ''**सुलभ व्रत तप दान दमन। सुलभ तीर्थाटण वेदाध्ययन। सुलभ यज्ञ व्याकरणाभ्यासन। हरीभक्ती अति दुर्लभ।।**'' अंतर्मुख होऊन प्रेमाने रामनामात रंगून जाणे, हे सोपे नाही. अवघड आहे.

बहुजनसमाज बहिर्मुख विषयबुद्धीच्या आहारी असल्यामुळे रामरूपाकडे कोणाचे लक्षच जात नाही. **दुर्बळ हे अवघे जन नारायणी विन्मुख।।** हीच इंद्रिय बुद्धीची बहिर्मुखता प्रभात समयी कमी प्रमाणात असते व चित्ताची एकाग्रता सहज होऊ शकते. म्हणून प्रभाते मनी....

★ ★ ★

**समस्तामधें सार साचार आहे।**
**कळेना तरी सर्व शोधून पाहें।**
**जिवा संशयो वाउगा तो त्यजावा।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा।।७५।।**

मागील श्लोकात नामाची इतर साधनांशी तुलना करून नाम हे कोणतीही अडचण नसलेले साधन कसे, हे सांगितले. नाम हेच सर्व साधनांचे सारसर्वस्व कसे, हे या श्लोकात सांगतात.

भवसिंधू तरून जाणेसाठी सर्व उपायांमध्ये रामनाम हेच साचारखरोखर सत्य साधन आहे. हे नीट समजत नसेल तर जरा शोध घे. शोध घे म्हणजे ग्रंथ ग्रंथांतरी नीट विचार करून शोधून पाहा. सद्गुरूला शरण जाऊन त्याचेकडून समजून घे, म्हणजे कळेल. पण असा काहीच प्रयत्न न करता, नामात काय आहे ? त्याने काय होणार ? अशा निरर्थक संशयात गुरफटून राहू नकोस. संशयाने कल्याण होणार नाही. आयुष्य मात्र फुकट जाईल. असा या श्लोकाचा थोडक्यात मतितार्थ आहे.

नाम हेच पारमार्थिक साधनातील सार साधन आहे, असे केवळ समर्थच म्हणतात असे नसून सर्व संत सज्जनांचे हेच सांगणे आहे. तुकोबा म्हणतात, **''वेद अनन्त बोलिला। अर्थ इतुकाचि साधिला। विठोबासी शरण जावें। निजनिष्ठें नाम गावें। सर्व साधनांचे सार। उतरी भवसिंधू पार।''** (गा. ३७१७) ज्ञानदेव म्हणतात **''सार सार सार विठोबा नाम तुझे सार।।''** तसेच **नामें पावन धर्माधर्म। नाम परब्रह्म वेदार्थे।।** (ज्ञा. १०-२३३) नाथ महाराज म्हणतात, **''बाप नामाचे निजतेज। यम वंदी चरणरज। नामापाशी अधोक्षज। चतुर्भुज स्वये तिष्ठतु।।''** आचार्यांसारखे अद्वैत वेदांती म्हणतात, **''भज गोविंदं भज गोविंदं''** म्हणजे नाम हे सारभूत साधन आहे याबद्दल सर्व संताची एकवाक्यता आहे.

हे साधन सार कसे याचा येथे उलगडा न करता त्याचा जिवा तूच सर्व दृष्टीने विचार करून शोध घे, असे समर्थ सांगतात, नाम चिंतनाचे सामर्थ्य सामान्य मनुष्यास कळत नाही. ग्रंथ वाचून पांडित्य करणाऱ्यासही त्याचे महत्त्व कळून, तो ते साधन म्हणून आचरणात आणेलच, असे नाही. त्याला सद्गुरू कृपाच हवी. त्यावाचून ते कळणार नाही. **संता वाचुनिया नाम नये हाता। साधने साधिता कोटी जाण। संतासी शरण गेलिया वाचूनी। एका जनार्दनी न कळे नाम।।** (एकनाथ)

भगवन्नाम, भक्ती, प्रेम ही गूढ रहस्ये आहेत. ती बोलण्याची नाहीत; अनुभवाची आहेत. ज्यांनी सर्व संकल्पाचा ज्ञानोत्तर संन्यास केला, **सर्व खल्विदं ब्रह्म** ही ज्यांची धारणा असे संन्यासीही कृष्णरूपात व नामात रंगून जातात. हे गूढ रहस्यच नाही का ? **हे वेदशास्त्रां अगम्य। सकळ देवांसी अतिर्दुगम। जेणें लुब्धें मी पुरूषोत्तम। तें हें भक्तप्रेमरहस्य।।** (ना. भा. २४-४०२) या गूढ रहस्याचा अनुभव गुरूकृपेवाचून येत नाही. ज्ञानोबा म्हणतात, **''ज्ञान गूढगम्य ज्ञानदेवा लाधले। निवृत्तीने दिधले माझे हाती।।''**

आता सर्व संतांनी नाम हेच सर्व सार का म्हटले याचा शोध घेऊ. जे कालाचे मर्यादेत न राहता चिरंतन असते ते सार. उदा. सोने हे सत्य, पण त्याच रूपाने दागिने हे असत्य. तसेच परमात्मा हा सत्य व त्याचे आधारावर भासमान होणारे नानारूपाने नटलेले जग अशाश्वत. समजा आकाराला आलेल्या दागिन्याची रूपे नष्ट झाली तरी त्यारूपाबरोबर सत्य-सोने नष्ट होत नाही, ते राहतेच. रामराव, कृष्णराव ही नावे धारण करणारी अनेक रूपे जन्माला आली. नामानेच त्यांच्या रूपाची ओळख पटली. ती रूपे नष्ट झाली तरी नामे मागे कायम आहेतच. मग नाम हे देशकाल मर्यादेपलीकडे



नाही का ? आणि रूपापेक्षाही ते जास्त सत्य नाही का ? मग जे सत्य, ते श्रेष्ठ.

या जगात कितीतरी वैचित्र्य आहे. नाना तऱ्हेचे दगड, किडे, प्राणी, पक्षी, वृक्ष इत्यादि आहेत. या सर्वांची नावे भिन्न आहेत. त्यात सजीव व निर्जीव असे दोन भेद आहेत. पण या सर्व सजीव, निर्जीव वस्तूमध्ये एक सामान्य गुण आहे, तो म्हणजे **असणेपणा**. सजीव वस्तू झाली तरी आहे व निर्जीव वस्तू झाली तरी आहे. हे अस्तित्व आले की नामरूप आलेच. भौतिक सृष्टीसाठी ॐकारातून शब्द सृष्टी उत्पन्न होते. या अखिल सृष्टीला परमात्म्याचा आधार असल्यामुळे ॐकार हे परमात्मवाचक नाम आले. म्हणून नाम म्हणजे सत्. जेथे सत् तेथे चिद् व आनंद म्हणून नाम हे सच्चिदानंदस्वरूप आहे. ते सृष्टीच्या आदि अंती शिल्लक राहाते इतकेच नव्हे तर रूपालाही व्यापून पुन: शिल्लक राहते. परमात्म स्वरूपाजवळ, अगदीजवळ कोण असेल, तर ते नामच. जो नामात मीपणाने नाहीसा होतो त्यालाच नाम महात्म्याची कल्पना येते.

या सत्ला म्हणजे सत्य परमात्म्याला काही रूप दिल्याशिवाय त्याचे अनुसंधान ठेवता येत नाही. म्हणून नाम हेच त्याचे रूप होय. यावर एक अशी शंका येईल की सृष्टीत वाच्य म्हणजे पदार्थ व त्याचे वाचक म्हणजे नाम हे भिन्न असतात असा न्याय आहे. साखर हे नाम म्हणजे साखर नव्हे. अग्नी हे नाम म्हणजे अग्नी नव्हे. नाम हेच रूप असेल तर साखर म्हटले की तोंड गोड व्हायलाच पाहिजे व अग्नी म्हटले की तोंड भाजले पाहीजे. पण असे होत नाही. म्हणून पदार्थ व नाम एक असू शकणार नाहीत. परंतु वाच्यवाचक भेद हा भौतिक पदार्थाला लागू आहे. भगवान हा सर्व सृष्टीचा एकच आधार असून तो अलौकिक चैतन्य घन असल्यामुळे, त्याचे नामही आपोआपच भौतिक अत एव सत्य आहे. अनेक दागिन्यांच्या नावापैकी कोणतेही एक नाव घेतले तरी त्यातले सोने हे नाव नष्ट, होत नाही, कायमचे राहते. त्याप्रमाणे त्या सहस्रनामी भगवंताचे कोणतेही नाम घेतले तरी त्याचे चैतन्य स्वरूप त्यात अंतर्भूत राहतेच. विश्वव्यापक परमात्मस्वरूप, केवळ साध्य नामसाधनाने हस्तगत-आपलेसे करून घेण्याची ही संत सद्गुरू यांची केवढी किमया ? **चैतन्य नित्य निराधार। निर्धर्मक निर्विकार। त्याचा केला जीर्णोद्धार। सत्य साचार जगद्गुरू।।** (ना. भा. ९-४४५)

म्हणून समर्थ ठासून जीवाला सांगतात. **भजनरहित ज्ञानें मोक्ष होणार**

**नाहीं। सकळ निगम त्यांचें सार शोधूनि पाहीं। सगुणभजन मागें रक्षिलें थोरथोरीं। अधम नर तयांचें ज्ञान संदेहकारी॥** (स्फु. श्लोक) म्हणून - प्रभाते मनीं.....

★ ★ ★

**नव्हे कर्म ना धर्म ना योग कांहीं।**
**नव्हे भोग ना त्याग ना सांग पाहीं।**
**म्हणे दास विश्वास नामीं धरावा।**
**प्रभाते मनीं राम चिंतीत जावा॥७६॥**

मागील श्लोकात नाम हे सर्व साधनांचे सार कसे आहे, हे ग्रंथावरून किंवा सद्‌गुरूकडून नीट समजून घ्यावे. या साधनासंबंधी व्यर्थ संशय धरू नये, असे सांगितले. ग्रंथावलोकन न झाल्यास किंवा योग्य सद्‌गुरू न भेटल्यास इतर साधनात काही ना काही व्यंग राहते हे जाणून नामावर दृढ विश्वास ठेवून तेच साधन करावे, असे या श्लोकात सांगतात. परमार्थ प्राप्तीचे इतर उपाय यथासांग म्हणजे विधिपूर्वक होणे कठीण असते.

**(१) कर्म :-** या कलियुगात कर्म,धर्म,योग, त्याग इत्यादि परमार्थ प्राप्तीसाठी केलेले उपाय विधिपूर्वक होणे कठीण आहे. कर्माची गती सूक्ष्म व गहन असल्यामुळे बुद्धिवानातही कर्म कोणते व अकर्म कोणते याचा घोटाळा उडतो. ते करीत असता यथाविधी होतेच असे नाही. साधे आचमनसुद्धा यथासांग होत नाही. शिवाय कर्म यथासांग झाले तरी ईश्वरार्पण करावे लागते व काही वैगुण्य दिसले तरी तेथे हरि स्मरण करावे लागते. म्हणजे कर्माची शुद्धता राहणे व अशुद्धता जाणे हे सर्व नामावरच अवलंबून असल्यामुळे भगवन्नामच सर्व समर्थ आहे.

**कर्मीं कर्म विगुण होत। तेथ स्मरावा मी अच्युत। नामें न्यून तें संपूर्ण होत। हे सामर्थ्य नामाचें॥** (ना. भा. १०-४६०)

**(२) धर्म :-** धर्मासंबंधीही पंडितांत निरनिराळी मते आहेत. कोणी आचाराला महत्त्व देतो. कोणी अहिंसेला महत्त्व देतो. कोणी प्रजा धारणेला धर्म म्हणतो तर कोणी अभ्युदय निश्रेयस सिद्धीला धर्म मानतो. भगवान स्वत: **धर्मोमद्भक्तिकृत् प्रोक्त:।** असे म्हणतात. उद्धवाला धर्माचे गुह्य सांगताना ते म्हणतात. **ऐक उद्धवा निज वर्म। गुह्य सांगेन मी परम। माझी भक्ती जे सप्रेम। उत्तम 'धर्म' तो जाण॥** (ना. भा. १९-३४९) समर्थ म्हणतात, **''सकळ धर्मामध्ये धर्म। स्वरूपी राहणे स्वधर्म।''** नामाने मनाचे रूपाशी लगेच तादात्म्य



होत असल्यामुळे नामाचे महत्त्व श्रेष्ठ आहे.

**(३) योग :-** योग म्हणजे अष्टांग योग. यात यमनियम आसनादिकासाठी शारीरिक व मानसिक श्रम करावे लागतात व चित्तवृत्ती निरोध करावा लागतो. भक्तीशिवाय चित्तनिरोध क्लेशकारक होतो त्यासाठी मन सात्विक असावे लागते. सात्त्विक मनासाठी युक्ताहार विहार ठेवावा लागतो. इतके करूनही अभ्यासाचे वेळी विषयाकडे सहज धावणारे मनास वरचेवर परतवून ध्येय वस्तूकडे आणावे लागते. यात मानसिक कष्ट फार होतात. नामाने ध्येय वस्तूला मन लगेच चिकटते व तद्रूप होते.

**(४) भोग :-** कितीही द्रव्य मिळवून विषयभोग भोगिले तरी त्यात कृतार्थता वाटत नाही, किंवा समाधान उत्पन्न होत नाही. हा अनुभव प्रत्यक्ष आहेच. पण भजनात होणाऱ्या एकाग्रतेमुळे समाधान होते. **मनी प्रगटता श्रीहरी। तो इंद्रियांतरी भजनानंदू॥**

**(५) त्याग :-** त्याग म्हणजे कर्मफलाची इच्छा सोडणे. सामान्य बहुसंख्य जनास हे दुर्घट आहे. केल्याचे काहीतरी पदरी पडावे, हा सहज स्वभाव आहे. पण नामाने कर्ता करविता तो देवच अशी मनाची धारणा होऊन जे आहे ते ठीक, अशी वृत्ती होते. काही धरावे लागत नाही. काही सोडावे लागत नाही. **स्थिती बाणता स्वरूपाची। चिंता सोडिली देहाची। मग होणाऱ्याची। कांही चिंता नसे॥**

सारांश, कर्म धर्म योगादिकांचे फल आत्मसंतोष हेच आहे. **मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तीहीनं सुरेश्वर। यत्पूजितं मयादेव परिपूर्ण तदस्तुमे॥ न्यूनं संपूर्णतां याति यद्योवन्दे तमच्युतम्॥** असे शरण होऊन न्यून ते पूर्ण करून घेणेसाठी आळवावेच लागते. भगवत्संतोषाविरहित कोणतेही धर्म कर्म यथासांग झाले असे मानणे हेच मुळी अज्ञानाचे किंवा मूर्खत्वाचे लक्षण होय. **न करितां भगवत्‌भजन। वेदाध्ययन यज्ञ दान। येणेंचि आम्ही जाऊं तरून। म्हणती ते जन महामूढ॥** (ना. भा. २६-३८१) कर्म हे जड असलेमुळे फल देऊ शकत नाही. फलदाता ईश्वर आहे. नामाने तो प्रसन्न होतो. म्हणून नाम साधनावर विश्वास ठेवून ते साधन निर्धाराने करावे. म्हणून श्रद्धा अशी असावी की नामाने अनेक भक्त तरून गेले ते सर्व साधनाचे सार आहे. मी हे साधन केल्यास ईश्वर कृपा होऊन मीही मुक्त होईन; माझा उद्धार होईल, अशा दृढ विश्वासाने हे साधन करावे.

विश्वास हे परमार्थातले मोठे भांडवल आहे. **श्रद्धावान् लभते ज्ञानं।**

कोणतेही कार्य श्रद्धेने केले तर ते सफल होते. श्रद्धा असेल तर भगवत्कृपेने सर्व संशयनिवृती होते. तुकाराम म्हणतात, **''पांडुरंगे सत्य केला अनुग्रहो। निरसूनि संदेह बुद्धिभेद।।''** पण अश्रद्धेने हे साधन केल्यास दुर्गती प्राप्त होते, **अश्रद्दधाना: पुरूषाधर्मस्यास्य परंतप। अप्राप्य मां निवर्तन्ते मृत्युसंसार वर्त्मनि।।** (भ. गी. ९-३) अश्रद्ध कोणाला म्हणायचे. ज्याला जे ठाऊक नाही, त्याला अश्रद्ध म्हणता येत नाही. ठाऊक नसलेल्या गोष्टीबद्दल श्रद्धाही नसते व अश्रद्धाही नसते. पण ठाऊक असून जी गोष्ट अविश्वासाने केली जात नाही, त्याला अश्रद्ध म्हणतात. नाममहात्म्य ठाऊक असूनही अविश्वासाने ते साधन न करणारा तो अश्रद्ध. अशा मनुष्याला भगवान म्हणतात, **अप्राप्य मां निवर्तन्ते मृत्युसंसार वर्त्मनि।** म्हणजे मृत्यू संसार मार्गात परत येतात. यावर अशी शंका येईल की मृत्यू संसारात ते आहेतच मग परत येतात याचा अर्थ काय ? याचा अर्थ असा की कलियुगी उद्धारक असे नामामृताचे महात्म्य ऐकूनही अविश्वासाने त्याचा घोट न घेता, याने काय होणार असे मानून, त्यापासून परावृत्त होऊन, संसारचक्रात हे अविश्वासू फिरत राहतात. यासाठी विश्वास धरून प्रभाते मनी राम चिंतीत जावा.

सारांश कोणतेही कर्म, धर्म, योगसाधन केले तरी त्याचे फल-प्राप्तीसाठी, हरि-संतोष पाहिजेच. तो फुकाच्या व सुखाच्या नाम् साधनाने होतो.

**सकळही तपे केली। सांग विधिपूर्वक त्यासीच फळली। ज्याचे वाचे विश्वासे आली। नामे हरीहराची।।**

★ ★ ★

**करी काम निष्काम या राघवाचें।**
**करी रूप स्वरूप सर्वा जीवांचें।**
**करी छंद निर्द्वंद्व हे गूण गातां।**
**हरीकीर्तनीं वृत्तिविश्वास होतां।।७७।।**

मागील श्लोकांत सर्व कर्मधर्मातील न्यून नामाने कसें पूर्ण होतें हें सांगून नामावर विश्वास ठेवून तें साधन करावें असें सांगितलें. ''प्रभाते मनीं राम चिंतींत जावा'' या सदरातील दहा श्लोकात निरनिराळ्या प्रकारें नाममाहात्म्य सांगितलें, म्हणजे तिसरी स्मरणभक्ति सांगितली. या श्लोकांत उत्कट रामभक्तींनें व त्याच्या ध्यानानें काय फलप्राप्ति होते हें सांगून दुसरी



कीर्तनभक्ति सांगतात.

या राघवाचा काम भक्ताला निष्काम करितो. म्हणजे त्याच्या वासनांचा क्षय होतो. विषयासक्ती आहे तोंवर तृप्ति कधींच होत नाहीं, पण निर्विषय झालें कीं स्वाभाविक तृप्ति आहेच. एका श्रीरामाची इच्छा केली, त्याचा ध्यास लागला कीं भक्त निष्काम होतो. म्हणजे रामकृपेनें त्याची इच्छापूर्ति होऊन तो संतुष्ट होतो, किंवा विषयवैराग्य उत्पन्न होऊन सर्व इच्छा नाहींशा होतात. **'सदा नाम घोष करूं हरिकथा। तेणें सदा चित्ता समाधान।।'** असें तुकोबा म्हणतात. एक काम नाहींसा झाला कीं त्याचेपासून उत्पन्न होणारे क्रोधलोभादि अनर्थ आपोआप टळतात आणि भगवद्रूपाची गोडी लागते. **कीर्तनें उपजे भगवत्प्रेम। जीवासी करी निष्काम।। निष्काम तोचि आत्माराम। लागे स्वरूपीं रमावया।।** (ना. भ. सू. ३७,३७९) आत्माराम स्वरूपांत एकदां भक्त रमूं लागला कीं -

'ते रूप सर्वां जिवाचें स्वरूप करी,' तें रामरूप एकदां ठसले कीं भक्ताला सर्वत्र रामच भरलेला दिसतो. सर्व सृष्टीचा तोच आधार असल्यामुळें दृष्टी जाईल तिकडे रामरूपच दिसतें. स्त्रियांचे चित्त दागिन्याच्या बाह्य सौंदर्यावरच खिळून राहतें.पण सराफाचें चित्त त्या दागिन्यांच्या सौंदर्याचा भेद करून त्याचा आधार असें जे सोनें त्यावर खिळून राहते. याप्रमाणेंच सामान्य जनांचे लक्ष बाह्य सृष्टीसौंदर्यावर खिळून राहतें, पण भक्ताचें लक्ष सृष्टीचा आधार जो परमात्मा त्यावर जडून राहतें. **या उपाधीमाजीं गुप्त। चैतन्य असे सर्वगत। तें तत्त्वज्ञ संत। स्वीकारिती।।** (ज्ञा. २-१२६) गोपींना **जिकडे पाहे तिकडे हरी। हरीविना दुजें नाहीं।।** असाच अनुभव आला. तसेंच **रिता ठाव या राघवेवीण नाहीं।।** हें प्रत्ययास येतें. स्वत:चा विसर पडून म्हणजे देहबुद्धि नाहींशी होऊन रामरूपाची जाणीव झाल्यामुळें विश्वात्मक भाव उत्पन्न होतो. अशी या रामरूपाची श्रेष्ठ फलश्रुती असल्यामुळे ती ठसण्यासाठी निष्ठेनें हरिकथेचा नाद असावा.

हरिकीर्तनीं वृत्ति-विश्वास होता, हें गुण गातां, छंद निर्द्वंद्व करी-हरिगुण गानाचा एकदा नाद लागला कीं त्यांत स्वार्थ व परार्थ हे दोन्हीही साधतात. (१) मनुष्य हरिनामांत तल्लीन झाला म्हणजे प्रथम तो स्वत:ला विसरतो व भगवत्स्वरूपाशीं एकरूप होतो. तेथे चालती बोलती समाधि प्राप्त होते. तुकोबा म्हणतात **समाधीचें सुख सांडा ओवाळून। ऐसा या कीर्तनी ब्रह्मरस** (गा. २३३५). (२) कीर्तनाचा छंद लागला म्हणजे त्याविना करमेंनासें झालें

कीं तें वारंवार होतें, त्यामुळें चित्त सात्त्विक बनतें व ईश्वरी प्रसादानें शांति प्राप्त होते. मन:शांतीमुळें ते निर्द्वंद्व होतें म्हणजे शीत उष्ण, लाभालाभ, सुखदु:ख व मानापमान इत्यादि द्वंद्वांबद्दल सहिष्णुता प्राप्त होते. कशीही स्थिती प्राप्त झाली तरी चित्त डगमगत नाहीं. **करावें कीर्तन। मुखें गावें हरिचे गुण।। मग कांही नव्हे बाधा। काम दुर्जनाच्या क्रोधा।। शांतिखड्ग हातीं। काळासी ते नागविती।।** (गा. २३८२) थोडक्यात म्हणजे ''आहे तें ठीक'' अशी वृत्ति बनते. द्वंद्वभान जसजसें कमी होत जातें तसतशी द्वैत भावना मावळत जाऊन परमेश्वराच्या अद्वितीय स्वरूपाची ओळख होते. (३) तिसरा लाभ म्हणजे कीर्तनात आपले बरोबर आणखी चार लोकांचेंही पारमार्थिक हित साधतें. कारण **ईश्वराचें गुणगान। सर्वांसी वेध लावून।। पापपुण्याची निवड करून। सदाचारी प्रवर्तवी।।**

टाळ, वीणा, मृदंग यांचे झंकारात सर्व श्रोते आपली संसारव्यथा विसरून भगवन्नामगुणांत डोलूं लागतात. आणि ''कथेमाजी उभा देव'' अशी स्थिती असल्यामुळे सर्व वातावरण शांत, पवित्र व प्रसन्न बनतें. नादानें व नामानें ही प्रसन्नता उत्पन्न होते व त्याच बरोबर पापपुण्यविचार कळल्यामुळें श्रोत्यांची सदाचाराकडे प्रवृत्ति होऊन लोकसंग्रह साधतो. **भावें करितां कीर्तन। तरे तारी आणीक जन। भेटे नारायण। संदेह नाहीं म्हणे तुका।।** (गा. २३४६)

पण याचबरोबर एक गोष्ट लक्षात ठेवावी कीं, कीर्तनभक्ति पुढे श्रोते असले तरच करावयाची असें नाही. कांही प्रसंगीं श्रोते नसले म्हणजे कीर्तन बंद ठेविलें जातें; पण हें इष्ट नाहीं, कारण केवळ लोकरंजन हा कीर्तनाचा उद्देश नाहीं. कीर्तन हे देवाचें गुणगान करून त्याच्या कथालीला सांगून त्यांत स्वत: रमून जाण्यासाठीं आहे. श्रोते असतील तर त्यांचा फायदा होईल. पण श्रवणार्थ कोणी नसेल तरीही स्वात्महितासाठी कीर्तनाची आवश्यकता आहे. **आपुलिया सुखस्वार्था। केलीच करावी हरिकथा। हरिकथेवीण सर्वथा। राहोचि नये।।** (दा. ४-२-४) हरिकथेमुळें वाचा शुद्ध होते. महादोष नाश पावतात, सुशीलता येते, श्रोत्या-वक्त्यांचे संशयनिरसन होतें आणि भगवत्कृपा होते. म्हणून हरिकीर्तनावर पूर्ण विश्वास ठेवून तें एकतानतेनें करावें.

★ ★ ★



**अहो ज्या नरा रामविश्वास नाहीं।**
**तया पामरा बाधिजे सर्व कांही।**
**महाराज तो स्वामि कैवल्यदाता।**
**वृथा वाहणें देहसंसारचिंता।।७८।।**

नामसंकीर्तनावर विश्वास ठेविल्याने कर्मसांगता कशी होते व हरिकीर्तन विश्वास ठेवून केल्यानें निर्द्वंद्व स्थिति कशी प्राप्त होते हे मागील दोन श्लोकांत सांगितले. ईश्वरावर विश्वास असलेला मनुष्य स्मरण किंवा कीर्तनभक्तिच्या मार्गाला लागेल. पण देवावर ज्याचा विश्वासच नाही अशा अविश्वासी मनुष्याची स्थिती काय असते हें या श्लोकात सांगून निष्ठावंत भाविक भक्ताचा भावही दर्शवितात.

ज्याचा रामावर विश्वास नसतो अशा अभक्त किंवा अविश्वासी मनुष्याला जीवन कंठीत असतांना व मृत्यूनंतरही सर्व गोष्टी बाधकच होतात. म्हणजे जीवनहि असह्य, दु:खाचे होतें व मरणानंतरही अधोगति प्राप्त होते.

पण अशी विषमता कां असावी ? भक्त असो कीं अभक्त असो, ईश्वराला दोघेही सारखेच. आत्मारामाचें वास्तव्य दोघांच्याहि ठिकाणीं आहे. मग अभक्ताला सर्व गोष्टी बाधक व भक्ताला सर्व साध्य, ''मनीं धरावें तें होतें'' असें का ? याचें उत्तर असें की, जगाचा मायबाप-स्वामी असा ईश्वर विषम नाहीं. सर्व मुलांचे कल्याण व्हावे असेंच बापाला वाटतें. पण मला आता सर्व कळतें, बापाला काय विचारावयाचें ? अशी अहंमन्यता मुलाच्या ठिकाणी आली कीं बाप स्वस्थ राहतो. मग अहंमन्यतेनें जे मुलानें केलें तें त्यालाच भोगावें लागतें. तसेंच येथें आहे. नाथ म्हणतात **भक्ताअभक्तांची कर्मगति। भगवंत चालवी निश्चिती। तेथ भक्तांची कां अलिप्तस्थिती। अभक्त कां होती अतिबद्ध।। करितां कृष्ण कीर्ति कीर्तन। भक्तांचा निरसे देहाभिमान। यालागीं ते अलिप्त जाण। अभक्तां बंधन अहंभाव।।** (ना. भा. ३१-३२३,३२४) अभक्ताला सर्व कांही बाधक होतें म्हणजे देह अहंकारामुळें तो संसारचक्रांत बद्ध होतो.

अहंकारामुळे देहबुद्धि दृढ होते त्यामुळें देहाशी संबंधित असेल तो माझा व मला सुख देणारा विषय तो सत्य असे वाटू लागतें **तेंचि काया मी आपण। हें देहबुद्धीचे लक्षण। येणें करितां जालें प्रमाण। दृश्य आवघें।।** (दा. ६-८-४१) वेद, शास्त्र यावर विश्वास नसल्यामुळे सृष्टींत प्राप्त होणाऱ्या

विषयसुखांत तो धडपडूं लागतो. त्यासाठी विहित, अविहित यांचा विचार न करितां वाटेल तें कर्म तो करूं लागतो. इतकें करूनही जिवंत असेपर्यंत देहसंसार चिंता सुटत नाहीं, समाधान प्राप्त होत नाही व पापपुण्याचा विचारच नसल्यामुळें अंती दुर्गति प्राप्त होते. **देहाचेनि थोरपणें। समाधानासि आलें उणें। देह पडेल कोण्यागुणें। हें ही कळेना॥** (दा. ७-२-३६) म्हणून देवावर विश्वास नसणाऱ्या अशा अभक्ताला पामर म्हणजे दुदैवी, पतित, करंटा असें म्हणतात. मोक्षदाता षड्गुणैश्वर्यसंपन्न, जगाचा स्वामी, राजाधिराज राजाराम अंतरीं जवळ असून ज्याने केवळ अविश्वासाने आपलें इहपर अनहित केले तो अज्ञानी पामर नव्हे का ? निकट असलेल्या आत्मारामाचें अविश्वासानें विस्मरण झाल्यामुळें असें करंटेपण पदरीं येतें. नामदेव तर अशा नराला चांडाळ म्हणतात. **नाहीं भक्ति नामीं तो चांडाळ पातकी। तोचि जाणा लोकीं दुष्ट नष्ट॥**

भक्त किंवा अभक्त यांच्या बाह्य क्रियेंत फारसा फरक नसतो. देहधर्माला अनुसरून खाणें, पिणें, व्यवसाय इत्यादि व्यापार दोघांचेहि चालूच असतात; पण फरक असतो समजुतींत. भक्ताचा परमेश्वरावर व त्याच्या सत्तेवर विश्वास असतो. तर अभक्ताचा अहंकर्तृत्वावर विश्वास असतो. कर्ता, करविता एक देव अशी भक्तांची श्रद्धा असते, तर कर्ता, करविता मी असे अभक्ताला वाटतें. भक्ताच्या ठिकाणीं पापपुण्यात्मक विचार असतो तर अभक्ताला त्याची गरज नसते. अभक्त देहाची व संसाराची चिंता करण्यांत चूर असतो, तर **सर्व कांही चिंता केली भगवंते** अशी भक्ताची निष्ठा असते.

यावर एक शंका अशी येईल की, सर्व कांही चिंता आपली आपण करतो असा अनुभव असतांना ''सर्व कांही चिंता केली भगवंते'' असें म्हणणें किंवा वाटणें हें अविचाराचें नव्हे का ? नव्हे. भक्ताचाहि या निष्ठेमागे कांही शास्त्रीय विचार असतो, तो असा-ज्या संकल्पबीजापासून या देहाप्रत आपण आलों तो मूळ संकल्प कोणाचा ? याचा विचार केल्यास जो संकल्प आपण आपल्या घमेंडीत आपला म्हणून कवटाळतो तो संकल्प आपला नसून मूळ संकल्प तो हरिसंकल्प आहे, असा निश्चय होत जातो. संकल्प जर हरीचा तर त्यापासून झालेले **देह हे देवाचें धन कुबेराचें। तेथें मनुष्याचें काय आहे॥** हे तुकोबांचे म्हणणें खरें नव्हे का ? ज्याचा देह त्याला त्याची चिंता. मग ''वृथा वाहणें देहसंसारचिंता'' हे समर्थवचन सत्य नव्हे का ?

सारांश, कर्ता करविता एक ईश्वर आहे असा दृढ विश्वास तरी पाहिजे किंवा आमचे आम्ही आहों असा तरी विश्वास पाहिजे. हिरण्यकश्यपू



तरी व्हावें किंवा प्रल्हाद तरी असावें; पण हिरण्यकश्यपू होणें अवघड आहे, सोपें नाहीं. संकटपरंपरा आली किंवा प्रयत्नानीं अपयश पदरीं येऊ लागलें म्हणजे अहंकर्तृत्वाने ओथंबलेला अभक्त डळमळूं लागतो. मग 'इदं च नास्ति पर' च न लभ्यते' अशी त्याची अवस्था होते. भक्ताला उपासनेमुळें श्रीराम हा आपला पाठिराखा आहे असा विश्वास वाटतो. म्हणून त्याच्या आधारावर संशयातीत होऊन तो समाधानांत राहतो व अंती सद्गति प्राप्त करून घेतो. **'वसे अंतरी रामविश्वास जेथें। नसे मानसीं नष्ट संदेह तेथे॥ विवेके अहंभाव ज्याचा गळाला। सदा राघवीं ऐक्यरूपें मिळाला॥** (क. अ. १३४-११६) म्हणून हृदयस्थ रामावर अविश्वास धरून मानवांनी आपलें अनहित करून घेऊ नये.

★ ★ ★

**मना पावना भावना राघवाची।**
**धरी अंतरी सोडि चिंता भवाची।**
**भवाची जिवा मानवा भूलि ठेली।**
**नसे वस्तुची धारणा व्यर्थ गेली॥७९॥**

मागील श्लोकांत ज्याचा रामावर विश्वास नाहीं अशा अविश्वासी मनुष्याला इहलोकीं व अंती कष्ट कसे होतात हें सांगून कैवल्यदाता श्रीराम जवळ असतांना उगीच देहसंसारचिंता करणें व्यर्थ होय, असें सांगितलें. हें व्यर्थ कसें याचा विवेक या श्लोकात सांगतात.

मना, राघवाची पावना भावना अंतरीं धरी, भवाची चिंता सोडी. बा मना; तूं प्रपंचाची जी चिंता करितोस ती सोडून दे आणि ज्या योगानें तूं पावन होशील म्हणजे तुझा उद्धार होईल. अशा राघवाचें प्रेमानें चिंतन कर. **सांडून आपली संसार वेथा। करीत जावी देवाची चिंता। निरूपण, कीर्तन, कथावार्ता। देवाच्याचि सांगाव्या॥** (दा. ४-८-७) देवाची चिंता म्हणजे निरनिराळ्या प्रकारांनीं त्याचें सतत स्मरण. यामुळे तूं दैवी संपत्तीचा होशील व तुझी देहबुद्धि झडून तूं आत्मबुद्धिचा होशील. देह संसारचिंतनानें तमोगुण वाढून अज्ञान प्रबल होईल, पण रामभजनानें सत्त्वगुण वाढून ज्ञानाची वाढ होत जाईल. कारण गुरूद्वारा आत्मबुद्धीचा दाता मी आहे, असें भगवान म्हणतात. **तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतीपूर्वकं। ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते॥** (भ. गी. १०-१०) उद्धवाला ते म्हणतात, **''भावें करितां माझी**

**भक्ती। शुद्ध होय चित्तवृत्ती। तेणें आत्मदृष्टीची स्थिति। गुरूकृपा पावती मद्भक्त॥** (ना. भा. २९-२७५) म्हणून संसारचिंता सोडून राघवस्मरण सतत असावें. असें न करितां संसारचिंतनच करीत राहशील तर काय होईल हें बा मना, तुला सांगतो.

**जिवा मानवा भवाची भूलि ठेली। नसे वस्तुची धारणा वेर्थ गेली॥**

संसार ही एक प्रकारची भूल आहे. म्हणजे गुंगवून टाकणारा भ्रम आहे. हा भूलभुलवणीचा खेळ आहे. मानवी जीव यांत सहज अडकतो. वास्तविक संसार अशी कांही वस्तूच नाही. नुसत्या वस्तूची म्हणजे असत्य वस्तूची भावना करणें हाच मुळीं भ्रम. नसलेल्या बागुलबोवाची कल्पना धरून अज्ञानी बालकांनी घाबरून बसावें त्यांतलाच हा प्रकार. सत्यस्थिती अशी आहे कीं **एक परब्रह्म संचलें। कदापी नाहीं विकारलें। त्यावेगळे भासलें। तें भ्रमरूप॥** (दा. १०-६-९) मना, तूं म्हणशील कीं संसार जगद्रूपाने प्रत्यक्ष दिसतो, मला स्वत:ला भासतो, असें असतांना तो नाहींच किंवा तो भ्रम आहे असें कसें म्हणता ? मना, **जे प्रत्यक्ष पाहतां आडळे। विचार घेतां तरी नाडळे॥** (दा. १-३-७) असें हे मायिक नाटक आहे. म्हणून याचा विचार तुला सांगतों.

प्रथम हे लक्षात ठेवावे की ''भ्रममूलमिदं जगत्'' हें समजून घेण्याचें झाल्यास याचा विचार व्यावहारिक दृष्टीनें करून चालणार नाहीं. तो ज्ञानदृष्टीनेंच झाला पाहिजे. व्यवहाराकडे व्यवहाराच्या दृष्टीनें पाहावें, व परमार्थाकडे ज्ञानदृष्टीनें, तात्विक दृष्टीनें पाहावें. व्यवहारांत हिरा हा मोलाचा पदार्थ आहे. पण रसायनशाळेंत तो कोळशाच्या कसाबरोबर बसतो. पण कोळशाच्या किंमतीनें तो मागणें अव्यवहार्य ठरेल. म्हणूनच विद्वानांनी व्यावहारिक सत्ता आणि पारमार्थिक सत्ता अशा दोन सत्ता मानल्या आहेत. म्हणून ब्रह्मावेगळें इतर सर्व भ्रमरूप कसें हें तात्त्विक दृष्टीने पाहूं.

असावयाचें एक व दिसावयाचें किंवा वाटावयाचें भलतें, हा भ्रम होय. असावयाची सूर्यकिरणें पण वाटावयाचें पाणी (मृगजळ), असावयाचें वठलेलें झाड पण वाटावयाचें भूत, हा भ्रम, **येक असतां येक वाटे। येक सांगतां येक निवटे। येक दिसता येक उठे। या नांव भ्रम॥** (दा. १०-६-२३) यालाच विद्वान् लोक अध्यास असें म्हणतात. **यदन्यदन्यत्र विभाव्यते भ्रमादध्यासमित्याहुरमुम् विपश्चितः। असर्पभूतेऽहि विभावनं यथा रज्वादिके तद्वदपीश्वरे जगत्॥**' (रा. गी. ३७) भ्रमानें एका वस्तूच्या ठिकाणी अन्य वस्तूची प्रतीति होणे याला विद्वान् अध्यास असें म्हणतात. ज्याप्रमाणें सर्परूप



नसलेल्या दोरीमध्यें सर्पाची प्रतीति होते, त्याप्रमाणें ईश्वरस्वरूपाचें अधिष्ठानावर या जगद्रुपी संसाराची प्रतीति येते. **भ्रमरूप विश्व स्वभावें। तेथें काय म्हणोनी सांगावे। निर्गुण ब्रह्मावेगळें आघवें। भ्रमरूप॥** (दा. १०-६-३६)

संसाररहाटीसाठीं, त्यांतील व्यवहारासाठीं मनानेंच उत्पन्न केलेला हा असंख्य कल्पनांचा खेळ आहे. म्हणूनच मनास उपदेश. हा खेळ कसा होतो हें एका उदाहरणानें स्पष्ट होईल. एखादा व्यावहारिक मनुष्य कापडदुकानांत गेला म्हणजे त्यास निरनिराळ्या अनेक वस्तू दिसतात. लुगडीं, धोतरें, चादरी, निरनिराळ्या रंगांचे कापड इत्यादि. हे सर्व निरनिराळे नामरूपात्मक प्रकार आहेत असे वाटून, ते पाहून तो चकित होतो. पण एखादा तत्त्वज्ञ त्या दुकानांत गेल्यास त्याला सर्व दुकानांत कापसाच्या तुंतविरहित कांही नाहीं असें वाटेल व तो म्हणेल कीं येथें एक कापसाचा तंतूच सत्य आहे. धोतर, लुगडी इत्यादि नावें व रूपें असत्य असून तंतुविरहित या सर्व कापडांत कांहींच नाहीं. **आडवेतिडवे विणले तंतू। त्यांसी वस्त्र नाम हे मृषा मातू। तेवीं संसार शब्द हा व्यर्थु। स्फुरें भगवंतू मी तद्रूप॥** (ना. भा. १२-४१६) आपणसुद्धां तत्त्व कळलें कीं त्या गोष्टीचा विचार असत्य म्हणून सोडतो. स्वप्न, मृगजळ, गारूड्याचा खेळ, इत्यादिकांनी आपण मोहित होत नाहीं व त्याचा विचारहि करीत नाहीं कारण हा भास आहे, त्यांत सत्यता नाहीं म्हणून त्यांचा विचार करणें व्यर्थ होय अशी आपली खात्री असते.

तात्पर्य हें कीं, मनकल्पनेविरहित संसार असें कांहीं नाहीच. कल्पनेवर उभारलेली सृष्टि म्हणजे भासच. **म्हणऊनि नाहीं आणि असे। हे कल्पनेचेनि सौरसें। जे कल्पनालोपें भ्रंशे। आणि कल्पनेसवें होय॥** (ज्ञा. ९-९१) हा अज्ञानमूलक, भ्रांत, दृश्य पसारा ज्या अधिष्ठानावर भासतो तो सर्वांचा सत्य आधार एकच आहे. तो म्हणजे निर्गुण आत्माराम. हाच देव, हाच मी, त्याच्याशी तादात्म्य होणें किंवा त्याला नामरूपाचें लेणें चढवून त्याच्याशीं तद्रूप होणें हीच भक्ति. **एवं सृष्टी मिथ्या जाण। जाणूनी रक्षावें सगुण। ऐसी हे अनुभवाची खूण। अनुभवी जाणती॥** (दा. ६-६-६०) या भावाने समर्थ म्हणतात- ''सत्य स्वरूपाचा छंद घे. मिथ्या मायेचा सोड.''

★ ★ ★

**धरा श्रीवरा त्या हरा-अंतरातें।**
**तरा दुस्तरा त्या परा सागरातें॥**
**सरा वीसरा त्या भरा दुर्भरातें।**
**करा नीकरा त्या खरा मत्सरातें॥८०॥**

मागील श्लोकांत संसार हा बागुल असल्यामुळें नसत्या वस्तूचें व्यर्थ चिंतन न करिता पतितपावन अशा राघवाचें चिंतन कर, असें मनाला सांगितले. संसार हा भ्रम आहे हे तात्विक दृष्टीनें जरी सत्य असले तरी जीवामागें जें पोट लागलें आहे तें स्वस्थ बसूं देत नाहीं, संसारचिंता करवितेंच, याची वाट काय ? याचें उत्तर या श्लोकात असे देतात कीं मोठमोठ्या देवांचे उदाहरण डोळ्यांपुढें ठेवून पोटाला चिमटा घेऊन या मायिक खेळाच्या नियंत्याला भजनानें आपलासा केलाच पाहिजे. त्याशिवाय अन्य तरणोपाय नाहीं.

हरा अंतरातें त्या श्रीवरा धरा. त्या दुस्तरा परा सागरातें तरा. श्री शंकर ज्याचें नेहमीं हृदयांत स्मरण करितात अशा त्या लक्ष्मीपतीचे विष्णूचें, म्हणजेच अवतारी श्रीसीतापती रामचंद्राचे विस्मरण होऊ न देतां त्याला धरा, सोडूं नका. म्हणजे जनाबाई म्हणतात त्याप्रमाणें आपल्या हृदयांतील बंदीखान्यांत प्रेमाच्या दोरीने बांधून त्याला कोंडून ठेवा. **हृदयी बंदिखाना केला। त्यांत विठ्ठल कोंडियेला॥** प्रेमाची दोरी लवचिक व मऊ असूनहि न तुटणारी अशी आहे. तिनें बद्ध झालेला कारूण्यरूप श्रीराम कितीहि समर्थ असला तरी त्यातून तो सुटत नाहींच, पण आपलासा होतो. ज्ञानोबा म्हणतात कीं कोरडें काष्ठ लीलेनं पोखरणारा भोंगा कोवळ्या कळिकेत प्रेमामुळे अडकून राहतो. **तेथ उत्तीर्ण होईल प्राणें। परी तें कमळदळ चिरूं नेणें। तैसे कठिण कोवळेपणें। स्नेह देखा॥** (ज्ञा. १-२०२) असे हें कोवळेपणामुळेंच कठीण असें कारूण्यप्रेम आहे. तो हृदयस्थ राम एकदा का आपलासा झाला म्हणजे परा म्हणजे फार मोठा व दुस्तर म्हणजे तरूण जाण्यास फार कठीण असा प्रपंचरूपी सागर आटूनच जातो. म्हणजे भ्रमरूप असत्य ठरतो. कारण श्रीराम हा कारूण्यसिंधू व करूणा करणारा असल्यामुळें भक्ताला आपलें स्वरूपज्ञान देऊन तो त्याचा भवभ्रम दूर करितो. कोणी कितीही ज्ञानी असो. श्रेष्ठ असो, इतकेंच काय पण बडा देव असो, भगवत्भजनाने भगवतकृपा संपादन केल्याशिवाय प्रपंचांतून त्याची सुटका नाही. **न करितां भगवत्भजन। ब्रह्म्यासीही मुक्ति नव्हे जाण। मग इतरांचा ज्ञानाभिमान। पुसे कोण परमार्थी॥** (ना. भा. ३-१८०) म्हणून महादेवासारख्या श्रेष्ठ देवाचा आचार लक्षांत घेऊन मानवानेंहि रामभजन करून आपला उद्धार करून घ्यावा.

यावर अशी एक शंका येईल. कीं, महादेवासारख्या देवांना सर्व गोष्टींची अनुकुलता असल्यामुळें ते भजनात काळ घालवूं शकतील. पण



मानवाच्या मागें पोटाचा जबरदस्त प्रश्न आहे. आधीं पोटोबा मग विठोबा. अशा स्थितींत संसार हा भ्रमरूप आहे. त्याचें चिंतन सोडून रामभजन करीत राहा, असा उपदेश केल्यास तो कितपत मानवेल ? केवळ वादासाठी अशी शंका घेतल्यास तिचें निराकरण होणार नाहीं. पण पारमार्थिक हित साधण्याच्या सदिच्छेनें ही शंका असल्यास त्याला तिसऱ्या चरणांत समर्थांचे उत्तर आहे.

दुर्भर म्हणजे कितीहि भरलें तरी भरण्यास कठीण असें जें पोट तें भरा. आम्ही नको म्हणत नाही. कारण तें भरल्याशिवाय देहधारणाच होणार नाही, व देहाशिवाय साधन होणार नाहीं. पण सारखें पोटाच्याच मागें लागू नका. आधी पोटोबा असू दे, पण नंतर तरी विठोबा असू दे. कां सतत पोटोबाच ? त्यापासून सरा म्हणजे जर मागें हटा व त्याला थोडें विसरा. मानवेतर योनी या भोगयोनी असल्यामुळें त्या सर्व योनींत हिंडून पोट भरण्याचीच चटक लागली आहे, म्हणून या देहांत थोडा विवेक करून पुढील लाभ लक्षांत घेऊन पोटाला थोडा वेळ विसरा. नाहीतर मानवदेह प्राप्त होऊन विशेष असे काय साधलें ? म्हणून **प्रपंच सुखें करावा। परी कांहीं परमार्थ वाढवावा। परमार्थ अवघाचि बुडवावा। हें विहित नव्हे॥** (दा. ५-३-१०३) केवळ पोटार्थी म्हणून जगणें हे मानवाला शोभण्यासारखे नसून त्यांत आत्मघात आहे.

जग हें व्यावहारिक सत्तायुक्त असल्यामुळें खाणें, पिणें इत्यादि व्यवहार चालणारच. गारूडी विद्येचा निरास न करितां ती खोटी आहे असें समजून चालावयाचें असतें. तसेंच शरीर धारणेला आवश्यक अशा भोगांचा निरास न करिता ''भ्रममूलमिदं जगत्'' हे जाणून व्यावहारिक सत्तेंत नांदावयाचे असतें. पोटासाठी व्यवहार हा आवश्यक आहे. पण तो तुकोबा म्हणतात त्याप्रमाणें **जोडूनिया धन उत्तम वेव्हारें। उदास विचारें। वेंच करी॥** (गा. ३९५०) या स्वरूपाचा असला पाहिजे तरच तो परमार्थाला पोषक होतो. समर्थाचा भाव असा आहे कीं सदाचारांत राहून पोट भरा, पण दुसरा श्रीमंत व भाग्यवान् कां आणि मी असा दरिद्री, दुर्दैवी कां या मत्सरबुद्धीने जर पोटासाठी धडपडत राहाल तर ते घातक ठरेल. म्हणून शेवटच्या चरणांत सांगतात-

खर म्हणजे गर्दभरूपी मत्सर त्याच्याशी नीकरा करा म्हणजे हट्टानें झगडून त्याचा नाश करा. मत्सर म्हणजे दुसऱ्याचे बरें न पाहणें. दुसऱ्याचा मत्सर करून आपलें कधीच बरें होत नाहीं. उलट बुद्धिभ्रंश मात्र होतो. प्रत्येक

मनुष्य आपल्या कर्मानें निबद्ध असल्यामुळें ''जसें करावें तसें भोगावें'' हा ईश्वरी न्याय आहे. ईश्वर झाला तरी तो प्रारब्ध-कर्माचा नियति नियम मोडीत नाहीं. **उठणें का बैसणें। तें देहासी दैवगुणें। अदृष्टगतीं देणें घेणें। खाणें जेवणें अदृष्टें।।** (ना. भा. १३-६४३) आपलें अदृष्ट आपणच आपल्या कर्मानें निर्माण करीत असतो. म्हणून ईश्वराला दोष लावूं नये. तो आपल्या भक्ताला चढणीचा दम लागूं देत नाही, म्हणजे दु:ख भासूं देत नाहीं. कोणत्याहीं स्थितीत समाधान राहतें. असलेल्या स्थितींत समाधान न पावणारा चांगली स्थिति प्राप्त झाली तरी समाधानी होणार नाहीं. म्हणून कोणाचाहि मत्सर न करितां आपल्यापेक्षां गरिबींत असणाऱ्या लोकांकडे दृष्टि ठेवून समाधानांत राहून परमार्थ साधावा. **यालागीं अदृष्टें जें प्राप्त। तेणें निर्वाहे सदा निश्चिंत।। साधक परमार्थ साधित। संतोषयुक्त गुरूवाक्यें।।** (ना. भा. ३-४९७)

★ ★ ★

**मना मत्सरें नाम सांडूं नको हो।**
**अती आदरें हा निजध्यास राहो।।**
**समस्तांमधें नाम हें सार आहे।**
**दुजी तुळणा तूळितांही न साहे ।।८१।।**

मत्सरबुद्धीनें केवळ पोटार्थी राहून मानवी जीवन फुकट घालवूं नका. असलेल्या स्थितींत समाधान मानून काहीं परमार्थ साधा. शंकरासारख्या देवाकडे लक्ष देऊन तरी रामाला ध्यानीं धरून ठेवा, असा उपदेश मागील श्लोकात **जनाला** केला. पण मत्सराचा उद्भव मनांत होत असल्यामुळे कानांनी ऐकलेला उपदेश मनाला ठसावा म्हणून या श्लोकात मागील-उपदेशच **मनाला** करितात.

बा मना, असलेल्या स्थितींत समाधान मानून कोण्याहीं जीवाकडे मत्सर बुद्धीनें पाहू नको हो, कारण प्रत्येक प्राणिमात्रांत आत्मारामाचें वास्तव्य आहे त्यामुळें कोण्याहि जीवाचा मत्सर करणें म्हणजे त्या रामाचा मत्सर करण्यासारखें आहे. कोण्याहि जीवाचा मत्सर न होण्यानें सर्वेश्वराची पूजा होत असते. दोन गोष्टी लक्षांत ठेव. कोणाचा मत्सर करूं नकोस आणि रामनाम सोडूं नकोस.

नामानें दुसऱ्याविषयीं तुझी मत्सरबुद्धि नाहींशी होईल, आणि दुसऱ्या कोणी तुझा मत्सर केल्यास तुला अपाय होणार नाहीं. उलट उपायच होईल.



नाम हें याप्रमाणें विघ्नें नाश करणारें दुधारी शस्त्र आहे. कोणासंबंधी मत्सर उत्पन्न होत आहे असें दिसलें रे दिसलें की लगेच त्याच्या ठिकाणीं नामानें भगवत्‌भावना करावी. अथवा कोणी आपला मत्सर करितो असें दिसल्यास त्याचे ठिकाणीहि नामानें भगवद्भावना करावी. कीं अपाय तोच उपाय होतो. हे भक्तिमार्गातील एक लक्षांत ठेवण्यासारखें तत्व आहे. **जेथूनि येऊं पाहे अपाव। तेथें दृढ वाढल्या भगवद्भाव।। तेव्हां अपावचि होय उपाव। विघ्नासी ठाव असेना।।** (ना. भा. २८-५४) ''पण पी हळद कीं हो गोरी'' असें झटदिशी होणारें हे कार्य नव्हे. मना, कोठेही लगेच भगवद्भावना उत्पन्न होणे हे कांही सोपें काम नाहीं. त्यासाठी अट्टाहासानें ध्यास घ्यावा लागतो.

आपत्काळीं स्वसंरक्षणार्थ उपयोगी पडावा म्हणून दंड जसा लक्षपूर्वक मेहनत घेऊन सारखा फिरवावा लागतो, तसें ध्यानीं मनीं भगवन्नाम व रूप हें सारखें घोळवावें लागतें. जड देह व त्याला खेळविणारा आत्माराम याव्यतिरिक्त ''मी'' असा कोणीच नसल्यामुळे जागृति, स्वप्न व सुषुप्ति या अवस्थांची जाणीव असलेले आपलेंच तें रूप होय इकडे सारखें लक्ष पुरवावें लागते. तरच मी देह ही अनेक जन्मजन्मांतरीची बसलेली गाठ ढिलीं पडते व अभयत्व येतें. कित्येक वेळीं मनांत असतें पण ध्यानात येत नाहीं. तर कांही वेळा ध्यानाचे वेळीं स्वरूप स्थैर्य असतें पण इतर वेळीं विक्षेप येतो. म्हणून मना, तुला नामाचा प्रेमपूर्व छंद लागूं दे. **अखंड ध्यानाचें लक्षण। अखंड देवाचें स्मरण। याचे कळतां विवरण। सहजचि घडे।।** (दा. १४-८-२४) असें असूं दे बरें.

मोक्षासाठीं जी विविध साधनें वेदशास्त्रांनीं सांगितली आहेत त्यांत नाम हें सार साधन कसें आहे हें शोधून पाहा आणि संशय न धरितां तें साधन करा असा-''समस्तांमधें सार साचार आहे'' या ७५ व्या श्लोकांत लोकांना उपदेश केला. पण उपदेश एका कानानें आंत शिरून दुसऱ्या कानानें तसाच बाहेर पडण्याचा संभव असतो. मना, तूं सर्व इंद्रियांचा राजा आहेस म्हणून तुझेपर्यंत हा उपदेश पोंचावा म्हणून तुला पुन्हा सांगतो कीं समस्तांमधें नाम हेंच सार आहे.

नाम हेंच सर्व स्वतंत्र, देशकालबंधनरहित असें श्रेष्ठ साधन आहे. **नामासी नाहीं कर्मबंधन। नामासी नाहीं विधिविधान। आसनीं भोजनीं शयनीं जाण। नाम पावन हरीचें।।** (भा. रा.) सर्व वेदांचे हेंच सार आहे. मायेचा आश्रय घेऊन सर्व सृष्टीची उत्पत्ति करून, सर्व प्राणिमात्रांत व्यापून राहिलेलें,

सगुण-निगुर्ण अंगाने नटणारें जें स्वयंभू ब्रह्म तेंच नामाचें लक्ष्य आहे. म्हणून नाम हें सार आहे. **शास्त्राचे जें सार वेदांची जो मूर्ति। तो आम्हा सांगाती प्राणसखा॥** (गा. १५९४) असें तुकोबा म्हणतात.

आणखी एक विचार असा कीं देहाकडून कोणतेहि जें कर्म घडतें तें बाह्य कर्मेंद्रियें व आंतील ज्ञानेंद्रियें या दोन साधनांमुळें घडतें. पण हीं दोन साधनें अमलांत येण्यापूर्वी अंत:करणांत कल्पनेने त्या कर्मांचा प्रथम उच्चार होतोच. ''घरीं भाजी नाहीं'' असें शब्द ऐकूं आले की ''बाजारात गेलें पाहिजे'' या शब्दांचा प्रथम अंत:करणात सूक्ष्म उच्चार होतो व मग हात कपडे घालतात व पाय बाजाराकडे वळतात. मग सर्व कर्मांचे आदिकारण नाम नव्हे का ? नामानेंच सर्व कर्म नांवारूपाला येतें. म्हणून नाम हें व्यापक, सर्व साधनांचे सार व सर्वात प्रमुख साधन आहे.

मना, आणखी एक मुख्य विचार लक्षांत ठेव, गीतेंत भगवंतांनी लाडक्या अर्जुनाला जो शेवटी गुह्य संदेश सांगितला तो **मन्मना भव मद्भक्तो मद्याजी माम् नमस्कुरू** (भ. गी. १८-६५) असा आहे. हा संदेश एका नाम-साधनानें साधतां येतो. **मी सर्व वस्तीचें वसौटें। माझीं नामें जियें चोखटें। तियें जीवा यावया वाटे। वाचेचिये लावीं॥** (ज्ञा. १८-१३५७) सर्वत्र माझीच वस्ती आहे. पण त्या व्यापक स्वरूपाचें सर्वकाळ स्मरण राहावें यासाठीं वाणीने सर्व काळ माझ्या पवित्र नामाचा उच्चार करीत जा.

हा सर्व विचार केला म्हणजे मना, तुला लगेच कळेल कीं या नामाच्या तोलाचें अन्य साधन नाहीं. यज्ञ, याग, दान, व्रतें, तपें इ. साधनांना नामाची सर नाहीं- मग अन्य असार साधनांच्या मागें कशाला लागावें ? मतामतांच्या गलबल्यांत न शिरता निष्ठेनें याच सारसाधनाचें ग्रहण करावें **नामावीण साधन नाहीं या कलियुगीं। व्यर्थ श्रम भोगी पाहतां मतें।**

★ ★ ★

**बहू नाम या रामनामीं तुळेना।**
**अभाग्या नरा पामरा हें कळेना।**
**विषा औषध घेतलें पार्वतीशें।**
**जिवा मानवा किंकरा कोण पूसे ॥८२॥**

मत्सरबुद्धीनें नामाकडे दुर्लक्ष करूं नको. इतर अनेक साधनें असतां नामांतच विशेष काय असे वाटूं देऊं नको कारण सर्व साधनांत तेंच एक



सारसाधन आहे असें मागील श्लोकात मनाला सांगितलें. आतां परमात्म्यांच्या अनेक नामांत रामनाम हें श्रेष्ठ कसें आहे हें या श्लोकात सांगतात.

परमेश्वराचीं सहस्र नामें आहेत. परंतु इतर नामांशी रामनामाची तुळणाही होणार नाहीं असें रामनाम श्रेष्ठ आहे. परंतु अज्ञानी करंट्या व दुदैवी मनुष्याला हें समजत नाहीं. समर्थ असें का म्हणतात याचा थोडा विचार पाहूं.

रावणवध मनुष्याच्याच हातून व्हावयाचा असल्यामुळें विष्णूनें देवांच्या विनंतीवरून दाशरथि रामाचें रूप धारण करून सर्वस्वी मानवतेचा अंगीकार केला. रावणवधानंतर, तूं देव आहेस, असें इतर देवतांनीं रामास म्हटल्यानंतर स्वत: रामच म्हणतात कीं **आत्मानं मानुषं मन्ये रामं दशरथात्मजम्॥** (वा. रा. यु. कां. स. ११७, श्लोक ११) मी मनुष्य असून दशरथपुत्र आहे व माझें नाव राम आहे. म्हणूजे राम या नामांत दशरथपुत्र या नात्यानें मानवता आहे व मूळ विष्णुरूप या नात्यानें ईश्वत्व आहे म्हणून परमेश्वराचा हा अवतार केवळ दुष्कृताचा विनाश करण्यासाठीं नसून मानवानें त्यापासून बोध घेऊन नराचा नारायण व्हावें यासाठी आहे. श्रीकृष्ण हे देवा व मानव रूपानें वावरलें तरी त्यांचे अवतारांत अघटितघटनापटुत्व असून अहंकृत भावाचा पूर्ण अभाव असल्यामुळें त्यांना पूर्णावतार म्हणतात. त्यांचे चरित्र **यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते। हत्वापि स इमांल्लोकान्त हन्ति न निबध्यते** (भ. गी. १८-१७) या थाटाचें असल्यामुळें मानवाला तें अमलांत आणणें कठीण आहे. रामचरित्र हें एक-वचनी, एक पत्नी, एक बाणी असें असल्यामुळें त्यांना मर्यादापुरूषोत्तम असे म्हणतात.

सारांश, ज्याला ''प्रपंच साधूनी परमार्थ केला तो नर भला रे भला'' असें भलेपण पदरांत पाडून घ्यावयाचें आहे त्यानें रामनामानें त्यांचे मानवत्व आठवून सावधानतेनें प्रपंच साधावा व त्यांचे देवत्व आठवून आत्महित साधावें. श्रीरामाचें मानवरूप अवताराबरोबर समाप्त झालें तरी त्यांचे देवरूप आत्माराम रूपानें सर्वत्र व्यापूनच आहे. **प्रगट रामाचें निशाण। आत्माराम ज्ञानघन। विश्वंभर विद्यमान। भाग्यें कळे॥** (दा. २०-४-१४) हा राम आपल्या जवळच असून नामानें त्याच्याशीं सख्य जोडल्यास भाग्यवानाला तो प्राप्त होण्याजोगा आहे.

अवतारदृष्ट्या वरील विचार सांगितला. आता मंत्रदृष्ट्या नामाचा विचार पाहूं. राम हा तारक मंत्र आहे. **गर्भजन्म जरामरण संसार महत्भयात्**

**संतारयमिति। तस्मादुच्यते तारकमिति।।** (रा. उ. ता. २) श्रीराम गर्भजन्य मजरामरण इत्यादिकांनी युक्त असणाऱ्या संसाराच्या महद्भयापासून भक्तांना तारतात. म्हणून त्यांना तारकब्रह्म म्हणतात. राम या पदानें परब्रह्म अभिप्रेत आहे. यापासून होणारा प्रणव मोक्षदायक व तत्त्वमसि रूप आहे. म्हणजे परब्रह्म तूं आहेस असा हा मंत्र उपदेश करितो. र कार हे तत्पदवाच्य परमेश्वर, मकार हे त्वं पदवाच्य जीव आणि आहेस हा अर्थ ज्या पदानें होतो तें असिपद म्हणजे अ होय.

प्रत्येक देवतेस बीज असतें. राम या नामांत रकार हें अग्निबीज आहे. हें मनोमल नाश करितें. आकार हें सूर्यबीज आहे. हें तम म्हणजे अज्ञान नाहींसे करितें. मकार चंद्रबीज आहे. हें त्रिविधताप हरण करून शीतलता उत्पन्न करितें. रकार वैराग्यहेतु, आकार हा ज्ञानहेतु व मकार हा भक्तिहेतु होय. यामुळें हें नाम वैराग्य, ज्ञान व भक्ति प्राप्त करून देणारें आहे. असे हें या नाम-मंत्रातील सामर्थ्य अज्ञानी मनुष्याला कळत नाहीं.

पण पार्वतीपति शंकरासारख्या देवानें विषाची बाधा झाल्यामुळें कंठांत धारण केलें व त्यामुळे त्यांना शांति प्राप्त झाली. असें असतांहि प्रपंचाचा दास बनलेल्या व विषय-सर्पविषानें भारलेल्या एखाद्या क्षुद्र मानवानें या नामरूपी औषधाची हेटाळणी किंवा उपेक्षा केली तरी त्याची काय पर्वा ? **हरिहर-ब्रह्मादिक। हे जयाचे आज्ञाधारक। तूं एक मानवी रंक। भजेसिना तरी काय गेलें।।** (दा. ६-७-२०) असा हा एकंदर श्लोकाचा भावार्थ आहे.

येथें एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं ''बहूनाम या रामनामीं तुळेना'' असें म्हणण्यात परमेश्वराच्या इतर नामांबद्दल अनादर दाखविण्याचा समर्थांचा हेतु नाही. सर्व देवात एका चैतन्याचेंच वास्तव्य आहे. पण एकदा देवता ठरली कीं तिची उपासना एकनिष्ठ, प्रभावी, अव्यभिचारी व्हावी या दृष्टीनें इतर देवांचा अनादर न करितां इष्ट देवतेला महत्त्व दिलें जातें. अमुक एक पुरूष हा पति ठरला म्हणजे स्त्रीने ज्याप्रमाणें त्याच्याशी पतिव्रता धर्मानें वागणें योग्य आहे, तसेंच येथें आहे. **पतिव्रता नेणे आणिकांची स्तुति। सर्वभावें पती ध्यानीं मनीं।। तैसें माझें मन एकविध झालें। नावडे विठ्ठलेवीण दुजे।।** असें तुकोबा याच हेतूने म्हणतात. एका देवतेची भक्ति करणें म्हणजे इतर देवतांचा द्वेष किंवा मत्सर करणें असें नाहीं. पतिव्रतेने पतीशी एकनिष्ठ राहाणें म्हणजे नात्यांतील पुरूषजातीचा द्वेष करावा असें नाही. पंढरीतील विठ्ठलाचें दर्शन घेऊन ''येथे का तूं उभा रामा'' असें जें समर्थांनीं म्हटले ते एकनिष्ठ उपासनेचेंच द्योतक होय.

★ ★ ★



**जेणे जाळिला काम तो राम ध्यातो।**
**उमेसीं अती आदरें गूण गातो।**
**बहू ज्ञान वैराग्य सामर्थ्य जेथें।**
**परी अंतरी नामविश्वास तेथें।।८३।।**

परमेश्वराच्या अनेक नामांत रामनाम हें श्रेष्ठ असल्यामुळे शंकरांनी तें आपल्या कंठात विषतापहरणार्थ वागविलें. अशा नामाचें महत्त्व एखाद्या प्रापंचिकास वाटलें नाहीं, तर त्याची काय किंमत ? असें मागील श्लोकात सांगितलें. श्रीरामाची महती सांगण्यासाठी मागील ३१ ते ७३ पर्यंतच्या श्लोकात व यापुढील ८४ व ८५ या श्लोकात शंकराचे उदाहरण आदर्श म्हणून समर्थांनी मनापुढें ठेवलें आहे व त्याच देवाचें निरनिराळ्या प्रकारें वर्णन केले आहे. त्यांतील हेतु इतकाच की देवामधील महादेवहि ज्या रामनामांत रंगून राहतो त्या नामाकडे मनाचें व जनाचें लक्ष वेधावें व तें विश्वासानें घेतले जावे. म्हणून वैराग्य,ज्ञान व सामर्थ्यसंपन्न असा असामान्य महादेवहि नामानिष्ठ कसा आहे हें या श्लोकात सांगतात.

देव, गंधर्व, ऋषी, मुनी, दानव, मानव या सर्वांना छळणारा कामरूपी असा जो मदन त्यास केवळ दृष्टीक्षेपानें जाळून टाकण्याचें ज्याचें सामर्थ्य असा जो मदनारि तोहि नेमानें रामध्यान करितो. स्वत: ध्यान करितो, इतकेच नाहीं तर आपली पत्नी जी पार्वती तिच्यापुढें आदरपूर्वक तो श्रीरामांचें गुणगान करितो. हा महादेव सामर्थ्यसंपन्न वैराग्याचा पुतळा व ज्ञानी असा असूनहि नामावर विश्वास ठेवून निष्काम रामभजन करितो. **नि:काम बुद्धीचिया भजना। त्रैलोकीं नाहीं तुळणा। समर्थेवीण घडेना। नि:काम भजन।।** (दा. १०-७-१९) असा हा थोडक्यांत श्लोकार्थ आहे.

यावर एक अशी शंका येईल कीं तीव्र वैराग्य,सामर्थ्य, अनुभवज्ञान इत्यादि प्राप्त झाल्यानंतर शंकरासारख्या महादेवाला रामनाम ध्यानादिकांची जरूर काय ? मुक्तावस्थेची जाणीव येऊन तीं अनुभवांत आल्यानंतर भजन करीत राहणें यांत पुरूषार्थ तो कोणता ?

याचे उत्तर समर्पक असें उद्धवानें भगवान् श्रीकृष्णाला दिलें आहे. तो म्हणतो. **भक्तीच्या पोटीं जन्मली मुक्ति। वाढली मुक्ती भक्तीतें घाती।। ऐसी जे का मुक्ति मातृहंती। तिसी मी सर्वर्थी नातळे। जोडल्याही मुक्तपण। मज द्यावें तुझे गुरूभजन। तेणें मुक्तीही होय पावन।। म्हणोनि लोटांगण घातलें।।** (ना. भा. २९-७३७, ७३९)

निष्काम भजनानें चित्तशुद्धि होते. त्यानंतर भगवत्कृपेने वैराग्य व गुरूद्वारा ज्ञान प्राप्त होऊन मुक्तावस्था अनुभवाला येते. याप्रमाणे मुक्तावस्था प्राप्त झाल्यानंतर ज्यामुळें ही श्रेष्ठ अवस्था प्राप्त झाली त्या भजनभक्तीचा त्याग केल्यास मुक्ति ही मातृहंती ठरत नाही का ? व भजकहि कृतघ्न ठरत नाही का ? म्हणून वेदांत गुरू व ईश्वर यांची जीव असेपर्यंत अखंड सेवा असावी. **आजीवतो त्रय: सेव्या: वेदान्तो गुरूरीश्वर: आदौज्ञानाप्तये पश्चात्कृतघ्नत्वनिवृत्तये।।** भक्तीचा मान ठेवून अनुभविली जाणारी मुक्ती हीच खरी पावनमुक्ति होय. तिच्यावरून त्रिभुवनहि ओवाळून टाकावें अशी ती श्रेष्ठ आहे. **म्हणोनि नि:काम भजन। वरि विशेष ब्रह्मज्ञान। तयास तुळितां त्रिभुवन। उणें वाटे** (दा. १०-७-२५)

म्हणून ज्ञानोत्तर भजन हा परम पुरूषार्थ किंवा पंचम पुरूषार्थ म्हटला जातो. आपल्या भक्तानें हा पंचम पुरूषार्थ साधावा म्हणून ज्ञानोत्तरहि भजन करावें असा भगवंताचा उपदेश आहे, ते उद्धवाला म्हणतात. **जीवु परमात्मा दोनी एक। ऐसें जाणणें तें 'ज्ञान' देख। ऐक्यें भोगणे परमात्मसुख। 'विज्ञान' सम्यक् त्या नांव।। ऐसा ज्ञानविज्ञानसंपन्न। होऊनी करावें माझें भजन।।** (ना. भा. १९-६५,६६) ज्ञानपूर्व भजनांतील गोडीपेक्षा ज्ञानोत्तर भजनातील गोडी कांही और आहे. म्हणूनच श्रीशंकर त्या रामनामांत धुंद होऊन राहतात. हा परम पुरूषार्थ सर्वांत उत्कटतेने कोणी साधला असेल तर तो शंकरांनी. शंकर हे भक्तिमार्गातील जगद्गुरू आहेत. म्हणून त्यांचा उल्लेख समर्थांनी निरनिराळ्या श्लोकांत केला आहे. समर्थच काय पण प्रत्यक्ष भगवान् अर्जुनाला सांगतात **- तरी श्रद्धावस्तूसि आदरू। करिता जाणिजे प्रकारू। जरी होय श्रीगुरू। सदाशिवु ।।** (ज्ञा. १२-२१६) भक्ति तत्त्वाचा आदर कसा करावा हे श्रीशंकर गुरू केल्यानेच कळेल.

समर्थांनी केवळ श्री शंकराचेंच वर्णन या श्लोकात केलें आहे. त्यांतील भाव असा दिसतो कीं ज्या शंकराच्या ठिकाणी वैराग्य, ज्ञान व सामर्थ्य ही आहेत तो देखील नामस्मरणावर विश्वास ठेवून रामाचें ध्यान करितो. मग जे दीन, दुबळे लाचार, हताश असे आहेत त्यांनी नामावर विश्वास ठेवून तें आस्थेनें घ्यावयास नको का ?

★ ★ ★



**विठोनें शिरीं वाहिला देवराणा।**
**तया अंतरी ध्यास रे त्यासि नेणा।।**
**निवाला स्वयें तापसी चंद्रमौळी।**
**जिवां सोडवी राम हा अंतकाळी ।।८४।।**

ज्ञानवैराग्य व मदनालाहि जाळणारा असा सामर्थ्यवान् श्रीशंकरही उमेसह रामनाम विश्वासानें जपतो, असें ज्ञानोत्तर भजनाचें महत्त्व मागील श्लोकात सांगितलें. आता ज्ञानोत्तर भजनामुळें शिवाला किती श्रेष्ठत्व प्राप्त झाले याचे वर्णन या श्लोकात करितात.

श्री विठ्ठलानी या महादेवाला आपल्या डोकीवर मिरवावे असें श्रेष्ठत्व त्याला प्राप्त झालें आहे. पंढरीतील पांडुरंगाच्या शिरावर असलेल्या महादेवाच्या पिंडीला अनुलक्षून हें वर्णन आहे. विठ्ठल म्हणजे विष्णु हे शंकराना मस्तकीं धारण करून मिरवितात ते ज्ञानोत्तरभक्तिप्रेमामुळे.

या प्रेमाची जातच वेगळी आहे. देव होऊन देवाला भजण्याचा हा प्रकार आहे. सृष्टिकार्यासाठी बाह्य दृष्टीने अवतारदेह वेगळा दिसला तरी अंतरंगात देवाभक्ताचें परस्परप्रेमामुळे ऐक्यच असतें. बालकाचा व मातेचा असे दोन देह जरी बाह्यत: दिसले तरी अंतरंगात प्रेमामुळे त्यांचें ऐक्यच असतें. बालकानें मातेच्या पायांत प्रेमाने मिठी मारावी आणि मातेने त्याला डोकीवर घेऊन नाचावे. तसेच शंकरानी विष्णूच्या पायांतील गंगा डोकीवर धारण करावी आणि विष्णूनें शंकराला मस्तकी मिरवावें, अशी ही ज्ञानोत्तर प्रेमाची जात आहे. भगवान् उद्धवाला म्हणतात. **निजभक्त मजभीतरीं। मी तया आंतबाहेरी। ऐसे सामरस्यें नांदो भारी। वेगळे बाहेरीं नाममात्र। माझिया सायुज्या जे आले। ते मीचि होऊनिया ठेले। परी मी होऊनि मज भजलें। ते 'भक्त' मानिलें म्यां ऐसे।।** म्हणून - **सायुज्यापरीस भक्ति गोड** (ना. भा. १९-२९७ ते २९९) भगवान् गीतेंत अर्जुनाला हेंच सांगतात. अर्जुना, सर्व स्थावर जंगमात्मक जग हे आपणच आहो असा ज्याला अनुभव आहे असा भक्त या अन्वयबोधानंतरहि जर माझें भजन करील तर त्याला मी मस्तकी मुकुटाप्रमाणे मिरवितो. **हे विश्वचि माझें घर। ऐसी मती जयाची स्थिर। किंबहुना चराचर।। आपण जाहला।। मग याहीवरी पार्था। माझिया भजनीं आस्था। तरी तयातें मी माथां। मुकुट करी।।** (ज्ञा. १२-२१३-२१४)

आत्मानुभवाच्या नंतरच्या भजनांत जो आनंद,जी गोडी, जें श्रेष्ठत्व आहे त्याचें वर्णन जितकें करावे तितकें थोडेच, हें भक्तिप्रेम उत्कटतेने आपल्या ठिकाणी नांदावे, आपण देवाचें लाडकें लेकरू होऊन देवानें आपल्यास प्रेमाने डोकीवर घ्यावे असें तुकोबासारख्या भक्तशिरोमणीलाहि

वाटतें. त्यांचा एक गोड अभंग येथें सांगावासा वाटतो. ते विठ्ठलाला म्हणतात- **माझे पाय तुझी डोई। ऐसें करी गा भाक देई।।१।। पाहता दिसे उफराटें। घडे तैं भाग्य मोठें।।२।। बहु साधन मोलाचें। यासी जोडा दुजें कैचें।।३।। नका आनमान विठ्ठला। तुका म्हणे धडा जाला।।** (गा. ९४५)

विठ्ठला, माझे पाय आणि तुमचें डोकें असें करा म्हणजे मला तुमच्या डोक्यावर बसवून घेईन असें वचन द्या. देवा, माझें हें बोलणें दिसायला उरफाटे दिसतें हें खरें आहे. कारण तुम्ही जगाचे स्वामी आणि मी एक य:कश्चित् जीव. कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् असें तुमचें सामर्थ्य, तर मी दीन, दुबळा, अल्पशक्तीचा तुम्ही सर्वज्ञ तर मी अल्पज्ञ. असें असता मी तुमच्या डोक्यावर बसण्याची भाषा बोलणें हा उरफाटा कारभार होतो हे खरें आहे. पर असें घडून आलें तर मात्र मी भाग्याचा खरा. तुम्ही मनांत आणलें तर अशक्य गोष्टहि शक्य होते. **अंध पारिखी माणिके। बोलविशी स्पष्ट मुके।।** अशी तुमची सत्ता आहे. मग मला डोक्यावर बसण्याचें भाग्य कां लाभूं नये ? देवा, तुमच्याजवळ जसे सामर्थ्य आहे तसेंच आमच्याजवळहि एक मोलाचें (नाम) साधन आहे. त्या साधनाला जगांत जोड नाही व त्याने उरफाटी दिसणारी गोष्ट ही सुरफाटी होते. तें साधन करण्याचा माझा ठाम निश्चय झाला आहे. तरी आपल्याकडून आत कसर किंवा संकोच होऊ नये. मला डोक्यावर घ्यावें, असा या अभंगाचा गोड भाव आहे. म्हणून समर्थ म्हणतात कीं विष्णूनें शिवाला मस्तकी धारण करावें, त्या शिवानें श्रीरामाचें चिंतन करावें आणि अशा रामाकडे आपलें दुर्लक्ष व्हावे, त्याला आपण ओळखू नये याला काय म्हणावे ?

शंकर हे उग्रतप करणारे तपस्वी असे असूनहि त्यांना झालेल्या विषतापाची शांति रामनामानें झाली. असा हा राम तापनिवारक असल्यामुळें जीवाची मरणापासून मुक्तता तोच करील. **नव्हे सोडवण रामनामेवीण। रामदास खूण सांगतसे।।**

श्लोकांतील पूर्वार्धांत समर्थांना आणखी एक भाव ध्वनित करावयाचा आहे कीं काय याची शंका येते. तो असा - विष्णु शिवाला मानतात व शिव रामाला मान देतात. शिवाची विषबाधा राम दूर करितात, तर विष्णु शिवाला मस्तकीं धारण करितात. असे हे तीन देव परस्पर प्रेमानें, सामरस्यानें नांदतात. असें असता मूळ आत्मारामाला न ओळखता हा वैष्णव, हा शैव, हा रामदासी असे सांप्रदायिक स्वरूप लक्षांत घेऊन त्या देवांच्या भक्तांनी



एकमेकाशी द्वेषानें, फुटीरपणानें वागावे याला काय म्हणावें ? अशा प्रकारचा अर्थ नाथांनी आपल्या भागवतांत स्पष्ट केला आहे. **शिव धवलधाम गोक्षीरू। विष्णु घनश्याम अतिसुंदरू। बाप ध्यानाचा बडिवारू। येरें येरू व्यापिला।। मुदला दोहींसी ऐक्य शुद्ध। मा उपासकांसी कां विरूद्ध।।** (ना. भा. ११-१२६०-१२६१) संघटक समर्थांचा हा भाव असेलहि.

★ ★ ★

**भजा राम विश्राम योगेश्वरांचा।**
**जपू नेमिला नेम गौरीहराचा।**
**स्वयें नीववी तापसी चंद्रमौळी।**
**तुम्हां सोडवी राम हा अंतकाळीं।।८५।।**

मागील श्लोकांत श्रीशंकरांना रामनामामुळें श्रेष्ठत्व प्राप्त होऊन शांतिसुखाचा लाभ कसा झाला हें सांगितलें, व जीवाची अंतकाळी सुटका रामनामानेच होईल असें सांगितले. या श्लोकांत जपयज्ञाचें महत्त्व सांगून रामभजनानें आपला उद्धार करून घ्या असें सांगतात.

सर्व योगी मुनी यांना राम हेच एक विश्रांतीचें म्हणजे सुखा-समाधानाचें स्थान वाटतें. तसाच सर्व योग्यांचे मुकुटमणी गौरीहर श्रीशंकर यांनाहि अनुभव आल्यामुळें ते रामरूपांत रंगून राहिले आहेत. समुद्रमंथनातून निर्माण झालेलें व जगालाहि जाळणारें असें विष प्राशन केल्यामुळें मस्तकी गंगा, भाली चंद्र, उरप्रदेशी सर्प इत्यादि उपायानीहि त्यांची शांति होईना. पण रामजपाने केवळ देहशांतिच नव्हे तर आत्मशांतिहि त्यांना प्राप्त झाली. **जाळिलें पोळिलें वीषें। कर्कशें काळिमा चढे। उपाय बहुधा केले। रामनामेंचि सूटिका।।** (मा. पं. १-४)

जपयज्ञ ही दिव्य मात्रा आहे. हिनें देह असताहि आराम व देहांतीहि आराम प्राप्त होतो. म्हणूनच गीतेंत भगवंतानी - **यज्ञानाम् जपयज्ञोऽस्मि।।** (भ. गी. १०-२५) **असें म्हटलें आहे. काय बोलोनी बहुत। जपयज्ञासम यज्ञ नाहीं निश्चित।। इतर यज्ञ मीच योगैश्वर्य शरीर भगवंत। परी तारक विभूति - रूप जपयज्ञ मी।।** (य. दी. १०-७१९) अशा या तारक श्रेष्ठ जपाचा ध्यास घेतल्यास लोकहो, तुम्हालाहि जन्ममरणाचे फेऱ्यातून हा राम सोडवील असें समर्थ सांगतात. उलटे नाम घेऊनहि या फेऱ्यातून अनेकांची सुटका झाली आहे.

**सव्य अपसव्य या नामें। तरले सुटले बहू। अंतकाळीं सर्व काळीं। सुटिका सकळै जन।।** (भा. प. १-५)

★ ★ ★

**मुखीं राम विश्राम तेथेंचि आहे।**
**सदानंद आनंद सेऊनि राहे।**
**तयावीण तो सीण संदेहकारी।**
**निजाधाम हें नाम शोकापहारी।।८६।।**

श्रीराम हे योगेश्वरांचे तसेंच शंकराचेंही विश्रांतिस्थान आहे. असें मागील श्लोकांत सांगितले, पण केवळ योगेश्वरानाच नव्हे तर जे कोणी मुखानें रामनाम घेतील त्यानाहि विश्राम म्हणजे शांति - सुख लाभेल असे या श्लोकांत सांगतात.

मुखानें रामनाम चालू असलें कीं रामाचें स्मरण होते. रामस्मरण झालें कीं हृदयांत रामरूप प्रगट होतें. तें रूप स्वत: सच्चिदानंद रूप असल्यामुळें इंद्रियांत त्याची प्रभा फाकते, व त्यामुळें भजनानंद उत्पन्न होतो. राम आनंदस्वरूप म्हणून त्यांचें नामहि आनंदकारी. कारण भगवंताच्या बाबतीत नाम तेंच रूप होय. नामानें चित्त शुद्ध होऊन रामकृपेनें ज्ञान प्राप्त झाले की स्वत:चा सर्व सुखाचा ठेवा रामच असून तेंच आपलें स्वरूप आहे याची जाणीव येते. म्हणून समर्थ म्हणतात कीं बा मना किंवा जीवा, अखंड नामस्मरण करीत नित्यानंदात राहा.

पण नामाव्यतिरिक्त इतर सर्व कल्पना, वासना, तर्कवितर्क हे संशय उत्पन्न करणारे क्षणिक असे असल्यामुळें मनाला ताप देतात. त्यामुळे शीण येत व शांति किंवा समाधान प्राप्त होत नाही. **सांडून राम आनंदघन। ज्याचे मनीं विषयचिंतन। त्यासी कैंचे समाधान। लोलंगतासी।।** (दा. ३-१०-६२) विषयानंद प्राप्त होण्यासाठी केलेलें कोणतेहि चिंतन हें प्रथमत: सुखकारक वाटलें तरी अंती शीणच उत्पन्न करितें.

असा हा श्लोकार्थ आहे. पण सुखाचें स्थान अन्य कोठेच नसून तें रामरूपीच आहे व तेंच आपलेंहि रूप आहे हें कशावरून ? अशी शंका येणें स्वाभाविक आहे. वास्तविक राम हेंच आपलें विश्रांतिस्थान आहे, याचा रोजचा अनुभव आहे. पण अज्ञानामुळें तो समजून येत नाही इतकेच. या शंकेचे समाधान बुद्धीला पटेल असें सुषुप्तीच्या दृष्टांताने होतें. म्हणून त्या



अवस्थेसंबंधी थोडा विचार करू.

मनुष्य हा झोपेपर्यंत वैषयिक किंवा प्रापंचिक विचारचक्रातच वावरतो. पण त्यामुळें मी सुखांत, आनंदात आहे असें कोणी म्हणत नाहीं. उलट सदैव असमाधानाचें रडगाणेंच चालू असतें. शेवटी तो थकतो आणि शरीर, बाह्य इंद्रियें मनबुद्ध्यादि आंतरइंद्रियें, अहंकार यांचा संबंध सुटून तो झोपतो. तेथें सर्व संकल्पविकल्पांचा अभाव असतो व सर्व प्रकारच्या ज्ञानाचा उपसंहार बुद्धींत होऊन ती बुद्धि गाढ अज्ञानांत लीन झालेली असते. येथें विषय नाहीं, त्याना ग्रहण करणारी इंद्रिये नाहीत अशा अवस्थेतील ''मी सुखाने झोपलो होतो'' हा सुखाचा अनुभव जागा झाल्यावर तो कसा सांगतो ? म्हणजे विषय व इंद्रियें यापलीकडे सुखाचें कांहीतरी स्थान आहे हें सिद्ध होत नाही का ? तेथें काहीच नाही म्हणावे तर सुख कशामुळे झालें ? **तेथें आत्माही नाही म्हणावा। तरी आनंद कैसा गणावा। बुद्धीनें तेथील आनंद जाणावा। जागृतीत त्याच आत्मयाकरितां।।** (य. दी. ३-८४९) म्हणून विषयइंद्रियविरहित सुख असतें हें अनुभवाला आणून देणारी ही सुषुप्ति अवस्था आहे. **आत्मा सुषुप्तिगम्य। गुरूकृपेवीण अगम्य।।** (य. दी. ५८१) सुषुप्तीचा विचार सद्‌गुरूकडून समजून घेऊन त्याचा उपयोग जागृतावस्थेंत साधनाने आत्मानुभव घेण्यासाठीं आहे. म्हणून श्लोकाच्या स्पष्टीकरणार्थ त्या अवस्थेमध्ये काय घडतें याचा स्थूल विचार पाहू.

जागा झालेला मनुष्य झोपेतील दोन अनुभव सांगतो. ''मी सुखांत निजलो होतो व मला काहीं समजलें नाही'' याप्रमाणे निद्रेतील सुख व अज्ञान यांचे स्मरण तो वाणीनें सांगतो. स्मरण हें अनुभवलेल्या पदार्थाचेंच होतें. न अनुभवलेल्या पदार्थाचे होत नाही असा नियम आहे. यामुळें अज्ञान व आनंद या दोहोंचा अनुभव सुषुप्तींत होता. वर सांगितल्याप्रमाणें थकलेला व विश्रांतीसाठी आधाशी झालेला जीव स्थूल सूक्ष्म प्रपंचाचा त्याग करून हृदयाकाशांत ब्रह्मानंदात लीन होतो म्हणून तो सुख अनुभवितो. दु:खाचा अभाव व आत्मचैतन्याशी तादात्म्य यामुळें तो आनंदात निमग्न असतो. मन हें स्थूल सूक्ष्म प्रपंचाचें (जागृती व स्वप्न) संस्कार घेऊन गाढ अज्ञानांत गडप झालेलें असतें. त्यामुळे संसारित्वाची अथवा जीवित्वाची प्रतीती येत नाही. तेथें आत्मसत्ताच केवळ नांदते. **एवं असो शके जे इतरावीण। त्यांत सत्ता आहे म्हणती प्रवीण।।** (य. दि. ३-८०७) पण गाढ अज्ञानाचे आवरणामुळें तेथील सुखाचें स्थान कळत नाही. तात्पर्य हे कीं, **सुषुप्तीत**

**ब्रह्मसुखानुभवाचें साधन अज्ञान वृत्तीत प्रतिबिंबिब झालेलें आत्मचैतन्य आहे.** हा सुखानुभव सोडून कर्मामुळें जीव जागृतीत येतो व वरील दोन अनुभव सांगतो की **सुख तें आत्मा आपण। आणि तेथें कांही न कळणें। हें आपले जडपण। प्रगट करी बुद्धीच॥** (य. दी. ३-८४१)

या झोपेच्या दृष्टान्तावरून बोध घेण्याचा तो असा कीं जागृतावस्थेंत बुद्धीचे साम्राज्य अधिक म्हणून वृत्ती अतिस्पष्ट असतात; म्हणून तेथें सुखानुभव नसतो. सुषुप्तीत अज्ञानाचें साम्राज्य अधिक म्हणून वृत्तीहि अति अस्पष्ट असतात. त्यामुळे भोगाचे भान होत नाही. पण आत्मसुखानुभव इतका गोड असतो कीं कोणी जागे करू गेल्यास त्यावर मनुष्य चिडतो. मग जागृतावस्थेंत वृत्ति नाहीतच अशी वृत्तिरहित अवस्था आल्यास केवढा आनंद होईल ? अशी अवस्था प्राप्त व्हावी यासाठी तर नामसंकीर्तन हा उपाय आहे, मात्र तें करीत असता - **अंतरीचे विषय जाड। येऊ पुढें न द्यावें॥** याप्रमाणें सदानंद सेवीत जा, रामच आनंदरूप आहे असें समर्थ म्हणतात.

यावर एक अशी शंका येईल कीं, सुषुप्तीत जर आत्मसंपन्नता आयती होते तर भजनाचें कष्ट कशासाठी घ्यावयाचे ? याचें उत्तर असें की, सुषुप्तींत आत्मसंपन्नता येत असली तरी अज्ञानाच्या प्राबल्यामुळें पूर्वसंस्कार व वासनांचे गाठोडे नष्ट होत नाही. उरावरचे तें बाजूला असल्याचा भास होतो म्हणूनच निद्रानंद प्राप्त होतो. पूर्वसंस्कारामुळे जागृति आली कीं तें उरावर असतेच. पण एकविध वृत्तीनें झालेल्या भजनात आनंद मिळून ज्ञानाचा उदय होत जातो व पूर्वसंस्काराचें गाठोडें हळूहळू कमी होत जातें. निर्वासनात्मक स्थिति आली कीं जन्ममरणाचा फेरा चुकतो. भजनांत आनंद, लिंगदेहनाश व मुक्ति असा तिहेरी लाभ आहे. **नारायणी वसले घर। निरंतर आनंदु॥** म्हणून असा सदानंद आनंद सेवूनि राहे.

★ ★ ★

**मुखीं राम त्या काम बाधूं शकेना।**
**गुणें इष्ट धारिष्ट त्यांचे चुकेना।**
**हरिभक्त तो शक्त कामास मारी।**
**जगीं धन्य तो मारूती ब्रह्मचारी।।८७।।**

नामाव्यतिरिक्त अन्य कोणतेंहि चिंतन शोकास कारण होतें. पण श्रीरामनामानें समाधान प्राप्त होऊन नित्यानंद अनुभविता येतो, असें मागील श्लोकात सांगितलें. या श्लोकांत जगाला छळणाऱ्या कामालाहि मारून



रामनामानें कसा विजय प्राप्त करून घेता येतो हें हनुमंताचे उदाहरण देऊन सांगतात. या एकाच श्लोकांत मारूतीचें सुंदर गुणवर्णन करून नामाचें श्रेष्ठत्वहि वर्णिले आहे.

जो अखंड रामनाम स्मरण करितो त्याला कामाची बाधा होऊ शकत नाही. **'जो काणी स्मरे माझें नामू। तिकडे पाहूं न शके कामू॥** (ना. भा. १२-१५५) असें भगवान् म्हणतात. नामाने रामरूपांत जो अखंड रंगून राहतो त्याला स्त्री अथवा अन्य विषय कामाची कधीहि पीडा होत नाही. इतकेंच काय पण कितीहि संकटें आलीं तरी या नामनिष्ठेमुळे तो प्रसंगोचित धैर्य दाखवून संकटाला तोंड देतो, डगमगत नाहीं. कारण नामामुळें चित्त शुद्ध होऊन उचित धारिष्ट प्राप्त होते..... **ज्याचें धारिष्ट चळेना। तो सत्त्व गुण** (दा. २-७-५९)

ईश्वरभक्ति करणारा इतका समर्थ्यवान होतो कीं जगाच्या मोहात अडकविणारा असा जो बलिष्ठ काम त्याचा लेशहि त्याच्या ठिकाणी उरत नाहीं. जो कामास जिंकतो तोच जितेंद्रिय. हा जो नाममहिमा सांगितला त्याचें प्रत्यक्ष उदाहरण जर कोणतें असेल तर तें धन्य अशा ब्रह्मचारी हनुमंताचें होय. हा श्लोकार्थ झाला.

समर्थांना मारूतीविषयी अत्यंत प्रेम होतें. ब्रह्मचारी, प्रतापी, बुद्धीवान्, ज्ञानी आणि आदर्श रामभक्त म्हणून त्यांनी मारूतीची ठिकठिकाणीं स्थापना केली. पुष्कळांना ते मारूती उपासनाहि सांगत, सामान्य उपासकाचे मारूतीच्या शारीरिक शक्तीकडे, अचाट सामर्थ्याकडे लक्ष जातें. पण **''जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्''** या त्याच्या गुणाकडे दुर्लक्ष होते. म्हणून ''हणम्या'' म्हणजे शक्तीने दांडगा पण डोक्याने मंद, असा शब्दप्रयोग केला जातो. यासाठीं या श्लोकांत सांगितलेले रामनामानें उत्पन्न गुण मारूतीच्या ठिकाणी कसे दिसून येतात हें पाहू.

(१) लक्ष्मण जेव्हां घायाळ झाला तेव्हां द्रोणागिरी पर्वतावरील पाहिजे असलेली वनस्पति सापडेना. प्रसंग तर तातडीचा व अति कठीण. अशा समयीं वेळ गमवण्यापेक्षां तो पर्वतच इष्ट स्थळीं नेण्याचे जें बुद्धीकौशल्य त्यानें दाखविलें तें इष्ट धारिष्ट नव्हे का ? (२) मारूतीचें ब्रह्मचर्य जेथें स्त्रियांचा संबंधच नाही अशा एकान्तांत राहून, मनावर दडपण ठेवून, ओढून ताणून राखलेलें असें ब्रह्मचर्य नाहीं. तें आंगवळणीं पडलेलें, स्वाभाविक, सहज असें ब्रह्मचर्य आहे. सीतेचा शोध, तारेचें सांत्वन, सुग्रीवांचे मंत्रीपद, रावणाच्या अंत:पुरांतील वास्तव्य इत्यादि अनेक प्रसंगी त्याचा सुंदर स्त्रियांशी सहवास आला असताहि व्रतभंग झाला नाही. कारण स्त्रीकडे दृष्टि गेली कीं मातृभाव

किंवा रामभाव जागृत व्हावा असा त्याचा सहज स्वभाव आहे. (३) जसें सहज ब्रह्मचर्य तशी त्याची भक्तीहि सहज - भक्ती आहे. सतत कार्यनिमग्न राहिल्यामुळें वरवर पाहिल्यास त्याच्या जीवनांत दास्य भक्तीशिवाय अन्य भक्तीचा प्रकार दिसत नाही. आश्रम नाहीं, एकान्त नाही, स्थिर बैठक नाही, डोळेझाक नाही; उलट सर्व आयुष्य धकाधकीचेंच. केव्हां निरोप घेऊन जावें तर केव्हां शिष्टाई करावी. केव्हां लंकादहन करावें तर केव्हां भुयारात शिरावें. असें असूनहि समर्थ त्याला हरिभक्त म्हणतात, तर भक्तशिरोमणि तुकोबा त्याला शरण जाऊन भक्तीची वाट पुसतात. तुकोबा म्हणतात, **''शरण शरणजी हनुमंता। तुम्हां आलों रामदूता।। काय भक्तीच्या त्या वाटा। मज दावाव्या सुभटा।।''** (गा. १३०९) असा हा भक्तीचा प्रकार तरी कोणता ?

मारूतीच्या कार्यनिमग्न कर्ममय जीवनांतील ही सहजभक्ति आहे. ज्याचा अहंकार परमात्मस्वरूपी समरस होऊन गेला आहे त्यालाच ती ठाऊक. भगवान् म्हणतात. **क्रियाजात मी जालेपणें। घडे कांहीचि न करणें। तयाचि नांव पूजणें। खुणेचें माझें।।** (ज्ञा. १८-११७८) मद्रूप झाल्यामुळें जें कांहीच न करणें होतें त्याचेंच नाव माझें मार्मिक पूजन. जेव्हा अभिमानरहित असें कर्म घडतें; तेव्हा तें कर्त्यानें न केल्यासारखेंच आहे. **म्हणौनि करीतयाही वोजा। तें न करणें हेंचि कपिध्वजा। निफजे तिया महापूजा। पूजी तो मातें।** (ज्ञा. १८-११७९) कर्म करीत असताहि जेथें अहंकारलोपामुळें न करणें उत्पन्न होतें त्या महापूजेनें तो माझी पूजा करितो. अशी ही नामामध्ये रंगून, स्वत:ला विसरून, आत्मस्वरूपी स्थिर राहून जीवनव्यापार करीत असताहि होणारी भक्ती आहे. मग तो बोलेल तेंच देवाचें स्तवन, तो पाहील तेथें देवदर्शन, हिंडेल ती यात्रा, असें होतें. **राम म्हणे भोगी त्यागी। कर्म न लिंपे त्या अंगी।। ऐसा राम जपे नित्य। तुका म्हणे तो जीवन्मुक्त।।** (गा. १२९६) अशा या सहजब्रह्मचर्यामुळे व सहज रामभक्तीमुळें - **जगीं धन्य तो मारूती ब्रह्मचारी.**

★ ★ ★

**बहू चांगले नाम या राघवाचें।**
**अती साजिरें स्वल्प सोपें फुकाचें।**
**करी मूळ निर्मूळ घेतां भवाचें।**
**जिवां मानवां हेंचि कैवल्य साचें।।८८।।**

मागील श्लोकांत हनुमंताचें उदाहरण देऊन रामनामाचें श्रेष्ठत्व



सांगितलें. तसेंच या व पुढील कांही श्लोकांत निरनिराळ्या प्रकारें नाममाहात्म्य सांगतात. या श्लोकांत मुख्यत्वें रामनामानें भवनिर्मूलन कसें होतें हें सांगतात.

राम हीं दोनच अक्षरें पण तीं किती गोड व चांगलीं आहेत. उच्चार करण्यास सोपीं व प्रणव नादानें युक्त म्हणून फारच गोड. त्यासाठीं काहीं मोलही नको. कोणी एखादा म्हणेल कीं अक्षरें गोड, सोपीं असतील. पण तीं सतत उच्चारण्यांत फायदा कोणता ? समर्थ म्हणतात कीं तें नाम गोड, सोपें व फुकाचें तर आहेच, पण जो तें घेतो तो जन्म मरणाच्या फेऱ्यातून सुटतो, असें यांत महत्त्व आहे. जीवदशेंत नांदणाऱ्या मानवाची जन्म - मरणातून सूटका करून घेणें यालाच कैवल्य म्हणतात, हाच मोक्ष होय. **जन्ममृत्यापासून सुटला। या नाव जाणिजे मोक्ष जाला।।** रामी रामदास म्हणतात, **''येवो द्यावे वाचे नाम निरंतर। तेणें हा संसार तरिजेल।।''** असा हा श्लोकार्थ आहे.

पण यावर एक शंका अशी येईल कीं, मोक्ष हा ज्ञानानेंच होतो असा सिद्धान्त आहे, समर्थही दासबोधांत तोच सांगतात. **नरदेहीं ज्ञानेंवीण। कदा न चुके जन्ममरण।।** (दा. ८-७-२५) **ज्ञानेवीण मुक्त जाले। हें तो घडेना।।** (दा. ९-७-३३) असें असतांना या श्लोकांत नामानें भवाचें निर्मूलन होतें, असें ते कसें म्हणतात ? याचा विचार पाहूं.

जीवामागें जी जन्ममरणपरांपरा लागली आहे तिचें मूळ कारण वासना हें आहे. वासना जोपर्यंत नि:शेष नष्ट होत नाहींत तोपर्यंत जन्ममरण चुकणार नाहीं. वसिष्ठ रामाला सांगतात - **यालागी सर्व संसार रघुनाथा। असे जाण वासनेच्या माथा।। वासना क्षयीं जीवन्मुक्तता। बाणे तत्त्वतां जाण तूं।।** (यो. वा.) वास्तविक आत्मचैतन्य हें स्वत: शुद्ध, सुखरूप, मुक्त असें असून सर्व वासनांचें व तदनुसार उत्पन्न होणाऱ्या वृत्तींचें तें प्रकाशक आहे, असें असतांहि आपले स्वरूप विसरून तें विषयवासना वृत्तीच्या संगतीत आल्यामुळें तादात्म्य पावतें म्हणून त्याला बद्ध, मलीन जीवदशा प्राप्त होते. **आत्म्यानें प्रकाशिली वृत्ती। वृत्तीने आत्म्यासी जीव-प्राप्ती। जीवा जीवत्वें देहासक्ती। सुखदु:खप्राप्ती तेणें भोगी।।** (ना. भा. १३-४१२) जीव दशा आली कीं मी देही असून मला जन्ममरण, सुखदु:खादि द्वंद्वे आहेत असें वाटूं लागतें. वासनावृत्तीशी तादात्म्य झाल्यामुळें मुक्त असूनहि बंध येतो. **एवं वृत्तीचिया संगती। वाढली विषयांची आसक्ती। तेणें संसारबंधप्राप्ती। झाली निश्चितीं जीवासी।।** (ना. भा. १३-४१३)

या सर्व वासनांचे वास्तव्यस्थान आहे चित्त. विषयांच्या अपेक्षेने ज्या

वासना निर्माण होतात त्या चित्तात साठविल्या गेल्यामुळें चित्ताला चित्तपण येतें. संकल्प विकल्प असले म्हणजे मनाला मनपण येतें व तें नसलें म्हणजे त्याचे मनपण नष्ट होतें. याप्रमाणें वासनामुळें चित्ताला चित्तपण येतें. वासना नष्ट झाल्या कीं चित्त अचित्त होतें व त्याला प्रकाशित करणारें आत्मचैतन्य तेवढें उरतें. तोच आत्माराम. **वासनायोगें चित्तपण। वासना क्षयें अचित्त जाण।। चित्ते संसार होय दारूण। अचित्ते पूर्ण ब्रह्मत्व।।** (यो. वा.) तात्पर्य चित्त म्हटलें कीं वासना आल्या आणि वासना आल्या की संसारबंध आला. म्हणून हा वासनाक्षय नामानें कसा साधतों हें पाहूं.

चित्ताचें अचित्त होणें हें जें अवघड कार्य तें नामासारख्या सोप्या साधनानें साधतें म्हणून नामाला महत्त्व आहे. विषयवासनार्थ बहिर्मुख होणें हा चित्ताचा सहज स्वभाव आहे, पण नामानें तें हळूहळू अंतर्मुख होऊ लागतें. नामस्मरणाबरोबर चित्त रूपाकडे वळतें व विषयवासनांशी पाठमोरे होतें. जसजसें साधन वाढेल तसतसें पाप क्षीण होऊ लागतें. पापक्षयाबरोबर चित्तातील रज तम हे गुण कमी होऊन सत्त्व गुणाची वाढ होत जाते. सत्त्वगुण वाढत जाईल तसतसें चित्त शुद्ध होऊन तें धर्मपरायण होत जातें. आपलें चित्त शुद्ध झालें की नाहीं हे ओळखावें कसें असा प्रश्न एका साधकानें केला असता श्री. प. प. टेंबे स्वामी म्हणाले की, ''जेव्हा आपलें वर्णविहित कर्म निष्ठेनें व आवडीनें करावें असे वाटू लागतें तेव्हां चित्त शुद्ध झालें आहे असें समजावें''. स्वधर्मनिष्ठा आली कीं वासनावर नियंत्रण पडून पाठोपाठ वैराग्य येतेंच. वैराग्य वाढेल तसें नामरूपाकडे चित्त जास्त ओढ घेतें व हृदयस्थ जनार्दनाची जाणीव होऊं लागते. **'चित्त' विसरोनि चित्ता। जडोनि ठाके भगवंता। 'मनाची' मोडली मनोगतता। संकल्पविकल्पता करूं विसरे।। ऐसी देखोनि हृदयशुद्धी। तेथोनि त्रिशुद्धी न रिघे हरी।।** (ना. भा. २-७७८,७७९) येथपर्यंत अट्टाहासानें प्रयत्नपूर्वक एकाग्रचित्ताने नामसाधन केलें पाहिजे. यापुढें भगवत्कृपा अनुभवाला येते.

हें लक्षांत असावे कीं धनं धान्य पशुं बहुपुत्रलाभं हे भगवतकृपेचें लक्षण नसून प्रारब्ध भोगाचें आहे. भगवतकृपेचें लक्षण स्वत: भगवंतच सांगतात. **माझें कृपेचें लक्षण। प्राप्त विषय भोगिता जाण। न तुटे माझें अनन्य भजन। 'पूर्ण कृपा' जाण या नांव।।** (ना. भा. २०-३६०) अशा पूर्ण कृपेनंतरच चित्तात निर्गुण आत्मरूपाचें ज्ञान उत्पन्न होतें. गुरूनें ज्ञानविचार सांगितला तरी ईश्वरकृपेशिवाय तो चित्तांत नीट उमटत नाहीं. **गुरूंनीं सांगितली ज्ञान स्थिति।**



**ते ईश्वरकृपेवीण चित्तीं। ठसावेना साधकांप्रती। जाण निश्चितीं उद्धवा।।** (ना. भा. २२-१००) म्हणून नामसाधनानें ईश्वरकृपा होऊन ज्ञानानेंच कैवल्य प्राप्त होत असल्यामुळे ''ज्ञानादेव तु कैवल्यम्'' या सिद्धान्ताला बाध येत नाहीं तुकोबा म्हणतात - **''तुटे भवरोग। संचित क्रियमाण भोग।। ऐसें विठोबाचें नाम। उच्चारिता खंडे जन्म।।''**

★ ★ ★

**जनीं भोजनी नाम वाचे वदावें।**
**अती आदरें गद्य घोषें म्हणावें।**
**हरीचिंतनें अन्न जेवीत जावें।**
**तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावें।।८९।।**

मागील श्लोकांत फुकाच्या नामानें भवनिर्मूलन होऊन कैवल्य कसें प्राप्त होतें हें सांगितलें. या श्लोकांत भोजनसमयी नामस्मरण केल्यास हरिकृपा होते असें सांगतात.

ज्या वेळीं एखादा सामुदायिक भोजनाचा प्रसंग असतो त्या वेळीं गद्य असें जें परमेश्वराचें नाम त्याला नादाची साथ देऊन तें मोठ्यानें गर्जना करून म्हणावें. ''सीताकांतस्मरण जयजयराम,'' ''पार्वतीपते हरहर महादेव'' इत्यादि स्वरूपांत आपण तें घेतों तसेंच मोठ्याने गर्जून सर्वांनी तें घ्यावें. केवळ गर्जनाच करावयाची एवढाच त्यांत हेतु नसावा, तें प्रेमानें घेतलें जावें. तसेंच भोजन घेत असतांना आपण एकटे असलों अगर समुदायांत असलों तरी मनांत हरीचें स्मरण सतत ठेवून भोजन घ्यावें. त्या वेळीं मनांत इतर कल्पनांना थारा देऊं नये. असा भजनक्रम राहिल्यास स्वाभाविकपणें श्रीहरी पावल्यावांचून राहणार नाहीं. कांही पुस्तकांत ''अन्न जेवीत जावें'' याऐवजीं ''अन्न सेवीत जावें'' असा पाठ आहे. तात्पर्य, अखंड नामाचा छंद असावा पण विशेषत: भोजनसमयीं तें घ्यावें म्हणजे हरिकृपा होते असा या श्लोकाचा अर्थ आहे.

हा श्लोक भोजनाच्या वेळी नेहमीं म्हटला जात असल्यानें तो बहुतेकांना पाठ असतो. त्याचा वरवर अर्थ पाहिल्यास तो सोपाहि आहे. पंगतींत आपण मोठ्यानें नामगर्जनाहि करितो. पण ती ''अती आदरें'' असती का नाहीं हें ज्याचें त्यास ठाऊक . गर्जना झाली कीं गप्पागोष्टी सुरू होतात. भोजनाच्या वेळीं गप्पागोष्टी करीत, आनंदानें हसतखेळत जेवण झाल्यास

अन्नपचन चांगलें व लौकर होतें, अशी सर्वसाधारण समजूत आहे व व्यावहारिक दृष्टीनें ती बरोबरहि आहे. पण कोणी विचारलें कीं नामाचा आणि भोजनाचा संबंध काय ? भोजन करतांना नाम घेतल्यानें स्वाभाविकपणें हरी कसा पावतो ? तर या प्रश्नांचे उत्तर देणें मुकाट्यानें नाम घेत जेवणाऱ्या नामधारकासहि अवघड जातें. म्हणून साधकाच्या दृष्टीने नाम व भोजन यांचा संबंध काय व तो किती आवश्यक व महत्त्वाचा आहे याचा विचार पाहूं.

बरेच लोक म्हणतात कीं आम्हीं नाम घेतों पण मनांत भलभलत्या कल्पना येतात व चित्त स्थिर राहात नाहीं. याच्या मूळाशीं कोणतें कारण असेल तर तें आहाराकडे दुर्लक्ष हें होय. अन्नांतील सूक्ष्म अंशानें मनाचें पोषण होतें. तो अंश सात्त्विक नसेल तर मनहि सात्त्विक बनत नाहीं. रजतमोगुणात्मक मन कल्पना सोडीत नाही व अंतर्मुख होत नाही, म्हणून **मानसीं विषय पोखे। रसना द्वारें।।** (ज्ञा. २-३०६) हें तत्त्व विसरूं नये.

स्वेच्छा स्वैर खाण्यापिण्यानें विषयवासना प्रबल होतात. विषानें मरण येतें. मदिरेनें आपण काय करतों, कोठें आहों याचें भान राहात नाहीं हें आपण पाहतोंच.

**जैसे भांडियाचेनि तापें। आंतुलें उदकही तापे। तैसी धातुवशें आटोपे। चित्तवृत्ती।।** (ज्ञा. १७-११७) अग्नीनें प्रथम भांडें तापतें व नंतर आंतील पाणी तापतें. त्याप्रमाणें जसा आहार घ्यावा तसा देहांतील धातूवर परिणाम होतो; व त्या धातूप्रमाणें चित्ताचा स्वभाव बनतो. अन्नाचा रस, रक्त, मांस, अस्थि, मज्जा, स्नायु, व शुक्र किंवा शोणित या देहांतील सप्त धातु होत. सात्त्विक आहारानें सप्त धातूंवर सात्त्विक परिणाम होऊन चित्तांत सात्त्विक गुणांची वाढ होते व दैवी संपत्तीचा लाभ होतो. राजस, तामस आहारानें त्या त्या गुणांची वाढ होऊन राक्षसी किंवा आसुरी स्वभाव बनतो. म्हणूनच गीतेंत आहाराचें त्रिविध स्वरूप सांगितलें आहे व युक्ताहारानें दुःखनाश होतो असें म्हटलें जातें.

कोणी म्हणेल कीं हल्लींच्या काळीं जेथें साधा आहार मिळणें कठीण, तेथें सात्त्विक आहार आणावयाचा कोठून ? ही अडचण आहे खरी. पण त्याचबरोबर चविष्ट खाद्य पेयांची दुकानेंहि भरभराटींत चालू असून यांची वाढ होत आहे हेंहि खरें नाही का ? सर्वांना सात्त्विक अन्न मिळणें कठीण आहे, त्याप्रमाणेंच इतर इंद्रियांवर बंधन घालतां आलें तर जगण्यासाठी रसनेंद्रिय चालू ठेवावेंच लागतें इत्यादि गोष्टी लक्षांत घेऊनच समर्थ म्हणतात, ''हरी



चिंतनें अन्न जेवीत जावें.'' (अन्न जसें मिळेल तसें व तेवढें घ्या) पण तें नामानें संस्कारित करा. अन्नाला महागाई आहे, पण नाम तर फुकाचे आहे ना ? जगण्यासाठीं जें पदरीं पडेल तें खातांच; मग नाम कां टाळतां ?

हरीचें स्मरण करून जर घास घ्याल तर श्रीहरी पावेल. ''स्वभावें'' हा शब्द महत्त्वाचा आहे. स्वभाव म्हणजे संस्कार. **की स्वभाव। संस्काराचें नां।। संस्कारानुरूप भाव। उपजतो श्रद्धेचा।।** (य. दी. १७-४१) आणि ज्याच्यावर श्रद्धा तेच ध्यानीं मनीं दिसतें. हरीच्या नामांत इतकें सामर्थ्य आहे कीं तें अन्नाला पवित्र बनवितें व त्या पवित्र अन्नामुळें चित्ताची शुद्धि होऊन हरिप्रसाद प्राप्त होतो. म्हणून नामाबरोबर होणाऱ्या आहाराला नाथ निर्गुण आहार म्हणतात. **ग्रासोग्रासीं गोविंद। येणें स्मरणें अन्न शुद्ध।। हा निर्गुण आहार प्रसिद्ध। चकारें गोविंद बोलिला।।** याच्याहि पुढें परम निर्गुण आहार आहे. तो असा- **अन्न ब्रह्म अहंच ब्रह्म। पंक्तीकर तोहि ब्रह्म।। ऐसा ज्याचा भोजनानुक्रम। तो आहार परम निर्गुण।।** (ना. भा. २५-३७८-७९) सारांश हा आहे कीं, जें मिळेल तें युक्त अन्न घेत असतांना अट्टाहासानें नामस्मरण करावें. त्यामुळें अन्न शुद्ध होतें व तें चित्तशुद्धीला फार उपकारक होतें.

★ ★ ★

**न ये रामवाणी तया थोर हाणी।**
**जनी व्यर्थ प्राणी तया नाम काणी।**
**हरीनाम हें वेदशास्त्रीं पुराणीं।**
**बहू आगळें बोलिली व्यासवाणी ।।९०।।**

भोजनाच्या वेळीं नाम घेतल्यानें सत्व वृत्तीची वाढ कशी होते हें सांगून जनांत किंवा भोजनांत अखंड नाम घ्यावें, असें मागील श्लोकांत सांगितले, पण असें नाम न घेतलें गेल्यास मानवी जीवनाची फार मोठी हानि होते, असें या श्लोकांत सांगतात.

ज्याच्या मुखांतून रामनाम येत नाहीं तो आपणहून आपला फार मोठा घात करून घेत आहे असें समजावें. या लोकीं ज्याचा जन्म निरर्थक आहे अशा मनुष्यालाच नाम हें तुच्छ किंवा कष्टाचें वाटतें. त्याचें मनुष्यत्वच फुकट होय. म्हणजे त्याला मनुष्य असें म्हणतांच येणार नाहीं. कोणी - तुच्छ किंवा क्लेशदायक.

मानवदेह प्राप्त झालेल्या मनुष्यानें स्वतःचा उद्धार करून घ्यावा

म्हणून तर वेद, शास्त्रें व पुराणें याचें प्रयोजन-वेद हे ईश्वराचे निश्वसित, तर पुराणें हीं व्यासप्रणीत. अन्वय-हरिनाम हे बहू आगळें. वेदशास्त्री पुराणीं व्यास वाणी बोलिली, वेदशास्त्रें हरिनाम हें जसें और सारसाधन आहे असें सांगतात. तसेंच पुराणांत व्यासवाणीहि सांगते. **चहूं वेदीं जाण साही शास्त्रीं कारण। अठराही पुराणें हरिसी गाती॥** (ज्ञा. ह. पा.) अशा या भगवंताच्या व महात्म्यांच्या शब्दाकडे दुर्लक्ष करून नामाला तुच्छ लेखणारा मानव स्वत:चे घोर नुकसान करून घेतो. असा हा श्लोकार्थ आहे. पण नामाला तुच्छ लेखणारीं अनेक माणसें प्रपंचांत भरभराटींत व ख्यालीखुशालींत नांदत आलेलीं दिसतात. म्हणून समर्थ ज्याला 'थोर हाणी'' असें म्हणतात तिचें स्वरूप काय हें पाहूं.

प्रथम हें लक्षात घेतलें पाहिजे कीं, नरदेहाच्या सार्थकतेसंबंधी किंवा लाभहानीसंबंधी आपल्यासारख्या प्रापंचिकांच्या आणि संतांच्या कल्पनेंत फार फरक आहे. लहानाचे मोंठे व्हावे. एखादी पोटभरू विद्या शिकावी, संपत्ती मिळवावी, ऐश्वर्यात नांदावे आणि पोट अनायासे भरावे, म्हणजे झाली नरदेहाची इतिकर्तव्यता अशी आपली समजून असते. संत म्हणतात कीं आयुष्यांतील लाभहानि, श्रीमंती,गरिबी ही तूं कितीही धडपड केलीस तरी तुझ्या पूर्वकर्मानुसारच प्राप्त होणार, टिकणार किंवा जाणार. हा लोक सोडतांना बऱ्यावाईट कर्मांचें गांठोडे घेऊन तूं एकटाच जाणार व सर्व येथेंच राहणार. **राजा असतां मृत्यू आला। लक्ष कोटी कबूल झाला। तरी सोडीना तयाला। मृत्यू कांहीं॥ ऐसें हें पराधेन जिणें। यामधे दुखणें बाहाणें। नाना उद्वेग चिंता करणें। किती म्हणोनि॥** (दा. १२-८-३२,३३) म्हणून नरदेहासारखें घबाड प्राप्त झालें असतां त्याचा लाभ घेऊन अमर हो. जेथून तुला कोणी खालीं खेचणार नाहीं असें अच्युत पद प्राप्त करून घे वरचेवर मरूं नकोस. सारांश, संतांच्या दृष्टीनें अमर होणें हा नरदेहांतील अलभ्य लाभ होय. आणि वरचेवर मरत राहणें ही थोर हानि होय.

वास्तविक परमेश्वरानें मानवदेह दिला तो भजनानें हें अमरत्व साधण्यासाठीं. अन्य कोणताहि लाभ उठविण्यासाठीं नाही असें स्वत: भगवंतच सांगतात. **अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम्॥** हा लाडक्या अर्जुनाला त्यांचा संदेश आहे. खाणेंपिणें, निद्रा घेणें, प्रजोत्पादन करणें, इत्यादि व्यवहार इतर सर्व योनींत आहेतच. पण विवेक व वैराग्य यांसारखी भगवंताची अमोल देणगी मानव देहाव्यतिरिक्त अन्य कोणत्याहि देहांत नाहीं. म्हणून **नरदेहीं**



**आलियां येक। कांही करावें सार्थक। जेणें पाविजे परलोक। परम दुल्लभ जो॥** (दा. २-४-५) श्रीदत्तात्रेयांनी चोवीस गुरू केले, पण त्या सर्वापेक्षा श्रेष्ठ असा पंचविसावा गुरू नरदेह मानिला आहे. **चोवीस गुरूंचाही गुरू। विवेकवैराग्यविचारू। हा नरदेहीं लाघे सघरू। यालागीं मुख्य गुरू नरदेहो॥** (ना. भा. ९-२४९) ज्या देहांतील विवेकामुळें दुर्लभ अशा अविनाश पदाची प्राप्ति होते असा हा अलभ्य लाभ करून देणारा मानव देह आहे. मग याचा उचित असा उपयोग करून घ्यावयास नको काय ? **नरदेहाचें उचित। कांही करावें आत्महित॥** (दा. २-४-१३) असा सदुपयोग न झाल्यास मानवी जीवन म्हणजे खेळखंडोबाच, नरदेहाचें मातेरें केवळ आयुष्यनाशच. **तैसें नरदेह येऊनि नरां करिती आयुष्याचा मातेरा॥ पूर्ण व्यवसायो शिस्नोदरा। उपहास निद्रा कां निंदा॥** (ना.भा. २-२३५) ध्येयविस्मरणामुळें असें आयुष्याचें मातेरें होण्यापेक्षां पशुत्व बरें. पशूंत ऋतुकालाविना स्त्रीसंभोग नाही, लोभ नाही,निंदा नाहीं; आणि विवेक असून मनुष्यांत हे सर्व दुर्गुण; मग तो पशूहूनही हीन नव्हे का ? **काम क्रोध सलोभता। चिंता निंदा अतिगर्वता। हे मनुष्याचेचि माथा। पशूसी सर्वथा असेना॥** (ना.भा. ९-३६८)

केवळ आयुष्याचें मातेरें होतें इतकेच नव्हे तर त्याहूनहि थोर हानि म्हणजे आत्महत्या व ईश्वराचा घात या दोषांचे पाप पदरीं येतें. मनुष्यानें अमर व्हावे म्हणून ईश्वरानें मानवदेह दिला. त्या मानवाला विशेष असें ज्ञान दिलें. त्यानें विवेकानें योग्य मार्गानें जावें म्हणून मार्गदर्शन वेद, शास्त्रें व पुराणे निर्माण केलीं. इतक्या सर्व सोई करूनहि हा मानव साध्या भजनमार्गानेहि आपला उद्धार करून न घेतां निरनिराळ्या योनींत हिंडून वरचेवर मरूं लागला तर अमर न झाल्यामुळें तो आत्मघातकी व देवाला विसरल्यामुळें तो विश्वासघातकी होय.**भवाब्धि न तरवे तया। आत्महत्यारा बोलिजे॥** (दा. ८-७-२३) आणि **ऐसा नरदेह पावोनि देख। जो न साधीचि ब्रह्मसुख। तो जनांमाजीं परम मूर्ख। विश्वासघातक देवाचा॥** (ना. भा. ९-३७७) या भावानें 'थोर हाणी' असें समर्थ म्हणतात.

★ ★ ★

**नको वीट मानूं रघूनायकाचा।**
**अतीआदरें बोलिजें रामवाचा।**
**न वेचें मुखीं सांपडे रे फुकाचा।**
**करीं घोष त्या जानकीवल्लभाचा ॥९१॥**

ज्या मानवाच्या मुखातून रामनामाचा उच्चार होत नाहीं त्याच्या आयुष्याची थोर हानि होते. म्हणजे आत्मघात होऊन जन्ममरणाच्या फेऱ्यांत त्याला अडकून राहावें लागतें असें मागील श्लोकांत सांगितलें, ही थोर हानि चुकवावयाची असेल तर मनुष्यानें काय साधन केलें पाहिजे तें या श्लोकात सांगून नाममाहात्म्य वर्णन करतात.

राघवरूपानें नटलेल्या आत्मारामाचा कंटाळा करूं नकोस म्हणजे त्याच्या रूपाकडे दुर्लक्ष करूं नकोस. कांही लेखकांनी ''रघूनायकाचा'' या शब्दांचा अर्थ रामनामाचा असा केला आहे. पण या प्रथम चरणांत नामाचा कंटाळा करूं नकोस असें समर्थांना सांगावयाचें नसून ज्याचें नाम घ्यावयाचें त्या नामीच्या रूपाकडे दुर्लक्ष करूं नकोस असें सांगावयाचें आहे असें वाटते. पहिल्या चरणांत केवळ नामीचा उल्लेख असून दुसऱ्या चरणांत नामाचा उल्लेख आहे. म्हणून राघवरूपाकडे दुर्लक्ष न करतां अत्यंत प्रेमानें त्याचें नाम वाणीनें घे असा हा पूर्वार्धाचा भावार्थ बरा वाटतो.

नाम घेतांना जर रूपाकडे लक्ष नसेल तर मन कोठेहि अन्यत्र भटकत राहतें व मुखानें नाम घेणारा पुण्यवान असला तरी नामानें जन्मबंधविनिर्मुक्त व्हावयाचें असल्यास त्या नामांत रूपाची आठवण आणि नामीबद्दल प्रेम या दोन गोष्टी असल्याच पाहिजेच. **मुखीं नाम घ्यावें। मनीं रूप आठवावें।।** असे तुकोबा म्हणतात. केवळ मुखानें नाम घेतल्यास कांही पुण्यसंचय होईल. पण एकाग्रतेच्या अभावीं याची देही याची डोळा संसारनाश होणार नाही. **रूपाची न धरितां सोये। नामासरिसें भरंगळो नये।।** (दा. १०-१०-९) म्हणून पहिल्या चरणांत राघवरूपाचा कंटाळा नसावा असें सांगितलें व दुसऱ्या चरणांत वाणीनें नाम घेतांना त्यांत प्रेम असावें असें सांगितले.

सुरवातीस ओढीचे किंवा अष्टसात्त्विक भाव उत्पन्न होण्याइतकें प्रेम असणार नाहीं. कारण प्रेम हें करूं म्हणून होत नसतें. तें आहे ''देणे ईश्वराचे'' पण रूपाचा आठव व नामाचा जयजयकार हे प्रयत्न केल्यानें होतात व साधतात. आपला अंतरात्मा हाच राघवरूपानें नटला. असून त्याच्या अस्तित्वावरच आपला देह चालतो, बोलतो, पाहतो, ऐकतो, मी म्हणतों हे जाणून, आपल्या आवडत्या हृदयस्थ मनोमय मूर्तीकडे लक्ष देऊन नाम घेतल्यास त्यांतूनच सात्त्विक प्रेमाची उत्पति होते आणि कळवळ्याचा घोष मुखांतून निघतो. तुकोबा म्हणतात. **चालें हें शरीर कोणाचियें सत्ते। कोण बोलवीतें हंरीविण।। देखवी ऐकवी एक नारायण। तयाचें भजन चुकों नका।।**



(गा. १११८) आपल्या पदरचें कांही खर्च न होतां फुकट केवळ वाणीनें जर हें अमोल साधन हातें, तर याचा कंटाळा कां करावा ? यासाठी त्यां सीतापति रामाचा जयजयकार करीत राहा.

★ ★ ★

**अती आदरें सर्वही नामघाषें।**
**गिरीकंदरी जायिजे दूरि दोषें।**
**हरी तिष्ठतु तोषला नामघोषें।**
**विशेषें हरा मानसीं रामपीसें ।।९२।।**

कंटाळा न करता रामरूपाकडे लक्ष देऊन अत्यंत प्रमानें रामनामाचा जयजयकार करावा, असें मागील श्लोकात सांगितलें. असें नाम घेतल्यानें त्याचें कोणतें फल प्राप्त होतें तें या श्लोकांत सांगतात.

**अन्वय :-** अती आदरें नामघोषें सर्वही दोषें। दुरी गिरीकंदरीं जायिजे. अत्यंत प्रेमानें नामघोष केला की सर्व दोष, सर्व पातकें नामधारकापासून लांब पळून पर्वतगुहांत दडून बसतात. म्हणजे नामधारकांचे सर्व दोष नाहीसें होतात. **नाम स्मरे निरंतर। तें जाणावें पुण्य शरीर। महादोषांचे गिरीवर। रामनामें नासती।।** (दा. ४-३-२२) जन्मजन्मातरींची पातकें किंवा संस्कारदोष नाहींसे करून चित्त सत्वगुणसंपन्न करण्याचें सामर्थ्य नामांत आहे. कुबट धान्य अथवा कपडे यांना ऊन किंवा सूर्यप्रकाश दाखविला म्हणजें तीं जशी पूर्व शुद्ध स्थितीला येतात. तसेंच नामाच्या जयजयकारानें एकाग्र झालेलें चित्त चैतन्यघन रामरूपाच्या प्रकाशाने शुद्ध होऊन आपल्या मूळच्या चिद् या अवस्थेला प्राप्त होतें. असा या नामाचा प्रताप आहे. **अच्युत हें स्मरतां नाम। प्रतापें निर्दळी कर्माकर्म। सकळ पातकें करी भस्म। दाटुगें नाम हरीचें।।** (ना. भा. २६-१४)

**अन्वय :-** नामघोषें तोषला हरी तिष्ठतु. नामघोषानें संतोष पावलेला परमेश्वर शुध्द चित्तांत आनंदानें राहतो. प्रत्येक प्राणिमात्रांत चैतन्यघन रामाचें वास्तव्य आहेच. पण मलिन चित्तामुळें त्याची जाणीव येत नाहीं. दाट ढंगाच्या आड सूर्य असतो, ढगांना तोच प्रकाशितो, पण असें असूनहि तो नाहीं असें वाटतें. तसें मलिनाचित्तप्रकाशकहि रामच आहे पण चित्तमालिन्यामुळें त्याची जाणीव होत नाही. म्हणून जेथें नामस्मरण् होतें तेथें त्याची जाणीव येत असल्यामुळे हरी आनंदानें राहतो असें म्हटलें आहे. दुसरी गोष्ट म्हणजे जेथें

प्रेम तेथें हरी. तो प्रेमाचा भुकेला आहे. **प्रेमळाची परम प्रीति। उल्लंघू न शके श्रीपती।।** (ना. भा. २-७७२) त्याला वैकुंठ नको, सूर्यलोक नको, योग्यांचें हृदय नको. त्याला प्रेमळ नामघोषाची चटक आहे. ती इतकी कीं नामघोषांनें लुब्ध झालेला तो नामधारकांच्या अंत:करणातून बाहेर निघतच नाहीं. **हरीनामप्रेमप्रीतीवरी। हृदयीं रिघाला जो हरी। तो निघों विसरे बाहेरी। भक्तप्रीतीकरीं कृपाळू।।** (ना. भा. २-७८०) यासाठीं हरी तोषला तिष्ठतु नामतोषें असे समर्थ म्हणतात.

म्हणूनच हरीमानसी रामपींसे विशेष आहे. श्रीशंकरांना रामनामाचें वेड फार आहे. आपण धन, स्त्रीप्रेमानें वेडे होतों, पण आत्मारामाच्या प्रेमानें वेडे झालेले फारच थोडे. वेड नसो, पण आवड तरी असावी, त्यामुळें जन्माचें सार्थक होईल **तुका म्हणे यासी (नारायणास) कीर्तनाची गोडी। प्रेमें घाली उडी नामासाठीं।।** म्हणून प्रेमळ चित्तानें नामघोष करावा.

★ ★ ★

**जगीं पाहतां देव हा अन्नदाता।**
**तया लागली तत्त्वतां सार चिंता।**
**तयाचें मुखीं नाम घेतां फुकाचें।**
**मना सांग पां रे तुझे काय वेचें ।।९३।।**

नामानें सर्व दोष नाहीसें होऊन हरिसंतोष कसा होतो हें मागील श्लोकात सांगितले. या श्लोकात समर्थ मनाला सांगतात कीं केवळ आम्ही नामाचें गोडवे गातों म्हणून तूं नामाला महत्व देऊं नकोस. सृष्टीकडे व मानवी जीवनाकडे तूं थोडेंसें लक्ष दें, विचार कर, म्हणजे नामाची आवश्यकता काय हें तुझें तुलाच समजेल.

सृष्टींत जन्मास आलेल्या कोणत्याहि प्राण्यास अन्नावांचून जगतां येत नाही हें स्पष्ट आहे. आणि प्रत्येकाची धारणा अशी असते कीं मी स्वत: अन्न मिळवितों व खातों. यांत देवाचा असलेला संबंध लक्षातहि येत नाही. पर्जन्यानें थोडी ओढ खाल्ली कीं चिंतेनें आकाशाकडे लक्ष जातें व मनहि कांसावीस होतें. तें पावसाची चिंता करतें. पण पर्जन्यवृष्टि ज्याच्या स्वाधीन आहे त्या विश्वचालक विश्वंभराचें चिंतन करीत नाहीं किंवा त्याला आळवीत नाही. सृष्टिक्रम लक्षांत येतो, पण सृष्टिचालक लक्षांत येत नाहीं.

वास्तविक ज्यानें सृष्टि निर्माण केली त्यालाच तिच्या धारणेचीही सार



म्हणजे सर्व चिंता वाहावी लागते. या अखिल सृष्टीचा चालक व मालक परमात्मा आहे. **एष भूतानाम् अधिपति:।। भुवनस्यनाथ:।।** हाच सर्व भूतांचा अधिपति म्हणजे स्वामी आहे व जगाचा रक्षक आहे. पर्जन्यामुळें अन्नाची उत्पत्ति होते व अन्नावर प्राणिमात्रांचे जीवन व उत्पत्ति अवलंबून आहे. पर्जन्याच्या अभावीं सर्व जीव कष्टी होतील हें जाणून दयाळू ईश्वरानें यज्ञव्यवस्था निर्माण केली. **सहयज्ञा: प्रजा: सृष्ट्वा** इत्यादि श्लोकांच्या द्वारा गीतेच्या तिसऱ्या अध्यायांत ती भगवंतानें सांगितली आहे. चालू परिस्थितींत यज्ञादि कर्मे होणें हें सर्व दृष्टीनें अवघड आहे, पण ज्याच्यावर जीवन अवलंबून आहे,अशा पर्जन्यासाठीं निदान घासभर अन्नाचा वैश्वदेव तरी व्हावा. पण त्यांत अन्न फुकट गेलेंसें वाटतें. तो नाहीं तर पुढें आलेल्या अन्नाच्या ताटाचा ईश्वरस्मरणपूर्वक नैवेद्य तरी दाखविला जावा. हेंहि घडलें नाहीं तर तोडांत घास गेला कीं उपकृत बुध्दीनें त्या देवाचें फुकटचे नाम तरी घ्यावें. पण हेंहि होत नाहीं; याचें कारण अन्नादाता देव आहे येथपर्यंत लक्ष जातच नाहीं. **अहिर्निशी ज्या भगवंता। सकळ जीवांची लागली चिंता। मेघ वरूषे जयाची सत्ता। सिंधू मर्यादा धरी।।** (दा. ३-१०-५६) अशा कनवाळु कृपाळु देवाची आठवणहि होत नाहीं. म्हणून जगीं पाहतां देव हा अन्नदाता, असें स्मरण करून द्यावें लागतें.

स्वत: समर्थांची या वचनावर किती दृढ श्रध्दा आहे हें त्यांच्या एका पदावरून कळेल. एक काळा फत्तर फोडून त्यांत असलेल्या बेडककीकडे व पाण्याकडे शिवरायाचें लक्ष वेधून ते म्हणतात - **आम्ही काय कुणाचें खातों श्रीराम आम्हांला देतो।।** शिवबा, तटाच्या भिंतीत उगवलेल्या पिंपळाच्या मुळाला काय मोटेनें पाणी पाजलें जातें ? तेथें पाणी कोण घालतो ? मातेच्या मांसरक्तमय स्तनांत बालकाकरितां गोड व शुध्द दूध कोण निर्माण करतो ? खडकाच्या पोटांत काय समुद्र असतो ? मग तेथें जिवंत असलेल्या, सर्वांनी पाहिलेल्या, या रोड बेडकीच्या मुखांत पाणी कोण पाजतो ? शेवटीं समर्थ म्हणतात. **नसतां पाण्याचे बुडबुडे। सदा सर्वदा गगन कोरडें। दास म्हणे जीवन चहुंकडे। घालुनि सडे पीक उगवितो। श्रीराम आम्हांला देतो।।** म्हणून जगीं देव हा अन्नदाता.

★ ★ ★

**तिन्ही लोक जाळूं शके कोप येतां।**
**निवाला हरू तो मुखें नाम घेतां॥**
**जपे आदरें पार्वती विश्वमाता।**
**म्हणोनी म्हणा तेंचि हें नाम आतां ॥९४॥**

सृष्टिकर्त्या देवाला सर्व जीवांची चिंता असल्यामुळें तो अन्न पिकवून त्यांची भूक कशी भागवितो हें मागील श्लोकात सांगितले व त्यांचे नांव घेण्यास सांगितलें. या व पुढील तीन-चार श्लोकात पौराणिक उदाहरणें देऊन समजून अथवा चुकून नाम आल्यासहि कसें कल्याण होतें हें सांगतात.

या श्लोकात समजून नाम घेत असलेल्या शंकराचें उदाहरण प्रथम दिलें आहे. वास्तविक नामाबद्दल पूर्वी पुष्कळ श्लोकात शंकराचा उल्लेख आला आहे. पण शंकर हे आदर्श तपस्वी म्हणून समर्थांना त्याचें वेळोवेळीं स्मरण होतें असें दिसतें. **करितां तापसांची कडसणी। कवण जवळी ठेविजे शूलपाणी॥** असें ज्ञानोबाहि म्हणतात. दक्षप्रजापति यज्ञाच्या वेळीं उमेचा जाणून बुजून अपमान केला गेला, आणि तोहि माहेराकडून. त्यामुळें शंकरांना इतका भयंकर संताप आला कीं त्यामुळें तिन्ही लोक जळून भस्म होतात कीं काय असे वाटलें. पण तसे न झाल्यामुळें आपल्यापेक्षाहि विश्वरक्षणांचे सामर्थ्य असलेला कोणी तरी आत्माराम आहे असें वाटून ते रामनाम घेऊं लागले. त्यामुळें दुर्धर असा त्यांचा संताप कमी होऊन त्यांना पूर्ण शांति लाभली. हा नामप्रताप पाहून जगन्माता जी पार्वती तीहि प्रेमपूर्वक रामनाम जपूं लागली. या शिवशक्तीचा नामाबद्दलचा आदर सांगून समर्थ म्हणतात - लोकहो, **सुरेंद्रचंद्रशेखरू। अखंड ध्यातसे हरू। जनासि सांगतो खुणा। श्रीराम राम हे म्हणा॥**

★ ★ ★

**अजामेळ पापी वदें पुत्रकामें।**
**तया मुक्ति नारायेणाचेनि नामें।**
**शुकाकारणें कुंटणी रामवाणी।**
**मुखें बोलतां ख्याति जाली पुराणीं॥९५॥**

मागील श्लोकात नित्यनामजप करणाऱ्या शंकरपार्वतीचें उदाहरण दिलें. या श्लोकात अंतसमयीं चुकून मुखानें नाम आल्यामुळें सद्गति कशी प्राप्त झाली या संबंधी दोन पौराणिक उदाहरणें सांगतात.

आजमेळा हा कान्यकुब्ज देशाचा मूळचा सदाचारी ब्राह्मण, पण मन अनावर झाल्यामुळे पापी बनलेल्या या ब्राह्मणास दासीपासून दहा पुत्र झाले.



त्यात सर्वात धाकट्या मुलाचें नांव नारायण होतें. त्या मुलावर त्याचें फार प्रेम होतें. आसन्नमरण स्थितींतहि अरे नारायणा, अशा तो हाका मारी. पण त्या नामामुळें विष्णुदूत यमदूतांना त्याच्यावर पाश टाकू देईनात. त्यांचा संवाद अजामेळानें ऐकिला व परमेश्वरनामस्मरणाचें पुण्य जाणून तो पुढें विरक्त व भगवद्भक्त झाला. मरणोत्तर त्याला उत्तम गति प्राप्त झाली. केवळ पुत्राच्या मिषाने घडलेल्या नामस्मरणानें तो विष्णूपदीं गेला.

तसेंच, पिंगला नांवाची एक वेश्या होती. तिनें एक पोपट पाळलेला होता व त्यांचे नाव राघव असें ठेविलें. सौदर्य नष्ट झाल्यावर तिला कोण विचारणार ? पूर्वकर्माबद्दल तिला पश्चाताप वाटू लागला व अंतसमयीं आपल्या राघवाचें पुढें काय होणार या काळजींनें ती राघवा, राघवा अशा हाका मारू लागली. या राघवनामामुळें तिचें नांव पुराणांत गायिलें गेलें. समर्थ म्हणतात. **याच देहीं गति पावली कुंटणी। रामनाम वाणी उच्चारितां॥**

केवळ अंतसमयी निराळ्या मिषानें घेतलेल्या नामानें या दोघांना उत्तम गति कशी प्राप्त झाली ? असा प्रश्न पुष्कळांच्या मनांत येतो. याचें उत्तर ज्ञानोबांनीं ज्ञानेश्वरी अ. ११ मध्यें अर्जुनाच्या मुखांतून वदविलें आहे. भगवंताच्या विश्वरूपदर्शनासाठी उत्सुक झालेला अर्जुन त्यांना म्हणतो देवा, तुझें औदार्य सर्व स्वतंत्र म्हणजे तुझ्या मर्जीवर आहे. त्यामुळें पात्रापात्रविचार मनांत न आणितां पवित्र मोक्षसुख तू कोणालाहि देतोस. पुत्रमिषानें तुझें नाम घेणाऱ्या अजामेळास तूं आपली तद्रूपता दिलीस. **पुत्रा आळविता अजामिळा। आपणपें देसी॥** (ज्ञा. ११-१०४) तसेंच **तूंते आराधी ना आयके। होती पुंसा बोलावि कौतुकें। तिये वैकुंठीं तुवां गणिके। सुरवाडू केला॥** (ज्ञा. ११-१०७) तुझें गुणवर्णन जिनें कधी ऐकिलेंहि नाहीं तुझीं आराधनाहि जिनें कधीं केली नाहीं, अशा गणिकेला अंतकाळीं तिच्या मुखांतून पोपटाच्या मिषानें निघणाऱ्या तुझ्या नामामुळें तू वैकुंठलाभ करून दिलास. यावरून असें दिसतें कीं, तुझे औदार्य स्वतंत्र असेंच आहे. मोक्ष हा दुर्लक्ष असलातरी तो तुझ्या पायावर लोळण घेतो आणि धाडशील तिकडे तो सेवकाप्रमाणें जातो. **मोक्षु दुराराध्यु कीर होय। परी तोहि आराधी तुझे पाय। म्हणोनि धाडिसी तेथें जाय। पाइकु जैसा॥** (ज्ञा. ११-९९) अन्य मिषाने घडलेल्या नामानें जर अशी सद्गति प्राप्त होते तर श्रद्धापूर्वक नामानें उत्तम गति मिळेल यांत काय नवल आहे ?

★ ★ ★

**महाभक्त प्रल्हाद हा दैत्यकूळीं।**
**जपे रामनामावळी नित्यकाळीं।।**
**पिता पापरूपी तया देखवेना।**
**जनीं दैत्य तो नाम मूखें म्हणेना ।।९६।।**

अजामेळ व कुंटणी यांच्या कथांद्वारें मागील श्लोकांत नाममहात्म्य सांगितलें. या श्लोकांत भक्त प्रल्हादाचे उदाहरण देऊन नामप्रताप वर्णन करतात.

भक्त प्रल्हाद हा दैत्यकुळांत जन्मला असतांहि लहानपणापासून अखंड नाम जपत असे. त्याची ही नैसर्गिक स्मरणभक्ति त्याचा पिता जो हिरण्यकश्यपू त्याला पाहवेना. पंतोजीनें काय शिकविलें असा पित्यानें प्रश्न केला असतां **श्रवणं कीर्तन विष्णोः स्मरणं पादसेवनं।।** इत्यादि नवविधा भक्तीचें स्वरूप त्यानें सांगितले. आपल्या वर्गबंधूनाहि **घ्या हरिच्या नामा। कशास लिहितां ओनामा।।** असें तो सांगे. पित्याला त्यानें नारायण-माहात्म्यहि सांगितलें; परन्तु हिरण्यकश्यपूस तें पटेना. ऐश्वर्य व तपोबलानें उन्मत्त झालेल्या त्या पापी पित्यानें प्रत्यक्ष मुलाचा छळ आरंभिला.

दैत्य वृत्तीच्या मनुष्यास देवाचें नांवहि सहन होत नाहीं, उलट त्याचा द्वेषच असतो. जबरदस्त अहंकारामुळें तो ईश्वरालाहि तुच्छ समजतो. **तैसा अहंनामाचेनि मोहे। ईश्वराचें नामहि न साहे।।** (ज्ञा. १६-२३५) मग त्याला आपल्या मुलानें घेतलेलें देवाचें नाव सहन कसें व्हावें ? प्रल्हादाच्या छळानें देवाला नृसिंह रूप घ्यावें लागलें याचा उल्लेख सामर्थांनी पुढे १२१ व्या श्लोकांत केला आहे.

दैत्यकुलांत जन्म पावणाऱ्याच्या ठिकाणीं ईश्वरभक्तीचा अभाव असतो, असा सर्व साधारण नियम सांगून त्याला अपवाद म्हणून प्रल्हादाच्या स्मरणभक्तीचे येथे वर्णन केलें आहे. वास्तविक झाड तसें फळ हा सृष्टिनियम आहे. असें असतां पापी दैत्य हिरण्यकश्यपूच्या पोटीं दैवी गुणाचा प्रल्हाद पुत्र कसा निर्माण झाला, असा प्रश्न येतो. याचे उत्तर प्रल्हादानेंच आपल्या शाळासोबत्यांना दिलें आहे. प्रल्हाद त्यांना सांगतों कीं, ''आपला पिता तपश्चर्येत निमग्न असतांना आपली माता कयाधू हिला नारदऋषींनीं आपल्या आश्रमांत ठेवून घेतलें. उचित वेळीं प्रसूति होऊन गर्भरक्षण व्हावें, हा त्यांत हेतु होता. माझ्या आईनें त्या दयाळू ऋषीची उत्तम सेवा केली. त्यामुळें संतोष वाटून नारदांनीं मातेच्या संसारनिवृत्तीसाठीं व मला समजावें म्हणून धर्माचें भक्तिरूप तत्व व आत्मानात्मविवेकरूप ज्ञान या दोहोंचा तिला उपदेश केला.



माता स्त्री असल्यामुळें तिला त्या विषयाचा विसर पडला. पण त्या उपदेशाचे संस्कार माझ्या मनावर चिरंतन राहिल्यामुळें मला नारायणावाचून दुसरें कांहीं दिसतच नाहीं.'' हे प्रल्हादाचें उत्तर लक्षांत ठेवून गर्भवती स्त्रियांनीं कोणते ग्रंथ वाचावे व ऐकावे याचा नीट विचार केल्यास भावी पिढीचे हित होणार नाही का ?

★ ★ ★

**मुखीं नाम नाहीं तया मुक्ति कैंची।**
**अहंतागुणें यातना ते फुकाची।**
**पुढें अंत येईल तो दैन्यवाणा।**
**म्हणोनी म्हणा रे म्हणा देवराणा ।।९७।।**

नामाचें महत्त्व कळलें अगर न कळलें तरी तें मुखानें घेतलें गेल्यास कसें हित साधतें हे प्रल्हाद, अजामेळ आणि कुंटीण यांचीं पौराणिक उदाहरणें देऊन सांगितलें. पण मुखांतून नाम निघालेंच नाहीं तर त्याची काय अवस्था होते, हें या श्लोकांत सांगतात.

ज्याच्या मुखांतून भगवंताचें नाम कधींच येत नाहीं त्याला या सृष्टीचा सत्ताधारक, चालक व मालक कोणीतरी एक आहे याची जाणीवच नसते. अशा मनुष्याचा उद्धार व्हावा कसा ? आपण कोणीतरी एक प्रतिष्ठित देहधारी आहो या घमेंडीतच तो असतो. त्यांना अनात्म वस्तूंचे कितीही ज्ञान असलें तरी त्यानें पोट भरेल, लौकिक होईल. पण मुक्तस्थिति प्राप्त होणार नाहीं. **असो सकळ कळाप्रवीण। विद्यामात्र परिपूर्ण। तरी ते कौशल्यता परी ज्ञान। म्हणो चि नये।।**'' (दा. ५-५-३२) आत्मज्ञानाशिवाय मुक्तस्थिति नाहीं. शुद्ध चित्ताशिवाय आत्मज्ञान नाही व नामाशिवाय चित्तशुद्धी नाहीं. अशुद्ध चित्ताचें मानवी जीवन म्हणजे पशुजीवनाहूनहि कनिष्ठ होय. कारण पशूच्या ठिकाणीं घातकी देहअहंकार नसतो. पण आपणाला बुद्धिमान समजणाऱ्या मानवाच्या ठिकाणीं तो भरपूर असतो.

या अहंकारामुळेंच फुकट हाल सोसावे लागतात. मीपणाच्या घमेंडींत मला म्हणजे देहाला सुख व्हावें म्हणून मानवाची रात्रंदिवस धडपड असते. मी मोठा, मी सुंदर, मी शहाणा, माझें घर, माझा प्रपंच असें मीं व माझें करण्यानें चित्ताला स्वास्थ्य राहात नाहीं व दुःख मात्र पदरीं पडतें. **पुत्र कळत्र आणि दारा। इतुकाचि मानुनियां थारा। विसरोनी गेला ईश्वरा। तो येक मूर्ख।।** (दा. २-१-४०)

देहाला सुख व्हावें म्हणून अनेक वासनांच्या नादी लागल्यामुळें रजोगुणाची अतीव वाढ होते. जेथें रजोगुणाचें प्राबल्य तेथें पुनरावृत्ति म्हणजे पुनः पुनः जन्माला येणें व मरणें सुटत नाहीं. **नेणोनियां परमात्मा। सकळ पदार्थीं प्रेमा। बलात्कारें घालीं जन्मा। तो रजोगुण॥** (दा. २-५-३३)

वासनांमुळें चित्ताला चिंता व रजोगुणामुळें पुनरावृत्ति वाट्याला येऊनच्या येऊन अंत्यसमय आला कीं व्याधि, जरा इत्यादिकांच्या यातना सहन कराव्या लागतात. इष्टमित्र, नातीगोती भोवती कितीही असली तरी कोणी कोणाचें दुःख घेऊं शकत नाही व अंतीं बरोबर येत नाही. येथील सर्व येथेंच राहतें व जो तो आपल्या प्रारब्ध यातना भोगून आला तसा एकटाच जातो. **जाणे लागे अंतीं एकले सेवटीं। वेर्थ खटपट सांडूनिया॥ आत्महित गेलें संसाराचे वोढी। अंती कोण सोडी रामेवीण॥** हयातींत नामानें रामाचें पाठबळ मिळविलें नसल्यामुळें अशी दैन्यावस्था प्राप्त होते. यासाठीं गाफील न राहता देवाधिदेव श्रीरामाचा नामघोष करून त्याला आळवा.

★ ★ ★

**हरीनाम नेमस्त पाषाण तारी।**
**बहू तारिले मानवदेहधारी।**
**तया रामनामीं सदा जो विकल्पी।**
**वदेना कदा जीव तो पापरूपी ॥९८॥**

ज्याच्या मुखातून नाम येत नाहीं त्याला मुक्ति तर दूरच पण संसारचक्रांत फिरत राहावें लागून यातना मात्र सोसाव्या लागतात, असें मागील श्लोकांत सांगितलें. पाण्यांत धोंडा बुडावा हा सृष्टीनियम आहे, पण तो जड दहडहि पाण्यावर तरंगावा, असा नामाचा प्रताप आहे. अशा या रामनामाकडे साशंक वृत्तींने पाहून तें न घेणें म्हणजे पदरीं पाप घेऊन पाषाणाहूनहि हीन ठरण्यासारखें आहे, असें या श्लोकांत सांगतात.

सीतामाईच्या शोधांत लंकेस जाण्यासाठीं रामनाम लिहून व त्याचा जयघोष करून वानरांनी समुद्रांत दगड टाकून त्यांचा पूल तयार केला, हें रामायणावरून कळतें. ज्या नामानें जड पाषाण तरले तें नाम मानवाला तारक होणार नाहीं का ? तें नकळत घेतल्यानें अजामेळ व कुंटीण यांचा उद्धार झाला. कळून घेतल्यानें प्रल्हादासाठीं देव अवतरला. असे पुष्कळ भक्त नामसाधनानें तरून गेले. **नामें पाषाण तरले। असंख्यात भक्त उद्धरले। महापापी**



**तेचि जाले। परम पवित्र॥ (दा. ४-३-१८) एकीं पाषाण वाऊनि उतरलीं। समुद्रीं कटकें॥** (ज्ञा. १०-३६) असें ज्ञानोबाहि म्हणतात.

अशा नामाबद्दल जो साशंक राहून तें घेणार नाहीं तो पापीच म्हटला पाहिजे. ईश्वराचें विस्मरण हेंच पाप. नामानें दगड तरले, अनेकांचा उद्धार झाला, असें जाणूनहि ज्याच्या ठिकाणीं भगवत्प्रेम उत्पन्न होत नाही तो केवळ पापीच नव्हे तर प्रत्यक्ष दगड आहे. दगड हा दगड नसून भक्तिविन्मुख मनुष्य हाच मूर्तिमंत दगड होय. **सद्यः प्रत्ययही देखेनि। भक्ति नुपजे ज्याचे मनीं। तोचि पाषाण ये जनीं। नव्हे पाषाण पाषाण॥** पाषाण पाहिजे तसा घडवितां येतो, इतकेचं काय पण मूर्तिरूपानें तो देव झाल्यास मनुष्य तिच्या पायावर नम्र होऊन डोकें ठेवितो. मनुष्य जसा घडला जावा तसा आधीं घडत नाही व घडला गेलात तर तो पूर्व स्थितीला केव्हां येईल याचा नियम नाहीं. **टाकीनें खपली फोडली। परी ती मागुती नाहीं जडली। मनुष्याची कुबुद्धी झाडिली। तरी ती पुन्हा लागे॥** (दा. ८-६-१०) पण असें असलें तरी जेथें धादान्त पाषाण तरले तेथें रामनामानें देहधारी मानवपाषाण तरतील यांत काय संशय ?

हें श्लोकविवरण झालें. पण सामान्य माणसास **हरिनाम नेमस्त पाषाण तारी** असें सांगितलें तरी हें सांगणें नामाच्या गौरवार्थ, स्तुतिपर होय असेंच वाटणें साहजिक आहे. कारण तशी प्रचिति नाहीं. साधारण वाळूचा कण पाण्यांत टाकिला तरी तो बुडतो, असें जेथें अनुभवाला येतें, तेथें नामानें पाषाण तरले असें ग्रंथाधारें जरी सांगितलें तरी मनांत विकल्प येणारच - मग विवेकानें प्रचीति पाहावी असा प्रचीतीचा आग्रह धरणारे समर्थ ''हरीनाम नेमस्त पाषाण तारी'' असें अनुभवाला न उतरणारें विधान कसें करितात, असें वाटणें साहजिक आहे. याचें उत्तर असें आहे कीं संतांना ईश्वराच्या कर्तुमकर्तुम् सामर्थ्याचा पुष्पळ वेळां अनुभव आलेला असतो. म्हणून त्याच्या अघटितघटनापटुत्वावर त्यांचा दृढ विश्वास असतो. समर्थच काय पण ज्ञानोबा तुकोबा काय म्हणतात पहा. **आधणीं घातलिया हरळ। होती अमृताचे तांदुळ। जरी भुकेची राखे वेळ। जगन्नाथु॥** (ज्ञा. १५-२३) एखाद्याची भूक निवारण करावी असें जगन्नाथाच्या मनांत आल्यास आधणांत घातलेले वाळूचे खडेहि अमृतमय तांदूळ होतात. कथा चालली असतां एक मूल मृत झालें. तेव्हा भगवंतांची करूणा भाकून तुकोबा म्हणतात- **अशक्य तें तुम्हां नाहीं नारायण। निर्जीवा चेतना आणावया॥** इत्यर्थ इतकाच कीं ईश्वराच्या शब्दकोषांत अशक्य हा शब्दच नाही. म्हणून कोणताहि विकल्प मनांत न आणतां निःशंकपणें

रामनाम घ्यावें.

★ ★ ★

**जगीं धन्य वाराणशी पुण्यराशी ।**
**तयेमजि जातां गती पूर्वजांसी ।**
**मुखें रामनामावळी नित्यकाळीं ।**
**जिवा हीत सांगे सदा चंद्रामौळी ।।९९।।**

नाममहात्म दर्शविण्यासाठीं मागील श्लोकांत जड पाषाणहि पाण्यांत तरले, असें रामायणांतील उदाहरण देऊन सांगितलें. या श्लोकांत नामाच्या प्रभावामुळें एखादें स्थानहि पावन होऊन पुण्यक्षेत्र कसें बनतें हें वाराणशीचें उदाहरण देऊन सांगतात.

काशीक्षेत्र हें जगामध्यें पावन क्षेत्र समजलें जातें. तेथें जाणारा स्वतः तर पावन होतोच पण पिंडदानादि पुण्य कर्मानें तो आपल्या पूर्वजांसही सद्‌गति प्राप्त करून देतो. श्रीरामनामामध्यें अखंड रंगून गेलेल्या श्रीशंकराचें तेथें वास्तव असल्यामुळें तो नामानें दुमदुमलेला देश आहे. रावणवधानंतर सर्व देवांनी प्रभु रामचंद्राची स्तुति केली. तेव्हां श्रीरामाची स्तुति करतांना शंकर म्हणतात, ''**अहं भवन्नाम गृणन्कृतार्थो। वसामि काश्यामनिशं भवान्या।। मुमूर्षमाणस्य विमुक्तयेऽहं। दिशामि मंत्रं तव राम नाम।।**'' (अ. रा. यु. स. १५-६२) हे रामा, आपल्या नामघोषाने मी कृतार्थ झालों आहे. काशींत भवानीसह मी नित्य राहतो, मरणोन्मुख झालेल्या मनुष्यानें मुक्त व्हावें म्हणून मी तुझ्या नामाचा त्याला नाममंत्र देतों. काशींत मृत्यु आल्यास अंतसमयी शंकर रामनामाची जाणीव देतात व त्यामुळें मुक्ति प्राप्त होते अशा दृढ निष्ठेमुळे काशी हें मुक्तिक्षेत्र समजलें जातें. **नामाचा महिमा जाणे शंकर। जना उपदेशी विश्वेश्वर। वाराणशी मुक्तिक्षेत्र। रामनामें करूनी।।** (दा. ४-३-१५)

पण ही क्षेत्रमुक्ति लाभण्यासाठीं काशीस गेलें पाहिजे व तेथें मरण आलें पाहिजे. हें सर्वांना सहज साध्य नाहीं. श्लोकांतील भावार्थहि तसा नाहीं. जड अशा पाषाण व भूमीलाहि जर रामनामुळें धन्यत्व प्राप्त होतें, श्रीशंकरहि तें नाम स्वतः घेतात व लोकांस सांगतात, तर तें नाम आपलाहि खास उद्धार करील या श्रद्धेनें तें विकल्परहित घेतलें जावें एवढाच या व पूर्व श्लोकाचा भाव आहे.

★ ★ ★



**येथासांग रे कर्म तेंही घडेना ।**
**घडे धर्म तों पुण्य गांठीं पडेना ।**
**दया पाहतां सर्वभूतीं असेना ।**
**फुकाचें मुखीं नाम तेंही वसेना ।।१००।।**

मागील दोन श्लोकांत जड पाषाणहि नामाने पाण्यावर तरले व जड भूमीहि नामानें मुक्तिक्षेत्र बनली असें सांगितलें. इतक्या अट्टाहासानें नामाचें श्रेष्ठत्व आपण कां प्रतिपादन करीत आहों हें या श्लोकांत सांगून नामविना मानव किती निकृष्ट अवस्थेला पोचतो हें सांगतात.

कांहीं पुस्तकांत दुसरें चरण ''घडे कर्म तें पुण्य गांठीं पडेना'' असें आहे. श्री. देवांच्या पुस्तकांत ''घडे धर्म तों पुण्य गांठीं पडेना'' असा पाठ असून ''ते'' चा मागाहून ''तो'' केला आहे, असें ते म्हणतात. ज्या प्रमाणें विधियुक्त कर्म घडावें तसें तें घडत नाहीं, होत नाहीं, आणि जो कांही थोडा धर्म घडतो. त्याचें पुण्य पदरांत पडत नाहीं. कर्म असो कीं धर्म असो, दोन्हीहि अविधिपूर्वक झाल्यास पुण्यसंचय कसा होईल ? कर्म म्हणजे वर्णाश्रमानुसार व समाजाचा एक घटक म्हणून वाट्यास आलेला वैदिक आजार. आणि धर्म म्हणजे स्वउन्नतीसाठीं उचित अशी धारण किंवा दानप्रदान कर्म.

धर्म व कर्म हे दोन शब्द इतके निगडित आहेत कीं एकाची सीमा कोठें संपते व दुसऱ्याची कोठें सुरू होते हें निश्चित सांगता येत नाहीं; इतके ते एकरूप आहेत. म्हणूनच ''आचारप्रभवो धर्मः'' असें म्हटलें जातें. मनुष्याला जीवनांत चिरंतन सुख असावें असें वाटतें. तें सुख धर्मानेंच प्राप्त होतें. ''धर्मात् सुखमवाप्नोति।'' ज्याच्यामुळें सुखाचें धारण, जीवन पोषण होतें तो धर्म. **धारणात् धर्म इत्याहुः धर्मो धारयते प्रजाः।।** या लोकीचें जीवन सुरळीत व सुखाचें होऊन परलोकीं सद्‌गति प्राप्त होते, तो धर्म. धर्मामुळेच उत्तम संतति, अचल संपत्ति व अंतीं सद्‌गति प्राप्त होते, असा वेदाचा निश्चय आहे. सरळ रस्त्यानें चाललें असतां अपाय होत नाहीं किंवा दिव्याचा आधार असला म्हणजे ठेच लागत नाहीं. **तयापरी पार्था। स्वधर्में राहटतां।। सकळकामपूर्णता। सहजें होय ।।** (ज्ञा. २-१८८)

या श्रेष्ठ धारणेसाठींच कांहीं विशिष्ट आचारांचें पालन करावें लागतें, त्याला कर्म म्हणतात. धर्म हा कर्मप्रधान असून सत्कर्मांतून धर्माची घडण होते. वैयक्तिक, सामाजिक, कौटुंबिक, नैतिक, पारमार्थिक इत्यादि सर्व नियमांचा धर्म या शब्दांत अंतर्भाव होतो. म्हणून निधर्मी राज्यानें किंवा

धर्मनिरपेक्षतेनें राष्ट्र, व्यक्ति, कुटूंब, समाज, परमार्थ यांपैकी कशांतहि सुखाचा व्यवहार होणार नाहीं, कारण जेथें धर्म नाहीं तेथें सुख नाहीं.

समर्थांनीं मनाचे श्लोक रचल्यानंतर आजपावेतों तीनशे वर्षांवर काल लोटला आहे. समर्थकालीं थोडाबहुत तरी धर्मकर्माचा व्यवहार चालू होता. स्नानसंध्या, पूजा, नैवेद्य, वैश्वदेव, सचोटीचा व्यवहार इत्यादि कर्मे चालूं होतीं. तीं यथासांग न होणें एवढेंच त्यांत वैगुण्य होतें, असें म्हणतां येईल. पण चालू परिस्थितींत धर्मकर्माचा लोपच होत चालला आहे तेथें यथासांग, पुण्य गांठीं पडेना, इत्यादि शब्द निरुपयोगीच नव्हेत का ? चालू कालीं गीताग्रंथाबद्दल पुष्कळ गौरवपर बोललें जातें पण **यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत्॥** (भ. गी. १८-५) या भगवद्वाणीकडे कोण लक्ष देतो ? आमची आवड व सोय यांत बसेल तें धर्मकर्म, अशी धर्माची हल्लीचीं व्याख्या आहे. नित्य कर्मे तर दूर राहोत पण प्रासंगिक अशा मंगलकार्यात तरी धर्म, कर्म, संस्कृति इत्यादिकांबद्दल जिव्हाळा दिसतो का ? मंगल कार्यांनाहि केवळ उत्सवाचें स्वरूप आलेलें नाही का ? बटूला शिखा ठेवण्याची लाज वाटते. अर्धी चड्डी, शर्ट व कांही ठिकाणीं तर गळ्यांत टाय, अशा थाटांत तो भिक्षेला म्हणजे देणग्या स्वीकारण्यासाठीं खुर्चीवर बसतो. स्वागतार्थ व पानसुपारी देण्यासाठीं उभीं असलेली माणसें बोडकीं. शुभशिर्वाद देण्यासाठीं येणारीं माणसेंहि बोडकी. बोहल्यावर चढणारा नवरदेव सुटांत दिसतो व तोहि बहुतेक काळ्या रंगाचा! सर्वच विपरीत, अशुभ व अमंगल. पण असें असूनहि हें प्रगतीचें लक्षण गणलें जातें हें केवढें आश्चर्य ? पण आश्चर्य तरी कसचें ? हें तामसी बुद्धीचें लक्षण होय, **अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसावृता। सर्वार्थान्विपरीतांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी॥** हा व्यक्तिगत कौटुंबिक आचार झाला. समाजाकडे पाहावें तर परस्पर प्रेम, आपुलकीचा जिव्हाळा कोठेंच नाही.

**दया धर्म का मूल है,** या दृष्टीनें भूतमात्री दया तरी असावी, पण तीहि नसते. कोणाचेंहि दुःख पाहून कळवळा येणें व तें दूर करणें याला दया म्हणतात. सर्व ठायीं दया हें एक दैवी संपत्तीचे लक्षण आहे. **दैवी संपत्तीचें लक्षण। भूतमात्रीं दया पूर्ण॥ लहान थोर हा भेद सोडून। सदा तत्पर असावें॥** (ना. भा. सू. १०३५) पण ही दयाहि आपलें म्हटलें त्याच्या ठिकाणीं येते. सर्वत्र आत्मभावनेनें येत नाही. म्हणून ती दया नसून माया होय. दया नाहीं तर धर्म म्हणून निदान भगवंताचे फुकटचें नाम तरी मुखांतून यावें.



विष्णुसहस्रनामांत भगवंताला धर्म असें नावं आहे. **धर्मो धर्मविदुत्तमः** पण एवढा फुकटचा धर्महि होत नाही. सारांश, उचित धर्म नाही, व भगवन्नामहि नाहीं. मानव म्हणवून घेणाऱ्या जीवाची कोण ही केविलवाणी स्थिति! **कलौ करिताही न करावे स्वकर्म। धरितांहि न धरवे स्वधर्म॥ न कळे कैसें भूतदयावर्म। नामही फुकांचे न ये मुखीं।**

★ ★ ★

**जया नावडे नाम त्या यम जाची।**
**विकल्पें उठें तर्क त्या नर्क ची ची।**
**म्हणोनी अती आदरें नाम घ्यावें।**
**मुखें बोलतां दोष जाती स्वभावें ॥१०१॥**

उचित असें धर्मकर्म नाहीं, सर्वांभूतीं दया नाहीं, आणि देवाचें फुकाचें नामहि मुखांत नाहीं अशी जी परिस्थिति मागील श्लोकांत सांगितली ती ज्याच्या वाट्यास येते त्या मानवाचीं इहपरलोकीं कशी केविलवाणी स्थिति होते तें या श्लोकांत सांगतात.

धर्मकर्म तर यथासांग नाहींच पण निरनिराळे तर्कवितर्क उत्पन्न झाल्यामुळें संशयग्रस्त होऊन ज्याला भगवन्नामही आवडत नाहीं अशा मानवाला या लोकिही सुख होत नाही व मेल्यानंतरही यमयातना सोसाव्या लागतात. म्हणून 'यमजाची' असे म्हणतात. ज्ञानोबाहि आपल्या हरिपाठांत म्हणतात, **''हरींवीण जन्म नर्कची पै जाणा। यमाचा पाहुणा प्राणी होय॥''** (ह. पा. २२) असें जें संत म्हणतात त्याचा विचार पाहू.

सामान्य माणसाला असें वाटतें कीं नरक, यमयातना इत्यादि जें दुःखभोग आहेत ते मरणानंतरच भोगावे लागतात. जिवंत असतांना त्यांचा कांहीं संबंध नाहीं. एकंदर नरक अठ्ठावीस असून यातना भोगांचीं तीं निरनिराळीं स्थानें आहेत, एवढीच सामान्य कल्पना असते. पण केवळ मरणोत्तर भोगाव्या लागणाऱ्या यातनांनाच संत नरक म्हणत नाहींत. तमोगुणाची अतीव वाढ होऊन मोहग्रस्त झालेल्या अंतःकरणाच्या अवस्थेला केवळ नरक नव्हे तर महानरक असें तें म्हणतात. अज्ञानावस्था हाच महानरक. **नरकस्तम उन्नाहो। ऐसा तमाचा उन्नाह उद्रेक। त्या नांव जाण 'महानरक'। परी यमयातना जें दुःख। नरक म्हणों नये॥ काम क्रोध लोभ देख। हेचि तीनही निरयदायक॥ तेथें महामोह आवश्यक। जे होय एक अंधतम॥**

(ना. भा. १९-५३९-५४१)

जो ईश्वरभजनविमुख असतो त्याला आपल्यावर अदृश्य अशा कालरूपी ईश्वराची अबाधित सत्ता आहे याची जाणीव नसते, दिसणारा देह हेंच सारसर्वस्व असें त्याला वाटतें. एकदां देहभरण हेंच ध्येय ठरलें कीं त्या देहाच्या सुखांत इंद्रियांचे भलभलते लाड पुरविण्यांत तो गुंग होतो. कर्माकर्म विचार सुटतो, वासनांवर नियंत्रण न राहिल्यामुळें कामक्रोधादि षड्रिपु बळावतात. शास्त्र किंवा साधुवचनाबद्दल तो संशयग्रस्त होतो व त्यांची निंदा करितो इतकेच काय पण देहाला जन्म, मृत्यु, जरा, व्याधि इत्यादि दुःखातून जावें लागणार आहे, याची पुसट कल्पनाहि त्याच्यापुढें येत नाहीं. **ऐशी जे का देहअहंता। ती नाव परम मूर्खता।।** यमयातना या भोगून संपतात. पण तमोगुणानें मोहांध झालेलें अंतःकरण जीवनांत शांति लाभू देत नाही व जन्ममरणाच्या दुःखचक्रांत पिचत ठेवतें. जनकराजानें ऋषींना विचारलेल्या प्रश्नांत असा एक प्रश्न विचारला कीं, भगवत्भजनाची ज्याला आवड नाहीं, त्याकडे ज्यानें पाठ फिरवली आहे अशा मानवास गति कोणती ? त्यावर चमस ऋषी सांगतात, **जे वासुदेवीं सदा विमुख। ज्यासीं हरिभजनीं नाहीं हरिख। त्यांचीं दशा हे अधोमुख। अतिदुःखें दुःख भोगिती।।** (ना. भा. ५-२९९) तात्पर्य, भगवन्नामावांचून मानवी जीवन म्हणजे नरकच होय.

म्हणून मनांत कोणताहि विकल्प न ठेवता मुखानें नाम घ्यावें. संत, शास्त्रें, पुराणें या सर्वांची या साधनाबद्दल एकवाक्यता आहे हें ध्यानांत घेऊन आदरपूर्वक श्रद्धेनें भगवन्नाम घ्यावें. यामुळें ''गिरिकंदरी जायिजे दूरि दोषें'' हें फल मिळतें असें श्लोक ९२ मध्यें सांगितलें आहे. भजनाशिवाय देहाभिमान सुटत नाहीं. देहाभिमान सुटल्याशिवाय गाढ अज्ञान दूर होत नाहीं. **माझे निज भजनेवीण जाण। देहाभिमान तुटेना।।** (ना. भा. २८-३९३) असें भगवान् स्वतःच सांगतात. स्मरणभक्ति ही अति श्रेष्ठ भक्ति आहे. **स्मरणभक्ति अतिश्रेष्ठ ती नवामाजीं वरिष्ठ। आठालागीं व्यापी गरिष्ठ। भगवत्प्रेष्ठ ती जाणा।।** (द. म. अ. १-२१)

★ ★ ★

**अतीलीनता सर्वभावें स्वभावें।**
**जना सज्जनालागि संतोषवावें।।**
**देहे कारणीं सर्व लावीत जावें।**
**सगूणीं अती आदरेंसी भजावें ।।१०२।।**



श्लोक ८० ते १०० पर्यंत निरनिराळ्या प्रकारें नाममहात्म्य सांगितले. तर्ककुर्तक करून विकल्पानें नाम न घेणाऱ्याची इहपर लोकीं छीथू होऊन अधोगति होते व प्रेमपूर्वक नाम घेणारा निर्दोष व सात्त्विक होतो, असें श्लोक १०१ मध्यें सांगितलें. या व पुढील काही श्लोकांत नामसाधन प्रभावी होण्यासाठी साधकानें कोणती पथ्यें सांभाळावीत हे सांगतात.

अति नम्र राहून लोकांना व विशेषतः सज्जनांना आपल्यापासून सुख होईल, असें मनापासून वागावें. इतकेंच नव्हे तर आपल्यामुळें दुसऱ्याला समाधान व्हावें असा आपला सहज स्वभाव म्हणजे संस्कार असावा. लीनता असली म्हणजे आपल्या ठिकाणीं असलेल्या गुणांचा अथवा ज्ञानाचा अहंकार राहात नाहीं व निरहंकारापणें स्वाभाविक लोकसेवा होते. या निरहंकार लोकसेवेंतून सर्वांकडे आत्मवत् पाहण्याचें मनाला वळण लागतें. **प्रसंग जाणोनि बोलावें। जाणपण कांहींच न घ्यावें। लीनता धरून जावें। जेथतेथें।।** (दा. १५-६-२३) याप्रमाणें सर्व लोकांशी वागावें. पण सज्जनांना संतोष वाटेल असें वागण्याबद्दल विशेष खबरदारी घ्यावी.

सज्जन म्हणजे भगवत्परायण, ज्ञानी संत. अशा संतांना कायावाचामनें झिजून जेवढें समाधान देतां येईल तेवढें द्यावें. त्यांचें मनोगत ओळखून वागावें. कारण त्यांच्या अंतःकरणांत आपल्याबद्दल प्रेम उत्पन्न होण्यांत आपल्या उद्धाराचें बीज असतें. प्रसंगी आपल्या नित्य साधनांत व्यत्यय आला तरी चालेल, पण त्यांचे समाधान राखावें. कारण परमार्थाला आवश्यक अशा कर्म, भक्ति, ज्ञानादि साधनांच्या अभावी केवळ सत्संगानें उद्धार झाल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. भगवंत उद्धवाला म्हणतात **न करितां साधन व्युत्पत्ती। केवळ जाण सत्संगती। मज पावले नेणें किती। तें मी तुजप्रती सांगेन।।** (ना. भा. १२-६३) संत हे सृष्टीमध्यें वावरणाऱ्या भगवंताच्या मूर्ती होत. भगवंताच्या मनांत आल्यास जसें कोणतेंही कार्य घडूं शकतें, तसें, सज्जनांच्या मनांत आलें कीं ते कोणाचाहि उद्धार करूं शकतात. **तयापरी श्रीगुरु। करिती जैं अंगीकारू। तैं होऊनि ठाके संसारु। मोक्षमय आघवा।।** (ज्ञा. १५-२४) यासाठीं सज्जनांलागीं संतोषवावें.

सज्जनसंतोषार्थ मनापासून, नम्रपणें झिजण्यांत नरदेहाची सार्थकता आहे. परसंतोषासाठीं झिजणें म्हणजेच देह कारणीं लावणें होय. स्वार्थासाठी कोणीहि कायावाचामनें, धनें झिजतो हा सहज स्वभाव आहे. पण परसंतोषासाठी झिजण्याची शिकवण द्यावी लागते. **शरीर परोपकारीं लावावें।**

**बहुतांच्या कार्यास यावें। उणें पडों नेदावें। कोणियेकाचें॥** (दा. १२-१०-५) सर्वभूतहितरत असणें हें एक परमार्थाचें साधन आहे. याने सर्वलोकमहेश्वराचें पूजन होऊन तो संतुष्ट होतो. म्हणून देह कारणीं लागतो. **शरीरास बरें केलें। तें आत्मयास पावलें। शरीरयोगें जालें। समाधान॥** (दा. १३-९-३७)

अनेक माणसें जनताजनार्दनाची सेवा या गोंडस नांवाखाली समाजसेवा करितात. पण त्यांत लौकिक, मान्यता, स्वलाभ, परस्परसाहाय्याची अपेक्षता, प्रसिद्धि असे अनेक हेतु असतात. निःस्पृहता आणि भक्ति यांचा अभाव असलेली लोकसेवा पुण्यकारक होईल पण मोक्षदायक होणार नाहीं. या श्लोकांत लीनता, सर्वभावें, स्वभावें हे समर्थांनी योजलेले शब्द फार महत्त्वाचे आहेत. नम्रपणे, मनापासून, आत्मवत् लेखून परसंतोष साधावयाचा असेल तर त्यामागें भक्तीचा जिव्हाळा पाहिजे. देवाचा संबंध लक्षांत घेऊन सेवारूपानें विश्वाशीं झालेली सोयरीक परमार्थाला पोषक होते. म्हणून सगुणीं भजावें.

आपल्या ठिकाणीं असलेल्या हृदयस्थ आत्मारामरूपी रामाचें प्रेमानें भजन करावें. त्या सर्वात्मक चैतन्याचें सगुण, साकार, श्यामसुंदर रामरूपानें स्मरण करावें, डोळ्यानें सगुण मूर्तीचे दर्शन घ्यावें, कानानें गुणानुवाद ऐकावे, मस्तकानें नमन करावें, हातानें पूजन करावें, मनानें ध्यान धरावें, त्याचप्रमाणें पराचे गुणदोष न पाहतां त्याच रामाचें सर्व भूतांच्या ठिकाणीं दर्शन घेण्याचा अभ्यास करावा. एकांतात हृदयस्थ रामाचें स्मरण व लोकांत त्याचेंच लोकमहेश्वरदर्शन असा जोड अभ्यास झाला म्हणजेच नम्रपणानें, मनापासून, आत्मवत्, परसंतोष राखण्याचें मनाला वळण येतें. मूर्तराम विश्वव्यापक होतो. भक्तीनें परब्रह्म नामरूपाला येतें. सगुण ब्रह्म **ध्यानें मन। शीघ्र होई सावधान। मग निरस्तोपाधि कल्पन। स्वात्मध्यान स्फुरतसे॥** (द. म. १-१९) याप्रमाणें **सगुण पाहतां मुळास गेला। सहजचि निर्गुण पावला.... ॥** (दा. १८-८-२३) असें होतें व नरदेहाचें सार्थक होतें.

समाजसेवक व परमार्थसाधक या दोघांनाहि हा श्लोक फार महत्त्वाचा आहे. समाजसेवक हा जनतेंतील जनार्दन मानतो. पण स्वतःत किंवा मंदिरात असलेल्या त्याच देवाचें अस्तित्व विसरतो. भजनशील साधक स्वतःतील किंवा मंदिरांतील देव मानतो, पण त्याच जनतेंतील जनार्दनाला विसरतो. यामुळें एकाचें स्वतःतील आत्मारामाकडे दुर्लक्ष होतें व एकाचें जनताजनार्दनाकडे दुर्लक्ष होतें. अशी दोघांचीही भक्ति एकांगी म्हणून अपूर्णच



राहते. या श्लोकांत सांगितल्याप्रमाणे साधन झाल्यास दोघेहीं परिपूर्ण निःस्पृह भक्त होऊन स्वपर समाधान साधतील.

★ ★ ★

**हरीकीर्तनी प्रीति रामीं धरावी।**
**देहेबुद्धि नीरूपणी वीसरावी।**
**परद्रव्य आणीक कांता परावी।**
**यदर्थी मना सांडि जीवीं करावी ॥१०३॥**

सगुण रूपांचे प्रेमानें भजन करीत अत्यंत नम्र राहून जनसज्जनांचे सर्व प्रकारें समाधान राखावें व देह सार्थकीं लावावा, असें मागील श्लोकांत सांगितलें. हा परसंतोष सहजपणे कसा साधता येतो याचा विचार या श्लोकांत सांगतात.

स्वसंतोष व परसंतोष साधण्याचा उत्तम मार्ग म्हणजे हरिकीर्तन किंवा निरूपण करणें हा होय. यामुळे स्वसंतोष, परसंतोष व भक्ति मार्गाचा प्रसार असा तिहेरी लाभ होतो. **हरिकीर्तनें करावीं। निरूपणें माजवावीं। भक्तीमार्गे लाजवावीं। निंदक दुर्जनें॥** (दा. २-९-१८) कीर्तने म्हणजे भगवंताच्या सगुण रूपाचें गुणवर्णन, **सगुणकथा या नांव किर्तन.** कीर्तनात भगवंताच्या निरनिराळ्या अवतारांची कथा सांगावी. तसेंच त्याचे यश, कीर्ति, प्रताप, महिमा यांचे वर्णन करावें. त्याबरोबरच भक्ति, ज्ञान, वैराग्य, नीति, न्याय या संबंधी बोलावें; मूर्ति असेल तर तेथें कीर्तनच करावें. **सगुणमूर्तीपुढे भावें। करुणाकीर्तन करावें॥** (दा. १४-५-१२) कीर्तन करीत असतां किंवा तें ऐकत असता अनुसंधान ठेवून रामरूपांत प्रेमानें रंगून जाणें हा महत्त्वाचा भाग आहे. वक्ता हा रूपांत रंगून जेव्हां बोलतो आणि श्रोता एकाग्र चित्ताने ऐकतो तेव्हांच कीर्तनांत रंग भरतो. म्हणजे वक्तासमाधान पावतो, श्रोते प्रेमानें डोलूं लागतात व वातावरण आनंदमय होतें. **ध्यानीं गुंतलें मन। कैचें आठवेल जन। निःशंक निर्लज्ज कीर्तन। करितां रंग माजे॥** (दा. १४-५-२७) असें कीर्तन भगवंताला प्रिय असल्यामुळें त्याचें साक्षांत वास्तव्य तेथें असतें. मग आनंदाला काय तोटा ?

**अद्वैत म्हणजे निरूपण।** निरूपणांत निराकार निर्गुण परब्रह्माचें प्रतिपादन करावें. तेंच एक सर्वत्र सर्वाधार आहे, तद्व्यतिरिक्त अन्य काहीं नाहीं असें अद्वैत ज्ञान बोलावें. निरूपणांत वक्त्यानें देहबुद्धि विसरून म्हणजे

ज्ञानाचा अभिमान न धरितां, नम्रपणें सिद्धान्तवाक्यावर बोलावें पूर्व पक्षावर फाल बोलूं नये. कारण कांहीं वेळा श्रोते पूर्वपक्षच खरा मानून विपरीत समजूत बाळगून राहतात. म्हणून निरूपणांत अद्वैत सिद्धान्ताचें स्पष्टीकरण करावें, शुद्धब्रह्मज्ञान बोलावें. जेथें मूर्ति नसून सज्जन विद्वान श्रोते असतील तेथें निरूपण करावें पण सगुण उच्छेदून निर्गुण बोलू नये. याप्रमाणें समर्थांनीं दासबोधांत कीर्तन व निरूपण यांचें स्वरूप स्पष्ट केलें आहे. **सगुणकथा या नांव कीर्तन। अद्वैत म्हणिजे निरूपण। सगुण रक्षून निर्गुण। बोलत जावें।** (दा. ४-२-२३) **मूर्ती नस्तां सगुण। श्रवणीं बैसले साधुजन। तरी अद्वैतनिरूपण। अवश्य करावें॥** (दा. १४-५-१९) याप्रमाणें कधीं कीर्तन व कधीं निरूपण करून सगुण प्रेमांत किंवा निर्गुण बोधांत रंगून जावें. पण एक धोरण असें असावें कीं कीर्तन असो अगर निरूपण असो **वचनें वाउगीं वेदना। वावरें विवरें वसेना। वक्तृत्वें निववी जना। विनित होवोनी॥** (दा. १४-४-२९) वावरें विवरें म्हणजें भलतें सलतें; भलतें सलतें काही न बोलतां अर्थाला धरून गोड व नम्र भाषेनें लोकांना संतोष द्यावा. उत्तरार्धांत पुढें सांगतात कीं,

हे मना, परद्रव्य, परस्त्री यांच्याबद्दल पुसट कल्पनाहि ठेवूं नको बरें. कीर्तन किंवा निरूपण यांच्याशी परस्त्री अथवा परधन यांचा संबंध काय, अशी शंका येईल. तिचें समाधान असें आहे कीं किर्तन किंवा निरूपण यांत रंग भरून आनंदमय वातावरण राहावयाचें झाल्यास वक्ता व श्रोते हे प्रतिपाद्य विषयाशी समरस असावे लागतात. या समरसतेचा भंग करणारीं किंवा तिच्या आड येणारी परस्त्री व धन हीं दोन विघ्नें आहेत. वक्त्याच्या मनांत द्रव्य लोभ असेल तर प्रेमाने कीर्तन होत नाहीं. देवाच्या ऐवजीं श्रोत्यांची स्तुतिस्तोत्रें गाइलीं जातात व धनिकांकडे किंवा कमीजास्त समूहाकडे लक्ष वेधलें जातें. **द्रव्यासाठीं हिंडो नये। किर्तन करीत॥** (दा. १४-१-४५) **मोलें कीर्तन करूं नये। कोठेंतरी॥** (दा. १४-१-५५) द्रव्याच्या अपेक्षेनें कीर्तन करणें हा पोटाचा धंदा होतो. तसेंच स्त्रियांकडे दृष्टि ठेवून शृंगारिक कीर्तन किंवा हावभाव करूं नयेत. त्यांतूनच बुवाबाजी उत्पन्न होते व परमार्थाबद्दल किंवा भक्तीबद्दल लोकांत निष्कारण अनादर उत्पन्न होतो. म्हणून वक्त्यानें या दोन गोष्टींविषयीं कटाक्षानें अलिप्त असावें.

याचप्रमाणें श्रोत्याचेंहि कीर्तनविषयाकडेच लक्ष असावें, बायकांकडे किंवा दुसऱ्याच्या खिशाकडे नसावें. त्यांनीं एकाग्र चित्तानें श्रवणार्थ कीर्तनास जावें. त्यांत श्रवणभक्ति हाच हेतु असावा. नाहींतर असे होतें कीं **विषयी लोक**



**श्रवणीं येती। ते बायकांकडेच पाहती। चोरटे लोक चोरून नेती। पादरक्षा॥** (दा. १८-१०-२६) परधन व परस्त्री यांची कीर्तनाशी या दृष्टीनें संबंध आहे. या दोन गोष्टींमुळें श्रवणभक्ति तर होत नाहीच पण पुन्हा जन्मावें लागतें. **कांचनांचें ध्यान परस्त्री चिंतन। जन्मासी कारण हेची दोन्ही॥** (स्फु. श्लोक) म्हणून बा मना, या दोन गोष्टींचा सदैव त्याग कर.

★ ★ ★

**क्रियेवीण नानापरीं बोलिजेतें।**
**परी चित्त दुश्चीच तें लाजवीतें।**
**मना कल्पना धीट सैराट धावे।**
**तया मानवा देव कैसेनि पावे ॥१०४॥**

परद्रव्य व परनारी यांच्याबद्दल मनांत पुसटहि कल्पना न ठेवता प्रेमानें कीर्तन करावें व निरहंकारपणे निरूपण करावें. अशा कीर्तन निरूपणाच्या योगानें स्वसंतोष राहून परसंतोषहि राखतां येतो, असें मागील श्लोकांत सांगितलें हा स्वपरसंतोष राखण्यासाठी वक्त्यानें केवळ वक्तव्य करून चालत नाहीं, बोलण्यासारखी त्याची क्रिया पाहिजे, असें या श्लोकांत सांगतात.

क्रियेशिवाय वक्तृत्व हें स्वतःच्याहि उपयोगी होत नाही व दुसऱ्यावरहि छाप पाडत नाहीं. उपदेश करणारा हा बोलल्याप्रमाणें स्वतः वागणारा पाहिजे. तसा तो नसेल तर त्याचेंच मन त्याला खातें, यामुळें तो स्वतः असमाधानी राहतो. त्याच्या उपदेशाचा विवेकी मनावरहि परिणाम होत नाहीं. कारण केवळ परोपदेशे पांडित्य लोकांना रुचत नाहीं. **क्रियेवीण शब्दज्ञान। तेंचि श्वानाचें वमन। भले तेथें अवलोकन। कदापि न करिती॥** (दा. १२-१०-३०) बोले तैसा चाले असा वक्ता लोकांना आवडतो.

आता वक्त्याने बोलण्यापूर्वी क्रिया करावी म्हणजे करावें तरी काय असा प्रश्न येतो. याचें उत्तर असें आहे कीं कीर्तनकार हा चरित्र्यसंपन्न पाहिजे. त्याच्या ठिकाणीं इंद्रियनिग्रह पाहिजे. तो भक्ति, ज्ञान, वैराग्यासंबंधी दुसऱ्यास उपदेश करीत असल्यामुळे तो स्वतः भक्त, ज्ञानी, विरक्त पाहिजे. दुसऱ्याला नीतीचे धडे शिकविणारा स्वतः नीतिमान पाहिजे. सदाचार व उत्कट भक्तीनें ईशकृपा झाली म्हणजे वक्त्याच्या वाणींत प्रसाद उत्पन्न होतो आणि ती प्रसादिक वाणी लोकमनांत रुजते. **देवाचेन प्रसन्नपणें। जे. जें घडे बोलणें।**

**तें तें अत्यंत श्लाघ्यवाणें। या नांव प्रासादिक।।** (दा. १४-३-६) म्हणून वक्ता आचारसंपन्न असावा.

हे मना, स्वतः आपली क्रिया कशी होत आहे हें न पाहतां केवळ कल्पनेच्या भराऱ्या मारून बोलत सुटणें हा हीन विवेक होय. **बोलणें एक चालणें एक। त्याचें नाव हीन विवेक। येणें करिता सकळ लोक। हासों लागती।।** (दा. १२-७-३) अशा हीन विवेकाने आत्मज्ञान कसें होईल व देव तरी कसा पावेल ?

तिसऱ्या चरणांत ''कल्पना धीट सैराट धावे'' असे शब्द आहेत. दासबोधांत धीट, पाठ, प्रासादिक असे कवित्वाचे तीन प्रकार सांगितले आहेत. कीर्तनात वक्ता आपल्या मनाला येईल त्याप्रमाणें बोलूं लागला किंवा कवित्व करूं लागला तर त्याला देव कसा पावेल ? धीट कवित्व म्हणजे धिटाईनें मन मानेल तसें केलेलें कवित्व. त्यांत शास्त्रप्रामाण्य नसतें किंवा भक्ति, ज्ञानवैराग्याचा ओलावा नसतो. **धीट म्हणिजे धीटपणें केलें। जें जें आपल्या मनास आलें।।** (दा. १४-३-८) निरनिराळ्या विचारांत किंवा वासनांत गुंतून भरकटलेलें मन देवाच्या ठिकाणीं एकाग्र होत नाहीं. **मन जाले कामाकार। तैसेचि निघति उद्गार। धीटपाठें परपार। पाविजेत नाहीं।।** (दा. १४-३-१२)

★ ★ ★

**विवेकें क्रिया आपुली पालटावी ।**
**अती आदरें शुद्ध क्रीया धरावी ।**
**जनीं बोलण्यासारिखें चाल बापा ।**
**मना कल्पना सोडि संसारतापा ।।१०५।।**

किर्तनकार किंवा निरूपणकार स्वतः काहीं साधन न करितां तत्वज्ञानाचा लोकांना उपदेशच करीत राहिला तर त्यामुळें त्याची त्यालाच मनात लाज वाटूं लागते. तसेंच मन मानेल तसें अशास्त्रीय असें तो बोलत सुटला तर त्यामुळें त्याला ईश्वर प्राप्तीहि होत नाहीं, असें मागील श्लोकांत सांगितले. म्हणूनच उपदेशकाचें बोलणें योग्य म्हणजे शास्त्राला अनुसरून पाहिजे व त्या बोलाप्रमाणें त्याचें स्वतःचें वागणें पाहिजे, असे या श्लोकांत सांगतात.

बोलणे असो कीं चालणें म्हणजे क्रिया असो त्यामागें सुविचार हा असलाच पाहिजे. अविचारानें काहींहि करणें योग्य नव्हे. प्रपंचांतहि जें जें विचारानें केलें जातें तें तें लोकमान्य होतें व त्यामुळें स्वपरसुख लाभतें.



परमार्थात तर विवेक अवश्य पाहिजे. अविविकानें होणाऱ्या परमार्थामुळें धड प्रपंचहि नीट होणार नाहीं व परमार्थहि साधणार नाही. अतो भ्रष्टस्ततोभ्रष्टः अशी स्थिती होईल. यासाठीं **विचारेंवीण बोलों नये। विवंचनेविण चालों नये।।** (दा. २-२-४) हें सुत्र लक्षांत ठेवलें पाहिजे.

विवेक म्हणजे सारासार किंवा नित्यानित्य विचार. प्रथमतः शुद्ध क्रिया कोणती हें विचारानें ठरविलें पाहिजे. नंतर ती स्वतः केली पाहिजे व मग उपदेशिली पाहिजें. शुद्ध क्रिया म्हणजे वर्णाश्रमाला अनुसरून होणारी उचित क्रिया, इहरपलोकीं कल्याण व्हावें म्हणून वेदमाउलीनें सांगितलेली व श्रेष्ठांनी आचारलेली क्रिया ती शुद्ध क्रिया. आपण करूं तोच कायदा, सांगू तोच धर्म करूं तेंच कर्म असें नसावें. आपली क्रिया उचित होत नसेल तर त्याबद्दल विचार करून, धर्मबाह्य क्रियेचा त्याग करून धर्माला मान्य अशा शुद्ध क्रियेचा स्वीकार केला पाहिजे. अशी विचारपूर्वक क्रिया घडली म्हणजे त्यांत शंका राहात नाही, त्यांत प्रेम उत्पन्न होतें व आत्महित साधतें. **विवेकें तुटे अनुदान। विवेकें होय समाधान। विवेकें आत्मनिवेदन। मोक्ष लाभे।।** (दा. ९-९-३९)

याप्रमाणें शुद्ध आचार स्वतः पाळून दुसऱ्यास सांगावा. ज्या क्रियेंत बोलण्याचा आणि चालण्याचा मेळ असतो ती उत्तम क्रिया होय. **बोलाऐसें वर्तों जाणे। उत्तम क्रिया।।** (दा. १९-४-८) श्लोक १०३ पासून कीर्तन किंवा निरूपणाला अनुसरून बोलण्याप्रमाणें क्रिया असावी, असा मनाला उपदेश चालू आहे. म्हणून ओघाला अनुसरून चौथ्या चरणांचा अर्थ लावणें योग्य वाटतें.

कीर्तन-निरूपणादिकांत तत्त्वज्ञान बोलणारे पुष्कळ असतात. तें जीवनांत उतरविण्यासाठीं क्रिया करणारे फार थोडे लोक असतात. अशांनीं आपल्या मनाशीं हितगुज करावें कीं हे मना, तूं नेहमी बोलतोस कीं संसार हा कल्पनामय आहे, स्वप्नवत् आहे म्हणून मिथ्या आहे. त्यांतील सुखदुःखेहि कल्पनोत्पन्न असून मिथ्या आहेत. आतां या बोलण्याप्रमाणें तुला जर अनुभव पाहिजे असेल तर तुला कल्पनातीत होण्याच्या अभ्यासाची क्रिया करावयास नको का ? प्रथम अशुद्ध कल्पना शुद्ध कल्पनेनें नाहीशी केली पाहिजे व शुद्ध कल्पनाहि विरून जाण्यासाठीं स्वरूपानुसंधान पाहिजे. **कल्पनेसी मिथ्यत्व आलें। सहजचि तद्रूप जालें। आत्मनिश्चयें नासिलें। कल्पनेसी।।** (दा. ७-५-४०) या अभ्यासक्रियेशिवाय, संसार मिथ्या आहे असें जें तूं प्रतिपादन करितोस, त्याला

काहीं अर्थ राहणार नाही. बडबडीपेक्षां तुझ्या व दुसऱ्याच्या पदरांत अन्य काहीं पडणार नाही. **बोलोनिया मुखें तैसी क्रिया करी। धन्य तो संसारी ब्रह्मज्ञानी ।। ब्रह्मज्ञानी। भला वर्तुणुकेपासी। कोरड्या शब्दासी कोण पुसे।।**

★ ★ ★

**बरी स्नानसंध्या करी येकनिष्ठा ।**
**विवेकें मना आवरी स्थानभ्रष्टा ।**
**दया सर्वभूतीं जया मानवाला ।**
**सदा प्रेमळू भक्तिभावें निवाला ।।१०६।।**

आपला स्वतःचा आचार शुद्ध कोणता हें विवेकानें ठरवून तो स्वतः पाळावा व मग तो लोकांस सांगावा. त्याचप्रमाणें कीर्तनादिकांत जें तत्त्वज्ञान आपण बोलतो तें स्वरूपानुसंधानाच्या अभ्यासानें प्रथम स्वतः अनुभवावें व मग लोकांस त्याचा उपदेश करावा, असें मागील श्लोकांत मनास सांगितलें. हें स्वरूपानुसंधान सुलभ होण्यासाठीं मनाला आवरून वर्णाश्रमाला अनुसरून संध्यावंदनादि स्वकर्म करावें. असें या श्लोकांत सांगतात.

मन हें अतिचंचल व विषयाकडे धाव घेणारें इंद्रिय आहे. त्याला विचारानें स्वकर्माकडे वळवावें. ईश्वराचा उद्देश लक्षांत घेऊन त्यानें आपल्यासाठीं योजिलेलें कर्म फलाशा सोडून तत्प्रीत्यर्थ केल्यास चित्त शुद्ध होतें व शुद्ध चित्त मूळ स्वरूपांत विरून जातें. **ईश्वरोद्देशें कर्म करितां। चित्ता ये शुद्धता।।** वास्तविक वर्णाश्रमयुक्त अशा कर्मांत रमून राहण्यांत मानवाचें हित आहे. परंतु जें हिताचें तेवढेंच मनाला नको असतें. म्हणून तें निष्काम स्वधर्मकर्म तेवढें टाळतें व अन्य कोणत्या तरी मार्गांत भटकत राहतें. यासाठीं विचारानें मनाला अन्य मार्गापासून परतवून स्वकर्मांत योजिलें पाहिजे.

स्वकर्मांत संध्येला फार महत्त्व आहे. समर्थ म्हणतात, स्नानसंध्या एकनिष्ठा बरी करा. संध्याकर्म हें अत्यंत श्रद्धापूर्वक बरें करावें. बरें म्हणजे असें की आचमन सुरू झालें की प्रापंचिक विषयांतून मन निघून कर्म पूर्ण होईपर्यंत तें भगवन्निष्ठ राहावें. असें झाल्यास अन्य कोणात्याहि साधनमार्गाची आवश्यकता नाहीं, असें हें स्वयंपूर्ण साधन आहे. नाथ म्हणतात, **''विध्युक्त करितां संध्यास्नान। तेथेंचि आहे ब्रह्मज्ञान। आचमनीं होय हरिरूप आपण। हें नेणोनि अज्ञान आगमीं भरती।।''** (ना. भा. ३-८१३) दिवसांचें पाप रात्री राहू नये, रात्रींचें पाप दिवसा राहू नये. असें दुष्कर्मांचा क्षय करणारें हें कर्म



आहे. गायत्री हा मंत्र बुद्धीची तेजस्विता वाढविणारा आहे. एके ठिकाणीं म्हणजे हृदयांत उपासिलेला परमेश्वर जो दशदिशा व्यापून सर्व ठिकाणीं आहे त्यास अभिवादन व्हावें अशी यांत व्यवस्था आहे. संध्या म्हणजे सूर्यरूपानें होणारी ही ब्रह्मोपासना आहे. **तद्ब्रह्म परमं नित्यं। ध्येयं यत् सूर्यमंडले। सवितुःसकलोत्पत्तिः। स्थिति संहारकारणः।।** सूर्य मंडलामध्यें स्थित असलेल्या या नारायणाची गायत्रीमंत्रानें उपासना झाल्यास दुसरें कांही साधन नको.

पण याच एका महत्त्वाच्या साधनाची बहुसंख्य लोकांकडून उपेक्षा व्हावी हें दुर्दैव होय. मनुष्य देवदेव करीत पुष्कळ हिंडतो. पण स्वकर्माकडे दुर्लक्ष करतो. मनुष्यानें स्वकर्म करून क्रमानें मुक्त व्हावें म्हणून भगवंताने वर्णाश्रमधर्मांची व्यवस्था केली. माझें सतत भजन कर, स्मरण ठेव, असा भगवंतांनीं अर्जुनाला गीतेंत उपदेश केला, पण अर्जुनाची इच्छा असतानाहि त्यांनी त्याला क्षत्रियकर्मापासून परावृत्त केलें नाहीं, त्यास प्रवृत्त केलें. ''मामनुस्मर'' पण ''युद्धच'' माझें स्मरण ठेव, पण क्षत्रियांचें युद्धकर्म कर असें सांगितलें. **म्हणौनि ज्ञातिवशे साचारू। सहज असे जो अधिकारू। तो आपुलालिया शास्त्रे गोचरू। आपण कीजे।।** (ज्ञा. १८-८९१) जातीप्रमाणें जो कर्माधिकार स्वाभाविक असेल तो शास्त्रानें समजून घ्यावा व करावा.

पण हा ईश्वरोद्देश लक्षांत न घेतां संध्येचा अधिकार असलेले बहुसंख्य लोक परमार्थासाठीं निरनिराळे मार्ग चोखाळीत असलेले दिसतात. वास्तविक गायत्री मंत्र हा सर्व मंत्रांचा राजा आहे. यांत सर्व मंत्रांचा अंतर्भाव आहे. तो मंत्र प्रथमचा, नंतर अन्य मंत्रास सुरूवात. नाथ म्हणतात, **''गायत्री रिघाल्यावीण कांहीं। इतर मंत्रासी रिगमू नाहीं। मुख्यत्वें गायत्रीच्या ठायीं। ते लागले पाहीं सकळ मंत्र।।** (ना. भा. १३-१०५) **एवं गायत्रीमंत्र ब्रह्मपूर्ण। सकळ सिद्धींचे कारण।।''** (ना. भा. १३-१०८) असें असतांना अशा श्रेष्ठ मंत्राची उपेक्षा करून, तेवढाच टाळून अनेक लोक वेदपठण, स्तोत्रपठण, शास्त्रश्रवण पूजा, नामस्मरण, इत्यादि कर्म अखंड करीत असतात. **पहा नवल वाटतें अपूर्व। सोडूनी मुळींचा उपासनागौरव। आपणां म्हणविती वैष्णव की शांभव। शाक्त सौर का गाणपत्य।।** (स्वा. दि. ६-४-२८) आपल्या जन्मदात्या आईची हेळसांड करून मानलेल्या आईची विचारपूस करून तिचें कोडकौतुक करण्यासारखें हें नव्हे का? नामस्मरणासारखें श्रेष्ठ साधन करणारीं बरींच माणसें चित्ताला समाधान नाहीं अशी जी तक्रार करतात त्याचें महत्त्वाचें कारण गायत्रीमंत्राची उपेक्षा हें एक आहे. मेरुस्वामी आपल्या रामसोहाळ्यांत म्हणतात- **गायत्री मंत्र**

**जप न होतां। अन्य मंत्र जपो जातां। गायत्री त्या मंत्रासी तत्त्वतां। भक्षूनि जाय।।** (रा. सो. ४-८-३९) याचा अर्थ नामस्मरणादि अन्य साधनें करूं नयेत असा नव्हें. तीं अवश्य करावीं. पण गायत्रीचें पाठबळ मिळवून तीं साधनें केल्यास मूळची उपासना न सुटतां स्वकर्म होऊनच्या होऊन अन्य साधनांतहि शुचिता व तेजस्विता निर्माण होते. या भावानें समर्थ म्हणतात- "बरी स्नानसंध्या।"

स्वकर्मानें चित्त शुद्ध झालें म्हणजे हळूहळू द्वैतभावना नष्ट होत जाते आणि **सर्वाभूतांचें हृदय। नाम त्याचें रामराय।।** असा प्रत्यय येऊं लागतो. असा प्रत्यय येऊ लागला म्हणजे सहज भूतमात्रीं दया उत्पन्न होते व साधक द्वंद्वानें युक्त अशा संसारातहि सर्वाघटीं राम आहे या समाधनांत प्रेमानें व्यवहार करतो.

★ ★ ★

**मना कोपआरोपणा ते नसावी ।**
**मना बुद्धि हे साधुसंगी वसावी ।**
**मना नष्ट चांडाळ तो संग त्यागीं ।**
**मना होइरे मोक्षभागीं विभागी ।।१०७।।**

विषयाकडे धावणाऱ्या मनाला विवेकानें आवरून स्नानसंध्यादि स्वकर्मांत त्याला योजावें व भूतमात्रीं दया असावी असें मागील श्लोकांत सांगितलें. मनाला विवेकाबद्दल विशेष आदर उत्पन्न होण्यासाठीं क्रोधादिकांना थारा न देतां सत्संग धरावा असें या श्लोकांत सांगतात. सत्संग हा परमार्थाचा पाया असल्यामुळें त्याचा उपदेश मागें श्लो. ४५ व्यांत व पुढें श्लो. १३५, २०३ व २०४ मध्यें वारंवार केला आहे.

हे मना, तुझ्या ठिकाणीं क्रोधाची उत्पत्ति होऊं देऊं नकोस. क्रोधाचें बीज असतें कामांत, म्हणजे विषयवासनांत. वासनांचे बीजारोपण झालें नाहीं म्हणजे क्रोधाचा उद्भव होण्याचें कारणच नाहीं. विषयवासना उत्पन्न न होण्यास उत्तम उपाय म्हणजे सत्संग, **संतचरणरज लागता सहज। वासनेचें बीज जळुनी जाय।। मग रामनामीं उपजे आवडी। सुख घडोघडीं वाढों लागें।।** असें असल्यामुळे सत्संग ठेवण्याचा बुद्धीचा निश्चय असू दे. तूं म्हणशील कीं जगांत साधुंचें सोंग घेऊन मिरवणारे भोंदूच फार आहेत. अशा परिस्थितींत साधु ओळखावा तरी कसा? अरे, हें अगदी सोपें आहे. भगवंत स्वतःच सांगतात.



**निरपेक्षता आणि माझें मनन। शांति आणि समदर्शन। पांचवें तें निर्वैर जाण। पंचलक्षण हें मुख्यत्वें।।** (ना. भा. १४-१८०) ही पांच लक्षणें जेथें दिसतील तेथें साधुत्व आहे असें समज. पण सत्संग म्हणजे केवळ साधूंचा सहवास नव्हे, हें लक्षांत असूं दे. सहवासाबरोबर साधु सांगतो तसें विश्वासानें वागलें पाहिजे. सहवास व साधुवचनानुसार वागणें याबद्दल दृढ बुद्धी असली म्हणजे संतापाला कारणच उरणार नाहीं, **सुखकारी संग संतसज्जनांचा। संताप मनाचा दुरी थाटे।।**

हे मना, केवळ साधुसंगती धरून चालत नाहीं तर दुष्ट संगति टाळावयाचीच असाहि बुद्धीचा निश्चय पाहिजे. कारण नष्टाची संगत इतकी घातक असते कीं सज्जनाचेंहि त्यामुळें अधःपतन होतें.

**दुर्जन संगती सज्जन ढासळे। क्रोध हा प्रबळे अकस्मात।।** ज्या संगतीपासून साधक कृतनिश्चयापासून ढळतो. तो संग दुष्टच, त्याचा निश्चयपूर्वक त्याग केलाच पाहिजे. दुष्ट किंवा असाधु कोणाला म्हणावें? जो केवळ विषयीं त्याला. **शिस्नोदरार्थ आसक्त। स्वधर्मत्यागें अधर्मरत। ऐसे जे विषयासक्त। ते जाण निश्चित असाधू।।** (ना. भा. २६-४०) ज्या रंगात पाणी मिसळावें त्या रंगाचें तें होतें. तसे पालट होण्याचा हे मना, तुझा स्वभाव आहे. **चांडाळ संगती होईजे चांडाळ। होय पुण्यशील साधुसंगे।।** म्हणून दुष्ट, चांडाळ संगती टाळून साधुसंगती धर. साधुसंगतीनें तू मोक्षाचा अधिकारी होशील. तुझ्या मागच्या जन्ममरणाच्या फेऱ्या चुकतील. कारण, **संसार तारावया जाण। सत्संगतीचि प्रमाण।।** (ना. भा. २६-४३४) जन्माला यावें, कांहीं दिवस जगावें अखेर मरावें, व पुन्हा जन्माला यावें असाच हा संसारसागर नाहीं का? अशा या भयानक सागरांतून पैलपार होण्यास सत्संग हीच एक दृढ नौका आहे. **यापरी संसारी जन। पावता उन्मज्जन निमज्जन। त्यासी तरावया भवाब्धि जाण। साधु सज्जन दृढ नाव।।** (ना. भा. २६-४२१)

★ ★ ★

**मना सर्वदा सज्जनाचेनि योगें ।**
**क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागे ।**
**क्रियेवीण वाचाळता ते निवारी ।**
**तुटे वाद संवाद तो हीतकरी ।।१०८।।**

दुष्ट संग टाळ, सत्संग धर म्हणजे वासनांचा क्षय होऊन तूं मोक्षाचा

अधिकारी होशील, असें मागील श्लोकांत मनाला सांगितलें. या श्लोकांत सत्संगतीनें कोणतें हित साधतें हें सांगतात.

हे मना, सत्संग हा असा आहे कीं त्यायोगानें आपल्या कायिक व मानसिक क्रियेंत सतत पालट होत राहातो, शुद्ध आचार शिकून शरीरानें सदाचार होऊं लागतो व मनांतील विषयवासना कमी होत जाऊन भगवत्प्रेम वाढू लागतें. सामान्य लोक आचरणांत श्रेष्ठांचें अनुकरण करीत असतात. हा त्यांचा सहज स्वभाव आहे. **एथ वडिल जें जें करिती। तया नाम धर्मु ठेविती।। तेंचि येर अनुष्ठिती। सामान्य सकळ।।** (ज्ञा. ३-१५८) सज्जनांचा सहवास असला म्हणजे त्यांचा आचार वरचेवर पाहून तोच करावा असें वाटूं लागतें. यामुळें मलिन आचार सुटून शुद्ध आचार ग्रहण केला जातो. जसा आचारांत पालट होतो, त्याप्रमाणें त्यांच्या सहज बोलण्यांतून निघणाऱ्या हितोपदेशाच्या श्रवणामुळें मनांत पालट होतो. विषयचिंतन करणारें मन भक्तीकडे वळतें.

भावावांचून देव कळत नाहीं. पण हीं भावभक्ति सत्संगाशिवाय कळत नाहीं. श्रद्धाळू मनुष्यानें आपल्या बुद्धीनें कितीहि साधन केलें तरी त्यांत संशय व विघ्नें उत्पन्न होतात. पण सज्जनांच्या मार्गदर्शनामुळें तेंच साधन संशयरहित होऊन त्यांत विघ्नें उत्पन्न होत नाहींत. **करितां साधनें आपमतींसी। तेथें विघ्नें उपजती ऐशीं। तींच साधनें साधुउपदेशीं। सर्वही सिद्धीसी पावती।।** (ना. भा. १२-६१) असा सज्जनांच्या वाणींत प्रभाव असतो. साधुसंगती श्रवणामुळें भक्ति, ज्ञान, वैराग्य, स्वधर्म, साधन इत्यादिसंबंधीं बोध होतो. श्रवणामुळें आचार, विचार यामध्यें योग्य तो पालट होऊन अखेर आत्महित साधतें. **ठाईंचे खळ चांडाळ। तेचि होती पुण्यसिळ। ऐसा गुण तत्काळ। श्रवणाचा।।** (दा. ७-८-३४)

पण हे मना, साधुसंगतीत जें श्रवणानें कळलें किंवा त्यांनी जें सांगितलें तें कृतींत आलें पाहिजे, तसें वर्तन झालें पाहिजे, तें नुसतें बडबडत राहण्यांत कांहीं फायदा नाही. **वर्तल्यावीण बोलावे। ते शब्द मिथ्या।।** (दा. १२-१०-३) जो मनुष्य साधुसंगतींत राहून त्याच्या मुखांतून येणारे बोल ऐकून मुकाट्यानें कृतींत आणतो तोच शहाणा, तोच खरा श्रोता. **तयांचेनि मुखें निघे। तेतुलें आदरें चांगें। ऐकोनिया आंगें। मनें होती।।** (ज्ञा. १३-१०४३) केवळ कळल्यानें कांही फायदा होत नाहीं. कळल्याप्रमाणें वळलें तरच हित होतें. **कळल्यानें काय होतें रे। वर्तणें खस्त पाहिजे।।** खस्त म्हणजे कळल्याप्रमाणें पूर्णत्वानें करणें.



हे मना, आणखी एक गोष्ट लक्षांत ठेव ती ही कीं, साधूशीं संवाद करावा पण वाद घालूं नये. समर्थांनी वाद न करण्याबद्दल मागें पुष्कळ श्लोकांत सांगितलें आहे. ५२ श्लोकांत रामाचा दास वादविवादाच्या भानगडींत पडत नाहीं असें सांगितलें. श्लोक ६१, ६२, ६३ मध्यें मुमुक्षु, साधक व सिद्ध या तिघांनी कधींहि वाद करूं नये असे सांगितलें. या व पुढील चार श्लोकांत वाद करूं नये पण संवाद करावा असें निरनिराळ्या प्रसंगांना अनुसरून सांगतात, तुटे वाद संवाद तो हीतकारी असे शेंवटचे चरण असलेल्या पांच श्लोकांचा हा गट आहे. या श्लोकांत साधूंशीं वाद करूं नये संवाद करावा असें मनाला सांगतात. कांहीं माणसे सत्संग करितात. दिसेल त्या सज्जनाची भेट घ्यावयाची. कांहीं प्रश्न टाकावयाचे व निघून जावयाचें अशी त्यांची खोडच असते, पण हा सत्संग स्वतःच्या कांही शंका फेडून घेऊन साधनांत किंवा विचारांत इष्ट तो पालट करून घ्यावा या हेतूनें नसतो. साधूची जरा परीक्षा पहावी व थोडी गंमत करावी एवढाच त्यांत हेतु असतो. अशा प्रसंगी वाद निर्माण होतो, पण आपल्यास कांही शिकावयाचें आहे असा आदरबुद्धीनें जेव्हां सत्संग होतो, परिप्रश्न होतात, तेव्हां वाद मिटतो व सांगणाऱ्याचे व ऐकणाऱ्याचें दोघांचेहि समाधान होतें. तो संवाद म्हणावा व तोच हिताचा व सुखाचा होतो.

★ ★ ★

**जनीं वादवेवाद सोडूनि द्यावा ।**
**जनीं सूखसंवाद सूखें करावा ।**
**जगीं तोचि तो शोकसंतापहारी ।**
**तुटे वाद संवाद तो हीतकारी ।।१०९।।**

सज्जनसंगतींत आचार व विचार यांत योग्य तो पालट होतो, त्याप्रमाणें मुकाट्यानें वागावें व त्यांच्याशीं वाद न करितां सुखसंवाद करावा, असें मागील श्लोकांत सांगितले. या श्लोकांत इतर सामान्य जनांशीहि वाद न करितां संवाद करावा असें मनाला सांगतात.

सामान्य जनाशींहि वादविवाद करूं नये. वाद म्हणजे स्वमताबद्दल आग्रह त्यांत ''मी म्हणतों तेंच खरें'' असा हट्ट असतो. दुसऱ्याने तेंच मान्य केले पाहिजे असा आग्रह असतो व आपण दुसऱ्याचें कांहीं मान्य करावयाचे नाहीं असा निश्चय असतो. वादाचें मूळ अहंकारांत असतें. मला कळतें तितके

दुसऱ्याला कळत नाहीं, असा अंतस्थ अभिमान असतो. झोपेंतून मनुष्याला जागें करितां येतें, पण झोपेचे सोंग घेणारा जागा होत नाहीं. तसें मनास पटलें तरी मान्य करावयाचें नाहीं हे जेथें ठरलेलें असतें तेथें वाद म्हणजे वितंडवादच होतो. त्यांतून अनर्थच निर्माण होतो. त्याचें वर्णन श्लोक ५२ मध्यें केलें आहे. वितंडवाद टाळावा त्याची कारणें अशीं (१) जेथें प्रत्यक्ष अनुभव नसतो, अज्ञान असतें तेथेंच वाद व झगडा होतो. शेवटी निकाल कांहीं लागत नाहीं. (२) वादविवादांत श्रुति-स्मृति-पुराणादिकांचे प्रामाण्य नसतें. जेथे कांही निकषच नाही तेथें खरें खोटें पारखावयाचें कसे ? **जो जे मतीं सांपडला। तयासी तेंचि थोर॥** असें होतें. प्रत्येक जण आपलेंच खरें धरून बसतो. (३) जेथें धर्माबद्दल अथवा सांगणाऱ्याबद्दल श्रद्धा नसते तेथें वाद करूं नये. त्याचा उपयोग होत नाहीं व वेळ मात्र फुकट जातो. श्रद्धा उत्पन्न होईपर्यंत स्वस्थ रहावें. (४) जर वाद करावयाचाच असेल तर तो आपल्या मनाशीं करावा. आपले गुणदोष लक्षात घेऊन संत व भगवद्वाणीशीं ते सुसंगत आहेत कीं विसंगत आहेत हें पडताळून पहावें व योग्य तो बोध घेण्यासाठी मनाशींच वाद करावा व आपलें आत्महित साधावें. (५) जगांत अनंत वृत्तींचीं अनेक माणसें आहेत. एकच मनुष्य सर्वांचे समाधान राखू शकत नाहीं. साधूचें बोलणें नास्तिकाला पटत नाही. यासाठी सज्जनाच्या संगतींत राहून त्याच्या बोधानें आपलें समाधान झाल्यानंतर इतर मतमतांराबद्दल वादविवाद करण्याचें कारणच नाहीं. शिवाय अनुभविण्याची वस्तु वादविवादानें कळत नाहीं. म्हणून वाद टाळावा.

पण संवाद खुशाल करावा. संवाद हा प्रेमाचा असतो. त्यांत अहंकार असत नाहीं. शेवट समाधानांत होतो म्हणून हा करावा. पण या संबंधींही कांहीं गोष्टी लक्षांत ठेवाव्यात (१) कोणी कांही विचारल्याशिवाय आपणहून कांही सांगत सुटूं नये, त्याची हेटाळणी होते. गरज असेल तेथें विक्री होते, तहान लागलेलाच पाणी मागतो, हें ध्यानांत असावें. (२) आपल्या संबंधी जेथें आदर असेल व आपल्या शब्दावर विश्वास असेल अशा ठिकाणींच संवाद करावा. (३) बोलणें प्रेमाचें असावें, अचूक असावें, तसेंच अनुभवाचें असावें, दुसऱ्याची निंदा किंवा उपरोधिका भाषा नसावी, वरचेवर सांगावें लागलें तरी चिडू नये, समर्थांच्या एकाच ओवींत संवादाचे तात्पर्य सांगतां येईल. **थोडे बोलोनि समाधान करणें। रागेजोन तरी मन धरणें। मनुष्य वेधींच लावणें। कोणी येक॥** (दा. १९-७-४)



अशा संवादाने जगांतील शोक व संताप नाहींसा होतो व आनंद आणि शांति यांचे साम्राज्य नांदते. चालू कालांत लोकांत वितंडवादाचें साम्राज्य सुरू आहे. तें नाहींसे होण्याच्या दृष्टीनें हा श्लोक महत्त्वाचा आहे. विरुद्ध विचाराचीं माणसें एकमेकांस भेटलीं कीं ''याचको याचकं दृष्ट्वा श्वानवत् गुरगुरयाते'' असें दृश्य दिसतें. सर्व पक्ष राष्ट्राचें किंवा समाजाचें भलें करण्यासाठीं निर्माण होतात. पण पाहावें तो सर्वांचीं तोंडें अष्ट दिशेकडे वळलेलीं. जो तो पक्ष आपलेंच खरें म्हणतो. मौजेने एके ठिकाणीं बसून कोणी कोणाचें नीट ऐकून घेण्यासच तयार नाहीं. एके ठिकाणीं आलेच तर झगडा. मतांत भिन्नत्व असलें म्हणून द्वेष व शत्रुत्व कशासाठी ? असे अनेक विषय असूं शकतील कीं ज्यांत मतभिन्नता नाही. त्या संबंधीं सुखसंवाद कां नसावा? याचें कारण पक्षाभिमानाचें पारडें इतर कोणत्याहि हितावह गोष्टीपेक्षां जड हेंच होय.

जेथे द्वेष नसतो, अहंकार नसतो, कळकळ असते, प्रेमानें बोलणें व ऐकणें असतें तेथेंच संवाद होतो व तोच हितकारी होतो व जगाला शांति देतो. असा संवाद एक साधूच जाणतो. **नाना मतीं नाना भेद। भेदें वाढती वेवाद। परी तो ऐक्यतेचा संवाद। साधु जाणती॥** (दा. ८-७-३५)

* * *

**तुटे वाद संवाद त्यातें म्हणावें ।**
**विवेकें अहंभाव यातें जिणावें ।**
**अहंतागुणें वाद नानाविकारी ।**
**तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥११०॥**

लोकांशी वाद न करितां संवादच करावा, संवादानेंच परस्पर समाधान होऊन शांति लाभते, असें मागील श्लोकांत सांगितलें. या श्लोकांत प्रथम चरणांत संवादाचे स्वरूप सांगून तिसऱ्या चरणांत वादाचें मूळ कोठें असतें हें सांगतात व दुसऱ्या चरणांत तें मूळ नाहींसें करावें असें सांगतात.

ज्यापासून वादाचा उलगडा होतो व परस्परांच्या शंका निवारण होतात, त्यालाच संवाद म्हणावें. संवादाचा शेवट परस्पर समजुतींत होतो. त्यांत परस्परांना जिंकण्याची हाव नसते. परस्पर सहिष्णुतेमुळें परस्परांना विषय समजावून देण्याची आस्था असते. उभयपक्षीं अभिमान आहे तोंवर संवाद होत नाहीं, वितंडवादच होतो.

कारण परस्परांमधील अहंकार हेंच खरें वितंडवादाचें मूळ आहे. अहंकारामुळें देहबुद्धि व देहबुद्धीमुळें चुरस, द्वेष व मत्सर इत्यादि विकार उत्पन्न होतात. सहज बोलण्यावरून बोलणें वाढतें व त्याचा शेवट कलहांत होतो.

**अभिमान धरोनि दर्पोक्ति। करितां न साहे कोणाप्रती।। सहज उक्तीवरून उक्ती। वाढतां वाढे कलह।।** (ना. भ. सू. ७२३) अहंकार हें असें वादाचें घातक मूळ आहे.

हा अहंकार बाहेर दिसत नाहीं. धातुगत ज्वराप्रमाणें तो शरीर व्यापून राहतो व त्याला नाचवितो. अहंता म्हणजे देहबुद्धि, आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं असलेलें मूळचें शुद्ध अहं स्फुरण जेव्हां भ्रमानें देहाशीं तादात्म्य पावतें तेव्हां अहंकार दृढ होतो व त्यामुळें आत्मत्वाचें विस्मरण होतें आणि दुस्तर संसार मागें लागतो. जनक बापाचें नातें टाकून दत्तक पुत्र जेव्हां दत्तक घराण्याचा अभिमान धरून त्याचें आडनांव धारण करितो तेव्हां तो मूळ घराण्याला मुकतो व परक्याचा होतो, नसलेल्या आयाबहिणींचें नातें चिकटतें. तसेच येथें होतें. **तेवीं आत्मत्वाचा विसरू। तेणें मी देह हा अहंकारू। तेणें अहंकारें संसारू। अतिदुस्तरू थोरावे।।** (ना. भा. ३-६३) या अभिमानानें सर्वांना पछाडलें आहे. लहान थोर, अज्ञानी, सज्ञानी, श्रीमंत, गरीब कोणीहि त्याच्या तावडींतून सुटत नाहीं. हा देह पडला तरी तो अनेक जन्मांत बरोबर नांदतो व यातना भोगवितो. निरनिराळे विकार धारण करून नाचणारा हा अहंकार, काम, क्रोध, मत्सर, द्वेष इत्यादिकांचें मूळ असून वादविवादप्रसंगीं हा चौफेर उधळतो, यासाठीं ज्यांच्या अंतरींचा अहंकार गेला नाहीं. त्यांनीं वादांत पडूं नये व भल्यांनीं विचारपूर्वक तो सोडावा, त्याला जिंकावें.

पण विवेकानें अहंता जिंकावी असें तोंडानें म्हणणें सोपें आहे. शरीरव्यापी हें धेंड दूर करणें हें काम फार कठीण आहे. देहबुद्धीकडे धावणारा हा अहंकार परतवून मूळच्या आत्मस्वरूपांत नाहींसा करणें हा श्रेष्ठ पुरुषार्थ आहे. हा पुरुषार्थ दोन गोष्टींनींच साधतां येतो.

एक सत्संग तरी पाहिजे किंवा ईश्वरी कृपा तरी पाहिजे. सत्संगानें विवेक उत्पन्न होऊन जाचक अहंकार दूर होतो. **तो दुर्धर देहाभिमान। ज्ञातेपणीं अतिदारुण। याचें समूळ निर्दळण। सत्संग जाण स्वयें करी।** (ना. भा. २८-६३८) सत्संगावाचून किंवा ईश्वरसाहाय्य असल्यावाचून ही गोष्ट घडत नाहीं. सर्व देहांचा नियंता एक ईश्वरच आहे, असा नीट विचार करून मूळचा



त्याचाच अहंकार त्याच्या चरणीं समर्पण केला तरच तो जिंकला जातो, नाहीं तर बोकांडी बसतो. **सकळ देहांचा नियंता। तोचि जाणावा तत्त्वतां। त्याचें स्मरणीं निश्चलता। पावोनी सुखीं असावें।। तरीच अभिमान तुटेल। नाहींतरी बोकांडी बसेल। धिंडवडे करोनी वाढेल। ऐसा जाणा निश्चय।।** (ना. भ. सू. ७३४,३५) परमेश्वरचरणीं देह समर्पण झाला म्हणजे देहांतील अहंकाराचें त्याच्या ठिकाणीं सहजच समर्पण होतें. यासाठीं त्या हृदयस्थ परमात्म्याचें सतत ध्यान व भजन पाहिजे.

त्यामुळें देहअहंकाराचें प्राबल्य हळूहळू कमी होत जाऊन तो ईशस्वरूपांत समूळ नाहींसा होतो. भजनध्यानामुळें ईशकृपा होते व त्या कृपेमुळें वैराग्य, ज्ञान, व सर्वांभूतीं भगवद्भाव हे उत्पन्न होतात. भगवंत म्हणतात- **ज्या ज्ञानाभेणें जाण। धाकेंचि पळे अभिमान। तें मी आपुलें त्यांसी दें ज्ञान। जें हृदयस्थाचें भजन करिती सदा।।** (ना. भा. १३-५४१) अभिमान प्रत्यक्ष दिसला तर त्याला धक्के मारून बाहेर घालवितां येईल. पण तो दिसत नाहीं; इतकेंच नव्हे तर तो अतर्क्य असून केवळ शब्दज्ञानानें जात नाहीं यासाठी ईश्वर साहाय्यच लागतें. ध्यान भजनाने तें प्राप्त झालें म्हणजे अभेदभाव उत्पन्न होतो. अभेदभक्तीमुळें जेथें नेहमीं प्रेमाचाच सुकाळ तेथें कोण कोणाशीं वितंडवाद करेल ? **भगवद्भाव सर्वांभूतीं। या नांव गा 'अभेदभक्ती'। हे आकळल्या भजन स्थिति। अहंकृती उरेना।।** (ना. भा. २८-३९५) याप्रमाणें अहंकाराचा लोप होऊन जेथें चित्तांत अभेदभाव असतो तेथेंच वाद तुटतो व संवाद होतो. कारण तेथें अहंकाराची जागा प्रेमानें व्यापलेली असते. (पुढील १६० श्लोक पाहा).

★ ★ ★

**हिताकारणें बोलणें सत्य आहे ।**
**हिताकारणें सर्व शोधूनि पाहे ।**
**हिताकारणें बंड पाखांड वारी ।**
**तुटे वाद संवाद तो हीतकारी ।।१११।।**

मागील श्लोकांत मनाला सारखा उपदेश झाल्यामुळें त्यानें कंटाळू नये म्हणून थोडें थांबून त्याला गोंजारून या श्लोकांत त्यांचें समाधान करितात. अल्लड मुलाला सारखा उपदेश मानवत नाही. थोडे थांबून त्याच्या पाठीवर हात फिरवून त्याची समजूत करावी लागते. तसाच या श्लोकांतील प्रकार आहे.

हे मना, तुझें कल्याण व्हावें म्हणून तुला या खऱ्या गोष्टी सांगाव्या लागत आहेत. तुझें हित कशांत आहे हें आम्ही श्लोक २२, २३ मध्यें विस्तारपूर्वक सांगितलें. हानि कशांत आहे हें आम्ही श्लोक ४६, ६० मध्यें सांगितलें. विश्रांतीचें व आनंदाचें स्थान कोठें आहे हें श्लोक ८६ मध्यें सांगितलें. आम्ही जें तुला सांगितले तेंहि शास्त्राला अनुसरून, परिणामीं उपकारक, जें सत्य तेंच गोड शब्दांत सांगितलें. हें आमचें सागणें तुला कांहीं वेळा अप्रिय जरी वाटलें तरी त्यांत तुझें कल्याण आहे. म्हणून न कंटाळता तें तूं ऐकून घ्यावेंस.

आम्ही सांगतों तें सर्व तूं मुकाट्यानें खरें मानावेंस असा आमचा तुला आग्रह नाहीं. तूं स्वतः खऱ्याखोट्या, शाश्वतअशाश्वत गोष्टींचा नीट विचार करून तुझें हित कशांत आहे तें पाहा. नीट विचार करितांना तुला स्वतःचे हित व्हावें असे वाटत असेल तर एक गोष्ट मात्र ध्यानांत ठेव ती ही -

अशास्त्रीय, नास्तिक विचारांचा अंगीकर करून उगीच कांहीं तरी बडबडून आग पाखडीत राहूं नकोस. कारण पाखांड मताचें सर्व बोलणें विपरीत असतें. **जें जनावेगळें केलें। ते वेदें अव्हेरिलें। म्हणोनि नाम तयासि ठेविलें। पाषांडमत॥** (दा. ५-१-१७) जनमताविरूद्ध तें बंडच. आपणास वाटतें तेंच खरें मानून कोणीं वागूं नये म्हणून तर सज्जन लोक वेद प्रमाण मानतात. पण नास्तिकाला प्रमाण असें काहींच नसतें. **देह तोचि देव। भोजन ते भक्ति॥ मरण ते मुक्ति। पाखांड्याची॥** वेद, शास्त्रें, पुराणें, सत्संग इत्यादि त्यांना विषासमान वाटतात. बा मना, तुला स्वतःचे कल्याण व्हावें असें वाटत असेल तर अशा नास्तिक तर्ककुतर्कांच्या नादीं न लागता ज्या शास्त्रविचारानें वाद मिटून संशयनिवृत्ति होते असा संवादच कर. त्यांतूनच तुझें हित आहे. सर्व संतांचें सांगणेंहि असेंच आहे. **हित आहे देहातीत। म्हणौनि निरोपिती संत॥ देहबुद्धीनें अनहित। होंचि लागे॥** (दा. ७-२-३७) पाखांड विचारानें देह-बुद्धी दृढ होते, वाद वाढतो. म्हणून तो टाळ, हितकारी संवाद कर.

★ ★ ★

**जनीं सागतां ऐकतां जन्म गेला ।**
**परी वादवेवाद तैसाचि ठेला ।**
**उठे संशयो वाद हा दंभधारी ।**
**तुटें वाद संवाद तो हीतकारी ।।११२॥**



पाषांड मताच्या नादीं न लागतां तुझा तूंच विचार करून आपलें हित कशांत आहे याचा निश्चय कर, असें मागील श्लोकांत मनास सांगितलें. असें न करतां केवळ वादविवाद करीत अगर ऐकत राहशील तर कांहीं हित तर होणार नाहींच, पण वादहि कधीं न संपतां संशय संपणार नाहीं, हें या श्लोकांत सांगतात.

जगाच्या आरंभापासून आतापर्यंत सांगणारे व त्याहून ऐकणारे पुष्कळ लोक होऊन गेले. सांगणाऱ्यांचे तोंड दुखूं लागलें व ऐकणाऱ्यांचे कान किटले पण वितंडवाद जशाचा तसा चालूच आहे. तो मिटला नाहीं. शिल्लकच आहे. **वक्त्यांच्या मुखा पार पडिले। श्रोत्यांचें श्रवण घस्टोनि गेले॥ एवं उभयतां वय वेचिलें। अर्थजात गेले वाहतचि॥** कारण अष्टधा प्रकृति ती विविध स्वरूपाची व विकारी असल्यामुळे तिच्यापासून उत्पन्न झालेली मानव शरीरें आपापल्या प्रकृतिस्वभावानुसार वागूं लागतात व अनेक प्रकारचीं मतें निर्माण होतात. **नाना मतें निर्माण जालीं। नाना पाषांडें वाढलीं। नाना प्रकारींचीं उठिलीं। नाना बंडें॥** (दा. ११-२-१६) अशा स्थितींत कोण खरा, कोण खोटा हें ठरवावयाचें कसें ?

एखादी साधी घटना घडली तरी त्यासंबंधी अनेक मतें निर्माण होऊन वाद होतो. एकाच्या पायाला विंचू चावला तर प्रारब्धवादी म्हणतो कसेंहि जा, तो चावणारच, प्रारब्ध टळत नाहीं. पापपुण्यवादी म्हणतो शंभर अपराध झाले म्हणून चावला. प्रयत्नवादी म्हणतो-नीट पाहून पाऊल न टाकल्याचा हा परिणाम. स्वभाववादी म्हणतो-विंचू व पायाचा संबंध आला कीं तो चावणारच. कोणी एखादा म्हणतो-विंचू सापडला तर मारा, नाहीं तर रडत रहा. वाद करून काय मिळणार ?

केवळ सामान्य माणसांत अशी मतभिन्नता नसून श्रेष्ठ अशा वेदशास्त्रांतहि आहे. पतंजली म्हणतो चित्त निरोध करून जीवब्रह्मैक्य साधावें. कपिल सांख्य म्हणतो-प्रकृति-पुरूष विचार समजला कीं संपलें. मीमांसक-जैमिनी कर्म हेंच ब्रह्म म्हणतो. नैय्यायिक गौतम सर्व ईश्वराधीन आहे, असें म्हणतो- तर चार्वाक पुनर्जन्मच नाहीं म्हणतो. वेदांती म्हणतो- सर्वं खल्विदं ब्रह्म तर अजातवादी म्हणते- **अगा जें झालेचि नाहीं त्याचि वार्ता पुससी कायी॥** सर्व वाद प्रकृतीच्या प्रांतांत आहेत आणि परमात्म वस्तु किंवा अच्युतपद हें प्रकृतीच्या पलीकडे आहे. त्या परमात्म वस्तूला अनुलक्षून जोंपर्यंत वाद होत नाहीं, तोपर्यंत संशय निर्माण होत राहणारच.

कारण अधिष्ठानाला विसरून किंवा बाजूला ठेवून म्हणजे ध्येयाकडे दुर्लक्ष करून झालेल्या वादापासून पदरांत कांही न पडता संशयच निर्माण होतात. एक झाड आहे. त्याला पुष्कळ फांद्या आहेत. त्या झाडापलीकडे शुद्ध प्रतिपदेची सूक्ष्म चंद्रकोर आहे. ती पाहण्याची झाल्यास आपण स्वतः कोणत्या बाजूस आहो. आपलें मुख कोणत्या दिशेकडे आहे हें लक्षांत घेऊन, दिसेल त्या फांदीवरून चंद्रकोर पाहिली पाहिजे. पण असें न करितां अमुक फांदीवरून चंद्र दिसेल, अमक्यावरून दिसणार नाहीं, ती फांदी वाकडी, ती सरळ असें तर्क काढून फांद्यांबद्दलच वाद घालीत सुटलें तर चंद्र तर बाजूलाच राहील, कोणत्या फांदीवरून तो दिसतो याचा निश्चय होणार नाही, आणि अनुभवाशिवाय वाद घेतल्यानें दांभिकपणा पदरीं येईल. अनेक साधनांतून आपणांस इष्ट अशा कोणत्याहि साधनाचा अनुभव न घेतां त्याबद्दल तर्ककुतर्क काढून वाद घेणें हा दंभधारी वादच होय.

मतभिन्नता असली तरी वेदशास्त्रांचा सिद्धांत एकच आहे. आपापल्या स्वभावानुसार, अधिकारानुसार ज्यानें त्यानें आपल्यास रुचेल व पचेल असा मार्ग पत्करून एकच ध्येय गांठावें यासाठीं त्यांनीं निरनिराळे मार्ग दाखविले आहेत. मुंबईस पोचण्यासाठीं चहू बाजूंनी मार्ग आहेत. ज्यानें त्यानें आपल्या सोईप्रमाणे मार्ग पत्करून मुबई गांठावी; तसेंच येथें आहे. ज्ञानोबा म्हणतात, ''**जरी वेदे बहुत बोलिलें। विविध भेद सुचिलें। तरी आपण हित आपुलें। तेंचि घेपे।। जैसा प्रकटलिया गभस्ती। अशेषहि मार्ग दिसती। तरी तेतुलेहि काय चालिजतीं। सांगे मज।।**'' (ज्ञा. २-२६०,६१) शस्त्र कसें वागवावें व वापरावें हें कळण्यासाठी गुरु लागतो. त्याप्रमाणें शास्त्र कसें लावावे व आचरावे हें कळण्यासाठी सत्संग लागतो. त्यामुळें संशयनिवृत्ति होऊन वाद मिटतो व स्वहित साधतें.

★ ★ ★

**जनीं हीत पंडीत सांडीत गेले ।**
**अहंतागुणें ब्रह्मराक्षस जाले ।**
**तयाहूनि व्युत्पन्न तो कोण आहे ।**
**मना सर्व जाणीव सांडूनि राहें ।।११३।।**

आजपर्यंत अनेकांनी उपदेश केला व अनेकांनी तो ऐकला, परंतु वाद मिटले नाहीत, ते अद्याप तसेच चालू आहेत, असें मागील श्लोकांत



सांगितलें. या वितंडवादांना थारा कां मिळतो याचें उत्तर या श्लोकांत देतात.

बोध पुष्कळांनीं केला, पण त्यांतील पुष्कळ शहाण्या विद्वान् लोकांनीं बोधाप्रमाणें स्वतःला अनुभव आहे किंवा नाहीं व तसें आपलें वर्तन आहे कीं नाहीं हें पाहण्याकडे दुर्लक्ष केलें. जो तो आपल्या विद्वत्तेंत व मोठेपणांत गर्क होऊन राहिला. शब्दपांडित्यानें दुसऱ्यावर आपल्या विद्वत्तेची छाप बसून आपणांस मोठेपणा मिळावा यासाठींच ज्यानें त्यानें धडपड केली. येथें पंडित हा शब्द शब्दपंडित या अर्थानें योजिलेला आहे, ज्ञानी, समदर्शी व अनुभवी असा जो, तो पंडित, असा पंडित या शब्दाचा खरा अर्थ आहे. **ज्ञानाग्नीने संचितें जाळी। आणि अकर्तात्मपणें क्रियामाण काळीं। अहंकर्तृत्वाच्या विटाळीं। ओवळें न करी चित्तासी।।** (य. दी. ४-४७६) अशा पंडिताच्या चित्तांत अंहकाराचा लेशहि नसतो. **ऐसे समदर्शी ज्ञानवंत। तेचि म्हणावे पंडित।।** (य. दी. ५-६२२)

शब्दपंडित हा आपणच आपला मोठेपणा मिरवून अभिमानांत चूर असतो. आपल्याच चांगुलपणाचा उदोउदो करीत जयपत्रें घेत हिंडतो. नम्रता ही त्याला ठाऊक नसते व मानाची हौस भारी असते. शास्त्रज्ञानाचा बडिवार वाहणाऱ्या अशा या शब्दपंडिताच्या ठिकाणीं सामर्थ्य व अहंकार एकवटले म्हणजे दर्प उसळतो. **शाब्दिक बोले उदंड वाचा। लेश नाहीं वैराग्याचा। अनुताप धारिष्ट साधनाचा। मार्ग न धरी।।** (दा. ५-३-८६) सारांश, स्वतःचे आत्मकल्याण न साधतां देहाची प्रतिष्ठा वाढावी या तीव्र वासनेंतच या शब्दपंडितांचा जन्म गेला. याचा परिणाम असा झाला कीं विद्याभ्यासानें समाधान न होतां ज्यांचा अभिमान झडला नाहीं आणि वाद घालण्याची हाव अपूर्ण राहिली ते मरणानंतर ब्रह्मराक्षस योनींत पिचत पडले. वाचकांना येथे वामन पंडितांची गोष्ट आठवेल. अहंकारानें पछाडल्यामुळें ज्यांना स्वतःच्या ठिकाणींच अनुभवाचें समाधान नाहीं ते ऐकणाराचें समाधान कसें करू शकणार? म्हणून वाद तसेच चालू आहेत.

नीट विचार केल्यास हे मना, आपण विद्वत्तेचा, मोठेपणाचा किंवा स्वतःच्या सामर्थ्याचा अहंकार तो काय वहावा ? तयाहूनि म्हणजे त्या ईश्वरापेक्षा जास्त शास्त्रज्ञानयुक्त बुद्धीनें श्रेष्ठ किंवा सामर्थ्यसंपन्न दुसरा कोण आहे? अल्पज्ञान, अल्पसामर्थ्य, चिंतामय क्षणभंगुर जीवन यांचा नित्य अनुभव असतांना मनुष्यानें गर्व कशासाठी वहावा? **कुश्चीळ आणि क्षणभंगुर। अखंड वेथा चिंतातुर। लोक लगेच म्हणती थोर। वेडपणें।।** (दा. १५-८-३७) वास्तविक

परमात्म्यापासून पृथक असें कोणी राहू शकत नाहीं, इतकेंच काय पण बलिष्टाचें बल, तेजस्वियांची तेजस्विता, बुद्धिवानांची बुद्धिमता हे सर्व त्या परमात्म्याचेच. **बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनं। बुद्धिर्बद्धिमतामस्मि तेज स्तेजस्विनामहं।।** (भ. गी. ७-१०) **बलं बलवतां चाहं** अशी वस्तुस्थिति असल्यामुळें हे मना, मी मोठा, माझेंच तेवढें खरें असा अभिमान न धरिता सर्व त्या ईश्वराचेंच या निश्चयांत राहा.

★ ★ ★

**फुकाचें मुखीं बोलतां काय वेचे ।**
**दिसेंदीस अभ्यंतरी गर्व सांचें ।**
**क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे ।**
**विचारें तुझा तूंचि शोधून पाहे ।।११४।।**

मोठमोठे पंडित अभिमानाला बळी पडून ब्रह्मराक्षस होऊन बसले. म्हणून हे मना, सर्वांत पंडित कोण असेल तर तो एक आत्मारामच होय, असा निश्चय करून देहाभिमान सोडून राहा, असा मागील श्लोकांत मनास उपदेश केला. पण सर्वांत ज्ञानघन आत्मारामच मोठा, आपण केवळ यःकश्चित् मानव आहों, असें केवळ तोंडानें म्हणून चालत नाहीं. अभिमान नष्ट होण्यासाठीं प्रत्यक्ष खटपट पाहिजे, असें या श्लोकांत सांगतात.

केवळ बडबड करण्यांत पदरचें कांहीं खर्च होत नाहीं व काही करावेंहि लागत नाहीं. त्यामुळें ईश्वर सर्वज्ञ व सर्वश्रेष्ठ असून मानवानें मीपणाची जाणीवहि ठेवूं नये, असें तत्त्वज्ञान पुष्कळ बोललें जातें. पण असें बोलत असतांनाच अंतःकरणात दिवसेंदिवस आपल्या मोठेपणाबद्दल गर्व बळावत चाललेला असतो. मन हे मोठें विचित्र अंतर इंद्रिय आहे. तें दाखवितें एक व करतें भलतेंच. तें कानाला तत्त्वज्ञान ऐकावयास लावतें व देहाला ध्यानाला बसवितें, पण राहतें मुलखांत हिंडत, मुखाकडून अभिमान सोडावा असें बोलवितें पण आपण अभिमानाला चिकटून गर्वानें फुगून राहतें.

सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं नुसतें बोलणें व्यर्थ होय. बोलण्यामागें क्रियेचें पाठबळ असेल तरच हित होतें. पण काय करावें याचा जोपर्यंत निश्चच होत नाही तोपर्यंत कार्यहि घडत नाहीं. कार्याचा निश्चय होण्यासाठी मन एकवटावें लागतें. तें द्विधा म्हणजे अनिश्चित राहून चालत नाहीं. निश्चयासाठी बुद्धीशी तें एकरूप व्हावें लागतें. यासाठीं एकच उपाय आहे.



तो म्हणजे मनाला विवेक करण्याची संवय लावणें. विवेक हें अतिश्रेष्ठ साधन आहे. **अविचार हाचि बंध। तेणेंचि होतोसि बद्ध।। म्हणूनी सांडी अविवेक। होई विचारधारक।।** (उ. मा.) विवेकानें साधनाचा निश्चय होतो व निश्चय झाला म्हणजे कोणतेंहि कार्य घडतें. मन हें इंद्रिय असें आहे कीं तें दिसत नाहीं. म्हणून त्याला पकडून कांहीं शिक्षा करितां येत नाही. त्याला विवेकाच्या खुंट्यास मात्र बांधून ठेवितां येतें. तसें बांधलें म्हणजे तें कोठेंहि फिरलें तरी विवेकाच्या भोंवतीच फिरतें. **मन दिसतें मा धरावें। ज्याचें त्यानें आवरावें। आवरून विवेकें धरावें। अर्थांतरीं।** (दा. १८-१०-१७) म्हणून शेवटच्या चरणांत मनाला म्हणतात :-

हे मना, मी म्हणतों त्याप्रमाणें तूं कांहीं कृति न करितां तोंडाने मात्र बडबडतोस आणि गर्वानें फुगून जातोस. हें खरें कीं खोटें याचा तूंच नीट विचार करून पाहा म्हणजे तुझें तुलाच कळेल कीं, तूं लोकांना ज्या तत्त्वज्ञानाच्या गोष्टी सांगतोस त्याप्रमाणें तुझी स्वतःचीच कृति नसते आणि कृति नाहीं तोंपर्यंत बोलणें व्यर्थ होय, म्हणून विचारानें काय करावयाचें याचा निश्चय करून कार्य कर. **विचारें निश्चळ जाली बुद्धि। बुद्धिपाशीं कार्य सिद्धि। पाहातां वडिलांची बुद्धि। निश्चळीं गेली।।** (दा. १५-१०-२९) ज्या आत्मसत्तेवर तूं नाचतोस तिकडे लक्ष देऊन त्या आत्मस्वरूपी रंगून जा म्हणजे मी मोठा हा गर्व राहणार नाहीं.

★ ★ ★

**तुटे वाद संवाद तेथें करावा ।**
**विवेकें अहंभाव हा पालटावा ।।**
**जनीं बोलण्यासारखें आचरावें।**
**क्रियापालटें भक्तिपंथेंचि जावें।।११५।।**

कांहीं क्रिया न करितां केवळ बडबडत राहण्यानें मीपणाचा ताठा तेवढा उत्पन्न होतो, हें खरें कीं खोटें याचा तूंच विचार कर, असें मागील श्लोकांत मनाला सांगितलें. या श्लोकांत मागील सात श्लोकांत सांगितलेल्या विचारांचा समारोप करून तात्पर्य सांगतात.

जेथें वाद न होता शेवट समाधानांत होईल तेथेंच संवाद करावा. जेव्हां दोन्हीहि बाजू दुराग्रह सोडून शांतपणे खऱ्याखोट्याचा निकाल लावण्याच्या सद्हेतूनें एकत्र येतात, तेव्हां वादाचा निकाल होतो व तोच संवाद

म्हणावा. पण शेवट वितंडवादांत होईल कीं संवादात होईल हें आधीं कसें ठरावें? त्यासाठीं पूर्वसूचक एक उपाय आहे. तो हा कीं वाद घालणारा अहंमन्य व दुराग्रही कितपत आहे हें प्रथम थोड्या बोलण्यावरून जाणून घ्यावें. त्याच्या ठिकाणीं अहंकार असेल तर वाद करूंच नये. कारण कोणताहि पक्ष अभिमानानें पेटला कीं वादाचा शेवट लागत नाहीं. दुराग्रह सुटल्यास संवाद होतो. **परी ऐसें न घडे कांहीं। वादासी अहंकार मूळ पाही। जाणोनि नेणपण घेतां तिहीं। वाद लागे बळावूं॥** (ना. भ. सू. ८८७) अशा वेळीं ''तुमचेंच बरोबर'' असें म्हणून मोकळें व्हावें. पण याच वेळीं आपल्या डोक्यावरहि अहंकाराचें ओझें कितपत आहे हें पाहिलें पाहिजे.

आपल्या ठिकाणीं अहंकार असल्यास तोही श्लोक ११३ मध्यें सांगितल्याप्रमाणें विचारपूर्वक सोडून दिला पाहिजे. याप्रमाणें दोन्हीहि बाजू अहंकाररहित, विचारी, शांत असल्या म्हणजे वाद तुटतो व संवाद होतो. **दोघेही शांतपणें। विचार करूं लागतील मनें। तरी संतोषासी काय उणें। दुराग्रह सांडिलिया॥** (ना. भ. सू. ८८६)

याचबरोबर आणखीहि एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे, ती ही कीं आपण जसें बोलतों तसें आपलें आचरण पाहिजे. वाद असो कीं सामान्यजनांस उपदेश असो, जो बोलण्याप्रमाणे वागतो त्याच्या शब्दालाच महत्त्व येतें व त्याचाच शब्द मानला जातो. **जैसें मुखें ज्ञान बोले। तैसीच सर्वे क्रिया चाले। दीक्षा देखोनी चक्कित जाले। शुचिस्मंत॥** (दा. १२-४-१३) न बोललें तरीहि केवळ सदाचार व चारित्र्यसंपन्नता यामुळें लोकांत आदर उत्पन्न होतो व आत्महित साधतें. यासाठीं आपण आडमार्गावर असलों तर तो सोडून सन्मार्ग धरावा. याप्रमाणें आपल्या आचरणांत योग्य तो फरक करून भक्तिमार्गानेंच जावें.

श्लोक २ मध्यें जसें ''मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें'' असें सांगितलें त्याप्रमाणें चकार घालून ''क्रियापालटें भक्तिपंथेंचि जावे'' असें येथें सांगतात. आचार-संपन्न होऊन शुद्ध अंतःकरणानें त्या भगवंताचें स्मरण करावें एवढेंच काम. असा हा सुलभ मार्ग आहे. या मार्गात यातायात नाही, बाह्य सामुग्रीची आवश्यकता नाहीं, कोठें दूर जावें लागत नाहीं. **ठायींच बैसोनी रहावें। मन एकाग्र करावें। भगवंताचें स्मरण ठेवावें। सर्व काळीं मानसीं॥** (ना. भ. सू. ६३९) भक्ति ही सोपी आहे कीं नाहीं हें कोणाला विचारण्याचें कारण नाही. कोणतेंहि प्रमाण शोधीत न बसता स्वतःच अनुभव घेऊन पाहावा. जवळच



असलेल्या हृदयस्थ आत्मारामाच्या चिंतनात केवढा आनंद आहे व केवढी शांति आहे हें ज्याचें त्यानें अनुभवून पाहावें. मात्र यासाठीं प्रयत्नपूर्वक अभ्यास पाहिजे. मनुष्य दृश्य सृष्टींतील विषयांतून आनंद व शांति प्राप्त होण्यासाठीं पुष्कळ धडपडतो. पण जवळच असलेल्या सुखाच्या ठेव्याकडे त्याचें लक्ष जात नाहीं. ईश्वर-चिंतनामुळें आनंद व शांति तर मिळतेच शिवाय भक्तकैवारी भगवान् हा आपलासा होतो व त्याच्या कृपेनें आपला कोणताहि कार्यभाग साधतों. **ईश्वर सर्वभूत हृदयस्थ। जवळीच असे नांदत। चिंतन करितां सकळ हेत। पुरवूं लागे सहज॥ चिंतन हें त्याची सेवा। जरी नित्य घडेल या जीवा। कशाचाही न पडे गोवा। सदा मन प्रसन्न॥** (ना. भ. सू. ६४४, ६४५) म्हणून भक्तिपंथेंचि जावें.

★ ★ ★

**बहू श्रापितां कष्टला अंबऋषि ।**
**तयाचे स्वयें श्रीहरी जन्म सोशी ।**
**दिल्हा क्षीरसिंधू तया ऊपमानी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥११६॥**

वादाचा शेवट होईल तेथेंच संवाद करावा, स्वतःचा अभिमान सोडावा, बोलण्याप्रमाणें वागावें व अशा सात्त्विक अंतःकरणानें भक्तिमार्गानेंच जावें, असें मागील श्लोकांत सांगितलें. देव हा भक्त कैवारी असल्यामुळें जीव हा एकदां का भक्तकोटींत गेला म्हणजे देव त्याचें दुःख निवारण करितो व त्याचे लाड पुरवितो, असें या पुढील दहा श्लोकांत निरनिराळे पौराणिक दाखले देऊन सांगतात.

मागील ''नुपेक्षी कदा राम दासाभिमानी'' या २८ ते ३६ श्लोकांच्या गटाप्रमाणें हाहि ''नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी'' असा ११६ ते १२५ श्लोकांचा गट आहे. मागल्या गटांत रामदासाभिमानी असे शब्द असून या गटांत देव भक्ताभिमानी असे शब्द आहेत. नुपेक्षी कदा व अभिमानी हे शब्द या दोन्ही गटांत तसेच आहेत. अंतरात्मा हाच समर्थांचा राम किंवा देव असल्यामुळें नुपेक्षी कदा राम म्हटलें काय व नुपेक्षी कदा देव म्हटलें काय अर्थ एकच. फरक आहे तो दास व भक्त या दोन शब्दांत.

दास हा नवविधा भक्तींतील सातव्या म्हणजे दास्यभक्तींत स्थिर झालेला असतो. सेवक हा नम्रपणें धन्याच्या स्वाधीन होऊन जसा राहतो,

तसेंच या दासाचें लक्षण असतें. देवाची मर्जी तेंच याचें इष्ट असल्यामुळें तो चिंतारहित असतो. त्याची स्वतःची काही मागणी नसतें. **तरी सदा निर्भर दास। चिंता आसविरहित॥** रात्रंदिवस देवाची सेवा करणें एवढेंच त्याला ठाऊक. दासाभिमानी देवच त्याच्या जें हिताचें तें करितो. **दास न ठेवी पोटाची चिंता। तैसी योगक्षेमाची चिंता॥ न ठेवावी सर्वथा। तें घे माथां परमेश्वर॥** (द. म. १-५३) एखादा सतृशील व सचोटीचा मुनीम धन्याची इमानानें सेवा करून त्याचें प्रेम संपादन करून सेवकाचा सखा होतो, तसेंच दास्यभक्ति फळाला आली म्हणजे हा दास सख्यभक्तींत उतरतो. भगवंताचें भजन करणारा पुण्यवान प्राणी हा आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी असाहि भक्त असू शकेल किंवा ज्ञानी, नित्ययुक्त असाहि असेल. सारांश, मागील गटांतील श्लोक दास्यभक्तीला म्हणजे साधन विचाराला अनुसरून आहेत असें वाटतें.

दुर्वास ऋषींनीं शाप दिल्यामुळें अंबरीष राजाला फार दुःख झालें. पण भक्तवत्सल भगवंतांनी त्या शापाचा स्वतःच अंगीकार करून भक्ताला दुःखपरंपरेतून सोडविलें.

या कथेसंबंधीं मतभेद दिसतात. दुर्वासांनीं अंबरीषावर कृत्या सोडल्यामुळें त्यांच्या मागें लागलेलें सुदर्शन चक्र ते अंबरीषालाच शरण गेल्यावर शांत झालें, असें भागवतात वर्णन आहे. पण अंबरीषासाठीं भगवंतांनी जन्म घेण्याचें पत्करलें याबद्दल भागवतांत आधार नसावा असें शंकर श्रीकृष्ण देव म्हणतात. कोणी सुदर्शनचक्राची कथा सांगून भक्तासाठीं भगवंतांनीच जन्म घेण्याचें स्वतःच अंगीकारिलें असें म्हटलें आहे. या श्लोकांतीत भावाला अनुसरून गुरूचरित्रांतील अध्याय तीनमध्यें सांगितलेला कथाभाग जास्त ग्राह्य वाटतो म्हणून तोच स्वीकारला आहे.

अंबरीष नावाचा एक पुण्यवान, धर्मशील, ज्ञानी व विष्णुभक्त असा राजा होता. तो एकादशी व्रत करीत असे. त्या दिवशीं कोणी अतिथि आल्यास त्याची अर्घ्यपाद्यपूजा करून सर्व काळ तो हरिचिंतनांत राही. त्याच्या या व्रताचा हट्टाने भंग करण्यासाठीं एकदां दुर्वास ऋषी त्याच्याकडे अतिथि म्हणून आले. त्या दिवशीं साधनद्वादशी एक घडीभरच होती आणि अकस्मात् अतिथि तर बुद्धिपुरस्सर आले, यामुळें अंबरीषास धाक पडला. दुर्वासांची पाद्यपूजा करून, त्यांना वंदन करून, स्नान-अनुष्ठानादि आटोपून पारणें सोडण्यासाठीं लवकर यावें, अशी राजाने विनंती केली. पण दुर्वासना येण्यास विलंब झाला. व्रतभंग होऊं नये म्हणून राजानें केवळ तीर्थ घेऊन पारणें



सोडिलें. दुर्वास आल्यावर पारणें सुटल्याचें पाहून ते अतिशय रागावलें. त्या रागाच्या भरात त्यांनीं ''तुला मोक्ष न मिळतां नाना योनींत जन्मावें लागेल'' असा राजास शाप दिला. शाप ऐकून राजानें भगवंताचें स्मरण केलें आणि शापवाणी पूर्ण होती न होती तोंच हृषीकेश प्रगट झाले. राजानें ऋषीचा शाप फुकट जाणार नाहीं हें जाणून भक्तवत्सल विष्णूच्या चरणांस घट्ट मिठ्ठी मारली. तेव्हां विष्णु म्हणतात- **विष्णु म्हणे दुर्वासासी। तुवां शापिलें अंबरीषासी॥ राखीन आपल्या दासासी। शाप आम्हांसी तुम्ही द्यावा॥** (गु. च. ३-६६) दुर्वास हे दूरदृष्टीचे ज्ञानी असल्यामुळें भगवंतानींच अवतार घेतल्यास साधूंचें संरक्षण, दुष्टांचा नाश व धर्मस्थापना इत्यादि गोष्टी होतील, भूभार हलका होईल असा विचार करून परोपकारार्थ विष्णूंना शाप देण्याचें त्यांनीं ठरविलें. तें विष्णूंना म्हणतात- **ऐसें विचारोनी मानसीं। दुर्वास म्हणे विष्णूसी। अवतरोनी भूमीसी नाना स्थानीं जन्मावें॥७४॥ प्रसिद्ध होसी वेळ दहा। उपर अवतार पूर्ण पहा।।७५॥ ऐसा कार्यकारणें शाप। अंगिकारी जगाचा बाप॥७६॥** म्हणून तयाचे स्वयें श्रीहरी जन्म सोशीं'' असें समर्थ म्हणतात. विशेष स्पष्टीकरणार्थ श्रीज्ञानेश्वरांनींहि हे पौराणिक दाखले ठिकठिकाणीं ज्ञानेश्वरींत दिले आहेत. अ. ११ मध्ये अर्जुनाच्या मनांत विश्वरूपदर्शनासंबंधी विचार चालू असता त्याला वाटतें की भगवंतांनी एकाचे गर्भवासहि सोसले, पण विश्वरूप मात्र कोणासच दाखविलें नाही. **एकाचे गर्भवासही साहिले॥** (ज्ञा. ११-३५)

उपमन्यु हा वसिष्ठ कुलांतील व्याघ्रपादाचा वडील मुलगा. घरची अत्यंत गरिबी असल्यामुळे त्याची आई त्याला पाण्यांत पीठ कालवून दूध म्हणून देत असे. एकदां खेळासाठीं तो दुसऱ्या ठिकाणीं गेला असतां त्याला ताजें दूध देण्यांत आलें. घरीं आल्यावर तो दुधासाठी हट्ट धरून बसला तेव्हां वैतागानें त्याची आई त्याला म्हणाली कीं, पूर्वजन्मीं तूं कांहीं ईशाराधना केली नाहींस तर तुला दूध कसें मिळावें ? हें ऐकून त्यांनें कडक तप केलें. तेव्हा शंकर प्रसन्न होऊन त्यांनी त्याला सतत दूध मिळावें म्हणून क्षीरसमुद्र दिला.

श्रीकृष्ण हे अर्जुनाच्या स्वाधीन झाल्यामुळे त्याला कोणतें सुख प्राप्त होणार नाहीं ? असा विषय मांडीत असता ज्ञानेश्वर म्हणतात, **''पाहे पां श्रीशंभूची प्रसन्नता। तया उपमन्यूचिया आर्ता। काय क्षीराब्धि दूधभाता। देइजेचिना॥''** (ज्ञा. ५-११) तसेंच गुरुमहिमा सांगताना ते म्हणतात, **''मागां दूध दे म्हणतलियासाठीं। आघवियाचि क्षीराब्धीची करूनि वाटी। उपमन्यूपुढे**

**धूर्जटीं। ठेविली जैसी।।** (ज्ञा. १०-१७)

तसेंच समर्थ म्हणतात कीं भगवंत हा भक्ताभिमानी असल्यामुळें ''दिला क्षीरसिंधु''.

★ ★ ★

**धुरू लेकरूं बापुडें दैन्यवाणें ।**
**कृपा भाकितां दीधली भेट जेणें ।**
**चिरंजीव तारांगणीं प्रेमखाणी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।११७।।**

भक्ताभिमानी देव भक्ताच्या प्रेमाकडे पाहतो, त्याच्या लहान-थोरपणाकडे पहात नाहीं, असें ध्रुवाचें उदाहरण देऊन या श्लोकांत सांगतात. पांच वर्षांचें अनाथ ध्रुव बाळ तें काय, वनांत जाऊन कडक तप करतें तें काय आणि ईश्वरप्राप्ति करून घेतें तें काय! ''अनन्याचे लाड पुरवी नारायण'' हेंच खरें नव्हे काय?

याकथेस भागवताचा आधार आहे (स्कं. ४, अ. ८ ते १२). उत्तमपाद राजाला सुनिती व सुरुची अशा दोन स्त्रिया होत्या. सुनीति ही वडील व तिचा मुलगा ध्रुव, सुरुचि ही धाकटी व तिचा मुलगा उत्तम. धाकटी सुरूची ही राजाची लाडकी होती. एकदां राजा उत्तमाला मांडीवर घेऊन बसला असतां ध्रुवानें तें पाहिलें व तोहि राजाच्या दुसऱ्या मांडीवर जाऊन बसला. हें पाहून सुरुची रागावली व तिला बरें वाटावें म्हणून राजानें ध्रुवाला मांडीवरून ढकललें. सुरुचीने त्याला मांडीवरून ओढलें असेंहि कोणी म्हणतात. ध्रुव रडत आपल्या आईकडे गेला. तेव्हा सुनीति त्याला म्हणाली, ''बाळा रडूं नको, ही परमेश्वराची इच्छा, तो ठेवील तसें राहावें, रडून काय उपयोग?'' तेव्हां ध्रुव म्हणाला- मी परेमश्वरालाच भेटतों व त्यालाच विचारतों. आई म्हणाली- बाबा, परमेश्वर काय फुकटचा भेटतो? त्यासाठीं एकान्तांत तप करावें लागतें. तूं तर लहान. तुझ्या हातून हें कसें जमेल बरें? पण ध्रुवानें तपाचा मनांत दृढ निश्चय केला व वनांत जाऊन तो तप करूं लागला. कांही काळानें त्यास नारद मुनि भेटले. त्याची निष्ठा कितपत दृढ आहे हें पाहण्यासाठी नारदांनी वनांत राहण्यात धोका कसा आहे हें त्याला सांगितलें. पण शेवटीं त्याचा दृढ निश्चय पाहून नारदांनी त्याला द्वादशाक्षरी मंत्राचा उपदेश केला. त्याप्रमाणें तप केल्यावर भगवंत प्रसन्न झाला व त्यांनी त्याला



बापाची मांडीच काय पण कायमचें अढळ पद दिलें. भगवत्प्रेमाची खाणी असा जो ध्रुव तो तारांगणी चिरंजीव झाला म्हणजे त्यानें अढळ पद मिळविलें. गुरुमहिमा वर्णन करतांना ज्ञानदेव म्हणतात, **''ना तरी वैकुंठपीठनायकें। रुसला ध्रुव कवतिकें। बुझाविला देऊनि भातुकें। ध्रुवपदाचें।।''** (ज्ञा. १०-१८) भक्त बाळ असला तरी देव त्याचे लाड पुरवितो असा तो भक्ताभिमानी आहे.

★ ★ ★

**गजेंद्रू महासंकटी वास पाहे ।**
**तयाकारणें श्रीहरी धांवताहे ।**
**उडी घातली जाहला जीवदानी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।११८।।**

भक्ताभिमानी देव केवळ बालकाचेच लाड पुरवितो असें नसून पशूनेहि त्याचें प्रेमानें स्मरण केलें तरी तो पावतो, असें एका कथेच्या आधारें सांगतात.

जिवावर आलेल्या संकटांत सापडल्यामुळें गजेंद्र नावाच्या एका हत्तीनें भगवंताचें कळवळून स्मरण केल्याबरोबर तो हरी त्याच्यासाठीं धावत गेला व त्याला संकट मुक्त केलें. **देव अनाथांचा कैपक्षी। नाना संकटापासूनी रक्षी। धांविन्नला अंतरसाक्षी। गजेंद्राकारणें।।** (दा. ४-८-२७) या कथेस भागवताचा आधार आहे. (स्कं. ८, अ. २ ते ४) हा गजेंद्र म्हणजे पूर्वजन्मांतील इन्द्रद्युम्न नावाचा शापित राजा. हा धर्मशील, पराक्रमी व विष्णुभक्त होता. पण यथायोग्य आदरातिथ्य न झाल्यामुळें अगस्ति ऋषींनीं त्याला ''तूं गजयोनी पावशील'' असा शाप दिला. तसाच नक्र किंवा मगर हा देवऋषींनीं शाप दिलेला पूर्वजन्मातील हूहू नांवाच गंधर्व. या दोघाही पशूंची पुष्कर तीर्थावर गांठ पडली. गजेंद्र हा आपल्या हत्तिणींच्या कळपांत जलक्रिडा करीत असतां नक्रानें त्याचा पाय धरला व त्यास तो पाण्यात ओढूं लागला. गजेंद्रानें पाय सोडविण्यासाठीं पुष्कळ धडपड केली पण नक्राच्या जबड्यांतून पाय सुटेना. तो हताश झाला व आपल्या सुटकेसाठीं त्यानें आपल्या आप्त कळपाची याचना केली. त्याची सुटका तर कोणी केली नाहींच, पण त्याला एकट्याला संकटात सोडून सर्व निघून गेले. त्याचा धीर सुटला. पण पूर्वजन्मांतील संस्कारामुळें त्याला हरिस्मरण झालें व आतां तोच आपला त्राता असें वाटलें. तुकोबा म्हणतात. **सुहृदीं सांडिलें कोणी नाही साहे। अंतीं वाट**

**पाहे विठो तुझी।।** आता आपण वांचत नाही असें पाहून त्यांनें त्याच सरोवरांतील एक कमळ सोंडेनें तोडून तें भगवंताला अर्पण केलें व आर्त होऊन त्याचा धावा केला. ब्रीदाने बांधलेले श्रीविष्णु गरुडाचीही वाट न पाहतां (त्यासाठीं गरुड सांडूनि धावसी अ. ४०५) तेथें धावत आले त्यांनी नक्राला मारून गजेंद्राची मुक्तता केली व विष्णुस्पर्शाने तो नक्रही मुक्त झाला. तात्पर्य, स्त्री असो, वैश्य असो, कुल कसेंहि असो इतकेच काय पण देहानें पशूहि असला तरी जिवाची सार्थकता भगवत् शरणागतींतच आहे. भगवंत म्हणतात, **पाहें पा सावजें हातिरूं धरिलें। तेणें तया काकुळती मातें स्मरिलें। कीं तयाचें पशुत्व वावो जाहलें। पातलिया मातें।।** (ज्ञा. ९-४४२) **म्हणोनि कुळ जातिवर्ण। हे आघवेचि गा अकारण। एथ अर्जुना माझे पण। सार्थक एक।।** (ज्ञा. ९-४५६)

★ ★ ★

**अजामेळ पापी तया अंत आला ।**
**कृपाळूपणें तो जनीं मुक्त केला ।**
**अनाथासि आधार हा चक्रपाणी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।११९।।**

पापी अजामीळ हा मृत्यूमुखीं पडत असतां त्याचा कळवळा येऊन चक्रपाणि श्रीविष्णूनीं या मृत्यूलोकांतून त्याला मुक्त केलें. याप्रमाणें भक्ताभिमानी देव हा निराधार दीन भक्तांचा फार मोठा आधार आहे. तो भक्ताची उपेक्षा करीत नाही. मागें श्लोक ९५ मध्यें अजामिळाचा दाखला दिला, तसाच तो येथेंहि दिला आहे. मागील श्लोकांत नामाचें श्रेष्ठत्व प्रतिपादन करण्यासाठीं त्याचा उल्लेख केला व या श्लोकांत देव हा भक्ताभिमानी कसा आहे हें दाखविण्यासाठीं त्याचा उल्लेख आहे. श्लोक ९५ मध्ये अजामिळाची कथा सविस्तर सांगितली असल्यामुळे त्याची पुनरुक्ति न करिता येथे **देव कृपेचा सागरु। देव करुणेचा जळधरु। देवाशी भक्तांचा विसरु। पडणार नाही।।** (दा. ४-८-२८) एवढें म्हटलें म्हणजें पुरे आहे.

★ ★ ★

**विधीकारणें जाहला मत्स्य वेगीं ।**
**धरी कूर्मरूपें धरा पृष्ठभागीं ।**
**जना रक्षणाकारणें नीच योनी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।१२०।।**



या श्लोकांत भक्ताभिमानी देव भक्तजनांसाठीं किती हलक्या योनीहि धारण करितों हें मत्स्य, कूर्म, वराहादि अवतारांचे दाखले देऊन सांगतात. अवतारांचे आवेश, अंश व पूर्ण असे तीन प्रकार आहेत. त्यांपैकी हे आवेश अवतार होत. राम हा अंश अवतार व कृष्ण हा पूर्ण अवतार समजतात.

भगवंतानें ब्रह्मदेवासाठीं लगेंच मत्स्यरूप धारण केले. या अवतारकथेसंबंधीं मतभेद दिसतो. पूर्वकल्पाशेवटीं पृथ्वीवर सत्यव्रत नांवाचा एक भगवत् भक्त राजा होता. तोच चालू कल्पांतील स्वयंभु मनु होय प्रलयकालांतील जलप्रलयांत मत्स्यावताराच्या शिंगाला आपली नाव बांधून राजाने या प्रलयापासून आपलें रक्षण करून घ्यावें अशी राजाला पूर्व सूचना देऊन भगवंतानें हा अवतार त्या राजाच्या रक्षणार्थ घेतला अशी कथा कोणी दिली आहे. परंतु **विधीकारणें जाहला मत्स्य वेगी** असें समर्थांनिं म्हटल्यामुळें ब्रह्मदेवासाठीं भगवंतानीं घेतलेल्या मत्स्य अवताराची कथा जास्त ग्राह्य वाटते.

कल्पकालीं ब्रह्मदेव निद्रा घेऊं लागले असतां, हयग्रीव दैत्यानें त्यांच्या मुखांतील वेद हरण करून समुद्रांत नेले. त्या वेळीं भगवंतांनीं मत्स्यरूप धारण करून त्या दैत्याला मारून ब्रह्मदेवांना वेद परत आणून दिले, अशी कथा आहे.

कूर्मावतारीं भगवंतांनीं आपल्या पाठीवर पृथ्वी धारण केली. समुद्रमंथनाच्या वेळीं मंदार पर्वत खालीं जाऊं लागला व तो बुडतो कीं काय अशी देवांना चिंता वाटूं लागली. तेव्हां भगवंतांनी भव्य असें कासवाचे रूप धारण करून तो पर्वत आपल्या पाठीवर घेतला व अमृत प्राप्त करून देण्यांत देवांना साहाय्य केलें.

इतकेंच काय पण वराहासारखें अगदीं हलक्या प्रतीचेंहीं रूप धारण करून लोकरक्षण केलें. भूदेवीला दैत्यांनीं समुद्रांत ओढून नेलें असतां तिला वर काढण्यासाठी देवानें उग्र वराहरूप धारण केल्याची कथा भागवतांत आहे. (स्कं. ३, अ. १३) याप्रमाणें देव भक्तांचा अभिमानी असल्यामुळे तो त्यांची उपेक्षा करीत नाहीं.

★ ★ ★

**महाभक्त प्रल्हाद हा कष्टवीला ।**
**म्हणोनी तयाकारणें सिंह जाला ।**
**न ये ज्वाळ विशाळ सन्नीध कोणी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।१२१।।**

पहिले तीन अवतार भक्ताभिमानी देवाने कसे धारण केलें हें मागील श्लोकांत सांगितलें. या श्लोकांत भक्त प्रल्हादासाठीं घेतलेल्या चवथ्या नरसिंह अवताराचे वर्णन आहे. मागील श्लोक ९६ मध्यें नाममाहात्म्य सांगण्यासाठी प्रल्हादाचा उल्लेख येऊन गेला. या श्लोकांत देव भक्ताभिमानी कसा आहे हें दाखविण्यासाठीं त्याचा उल्लेख पुनः केला आहे. या श्लोकार्थापुरता त्याचा कथाविचार पाहूं.

भक्तीपासून परावृत्त होण्यासाठीं हिरण्यकश्यपूनें प्रल्हादास फार छळिलें. पण सर्व छळ सहन करूनहि तो भक्तच राहिला. श्लोक ९६ मध्यें व येथेंहि त्याला महाभक्त असें म्हटलें आहे. त्याचें कारण असें कीं ज्यांनीं त्याच्यासाठीं अवतार घेतला ते भगवंतच त्याचा महिमा स्वतः गातात. हिरण्यकश्यपूनें ब्रह्मदेवापासून वरदान मिळवून आपलें जीवित इतकें सुरक्षित करून घेतलें होतें कीं सर्व भक्षक कालाचीहि त्याला फिकीर नव्हती. घरांत, बाहेर, दिवसा, रात्री, नर, पशु इत्यादिकांपासून मृत्यु नसावा असा हा विचित्र वर होता. अशा या विचित्र वराचा मान ठेवूनहि भगवंताला ज्या भक्ताच्या रक्षणार्थ विचित्र अवतार घेऊन खांबातून नरसिंहरूप घेऊन प्रगट व्हावें लागलें तो काय सामान्य भक्त म्हणावा? म्हणून भगवंतच स्वतः अर्जुनाला म्हणतात. **पाहे पा भक्तीचेनि अथिलेपणें। दैत्यीं देंवा आणिलें उणें। माझें नृसिंहत्व लेणें। जयाचिये महिमे।।** (ज्ञा. ९-४५०) मला या प्रल्हादासाठी अवतार घ्यावा लागला इतकेंच नव्हे तर माझ्याशीं त्याची तुलना केली असतां तोच काकणभर सरस ठरेल. कारण मी जो मोक्ष देतो तो केवळ त्याच्या कथा श्रवण करून मिळतो. **तो प्रल्हादु गा मजसाठीं। घेतां बहुतें सदा किरीटी। कां जें मिया द्यावें ते गोष्टी। तयाचिया जोडे।।** (ज्ञा. ९-४५१) अशा या भक्तश्रेष्ठाचा त्याच्या बापाकडून अनन्वित छळ झाल्यामुळें देवाला देहानें नर व मुखानें सिंह असें विचित्र रूप घ्यावें लागलें.

ज्वाळ म्हणजे अग्नि, विशाळ व विषाळ असे दोन पाठ दिसतात. विशाळ म्हणजे मोठा. विषाळ म्हणजे विषारी. विषाळ म्हणजे शंकर असा कोणी अर्थ लावितात पण विशाळ हें ज्वाळचें विशेषण घेऊन अर्थ करणें बरें वाटतें. हिरण्यकश्यपूच्या वधाच्या वेळीं तें नरसिंहरूप इतकें उग्र व भयानक झालें कीं त्याच्या मुखांतून निघणाऱ्या विषारी व तापदायक अग्निज्वाळांपुढे कोणीहि जाऊं शकेना. ब्रह्मदेव, शंकर इत्यादिकांनी देवाची स्तुति केली तरी कोणीही पुढे जाण्यास धजेना. प्रत्यक्ष लक्ष्मीलाहि पुढें जाण्याचें धैर्य होईना.



तेव्हां ब्रह्मदेवानें प्रल्हादास पुढें केलें. त्याला त्या उग्र रूपाची मुळीच भीति वाटली नाहीं. त्यानें साष्टांग नमन करून त्या रूपाची स्तुति केली तेंव्हां भगवान् संतुष्ट होऊन शांत झाले व त्यांनी आपल्या लाडक्या भक्तास प्रेमानें मिठी मारून पोटाशी घेतलें. ही कथा भागवत स्कं ७ अ. ५ ते १० मध्यें आली आहे. **हरीभक्त एक जाहला प्रल्हाद। ज्याचा गोविंद कैवारी ।। कैवारी हरी राखे नानापरी। ऐसा भाव धरी आलयारें।।**

★ ★ ★

**कृपा भाकिता जाहला वज्रपाणी ।**
**तयाकारणें वामनू चक्रपाणी ।**
**द्विजांकारणें भार्गव चापपाणी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।१२२।।**

या श्लोकांत देव हा भक्तकैवारी कसा आहे हें पांचव्या व सहाव्या म्हणजे वामन व परशुराम या अवतारांचे दाखले देऊन सांगतात.

वज्रपाणी म्हणजे इंद्रानें कृपेची याचना केली असतां चक्रधारी विष्णूनें त्याच्यासाठीं वामन अवतार घेतला. विरोचनपुत्र व प्रल्हादाचा नातू बळी हा धार्मिक व उदार असा दैत्यांचा राजा होता. देवांशी होणाऱ्या युद्धांत संजीवनी विद्येमुळे तो जिवंत राही. इंद्रपद प्राप्त होण्यासाठीं त्यानें शंभर यज्ञांचा संकल्प केला व नव्याण्णव यज्ञ पुरे केले. शेवटचा यज्ञ चालू असतां इंद्रादि देव विष्णूस शरण गेले. विष्णूनें बटु वामन अवतार घेऊन याचकरूपानें यज्ञांत बळीला त्रिपाद भूमीचें दान मागितलें. दैत्य गुरू शुक्राचार्यांनीं हे दान न देण्याचा सल्ला दिला असतांहि तो न ऐकतां बळीनें बटूच्या हातावर दानाचें उदक सोडलें. वामनानें विराट स्वरूप धारण करून एका पावलानें पृथ्वी व दुसऱ्या पावलानें आकाश व्यापिलें. तिसऱ्या पावलासाठीं बळीनें आपलें मस्तक पुढें केलें असतां त्यास पाताळांत दडपलें. पण त्याचें हें उत्कट औदार्य पाहून भगवान् प्रसन्न झाले. ''वैवस्वत मन्वंतर'' असेपर्यंत तू उपेंद्र राहशील व नंतर इंद्र होशील, तोंपर्यंत तूं पाताळाचें राज्य कर'' असा त्यांनी वर दिला. त्याच्या रक्षणार्थ भगवान् स्वतः त्याचे द्वारपाळ होऊन राहिलें अर्जुन म्हणतो, **दान मागोनी दारवंठेकरू। जाहलासी बळीचा।।** (ज्ञा. ११-१०६) बळीकडे दान मागणेस गेले व द्वारपाल होऊन राहिले. भा. स्कं. ८, अ. १५ ते २३ मध्यें ही कथा आहे. कार्तिक शु. १ ला हें दान दिल्यामुळें बलिप्रतिपदा म्हणून हा

दिवस ओळखला जातो.

ब्राह्मणांचा छळ झालेला पाहून भगवंतांनीं परशुराम अवतार घेतला. परशुरामाचे वडील जमदग्नि ऋषि व माता रेणुका. परशुराम वेदविद्या पित्यापासून शिकले व शास्त्र आणि धनुर्विद्या शंकरापासून शिकले. या कालीं महिष्मती नगरांत कार्तवीर्य नांवाचा एक महापराक्रमी राजा होता. तो दत्तभक्त होता. श्रीदत्ताला तो रोज हजार कमलें वाही. एके दिवशीं पूजेस एक कमल कमी पडलें असतां त्यानें लगेच आपला एक हात कापून करकमळ म्हणून तो देवास वाहिला. तेव्हां प्रसन्न होऊन दत्तांनीं त्याला एक हजार हात दिले. तेव्हांपासून त्याला राजा सहस्रार्जुन असें नांव पडलें. हा राजा धार्मिक, ब्राह्मणभक्त, यज्ञकर्मांचा भोक्ता व पुत्रवत् प्रजापालन करणारा होता. तसाच तो ज्ञानीं व योगीहि होता.

एकदां त्याने अश्वमेध यज्ञ केला. त्याच्या जीवन्मुक्त अवस्थेची इन्द्रादि देवांना जाणीव नसल्यामुळें हा स्वर्ग हरण करून इन्द्रपद घेईल कीं काय अशी त्यांना भीति वाटली. म्हणून देवांनीं सूर्याला अतिथिरूपानें राजाकडे पाठविलें. सूर्यानें क्षितीवरील सर्व उद्भिज्जाचें दान मागितलें. योगबलानें आपण तें उत्पन्न करूं असें वाटून राजानें दानाचें उदक सोडिलें. त्याबरोबर पृथ्वीवरील सर्व लता, तृण, वृक्षादि जळून भस्म झाले. ही वणव्याची झळ वसिष्ठाश्रमाला पोचल्यामुळें ध्यानस्थ वसिष्ठ उठले व क्रोधानें त्यांच्या मुखांतून शापवाणी निघून गेली, ती अशी. ''सहस्रार्जुना, जमदग्निसुत परशुराम तुझे हात तोडील व तुझा शिरच्छेद करील.'' आपणास सामान्य माणसाकडून मरण न येतां तें प्रत्यक्ष देवाकडून यावें, अशी राजाची दत्ताजवळ मागणीहि होती. या वासनेमुळेंच शापवाणीची घटना घडून आली. **अर्जुन हा ब्राह्मण भक्त। वसिष्ठही अत्यंत शांत। तो हा असा शाप देत। येथें कारण भावीं दैव।।** (द. म. १७-४५)

या शापानंतर सहस्रार्जुनाची बुद्धि फिरली. स्वर्ग जिंकावा असें त्यास वाटूं लागलें. देवाशीं त्याचें युद्ध होऊन देवहि बंदिवान झाले. इंद्र दीन बनला. शेवटीं जमदग्नीने स्वागत करून थाटाची मेजवानी दिल्याचें पाहून राजानें त्याची कामधेनूहि बलात्कारानें नेली. जमदग्नि ध्यानस्थ, शांत राहिले. वनांतून परत आलेल्या परशुरामास सर्व हकीगत समजताच तो राजावर धावून गेला. दोघांचे घनघोर युद्ध होऊन राजाचे हात व शिर तोडलें गेलें आणि तो रणांगणावर पडला व ब्रह्मरूप झाला.



राजाच्या शंभर पुत्रांनीं आश्रमांत परशुराम नाहीं असें पाहून ध्यानस्थ असलेल्या जमदग्नीचें शिर सूडबुद्धीने तोडिलें, या ब्रह्महत्येपासून परावृत्त करण्यासाठीं रेणुकेनें त्यांची पुष्कळ विनवणी केली, पण त्यांनीं ऐकिलें नाही. परशुरामानें पितृऋणांतून मुक्त होण्यासाठीं त्या शंभर पुत्रांना युद्धांत ठार केलें. व रागांत एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय करण्याची प्रतिज्ञा केली. पित्याचा दहनविधि व मातेचें सहगमन झाल्यानंतर परशुरामानें ही प्रतिज्ञा पूर्ण केली.

★ ★ ★

**अहल्ये सतीलागि आरण्यपंथें ।**
**कुडावा पुढें देव बंदी तयांतें ।।**
**बळें सोडितां घाव घाली निशाणीं ।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।१२३।।**

देव भक्ताभिमानी कसा आहे, हें सातव्या श्रीरामवताराचें उदाहरण देऊन या श्लोकांत सांगतांत.

सती अहिल्येचा उद्धार करण्यासाठीं श्रीरामाला अरण्यांतून मार्ग धुंडावा लागला. मागे श्लोक ३२ मध्यें श्रीरामांनीं अहिल्येचा उद्धार कसा केला याचें वर्णन येऊन गेलें आहे. त्याचप्रमाणें श्रीरामानीं रावणाच्या बंदिखान्यातून पुढें देवांची सुटका करून त्याचे रक्षण केले. कुडावा म्हणजे रक्षण. याचेंहि वर्णन मागें श्लोक ३१ मध्यें येऊन गेलें.

तिसऱ्या चरणासंबंधीं थोडा खुलासा करणें जरूर आहे. मागे श्लोक ३७ मध्यें **हरीभक्तिचा घाव गाजे निशाणी।** याचे विवेचन करताना ''संकट आपलें निशाण किंवा झेंडा पुढें करून झगडण्यास येईल तेव्हां न घाबरतां त्यावर हरीभक्तीचा घाव घाल'' हा श्री. आठल्ये यांचा अर्थ बरा वाटतो असा उल्लेख केला आहे. याचें कारण असें कीं निशाण या शब्दाचा अर्थाबद्दल संशय व मतभिन्नता आहे. नगारा हा अर्थ कोणत्या शब्दाचा ? असा श्री. आठल्ये प्रश्न करितात, तर श्री. देव निशाण या शब्दाचा अर्थ नगारा असा असेल अगर नसेल अशी शंका व्यक्त करून तसा असल्यास पहिला नसल्यास दुसरा, असे या चरणाचे दोन अर्थ करितात. हे मागील श्लोक ३७ संबंधीं सांगितलें.

या श्लोकांतहि श्री देव यांनीं निशाण म्हणजे नगारा असा शब्दार्थ दिला आहे व ''देवांना स्वपराक्रमानें बंधमुक्त करण्यासाठीं नगारा झडतो'' असा या चरणाचा अर्थ केला आहे. पण या अर्थानें कांहीं बोध होत नाही.

म्हणून निशाण म्हणजे नगारा हा संशयित किंवा गुळमळीत शब्दार्थ सोडून देऊन निशाण म्हणजे झेंडा किंवा ध्वज असा निश्चित शब्दार्थ घेऊन या चरणाचा अर्थ लावणें बरें असें वाटतें. स्वसामर्थ्यानें देवांना बंदिवासांतून सोडवून त्यांचें रक्षण करण्यासाठीं प्रभू रामचंद्रांनीं रावणाच्या राज्यध्वजावरच प्रहार केला, असा या चरणाचा स्पष्ट अर्थ होतो.

राम हा दासाची उपेक्षा कधीच करीत नाही. मागचा व पुढचा उपक्रम सोडून ''देव भक्ताभिमानीच्या'' ऐवजीं ''राम दासाभिमानी'' असें येथें म्हटलें आहे. या श्लोकांत रामावताराची महती सांगितली असल्यामुळें २८ ते ३७ श्लोकमालिकेप्रमाणें येथेंहि तसाच चरण ठेविला असावा.

★ ★ ★

**तयें द्रौपदी कारणें लागवेगें ।**
**त्वरें धांवतू सर्व सांडुनि मागें ।**
**कळीलागि जाला असें बौद्ध मौनी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥१२४॥**

या श्लोकांत आठवा कृष्ण-अवतार व नववा बौद्ध अवतार हे भक्ताभिमानी कसे आहेत हें सांगतात.

सर्व कामें बाजूला सारून महासाध्वी द्रौपदीसाठीं श्रीकृष्ण परमात्मा तिला संकटमुक्त करण्यास्तव तांतडीनें धावत आला. द्रौपदीवर सत्त्वहरण होण्याचे दोन प्रसंग आले. एक भरसभेंत वस्त्रहरण होण्याचा. ही घटना घडूं नये म्हणून अघटित-घटना-पटुत्व असलेल्या श्रीकृष्णांनीं तिला वस्त्रपुरवठा करून तिची विटंबना होऊं दिली नाही. दुसरा कोपिष्ट दुर्वास मुनि अतिथीच्या रूपानें शिष्यासह आले तेव्हांचा. त्या वेळी द्रौपदीनें देवाचा धावा केला. **दुशासनादहं पूर्वं सभायाम् मोचिता यथा। तथैव संकटादस्मान्मामुद्धतुमिहार्हसि॥** दुःशासनाच्या संकटांतून पूर्वी तूं मला जसें मुक्त केलेंस तसेंच याहि संकटांतून मुक्त करणारा तुझ्यांवाचून मला दुसरा कोण ? असा धावा करिताच ऋषींच्या भोजनाची सर्व व्यवस्था झाली. या दोन्हीहि कथा सर्वांना परिचित अशा आहेत.

कलियुगांत भगवान् बुद्धाला मौन धरून स्वस्थ रहावें लागलें. द्वापार युगांतील कृष्णावतारांत दुष्टांचा नाश, साधूंचें रक्षण व धर्मस्थापना इत्यादि अवतारकार्ये झालीं. पण कलियुग सुरू झाल्यानंतर बसलेली घडी पुन्हा



विसकटली. पुन्हा अधर्म वाढूं लागला, यज्ञयागांत पशुहत्या होऊं लागल्या व निरनिराळे संप्रदाय उत्पन्न होऊन परस्परांत द्वेष वाढूं लागला. अशा कालीं कपिलवस्तु नगरीचा राजा शुद्धोदन याच्या पोटीं भगवान् बुद्धाचा जन्म झाला. तारुण्यांत प्रपंचाबद्दल हा उदासीन होईल, असें भविष्य ऐकून पित्यानें त्याला सुखोपभोगांतच ठेविलें होतें. पण एकाच दिवशी महारोगी, वार्धक्याने जर्जर झालेला म्हातारा व प्रेत यांचें त्यास दर्शन झाल्यामुळें मानव हा विकारी, नाशवंत व क्षणभंगुर आहे असा त्याचा निश्चय झाला. आपली हीच अवस्था होणार असें त्यास वाटून प्रपंचाबद्दल त्याला तीव्र वैराग्य प्राप्त झालें. तेव्हां राज्य व कुटुंब यांची आशा सोडून तो वनांत गेला व एका पिंपळाच्या झाडाखालीं आत्मचिंतनांत निमग्न होऊन राहिला. आत्मसाक्षात्कारानंतर धर्मप्रसारार्थ ठिकठिकाणीं त्यानें मठस्थापना केली. अहिंसा, सत्य, दया, प्रेम, परोपकार, समानता व मोक्षार्थ संन्यास इत्यादि त्याच्या धर्माचे नियम होते. सर्वच नवीन वाटल्यामुळें अनेक लोक त्या धर्मांत सामील झाले. परंतु पश्चात्ताप व तीव्र वैराग्य यांच्या अभावीं भिक्षुभिक्षुणींमध्यें अनाचार माजला. अखेर खऱ्या धर्मांचे एक-दोन शिष्यच त्याच्या संगतींत राहिले. यामुळें अत्यंत कष्टी होऊन कलियुगांत होणारें पाप मानवानें ज्याच्या त्याच्या प्रारब्धानुसार भोगावें असें ठरवून त्यानें मौन स्वीकारिलें. याप्रमाणें बुद्धरूपाने ईश्वरानें मौनव्रत धारण केलें आहे.

★ ★ ★

**अनाथां दिनांकारणें जन्मताहे ।**
**कलंकी पुढें देव होणार आहे ।**
**जया वर्णितां सीणली वेदवाणी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥१२५॥**

या श्लोकांत पुढें होणाऱ्या दहाव्या कलंकी अवताराचें वर्णन केलें आहे.

भक्तवत्सल देव अनाथ, दीन अशा भक्तांचा उद्धार करण्यासाठीं या जगात जन्मताहे म्हणजे वारंपार अवतीर्ण होतो. दीन व अनाथ या शब्दांच्या अर्थाचा खुलासा श्लोक २८ मध्यें पूर्वी सविस्तर केला आहे. येथें इतकेंच सांगावयाचें कीं भक्तीहीन, दीन-दुबळी, अंध, पंगु अशीं असंख्य माणसें या जगांत आहेत. पण देव त्यांच्यासाठी अवतीर्ण होत नाहीं. ज्यांनी आपला

अहंकार व सर्व भार परमेश्वरास अर्पण केले आहेत, भगवंत हेंच ज्यांचें विसाव्याचें स्थान आहे व ज्यांचा सर्व भार ईश्वरावरच आहे, अशा दीन व असहाय भक्तांच्या उद्धारासाठीं देव अवतार धारण करितो.

धर्म व साधुरक्षणार्थ भगवंतांनीं युगायुगांत अवतार घेतले. आपले कोणीच ऐकत नाहीं असें पाहून बौद्धानें कलियुगांत मौन स्वीकारलें. आतां कलीचीं केवळ पावलें दिसत आहेत. पुढचें भविष्य तर भयंकर स्वरूपाचें आहें. बुद्धिवानांत अभक्ष-भक्षण, अपेयपान, दुष्टांचा गौरव, सुष्टांचा अपमान इत्यादि गोष्टी आपणांस दिसत नाहींत काय? तुकोबा म्हणतात- **''मागें संतीं होतें जें जें सांगितलें। तें येऊं लागलें अनुभवा।। आचारभ्रष्ट होती लोक कलीं। पुण्य क्षीण बळी झालें पाप।।२।। वर्ण धर्म कोणी न धरीती विटाळ। घालिती गोंधळ एके ठायीं।।३।।''** (गा. ३०९६) पुढें कली मातल्यावर तर सज्जनांचा, भक्तांचा वाली कोणीच राहणार नाहीं. देवांचें नांव घेणें हें सुद्धां पातक ठरून साधूंवर गोळ्या घातल्या जातील. भक्तांची दुर्दशा होऊन ते दीन व असहाय्य होतील, अशा समयाला भक्तांची बाजू घेऊन त्यांच्या रक्षणार्थ मी साकाररूपानें अवतार घेतो आणि जगभर पसरलेला अज्ञान अंधकार गिळून टाकतो, नाहींसा करितो, असें स्वतः भगवंतच सांगतात. **ते वेळीं आपुल्याचेनि कैवारें। मी साकारू होऊनी अवतरें। मग अज्ञानाचें आधारें। गिळूनि घाली।।** (ज्ञा. ४-५१) आपुल्याचेनि कैवारें म्हणजे केवळ दीन दुबळें नव्हे, जे त्याचे भक्त त्यांच्या कैवारार्थ.

या आपल्या वचनाप्रमाणें जगन्नियंता परमेश्वर शंभल ग्रामांत विष्णुयश नामक पवित्र ब्राह्मणाच्या घरीं कलंकीरूपानें पुढें प्रगट होणार आहे, अशी कथा भागवतांत आहे.

याप्रमाणें आपल्या भक्तांच्या उद्धारार्थ वेळोवेळीं अवतार घेणाऱ्या या भक्तवत्सल भगवंताचे गुणानुवाद करून वेदहि थकले. या श्लोकानें दशावतार वर्णन संपून ''नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी'' हें सदर पूर्ण होतें.

★ ★ ★

**जनाकारणें देव लीलावतारी ।**
**बहूतांपरी आदरें वेषधारी ।**
**तया नेणती ते जन पापरूपी ।**
**दुरात्मे महानष्ट चांडाळ पापी ।।१२६।।**



मागील १२० ते १२५ श्लोकांत दशावतारांचें वर्णन केलें. जगावर उपकार करणाऱ्या अशाया नाटकी भगवंताचें सत्य स्वरूप न जाणणारा मानव अधोगतीला जातो, असें या श्लोकांत सांगतात.

जगांतील पाप नाहींसें व्हावें, लोकांनीं पुण्य मार्गानें जावें, धर्माची विसकटलेली घडी पुन्हा व्यवस्थित बसावी व भक्तांचा उद्धार व्हावा यासाठीं अनेक वेष धारण करून भगवंत लोकांकरिता सहज लीलेनें प्रगट होत असतात. भक्तांचे पुण्य, अभक्तांचें पाप यांचीं फळें देण्यासाठीं भगवंताचा सगुण विग्रह म्हणजे विस्तार किंवा आकार धारण करणें याला अवतार म्हणतात.

अशा या लोककल्याणकारी नटधारी भगवंताच्या लीला व वास्तव स्वरूप लोकांनी समजून घ्यावयास पाहिजे. कारण याचें फल फार मोठें आहे. भगवंत गीतेंत अर्जुनाला म्हणतात, **''जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः। त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन।।''** (भ. गी. ४-९) लोकांसारखा माझा जन्म नाहीं. लोकांसारखें माझें कर्म नाहीं. माझें जन्म व कर्म दिव्य म्हणजे अलौकिक आहे असें भगवान् म्हणतात. मनुष्याला पूर्वकर्मामुळें जन्माला येऊन देहबंधनांत अडकून राहावें लागतें. ईश्वर हा चैतन्यमय असून त्याचा जन्म मायामय म्हणजे संकल्पमात्र असतो, खरा नसतो. लोकदृष्टीनें तो जन्माला आल्याचें भासवितो, पण वास्तविक तो अजन्माच असतो. मानवाचें कर्म अविद्या म्हणजे अज्ञान, अहंकार व भ्रम इत्यादिकांनी युक्त असतें. ईश्वराचें कर्म अविद्या अहंकार व भ्रमरहित असतें. म्हणून त्याला बंधन नसतें व तो कर्मापासून अलिप्तच असतो. लौकिक दृष्टीला तो कर्माचा कर्ता असें दाखवितो, पण तो अकर्ताच असतो. जगत्परिपालन हें त्याचेंच कर्म आहे, दुसऱ्याचें नव्हें. हें ईश्वराचें जन्म, कर्म, अवतार रहस्य शाब्दिक नव्हे, पण स्वरूपानुभवानें कळलें म्हणजे त्याचा संसारबंध तुटतो, तो मुक्त होतो. ज्ञानोबा तर त्याला परममुक्त म्हणतात. **माझें अजत्वें जन्मणें। अक्रियताचि कर्म करणें। हें अविकार जो जाणे। तो परममुक्त।।** (ज्ञा. ४-५८)

म्हणून समर्थ म्हणतात कीं, अशा या लोककल्याणकारी नाटकी, वेषधारी ईश्वराला जे लोक जाणत नाहींत ते पापी दुरात्मे होत. दुरात्मा कोण याची व्याख्या समर्थ अशी देतात- **सकळांवडिल अंतरात्मा। त्यासि नेणे तो दुरात्मा। दुरात्मा म्हणिजे दुरी आत्मा। अंतरला तया।।** (दा. १५-९-१८) बरें, हा आत्मा दूर तरी आहे? नाहीं. **जवळीं असोन चुकले। प्रत्ययास नाहीं सोकले।**

**उगेचिं आले आणि गेले। देवाचकरितां।।** (दा. १५-९-१९) देवासाठीं म्हणून जन्माला येतो पण हा दुरात्मा आला तसा जातो. गर्भवासांतील हाल सोसेनासे झाले म्हणजे तो देवाला म्हणतो- **आता सोडवी येथून। यावरी पाप न करीन। देवा, तुझें भजन करीन। तुला विसरे न कधींही।।** (द. म. ११-२३) असें म्हणूनहि देवाला विसरून जो आत्मघात करून घेतो, तो मानव नष्ट, चाडांळ, पापी, दुरात्मा नव्हे का ? सारांश, जन्माला येऊन जो मानव भगवंताचें अवताररहस्य यथार्थपणें जाणतो, त्याला श्रेय प्राप्त होतें. उलट, ईश्वराचा देह व जन्म आपल्यासारखाच असतो व जगत्पालनाचें कर्म क्षत्रियांचें असतें असें जो समजतो त्याची संसारपरंपरा सुटत नाहीं.

पुराणांतील गूढ अर्थ न समजल्यामुळें तर्ककुतर्क काढून काहींना असें वाटतें कीं रामकृष्णादिकांचें शरीरास ब्रह्म कां मानावें? आमच्यासारखाच त्यांचा जन्म व आमच्यासारखेंच त्यांचें कर्म व अवतार समाप्ति मग त्यांचीं शरीरें दिव्य का मानावयाचीं? याचीं उत्तरें खालीलप्रमाणें आहेत. (१) जीवांची शरीरें पंचीकृत पंचभूतांचीं असतात. देवांचें शरीर चैतन्याश्रित मायेचा साक्षात परिणाम असतो. (२) जीवांची शरीरें पुण्यपापादि पूर्व कर्माधीन आहेत. देवाचीं शरीरें संकल्प मात्र असतात. (३) जीवांना अविद्येमुळें आत्मस्वरूपासंबंधीं भ्रम असतो. देवांना तो नसतो. (४) अविद्येच्या नाशासाठीं व ज्ञानप्राप्तीसाठीं जीवांना सत्संगाची आवश्यकता असते. देवाच्या ठिकाणीं आत्मस्वरूपणविस्मरण नसतें. अवतारांतील गुरु हे लोकांना मार्गदर्शनासाठीं असतात. (५) जीवांची कर्मे अहंकारयुक्त असतात. देवाची कर्मे अहंकारविरहित एखाद्या नटाप्रमाणें होतात. म्हणून ते कर्मापासून अलिप्त असतात. भगवान् म्हणतात, **''माझें अव्ययत्व तरी न नसे। परी होणें जाणें एक दिसे। तें प्रतिबिंबे मायावशें। माझ्यांचि ठायीं।। माझी स्वतंत्रता तरी न मोडे। परी कर्माधीनु ऐसा आवडे। तेही भ्रांतिबुद्धि तरी घडे। एऱ्हवी नाहीं।।''** (ज्ञा. ४-४५-४६) असें हें अवताररहस्य आहे.

अवतार-रहस्य जाणणाऱ्याला मोक्ष प्राप्त होतो, इतकेंच काय पण ज्ञानोबा त्याला परममुक्त म्हणतात असें मागें सांगितलें. यावर अशी शंका येईल की, मोक्ष हा ज्ञानानेंच प्राप्त होतो. त्यावांचून नाहीं. असा जर सिद्धान्त आहे तर तो यथार्थ अवतार-रहस्य जाणल्यानें प्राप्त होतो असें कसें म्हणतां येईल ? याचें उत्तर असें आहे कीं, ज्ञानावांचून मोक्ष नाहीं हें खरेंच, पण भगवंताचीं दिव्य जन्मकर्मे कळणें हेंहि ज्ञानावांचून घडत नाहीं. ज्यानें तीं



जाणलीं तो आत्मज्ञानीच असतो. म्हणून ज्ञानोबा त्याचें वर्णन कसें करितात पहा. **ऐसेंया काजालागीं। अवतरे मी युगीं युगीं। परी हेंचि वोळखे जो जगीं। तो विवेकीया।।** (ज्ञा. ४-५७) **तो चालिला संगें न चळे। देहींचा देहा ना कळे। मग पंचत्वीं तव मिळे। माझाचि रूपीं।।** (ज्ञा. ४-५९) हे अवतार रहस्य ओळखणारा विवेकी असतो. तो सर्व व्यवहार करून लिप्त होत नाहीं. देहांत राहून देहाधीन होत नाही आणि देहावसानानंतर माझ्याच स्वरूपीं ऐक्य पावतो. असा हा ज्ञानीच असतो.

★ ★ ★

**जगी धन्य तो रामसूखें निवाला ।**
**कथा ऐकतां सर्व तल्लीन जाला ।**
**देहेभावना रामबोधें उडाली ।**
**मनोवासना रामरूपीं बुडाली ।।१२७।।**

अवतारी भगवंताचें सत्य स्वरूप न जाणणारे लोक पापी, दुरात्मे होत, असें मागील श्लोकांत सांगितलें. या श्लोकांत मानवी जीवन धन्य कोणाचें म्हणावें हें सांगतात.

सुखरूप असा जो श्रीराम त्या रामरूपांत जो आराम पावला तो धन्य होय. रामसूखें म्हणजे श्रीरामाचें ध्यान करण्यापासून होणारें सुख. ध्यान बाह्य स्वरूपाचें असलें म्हणजे दृष्टीला सुख होतें व अंतरंगातील असलें म्हणजे मनाला सुख होतें. **रामरूपी दृष्टी जाऊन बैसली। सुखें सुखावली न्याहाळितां।।** कांहीं ठिकाणी ''रामसूखें निमाला'' असा पाठ आहे, तोहि ठीकच आहे. कारण हास्यवदनावर मन स्थिर करणें हाहि एक ध्यानांतील महत्त्वाचा भाग आहे. सर्वांगाचा त्याग करून मुख पाहणें, मुखावरून हास्यावर लक्ष ठेवणें, हास्यांतून आनंद घेणें असा या ध्यानाचा प्रकार आहे. ध्यानाचें महत्त्व फार मोठे आहे. **ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते** असें भगवंत गीतेंत म्हणतात. या श्लोकांत पुढें सांगितलेल्या तल्लीनता, देहभाव हरपणें, वासनाक्षय, इत्यादि सर्व अवस्था ध्यानांतूनच निर्माण होतात व परमानंद प्राप्त होतो. **ध्यानें तन्मय होतां। इतर चिंता न उठतां। ये परमानंदता। ध्येयाकरता होवोनी।।** (द. म. ३४-४७) म्हणून ध्यानासंबंधी थोडा विचार पाहू.

रामसूखें या शब्दाने येथें श्रीरामाचें सगुण ध्यान सुचविलें आहे. हास्यवदन, कृपाकटाक्ष, पुष्पमालेनें सुशोभित असें भव्य वक्षस्थल, चमकदार

पीतांबर, सुकुमार पाउलें, खांद्यावर लीलेनें धारण केलेलें धनुष्य अशी ही बाह्य अथवा हृदयस्थ मनोहर राममूर्ति पाहिली कीं चित्ताची हालचाल बंद होते. मधाला माशी चिकटली म्हणजे तिला जसें उडतां येत नाहीं, तसेंच ते गोजिरें रूप मनाला सोडवत नाहीं. **तुज पाहतां सामोरी। दृष्टी न फिरे माघारीं।।** असें होतें. धन्याला सोडून सेवकजन जसे दूर होत नाहींत, त्याप्रमाणें मन हें सर्व इंद्रियांचा राजा असल्यामुळें इंद्रियेंहि मनाबरोबर रामरूपांत रंगून जातात व त्यांची बाह्य धाव थांबते. राजाला मेजवानी मिळाली कीं सेवकांनाहि पक्वान्नांचा लाभ होतो, तसें मनाबरोबर इंद्रियानाहि परमानंद प्राप्त झाल्यामुळें तींहि सुखावतात. **घडूनि येतां ध्यान। रूपीं रमे मन।। इंद्रियेंही तें स्थान। सर्वथा न सोडिती।।** (द. म. ३७-७१) जिभेस अमृत लागलें कीं तें गोडी देऊन अमर करणारच. तसें रामरूपानें नटलेलें चैतन्य सर्व सुखाचें आगर असल्यामुळें त्याला चिकटलेलें मन व इंद्रियें हीं सुखरूप होणारच. ही वस्तुशक्ति आहे. हृदयस्थ अंतर्ध्यान हें उत्तम. पण तें साधण्यापूर्वी बाह्य ध्यान धरावें. परंतु त्या ध्यानानंतर मूर्तीचे विसर्जन हृदयांतच करावें म्हणजे देवाला आपल्यापासून दूर न ठेवितां तो हृदयस्थ असल्याची भावना अखंड असावी.

ध्यानांतील मुख्य विघ्न म्हणजे इतर चिंता उठणें हें होय. चित्त शुद्ध नसेल तर इतर चिंता उठण्याच्या थांबणार नाहींत. म्हणून चित्तशुद्धीसाठीं आचारविचारांची शुद्धता पाहिजे व इंद्रियनियमन अवश्य पाहिजे. चिंतारहित ध्यान झाल्यास याच सगुण रामध्यानानें सच्चिदानंदरूप आत्मारामाची निर्गुण स्वरूपाची ओळख पटून आत्मसाक्षात्कार होतो. **हें ध्यान पूर्वी जरी। सगुण वाटलें तरी। स्थिर होतां अंतरीं। निर्गुण करी हेंचि अंतीं।।** (द. म. ३४-४८) अन्य कोणतीहि वृत्ति न उठतां स्थिर ध्यानांत जेव्हां मन ध्येयाकार होतें, म्हणजे ध्येय, ध्याता, ध्यान ही त्रिपुटी मावळते, तेव्हां त्याला समाधि म्हणतात.

ध्यानाचा अभ्यास जसजसा वाढत जाईल, तसतसें या श्लोकांतील पुढील अनुभव साधकास येऊं लागतात. ध्यानाचा अभ्यासु कीर्तनश्रवणांत लगेच तल्लीन होऊन जातो. निर्विषय स्थितींतहि अपूर्व आनंद असतो, असा ध्यानयोगांत अनुभव आल्यामुळें त्याच्या विषयवासना हळूहळू कमी होत जातात व शेवटीं विषयच रामरूप होतात. म्हणजे कोणत्याहि वस्तूचें प्रथम नामरूप लक्षांत न येतां त्या वस्तूच्या अधिष्ठान चैतन्याचेंच स्मरण होतें. अभ्यास वाढेल तसा देहभावहि मावळत जातो. **देहभाव हारपला। तुज पाहतां**



**विठ्ठला।।** अशी अवस्था होते. ध्यानांत ध्येयाशी एकरूप होऊन समाधिअवस्था येऊं लागली कीं द्रष्टा होऊन दृश्यपणें पाहिलेलें जें सगुण रूप तेंच एक आत्मरूप असें अनुभवाचें ज्ञान होतें.

तात्पर्य, श्रवणमननादि करणाऱ्या समाधियुक्त पुरुषाच्या ठिकाणीं ध्यानाभ्यासामुळें आत्माच ब्रह्म अशा स्वरूपाचें मोक्षदायक अनुभवज्ञान सिद्ध होतें व तो ज्ञानी भक्त होतो. **हां गा पूर्णिमेआधीं कायी। चंद्र सावयवुचि नाहीं। परीं तिये दिवशीं भेटे पाही। पूर्णता तया।। तैसा मीचि ज्ञानद्वारें। दिसें परी हस्तांतरें। मग द्रष्ट्त्वीं तें सरे। मियांचि मी लाभे।।** (ज्ञा. १८-११२७,२८) पूर्णिमेपूर्वी चंद्र हा आपल्या स्वरूपानें संपूर्ण असला तरी त्याला पूर्णिमे दिवशींच आपल्या पूर्ण स्वरूपाची भेट होते. त्याप्रमाणें ध्येय, ध्याता किंवा दृश्य, द्रष्टा असें ध्यानांत जोंवर द्वैत असतें तोंवर देवाच्या चैतन्य स्वरूपाचें ज्ञान असलें तरी देव व भक्त असें हातभर लांबचें नातें राहतें, विभक्त नव्हे तो भक्त याची जाणीव येत नाहीं. पण द्रष्टुत्व संपून ध्येयाकार दृष्टि झाली, पाहतेपण संपलें कीं देवभक्तांचें ऐक्य होतें, भक्त देवाशीं एकवटतो व आपण देह नसून देव आहों, रामरूप तेंच आपलें रूप होय अशी त्याला प्रतीति येते. या परमभक्तीचा परिणाम असा होतो कीं **येणें मनोभंग होई । वासनाक्षयही होई । संशयसमूह जाई । हाता येई जीवन्मुक्ति।।** (द. म. ३४-५४) याप्रमाणें सुखरूप रामरूपांत जो शांतचित्त राहतो तोच जगांत धन्य होय.

★ ★ ★

**मना वासना वासुदेवीं वसों दे ।**
**मना कामना कामसंगीं नसों दे ।**
**मना कल्पना वाउगी ते न कीजे ।**
**मना सज्जना सज्जनीं वस्ति कीजे ।।१२८।।**

मानवदेह प्राप्त झाला असतां पापी, दुरात्मा कोण ठरतो हें श्लोक १२६ मध्यें सांगितलें व धन्यत्व कोणाला प्राप्त होतें हें मागील १२७ व्या श्लोकांत सांगितलें. दोन्हीहि गोष्टी लक्षांत घेऊन धन्यत्व प्राप्त करून घेण्याचें झाल्यास मनानें काय केलें पाहिजे हें या श्लोकांत सांगतात.

कल्पना, वासना व कामना या शब्दांचें स्पष्टीकरण श्लोक ५८ मध्यें सविस्तर केलें आहे, प्रथम स्फुरण कल्पनेचें, ती तीव्र म्हणजे वरचेवर उठूं लागली कीं वासना व वासनेची उत्कटता ती कामना एवढें लक्षांत ठेवलें

म्हणजे झालें. हे मना, तुला वारंवार, जेथें तेथें श्रीरामाची आठवण असूं दे. अन्य कोणाची नको, वासुदेव या शब्दानें सर्वत्र व्यापक असें आत्मारामाचें स्वरूप सुचविलें आहे, **वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः** या गीतावचनाचें स्मरण होतें. बा मना, कामादि विकारांत आसक्त होऊं नकोस बरें, तसेंच विषयाविषयीं उगीच भलभलत्या कल्पना करीत बसूं नकोस. त्यांची संगतीच नको. वाउगी म्हणजे धर्मशास्त्राला सोडून अनुचित कल्पना नको, अन्नपानादिक शरीरधारणेला आवश्यक अशा कल्पना असूं देत. पण शरीराचे चोचले पुरविणाऱ्या कल्पना नकोत. कारण धर्मशास्त्राला अनुसरून जे उत्तमोत्तम भाव आहेत ते ईश्वराचें वैभव आहे, त्यांत दैवी संपत्ति आहे. पण अमंगळ अथवा दुर्गतींला नेणाऱ्या भावांत विभूतिमत्त्व नाहीं. **धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ॥** (भ. गी. ७-११)

हे सज्जन मना, तुला या उपदेशाचें सार सांगवयाचें असेल तर तूं नेहमीं सज्जनांच्याच वस्तीला राहा, त्यांचाच आश्रय कर म्हणजे वाउगें कांही घडणार नाहीं. वास्तविक सत्संग हा देहानें घडतो व नंतर मनावर त्याचा सुपरिणाम होतो. साधूच्या संगतींत मनुष्य राहिला असतां डोळ्यानें त्याचा आचार पाहून व कानानें त्याचे विचार ऐकून मनुष्याच्या मनावर त्याचा संस्कार होतो आणि त्याच्या आचारविचारांत पालट होतो. पण येथें मनालाच सज्जनांच्या संगतींत राहा असें जें समर्थ म्हणतात याचा अर्थ काय? मनानें नेहमीं सज्जनांच्या परमार्थ-ग्रंथ विचारांतच वावरावें असें सांगण्याचा येथें समर्थांचा हेतु दिसतो. **आसुप्तेरामृते कालं नयेद्वेदान्तचिंतया । दद्यान्नावसरं किंचित्कामादनिमनागपि ॥** जागे झाल्यापासून निजेतोंपर्यंत त्याचप्रमाणें देहपात होईपर्यंत श्रद्धेने वेदांत शास्त्रांचा विचार करीत मनुष्यानें काल कंठीत राहावें व मनांत कामक्रोधादि विकारांना मुळींच थारा देऊं नये. सर्व काळ मन जर अध्यात्मविचारांत असेल तर दुष्ट विचार उत्पन्न होण्यास त्यास अवसरच मिळणार नाहीं. एखादा दुर्गुणी मनुष्य आपल्याशीं लगट करुं पहात आहे असें पाहून शहाणा मनुष्य त्याचें स्वागत न करितां जर त्याच्याकडे दुर्लक्ष करीत राहील, तर तो आलेला दुर्गुणी मनुष्य निराश, हिरमुसला होऊन आला तसा परत जाईल. दर खेपेस असें दुर्लक्ष दिसेल तर तो येण्याचा थांबेल. तसेंच मन जर अध्यात्मग्रंथांत रमून जाईल तर कामादि विकार वरचेवर मनांत उद्भवणार नाहींत, पुढें ते आपोआप थांबतीलच. यासाठीं पारखून पारमार्थिक ग्रंथांचाच मनानें आश्रय करावा. **जेणें परमार्थ वाढे । आंगीं अनुताप चढे । भक्तिसाधना आवडे। त्या नांव ग्रंथ ॥ इतर जे प्रपंचिक । हास्य विनोद नवरसिक । हित नव्हे तें पुस्तक । परमार्थासी ॥** (दा. ७-९-२९,३०) अद्वैत ग्रंथ वाचण्यांत रमावें या अर्थानें मनास सांगतात कीं, **मना सज्जना सज्जनीं वस्ति कीजे ।**



★ ★ ★

**गतीकारणें संगती सज्जनाची ।**
**मती पालटे सूमती दुर्जनाची ।**
**रतीनायिकेचा पती नष्ट आहे ।**
**म्हणोनी मनातीत होऊनि राहे ॥१२९॥**

भलभलत्या कल्पनांच्या किंवा वासनांच्या नादीं न लागतां रामरूपात किंवा पारमार्थिक ग्रंथवाचनांत तुझें वास्तव्य असूं दे, असें मागील श्लोकांत मनाला सांगितलें. या श्लोकांत सज्जनसहवासाची आवश्यकता सांगून त्यामुळें कोणतें हित साधतें, हें मनाला सांगतात. ईशस्मरण, अध्यात्मग्रंथविवरण व सज्जनसहवास या त्रिवेणी-संगमांत स्नान घडलें म्हणजे जीवाला शिवत्व प्राप्त होतें. मागील श्लोकांत वासुदेवस्मरण व अध्यात्मग्रंथ वाचन हीं दोन साधनें सांगितलीं. या श्लोकांत सज्जनसंगतीचें महत्त्व सांगतात.

मानवाला जर उत्तम गति म्हणजे मोक्ष प्राप्त करून घ्यावयाचा असेल, आपली असेलेलीच मुक्त स्थिति जाणावयाची असेल तर त्यानें सज्जनांच्या संगतींत राहावें. पण चालू काळांत साधू कोण व भोंदू कोण हें ओळखणें फार अवघड आहे. वरवर दिसणाऱ्या सज्जनांची संगत केल्यानें पुष्कळ माणसें फसलीं आहेत. म्हणून हा सत्संगहि नको व परमार्थहि नको असें अनेकांना वाटतें. पण सत्संगाच्या दृष्टीनें याच्या उलट दुसरीहि बाजू आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे. परमार्थासाठीं किंवा उत्तम गति मिळावी म्हणून सज्जनांचा शोध घेणारीं माणसेंहि फार थोडीं. आपल्या कांहीं प्रापंचिक वासना सफल व्हाव्यात या बुद्धीनें चमत्कारावर भाळून, जेथें चमत्कार तेथें साधुत्व असें मानून, आपण परमार्थ करितों असें वाटून एखाद्याच्या मागे लागणारीं माणसेंच फार. अज्ञानामुळें भलत्याच समजुतीनें नादाला लागलेलीं माणसें फसली तर त्यांत नवल काय ? सत्संगाची आवश्यकता जेव्हां दयाळु संत प्रतिपादन करितात तेव्हा सज्जन कोण, हेंहि ते बोट ठेवून दाखवितात व असा सज्जन भेटल्यास त्यास काय विचारावें हेंहि तें निश्चितपणें सांगतात. पण याकडे दुर्लक्ष होते म्हणून आपण फसतों. मोक्षस्थिति दाखविणाऱ्या साधूला

ओळखण्याचें पहिलें लक्षण जर कोणतें असेल तर तें निरपेक्षता हें आहे. **निरपेक्ष तो मुख्य 'भक्त'। निरपेक्ष तो अति 'विरक्त' । निरपेक्ष तो 'नित्यमुक्त'। सत्य भगवंत निरपेक्षी ।।** (ना. भा. २-७४४) आत्मस्थितींत वावरणाऱ्या आत्मतृप्ताला कशाची अपेक्षा असणार? **दुराशागुणें जो नव्हे दैन्यवाणा।।** असें पुढें श्लोक १६८ मध्यें समर्थांनी म्हटलें आहे. त्याला अपेक्षा कोणती असेल तर जीवाचें कल्याण व्हावें एवढीच. **जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति।।** तो सात्त्विक व वैराग्यसंपन्न असल्यामुळें जनाचा उद्धार करितो. **सन्मार्ग दाखवी जना । जो लावी हरिभजना । ज्ञान सिकवी अज्ञाना । तो सत्त्वगुण ।।** (दा. २-७-७९)

मनुष्यानें सत्संगासाठीं भगीरथ प्रयत्न करावा. त्यामुळें सतत मागें लागलेलें जन्ममरणाचें चक्र थांबतें. **सत्संगेन परं प्राप्य दुस्तरं तरतेऽचिरात् । तस्मादपि प्रयत्नेन सत्संगं सततं कुरु ।।** सत्संगाचा लाभ मिळतो अशी संधी आली रे आली कीं प्रापंचिक अडचणी थोड्या मागें पुढें करून मानवानें त्याचा निरंतर लाभ घ्यावा. त्यामुळें दुर्जनाची मति पालटून सुमति होते. म्हणजे अज्ञानी जीवाच्या दुर्मतींत पालट होऊन ती सुमति होते. ''दुर्जनाची मती पालटे सुमती (होये)'' दुर्जनाची मती म्हणजे दुर्मति. दुर्मति कोणती व सुमति कोणती हें गीतेंत सांगितले आहे. **तत्रैवं सति कर्तारमात्मानं केवलं तु यः । पश्यत्यकृतबुद्धित्वान्न स पश्यति दुर्मतिः ।।** (भ. गी. १८-१६) अकृतबुद्धि म्हणजे अशुद्ध बुद्धि. देह इंद्रियादिकांच्या कडून होणाऱ्या कर्माचें कर्तृत्व त्यांच्याशी एकरूप होऊन जो शुद्ध आत्म्यावर लादतो तो दुर्मति होय. सुर्यप्रकाशाच्या अस्तित्वावर घडून येणारे लोकांचे व्यवहार सूर्यावर लादणें हें मूर्खपणाचें लक्षण नव्हे का? तसें आत्मा अकर्ता असूनहि कर्ता वाटणें हीच दुर्मति होय. **ज्याची बुद्धि ये रीती । तो म्हणावा दुर्मति । तोचि जाणावा सुमति । ज्याची बुद्धि आत्मा अकर्ता देखते ।।** (य. दी. १८-४११) सत्संगानें ही दुर्मति जाऊन सुमति प्राप्त होते. म्हणजे बुद्धींतील अज्ञान जाऊन ती सज्ञान होते. यासाठीं अतिप्रयत्नानें सत्संग साधावा.

या सत्संगाच्या आड मुख्यत्वें कोणती गोष्ट येत असेल तर ती कामासक्ति होय. म्हणून म्हणतात कीं, नायका जी रति तिचा पति जो मदन तो महा चांडाळ आहे. जगांत स्त्री आणि धन हे दोन विषय अति मोह उत्पन्न करणारे आहेत. त्यांतल्यात्यांत स्त्रीमोह अतिदारुण आहे. स्त्रीलोभाने लुब्ध झालेला मनुष्य द्रव्यावर पाणी सोडून भिकारी बनण्यासहि तयार होतो.



स्त्रीमोहानें देहबुद्धि वाढते व त्यामुळें परमार्थाला पोषक असें विषयवैराग्य उत्पन्न होत नाही. **स्त्रीकामें प्रपंच सबळ । स्त्रीकामें दुःख प्रबळ । स्त्रीकामें मायेसी बळ । स्त्रीकामें सकळ मोहिलें जग ।।** (ना. भा. ३-२३४) म्हणून मदनाला चांडाळ म्हटलें. या चांडाळाची बाधा नको असेल तर हे मना, तूं निर्विकार होऊन रहा. मनातीत होऊनी राहे म्हणजे हे मना, तुझ्या ठिकाणीं अमनीभाव उत्पन्न होऊं दे. मनोव्यापारावर जय झाला असतां मन मुक्याप्रमाणें व्यापारशून्य होऊन राहतें. नाना प्रकारच्या वृत्ति हेंच मनाचें स्वरूप आहे. तें वृत्तिशून्य झालें कीं त्याचें मनस्त्व नष्ट होतें. हीच परम स्थिति होय. सत्संगाशिवाय किंवा सद्गुरुबोधाशिवाय ही परम स्थिति प्राप्त होत नाहीं, यासाठीं सत्संग धर.

कोणी अशी शंका घेईल कीं, स्त्रीकाम हा जर इतका प्रबल आहे तर निर्विकार मन होण्यासाठीं गृहस्थाश्रमी मनुष्यानें स्त्री सोडून वनांत जावें कीं काय? याचें उत्तर असें आहे कीं, स्वस्त्रीसहवास जितका अधिक तितका मोहविकाराला अवसर अधिक म्हणून नाथ म्हणतात, **''स्वस्त्रीशींही कार्यपुरतें। पाचारावें स्पर्शावें निरुतें। परी आसक्त होऊनिया चित्तें। सर्वथा तेथें नसावें।।''** (चि. प.) पण अशा तऱ्हेची वृत्ति होण्यासाठीं किंवा अशी मनाची घडण बनण्यासाठींहि सत्संग आवश्यक आहे.

★ ★ ★

**मना अल्पसंकल्प तोही नसावा ।**
**सदा सत्यसंकल्प चित्तीं वसावा ।**
**जनी जल्प विकल्प तोही त्यजावा ।**
**रमाकांत येकांतकाळीं भजावा ।।१३०।।**

उत्तम गतीसाठीं सत्संग धरावा. त्यामुळें बुद्धींतील अज्ञान दूर होऊन ती सज्ञान होते. स्त्रैण वृत्ति ही सत्संगाआड येते म्हणून तिचा त्याग करून मनातीत व्हावें, असें मागील श्लोकांत सांगितलें. मनातीत होणें म्हणजे काय व तें कसें व्हावें याचा स्पष्ट विचार या श्लोकांत सांगतात.

मनाचें स्वरूप केवळ वृत्तिरूप आहे. वृत्ति नाहीशा झाल्या कीं मनाचें मनपण नाहींसें होतें. **मनोवृत्ति तेचि मन जाण । वृतिहीन तेंचि मृतपण ।।** (यो. वा) म्हणून विचारानें चिकित्सा करून मनोनाश करावा लागतो. या मनाला विषयबाहुल्यामुळें मलिनता येते व निर्वासनेनें शुद्धता येते. वासनांनींच मन बद्ध होतें आणि निर्वासनेनें ते मुक्त होतें. अनेकजन्म वासनासंस्कारांमुळे मन

हें अनंत वृत्तींत रंगलेलें असतें. त्या वृत्तींतून त्याला काढणें हें कार्य एकदम होत नाहीं. पद्धतशीरपणें विवेकानें त्याला हळूहळू वृत्तिरहित करावें लागतें. ही पद्धत या श्लोकांत फार मार्मिकपणें सांगितली आहे.

ही पद्धत समजण्यासाठीं प्रथम तिसरें चरण नंतर दुसरें व नंतर पहिले चरण असा क्रम घेऊं. तिसऱ्या चरणांत ते सांगतात कीं मनांत येणाऱ्या मायिक विकल्पांचा प्रथमतः त्याग करावा. जल्प म्हणजे बडबड आणि विकल्प म्हणजे असत्य स्मरण. पण मुख्य विकल्प म्हणजे होय किंवा नाहीं हा संशय. संशयित, भ्रमात्मक म्हणजे अनात्म वस्तूबद्दल येणारे अनेक विचार प्रथमतः बंद करावेत. त्याची उगीच बडबड करीत बसू नये. हे अनात्मविचार बंद होण्यासाठीं आत्मवस्तूबद्दल विचार करीत राहावें असें दुसऱ्या चरणांत सांगतात. तात्पर्य हें कीं, मायिक किंवा प्रापंचिक विचार थांबवून पारमार्थिक विचारांत रहावें. **सत्य ब्रह्माचा संकल्प । मिथ्या मायेचा विकल्प । ऐसिया द्वैताचा जल्प । मनचि करी ।।** (दा. ७-५-४) जें पुढें टाकावें त्यावर झडप घालण्याची मनाला सवय आहे. म्हणून आत्मविचार पुढें केले कीं त्यांतहि तें रंगतें. परंतु मनोजय होण्यासाठी किंवा मनाचें मनपण नाहीसें होण्यासाठी अनात्म अगर आत्म असा कोणताच संकल्प उपयोगी नाहीं, असें प्रथम चरणांत सांगतात. सत्य ब्रह्माचा संकल्प करणारें मनहि वृत्तिरहित झालें पाहिजे. **वृत्तिरहित जें ज्ञान। तेंचि पूर्ण समाधान। जेथें तुटें अनुसंधान। मायाब्रह्मीचें।।** (दा. ७-५-१४)

हा विषय स्पष्ट होण्यासाठीं एक उदाहरण घेऊं. वारस नसल्यामुळें एका संस्थानाच्या राज्यावर एक हुशार, तरतरीत शेतकऱ्याचा मुलगा दत्तक घेऊन बसविला. पुढें शिक्षण घेऊन तो उत्तम राज्य करूं लागला. या मुलाच्या मनःस्थितीचा विचार केला म्हणजे वरील विवेचन स्पष्ट होईल. दत्तक गेल्यावर या मुलाला प्रथमतः आपल्या शेतकरी जीवनाची वरचेवर आठवण होईल. पण तो जसजसा राज्यकारभार पाहूं लागेल तसतसा आपण शेतकरी होतों, हें विसरत जाईल व आपण राजा आहों असा संस्कार त्याच्या मनावर होत जाईल. राज्यकारभारांत तो पूर्णपणें रुळला म्हणजे राज्य करीत असतांहि आपलें राजेपण विसरून तो राज्य करील. प्रथमतः शेतकरी जीवनाचें स्मरण. तें जाऊन पुढें राजा असल्याचें स्मरण व शेवटी राजा राहून राजेपणाचें विस्मरण. अशीच मनाची उन्नति होऊन तें उन्मन होतें. प्रथमतः जीवदेशेचें स्मरण, पुढें त्या दशेचें विस्मरण व आत्मदशेचें स्मरण, त्यापुढें आत्मस्वरूपीं राहून आत्मदशेचें विस्मरण हा अनुभव असल्यामुळें तो चिंतनांत येत नाहीं.



म्हणून सांगताहि येत नाहीं. **आकाराचें चिंतन। राहतां आत्माकार मन। जें उन्मनीं तें उन्मन। तें उन्मन जाणवेल परी चिंतवेना।।** (य. दी. २-६७०)

हा मनाचा उन्नतीचा क्रम जर सहज विनासायास साधावयाचा असेल तर त्यासाठीं उत्तम साधन म्हणजे रामरायाचें एकान्तांत एकाग्रतेनें, प्रेमानें भजन करणें हें होय. एकान्ताचें महत्त्व फार आहे. एकान्तांत संकोच वृत्ति व दांभिकपणा यांचा संचार नसतो, म्हणून चित्त रामस्वरूपीं जडण्यास सोईचें होतें. **शिष्या एकांतीं बैसावें। स्वरूपीं विश्रांतीस जावें। तेणें गुणें दृढावें। परमार्थ हा।।** (दा. ५-६-५८) पुढील श्लोक पाहतां या श्लोकांतील रमाकांत या शब्दानें समर्थांनी सगुण रामरूप सुचविलें आहे. एकान्तात श्रीरामाचें पूजन, भजन, ध्यान इत्यादि करावें. आत्मरूप हें निर्गुण आहे, निर्गुणांत मन स्थिर होणें हें अवघड जातें. रामरूपानें नटलेल्या आत्मचैतन्याचें ध्यान सुलभ पडतें. या सगुण रूपावरहि मन स्थिर न होतां इकडे तिकडे धांवूं लागलें तरी खेद न करतां नेटानें अभ्यास करून तें पुनः पुनः परतवून रामरूपीं स्थिर करावें. सगुण रूपावर धारणा धरून मन निश्चल झालें म्हणजे सगुण ज्ञान सिद्ध झालें. या सगुण ध्यानांतूनच निर्गुण धारणा, ध्यान इत्यादि अवस्थांतून मनाची सहज प्रगति होऊन तें उन्मन होतें. म्हणून सगुण रामरूपाचें एकांतांत भजन करावें असें सांगितलें. **या रूपींच पुनः पुनः। करावी स्थिर धारणा। येथें निश्चळ करितां मना। निर्गुणीं धारणा सहज होय।।** (द. म. १४-९५)

★ ★ ★

**भजाया जनीं पांहतां राम येकू ।**
**करी बाण येकु मुखीं शब्द येकू ।**
**क्रिया पाहतां उद्धरे सर्व लोकू ।**
**धरा जानकीनायकाचा विवेकू ।।१३१।।**

संकल्पविकल्परहित म्हणजे वृत्तिरहित अशी मनाची अवस्था व्हावयाची असेल तर एकांतांत श्रीरामभजन करावें, असें मागील श्लोकांत सांगितलें. आपण रामभजनाबद्दलच इतका आग्रह का धरीत आहों व त्याचा प्रसार कां करीत आहों याचें उत्तर समर्थांनीं या श्लोकांत सांगितलें असून विवेकयुक्त भजनमार्ग दाखविला आहे.

कोणतीहि व्यक्ति पूज्य होते, ती त्याच्या ठिकाणीं असलेल्या गुणामुळें. शरीर हें हाडामासाचें, घाण, मर्त्य आपलें आपणासच किळसवाणें.

अशा शरीराचें भजन कोण करील ? पण शरीर पूजनीय, होते तें आंतील गुणामुळे. वरवर दिसावयाला पूजा शरीराची पण ती खरी असते आंतील गुणांची. कपड्यावर घातलेला हार हा त्या कपड्यासाठीं नसतो, तो आंतील पुरुषाच्या गुणांसाठीं असतो. म्हणून **गुणाः पूजास्थानं गुणिषु नच लिंगं नच वयः।।** श्रीराम हें सुंदर प्रतीक चैतन्याचा गाभा असून बहुगुणी असें आहे. **सौंदर्यैर्वा गुणैर्वा रघुपतिसदृशो नास्ति देवो द्वितीयः।।** असें एक सुभाषित आहे. सौंदर्यानें किंवा गुणानें युक्त असें अन्य दैवत नाहीं.

एखादा जीवन्मुक्त स्वतः आत्मतृप्त असतांहि व त्याला कांही कर्तव्य नसतांहि, लोकसंग्रहार्थ ज्याप्रमाणें धर्माला अनुसरून त्याचा आचार असतो, त्याप्रमाणें स्वतः चैतन्यरूप आत्माराम असूनहि राजानें धर्मराज्य कसें करावें व सामान्य जनांनी उचित असें कौटुंबिक व सामाजिक जीवन कसें जगावें, याचें शिक्षण देण्यासाठीं हा भगवंताचा अवतार आहे. आज्ञाधारक पुत्र, प्रेमळ पति, पाठीराखा बंधु, अपेक्षारहित मित्र हे जसे श्रीरामाचे व्यक्तिगत गुण आहेत, तसेंच शौर्य, धैर्य, दातृत्व, प्रजानुरंजन इत्यादि राजाला शोभतील असेहि गुण त्याच्या ठिकाणीं आहेत. राजा हा सदाचारसंपन्न व धर्मनिष्ठ असला म्हणजे प्रजा त्याचें अनुकरण करून उचित मार्गानें वागते व तेव्हांच धर्मराज्य नांदतें. म्हणूनच **''राजा कालस्य कारणं''**, असें म्हटलें आहे. भारतीय वैदिक धर्मराज्य हें खरोखर स्पृहणीय आहे. अकालीं मरण नाही, उत्पात नाहींत, दुर्भिक्ष्य नाहीं, चोरी नाही, अधर्मानें वागणें नाहीं. **यथाकालीं पडे पर्जन्य । सर्वत्र पिके उत्तम धान्य । लोक होती वदान्य । मान्य राजा राज्य करितां ।।** (द. म. १६-७१) असें हें धर्म राज्य आहे. रामराजा हा समर्थ म्हणजे अनेक उत्तम गुणांनी युक्त असा राजा होता. म्हणून रामराज्य झालें. रामदास हे प्रचीति येऊन बोलणारे संत आहेत. केवळ कागदी पुराव्याला मान देणारे संत नव्हेत. ते म्हणतात, **''आमुचे कुळीं रघुनाथ । रघुनाथें आमुचा परमार्थ । जो समर्थाचा ही समर्थ । देवा सोडविता ।।''** (दा. ६-७-२१) **''रघुनाथ स्मरोनी कार्य करावें । ते तत्काळची सिद्धी पावे । कर्ता राम हें असावें । अभ्यांतरीं ।।''** (दा. ६-७-३३) या भावानें ''भजाया जनीं पाहतां राम येकू'' असें ते म्हणतात.

श्रीराम हे अवतारी पुरुष असल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं अनेक उत्तम गुणांचा समुच्चय असणें हें स्वाभाविक आहे. इतके गुण मानवांत असणें कठीण. पण ज्या गुणांमुळें मानव आपला उद्धार करूं शकेल असे कांहीं निवडक गुण त्याला रामचरित्रापासून अनुकरण करता येण्याजोगे आहेत, असें



तिसऱ्या चरणांत सांगून ते गुण कोणते हे दुसऱ्या चरणांत सांगितले आहेत. रामापासून घेतां येण्याजोगे गुण समर्थांनी आणखीहि एके ठिकाणीं सांगितलें आहेत. **कीर्ति या रघुनाथाची पाहतां तुळणा नसे । एक बाणी एक वचनी । एक पत्नीच धार्मिकु ।।** (मा. पं. १-६) हे मानवानें अनुसरण्यासारखे गुण नाहींत का ? श्रीरामाचा बाण दुष्टांचें निर्दळण व सुष्टांचें संरक्षण यासाठीं होता. त्याप्रमाणें मानवाला उचित कर्माबद्दल आदर व अनुचित कर्माबद्दल चीड पाहिजे. जसा श्रीरामाचा अचुक बाण तसा मानवाचा अचुक प्रयत्न असावा, **अचुक यत्न करवेना । म्हणोन केलें तें सजेना । आपला अवगुण जाणवेना । कांहीं केल्या ।।** (दा. १२-२-६) अचुक प्रयत्न, सत्कृत्याची चाड व दुष्कृत्याची चीड, सत्य वचन, परस्त्री मातेसमान व धार्मिक जीवन या गुणांचें अवलंबन करण्यांत मनुष्याचा उद्धार आहे. जे गुण श्रीरामाला प्रिय ते जर आपल्यांत असले तर आपण श्रीरामाचे लाडके होणार नाहीं कां? बापाला आवडणारे गुण जर मुलांत असतील तर तो बापाचा लाडका आहे हें काय सांगावयास पाहिजे ? **देवास ज्याची अत्यंत प्रीति। आपण वर्तावें तेणें रीतीं। येणेकरितां भगवंतीं। सख्य घडे नेमस्त।।** (दा. ४-८-३) हे गुण अंगीं बाणल्यास मनुष्याचा आठव्या म्हणजे सख्यभक्तींत प्रवेश होऊन, राम होऊन रामभजन होणारी नववी भक्ति त्याला साधते व त्याचा उद्धार होतो.

शेवटच्या चरणांत समर्थ असा इशारा देतात कीं जानकीनायकाचा विवेकु धरा, श्रीरामाच्या गुणांचें आम्ही वर्णन केलें म्हणून तो बहुगुणांनीं युक्त, गुणांत अडकलेला असा एक मानव आहे, असें मात्र समजूं नका. तसें समजाल तर तुम्ही अविवेकी ठराल. **अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितं।।** (भ. गी. ९-११) यासाठी त्या जानकीवल्लभाचा नीट विवेक करून त्याचें भजन करा म्हणजे त्याच्या ठिकाणीं असलेलें ईश्वरत्व, परमात्मतत्त्व हें ध्यानीं घ्या. हा जानकीवल्लभ म्हणजे आकाशादि भूतांचें व प्राण्यांचे अविनाशी आदिकारण होय असें जाणून त्याचें विवेकयुक्त भजन करा. सर्वत्र तोच पाहा व प्राणिमात्रांचा संतोष राखा, त्याला समर्थ भजन म्हणतात. **भेटो कोणी एकु नर। धेड महार चांभार। त्यांचें राखावें अंतर। याचें नांव भजन।।** मागील श्लोकांत एकान्त काळांतील भजन सांगितलें व या श्लोकांत सर्व काळीं होणारें ज्ञानयुक्त आत्माराम भजन सांगितलें. एकान्तांत जोंवर सगुण रामरूपभजनसाधन आहे तोंवर लोकातहि सगुण रामरूप पाहावें, एकान्तांत निर्गुण रामरूप अनुभवाला आलें कीं सर्वत्र आत्मारामच दिसेल.

★ ★ ★

**विचारूनि बोले विवंचूनि चालें ।**
**तयाचेनि संतप्त तेही निवाले ।**
**बरें शोधल्याविण बोलों नको हो ।**
**जनीं चालणें शुद्ध नेमस्त राहो ॥१३२॥**

श्रीरामाचे गुण व क्रिया लक्षांत घेऊन त्याप्रमाणें वागल्यास लोकांचा उद्धार होईल. म्हणून सगुण रामरूप लक्षांत घेऊन वागावें व तेंच रूप भूतमात्रांत पाहून त्याचें भजन करावें. याप्रमाणें त्याचें चिंतन सतत जागृत ठेवावें, असें मागील श्लोकांत सांगितलें. मनुष्याला जीवत्वाकडून ईशत्वाकडे जावयाचें असल्यास विचार व आचार यांच्या ऐक्यांचें केवढें महत्त्व आहे, तें या श्लोकांत सांगतात.

विचार असून आचार नसेल तर कार्यसिद्धि होत नाहीं आणि आचार असून त्याच्यामागें विचार नसेल तर कार्य व्हावें तसें होत नाहीं. म्हणून मनुष्याला आपली प्रगति जर झपाट्यानें करून घ्यावयाची असेल तर आचार व विचार या दोन्हीहि गोष्टींची आवश्यकता आहे. विचाराशिवाय आचार हा आंधळा आहे आणि आचाराविना विचार हा पांगळा आहे. पण आंधळ्यापांगळ्याचें ऐक्य झाल्यास प्रगति मात्र होते. पांगळा वाट दाखवितो व आंधळा चालतो. या दुचाकी गाडीची जाहिरात समर्थांनीं दासबोधांत ठिकठिकाणीं दिली आहे. ही दुचाकी जनालाच चालवितां येते, जनावराला नाहीं. इतकेंच काय पण ती ज्याला चालवितां येते तोच मनुष्य, असें समर्थांचें म्हणणें आहे. **विवेकहीन जे जन। ते जाणावे पशूसमान। त्यांचें ऐकतां भाषण। परलोक कैंचा॥** (दा. १२-८-२४) मानवी जीवन म्हटलें कीं तेथें आचारामागें विचार पाहिजे. म्हणूनच श्लोक ४१ मध्यें ''विचारें बरें अंतरा बोधवावें'' असें सांगितलें व श्लोक १०५ मध्यें ''विविकें क्रिया आपुली पालटावी'' असें सांगितलें. बोलण्याचालण्यामागें विचार असला म्हणजे काय लाभ होतो तें या श्लोकांत सांगतात.

जो विचार करून बोलतो व अति विचारपूर्वक चालतो त्याला स्वतःला तर शांति मिळतेच, पण त्याच्या सहवासांत येणारे जे संसारपीडित लोक तेहि त्याचें बोलणें ऐकून व चालणें पाहून समाधान पावतात. मनुष्यानें विवेकानेंच योग्य तो विचार निवडून त्याप्रमाणें बोललें चाललें पाहिजे, **विचारें जाणावा विचार। अंतरीं जाणावें अंतर॥** विचारानेंच विचाराची निवड होते व मनानेंच मन जाणतां येतें. विवंचूनि म्हणजे विचाराचें मंथन करून,



समुद्रमंथनातून विष निर्माण झालें तसें अमृतहि निर्माण झालें. त्याप्रमाणें विचाराचें घुसळणें सुरू झालें म्हणजे त्यांतून साधकबाधक असे सुष्ट व दुष्ट विचार बाहेर पडतात. त्यांतून सुष्ट विचारग्रहण करून त्याप्रमाणें वागावें व बोलावें. विचारूनि बोले म्हणजे जो विचार करून बोलतो आणि विवंचूनि चाले म्हणजे अति विचारपूर्वक किंवा काळजीपूर्वक वागतो, तोच स्वपरसमाधान राखूं शकतो. बोलणें बोलून संपतें पण कर्म-फल भोगावें लागतें. यासाठीं वागणें अति विचारपूर्वक व सावधानतेचें पाहिजे.

आतां विचारमंथन तरी कोणत्या गोष्टींचें करावें असें विचारल्यास समर्थ म्हणतात कीं सृष्टीपासून तों सृष्टिकर्त्या ईश्वरापर्यंत सर्व गोष्टींचा विचार पुनः पुनः करावा. **परमेश्वरें निर्मिलें तें। अखंड दृष्टीस पडतें। विवरविवरों समजावें तें। विवेकी जनीं॥** (दा. १८-२-२५) **तो निर्माण करतो जना। परी पाहों जातां दिसेना। विवेकबळें अनुमाना। आणीत जावा॥** (दा. १८-२-२७) या सर्व विचारमंथनाचें वर्म हें आहे कीं प्रगतीस उपयुक्त असतील असे सार विचार उराशीं बाळगावेत व जे निरुपयोगी असार विचार असतील, ते कां निरुपयोगी आहेत हें जाणून सोडून द्यावेत. उच्च विचारानेंच मनुष्य आपली प्रगति करीत असतो. **विचारें ऊर्ध्व चढती। तयासीच ऊर्ध्वगति। येरां सकळां अधोगति। पदार्थज्ञाने॥** (दा. १७-३-२१) अशा उच्च आचार-विचारी पुरुषांच्या संगतींत जे कोणी त्रिविध तापानें कष्टी झालेले लोक येतात, त्यांना प्रपंच व परमार्थ या दोन्हीही बाबतींत योग्य तें मार्गदर्शन घडतें व त्यामुळें समाधान मिळतें. प्रपंच व परमार्थांत जो योग्य विचारानें वागतो तोच विवेकी, तोच मुक्त व तोच दुसऱ्यास समाधान देतो. **संसारीं असतां मुक्त। तोचि जाणावा संयुक्त। अखंड पाहे युक्तायुक्त। विचारणा हे॥** (दा. १२-१-८)

प्रपंचात अथवा परमार्थांत युक्तायुक्त विचार करूनच वागावें व मग बोलावें. ज्या गोष्टीबद्दल आपला ठाम विचार झाला नसेल तेथें ''यांतील मला कांहीं माहीत नाहीं'' असें स्पष्ट सांगण्यास लाजूं नये. माहीत नसलेल्या गोष्टीबद्दल आपलें अज्ञान नम्रपणें व्यक्त करावें. विचार झाल्याशिवाय उगाच बोलत सुटूं नये आणि सतत सदाचाराचेंच जीवन जगावें. समर्थ म्हणतात, **'मुख्य यत्न विचाराचा। त्यावरी बोलणें बरें॥ चालणें सत्य नेमाचें। नीतिन्याय चुकों नये॥'** (स्फू. प्र. २-२)

★ ★ ★

**हरीभक्त वीरक्त विज्ञानराशी ।**
**जेणें मानसीं स्थापिलें निश्‍चयासी ।**
**तया दर्शने स्पर्शनें पुण्य जोडे ।**
**तया भाषणें नष्ट संदेह मोडे ।।१३३।।**

बोलणें चालणें यांच्यामागें विचाराची बैठक असली म्हणजे तो मनुष्य स्वपरसमाधान कसें राखूं शकतो, हें मागील श्लोकांत सांगितलें. एका आत्मबुद्धीचा निश्चय झाला म्हणजे भक्ति, ज्ञान, वैराग्य व स्वरूपानुभव हे प्राप्त होऊन मनुष्याचें सामर्थ्य कसें वाढतें, हें या श्लोकांत सांगतात.

सामान्यपणें पाहिल्यास भजन किंवा कीर्तन करणारा हरिदास बहुधा विरक्त नसतो व पुष्कळ ज्ञान सांगणारा ज्ञाता हा भक्त नसतो. हे दोन्ही गुण एकत्र एकाच व्यक्तींत असणें हें भाग्य होय. **तैसा हरिदास आणि विरक्त। ज्ञाता आणि प्रेमळ भक्त। वित्पन्न आणि वादरहित। तरी हेही अपूर्वता।।** (दा. १४-५-४) ही अपूर्वता सृष्टीसंबंधी सारासार व देहासंबधीं नित्यानित्य विवेकानें लाभते. कोणतेंही कर्म विवेकानें डोळस म्हणजे शुद्ध निर्दोष होतें. आवडीनुसार कोणत्याहि देवाचें नामरूप स्वीकारलें तरी भक्ति होते, ती एका अंतरात्म्याचीच होय असा विवेकानें निश्चय झाला कीं, तीच शुद्ध हरिभक्ति होय. त्याप्रमाणें सर्व चराचर सृष्टीचें आत्माराम हेंच अधिष्ठानचैतन्य असल्यामुळें आपलें स्वरूपहि तेंच आहे, मी असा अन्य कोणी नाही, असें विवेकानें ज्ञान होऊन तें अनुभविणें हेंच शुद्ध ज्ञान व विज्ञान होय. **जीवु परमात्मा दोनी एक। ऐसें जाणणें तें 'ज्ञान' देख। ऐक्यें भोगणें परमात्मसुख। 'विज्ञान' सम्यक त्या नांव।।** (ना. भा. १९-६५) शास्त्र व गुरूपासून शाब्दिक ज्ञान झालें तरी त्याचा अनुभव येण्यासाठीं व तो दृढ होण्यासाठीं धारणाध्यानादि अभ्यास करावाच लागतो. त्यानंतरच आत्मस्वरूपाचा निश्चय दृढ होऊन त्याचा विसर पडत नाहीं. **आत्मबुद्धि निश्चयाची। तेचि दशा मोक्षश्रीची। अहामात्मा हें कधींचि । विसरों नये ।।** (दा. ५-१०-३८) कोऽहं हा संदेह नाहींसा होऊन सोऽहं असें निश्चयात्मक ज्ञान झालें पाहिजे. असें आत्मज्ञान झालें आहे हें ओळखण्याची खूण तरी कोणती? जो आत्मानुभवी असतो तो सदानंदी असतो. त्याला आनंद भोगण्यासाठीं इतर जनांप्रमाणें विषयाची आवश्यकता नसते. विषयविरहित असा त्याचा आनंद असतो. सच्चिदानंद अशा आत्मस्वरूपीं निमग्न आहे तो आनंद शोधण्यासाठीं दुसरीकडे पाहील कशाला? **आणीक एक तेथींचीं खूण। विषयावीण स्वानंद पूर्ण।**



**हें अनुभवाचें मुख्य लक्षण। सत्य जाण सात्वता।।** (ना. भा. १९-३१) अशा साक्षात्कारी पुरुषाला कशाचीही अपेक्षा राहात नसल्यामुळें त्याच्या ठिकाणीं दृढ वैराग्य असतें. कशाचीहि स्पृहा नसणें तेंच दृढ वैराग्य. **जेथ निःस्पृहता समूळ सांग । त्याचि नांव दृढ वैराग्य ।।** (ना. भा. २५-६४) सारांश, आत्मनात्मविवेकयुक्त भजनसाधनामुळें तो अनन्य भक्त असतो, आत्मज्ञानामुळें तो ज्ञानी असतो, त्या ज्ञानाच्या अनुभवामुळें तो विज्ञानी असतो व आत्मतुष्टीमुळें तो विरक्त असतो.

अशा पुरुषाच्या दर्शनानें, स्पर्शानें पुण्य लाभतें व त्याच्या भाषणानें दुसऱ्यालाहि निश्चयाचें ज्ञान होतें. पुण्य जोडणें म्हणजे ब्रह्मज्ञान होणें. समर्थ दृश्य मायेला पाप म्हणतात व सत्य ब्रह्माला पुण्य म्हणतात. **दृश्य पाप वोसरलें । पुण्य परब्रह्म उरलें । अनन्य होतांच जालें । नामातीत ।।** (दा. १०-१०-५६) म्हणून **''आत्मज्ञान पाहे सदा । त्याच्या पुण्यास नाहीं मर्यादा ।।''** (दा. १०-१०-६५) वरील गुणांनीं युक्त असा पुरुष आपल्यांतील ज्ञानशक्तीचा प्रवेश दुसऱ्याच्या ठिकाणीं करूं शकतो. एवढें त्याच्या ठिकाणीं सामर्थ्य उत्पन्न होतें. यालाच शक्तिपात असें म्हणतात. या शक्तिपाताचें सामर्थ्य ज्या पुरुषाला असतें त्याला योगीराणा असें पुढील श्लोकांत समर्थांनीं म्हटलें, आहे. हें शास्त्र मोठें गमतीदार असून भारतीय विरक्त सत्पुरुषांचें अचाट आध्यात्मिक सामर्थ्य दाखविणारें तें आहे. या श्लोकांतील तें गुह्य रहस्य असल्यामुळें त्याचा थोडक्यात विचार पाहूं.

शक्तिपात म्हणजे काय याची सुंदर व्याख्या मुकुंदराजांनीं आपल्या विवेकसिंधूंत दिली आहे. **तेथ ज्ञानशक्तीचा प्रवेशु । अज्ञानशक्तीचा निरासु। उठिला स्वयं प्रकाशु। शिष्य चैतन्यीं।।** या ज्ञानशक्तीचा प्रवेश चार प्रकारांनी गुरु करितात. **दर्शनात् स्पर्शनात् शब्दात् कृपया शिष्य देहके ।।** (१) शिष्याकडे पाहून (२) त्याला स्पर्श करून, (३) शब्दमंत्राने किंवा उपदेश करून किंवा (४) त्याचें कल्याण व्हावें एवढी इच्छा झाल्यानें. या संबंधीचे भरपूर दाखले ज्ञानेश्वरींत पाहावयास मिळतात. सद्गुरु-स्तवनांत ज्ञानेश्वरांनी ठिकठिकाणी ज्या ओव्या घातल्या आहेत त्या पाहिल्या म्हणजे, त्यांचे गुरु जे निवृत्तिनाथ त्यांच्याठिकाणीं वरीलप्रमाणें चारहि प्रकारांनीं शक्तिपात घडवून आणण्याचें सामर्थ्य होतें असें दिसतें. कसें तें पाहा.

स्पर्श- **ज्ञानदेव म्हणे मी चाडें । सद्‌गुरूंनीं केला कोडें । माथां हात ठेविले तें फुडें । बीचि वाइलें ।।** (ज्ञा. ६-४९२) श्रीकृष्णांनीं अर्जुनाला मिठी

मारली त्याचें कारण सांगतांना ज्ञानोबा म्हणतात, **''ऐसें जें कांहीं एक । बोला बुद्धीसीही अटक । तें द्यावया मिख । खेवाचें केलें ॥''** (ज्ञा. १८-१४२०) श्रीकृष्णानें उद्धवाची पाठ थोपटली याचें कारण सांगताना नाथ म्हणतात, **''पाठी थापटवयामिसें जाण । करित स्वशक्तिसंचरण । तेणें अद्वबोधलक्षण । उद्धवासी जाण प्रकाशी ॥''** (ना. भा. ११-१२८) स्पर्श व दृष्टिक्षेप :- **हें असो दिठी जयावरी झळके । कीं हा पद्मकरूं माथां पारुखे । तो जीवची परि तुके । महेशेशी ॥** (ज्ञा. १०-९) **कृपाकटाक्षें न्याहाळिलें । आपुल्यापदीं बैसविलें ॥** शब्द :- चौदाव्या अध्यायांत विषय सुरू न करितां ज्ञानोबांनी गुरुचें स्तवनच चालूं ठेविलें. तेव्हां निवृत्तिनाथ म्हणतात- **''हें असो आता वाजटा । तो ज्ञानार्थ करूनी गोमटा । ग्रंथ दावी उत्कंठा । भंगों नेदी ॥''** यावर ज्ञानेश्वर उत्तर देतात- **''हो कां जी स्वामी । हेंचि पाहातु होतों मी । जें श्रीगुरुमुखें म्हणा तुम्ही । ग्रंथू सांग ॥''** (ज्ञा. १४-२६,२७) कृपा :- कृपेनें होणाऱ्या शक्तिपाताचें वर्णन श्लो. १५१ मध्ये 'सानुरागें' या शब्दानें केलें आहे. तेथें त्याचा विचार पाहू.

या शक्तिपाताचा मुख्य हेतु शिष्याच्या ठिकाणींच असलेली ज्ञानशक्ति जागृत करून वृत्तिरहित अवस्थेच्या द्वारा त्याला अद्वैतबोधाचा अनुभव दाखविणें हा होय. म्हणून समर्थ म्हणतात- **''मुख्य शक्तिपात तो ऐसा । नाहीं चंचळाचा वळसा । निवांतीं निवांत कैसा । निर्विकारी ॥''** (दा. १५-१०-१३) या गूढ अर्थानें ''तया दर्शनें स्पर्शनें पुण्य जोडे॥'' असें समर्थ म्हणतात.

★ ★ ★

**नसे गर्व आंगीं सदा वीतरागी ।**
**क्षमाशांति भोगी दयादक्ष योगी ॥**
**नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा ।**
**इहीं लक्षणीं जाणिजे योगिराणा ॥१३४॥**

आत्मानुभवी, विरक्त अशा हरिभक्ताच्या दर्शनानें, स्पर्शानें, पुण्यलाभ होऊन त्याच्या संभाषणानें संशयनिवृत्ति होते, असें मागील श्लोकांत सांगितलें. परंतु वैराग्य, उत्कट हरिप्रेम व आत्मानुभव हीं अंतरंगातील लक्षणें असल्यामुळें तीं दुसऱ्यास समजणें कठीण म्हणून अशा विज्ञानराशी भक्तांची कांहीं बाह्य लक्षणें या श्लोकांत सांगतात.

तो गर्विष्ठ असत नाहीं, नम्र असतो. गर्व म्हणजे ताठा, गर्वांत तुच्छतेचा भाव असतो. सर्वत्र आत्मदर्शन अनुभविणारा हा भक्त कोणाशीं गर्व



करणार? म्हणून तो भूतमात्रीं नम्र असतो.

तसाच तो वीतरागी असतो. वि+इ-जाणें. वीत म्हणजे गेलेला आहे, राग म्हणजे विषयांवरील प्रेम ज्याचें, असा तो विरक्त असतो. ज्याला विषयांत प्रेम वाटत नाही तो त्याच्या नादीं कशाला लागेल? म्हणून तिसऱ्या चरणांत त्याला लोभ नसतो व भिकाऱ्यासारखा दीन होऊन तो विषयांच्या मागें लागत नाहीं किंवा विषय नसले म्हणजे तो अस्वस्थ होत नाहीं किंवा त्रासत नाही, असें म्हटलें आहे. त्याच्या सर्व वासनांचा क्षय झालेला असतो. **अनन्य करितां माझें भजन । माझ्या स्वरूपीं झगडलें मन । सकळ वासना गेल्या विरोन । वृत्तिशून्य अवस्था ॥** (ना. भा. १४-१६२) ही वृत्तिशून्य अवस्था म्हणजेच निरपेक्षता. **वृत्तिशून्य अवस्था । ती नाव जाण निरपेक्षता ॥** (१४-१६६)

तसेंच त्याच्या ठिकाणीं क्षमा आणि शांति हीं लक्षणें असतात, असें दुसऱ्या चरणांत म्हणतात. क्षमा म्हणजे दुसऱ्यांच्या अपराधाबद्दल त्याला शिक्षा करण्याचें सामर्थ्य अंगात असतांहि त्याचे अपराध सहन करणें किंवा पोटांत घालणें. प्रतिकार करण्याची शक्ति नसलेला दुबळा मनुष्य दुसऱ्याचे अपराध सहन करितो, पण ती क्षमा नसून तें दुबळेपण होय. शक्ती असून अपराध सहन झाला म्हणजे अपराधी मनुष्य आपल्या गैरवर्तनाबद्दल लाजतो व पश्चात्ताप पावतो.

शांति म्हणजे क्रोध उत्पन्न होण्याला कारण असतांहि रागास न येणें असा नेहमींचा अर्थ आहे. पण येथें ''दयादक्ष योगी'' हीं पुढील लक्षणें लक्षांत घेतां शांति या शब्दाचा ज्ञानोबांनी दिलेला अर्थ ग्राह्य वाटतो. **तैसी ज्ञेया देतां मिठी । ज्ञातृत्वही पडे पोटीं । मग उरे तेंचि किरीटी । शांतिचें रूप ॥** (ज्ञा. १६-१४०) आत्मरूपीं ऐक्य पावून त्या स्वरूपाची जाणीवहि न राहतां सहज स्वरूपीं असणें, याला शांति म्हणतात. असा शांत पुरुषच त्याच्या संगतींत येणाऱ्या दुसऱ्यांचा उद्धार करूं शकतो व भूतदयेविषयीं दक्ष असतो.

पीडितांची कींव येऊन त्याचें रक्षण करण्याची जी इच्छा त्याला दया म्हणतात. आत्म्याच्या अविकारी स्वरूपाची व त्याच्यावर कशाचाहि आघात होत नाही याची या योग्याला जाणीव असल्यामुळें तो स्वतः जरी सहनशील व क्षमावंत असला तरी प्राणि-मात्रांच्या दयेबद्दल तो दक्ष असतो, कारण सर्व जीव सुखांत नांदावेत अशी त्याची सद्वासना असते. अनेक जीवरूपानें नटलेल्या परमात्म्याला कोणी दुखवूं नये असें त्याला वाटतें. म्हणून शांतचित्त असूनहि परपीडकाला तो शिक्षा देतो. या दृष्टीनें तुकोबा म्हणतात तें लक्षांत

ठेवण्यासारखें आहे. **परपीडक तो आम्हां दावेदार। विश्वीं विश्वंभर म्हणऊनि।। दंडू त्यागू बळें नावलोकूं डोळां। राखूं तो चांडाळ ऐसा दुरी।। अनाचार कांहीं न साहे अवगुण। बहु होय मन कासावीस।।** (गा. ३३९७)

अशा बाह्य लक्षणाचा हा योगी असतो. योगी म्हटलें कीं समाधि लावून बसणारा अष्टांगयोगी लगेच ध्यानांत येतो. परंतु योगी या शब्दाचा अष्टांगयोगी एवढाच अर्थ नसून निष्काम कर्म, भक्ति, ज्ञान व योग या कोणत्याहि उपायानें जो आत्मारामाशी जोडला जातो किंवा चित्तानें अखंड जडला जातो, तो योगी होय. **अखंड योग म्हणोन योगी।।** (१७-१-२३) चौथ्या चरणांत सांगतात कीं या लक्षणांनी युक्त असेल तो योगीराणा समजावा. आत्मतृप्त झाल्यामुळें ज्याच्या अंतःकरणांतील सर्व विषयवासना नष्ट झाल्या आहेत. अशांच्या ठिकाणींच धगधगीत वैराग्य असतें व अशांनाच सोनें, रुपें मृत्तिकेसमान असतें. योगीराणा किंवा महायोगी याची समर्थांची व्याख्या अशी आहे. **प्रत्ययेज्ञानी वीतरागी। विवेकबळें सकळ त्यागी। तो जाणीजे महांयोगी। ईश्वरी पुरुष।।** (दा. १२-७-१८)

★ ★ ★

**धरीं रे मना संगती सज्जनाची**
**जेणें वृत्ति हे पालटे दुर्जनाची ।**
**बळें भाव सद्‌बुद्धि सन्मार्ग लागे ।**
**महा क्रूर तो काळ विक्राळ भंगे ।।१३५।।**

मागील १३३ व १३४ श्लोकांत हरिभक्त अशा योगीराण्याचीं अंतरंगातील व बाह्य लक्षणें सांगितलीं. अशा या सज्जन भक्ताच्या संगतींत राहिल्यास काय प्राप्त होतें, तें या श्लोकांत मनाला सांगतात.

या श्लोकांतील पूर्वार्धांतील विवेचन ''गती कारणें संगती सज्जनाची'' या १२९ व्या श्लोकांत सविस्तर केलें आहे. सज्जन कोणाला म्हणावें, दुर्जनाची दुर्मति म्हणजे काय व त्यांत पालट कसा होतो इत्यादि विवेचन त्या श्लोकांत आलें असल्यामुळें येथें द्विरुक्ति न करितां उत्तरार्धाकडे वळूं या. दुर्जनाची दुर्मति जाऊन सुमति प्राप्त होणें किंवा दुर्जनाच्या वृत्तींत पालट होणें म्हणजे बुद्धींतील अज्ञान दूर होऊन ती सज्ञान होणें किवा देहबुद्धि जाऊन आत्मबुद्धि निर्माण होणें होय. एवढें लक्षांत ठेवलें म्हणजे उत्तरार्ध स्पष्ट होईल.

सज्जनाच्या संगतीपासून वृत्तींत कसा पालट होत जातो हें उत्तरार्धांत



सांगतात. भाव बळें सद्‌बुद्धि सन्मार्ग लागे, तो महाक्रूर विक्राळ काळ भंगे, असे हे सत्संगामुळें होणारे फायदे आहेत. **भाव बळे-** भाव म्हणजे प्रेम अथवा विश्वास. साधुसंगतींत विषयवासना हळूहळू कमी होत जातात व ईश्वराबद्दलचें प्रेम वाढत जातें. वासनांचें बीज जसजसें जळत जाईल तसतसें भगवन्नामांत प्रेम उत्पन्न होतें. तसेंच कर्तेसवर्ते आपणच आहों हा जो देहअहंकार असतो तो नाहींसा होऊन कर्ता-करविता एक ईश्वरच आहे, असा विश्वास वाढत जातो व त्यामुळें ईशकृपा होते.

**येके भावनेसाठीं। देवासीं पडे तुटी। कां ते होय कृपादृष्टी। देव कर्ता भावितां।।** (दा. ६-७-३७) याप्रमाणें स्वतःचा अहंकार कमी होत जाऊन सत्संगामुळें देवावरील प्रेम व विश्वास हे बळावतात.

**सद्‌बुद्धि सन्मार्ग लागे -** प्रेम व विश्वासाबरोबरच हळूहळू प्रपंचाबद्दल वीट येऊं लागतो, मनापासून विषय सुटत जाऊन ईश्वरप्राप्ति हेंच एक मानवदेहाचें अंतिम ध्येय होय, असा बुद्धिचा दृढ निश्चय होतो. ही निश्चयात्मक बुद्धि म्हणजेच सद्‌बुद्धि होय. **दुर्लभ जे सद्‌बुद्धि। जिये परमात्मचि अवधि।।** (ज्ञा. २-२४१) अशी ही दुर्लभ सद्‌बुद्धि सत्संगाने प्राप्त होते. धन, स्त्री, पुत्र, मित्रादिक या इतरांचा संग बाधक होतो, तो कुबुद्धि निर्माण करितो. **तैशी नव्हे सत्संगति। संगें छेदी आसक्ति। देशसंगा। तेथ उपदेश नलगे कांहीं। संगेंचि देहीकरी विदेही।** (ना. भा. २६-३५२-३५३) सद्‌बुद्धि प्राप्त झाली कीं मनुष्य विहित मार्गानेंच वागूं लागतो. कारण सन्मार्गानेंच ईश्वर संतुष्ट होतो याची सत्संगामुळेंच त्याला जाणीव येते.

**तो महाक्रूर विक्राळ काळ भंगे -** तापट, निर्दय, भयप्रद असें वाटणारें यमराजाचें स्वरूपहि सत्संगानें भंग पावतें म्हणजे नाहीसे होऊन निर्भयता प्राप्त होतें. काळाचें स्वरूप तीन प्रकारचें आहे. एक गणना काल म्हणजे निमिष, पळघटि, दिन इत्यादि. दुसरा अक्षय काल म्हणजे सृष्टि असेपावेतो नांदणारा काल. तिसरा सर्व हरण करणारा काल म्हणजे नाश किंवा मृत्यु. यांतील पहिल्या दोन कालांबद्दल कोणाला भीति वाटत नाहीं, पण तिसरें स्वरूप सगळ्या जगाला घाबरें करितें. सज्जनसंगतींत आपल्या व कालाच्या अशा दोघांच्याहि स्वरूपाचा विवेक होऊन निश्चयात्मक ज्ञान होतें व त्यामुळें निर्भयता प्राप्त होते.

आपण स्वतः आत्मस्वरूप असल्यामुळें आपला असा मानिलेला पंचभूतात्मक देह, काल नाहींसा करितो, आपल्यावर त्याचा कांहीं परिणाम

होत नाहीं, असें स्वस्वरूपाचें ज्ञान होतें. तसेंच काल म्हणजे कोणी एक भयानक, क्रूर पुरुष नसून जें जें जुनें जर्जर तें तें नाहींसें करून नवे पदार्थ पुरविणारें जगाला उपकारक असें तें भगवंताचें स्वरूप आहे, असें कालाबद्दलचेंहि ज्ञान उपकारक होतें. **अहमेवाक्षयः कालो॥ मृत्युः सर्वहरश्चाहं॥** (भ. गी. १०-३३,३४) इत्यादि भगवद्वाक्यांचा सज्जनसहवासांत उलगडा होतो व आपलें व कालाचें स्वरूप एकच या अद्वैत बोधामुळें निर्भयत्व प्राप्त होतें. **आत्मा एकत्वें अभेद। कालनामें तोचि प्रसिद्ध। जीव तदंशे चिदत्वें शुद्ध। त्यासी काळादि द्वंद्व बाधीना॥** (ना. भा. २३-८७५) याप्रमाणें विवेक उत्पन्न होऊन विक्राळ यमाचें स्वरूप भंग पावतें व त्या ठिकाणीं परमात्म-दर्शन घडतें. **विवेकदृष्टी पाहतां जाण। काळ परमात्मा दोन्ही अभिन्न॥** (ना. भा. २४-४८५) म्हणून हे मना, सज्जनसंगति धर.

★ ★ ★

**भयें व्यापिलें सर्व ब्रह्मांड आहे ।**
**भयातीत तें संत आनंत पाहे ।**
**जया पाहतां द्वैत काही दिसेना ।**
**भय मानसीं सर्वथा ही असेना ॥१३६॥**

सज्जनांच्या संगतींत वृत्तींत पालट होऊन सद्बुद्धि प्राप्त होते, सन्मार्ग लागतो भयप्रद असें यमाचें रूपही भगवद्रूपच होय याची जाणीव येऊन अभय प्राप्त होतें, असें मागील श्लोकांत सांगितलें. सर्व ब्रह्मांड भयानें व्यापिलें असून एक ब्रह्म किंवा ब्रह्मस्वरूप झालेले ज्ञानी संत एवढेच निर्भय असतात, असें सांगून त्या निर्भयतेचें कारणहि या श्लोकांत सांगतात.

सर्व ब्रह्मांडाकडे पाहिलें म्हणजे जड अगर चेतन कोणतीहि वस्तु असो, त्यांत विरोध दिसतो. त्यामुळें सर्व ब्रह्मांडच भीतीनें व्याप्त दिसतें. जड अशा पंचमहाभूतांत पृथ्वीला पाणी खातें, पाण्याला अग्नि आटवितो, अग्निला वायु विझवितो व वायूला आकाश गडप करितें. सृष्टिकार्यांत ही जीं एकत्र नांदत आहेत तीं परमेश्वराच्या भीतीनेंच. जीवाजीवांतही स्वाभाविक विरोधामुळें भीति दिसते. मुंगूस-साप, उंदिर-मांजर, गाय-वाघ, इत्यादिकांत स्वाभाविक विरोध व भीति आहे. मानवांत धनिक गरीबावर, सशक्त अशक्तावर, बुद्धिमान् निर्बुद्धावर सत्ता गाजवितो म्हणूनच बळी तो कान पिळी असें म्हटलें जाते. भोगांना रोगाचें भय, शास्त्राला वादाचें, वित्ताला चोराचें



किंवा कराचें, रूपाला जरेचें असें जिकडे पहावें तिकडे भीतीचें वातावरण दिसतें. एखादा शूर पुरुष प्राणाचीहि पर्वा न करतां लढतो पण ही व्यावहारिक निर्भयता असून तिच्यामागें शत्रुभीति हे कारण आहेच. येथें जगांत स्वाभाविक भय कसें नांदतें याचा पारमार्थिक दृष्टीनें विचार मांडला आहे, म्हणून सर्व ब्रह्मांड भयें व्यापिलें आहे, असें प्रथम चरणांत म्हटलें आहे. यावर भयातीत अशी कोणतीहि वस्तु नाहीं कां? असा सहजच प्रश्न उत्पन्न होतो. त्याचें उत्तर दुसऱ्या चरणांत देतात.

भयातीत ते अनंत संत पाहे. जेथें भय हा शब्दच नाहीं असें जगात निर्भय कोणी असेल तर तें एक ब्रह्म व एक ब्रह्मनिष्ठ संतच होत. संत म्हणजे ब्रह्म असा अर्थ घेऊन व आनंत हें त्याचें विशेषण घेऊन कोणी या चरणाचा ब्रह्मपर अर्थ लावतात. इतर कोणीं संत म्हणजे साधु असा अर्थ घेऊन संतपर लावतात. परंतु तें या नपुसकलिंगी प्रत्ययाची तेथें अडचण येते. म्हणून केवळ ब्रह्मपर अगर केवळ साधुपर असा एकांगी अर्थ लावण्यापेक्षां अनंत हा शब्द ब्रह्मवाचक घेऊन अर्थ केल्यास ओढाताण न होतां अभिप्रेत अर्थ स्पष्ट होईल असें वाटतें. भयातीत तें अनंत म्हणजे ब्रह्म व संत म्हणजे साधु पाहे. जसें ब्रह्म हें भयातीत, तसाच ब्रह्मनिष्ठ संतहि भयातीत होय. कारण संतही ब्रह्मरूपच झालेला असतो. संतलक्षण सांगतांना समर्थ म्हणतात, **''निर्विकल्पी कल्पनातीत। तोचि वोळखावा संत। येर अवघेचि असंत। भ्रमरूप॥''** (दा. १३-२-२६)

ब्रह्म हें भयातीत आहे. कारण तें एकमेवाद्वितीयं असें आहे. जेथें एकच वस्तु असून तद्व्यतिरिक्त अन्य वस्तूच नाही तेथें भीति कोणाची वाटावी? सर्व काली सर्व ठिकाणी व सर्वात्मा असल्यामुळें तें काल, देश व वस्तु इत्यादिकांनी मर्यादित नाही म्हणून अनंत आहे. जें अज, नित्य, शाश्वत, पुराण असें एकच एक आहे. त्याला भीति कशाची असणार? साधूहि तद्रूपच झालेला असतो म्हणून त्याच्या ठिकाणीं द्वैत नसतें.

भीति आहे ती द्वैतांत आहे. **भयं द्वितीयाभिनिवेशतःस्यात्** वास्तविक सर्व ठिकाणीं अधिष्ठानरूपानें असणारा आत्मा एकच आहे. तो उपाधीवेगळा आहे. पण त्याच्या नामरूपात्मक भिन्न भिन्न उपाधींशी अज्ञानानें बुद्धिचें तादात्म्य झाल्यामुळें भेद भासतो. घट-मठाच्या उपाधीमुळें एकच अखंड आकाश भिन्न भिन्न नामरूपानें भासलें तरी तें एकच असतें व घटमठांपासून अलिप्त असतें; तसेंच येथें आहे. **उपाधीयोगें वाटे भिन्न । परी तें आकाश**

**अभिन्न। तैसा आत्मा स्वानंदघन। येकचि असे।।** (दा.८-७-५३) उपाधीरहित निर्मळ आत्मरूप तेंच ब्रह्म व तेंच आपलें स्वरूप होय, असें आत्मानात्मविवेकानें जोपर्यंत कळत नाहीं तोपर्यंत व्दैतबुध्दि राहते व जोपर्यंत व्दैतबुध्दी आहे तोपर्यंत भीति आहेच. **जंव असे व्दैतवार्ता। तवं भयाची बाधकता। अभेदत्व आल्या हाता। निर्भयता साधका।।** (ना.भा. १८-१३६)

साधूच्या ठिकाणीं विवेकयुक्त वैराग्य असतें. म्हणून तो निर्भय असतो. **सर्व वस्तु भयान्वित भुवि नृणां वैराग्यमेवाभयम्** असें वैराग्यशटकांत म्हटलें आहे. सत्-असत्चा विचार होऊन ज्याला आत्मानुभव प्राप्त झाला आहे त्याला वासनांचा त्याग करावा लागत नाहीं. तो आपोआप होतो व देहवासनाहि सुटते हेंच वैराग्याचें खरें स्वरूप होय. असा विरक्त पुरूष तोच ब्रह्मनिष्ठ योगी होय. **विवेकें अंतरीं सुटला। विराग्यें प्रपंच तुटला। अंतर्बाह्य मोकळा झाला। नि:संग योगी।।** (दा. १२-४-१२) स्वत:चें स्वरूप अच्छेद्य अदाह्य, अक्लेद्य, अशोच्य, नित्य, सर्वगत व स्थिर आहे अशी जाणीव ज्याला झाली तो कोणाची कशासाठीं भीति बाळगेल? **साधु वस्तु अव्दये। तेथें कैचे वाटेल भये। परब्रह्म तें निर्भये। तेचि साधु।। या कारणें भयातीत। साधु निर्भय निवांत। सकलास मांडेल अंत। साधु अनंतरूपी।।** (दा.८-९-३९,४०) येथें सामान्यत: उपासनाकांड संपतें व पुढील श्लोकापासून ज्ञानकांडास सुरूवात होते.

★ ★ ★

**जिवां श्रेष्ठ ते स्पष्ट सांगोनि गेले।**
**परी जीव अज्ञान तैसेचि ठेले।**
**देहेबुध्दिचें कर्म खोटें टळेना।**
**जुनें ठेवणें मीपणें आकळेना।।१३७।।**

सर्व जग भीतीनें ग्रासलेले असून भयातीत असें कोण असेल तर तें एक बह्म व तें अनुभविणारे ब्रह्मनिष्ठ संत होत, असें मागील श्लोकांत सांगितले. त्या ब्रह्मनिष्ठ पुरुषांची योग्यता किती आहे व मानवकल्याणासाठीं त्यांची केवढी तळमळ आहे याचें वर्णन या श्लोकांत करितात. ''जुनें ठेवणें मीपणें आकळेना'' या पाच श्लोकांच्या गटास या श्लोकापासून प्रारंभ होत असून येथून ज्ञानकांड सुरू होतें. वसिष्ठ, याज्ञवल्क्य, पिप्पलादादि ऋषिमुनींपासून तों आधुनिक संतापर्यंत अनेक



महात्म्यांनी अज्ञानी मानवांचा उध्दार व्हावा म्हणून स्पष्ट शब्दांत आत्मज्ञानाचा उपदेश केला. याठिकाणी श्रेष्ठ हा शब्द फार मार्मिकपणें योजिलेला आहे. सर्वात श्रेष्ठ, भयातीत सर्वाधार असें एक ब्रह्मच होय. पण तें निष्क्रिय निशब्द असें आहे. संत सज्जनांच्यामुळे जीवाला अनुभवाला येतें. **जें त्रैलोक्याहून वेगळें। जे वेदश्रुतीसी नाकळे। तेंचि जयांचेनि वोळे। परब्रह्म अंतरीं।।** (दा. १-५-२५) असा या ब्रह्मनिष्ठांचा महिमा असल्यामुळें त्यानां श्रेष्ठ असें म्हटलें.

अशा या श्रेष्ठांनीं मानवाला स्पष्ट असें काय सांगितलें? त्यांनी सांगितलें कीं **'अयमात्मा ब्रह्म'।। 'तत्त्वमसि'।।** आत्मा हाच ब्रह्म आहे आणि हे जीवा! तें ब्रह्मच तू आहेस. हे सतत ध्यानांत राहावें व त्याचें चिंतन असावें, म्हणून **'अहमात्मा हे कधीची। विसरो नये।।'** (दा.५-१०-३८) असे समर्थ सांगतात. श्री प. प. वासुदेवानंद सरस्वती त्याच्याही पुढें जाऊन आपल्या ब्रह्मचिंतनात सांगतात कीं- बाबांनो, हें चिंतनहि तुमच्याकडून होत नसेल तर निदान तोंडाने तरी तसें म्हणत राहा, तसें घोकत राहा. भृंगकीटक न्यायानें तसें घोकल्यानेही तुमचे कल्याण होईल. **मी ब्रह्मचि न संसारी। मी मुक्त हें चिंतिजे अंतरी। हें चिंतन न घडे तरी। वाक्य उच्चारी हें नित्य। या अभ्यासानें भ्रमरकीटवत्। ब्रह्मभाव होय निश्चित। संशय सोडूनि सतत। करावा निश्चित अभ्यास हा।।** यापेक्षां साधूंनीं मानवाच्या कल्याणार्थ कितीं कळकळावें?

परंतु श्रेष्ठ कितीहि कानींकपाळी ओरडले तरी जीवाचें अज्ञान आजमितीला जसेंच्या तसें कायम आहे. कोणीहि सज्जनांच्या उपदेशाकडे लक्ष देण्यास तयार नाहीं. हितोपदेश असूनही तिकडे कोणी लक्ष कां देत नाही याचे कारण तिसऱ्या चरणांत सांगतात.

जीवाने देह म्हणजेच मी ही बुध्दि उराशीं घट्ट बांधून ठेवली आहे. ती सोडण्यास तो तयार नाही. ही देहबुध्दि इतकी घातुक आहे कीं ती सुविचार नष्ट करून टाकते. ती स्वत: आपल्या हिताहिताचा विचार करित नाहीं व दुसऱ्या कोणी तो सांगितला तरी तिकडे दुर्लक्ष करिते. **आठवतां देहबुध्दि। उडे विवेकाची शुध्दी।** (दा. ५-१०-३७) यामुळें अज्ञान जसेंच्या तसेंच कायम राहातें व अक्षै जवळच असलेला आत्मठेवा अनुभवाला येत नाही. जुनें ठेवणें म्हणजे शाश्वत, पुराण, सर्वां-वडील असें आत्मस्वरूप, समर्थ

म्हणतात :- **अक्षै ठेवा सकळांचा। परी पांगडा फिटेना शरीराचा। तेणें मार्ग ईश्वराचा। चुकोनि जाती।।** (दा.५-२-३९) पांगडा म्हणजे अभिमान. याप्रमाणें जीवाला मोहांत पाडण्याचें देहबुध्दीचें जें खोटें कर्म तें टळत नाही. म्हणजे जीवामागचे सुटत नाही.

ही देहबुध्दि इतकी घातक असताना व आत्मबुध्दि सुखरूप असताना जीव या देहबुध्दिलाच इतका चिटकून का राहतो? याचें कारण असें आहे कीं दिसायला मोहक पण परिणामीं घातक अशा विषयवासना देहाच्या आधारानें पुऱ्या होतात, म्हणून विषयभोगांना चटावलेला जीव देहबुध्दी दृढ धरून ठेवितो. **जे प्राणियां कामीं भर। देहाचिवरी आदरू। म्हणोनि पडिला विसरू। आत्मबोधाचा।।** (ज्ञा.४-२०) विषयवासनेमुळें देह, देहामुळें देहाभिमान व भोग व भोगांत रणमाण झाल्यामुळे स्वरूपविस्मृति म्हणजेच अज्ञान असें हें घातक चक्र आहे. यासाठीं विषयवैराग्य पाहिजे. जोंवर वैराग्य नाहीं, तोंवर विवेक नाहीं, विवेक नाही तोवर अज्ञान दूर होत नाही. अज्ञान असेपर्यंत देहबुध्दि जात नाहीं, देहबुध्दि असेपर्यंत मीपण सुटत नाहीं व मीपणा असेपर्यंत जुनें ठेवणें सांपडत नाहीं व अज्ञान तसेंच राहतें. **तैसे वैराग्याची शिव न देखती। जे विवेकाची भाष नेणती। ते मूर्ख केवीं पावती। मज ईश्वरातें।।** (ज्ञा.४-२५)

★ ★ ★

**भ्रमें नाडळे वीत तें गुप्त जालें।**
**जीवा जन्मदारिद्र्य ठाकूनि आलें।**
**देहबुध्दिचा निश्चयो ज्या टळेना।**
**जुनें ठेवणें मीपणें आकळेना।।१३८।।**

जीवाच्या कल्याणार्थ सज्जनांनी महावाक्याचा स्पष्ट उपदेश केला. पण देहअलंकारामुळें जीवाचें अज्ञान तसेंच कायम राहिलें, असें मागील श्लोकांत सांगितलें. श्रेष्ठांच्या उपदेशाकडे जीवानें लक्ष दिलें नसेल. पण जीव हा जर ब्रह्मरूपच आहे तर त्याचें त्यालाच आपलें स्वरूप कां कळूं नये? राजाच्या मुलास तूं राजपुत्र आहेस हें काय सांगावें लागतें? गर्भश्रीमंती असतांना जीव हा जन्मदरिद्री कां राहावा? याचें कारण ही अज्ञानजन्य देहबुध्दिच होय, असें या श्लोकांत सांगतात.

वीत म्हणजे वित्त. येथें वित्त म्हणजे आत्माख्य धन, स्वरूप. आपल्या वंशजांनीं दारिद्र्यांत जीवन कंठूं नये म्हणून एखाद्या पूर्वजानें द्रव्याचे हंडे घरीं



जमिनींत पुरून ठेवावेत. पण दुदैवाने त्या गुप्त द्रव्याची माहिती नसल्यामुळें त्याच्या वंशजांनीं अज्ञानामुळें त्या गुप्त धनावरच दारिद्र्यांत नांदावे. या उदाहरणाप्रमाणें जीवाचें परम कल्याण व्हावें म्हणून श्रेष्ठांनीं स्पष्ट शब्दांत ग्रथांत सांगून ठेवले आहे. पण दुर्दैवी देहबुध्दिमुळें गुह्य हृदयस्थ धनाकडे जीवाचें लक्ष जात नाहीं व तो जन्ममरणपरंपरेचें दारिद्र्य भोगीत राहतो. **नातरी निदैवाचा परिवरीं। लोह्या रुतलिया आहाति सहस्रवरीं। परी तेथ बैसोनि उपवासु करी। कां दरिद्रें जिये।।** (ज्ञा. ९-५९)

स्वत: जीवाला आपण ब्रह्मरूप असल्याची जाणीव गर्भांत जरी असली तरी तो बाहेर आला रे आला कीं आपलें स्वरूप विसरतो व मी कोण या भ्रमांत पडतो. शेवटीं दिसणारा देहच मी अशी दृढ बुध्दि धरून राहतो. **गर्भी म्हणे सोऽहं सोऽहं। बाहेरी पडतां म्हणे कोऽहं।।** (दा. ३-१-४७) वास्तविक नसलेलें जन्ममरणपरंपरेचे हे दारिद्र्य जीवाच्या घरांत म्हणजे अंत:करणांत बोलविल्यासारखे जें आलें त्याला कारण कोणतें असेल तर अज्ञानामुळें उत्पन्न झालेला ''मी देही'' हा भ्रम हें होय. डोळ्यास एक असतां जें भलतें दिसतें, कानाला एक असतां जें भलतेंच ऐकूं येतें आणि मनाला एक असतां जें भलतें भासतें तो भ्रम होय. **येक अस्तां येक वाटे। येक सांगतां येक निवटे। येक दिसतां येक उठे। या नांव भ्रम।।** (दा. १०-६-२३) हा भ्रम वस्तूचें यथार्थ आकलन न झाल्यामुळें म्हणजे अज्ञानानें होतो. **उदंड भ्रम विस्तारला। अज्ञानजनीं पैसावला।।** (दा.१०-६-३५)

देह तोच मी हा जो भ्रम जीवानें आपल्या उराशी घट्ट बाळगुन ठेविला आहे तो जोपर्यंत दूर होत नाहीं तोपर्यंत आपल्या मूळ स्वरूपाचा साक्षात्कार होत नाहीं. म्हणजे जुन्या ठेवणीचें आकलन होत नाहीं व त्यामुळें मागें लागलेलें जन्ममरण टळत नाही. **देह मी वाटे ज्या नरा। तो जाणावा आत्महत्यारा। देहाभिमानें येरझारा। भोगिल्याच भोगी।।** (दा.५-६-५५)

वास्तविक जीव हा मूळचा शिवस्वरूप. पण भ्रमानें देहबुध्दींमुळें आपलें पूर्णत्व विसरला व जन्मोजन्मीं सुखाची भिक्षा मागीत फिरू लागला. स्वप्नात स्वत:चे राजेपण विसरून एखाद्या राजाने स्वत:ला भिकारी समजून ज्याप्रमाणें भिक्षा मागावी अशी या जीवाची अवस्था आहे. **आपणचि राजा आहे। हें त्याचें त्यास ठाउके नव्हे। तैसेंच जीवासही होये। पूर्णत्व स्वयें स्मरेना।।** (ना. भा. १२-२८३) वास्तविक जडाला सजीव करणारा तो जीव शब्दाचा अर्थ आहे. जड शरीरास तो जिवंत ठेवतो यावरूनच शरीराहून तो

वेगळा आहे व चैतन्यस्वरूप आहे हें स्पष्ट होतें. **जैसा जीव जडातें जीवविता। यालागीं जीवू ऐेशी वार्ता। सहजें तरी स्वभावतां। चैतन्य रूपता जीवाची।।** (ना. भा. १२-२८९) जो दिवा घटांत ठेविला म्हणजे घटाला प्रकाशित करितो तो दिवा घट बाजूला सारून ठेविला तर सर्व घर प्रकाशित करणार नाहीं का? त्याप्रमाणें शरीरस्थ चैतन्य शरीर बाजूला झालें तर विश्व व्यापणार नाही का? **तेवीं शरीरामाजीं तरी जीवू। सहजें तरी सदाशिवू।।** (ना. भा. १२-२९१)

परंतु अज्ञानजन्य भ्रमानें देहाशीं तादात्म्य झाल्यामुळें मी म्हणजे देह अशी जीवाची संकुचित वृत्ति होते. ह्या भ्रमालाच अध्यास असें म्हणतात. मी या अहंकारांत दोन धर्म आहेत.एक बुद्धिधर्म व दुसरा आत्मधर्म. बुद्धिधर्मात जडत्व व अनित्यत्व आहे. बुद्धी ही स्वयंप्रकाशित नसल्यामुळें जड आहे व सुषुप्तींत लीन होत असल्यामुळें ती अनित्य आहे. आत्मधर्माच्या ठिकाणीं ज्ञानतत्व नित्यत्व आहे. आत्मा हा जाणीव किंवा ज्ञानस्वरूप आहे. जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तीनहि अवस्थांचा तो साक्षी असल्यामुळें नित्य आहे. अग्नि व लोखंडाचा गोळा यांचे सान्निध्य आले म्हणजे अग्नीचे गुणधर्म लोखंडावर व लोखंडाचे गुणधर्म अग्नीवर लादले जातात. आकार नसलेला अग्नि वाटोळा दिसतो व गार काळें लोखंडे तप्त तांबडें दिसतें. तसेंच या ठिकाणीं बुद्धीचे गुणधर्म आत्म्यावर व आत्म्याचे गुणधर्म बुद्धीवर लादले जातात. व त्यामुळें देह म्हणजेच मी, असा अलंकार उत्पन्न होतो. ही देहबुद्धि ज्ञानाने जोपर्यंत दूर होत नाहीं तोपर्यंत स्वस्वरूप अनुभवाला येत नाहीं व जन्मदारिद्र्य सुटत नाहीं. भगवान् म्हणतात, **तैसीं अहंममतेचिये लवडसवडी। मातें न पवर्तीचि बापुडीं। म्हणोनि जन्ममरणाचिये दुथडीं। डहुळितें ठेलीं।।** (ज्ञा. ९-६२)

★ ★ ★

**पुढें पाहतां सर्वही कोंदलेंसे।**
**अभाग्यास हें दृश्य पाषाण भासे।**
**अभावें कदा पुण्य गांठीं पडेना।**
**जुनें ठेवणें मीपणें आकळेना।।१३९।।**

जुनी गुप्त ठेव भूमिगत असल्यामुळें व तिचें ज्ञान नसल्यामुळें ती जशी समजून येत नाहीं. तसे हृदयस्थ असलेले गुप्त आत्मस्वरूप देहबुद्धीमुळें अनुभवाला येत नाहीं, असें मागील श्लोकांत सांगितलें. पण हें आत्मधन केवळ



गुप्त एकदेशी असें नसून आंत-बाहेर, वर-खालीं, दूर-जवळ, सर्व ठिकाणीं व्यापक आहे, असें या श्लोकांत सांगतात. **बहिरन्तश्च भूतानामचरं चरमेव च।।** (भ. गी. १३-१५)

तुम्ही कोठेंहि पाहा हें आत्मधन तुमच्या समोरच आहे. कोणत्याहि दिशेला तोंड फिरवा, तें पुढें आहेच. तें धरू जातां धरितां येत नाहीं, टाकूं जातां टाकतां येत नाहीं. मनुष्य कोठेहि पळून गेला तरी तेथें सभोवार आकाश हें असणारच, तसें परब्रह्मविना रिकामें स्थानच नाहीं. मनुष्यापुढें, मागे, वर, खाली तें आहेच. **जिकडे तिकडे जेथें तेथें। विन्मुख होतां सन्मुख होतें। सन्मुखपण चुकेना तें। काहीं केल्यां।।** (दा. २०-१०-२) असें हें सर्वत्र कोंदलेंसें म्हणजे घनदाट भरलेलें आहे. आध्यात्मिक विचारदृष्टीनें पाहिल्यास तें कोंदलेंसें आहे. पण स्थूल मायिक दृष्टीने पाहिल्यास नामरूप तेवढेंच दिसतें.

सभोंवार असें तेंच ब्रह्मचैतन्य असताना अभागी जीवाला जिकडे तिकडे सर्व दृश्य जड पाषाणरूपानें भासतें. अभागी म्हणजे स्थूल दृष्टीचा, ब्रह्मदृष्टीनें जगाकडे न पाहणारा, अज्ञानी, **परमार्थी तो राज्यधारी। परमार्थ नाहीं तो भिकारी।।** (दा. १-९-२३) भक्त, योगी, ज्ञानी यांच्या दृष्टीचा विकास जग हें ब्रह्मरूपानें पाहण्यांतच आहे - **ऐसेनि (तरंग सागराप्रमाणे) बा समरसें। दृष्टी जैंय उल्हासे। ते भक्ति पैं ऐसें। आम्ही म्हणों।। आणि ज्ञानाचें चांगावें। इयेचि दृष्टी नांवे। योगाचेंही आघवें। सर्वस्व हें।।** (ज्ञा. १४-३८७-३८८) जगांतील प्रत्येक पदार्थ पांच गुणांनी नटलेला आहे. नाम, रूप, अस्ति, भाति आणि प्रीति. नाम व रूप हे मायेचे गुण असून अनित्य आहेत. आणि अस्ति, भाति व प्रीति हे ब्रह्माचे गुण असून नित्य आहेत. स्त्रीची दृष्टि मोहानें अनित्य दागिन्यावर खिळून राहते, पण सराफाची दृष्टि नित्य अशा सोन्यावर स्थिर असते. तसेंच येथें आहे. अज्ञानी जीवाची दृष्टि पदार्थाच्या नामरूपाला चिकटून राहते आणि ज्ञान्याची दृष्टि नित्य अशा आधारभूत ब्रह्मतत्वावर स्थिर असते. अभक्ताला मूर्ति पाषाणरूप भासते, तर भक्ताला ती चैतन्याची ओतीव मूर्ति वाटते. या भावानें ''अभाग्यास हें दृश्य पाषाण भासे'' असें म्हटलें आहे. या ज्ञान व अज्ञान दृष्टींतील फरक ज्ञानोबाच्या दोन ओव्यांवरून चांगला ध्यानांत येईल. **नुकलितां पटु। तंतूचि असे स्पष्टु। न विरवितां घटु। मृत्तिका जेवीं।। म्हणोनि विश्वपण जावें। मग मातें घेयावें। तैसा नव्हे आघवें। सकटची मी।।** (ज्ञा.१४-३७९-३८०)

अभागी मानवाला ही ज्ञानदृष्टि कां येत नाहीं याचें कारण तिसऱ्या

चरणांत सांगतात. अभाव म्हणजे अश्रद्धा, अविश्वास. शास्त्रें किंवा श्रेष्ठ पुरूष जें काहीं सांगतात त्यावर या दुर्दैवी मानवाचा विश्वास असत नाही म्हणून त्याचें अंत:करण सत्त्वगुणसंपन्न होणें हेंच पुण्य होय. सात्त्विक अंत:करण असलें म्हणजे शुद्ध किंवा उचित कर्म घडतें. इष्ट कर्मांनें पुण्य पदरीं पडतें, ज्ञान रूजतें व योग्य कालीं पुण्यप्रद असें आत्मस्वरूप अनुभवाला येतें. **जो अज्ञानाचा सेवट। जो पुण्याचें मूळ पीठ। ज्याचेनि सांपडे वाट। परलोकाची।।** (दा. २-७-७) **ऐसा हा सत्त्वगुण।** मनुष्य हा प्रपंचांत अनेक गोष्टी श्रध्दापूर्वक करतो. पाऊस पडेल या श्रद्धेनें तो पेरतो, पोट भरेल या विश्वासानें शिकतो. सुख होईल म्हणून विवाह करतो. म्हातारपणीं विचारतील म्हणून पोरें पोसतो; पण परमार्थांत मात्र जेथें त्याला श्रध्दा आंधळी वाटते. वास्तविक मनुष्याच्या ठिकाणीं गुणानुसार स्वाभाविक किंवा अंगभूत असलेली श्रद्धा ही डोळसच असते. आंधळें असतें तें प्रापंचिक प्रेम होय, कारण तें भ्रमानें नसती आशा उत्पन्न करितें. म्हणून स्वाभाविक असलेली श्रद्धा सात्त्विक बनविणें यांतच मानवी प्रयत्नांची सार्थकता आहे. नामरूपात्मक जग हें चालूच राहणार. तें कोणी नष्ट करू शकत नाहीं. आत्मज्ञानासाठीं तें विवेकानें बाधित करावें लागतें व हा विवेक आत्मवाक्यावर विश्वास असेल तरच उत्पन्न होतो. परंतु वेद, संत, गुरु इत्यादिकांच्या शब्दांवर विश्वास नसल्यास अज्ञान तसेंच राहतें. अज्ञानामुळें अंत:करण शुध्द नसतें. शुध्द नसल्यामुळें ज्ञान रूजत नाहीं, ज्ञान नसल्यामुळे सर्वांचा आश्रय असें जें ब्रह्म तेंच आपलें स्वरूप आहे याची जाणीव होत नाहीं व पुण्य पदरी पडत नाहीं. म्हणजे जुनें ठेवणें बुद्धीला गवसत नाहीं. यासाठीं अश्रद्ध माणसाला समर्थांनीं अभागी म्हटलें आहे. **जें सर्वत्र सर्वही देहीं। जया करितांही घातु नाहीं। तें विश्वात्मक तूं पाही। चैतन्य एक।।** (ज्ञा. २-१७७) असें स्वत: भगवान म्हणतात - भगवत्‌वाणीवरही विश्वास न ठेवणारा मानव अभागी नव्हे का?

★ ★ ★

**जयाचें तया चूकलें प्राप्त नाहीं ।**
**गुणें गोविलें जाहलें दु:ख देहीं ।**
**गुणावेगळी वृत्ति तेही वळेना ।**
**जुनें ठेवणें मीपणें आकळेना ।।१४०।।**



सर्वत्र एक परब्रह्मच घनदाट असें भरलें आहे व तेंच आपलें रूप आहे. पण अश्रद्धेनें अज्ञाननाश करणारें व पुण्याचें मूळ असें सात्त्विक अंत:करण नसल्यानें आपलेंच आत्मधन आपल्या अनुभवाला येत नाहीं, असें मागील श्लोकांत सांगितलें. हें आत्मधन सांपडण्यासाठीं केवळ सात्त्विक अंत:करण असून चालत नाहीं त्यासाठीं देहबुद्धि सुटून गुणातीत व्हावें लागतें असें या श्लोकांत सांगतात.

मागील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें अंतर्बाह्य सर्व ठिकाणीं आत्मस्वरूप भरलें असतांहि व तेंच आपलें असूनहि तें अनुभवाला तर येत नाहींच, पण उलट जीव दु:खांतच पोळत राहतो. असें कां व्हावें? याचें उत्तर असे आहे कीं, गुणातीत असलेलें आपलें सुखस्वरूप भ्रमानें विसरून जीव गुणांतच अडकून राहतो, म्हणून तो दु:खी होतो. स्वत:जवळ कस्तुरी असताना मृगानें त्यासाठी धांपा टाकीत रानोमाळ भटकत फिरावें, अशी जीवाची स्थिति होते. **मृगमद नाभीसि असता नेणुनि, भ्रमतां भ्रमतां मेले रे।।**

प्रकृतीपासून उत्पन्न होणारे सत्त्व, रज, तम, हे त्रिगुण देहाला व देहबुद्धीला कारण असून हेच अविनाशी अशा आत्म्याला देहांत बद्ध करितात. **सत्त्वं रजस्तम इति गुणा: प्रकृतिसंभवा। निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनमव्ययम्।।** (भ. गी. १४-५) तीन गुणांत सत्त्व गुण हा अज्ञान दूर करणारा, पुण्याचें मूळ, उन्नतिकारक असला तरी तो प्रकृतिगुणच आहे. सुरी ही सोन्याची असली तरी ती सुरीच. कापणें हाच तिचा धर्म. तसें सत्त्वगुण हा चांगला असला तरी व उपकारक असला तरी बंधाचा गुणधर्म त्यांत आहेच. सत्त्वगुण हा सुखाच्या व ज्ञानाच्या संगतीने म्हणजे मी सुखी, मी ज्ञानी या अहंकारानें जीवाला बद्ध करतो. रजोगुणांत सुखदु:खमिश्रित प्रवृत्ति असते व तमोगुणांमुळें अज्ञान वाढून मोह उत्पन्न होतो. आत्मधन हें प्रकृतीच्या प्रांताबाहेर असल्यामुळें प्रकृतीचे तीन गुण ओलांडून त्रिगुणातीत व्हावें लागतें. तीन गुणांपलीकडे गेल्याशिवाय दु:ख संपत नसल्यामुळें **निस्त्रैगुण्यो भवार्जुन** असा अर्जुनाला भगवंताचा उपदेश आहे.

निर्मळ, निर्विकार, बंधनरहित असें विश्वाचें मूळ असलेलें आत्मस्वरूप या गुणांच्यामुळें देहाएवढें बनतें. अव्ययत्वांत व्ययत्व येते. **तैसें हें सांत:करण । देहचि होती त्रिगुण । म्हणोनि बंधा कारण । घडे कीर ।।** (ज्ञा. १४-२८३)

वृत्ति (बुद्धिव्यापार) ही त्रिगुण कशी बनते व अज्ञानभ्रांतिमुळें हे तीन

गुण जीवाला बद्ध कसें करितात याचें वर्णन ज्ञानोबांनीं फार सुंदर केलें आहे. मनुष्य प्रथम सावध असतो. पुढें हळूहळू त्याच्या ठिकाणीं आळस बळावत जातो. बळावलेल्या आळसामुळें सावधपण जस जसें ओहटीस लागेल, तसतसा तो निद्रेच्या स्वाधीन होतो व शेवटीं निद्रा किंवा अज्ञान हें दृढ होऊन राहते. **तैसी अज्ञानांगीकारें। निगाली वृत्ति विखरे। ते सत्त्वरजव्दारें। तमही होय ।।** (ज्ञा. १४-१४३) अज्ञानाचा म्हणजे देहबुद्धीचा अंगीकार करून बाहेर पडलेली वृत्ति जेव्हां पसरत जाते, तेव्हां ती सत्त्व, रज होऊन तमहि होते. याप्रमाणें आपली वृत्ति त्रिगुणांनीं वेष्टित झाल्यामुळे देहापलीकडे काहीं दिसत नाहीं. आपण या त्रिगुणवृत्तींत अडकतों कसें हें अंत:करणाकडे थोडें जागरुकतेनें पाहिल्यास किंवा त्याचा विचार केल्यास सहज आपलें आपणास कळण्याजोगें आहे. पण तसा प्रयत्न आपल्याकडून होत नाहीं. म्हणून तिसऱ्या चरणांत ''गुणावेगळी वृत्ति तेही वळेना'' असें म्हटलें आहे.

पुष्कळ वेळां आपण विचार करीत बसतों. एक विचार संपला कीं लगेच दुसरा सुरू होतो. किती वेळ गेला हें समजतहि नाहीं. पण काहीं वेळा आपणास अशी जाणीव येते कीं, अरे, हा विचार उदात्त (सात्त्विक) आहे, हा लाभदायक (रजात्मक) आहे, हा घाणेरडा (तमोरूप) आहे. ही जाणीव येते तेव्हां थांबून थोडा विचार करावा कीं या त्रिगुणात्मक वृत्ति ज्याला दिसल्या तो मी या वृत्तीहून कोणीतरी अलग, वेगळा आहे. या वृत्तींचा मी द्रष्टा आहे. वृत्तींशी मी जेव्हा एकरूप झालों होतों तेंव्हा माझें निराळेंपण मला दिसत नव्हतें आणि वेळेचेंही भान नव्हतें, इतका मी त्यांत गुडूप झालों होतों. आता वृत्तींचा द्रष्टा होऊन मी जेव्हा त्यांच्याकडे वेगळेपणें पाहूं लागलो तेव्हां मला कळतें कीं वृत्तीशीं माझें तादात्म्य झालें कीं मी माझें अलग स्वरूप विसरतों. म्हणजे त्या मला बद्ध करतात आणि वेगळेपणें त्या पाहूं लागलों कीं मी देहाचा व वृत्तींचा साक्षी होतो. **तैसें गुणीं गुणापरौतें। जें आपणपे असें आयितें । तिये अहं बैसे अहंते । मूळकेचिये।। तैं तेथूनि मग पाहतां। म्हणे साक्षी मी अकर्ता। हे गुणचि क्रियाजातां। नियोजना।।** (ज्ञा.१४-२९२, ९३) देह असेपर्यंत प्रकृतिधर्मानुसार वृत्ति उठत राहणारच. वृत्ति उठत राहिल्यानें जीवाच्या मुक्ततेला बाध येत नाहीं. तो वृत्तीशीं तादात्म्य पावून स्वत:चें साक्षित्व विसरतो, त्यामुळें त्याला गुणानें बद्ध झाल्याचें भ्रमानें भासतें. आपल्याच भारानें फिरत्या नळीला चिकटलेला आणि अडकलेला राघू दृष्टि उलटी झाल्यामुळें म्हणजे आकाशाकडे वळल्यामुळें नळीला बद्ध होऊन राहतो.



वास्तविक त्यानें नळीं सोडली तरी त्याला उडता येऊन तो मुक्त होईल. पण भ्रमानें तो नळीं सोडीत नाहीं, तसेंच येथें आहे. जीव त्रिगुणात्मक वृत्तिव्यापारांना सोडून थोडासा जर अलग होईल तर त्याला आपलें साक्षित्व कळेल. पण देहबुध्दीमुळें गुणवृत्तींना तो चिकटूनच राहतो. गुणावेगळी होण्याची ही साक्षित्वाची वृत्ति जो पर्यंत वळत नाहीं म्हणजे कळून पचनीं पडत नाही, म्हणजे मी हा मीपणा सुटत नाहीं व मीपणा असेपर्यंत जूनें ठेवणें म्हणजे आत्मधन सांपडत नाहीं.

★ ★ ★

**म्हणे दास सायास त्याचे करावे ।**
**जनीं जाणता पाय त्याचे धरावे ।।**
**गुरुअंजनेंवीण तें आकळेना ।**
**जुनें ठेवणें मीपणें तें कळेना ।।१४१।।**

जुनें ठेवणें म्हणजे आत्माख्य धन हें जीवाच्या मालकीचें असूनहि भ्रमानें गुणाशीं तादात्म्य झाल्यामुळें त्याचें विस्मरण होऊन जीव दु:ख भोगीत आहे. गुणापासून अलिप्त होऊन साक्षींपणानें त्याच्याकडे पाहण्याचें जोपर्यंत जमत नाहीं तोपर्यंत त्याला तें ठेवणें प्राप्त होत नाहीं, असें मागील श्लोकांत सांगितलें. हें साक्षित्व समजून येण्याला म्हणजे त्रिगुणातीत होण्याला उपाय कोणता हें या श्लोकांत सांगतात.

सायास म्हणजे कष्ट, सेवा, तुम्हांला आत्मधन जर पाहिजे असेल तर तें ज्याला ठाऊक आहे अशा पुरुषाची निवड करून त्याची सेवा करा. त्याच्यासाठीं तनमनधनानें झिजा. **सर्व कांहीं कळे सद्गुरु करितां। दास म्हणे आतां गुरु करी।।** कोणतीहि कला किंवा विद्या आपलीशी करून घ्यावयाची झाल्यास त्यांत जो तज्ज्ञ असेल त्याची मर्जी संपादन करावी लागते. तेव्हां ती कला किंवा विद्या हस्तगत होते. हें जसें व्यावहारिक सत्य आहे, तसेंच जी आत्मवस्तु अतिसूक्ष्म व अलभ्य आहे तिचें ज्ञान करून घेण्यासाठी तत्त्वज्ञ संताचीच कास धरिली पाहिजे, हें पारमार्थिक सत्य आहे. **जे वस्तु परम दुल्लभ। जयेचा अलभ्य लाभ। तेंचि होये सुल्लभ। संतसंगेकरूनि।।** (दा. १-५-२) उत्तम हिरा दुर्मिळ असतो हें खरें, पण त्याची ज्याला ओढ असते तो त्याच्या शोधांत राहतो व तो हिरा त्याला मिळतोहि. तसेंच ज्ञानदाता कोणीतरी हवाच अशी

मनाला ओढ लागली, तें आतुर झालें कीं योग्य तो पुरुष लाभतो. **याकारणें ज्ञाता पाहावा । त्याचा अनुग्रह घ्यावा । सारासार विचारें जीवा । मोक्ष प्राप्त ।।** (दा. ६-१-३१) ज्याचा अनुग्रह घ्यावयाचा, त्याच्यासाठीं झिजावयाचें. जो जुनें ठेवणें दाखवितो, तो जाणता असावा कसा, हें समर्थ एका ओवींत सांगतात. **जेथें शुध्द ब्रह्मज्ञान । आणी स्थूळ क्रियेचें साधन । तोचि सद्‌गुरु निधान । दाखवी डोळां ।।''** (दा. ५-२-२८) ब्रह्मज्ञानामुळें तो आत्मतृप्त असतो. आत्मतृप्तीमुळें तो नि:स्पृह असतो व नि:स्पृहतेमुळें तो शांत असतो. प्राणिमात्राच्या कल्याणाची त्याच्या ठिकाणीं आस्था असल्यामुळें त्याला स्वत:ला आवश्यकता नसतांनाहि लोकसंग्रहार्थ तो सत्कर्माचें जीवन कंठीत असतो. अशा जाणत्यास अनन्य शरण होऊन वंदन करावें.

पण ज्ञानप्राप्तीसाठी नुसतें वंदन करून भागत नाहीं. वंदनाबरोबर परिप्रश्न व सेवाहि पाहिजेत. सेवा म्हटलें कीं पुष्कळ माणसें दचकतात व पायास हात लावण्यास लाजतात. सेवा घेणारा हा गुरु कसला असा स्वत:बद्दलचा प्रश्न त्यांच्या मनांत उत्पन्न होत नाहीं. ज्याला परमार्थज्ञान पाहिजे असेल त्यानें शास्त्र व स्वगुण यांच्याकडे लक्ष दिलें पाहिजे. आपणास योग्य गुरु पाहिजे असेल तर आपणहि योग्य शिष्य बनलें पाहिजे. गुरुसेवा हा शिष्यधर्म आहे. तो उगाच सांगितला नाहीं. सेवेमुळें प्रेम उत्पन्न होतें. जितकें अधिक प्रेम, तितका अधिक जिव्हाळा व जेथें जिव्हाळा तेथें अंतरंगातील गुह्य प्रकट होतें, म्हणून संतरूपी ज्ञानमंदिराचा सेवा हा उंबरठा होय, असे ज्ञानोबांनी म्हटलें आहे. प्रणिपात, परिप्रश्न व सेवा या ज्ञानप्राप्तीच्या तीन साधनांबरोबरच शिष्याचा सद्‌गुरुवचनावर पूर्ण विश्वास पाहिजे. **अविश्वासें कास सोडिली । ऐसी बहुतेक भवीं बुडालीं....।। या कारणें दृढ विश्वास । तोचि जाणावा सच्छिष्य । मोक्षाधिकारी विशेष । आग्रगण्यु ।।** (दा. ५-३-३७,३८)

जाणत्याचे पाय धरणें कां आवश्यक आहे हें उत्तरार्धांत एक दृष्टान्त देऊन स्पष्ट करितात. पायाळू मनुष्याच्या डोळ्यात विशेष प्रकारचें अंजन घातलें म्हणजे त्याला भूमिगत द्रव्य दिसतें, असा एक समाज आहे. मनुष्य पायाळू पाहिजे व अंजन हें माहीतगारानें डोळ्यात घातलें पाहिजे म्हणजे गुप्तधन दिसावयाचें. या उदाहरणाप्रमाणें येथें पायाळू म्हणजे मुमुक्षु शिष्य, अंजन म्हणजे ज्ञान व या अंजनाचा माहीतगार म्हणजे तत्त्वज्ञ गुरु. या तीन



गोष्टी जुळल्याशिवाय जुनें ठेवणें जें आत्मधन तें कळत नाहीं. **दिसेना जें गुप्तधन । तयासी करणें लागे अंजन । गुप्त परमात्मा सज्जन । संगतीं शोधावा ।।** (दा. ६-९-१९) गुरुवचनानें देहबुध्दीचें डोळ्यावरील पडळ नाहींसें होतें व दिव्य दृष्टि येऊन गुप्त परमात्मा अनुभवाला येतो. **जैसे नेत्रीं घालितां अंजन । पडे दृष्टीस निधान। तैसें सद्‌गुरुवचनें ज्ञान । प्रकाश होय ।।** (दा. ५-१-३८)

या श्लोकानें 'जुनें ठेवणें मीपणें आकळेना' हें सदर पूर्ण झालें.

★ ★ ★

**कळेना कळेना कळेना ढळेना ।**
**ढळे ना ढळे संशयो ही ढळेना ।।**
**गळेना गळेना अहंता गळेना ।**
**बळें आकळेना मिळेना मिळेना ।।१४२।।**

जुनें ठेवणें म्हणजे आपलें जें आत्मस्वरूप तें जाणत्या गुरूला शरण जाऊन व त्याची सेवा करुन जाणून घ्यावें, अन्यथा ते अनुभवितां येत नाहीं. असे मागील श्लोकांत सांगितलें, यावर एखादा असा प्रश्न करील कीं आपला उध्दार आपण करावा असें भगवंतानीं गीतेंत सांगितलें असतां आपल्याच आत्मस्वरूपाचें ज्ञान आपणासच कां होऊं नये? (उध्दरेदात्मनात्मानम्) त्यासाठीं दुसऱ्या जाणत्याचे पाय धरण्याचें काय कारण? याचें उत्तर या श्लोकांत दिलें आहे.

चौथ्या चरणांत समर्थ म्हणतात कीं, आपल्याच हिंमतीवर आपण आत्मतत्त्व जाणूं शकूं असा दुराग्रह कोणी धरला तर तें तत्त्व त्याला जाणतां येणार नाहीं व आत्मस्थिति प्राप्त होणार नाहीं. एखादी वस्तु आपल्याच डोळ्यांनी आपण पाहता असलों तरी तेथें अग्नि अथवा सूर्यप्रकाशाची गरज लागतेच. डोळा आपलाच असला तरी अंधारांत तो काहीं पाहूं शकत नाही, त्याला प्रकाशाची मदत लागतेच. असेंच येथें आहे. बुद्धि आपलीच पण ती अंधारांत वावरत असल्यामुळें तिला आत्मप्रत्ययाचें आकलन होत नाहीं. हा अंधार, संशय व देहबुध्दीचा म्हणजे अज्ञानाचा आहे. जोपर्यंत जाणत्याच्या ज्ञानप्रकाशाचा लाभ मिळत नाही तोपर्यंत हा अज्ञान अंध:कार दूर होत नाही. अहंता व संशय हे दूर झाल्याशिवाय आत्मतत्त्वांचे आकलन होत नाहीं, म्हणून कळेना कळेना.

वस्तूचें दुर्लभत्व दाखविण्यासाठीं शब्दाची द्विरुक्ति, त्रिरुक्ति केली

आहे. प्रथम चरणांतील ढळेना या शब्दाचा संबंध पुढील द्वितीय चरणाकडे आहे. कळेना कळेना म्हणजे काय कळत नाहीं व संशयोही ढळेना म्हणजे कोणता संशय दूर होत नाहीं? न दिसणारें जुनें ठेवणें असें जें आत्मतत्त्व तें कसें आहे, कोठें आहे, हें काहीं केल्या कळत नाहीं. कारण तें दिसत नाहीं. पाहावयास गेलें तर आपला देह व दृश्य सृष्टि डोळ्यास दिसतात व तीच दोन्ही सत्य वाटतात. आत्मा या नांवाची काही वस्तु आहे हें मनाला पटतच नाहीं. **इकडे सत्य मानिला देहो । तिकडे दृश्य सत्य हा निर्वाहो । दोहींमधें माहां संदेहो । पैसावला बळें ।।** (दा. ६-८-४२) प्रत्यक्ष दिसतो तो देहच खरा मी, अशी एकदा बुध्दि दृढ झाली आणि दिसणारी सृष्टि सत्य वाटूं लागली तर अदृश्य आत्मतत्त्वाकडे लक्ष कसें जाणार? किंवा श्रेष्ठांनी ''तेच सर्व आहे, तेंच तूं आहेस,'' असें जरी सांगितलें तरी तें बुद्धीस झटदिशीं कसें पटणार? उलट संशयबुद्धिच दृढ होत जाते. **मिथ्य तेंचि सत्य जालें । सत्य असोन मिथ्य केलें । संदेह-सागरीं बुडालें । अकस्मात मन ।।** (दा. ७-७-४२) म्हणून कळेना असें त्रिवार म्हटले. श्रवणानें किंवा ग्रंथवाचनानें पुष्कळ वेळां आपल्यास कळलें व संशय दूर झाला असें वाटतें, परंतु पुन्हा एकदा अन्य संकल्प उठला कीं झालेला बुध्दीचा निश्चय ढासळतो व पुन्हा संशय राहतोच. संशय ढळला असें वाटलें, पण अद्याप नीट कळलें नाहीं. असें वाटूं लागतें. अशा वेळीं माझ्या बुद्धीनें मीच संशय फेडून घेईन असा दुराग्रह सोडून जाणत्याकडून बुध्दीचा निश्चय करून घ्यावा लागतो, नाहींतर संशयांत गूरफटून राहावें लागतें. शिवाय दुसरी गोष्ट अशी कीं मनाने कितीहि कल्पना केल्या तरी जें कल्पनेंत सांपडूं शकत नाहीं त्याबद्दलचा संशय दूर व्हावा कसा? संशय फिटला व फिटला नाहीं ही आपली कल्पनाच. **मनास कल्पायाची सवे । मनें कल्पिलें तें नव्हे । तेणें गुणें संदेह धावे । मीपणाचेनि पंथे ।।** (दा. ७-७-४३) म्हणून ढळे ना, ढळे, नाढळे असें म्हटलें.

अहंचें देहाशीं जोपर्यंत तादात्म्य आहे म्हणजे मी देह अशी जोपर्यंत दृढ बुद्धि आहे तोपर्यंत सर्व कल्पना देहाच्या प्रांतांतच वावरतात. देहापलीकडे देहाला आधारभूत अशी काहीं वस्तु आहे असा आत्मविचार सहन होत नाहीं. **विवेक वस्तूकडे वोढी । देहबुध्दि तेथूनि पाडी । अहंता लावूनि निवडी । वेगळेपणें ।।** (दा. ७-२-४०) देह-अहंतेची ही गांठ घट्ट होऊन बसली असल्यामुळें ती सैल होत नाहीं, संशय व अहंता यांमुळे बुध्दीवर आलेला अज्ञान- अंधकार जोपर्यंत सद्गुरुज्ञानप्रकाशानें दूर होत नाहीं. तोपर्यंत माझें मी आत्मज्ञान करून घेईन



असा आग्रह व्यर्थ होय. **तेथ जाणपणें जाणों जासी। तैं जाणावें तेचि नेणसी। तेथ ज्ञातेपणें ज्ञानासी। स्वरूपापाशीं रिगू नाहीं।।** (ना. भा. ३-६४५)

★ ★ ★

**अविद्यागुणें मानवा ऊमजेना ।**
**भ्रमें चूकलें हीत तें आकळेना ।**
**परीक्षेविणें बांधलें दृढ नाणें ।**
**परी सत्य मिथ्या असें कोण जाणें ।।१४३।।**

संशयवृत्ति व देहअहंकार या दोन अडचणी दूर होत नसल्यामुळें कितीही खटपट केली तरी आत्मस्वरूपाचें आकलन होत नाही, असे मागील श्लोकांत सांगितले. या दोन अडचणी दूर न होण्याचें कारण काय हें या श्लोकांत सांगतात.

मनुष्याला अविद्येमुळें स्वस्वरूपाची ओळख पटत नाहीं. यासाठीं अविद्या म्हणजे काय हे समजलें पाहिजे. अविद्या म्हणजे व्यष्टि, अज्ञान, स्वत: व्यक्तीला आपण कोण, आपलें स्वरूप काय,याची जाणीव नसणें, **मी कोण ऐसें नेणिजे । तया नांव अज्ञान बोलिजे ।।** (दा. ७-२-२२) अविद्या ही अनादी, भावरूप व सांत (जिचा विवेकानें अंत होतो) इत्यादि विशेषणांनी विशिष्ट अशी आहे. रजोगुण व तमोगुण यांनी कलुषित झालेल्या सत्त्वगुणाला म्हणजे मलिन सत्त्वगुणाला अविद्या म्हणतात. ही जीवाची उपाधि आहे. ही कर्मानुरूप कमी अधिक शुद्ध अथवा मलिन असते. हीच स्थूळ व सूक्ष्म देहाला कारण होत असल्यामुळें हिला कारण शरीर असें म्हणतात. या मलिनसत्त्वप्रधान उपाधीमुळें जीव हा किंचिज्ञ होतो. त्याला बाह्य कल्पनारूप प्रपंचाचें ज्ञान असतें; पण कल्पनेपलीकडील आपल्या आत्मस्वरूपाचें ज्ञान नसतें. म्हणून आपल्या कल्पनेनें होणारा जो बोध तीच स्वाभाविक अविद्या होय, असें नाथ म्हणतात, **''निज कल्पनेचा जो बोध। तीच अविद्या स्वत: सिध्द। तेणेंचि बाधें विधिनिषेध। ते त्यागिल्या शुध्द ब्रह्मचि।।''** (ना. भा. १२-२२४) एखादा भ्रमिष्ट मनांत कल्पना येईल तसा वागत सुटतो, त्याप्रमाणें ज्ञानी संतांच्या दृष्टीनें आम्ही अज्ञानी जन कल्पनेच्या भराऱ्या मारणारे, खुळेच आहोंत या कारणशरीर अविद्येलाच अज्ञान असें म्हणतात.

अज्ञान म्हणजे ज्ञानाचा अभाव नसून तें अनादि, अनिर्वचनीय, भावरूप आहे. तें जर अभावरूप असतें तर व्यामोह, भ्रम हें भावरूप कार्य

त्यापासून कधीच पूर्ण झालें नसतें. यास्तव अज्ञान म्हणजे ज्ञानाचा अभाव नसून ज्ञानानें नष्ट होणारें, जे ज्ञानविरोधे तें अज्ञान होय. अंधार असा काहीं पदार्थ नाहीं पण तो भासतो. प्रकाशाला प्रतिबंधक पण प्रकाशविराधी म्हणजे प्रकाशानें नाहींसा होणारा तो अंधार, याप्रमाणें प्रत्यक्ष अनुभवाला येणाऱ्या स्वरूपाचा जो प्रतिबंध तें अज्ञान होय व तें कल्पनारूप आहे. अविद्या म्हणजे व्यष्टि अज्ञान, हेंच जगद्रुप भ्रमाचें कारण आहे. या अविद्येचा नाश म्हणजेच मोक्ष व ही अविद्या म्हणजेच बंध. **अविद्यास्तमयो मोक्षः स च बंध उदाहृत:।** असे सुरेश्वराचार्य म्हणतात.

अविद्येचें स्वरूप समजलें म्हणजे या श्लोकाचा अर्थ स्पष्ट होतो. एखाद्याने आपली गरज किंवा इष्ट हेतु साधेल म्हणून खिशांत नाणें ठेविलें पण तें खरें आहे का खोटें आहे हें जर त्यानें पाहिलें नाहीं तर तो भ्रमिष्टच म्हटला पाहिजे. खोट्या नाण्यानें हित साधत नाहीं याची जाणीव तर तो विसरलाच; पण उलट माझ्याजवळ द्रव्य आहे त्यानें सर्व काहीं साध्य होईल या भ्रमांतच तो राहतो. तव्दत् कल्पनारूप प्रपंचरूप ज्ञानालाच मनुष्य खरें ज्ञान समजून चालतो व आपलें अनहित करून घेतो. **आदिकरूनि चौसष्टि कळा । या वेगळ्या नाना कळा। चौदा विद्या सिध्दि सकळा। हें ज्ञान नव्हे ।।** (दा. ५-५-३१) ही जाणीव मनुष्याला नसते त्यामुळें बद्धदशा तीच आत्मदशा या भ्रमांत तो राहतो.

मनुष्याला आपलें स्वहित कळत नाहीं इतकेंच नव्हे तर ज्यांनीं आत्महित ओळखलें आहे व त्याला अनुसरून ज्यांचें आचरण आहे तेच उलट भ्रमिष्ट होते असें त्याला वाटूं लागतें. ही तर बध्ददशेची सीमा होय. या दशेंत विषयभोगसुख हेंच हिताचें वाटूं लागतें. **स्फुरे वीषयीं कल्पना ते अविद्या।।** असें समर्थ म्हणतात. विषयांत गुंतल्यामुळें आपण स्वत:च सच्चिदानंरूप आत्मा आहों हें मनुष्याला कळत नाहीं. दु:खरूप विषयांतच सुख मानून त्यांत रंगल्यानंतर आत्यंतिक कल्याणार्थ खऱ्या सुखाचा विचार करण्याचें भान कोणाला राहणार ?

★ ★ ★

**जगीं पाहता साच तें काय आहे ।**
**अतीआदरें सत्य शोधूनि पाहें ।।**
**पुढें पाहतां पाहतां देव जोडें ।**
**भ्रमें भ्रांति अज्ञान हें सर्व मोडे ।।१४४।।**



खऱ्याखोट्याचा विचार न करतां कल्पनारूप अविद्येचें खोटें नाणें जवळ बाळगल्यामुळें मानवाचें आत्यंतिक हित तर साधत नाहींच, पण उलट आपलें हित साधणार आहे, या भ्रमांत मात्र तो राहतो, असें मागील श्लोकांत सांगितलें. म्हणजे अविद्यारूपी खोटे नाणें संग्रह केल्यानें होणारा लाभ कोणता हे सांगतात.

साच म्हणजे सत्य. सृष्टीकडे पाहिल्यास सत्य अशी वस्तु कोणती दिसते? कोणतीच नाही. जें जें डोळ्याला दिसतें अगर मनास भासतें तें तें सर्व विकारी आणि नाशवंत आहे, सत्य असें कांहीं नाहीं. यासाठीं हें मना, या जगतांत सत्य वस्तु कोणती आहे याचा अत्यंत काळजीपूर्वक बारकाईनें विचार करून पाहा. तूं जसजसा विचार करीत जाशील तसतसा तुझा भ्रम नाहींसा होऊन तुला सत्य वस्तूचें ज्ञान होईल. जें सत्य असतें तें आदि, मध्य व अंत या तिन्ही कालीं जसेंच्या तसें कायम असतें, त्यांत कोणताहि बदल होत नाहीं. पेटींत अव्यक्त असलेला सोन्याचा गोळा अलंकाराच्या रूपानें व्यक्त होऊन बाहेर आला व अलंकार आटून तो पुन्हा पेटींत गेला तरी व्यक्त व अव्यक्त रूपाहून सोनें हें अगदीं निराळेंच आहे. तें गोळाहि नाहीं अथवा अलंकारहि नाहीं. सोन्यांत कोणतीहि घडामोड होत नाही. म्हणून सोनें सत्य होय व गोळा, अलंकार हे मिथ्या होत. कारण तीं दोन्ही सोन्याशिवाय स्वतंत्र नांदूं शकत नाहींत. **सत्यनामाव्ययम् नित्यमविकारि तथैव च।।** (म. भा.) अशी सत्याची व्याख्या आहे. जें अव्यय म्हणजे कधीहि नाश न पावणारें, नित्य म्हणजें नेहमीं कायम राहणारें आणि अविकारी म्हणजें ज्याचें स्वरूप कधीहि पालटत नाहीं, तेंच सत्य होय.

ह्या नामरूपात्मक दृश्य अदृश्य जगांत सर्वत्र व्यापून असलेलें जें ब्रह्म तेंच सत्य होय. **यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति** (भ. गी. ८-२०) या सत्य वस्तूच्या आधारावर विश्व व्यक्त स्वरूपाला येवो किंवा अव्यक्त दशेंत जावो, ही परब्रह्मवस्तु व्यक्त अव्यक्त दशेहून भिन्न असून जशीच्या तथी अनादि सिद्ध आहे. वरील सोन्याच्या दृष्टान्तास अनुसरून ज्ञानोबा म्हणतात, **''नातरी आटतिये अळंकारीं। नाटतें कनक असे जयापरी। तेवीं मरतिये जीवाकारीं। अमर जें आहे।।''** (ज्ञा. ८-१७८)

हे मना, या अमर सत्य वस्तूचा नित्य विचार करून शोध घेत जावें. हें सत्य नाही, तें सत्य नाहीं, सृष्टि सत्य नाहीं, देह, इंद्रियें, सत्य नाहींत

असा असत्याचा विचार करीत जावें. आत्मानात्म विवेकाच्या साहाय्यानें या ब्रह्म वस्तूचा अंतरंगांत शोध घेत राहिलें म्हणजे अखेरीस त्या सत्य स्वरूपाची तुला ओळख होऊन तुझ्या ठिकाणीं असलेली भ्रांति अज्ञान हीं नाहींशीं होतील व त्या सत्य स्वरूपाशी तुझें अखंड तादात्म्य राहील.

अस्य निवडून बाजूला सारीत सारीत ज्ञानदृष्टीनें सत्य ब्रह्माचा अंतरंगांत शोध घ्यावा इत्यादि श्लोकार्थ झाला. पण यावर एक शंका येणें अगदी स्वाभाविक आहे ती अशी कीं, सृष्टीकडे सत्य बुद्धीनें पाहण्याचाच मानवाच्या ठिकाणीं दृढ संस्कार असतो. सृष्टिकर्ता, ईश्वर, सृष्टि, सृष्टीतील सर्व व्यवहार हे सर्व सत्य आहे, अशीच त्याची दृढ बुद्धि असते. अशा परिस्थितींत ब्रह्मच तेवढें सत्य; तद्व्यतिरिक्त सर्व मिथ्या भ्रांति असे जर त्यास सांगितलें तर त्याला तें लगेंच पटावें कसें? व त्यानें सत्य ब्रह्माचा शोध घेण्याला प्रवृत्त व्हावें कसें? शिवाय या सत्याला नाम नाहीं, रूप नाहीं, गुण नाहीं डोळ्याला तें दिसत नाहीं, नाकानें हुंगता येत नाहीं, तें कानानें ऐकूं येण्याजोगें नाही किंवा हातानें स्पर्श करण्यासारखें नाही, अशा वस्तूचा शोध घेण्याकडे मनुष्य प्रवृत्त तरी कसा व्हावा?

ही योग्य अशी शंका लक्षांत घेऊनच शास्त्रानेंहि तिचें समाधान केलें आहे. मानवानें विचारपूर्वक पावलें टाकीत क्रमाने आपली उन्नति करून घ्यावी यासाठीं मंद, मध्य व तीव्र असे मुमुक्षूचे अधिकार लक्षांत घेऊन वेदान्त शास्त्रानें तीन प्रकारच्या सत्ता मानल्या आहेत. त्या लक्षांत न घेतल्यास बरेच गैरसमज तसेच राहतात म्हणून त्याचा थोडक्यांत विचार पाहूं.

व्यावहारिक, प्रतिभासिक व पारमार्थिक अशा तीन सत्ता वेदान्तशास्त्रानें मानिल्या आहेत. (१) व्यावहारिक सत्ताः- यांत ब्रह्मावर भासणाऱ्या आकाशादिकांची सत्ता भिन्न मानिली आहे. त्यामुळें गारुडी विद्येप्रमाणें जग व्यावहारिक सत्तायुक्त आहे असें म्हणावें लागतें. लौकिक व्यवहारामधील घटपटादि पदार्थ यांची लौकिक सत्ता आहे म्हणजे तिनें लौकिक सिद्धि होते. ब्रह्मज्ञान नसलें तरी मनुष्य व्यवहारचतुर असूं शकतो. या सत्तेचा जागृतींत बाध होत नाही. पण स्वप्न, सुषुप्ति, मूर्च्छा, समाधि या अवस्थांत बाध होतो. तिचा ब्रह्मज्ञानानें म्हणजे पारमार्थिक सत्तेनें बोध होतो. (२) प्रातिभासिक सत्ता :- अधिष्ठानाचें ज्ञान झाले असतां जी नष्ट होते ती. उदा. शुक्तिरजत, रज्जुसर्प, स्वाप्निक पदार्थ. तिचा ब्रह्मज्ञानावांचून म्हणजे व्यावहारिक सत्तेनें बाध होतो. उजेडानें दोरीचें ज्ञान होतें व जागे केल्यानें



स्वप्न खोटें ठरतें. (३) पारमार्थिक सत्ता :- या सत्तेचा तीनहि कालीं बाध होत नाहीं. ती एकच त्रिकालाबाधित अशी ब्रह्मसत्ता आहे. पारमार्थिक सत्तेनें व्यावहारिक आणि प्रतिभासिक अशा दोन्ही सत्तांचा बाध होतो. परंतु पारमार्थिक सत्तेचा कशानेंहि नाश होत नाहीं. म्हणून ''एकमेवाद्वितीयं ब्रह्म'' हाच सिद्धान्त खरा आहे.

या सत्तांसंबंधीं एक विचार लक्षांत ठेवला पाहिजे. तो हा कीं यांच्यामधील समानसत्ताक पदार्थांची सत्ता परस्परास साधक अथवा बाधक होते; पण विषमसत्ताक पदार्थांची सत्ता परस्परांस साधकबाधक होत नाही. स्वप्नामध्यें सर्पदंश झालेल्यास व्यावहारिक मांत्रिक तरी पाहिजे किंवा जागृति येऊन सत्तापालट तरी पाहिजे.

जो पदार्थ ज्ञानानें बाधित होतो तो पदार्थ सत्य नसतो. त्याचा अत्यंत अभावच असतो. म्हणून जगामध्यें ''साच तें काय आहे'' हें पहावयाचें झाल्यास प्रातिभासिक सत्तेचा व्यावहारिक सत्तेनें व व्यावहारिक सत्तेचा पारमार्थिक सत्तेनें व्यवहार मात्र सिद्ध होतो, पण पारमार्थिक सत्तेनें इतर दोन सत्तांचा बाध होतो. म्हणून समर्थ म्हणतात- **''हे ज्ञानदृष्टीनें पहावें। पाहोन तेथेंचि राहावें। निजध्यासें तद्रूप व्हावें। संगत्यागें।।** (दा. १९-५-२८)

★ ★ ★

**सदा विषयो चिंतितां जीव जाला ।**
**अहंभाव अज्ञान जन्मासि आला ।**
**विवेके सदा स्वस्वरूपीं भरावें ।**
**जिवा ऊगमीं जन्म नाहीं स्वभावें ।।१४५।।**

जगांत सत्य वस्तु कोणती आहे याचा नीट काळजीपूर्वक विचार करून पाहा. जसजसा आत्मनात्माविवेक होईल तसातसा खरा देव कोणता हें कळून येऊन अज्ञान भ्रांति इत्यादि नाहींशीं होऊन तो देव म्हणजेच आपलें रूप होय हें अनुभवाला येईल, असें मागील श्लोकांत सांगितलें. देव जोडला जाऊन स्वस्वरूपाची ओळखहि जर पटते तर मनुष्य हा विवेक कां करीत नाहीं याचें उत्तर या श्लोकांत देऊन विवेकानें व साधनानें मानवानें आपल्या स्वरूपाची ओळख करून घ्यावी असा उपदेश करतात.

वास्तविक जीव हा ब्रह्मच आहे. परंतु स्वसुखाची गोडी विसरून तो विषयाचेंच चिंतन करीत राहिला. या स्वरूपविस्मृतीच्या अज्ञानामुळें विषयांतच

सर्व सुखाचा ठेवा आहे, असें त्याला वाटूं लागलें. अंतःकरणांतील विषयवासनांमुळें त्या भोगण्यासाठीं त्याला पुन्हा शरीर घेऊन जन्मावें लागतें व शरीर हेंच सारसर्वस्व मानून तो अहंकारानें नाचूं लागतो. विषयविष हें जबरदस्त आहे, विषाचा लेशहि पोटात गेला म्हणजे तो जसा प्राणघातक ठरतो, त्याप्रमाणें विषयांचा अंतःकरणांत सूक्ष्म संस्कार असला तरी तो बुद्धिभ्रंश घडवून जन्ममरणपरंपरेचें घातक चक्र निर्माण करतो. **ध्यायतो विषयान् पुंसः संङ्गस्तेषूपजायते।** (भ. गी. २-६२) **तैसी या विषयांची शंका। मनीं वसती देखा। घातु करी अशेखा। विवेकजाता।।** (ज्ञा. २-३२०)

विषयांची संगति विवेकभ्रष्ट करून पतन घडवून आणणारी असल्यामुळें नीट विचार करून मनुष्यानें मनःपूर्वक ती टाळावी. म्हणजे विषयासंबंधीं आवडनावड टाळावी. ती नसली कीं बुद्धि अंतर्मुख होऊं लागते बुद्धि अंतर्मुख होऊं लागली म्हणजे स्वस्वरूपाचा विचार करावा व तद्रूप व्हावें.

या श्लोकांतील **''विवेकें सदा स्वस्वरूपीं भरावें''** हें तिसरें चरण पूर्वी श्लोक १० मध्यें शेवटचे चरण म्हणून जसेंच्या तसें येऊन गेलें आहें. त्या ठिकाणीं याचा संपूर्ण विचार मांडलेला आहे. या श्लोकाला अनुसरून येथें इतकेंच सांगावयाचें कीं विषयासंबंधी अमुक हवा, अमुक नको ही आसक्तीच नाहींशी झाली कीं विषय हे आहेत तसेच जरी राहिले तरी त्यांची विषारी नांगी नाहीशी होते व ते आत्मानात्मविवेकाला बाधक होत नाहींत. त्यामुळें आत्मविवेक व स्वरूपीं भरणें म्हणजे तादात्म्य या दोन्हीहि गोष्टी शांत चित्तानें होतात. चित्ताला पूर्ण प्रसन्नता आली म्हणजे अखेर तें परमात्मस्वरूपींच लीन होऊन राहतें, पोटांतच अमृताचा झरा असला तर क्षुधा व तृषेची बाधा कशी होईल ? **तैसें हृदय प्रसन्न होये। तरी दुःख कैंचें कें आहे। तेथ आपैसी बुद्धि राहे। परमात्मरूपीं।।** (ज्ञा. २-३४०)

उगमीं म्हणजे ब्रह्माच्या ठिकाणीं जन्म मृत्यू यांची वार्ताहि नाहीं. **माया उपजे ब्रह्म उपजेना। माया मरे ब्रह्म मरेना।।** (दा. ६-५-६) ब्रह्म हें शुद्ध असल्यामुळें तें कशाचें कारण नाहीं. फोलपट काढलेल्या कोणत्याहि शुद्ध बीजापासून अंकुरोत्पत्ति नाहीं. ब्रह्म नित्य असल्यामुळे कशाचें कार्य नाहीं व मुक्त असल्यामुळे कशानेंहि बद्ध होत नाहीं. हीच स्थिति जीवाची आहे. जीव हा ब्रह्मच आहे. **जीवो ब्रह्मैव नापरः।।** अंतःकरण उपाधीला अनुसरून त्याला अंश म्हटले आहे, **ममैवांशो जीवलोके।।** (भ. गी. १५-७) परमेश्वर वस्तुतः चिद्रूप आहे म्हणून जीव हा उपाधीमुळे त्याचा काल्पनिक अंश आहे,



वास्तविक नव्हे. निरनिराळ्या भांड्यांतील जलामुळे प्रतिबिंबें अनेक असली तरी सूर्य एकच म्हणून जीव हा वास्तविक (स्वभावें) ब्रह्मच होय. परंतु ब्रह्मावर अहंचा अध्यास (भ्रम) झाल्यामुळें अविद्या म्हणजे अज्ञान मागें लागलें. तें दूर होऊन जीवानें आपलें उगमस्थान गांठावें म्हणून परमेश्वरानें मनुष्याला विशेष असें ज्ञान दिलें आहे. या ज्ञानाच्या जोरावर मायानदीपार असलेलें आपलें उगमस्थान त्याला गांठतां येतें.

आत्मानात्मविवेकानें त्याला आपल्या शरीरांत असलेल्या अनात्म तत्त्वांचा झाडा करून एक आत्मतत्त्वच सत्य आहे, मी असा अन्य कोणी नाहीं, माझें मी मी म्हणणें हें आत्म्याला अनुसरूनच आहे हें कळून येतें. **पाहतां देहाचा विचार। अवघा तत्त्वांचा विस्तार। तत्त्वें तत्त्व झाडितां सार। आत्माच उरे।।** (दा. ६-२-३०) आतां जेथें आपणच नाहीं तेथें जन्ममृत्यु कोणाला असणार? **आपणासि ठावचि नाहीं। जन्ममृत्यु कैचे काई।।** (दा. ६-२-३४) आत्मा हा निर्गुण असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं पाप-पुण्य, जन्म-मृत्यू ही भानगडच नाहीं. आत्मनात्मविवेकानें याप्रमाणें शाब्दिक ज्ञान (परोक्षज्ञान) होतें. परंतु आपण आत्मस्वरूपच आहों, असें प्रत्यक्ष अनुभवाला येण्यासाठीं म्हणजे अपरोक्ष ज्ञानासाठीं आत्मानुसंधानाच्या अभ्यासानें आत्मस्वरूपाशीं तादात्म्य व्हावें लागतें. आणि हें तादात्म्य बाणलें म्हणजे कळून येतें की **पापपुण्य येमयातना। हे निर्गुणीं तों असेना। आपण तोचि तरी जन्ममरणा। ठाव कैचा।।** (दा. ६-२-३५) म्हणून ''जिवा ऊगमीं जन्म नाहीं स्वभावें'' असें म्हटलें आहे.

अंतःकरणांतील परमात्म्याचें जें प्रतिबिंब त्याला जीव असें म्हणतात. उपाधीमुळें निर्माण झालेलें प्रतिबिंब वास्तविक खोटेंच, परंतु अज्ञानयुक्त अहंकारामुळें तें खरें वाटतें व जीवदशा ही सत्य भासते. तसें भासणें हाच संसार होय. आरशांतील आपलें प्रतिबिंब खोटेंच, पण ते खऱ्याप्रमाणें वाटून मनुष्य त्यांत गुंगून जातो हाच भ्रम.

स्वरूपज्ञानानें हें जीवरूपी प्रतिबिंब मूळ परमात्मरूपी बिंबांत समाविष्ट होतें व जीवदशा आणि त्यांत भासणारें जन्ममृत्यू हे असत्य होत, असें वास्तव ज्ञान होतें. खालील ओव्यांनी हा अवघड विषय सुलभ व स्पष्ट होईल असें वाटतें. **एवं एक सत् तें बिंब। सत् दुसरें प्रतिबिंब। सुखदुःख भोगालंब। सत् दुसरें तयासी। अवलंबोनी मीपणा। प्रतिबिंबात्मा आपणा। नेणोनी सत्यपणाच्या खुणा। मी जड देह म्हणतसे।। त्यास बंध तो हाच। कीं देह आपण मानी साच। ते देहात्मता आहाच। सत् असत् वेगळें करितां।।** (य.

दी. ३३२, ३३३, ३३४).

★ ★ ★

**दिसे लोचनीं तें नसें कल्पकोडी ।**
**अकस्मात आकारलें काळ मोडी ।**
**पुढें सर्व जाईल कांहीं न राहे ।**
**मना संत आनंत शोधूनि पाहे ।।१४६।।**

विषयचिंतनामुळें मनुष्य विवेकभ्रष्ट होतो म्हणून त्यांचें चिंतन सोडून मानवानें स्वस्वरूपविचार करावा म्हणजे जीवाला मुळीं जन्मच नाहीं, हें त्याला कळून येईल, असे मागील श्लोकांत सांगितलें. परंतु दृश्य जगत हेंच मनुष्याला सत्यत्वाने भासत असल्यामुळें ते स्वस्वरूपविचाराला प्रतिबंध करतें. यासाठीं दृश्य जगताची अनित्यता जाणून मानवानें ज्ञेय अशा नित्य ब्रह्माचाच शोध घेऊन स्वस्वरूप अनुभवावें, असें या श्लोकांत सांगतात.

जें जें काहीं डोळ्यास दिसतें तें तें कोटिकल्प कालपर्यंत टिकणारें नाहीं, त्याचा केव्हांतरी नाश होणारच. आकाराला आलेली वस्तु नाश पावणारच. एखादी वस्तु बऱ्याच कालपर्यंत टिकलेली दिसली तरी ती अखेर कालाच्या पोटांत गडप होणारच. कारण **'जें उपजे तें नाशे'** हा सिध्दांत आहे. **जनीं लोचनीं पाहतां दिसतां हें । तया नाश कल्पांतरी होत आहे ।। यत् दृष्टं तन्नष्टं ।।** सर्व सृष्टि हा त्रिगुण व पंचमहाभूतें या अष्टधा प्रकृतीचा खेळ असून त्यालाच दृश्य असें म्हणतात. हें दृश्य नाशवंत आहे, असें वेदश्रुतीचें सांगणें आहे. **पंचभूतें आणि त्रिगुण । ऐसी अष्टधा प्रकृती जाण। अष्टधा प्रकृतीस नामाभिधान। दृश्य ऐसें।। तें हें दृश्य नासिवंत । ऐसें वेद श्रुति बोलत ।।** (दा. ६-२-१४, १५)

यासाठीं हे मना, **अविनाशि तो कोण आधीं पहावा । खरा देव तो आदरें ओळखावा ।।** जी शाश्वत वस्तु आहे तिचा शोध घे. ती दिसत नसली तरी विवेकानें शोध घेऊन सज्जनांनीं तिचा अनुभव घेतलेला आहे. अशी वस्तु म्हणजे **निर्गुण ब्रह्म शाश्वत । जाणती ज्ञानी ।।** (१५) तें शाश्वत ब्रह्म जाणल्याने आपलें तेंच स्वरूप आहे याचा जीवाला अनुभव येतो. व त्यामुळें तो निर्भय होऊन जन्ममरण परंपरेतून सुटतो. म्हणून - **मना संत आनंत शोधूनि पाहे.**

हें शेवटचें चरण असलेल्या पांच श्लोकांच्या गटांतील हा पहिला



श्लोक आहे. या पांच श्लोकांत ज्ञेय असें जें ब्रह्म त्याच्या स्वरूपासंबंधीं विचार आहे. प्रत्यक्ष दृष्टीला दिसणाऱ्या दृश्य सृष्टीलाहि बाजूला सारून हें संत आनंत ब्रह्म जाणावें असें या श्लोकांत म्हटलें आहे. म्हणून या संत आनंताचा विचार पाहू.

संत म्हणजे सत्य, त्रिकालीं बाधित न होणारें, सृष्टीच्या आदि, मध्य व अंती शाश्वत असणारें, नित्य, ज्याचा अभाव नाहीं असें. आनंत म्हणजे अनंत. देशत:, कालत: वस्तुत: जें मर्यादित होत नाहीं तें. श्लोक १३६ पाहा. **अंतचि नाहीं तें अनंत । शाश्वत आणि सदोदित । असंत नव्हे तें संत । सर्वकाळ ।।** (दा. १७-२-२) **ज्ञान म्हणजे जडविलक्षण. सत्यंज्ञानमनंतम् ब्रह्म ।।** अशी श्रुति असून जें सत्य, ज्ञान व अनंत ब्रह्म तेंच पारमार्थिक तत्त्व आहे. हें श्रुत्युक्त ब्रह्मलक्षण आत्म्याच्या ठिकाणींहि आहे. सर्व विषयांचा भोक्ता व सर्व साक्षी या रूपानें त्याचें साक्षात् भान प्रत्येकाला होत असतें. **तो कळतो परी दिसेना । प्रचीत येते परी भासेना । शरीरीं असे परी वसेना । येकें ठाई ।।** (दा. १०-१०-३७)

शुध्द परब्रह्माच्या ठिकाणीं चंचलत्व नाहीं तें निश्चल आहे. पण अष्टधा प्रकृतीच्या उपाधीमुळें त्याच्या ठिकाणीं चंचलत्व भासू लागलें कीं तें ईश्वर, आत्मा, अंतरात्मा, जीवात्मा इत्यादि नांवाला पात्र होतें. **ऐसें कांहींयेक अचंचळ । तें अचंचळी भासे चंचळ । त्यास नामेंहि पुष्कळ । त्रिविधा प्रकारें ।।** (दा. १०-१०-५) उपाधीशीं तादात्म्य झालें कीं ब्रह्मच ईश्वरत्वाला प्राप्त होतें, शुध्द सत्त्वप्रधान प्रकृतीच्या म्हणजे मायेच्या उपाधीमुळें ब्रह्म ईश्वर, अंतरात्मा, नियंता सर्वज्ञ इत्यादि संज्ञा पावतें आणि मलिनसत्त्वप्रधान उपाधींमुळें जीवात्मा, अल्पज्ञ इत्यादि संज्ञा पावतें.

तात्पर्य, जीवाविषयीं विचार करू लागले कीं जगाचा विचार पुढें येतो. जगाचा विचार आला कीं जगकर्त्या ईश्वराचा आणि ईश्वरसिध्दीसाठीं अष्टधा प्रकृतीचा किंवा मायेचा आश्रय करावा लागतो. **जेथें प्रकृतीचें पिसें । समूळ वावो ।।** असें प्रकृतीपलीकडील आपलें शुध्द ब्रह्मस्वरूप जर जीवाला जाणावयाचें असेल तर प्रकृतींमुळे उत्पन्न झालेल्या या मलिन व शुध्द उपाधी दूर करण्याचा उपद्व्याप मनानें केलाच पाहिजे. त्याशिवाय गत्यंतर नाहीं. भगवान अर्जुनाला म्हणतात, **''आकारू जेथ सरे । जीवत्व जेथ विरे । व्दैत जेथ नुरे । अद्वय जें ।। तें परम तत्त्व पार्था । होती ते सर्वथा । जें आत्मानात्मव्यवस्था-। राजहंसु ।।''** (ज्ञा. १३-११४१,४२) म्हणून मना संत आनंत शोधूनि पाहे.

★ ★ ★

**फुटेना तुटेना चळेना ढळेना ।**
**सदा संचलें मीपणें तें कळेना ।**
**तया येकारूपासि दुजें न साहे ।**
**मना संत आनंत शोधूनि पाहे ।।१४७।।**

सर्व दृश्य अदृश्य सृष्टि नश्वर असल्यामुळें तिला विचारानें दूर करून तिचा आधार असलेल्या स्थल, काल, वस्तु इत्यादिकांनीं मर्यादित न होणाऱ्या अशा सत्य शाश्वत वस्तूचा शोध घेऊन तिचा अनुभव घे, असें मागील श्लोकांत सांगितलें. त्या शाश्वत ब्रह्माची काहीं लक्षणें सांगून अहंकार म्हणजे देहबुध्दि असेतोंपर्यंत त्याचें आकलन होत नाहीं, असें या श्लोकात सांगतात.

हें ब्रह्म असें आहे कीं ते कशानेंच फुटत नाहीं किंवा तुटत नाहीं. **जें शस्त्रें तोडितां तुटेना-नैनं छिन्दन्ति शस्त्रणि।।** तें हालत नाहीं किंवा चळत नाहीं. **जे वायोचेनि उडेना। जें पडेना झडेना ।।** (दा. ६-२-१६ व १७) पुढें १७७ व्या श्लोकांत असेच वर्णन आहे - **फुटेना तुटेना कदा देवराणा ।**

तें दिसत नसलें तरी सदा संचलें म्हणजे सर्वत्र घनदाट भरून राहिलें आहे. फुटणाऱ्या, तुटणाऱ्या, चळणाऱ्या सर्व वस्तूंत तें आहे. त्या वस्तु फुटतील, तुटतील, ढळतील, पण हें सर्वाधार ब्रह्म जसेंच्या तसें कायमच राहतें.

न दिसणाऱ्या एखाद्या वस्तूंचे केलेलें वर्णन खरें कशावरून अशी शंका येणें साहजिक आहे. याचें उत्तर असें आहे कीं ब्रह्म दिसत नसलें तरी तें जाणतां येते.आकाश हें बोटानें दाखविता येत नसलें व डोळ्यांस न दिसलें तरी जाणतां येतें. अनेक सज्जनांनी हें ब्रह्म अनुभविलें आहे. इतकेंच नव्हे तर न दिसणाऱ्या या वस्तूला जाणण्यांतच पुरूषार्थ आहे, असें समर्थ म्हणतात. **''जें उमजेना तें उमजावें । जें दिसेना तें पाहावें । जें कळेना तें जाणावें । विवेकबळें ।।''** (दा. ६-२-२२) जोंपर्यंत मीपणा म्हणजे देहबुद्धि आहे तोपर्यंत ही वस्तु सर्वत्र कोंदाटली असे, तरी जाणता येत नाहीं. आत्मानात्मविवेकानें देह व त्यांना अनुसरून असणारा अहंकार या उपाधींचा शेवट होतो तेव्हां या वस्तूची जाणीव येते. देहबुध्दीमुळें जीवात्मा देहाएवढा मर्यादित व देहाप्रमाणें विकारी होऊन राहतो. आणि आत्मबुध्दीमुळें तो व्यापक व निर्विकारी ब्रह्म होतो. **सर्व उपाधींचा सेवट । तेथें नाहीं दृश्य खटपट। निर्गुण ब्रह्म घनदाट । सकळां ठाई ।।** (दा. १४-९-११) तुकोबा आपला अनुभव सांगतात. **आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां । तो झाला सोहळा अनुपम्य ।।१।। आनंदें दाटलीं तिन्हीं त्रिभुवनें । सर्वात्मकपणें भोग झाला ।।२।। एकदेशी होतो अहंकारें आथिला । त्याच्या त्यागें झाला सुकाळ हा ।।३।। फिटले सुतक जन्ममरणाचें ।।** (गा. १७१२)

''एकमेवाव्दितींयं'' असें हें ब्रह्म असल्यामुळें त्याला अन्य कोणत्याहि उपाधीचा संग सहन होत नाहीं. तें निरुपाधिक व्दितीयसंबंधशून्य असें आहे. म्हणून सर्व उपाधींचें निरसन झाल्याशिवाय तें जाणतां येत नाहीं. त्यासाठीं तद्रूपच व्हावें लागतें. **संग सोडवा आपुला । मग पाहावें तयाला ।।** (दा.७-२-१९) आपण म्हणजे तरी कोण? **आपण म्हणिजे मीपण । मीपण म्हणिजे जीवपण । जीवपण म्हणिजे अज्ञान । संग जडला ।।** (दा. ७-२-२०) सर्वांत मोठी जबरदस्त उपाधी म्हणजे अज्ञानामुळें उत्पन्न होणारी ''अहं देही'' ही बुद्धि होय.हा मीपणा त्रिगुण वृत्तींत सांपडल्यामुळेंच त्याला जीवदशा येते. या मीपणाचा संग सुटला म्हणजे स्वस्वरूपाची जाणीव येते. वारा सुटला म्हणजे सुमुद्राचेंच पाणी लाटारूपानें भिन्नसें भासतें. वारा थांबला कीं त्याच लाटांचें समुद्राशीं ऐक्य होतें. तसें अज्ञानजन्य देहअहंकाराच्या वाऱ्यामुळें उत्पन्न झालेल्या गुणवृत्तींच्या लाटा थांबल्या म्हणजे जीवशिवाचें ऐक्य होतें. भगवान् अर्जुनाला म्हणतात - **देहाभिमानाचा वारा । आतां वाजों ठेला वीरा । तैं ऐक्य वीचिसागरां । जीवेशां हें ।।** (ज्ञा. १४-३०५) म्हणून मीपणा सोडून मना संत आनंत शोधूनि पाहे.

★ ★ ★

**निराकार आधार ब्रह्मादिकांचा ।**
**जया सांगता सीणली वेदवाचा ।**
**विवेकें तदाकार होऊनि राहें ।**
**मना संत आनंत शोधूनि पाहें ।।१४८।।**

ब्रह्म हें तुटणारें फुटणारें नसून सर्व ठिकाणीं भरलेलें आहे. पण त्याला व्दैत सहज होत नसल्यामुळें अहंकार सोडून त्याचा शोध घे, असे मनाला मागील श्लोकांत सांगितलें. तें ब्रह्म सर्वाधार व अवर्णनीय असून विवेकानें तद्रूप होऊनच तें अनुभवितां येतें, असें या श्लोकांत सांगतात.

या ब्रह्माला आकार नाहीं. **निराकार म्हणिजे आकार नाहीं ।।** त्याला

कोणाचा आधार नाहीं पण तें मात्र मायाशक्तीनें सर्व ब्रह्माडांचा आधार आहे. ब्रह्मादिकापासून तों मशकांपर्यंत अनंत ब्रह्माडांचा तेंच आधार आहे. या ब्रह्माला सृष्टिउत्पत्तिकालीं ब्रह्मदेव म्हणतात, स्थितिकालीं व्यापकत्वामुळें विष्णु म्हणतात व संहारकालीं रुद्र असें म्हणतात. तीन गुणहि जेव्हा लोपून जातात (निधर्म स्थितींत) तेव्हां काहीं नाहीं अशा शून्यावस्थेंतहि जें उरतें तें वेदादिकांनी ठरविलेलें महाशून्य परब्रह्म होय. **नभाचें शून्यत्व गिळून । गुणत्रयातें नुरऊन । तें शून्य तें महाशून्य । श्रुतिवचनसंमत ।।** ( ज्ञा. १३-९२५)

अशा या सर्वाधार ब्रह्माचें वर्णन करतांना वेदहि थकून गेले. वेदांनीं इतर वस्तूंचा नेति नेति शब्दानें निषेध करून त्याचें वर्णन केलें. न इति न इति म्हणजे याच्याहून दुसरें काहीं नाहीं व याच्याहून श्रेष्ठ कांही नाहीं.

अशा या ब्रम्हाचा विवेकानें शोध घेऊन तद्रूप होण्यानेंच त्याचा अनुभव येतो. जीवाचें तेंच स्वरूप असल्यामुळें त्याला ब्रह्माशीं तद्रूप होतां येतें. विषमधर्माच्या वस्तु एकरूप होत नाहींत. **परब्रह्म म्हणिजे सकळांपरतें। तयास पाहंता आपणचि तें।।** (दा. ९-१-२९) परंतु हें परब्रह्म त्रिगुण व शून्यावस्था यांच्यापलीकडे असल्यामुळें विवेकाने ती ओलांडून पलीकडे जावें लागतें. **आधीं दृश्य सोडिलें । मग सुन्यत्व ओलांडिले । मूळमायेपरतें देखिलें । परब्रह्म ।।** (दा. ८-१०-७०) विवेकाने असा पिंडब्रह्मांडनिरास होण्यासाठीं सतत ब्रह्मचिंतन चालूं ठेवावें लागतें. हें चिंतन कसें करावें हें अगदी सोप्या भाषेंत श्री. पं. प. वासुदेवनंदसरस्वती यांनी आपल्या ''ब्रह्मचिंतनात'' सांगितलें आहें. साधकास उपयोग होण्याच्या दृष्टीनें त्याचा थोडक्यात विचार पाहूं.

वास्तविक ब्रह्म हें कशाचें कारणहि नाहीं व कार्यहि नाहीं. तेंच एक सर्वत्र सर्वाधार असून सृष्टि हा त्यावर भासणारा भ्रम होय, असा वेदान्तसिध्दान्त आहे. या दृष्टीनें महाराज म्हणतात, **''अज्ञानामुळें ब्रह्मापासुन । आकाश झालें बुदबुदासमान । वायु झाला आकाशापासून । वायूपासून तेज झालें ।।''** तेजापासून उदक , उदकापासून पृथ्वी, पृथ्वीपासून व्रीहियवादिक हें सर्व अज्ञानामुळें उत्पन्न झालें. याप्रमाणें कारणातून कार्य निर्माण होतें. जें एकाचें कार्य तें दुसऱ्याचें कारण होऊन सृष्टि निर्माण होते. सृष्टिसंहाराच्या वेळीं कार्य कारणांत नाहींसें होतें. म्हणजें पृथ्वी उदकांत विरते, उदक तेजांत, तेज वायूंत, वायु आकाशात, आकाश अव्याकृत मायेंत व माया शुध्द ब्रम्हांत विरून जाते. त्या ब्रह्मावांचून अन्य कांहीं उरत नाहीं. तेंच आपलें सत्य स्वरूप होय असा विवेक करावा. **नित्य निर्विकल्प निर्विकार। सच्चिदानंद अव्यय मी**



**पर । पंचकोशातीत परमेश्वर । अकर्ता, अभोक्ता, असंग मी ।।** सृष्टि ही चालू राहणारच. परंतु सृष्टि असतानांच असा विवेक करून शुध्द ब्रह्माशीं तादात्म्य पावणें याला विवेकप्रळय असें म्हणतात. **प्रकृती अस्तां विवेक कीजे। त्यास विवेकप्रळये बोलिजे।।** (दा. १०-५-२८) याप्रमाणें विवेकयुक्त ब्रह्मचिंतनाचा अभ्यास झाल्यास समर्थ म्हणतात - **जाणंता जाणंता जाणीव जाते । आपली वृत्ति तद्रूप होते । आत्मनिवेदन भक्ती ते । ऐसी आहे ।।** (दा. १३-२-२८) म्हणून, मना संत आनंत शोधूनि पाहे.

★ ★ ★

**जगीं पाहतां चर्मचक्षीं न लक्षे ।**
**जगीं पाहतां ज्ञानचक्षीं न रक्षे ।**
**जगीं पाहतां पाहणें जात आहे ।**
**मना संत आनंत शोधूनि पाहे ।।१४९।।**

निराकार, सर्वाधार ब्रह्माचें वर्णन करतां येत नसल्यामुळें तद्रूप होऊनच तें जाणावें लागतें, असें मागील श्लोकांत सांगितलें. जसें तें वाणीनें वर्णन करतां येत नाहीं, तसेंच तें चर्मचक्षूंना किंवा ज्ञानचक्षूंना दिसण्यासारखें नसल्यामुळें पाहणें बंद पडून पाहणारा तद्रूपच होतो, असें या श्लोकांत सांगतात.

डोळ्याला दिसणारी वस्तु ही सगुण, साकार असावी लागते. ब्रह्म हें जर निर्गुण, निराकार आहे तर तें चर्मचक्षूनें कसें दिसेल? डोळ्यानें तें पाहूं जाणारा मूर्ख ठरेल. **अस्थीचा देही मांसाचा डोळा। पाहेन म्हणे ब्रह्माचा गोळा। तो ज्ञाता नव्हे आंधळा। केवळ मूर्ख।।** (दा. ६-८-४६) म्हणून डोळ्यानें तें जगांत पाहतां येणार नाहीं. मग तें ज्ञानचक्षूनें पाहतां येईल का? याचें उत्तर ते दुसऱ्या चरणांत देतात.

या चरणाचा दोन प्रकारें परस्परविरोधी अर्थ लाविला जातो व दोन्हीहि बाजूंनीं आधार मिळतात. ते प्रकार असे, (१) न रक्षे म्हणजे निरीक्षे. चर्मचक्षूनें तें दिसत नसलें तरी ज्ञानचक्षूनें तें जाणतां येतें, **ज्ञानदृष्टीचें देखणें । चर्मदृष्टी पाहों नेणे ।।** (दा. ७-४-४८) ज्ञानदृष्टीनें तें जाणतां येतें म्हणून तर ब्रह्मज्ञानाची आवश्यकता व महत्त्व. ज्ञानाच्या टप्प्यांत येत नाहीं असे कांहीं नाहीं व **ज्ञानदेव तु कैवल्यम्** असा सिध्दान्त आहे. संस्कृत रूपांतरकारांनी तर असाच अर्थ केला आहे. **जगत्यां तु यज्ज्ञानचक्षूर्विलोक्यं ।।** दुसरे कोणी याच्या

उलट अर्थ करतात. (२) न रक्षे म्हणजे लक्षित होत नाहीं. वाच्यार्थानें म्हणजे प्रत्यक्ष शब्दार्थानें किंवा लक्ष्यार्थानें म्हणजे विचारानें लक्षांत येणाऱ्या अर्थानें त्याचें ज्ञान झालें तरी प्रत्यक्ष अनुभूतीच्या वेळीं शब्दार्थ व लक्ष्यार्थ हे दोन्हीहि लंगडे पडतात व ज्ञान दिपून जातें, सुर्याभोंवतींचा प्रकाश दृष्टीला दिसला तरी प्रत्यक्ष सूर्यदर्शनाच्या वेळीं डोळे दिपून मिटतात. अशीच स्थिति ज्ञानदृष्टीची होते. **चर्मचक्षु ज्ञानचक्षु। हा तों अवघाच पूर्वपक्षु। निर्गुण ठाईंचा अलक्षु। लक्षवेना॥** (दा. १३-२-१६)

अनुभवाच्या वेळीं द्रष्टा, दृश्य व दर्शन ही त्रिपुटीच संभवत नसल्यामुळें ब्रह्म पाहावयास गेल्यास पाहणेंच नाहींसें होतें असें तिसऱ्या चरणांत म्हणतात, तें पाहावयास गेल्यास पाहणेपणाच नाहींसा होतो. **द्रष्टा द्रष्टपणें नुरे ।।** (दा. ६-१०-१६) **निरखित निरखित (वृत्ति) गेली रे । पाहता तन्मय झाली रे ।।** दृश्यच कांहीं नाहीं तर द्रष्टा कसा उरणार? अनुभविणाऱ्याच्या ठिकाणीं आपण तें अनुभवीत आहों याचें भानहि नाहींसें होतें कारण ज्ञान तरी तेंच, ज्ञाताहि तेंच व ज्ञेयहि तेंच आणि जें अनुभवाला येते तेंही तेंच. **मग तेंचि होय ज्ञान। ज्ञाता ज्ञेय हन। ज्ञानें गमिजे स्थान। तेंही तेंचि॥** (ज्ञा. १३-९३६)

सारांश, तद्रूप झाल्याशिवाय ब्रह्मानुभव नाहीं. यासाठीं क्रमाक्रमानें एक एक पायरी चढत अभ्यासानें वृत्तिरहित अवस्थेला पोहोंचावें लागतें. तो क्रम असा **येथें राहिला वाच्यांश । पाहोनि सांडिला लक्ष्यांश । लक्ष्यांशासरिसा वृत्तिलेश । तोही गेला ।।** (दा. ११-९-२५) या क्रमाभ्यासानें मना, संत आनंत शोधूनि पाहे.

★ ★ ★

**नसे पीत ना श्वेत ना शाम कांहीं ।**
**नसे व्यक्त अव्यक्त ना नीळ नाहीं ।**
**म्हणे दास विश्वासतां मुक्ति लाहे ।**
**मना संत आनंत शोधूनि पाहे ।।१५०।।**

ब्रह्म हें चर्मचक्षूनें किंवा ज्ञानचक्षूनें पाहतां येण्याजोगें नसून पाहाणाऱ्याला जेव्हां स्वत:चाच विसर पडून तो तद्रूप होतो तेव्हांच तें अनुभवाला येतें, असें मागील श्लोकांत सांगितलें. तें रूप व वर्णरहित असल्यामुळें सिध्दान्त वाक्यावर विश्वास ठेवूनच त्याचा शोध घेत गेलें पाहिजे



असें या श्लोकांत सांगतात.

परब्रह्म हें पिवळें नाहीं, पांढरें नाहीं, सावळें किंवा निळेंहि नाहीं. त्याला कोणताच वर्ण किंवा रंग नाहीं. तें सर्वांपलीकडे आहे हें दर्शविण्यासाठीं **आदित्यवर्णस्तमस: परस्तात्** असे त्याचें वर्णन केले जातें. **काळे ना पिवळें नीळें । तांबडें ना हिरवे नव्हे । वर्णवेक्ति तया नाहीं । सदोदितचि संचलें ।।** तात्पर्य रूप, वर्ण, आकार इत्यादि नसल्यामुळें तें दृष्टीस पडणारें नाहीं.

तें व्यक्तहि नाहीं व अव्यक्तहि नाहीं. तें नाहींच म्हणावें तर विश्वरूपानें तें भासतें आणि विश्व तेंच तें, असें म्हणावें तर जें दिसतें व भासतें ती नाशवंत माया होय. **जे नाही म्हणो जाईजे । तव विश्वाकार देखिजे । आणि विश्वचि ऐसें म्हणिजे । तरी हे माया ।। रूप वर्ण व्यक्ती । नाहीं दृश्य द्रष्टा स्थिति । तरी कोणें कैसें आथी । म्हणावें पां ।।** (ज्ञा. १३-८६८, ८६९) ब्रह्म हें याप्रमाणें अत्यंत शुध्द, अतिसूक्ष्म व अप्रत्यक्ष असें असल्यामुळें रूप, वर्ण, व्यक्तिरहित, विलक्षण, अनिर्वचनीय असें आहे. मग अशा विलक्षण वस्तूचा अनुभव तरी कसा यावा? याचें उत्तर तिसऱ्या चरणांत देतात.

समर्थ म्हणतात की, हे विलक्षण परब्रह्म वेदांत व गुरुवाक्यावर श्रध्दा ठेविल्यानेंच शोधितां येतें व मुक्त स्थिति प्राप्त होते. देवावर विश्वास ठेवून ज्याप्रमाणें कांहीं लोक असतात त्याप्रमाणें **जीवो ब्रह्मैव नापर:।** तूं स्वयं ब्रह्मच आहेस, या सिध्दान्तवाक्यावर दृढ श्रध्दा ठेवून सर्व अनात्म वस्तूंचा निरास करितां करितां जें उरतें तेंच ब्रह्म होय. देहभावनेला धरून असणारा तो मी नसून देहातीत असा मी आहे, असें अनुभवाला येणें हीच मुक्ति होय. **सांडूनि रूपनामअभिधान । स्फुरे जें कां उध्दवपण । तें मज हृदयस्थाचें रूप जाण । त्यासी तुवां शरण रिघावें।।** (ना. भा. १२-२६४) निश्चयपूर्वक अशी जी ही सत्यबुद्धि तीच श्रद्धा होय व अशी श्रद्धा हीच मुक्तीस कारण आहे. जो श्रद्धावान असेल त्यालाच मोक्ष हा चौथा पुरुषार्थ सिद्ध होतो. वेदावर, देवावर, गुरुवर, मंत्रावर, संतावर व औषधावर जशी श्रद्धा असेल तसें फळ मिळतें. वेद हें ईश्वराचें वाक्य असून तें केव्हांहि अयथार्थ नाहीं. गुरूहि ईश्वरस्वरूपच आहे म्हणून वेद व गुरुवाक्यावर मुमुक्षूची श्रद्धा पाहिजे. **मुख्य सच्छिष्याचें लक्षण। सद्गुरुवचनीं विश्वास पूर्ण॥** (दा. ५-३-१९)

ब्रह्म हें अत्यंत सूक्ष्म परमार्थतत्त्व श्रुतीनें सांगितलें आहें. तें ग्रहण करण्यास कठीण असल्यामुळें **श्रद्धस्व सोम्य** असें वेदानें सांगितलें आहे. जो श्रद्धाहीन असतो त्याची साधनाकडे प्रवृत्ति होत नाहीं व जो प्रवृत्तिशून्य आहे

त्याला साध्य सिद्ध होत नाहीं. म्हणून वेदांत व गुरुवाक्यांवर श्रद्धा ठेवून मना, संत आनंत शोधूनि पाहे.

★ ★ ★

**बरें शोधितां शोधितां शोधिताहे ।**
**मना बोधितां बोधितां बोधताहे ।**
**परी सर्व ही सज्जनाचेनि योगें ।**
**बरा निश्चयो पाविजे सानुरागें ।।१५१।।**

ब्रह्म हें वर्ण, व्यक्तिरहित असल्यामुळें तें इंद्रियगोचर नाहीं. म्हणून गुरुवेदान्तवाक्यांवर विश्वास ठेवूनच त्याचा शोध घेतला पाहिजे, असे मागील श्लोकांत सांगितलें. त्याचें ज्ञान कसें होत जातें याचा साधनविचार व त्यासाठीं सत्संगाची आवश्यकता या श्लोकांत सांगतात.

बरें म्हणजे आस्थेनें किंवा कळवळीनें. त्या ज्ञेय वस्तूचा आस्थेने योग्य प्रकारें विचार करीत गेल्यास म्हणजे प्रतिकूल विचार दूर सारून अनुकूल असे विचार मनांत ठसवीत गेल्यास त्याचें शाब्दिक ज्ञान होतें. आत्मा कोण, अनात्मा कोण, पिंडांत नित्य काय व अनित्य काय, ब्रह्मांडांत सार कोणते व असार कोणतें याचा विचार करितां करितां ब्रह्मज्ञान होतें. परंतु हें ज्ञान झटदिशी, तडकाफडकी होण्याजोगें नाही. ते क्रमाक्रमानें होत जातें. औषध घेतलें कीं लगेच रोग जात नाहीं. जमीन उत्तम असली, पाणीहि विपुल असलें व शुद्ध बीजाची पेरणीहि वेळेवर झाली तरी प्रत्यक्ष फल हातीं पडेपर्यंत थांबावें लागतेंच. तसेंच ब्रह्मज्ञानहि क्रमाक्रमानें होऊन अनुभवाची योग्यता हळूहळू प्राप्त होते. **तुका म्हणे तेथें न चले तातडी। प्राप्त काळ घडी आल्यावीण।।** त्यासाठीं इंद्रियजय, विषयवैराग्य, तीव्र मुमुक्षा हीं तर असावीं लागतातच पण त्याशिवाय श्रवण, मनन, निदिध्यास व तत्वंपदशोधन इत्यादिहि घडावें लागतें. या साधनद्वारा मनाला हळूहळू आत्मबोध होत जातो.

पण हें सर्व योग्य प्रकारें होण्यासाठीं सत्संगाची आवश्यकता आहे. **धुंडितां धुंडितां देवो। सत्संगें सांपडे जनीं।** एखाद्या प्रापंचिक पोटभरू कलेंत पारंगत व्हावयाचें झाल्यास जर कोणी तरी मार्गदर्शक गुरु लागतो, तर सूक्ष्म अशा कल्पनातीत वस्तूचा अनुभव घ्यावयाचा झाल्यास मार्गदर्शक गुरु नको कां ? म्हणून शोध व बोध हे दोन्ही सज्जनसंगतींत होतात, असें तिसऱ्या चरणांत म्हणतात. जें कशानेंहि साधणार नाहीं तें सत्संगानें घडून येतें. सूक्ष्म अशा आत्मविवेकाची सवय सत्संगाने



लागते. **कृपादान केलें संतीं। कल्पांतींहि सरेना।। तुका म्हणे संतसेवा। हाचि ठेवा उत्तम।।**

बरा निश्चयो म्हणजे शाश्वत ब्रह्माचा निश्चय ''बरा निश्चयो शाश्वताचा करावा'' असें पुढें १६७ व्या श्लोकांत म्हटलें आहे. सानुरागें म्हणजे प्रेमानें किंवा अनुग्रहानें. सज्जनांची संगत जेव्हां लाभते तेव्हां त्यांच्या कृपेनें सर्व संदेह नष्ट होऊन परब्रह्माच्या ठिकाणीं बुद्धीचा निश्चय होतो. आवडीने केलेल्या सेवेनें सज्जन सद्गुरु संतुष्ट होतो व 'हा माझा,' असा त्यांनीं प्रेमानें स्वीकार केला कीं त्या शिष्याचा उद्धार होतो. ज्ञानोबा म्हणतात कीं जगदीशाच्या मनांत भूक निवारण करण्याचें आलें कीं अधणांत वाळू घातली तरी तिचा सुंदर भात होतो. त्याप्रमाणें गुरुचा अनुग्रह झाला म्हणजे गुरूने शिष्याचा अंगीकार केला कीं त्याचा संसारच मोक्षमय होऊन जातो. **आधणीं घातलिया हरळ। होती अमृताचे तांदुळ। जरी भुकेची राखे वेळ। जगन्नाथु।। तयापरी श्रीगुरु। करिति जैं आंगीकारू। तैं होऊनी ठाके संसारू। मोक्षमय आघवा।।** (ज्ञा. १५-२३-२४) असा हा सज्जनसंगतीचा प्रभाव आहे. एकामेवाद्वितीयं ब्रह्म या सिद्धान्त वाक्याचा शोध व बोध घेऊन तें अनुभवावयाचें असेल तर सद्गुरुकृपा हीच किल्ली होय असें समर्थ म्हणतात. मौल्यवान् वस्तूंनी भांडारगृह भरलेलें असलें व त्याची किल्ली हस्तगत झाल्यास त्यांतील सर्व वस्तूंची प्राप्ति होते, तसेंच परमार्थांत आहे. **सद्गुरुकृपा तेचि किली। जेणें बुद्धि प्रकाशली। द्वैत कपाटें उघडलीं। येकसरीं।।** (दा. ७-२-१५)

★ ★ ★

**बहूतांपरी कूसरी तत्वझाडा ।**
**परी अंतरीं पाहिजे तो निवाडा ।**
**मना सार साचार तें वेगळें रे ।**
**समस्तांमधें येक तें आगळें रे ।।१५२।।**

सूक्ष्म अशा परब्रह्माचा शोध व बोध सज्जनांच्या संगतींत त्यांच्या अनुग्रहानें होतो, असें मागील श्लोकांत सांगितलें. सत्संगच कशास पाहिजे ? स्वत:च्या बुद्धिचातुर्यांने किंवा श्रवणांतील वाक्चातुर्यानें त्या सूक्ष्म वस्तूंचें आकलन कां होऊ नये ? याचें उत्तर श्लोकांत देतात. कूसरी म्हणजे चातुर्य. मनुष्यांच्या ठिकाणीं बुद्धि चातुर्य किंवा वाक्चातुर्य असें सर्व दृष्टींने कितीही कौशल्य असलें, अनेक तत्त्वांचे आकलन होऊन त्यांचें प्रतिपादनहि उत्तम

प्रकारें जरी करितां आलें तरी सार्थकता झाली असें नाहीं; कारण ब्रह्मतत्त्व हें ''बोला बुद्धिसी अटक'' असें तत्त्व आहे. तें वाचेला व बुद्धिला अगम्य असल्यामुळे इतर सर्व तत्त्वांचा झाडा म्हणजे निषेध करूनच त्यांचे अनुभवाचें ज्ञान व्हावें लागतें. केवळ तत्त्वांचा शाब्दिक उलगडा करणें म्हणजे कण बाजूला ठेवून भूस कांडण्यासारखे होय. तुकोबा म्हणतात, **''घरोघरी सांगती ज्ञान। भूस शीण कांडिती॥''** प्रथम बुद्धीनें इतर सर्व तत्त्वांचा निषेध झाला पाहिजे. त्यानंतर मध्यें येतें शून्य. पण शून्य नाहीं याचा निवाडा होऊन ब्रह्म आहे, तें शाश्वत आहे, असा बुद्धीचा निश्चय झाला पाहिजे. **इकडे दृश्य तिकडे देव। मध्यें सुन्यत्वाचा ठाव। तयास मंदबुद्धिस्तव। प्राणी ब्रह्म म्हणे॥** (दा. ८-१०-६६) म्हणून शून्यांत न पडतां तें ओलांडून शून्यापलीकडे शून्यत्व जाणणारा उरतोच, याचा निश्चय झाला पाहिजे.

सार म्हणजे तत्त्व, साचार म्हणजें खरें, आगळें म्हणजे विलक्षण, और, सर्वांहून वेगळें असें एकमेवाद्वितीयम्. हे मना, ब्रह्मतत्त्व हें एकच खरे तत्त्व असून तें सर्वत्र सर्वांहून वेगळें अलिप्त असें और तत्त्व आहे, हें परब्रह्म शाश्वत असल्यामुळें सत्य आहे. त्याच्यासारखी दुसरी वस्तु नसल्यामुळें तें सर्वांहून विलक्षण आहे व त्याच्या ठिकाणींच जगाची उत्पत्ति, स्थिति व लय भासमान होत असल्यामुळें तें सर्वश्रेष्ठ आहे. **पंचभूतीं असे मिश्रित। परंतु तें पंचभूतातीत। पंकीं आकाश अलिप्त। असोनि जैसें॥** (दा. ७-४-२०) त्या वस्तूपुढें तुझें चातुर्य, तत्त्वझाडा कांहींच नाहीं. परब्रह्मासारिखें दुसरें कांहींच नसल्यामुळें दृष्टान्त देता येत नाहीं. समजुतीसाठीं दृष्टान्त द्यावयाचा झाल्यास एका आकाशाचाच दृष्टान्त देतां येईल. म्हणूनच श्रुतीनें 'खंब्रह्म' व स्मृतीनें 'गगनसदृशं' असें म्हटलें आहे. आकाशाच्या ठिकाणीं असलेला शून्यत्त्व हा गुण जर बाजूला केला तर आकाश हेंच ब्रह्म म्हणता येईल. **काळिमा नसतां पितळ। मग तें सोनेंचि केवळ। सुन्यत्व नसतां निवळ। आकाश ब्रह्म॥** (दा. ७-४-२३)

असें नामरूपांत असून नामरूपातीत असलेलें हें सूक्ष्म ब्रह्म हे मना, बुद्धिचातुर्यानें जाणतां येत नाहीं.

★ ★ ★

**नव्हे पिंडज्ञानें नव्हे तत्त्वज्ञानें।**
**समाधान कांहीं नव्हे तानमानें।**
**नव्हे योगयागें नव्हे भोगत्यागें।**
**समाधान तें सज्जनाचेनि योगें॥१५३॥**



मनुष्याच्या ठिकाणीं बुद्धिकौशल्य कितीहि असलें व चातुर्यानें त्याला तत्व विवेचन कितीहि करितां आलें तरी परब्रह्म हें सर्वांत असून सर्वांहून वेगळें असें विलक्षण तत्त्व असल्यामुळें त्याचा निश्चय झाल्याशिवाय सार्थकता नाहीं, असें मागील श्लोकांत मनाला सांगितलें. हाच भाव या श्लोकांत स्पष्ट करून सज्जनाच्या मार्गदर्शनाशिवाय आत्मानुभवाचें समाधान प्राप्त होत नाहीं, असें १५१ श्लोकाप्रमाणें, या श्लोकांतहि पुन्हां सांगतात.

पिंडज्ञान म्हणजे शरीरसंबंधींचे ज्ञान. तत्त्वज्ञान म्हणजे पंचभौतिक मायिक ज्ञान. यांत पंचभूतांपासून तों महत्तत्त्वापर्यंत सर्व तत्त्वांचा अंतर्भाव होतो. तानमान म्हणजे गायनादि कलांचे ज्ञान. योग म्हणजे अष्टांगयोग, यम, नियम, आसन, प्राणायमादि. याग म्हणजे यज्ञादि कर्म. भोगत्याग म्हणजे प्राप्त झालेल्या सुखोपभोगाचा त्याग, बाह्य वैराग्य. समाधान म्हणजे समाधि किंवा स्वरूपाकार वृत्ति, तदाकारता.

शरीरज्ञानानें, सृष्टि ज्ञानानें, प्रापंचिक ज्ञानानें, गायनानें, योगज्ञानानें यज्ञयागादि कर्मज्ञानानें, सुखोपभोगत्यागानें, इत्यादि कशानेंहि चिरकाल स्थिर असें समाधान प्राप्त होत नाहीं. याचा अर्थ पिंडज्ञानादि वरील गोष्टी नकोत असा. नव्हे प्रापंचिक स्वास्थ्याला किंवा शरीरधारणेला वरील गोष्टींचे ज्ञान आवश्यकच आहे. परंतु मोक्ष हा चौथा पुरुषार्थ जर सिद्ध करण्याचा असेल तर त्यासाठीं आत्मज्ञानाचीच आवश्यकता आहे. म्हणून समर्थ आत्मज्ञानालाच ज्ञान असें म्हणतात व इतर प्रापंचिक ज्ञानाला कलाकौशल्य असें म्हणतात. ज्ञानाचें लक्षण सांगतांना ते म्हणतात - **''ज्ञान म्हणजे आत्मज्ञान॥** (दा. ५-६-१) **जेथें दृश्य प्रकृति सरे। पंचभूतिक वोसरे। समूळ द्वैत निवारे। या नांव ज्ञान॥''** (दा.५-६-३) योग हा मोक्षदृष्ट्या उपकारक आहे. परंतु तो एखाद्या सिद्धीसाठीं झाल्यास हानिकारक ठरतो. तो पारमार्थिक दृष्टीनेंच व्हावयास पाहिजे.

या श्लोकांत समाधान हा शब्द फार महत्त्वाचा आहे. प्रांपचिक गायनकलादिकांनी समाधान प्राप्त होत नाहीं असें नाहीं, तें होतें, परंतु तें क्षणिक असतें. योगसमाधीनेंहि समाधान प्राप्त होते. परंतु व्युत्थानानंतर तें कायम राहिलच असें नाहीं. कोणत्याहि परिस्थितींत चित्ताची प्रसन्नता जेव्हां स्थिर राहते तेव्हांच त्याला अखंड समाधि किंवा परमसमाधि म्हणतात. समाधान हा शब्द चित्ताची अखंड प्रसन्नता या अर्थानें येथें अभिप्रेत आहे. चिरंतन ज्ञेय असें जें ब्रह्म त्याच्या ठिकाणीं बुद्धीला स्थिर करणें म्हणजें

समाधान होय. नाथ म्हणतात, **''यालागीं समाधि आणि व्युत्थान। या दोन्ही अवस्थांसहित जाण। बुद्धी होय ब्रह्मार्पण। अखंडत्वें पूर्ण परमसमाधि॥''** (ना. भा.२-४३१) अशी अखंड समाधानाची बुद्धि सज्जनसंगतींत मिळणाऱ्या ब्रह्मज्ञानानेंच प्राप्त होते. **सकळ कर्मीं समाधी। हेचि सद्गुरूची बोधी बुद्धी॥** (४२४) कोणतीहि गोष्ट नीट कळल्याशिवाय कृतींत उतरत नाहीं. सज्जनसंगतींत प्रथम श्रवण घडतें. श्रवणामुळें साधकाची बुद्धि हळूहळू शुद्ध होऊन आपण कोण या स्वरूपाचें ज्ञान होऊन अद्वैत बोध होतो. या बोधानंतर अभ्यासानें स्वरूपाकार वृत्ति होते. **सत्संगावरी श्रवण। तेणें कळे निरूपण। श्रवणें होइजे आपण। तदाकार॥** (दा. ७-८-९)

★ ★ ★

**महावाक्य तत्त्वादिकें पंचिकर्णें।**
**खुणे पाविजे संतसंगे विवर्णें।**
**द्वितीयेसि संकेत जो दाविजेतो।**
**तया सांडुनी चंद्रमा भाविजेतो॥१५४॥**

शरीरज्ञान, तत्त्वाचें ज्ञान, गायनादि कला, योग - याग इत्यादिकांनीं न प्राप्त होणारें चित्ताचें समाधान सज्जनसंगतीनें मिळतें, असें मागील श्लोकांत सांगितलें. या श्लोकांत सज्जनांची उपदेशपद्धत कशा प्रकारची असते हें सांगतात.

सज्जनांच्या मुखांतून तत्त्वमस्यादि महावाक्यांचा उपदेश ऐकावयास मिळतो. चार देहांची व्याप्ऐंशी तत्त्वें त्यांच्याकडून कळतात. सूक्ष्म पंचमहाभूतें एकमेकांत मिसळून त्यांचें मीलन कसें होतें या पंचीकरणाचें विवेचन ते करितात. हें सर्व ऐकून सर्व तत्त्वांना आधारभूत असलेलें जें ब्रह्म त्याची खूण पटते, म्हणजे त्यांचे केवळ दिग्दर्शन होतें. सर्व नाशवंत पदार्थांपलीकडे चिरंतन अशी ही वस्तु आहे व तेंच आपलें स्वरुप आहे, हें कळून येतें. ब्रह्म हा कांहीं एखादा पदार्थ नाहीं कीं जो चटकन हातांत देतां येईल. तो एक अनुभव आहे व तो ज्याचा त्यानेंच घेतला पाहिजे. पण हा अनुभव कसा घ्यावा याचा संकेत म्हणजे निश्चय हा सद्गुरुकडूनच होतो. **पदार्थाऐसें ब्रह्म नव्हे। मा तें हातीं धरून द्यावें। असो हें अनुभवावें। सद्गुरुमुखें॥** (दा. ७-३-५२) हा निश्चय खुणेनें कसा होतो हे समजण्यासाठीं शाखाचंद्रन्यायाचा दृष्टान्त दिला आहे. ध्येयाला अनुलक्षून संवाद न झाल्यास तो वादाला कारण होतो, असें



विवेचन श्लोक ११२ मध्यें शाखाचंद्रन्यायानें केलें आहे. येथें ध्येयाला अनुलक्षून सज्जन त्याची खूण कशी पटवून देतात हें त्याच शाखाचंद्रन्यायानेंच सांगावयाचें आहे.

अगदी सूक्ष्म कोर असलेला असा शुद्ध द्वितीयेचा चंद्र दिसत नाहीं. तो ज्यानें पाहिलेला असतो तो न पाहिलेल्यास झाडाच्या विवक्षित फांदीची खूण दाखवून त्या दिशेनें पाहावयास सांगतो, त्या खुणेच्या दिशेनें पाहिलें कीं चंद्रकोर दिसते. चंद्रदर्शनानंतर तो खुणेची फांदी सोडून देतो व चंद्रच पाहात राहतो. असेंच सज्जनांच्या विवेचनश्रवणानें घडतें. परब्रह्म हा चंद्र, महावाक्य ही फांदी, मुमुक्षु हा चंद्र पाहण्याची इच्छा करणारा व सज्जन सद्गुरु हे ज्यानें आधींच चंद्र पाहिलेला असतो तो.

हे श्लोकाचें विवरण झालें. तत्त्वें व पंचीकरण यांचा उल्लेख पूर्वी झाला आहे. येथें शाखाचंद्रदृष्टान्तांत महावाक्य हें खूण म्हणून शाखेच्या ठिकाणीं समजावें असेंहि सांगितलें; परंतु या महावाक्याचें स्वरूप काय हें मुमुक्षूंस ठाऊक असणें जरूर आहे, कारण आत्मज्ञानासाठीं महावाक्योपदेश हा महत्त्वाचा विषय असून त्याचें विवरण हें मुख्य ज्ञान आहे, असें समर्थ म्हणता. **महावाक्याचें विवरण। हें मुख्य ज्ञानाचें लक्षण। शुद्ध लक्ष्यांशे आपण। वस्तूच आहे॥** (दा. ५-६-१४) हें मुख्य ज्ञानदान वास्तविक ब्रह्मनिष्ठ, अनुभवी अशा सद्गुरूकडूनच व्हावयास पाहिजे. त्यांच्याकडून सर्व शंकाचें निरसन होऊन संदेहरहित असें ज्ञान प्राप्त होतें. म्हणून महावाक्यबोध म्हणजे काय हें समजण्यापुरताच येथें विचार करूं.

प्रत्येक वेदाचें एक अशी चार वेदांचीं चार महावाक्यें आहेत. ऋग्वेद- **प्रज्ञानं ब्रह्म॥** यजुर्वेद - **अहं ब्रह्मास्मि॥** सामवेद - **तत्त्वमसि॥** अथर्ववेद - **अयमात्मा ब्रह्म॥** चारीहि महावाक्यें ब्रह्मात्मैक्य प्रतिपादन करितात, म्हणजे जीव हा ब्रह्मस्वरुपच आहे असा बोध करितात; परंतु स्पष्ट वाक्य म्हणून तत्त्वमसि या सामवेदीय महावाक्याचें नेहमीं विवरण केलें जातें. याचें विवरण करण्यापूर्वी शास्त्रीय शब्दानें गोंधळ होऊं नये म्हणून या महावाक्याच्या उपदेशांतील रहस्य काय, हें प्रथम पाहूं. शूद्ध ब्रह्म चैतन्याला शुद्ध उपाधीमुळें ईश्वरत्व येतें व मलिन उपाधीमुळें जीवत्व येतें इतकेंच. ईश्वराची मायाही शुद्ध उपाधि व जीवाची अविद्या ही मलिन उपाधि. या दोन्हीहि दूर झाल्या तर दोघेहि ब्रह्मरूपच. महदाकाश हें एकच, पण मठाच्या उपाधीमुळें तें मठाकाश (ईश्वर) होतें आणि घटाच्या उपाधीमुळें तेंच घटाकाश (जीव) होतें.

घट व मठ उपाधी बाजूला झाल्या कीं सर्व महदाकाशच. या दृष्टान्तानें महावाक्यार्थ समजणें सोपे जाईल.

या महावाक्यांत तीन पदें आहेत. तत्, त्वम्, आणि असि. निरूपाधिक व उपाधिनें युक्त असे दोन प्रकार असल्यामुळें तत्, त्वम् या पदांचे दोन अर्थ आहेत. एक वाच्यार्थ व दुसरा लक्ष्यार्थ. वाच्यार्थ म्हणजे शब्दोच्चार होतांच लक्षांत येणारा अर्थ. उदा. गामानय म्हणजे गाय आण, हा अर्थ लगेच लक्षांत येतो. हा वाक्यांतील मुख्य अर्थ असतो. लक्ष्यार्थ म्हणजे शब्दोच्चार झाल्यावरहि वाक्यांत अर्थयोजना न झाल्यामुळें त्याच्याशीं संबद्ध असा विचारानें लक्षांत येणारा अन्य अर्थ. उदा. असें त्या झाडावरून खालीं जा, असा पत्ता सांगितल्यास झाड चढून खालीं उतरून जावयाचें नसतें, बाजूनें जावयाचें असतें, हा लक्ष्यार्थ कळण्यासाठीं तीन लक्षणें आहेत, तीं अशीं.

(१) **जहल्लक्षण** - यांत वाच्यार्थाचा समूळ त्याग करून लक्ष्यार्थ घ्यावा लागतो. उदा. गंगायां घोषः प्रतिवसति. म्हणजे गंगेत गौळवाडा आहे. गंगाप्रवाहांत वाडा असणें शक्य नाहीं, म्हणून गंगा या पदाचा मुख्य अर्थ जो प्रवाह तो सोडून देऊन त्याच्याशी संबंध असलेलें जें तीर त्याचें ग्रहण करावें लागतें. म्हणजे गंगातीरावर गौळवाडा आहे असा वाक्याचा अर्थ होतो. (२) **अजहल्लक्षणा** - यांत वाच्यार्थ न सोडतां लक्ष्यार्थहि स्वीकारावा लागतो. उदा. शोणो धावति म्हणजे तांबडा धावतो. रंग धावणे शक्य नाहीं. म्हणून रंगाशीं संबंध आहे अशा घोड्याचें किंवा बैलाचें पण ग्रहण करावें लागतें. म्हणजे तांबडा घोडा धांवतो असा वाक्याचा अर्थ होईल. (३) **जहदजहल्लक्षणा किंवा भागत्यागलक्षणा** - यांत वाच्यार्थांतील विरुद्ध भागाचा त्याग करून अविरूद्ध अंश लक्षांत घ्यावा लागतो. उदा. सोऽयं देवदत्तः। एके काळीं राज्य करीत असलेला देवदत्त राजा वैराग्यामुळें बैरागी वेषांत पाहून त्याला ओळखून एक मनुष्य म्हणतो - तोच हा देवदत्त. येथें पूर्वकाल, पूर्वदेश, राजसत्ता, तसेंच ओळखल्या वेळचा वर्तमानकाळ, ठिकाण व बैरागी वेष इत्यादि परस्पर विरुद्ध धर्मरूप वाच्यार्थाचा त्याग करून देवदत्ताच्या एकमात्र पिंडस्वरूप लक्ष्याचें ग्रहण केलें पाहिजे, म्हणजें निरुपाधिक देवदत्ताचें स्वरूप जाणलें जातें. महावाक्यांत या तिसऱ्या लक्षणेचें ग्रहण करितात. **आधीं घेईजे वाच्यांश। मग वोळखिजे लक्ष्यांश। लक्ष्यांशीं पाहतां वाच्यांश। असेल कैचा॥** (दा. ९-२-२२) महावाक्यांत ही लक्षणा कशी लागू पडते तें पाहूं.



**तत्पद** - शुद्ध सत्त्वगुण मायोपाधीनें युक्त सर्वज्ञ, सर्वशक्तिमान्, अंतर्यामीं, जगाची उत्पत्ति, स्थिति व लय करणारा असा जो ईश्वर तो तत्पपदाचा वाच्यार्थ आहे. अविनाशी, अद्वय, विशुद्ध आणि स्वसंवेद्य जें ब्रह्म तो तत्पदाचा लक्ष्यार्थ आहे.

**त्वम्पद** - अविद्येनें म्हणजे मलिन सत्त्वगुणानें युक्त, देहधर्मी म्हणजे मी स्थूल, कृश इत्यादि मानणारा, कर्तृत्व, भोक्तृत्वाचा अभिमानी हा त्वंपदाचा वाच्यार्थ आहे. शरीर, इंद्रियें, अहंकार इत्यादिहून निराळा, निरुपाधिक, साक्षी, कूटस्थ चैतन्य हा त्वंपदाचा लक्ष्यार्थ आहे.

या महावाक्यांत जहल्लक्षणा संभवत नाहीं. कारण या लक्षणेनें तत्त्वम् पदांच्या समग्र वाच्यार्थाचा त्याग होईल. येथें तत्पदानें ईशचैतन्य व त्वम् पदानें जीवचैतन्य असा वाच्यार्थ आहे. ईश व जीवचैतन्याचा त्याग केला तर ऐक्य कशाचें होणार ? महावाक्यानें जाणण्यास योग्य असें जें शुद्ध चैतन्य त्याचाहि या लक्षणेनें त्याग होऊन अनर्थ होईल. म्हणून ही लक्षणा ग्रहण करितां येत नाहीं.

अजहल्लक्षणेंत वाच्यार्थ न सोडतां लक्ष्यार्थहि ग्रहण करावा लागतो. येथें ही लक्षणा मानिली तर वाच्यार्थ संपूर्ण राहणार. आता तत्त्वम् पदांच्या वाच्यार्थाकडे लक्ष दिल्यास जीव व ईश्वर यांच्यांत भेद दिसणारच. कुठें सर्व शक्तिमान ईश्वर व कुठें अल्प शक्तिमान जीव! दोघांचें ऐक्य कसें व्हावें ? हे वाच्यार्थ परस्पर विरोधी असल्यामुळें ऐक्य सिद्ध होणार नाही. म्हणून ही लक्षणासुद्धां त्याज्य ठरते.

तिसऱ्या जहदजहल्लक्षणेनें हें ऐक्य सिद्ध होतें. यांत वाच्यार्थाचा त्याग करून तत्संबंधित लक्ष्यार्थाचें ग्रहण असतें. सर्वशक्तिमान सर्वज्ञ इत्यादि धर्मयुक्त तत्पद वाक्यांत ईश्वरचैतन्य आहे. तसेंच अल्पशक्ति, अल्पज्ञ, इत्यादि धर्मयुक्त त्वमूपद वाच्यार्थ जीवचैतन्य आहे. दोन्ही ठिकाणीं चैतन्य एकच आहे. परंतु परस्परांतील उपाधिकृत धर्म विरुद्ध असल्यामुळें एकत्व सिद्ध होत नाहीं. म्हणून या भागत्याग लक्षणेनें परस्पर विरुद्ध धर्मरूप वाच्यार्थाचा त्याग केला म्हणजे लक्ष्यार्थीनें दोन्हींकडे निरुपाधिक चैतन्य राहतें व असि पदानें त्यांचें ऐक्य साधतें. या लक्षणेनें ब्रह्मात्मैक्य समजून येत असल्यामुळें समर्थ म्हणतात - **''हें लश्यांशें अनुभवणें। येथें नाहीं वाच्यांश बोलणें। मुख्य अनुभवाचे खुणें। वाचारंभ कैचा।''** (दा. ९-२-२५)

महावाक्यरूप शाखेवरून संत हे ब्रह्मचंद्राची दिशा दाखवितात. पण

मनन व अभ्यास या दोन डोळ्यांनी मुमुक्षूनेंच याचा प्रत्यय घेतला पाहिजे. प्रत्ययानंतर काय स्थिति होते हें तुकोबा एका अभंगांत सांगतात - **कांहींच मी नव्हे कोणी ये गांवींचा। एकला ठायींचा ठायीं एक॥१॥ नाहीं आम्हां ज्यावें मरावें लागत। आहो अखंडित जैसे तैसें। तुका म्हणे नामरूप नाहीं आम्हां। वेगळा या कर्मा अकर्मासी॥**

★ ★ ★

**दिसेना जनीं तेंचि शोधूनि पाहे।**
**बरें पाहतां गूज तेथेंचि आहे।**
**करीं घेउं जातां कदा आढळेना।**
**जनीं सर्व कोंदाटलें तें कळेना ॥१५५॥**

सत्संगतींत पंचीकरण महावाक्यादि विवेचन ऐकून परब्रह्माची प्रचीति कशी घेतां येते, हें मागील श्लोकांत सांगितलें. यावर कोणी एखादा म्हणेल कीं न दिसणाऱ्या, न भासणाऱ्या अशा या सूक्ष्म वस्तूबद्दल एवढा खटाटोप कशासाठीं करावयाचा ? याचें उत्तर या श्लोकांत देऊन मानवानें असाध्य तेंच साध्य करावें असें सांगतात.

जे जगतांत चर्मचक्षूंना दिसत नाहीं त्या ब्रह्माचाच शोध घेऊन अनुभव पाहावा. हा उपदेश वरवर पाहिल्यास चमत्कारिक वाटेल. पण विचारांती हाच योग्य ठरेल. जें बाहेर दिसतें तेंच पाहण्याची दृष्टीला सवय असते. पण पुष्कळ ठिकाणीं महत्त्वाची वस्तु अंतरांत गुप्त असते नारळांतील खोबरे बाहेर दिसत नाहीं, आंत असतें. नरोटी फेकून तेंच घ्यावें लागतें. असेंच परमार्थांत आहे. समर्थ म्हणतात, **''प्रगट तें जाणावें असार। आणि गुप्त तें जाणावें सार। गुरुमुखें हा विचार। उमजों लागे॥''** (दा. ६-२-२१)

ब्रह्म हें चर्मचक्षूनें दिसत नसलें तरी अनेक सज्जनांनी ज्ञानचक्षूनें तें अनुभविलें असून त्यासंबंधी सर्वांची एकवाक्यता आहे. मग तें डोळ्याला दिसत नसले तरी नाहीं असे कसें म्हणता येईल ? म्हणून त्या संत आनंताचा शोध घेण्याचे कष्ट घेतले पाहिजेत; कारण त्यापासून बुद्धिग्राह्य अशा आत्यंतिक शाश्वत सुखाचा लाभ आहे. चंद्रावर वास्तव्य, अणुसंशोधन या क्षणिक सुखाच्या गोष्टी विज्ञानांत स्तुत्य, प्रगतीच्या व मानवी ज्ञानाच्या द्योतक ठरतात, तर चंद्रालाहि जी तेज पुरविते व अणूलाहि जी वस्तू आधार आहे ती वस्तु आपण स्वत: असल्याचा अनुभव घेणें हा मानवाचा महापुरुषार्थ नव्हे



का ? सृष्टियंत्रांत कोणतीही गडबड न माजवितां सस्वरूपाची ओळख पटवून घेणें यांतच मानवी जीवनाची सार्थकता आहे. एखाद्या सृष्ट पदार्थाचें ज्ञान असावयाचें पण आपण स्वत: कोण याचें ज्ञान नसावयाचें हा आत्मघात होय. म्हणून न दिसणाऱ्या ब्रह्माचाच शोध घे, असें समर्थ म्हणतात. **वेद विरंची आणि शेष। जेथें सिणले निशेष। तेंचि साधावें विशेष। परब्रह्म तें॥** (दा. ६-२-२४)

हा शोध योग्य पद्धतीनेंच घेतला पाहिजे. चर्मचक्षूनें न दिसणारी वस्तु ज्ञानचक्षूनें शोधिली पाहिजे. अशा बऱ्या रीतीनें पाहत गेल्यास ब्रह्म हें सर्वत्र अगदीं जवळ असून जणू काय गुप्त असल्याचें आढळून येईल. **जगी थोरला देव तो चोरलासे॥** डोळ्यासमोर डोळ्यांत असूनहि त्यांना न दिसणारी अशी ही आजब वस्तु आहे. **राघवाचें रूप पाहतां न दिसे। डोळां भरलेंसे सर्व काळ।**

सर्व ठिकाणी भरलेली असूनहि एखाद्या पदार्थाप्रमाणें हातावर देण्यासारखी ही वस्तु नाहीं. **स्थूल नव्हे सूक्ष्म नव्हे। कांहीं येकासारिखे नव्हे। ज्ञानदृष्टीवीण नव्हे। समाधान॥** (दा. २०-१०-१२) परब्रह्माचा सुगावा लागेल। व त्याच्याशीं तादात्म्य होईल अशी ज्ञानदृष्टि सज्जन देऊं शकतात. त्यांच्याकडून होणाऱ्या महावाक्योपदेशानें ही ज्ञानदृष्टि प्राप्त होते. असें सद्गुरूकडून ज्ञान झाल्याशिवाय जन्ममरणांतून सुटका नाहीं. **महावाक्याचें विवरण। करितां सुटे॥** (दा. ११-३-२९) ज्ञानानें बुद्धीवरील अज्ञानाचें आवरण दूर झालें कीं स्वयंप्रकाश आत्मा आहेच.

★ ★ ★

**म्हणे जाणतां तो जनी मूर्ख पाहे।**
**अतर्कासि तर्की असा कोण आहे।**
**जनीं मीपणें पाहतां पाहवेना।**
**तया लक्षितां वेगळें राहवेना॥१५३॥**

एखाद्या पदार्थासारिखें हातावर घेऊन चर्मचक्षूनें पाहतां येण्याजोगें हें परब्रह्म नसून तें ज्ञानचक्षूनें अनुभविले पाहिजे आणि यांतच परम पुरुषार्थ आहे, असें मागील श्लोकांत सांगितलें. परंतु ''मी ज्ञानी, मी तें जाणलें आहे'' असें जर कोणी अहंकारानें म्हणेल तर तो वेडा आहे, असे या श्लोकांत सांगतात.

ब्रह्म ही काय चीज आहे हें मला समजलें आहे असें जो म्हणतो तो मूर्ख समजावा. म्हणजे त्याला बडबडीचें शब्दज्ञान आहे पण अनुभव नाहीं

असें समजावें. कारण शहाणा, अनुभवी मला ब्रह्म काय आहे तें समजलें आहे, असें कधीं म्हणत नाहीं. **अविज्ञातं विजानताम्, विज्ञातं अविजानताम्॥** (केन उ.) समजलें असा अभिमान धरणाऱ्याला तें समजलेलें नसतें आणि लीनतेनें, तें समजलेलें नाहीं, अशी ज्याची बुद्धि असते त्याला ब्रह्मज्ञान असतें. **अद्वैत चर्चा गुरुगम्य आहे। कळे म्हणे तो सहसा न लाहे। चोरूनि जागे हृदयीं अहंता। कळे म्हणे त्या न कळेचि भ्रांता॥** ब्रह्म ही वस्तु बुद्धीचा विषय असून ती ज्ञेय आहे, असें अज्ञान ज्याला असतें ती विचारीहि नव्हे व ज्ञाताहि नव्हें. त्याला मूर्ख कां म्हटलें हें पुढील चरणांत सांगतात-

अतर्क्य अशा ब्रह्माला जाणणारा कोण आहे ? जी वस्तु दिसतहि नाहीं किंवा भासतहि नाहीं ती ध्यानांत तरी कशी येणार व त्यासंबंधी तर्क तरी काय करणार? **तें ध्यानीं धरितां नये । चिंतनी चिंतावे तें काये । मनामधे न समाये । परब्रह्म तें ॥** (दा. ७-७-२५) जेथें तर्क करितांच येत नाहीं ती वस्तु मी जाणतो असें म्हणणें हें वेडेपणाचें आहे.

दुसरी गोष्ट अशी आहें कीं, जीव हा वास्तविक ब्रह्मस्वरूपच आहे. तो वेगळा कोणी असता तर ''मी ब्रह्म जाणतों'' असें म्हणणें योग्य झालें असतें. **वस्तु येक आपण येक । ऐसी असती वेगळिक । तरि अनुभवाचा विवेक । बोलों येतां सुखें ॥** (दा. ६-१०-३४) परंतु दोघांचें स्वरूप एकच असल्यामुळें ''मी ब्रह्म जाणतों'' असें जेव्हां एखादा म्हणतो तेव्हां आपण जाणणारा ज्ञाता कोणी तरी आहों, जाणावयाचें ब्रह्म ही कांहीतरी वेगळीं ज्ञेय वस्तु आहे आणि ज्ञानानें ती आपण जाणली असें समजतो. यामुळें ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान अशी त्रिपुटी उत्पन्न होऊन तो ब्रह्माहून वेगळा पडतो व मी कोणी तरी एक अन्य आहे, अशी अहंता शिल्लक राहते. त्रिपुटी ही व्दैतांत किंवा मायेंत असते. अव्दैत ब्रह्मानुभवांत ती नाहींशी होते. ब्रह्मानुभवांत अनुभव घेणारा अनुभविता जीव, ज्याचा अनुभव घ्यावयाचा असें जें अनुभाव्य ब्रह्म, त्याच्याशीं एकरूप होऊन जात असल्यामुळें त्रिपुटी नाहींशी होते. मग जाणता, अनुभविता असा कोणी राहातच नाहीं. **अनुभव आणि अनुभविता । सकळ ये मायेचि करितां । ते माया मुळीं नसतां । त्यासी काय म्हणावें ॥** (दा.६-१०-३३)

या ब्रह्मानुभवांत मीपणा म्हणजे अहंता असेपर्यंत ऐक्यानुभव येत नाहीं आणि अनुभव आल्यानंतर सांगणारा मी असा कोणी वेगळा उरत नाहीं. शिवाय तो अनुभव शब्दातीत, सुखस्वरूपच असा असल्यामुळें सांगतां येत नाही. **एथ जाणीव करी तोचि नेणें । आथिलेपण मिरवी तेंचि उणें । आम्ही जाहलों ऐसें जो म्हणे । तो कांहिच नव्हे ॥** ( ज्ञा. ९-३६८)



★ ★ ★

**बहू शास्त्र धुंडाळितां वाड आहे ।**
**जया निश्चयो येक तोही न साहे ।**
**मती भांडती शास्त्रबोधें विरोधें ।**
**गती खुंटती ज्ञानबोधें प्रबोधें ॥१५७॥**

मी ब्रह्म जाणतो असे म्हणणारा ब्रह्मापासून वेगळा कसा राहतो व त्याच्या अंत:करणांत मीपणा कसा घर धरून राहतो, हें मागील श्लोकांत सांगितलें. स्वत:च्या बुद्धीनेंच ब्रह्मज्ञान होऊ शकतें, असा अहंकार धरण्यांत अडचणी कोणत्या आहेत त्या या श्लोकांत सांगतात.

वाड म्हणजे पुष्कळ. सर्वांचा एक निश्चय नाहीं अशीं शास्त्रे पुष्कळ आहेत तसेंच श्लोक ११२ मध्यें व्यवहारांत व शास्त्रकारांत निरनिराळ्या मतभेदांमुळें वादविवाद निर्माण होऊन एक निश्चय कसा होत नाहीं, याचें विवेचन झालें आहे. येथें एवढेंच सांगितलें म्हणजे पुरें कीं - **बहू निवडितां निवडेना । एक निश्चय घडेना । शास्त्रें भांडती पडेना । निश्चय ठाईं ॥** (दा. ८-१-११) शास्त्रांचा परस्परविरुध्द अर्थ करून मती भांडती म्हणजे बुद्धिवान मताभिमानी लोक भांडत असतात. यासंबंधी असें वाटतें कीं मूळ शास्त्रकार हा सहिष्णु व प्रामाणिक असतो. पण त्या शास्त्रावरील टीकाकारांत अहंमान्यता व पांडित्य यांमुळे वाद माजून एक निश्चय होत नाहीं. शास्त्रांचें शाब्दिक ज्ञान होतें; वक्तव्य करितां येतें परंतु अत:करणांत अहंकार व असमाधान तसेंच राहतें. **बहुत शास्त्रीं बहुत भेद । मतांमतांस विरोध । ऐसा करितां वेवाद । बहुत गेलें ॥** (दा. ८-१-१२) जेथें शास्त्रशास्त्रांत मतभेद तेथें तीं वाचून कसा एक निश्चय कसा व्हावा? स्वभावास अनुसरून एखादें मत बनेल एवढेंच.

शिवाय मनुष्याचें आयुष्य इतकें तोकडें व अनिश्चित आहे कीं त्याला अनेक शास्त्रांचा अभ्यास एका जन्मांत होणें शक्य नाहीं. थोडाबहुत अभ्यास झाला तरी शास्त्रांतील मतभिन्नतेंमुळें त्याची संशयव्यथा वाढताच राहते. **नाना शास्त्रें धांडोळितां । आयुष्य पुरेना सर्वथा । अंतरीं संशयाची वेथा । वाढोंचि लागे ॥** (दा. ८-१-२)

जेव्हां प्रबोध म्हणजे यथार्थ रीतीनें आत्मज्ञान होतें किंवा अज्ञानाची

निद्रा संपून ज्ञानाची जागृतावस्था प्राप्त होते, म्हणजे सिध्दान्तासंबंधीं दृढ निश्चय होतो तेव्हां मतिप्रकाश होऊन मनाची चंचलता थांबते आणि संशयच न राहिल्यामुळें समाधान होऊन वादविवाद थांबतो. म्हणून अनेक शास्त्रांच्या मागें न लागतां शरीरस्वास्थ्य आहे तोंपर्यंतच मनुष्यानें यथार्थ ज्ञानासाठीं जाणत्याच्या शब्दावर विश्वास ठेवून आपलें आत्मकल्याण साधावें, असा या श्लोकांतील भावार्थ आहे. **अनेक शास्त्री पहातां पडेना। आयुष्य थोडें पहाणें घडेना।। विश्वास येके वचनीं धरावा। संसार हा दुस्तर नीरसावा ।।**

★ ★ ★

**श्रुती न्यायमीमांसकें तर्कशास्त्रें ।**
**स्मृती वेद वेदांतवाक्यें विचित्रें ।**
**स्वयें शेष मौनावला स्थीर राहे ।**
**मना सर्व जाणीव सांडूनि पाहें ।।१५८।।**

अनेक मतभेद असलेलीं शास्त्रें फार व जीवित अत्यंत अल्प यामुळें मी स्वबुद्धीनें ब्रह्म जाणेन, असा अहंकार धरणें व्यर्थ असून जाणत्याकडून यथार्थ ज्ञान झालें म्हणजे मन:स्वास्थ्य लाभतें, असें मागील श्लोकांत सांगितलें. श्रेष्ठ शास्त्रें व असामान्य व्यक्ति यांचें ज्ञानहि ब्रह्मस्वरूप वर्णन करण्यास असमर्थ असल्यामुळें जाणतेपणाचा अभिमान सोडून स्थिर राहा, असें मनाला या श्लोकांत सांगतात.

श्रुति, स्मृति, न्यायशास्त्रे, तर्कशास्त्र, वेदवेदान्त, पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा, महावाक्ये इत्यादि बुद्धिला थक्क करून सोडणारे श्रेष्ठ ग्रंथ आहेत, परंतु सर्वांची ब्रह्मनिरूपणपध्दति एक प्रकारची नसल्यामुळें सर्वांची मति कुंठित झालेली दिसते. **वेदशास्त्र श्रुति स्मृती। तेथें वाक्यभेद पडती। ते सर्वही निवडती। सद्गुरूचेनि वचनें।।** (दा. ६-६-२६) शास्त्रांतील विरुद्ध वचनांचा समन्वय करून म्हणजे मेळ घालून शिष्यांचे समाधान केवळ ब्रह्मनिष्ठ सद्गुरुच करू शकतो. त्याच्या बोधामुळें शिष्याचें अज्ञान, भ्रांति इत्यादि दूर होऊन आत्मस्वरूपाच्या मार्गाचें नि:संदेह ज्ञान होते.

जाणीवेच्या म्हणजे ज्ञानाच्या दृष्टीनें वेदशास्त्रइतपत ज्ञान कोणाचे आहे? वक्तव्यामध्यें सहस्त्रमुखी शेषासारिखा अन्य वक्ता कोण सांपडेल? पण ब्रह्मनिरूपणासंबंधीं वेदांना नेति नेति म्हणून निषेधार्थानें सांगण्याची पाळीं आली आणि शेषाला खालीं मान घालून मौन स्वीकारून स्वस्थ बसावें लागलें.



भगवंताचे सतत सानिध्य असूनही शेषाला त्या सत्य स्वरूपाचें वर्णन करवेना. **पाहे पां जाणिवेचेनि बळें। कोणी वेदापासुनि असे आगळें। कीं शेषाहूनि तोंडगळें। बोलकें आथी।। तोही आंथरुणातळवटीं दडे। येरू नेति नेति म्हणोनि बहुडे। एथ सनकादिक वेडे। पिसे जाहाले।।** (ज्ञा. ९-३७०, ३७१) जेथें वेद, जैमिनीव्यासासारखें शास्त्रकार ऋषी, सनकादिकांसारखे तपस्वीहि ब्रह्मस्वरूपाचें वर्णन करण्यास असमर्थ ठरतात. तेथें हे मना, तुझा पाड तो किती? यासाठी हे मना, मी ब्रह्म जाणतों. हा अहंकार सोडून निश्चल होऊन राहा. अज्ञान दूर होण्यासाठीं ज्ञान अवश्य पाहिजे, पण त्या ज्ञानाचा अभिमान नको. कारण ज्या ब्रह्मस्वरूपांत ज्ञेय, ज्ञाता व ज्ञान ही त्रिपुटी मावळून जाते. त्या स्वरूपांचें विवरण कसें होणार ? **जेथें शेषाची प्रज्ञा मंदली। श्रुतीस मौन्यमुद्रा पडिली। जाणपणें न वचे वदली। स्वरूपस्थिती।।** (दा. ७-४-४०) जेथे जाणणाराच उरत नाहीं तेथें सांगणार कोण? म्हणून हे मना, ज्ञातेपणाचा अभिमान सोड. शेवटचें चरण जसेच्या तसें श्लोक ११३ मध्येंही आहे.

★ ★ ★

**जेणें मक्षिका भक्षिली जाणिवेची ।**
**तया भोजनाची रुची प्राप्त कैची ।**
**अहंभाव ज्या मानसीचा विरेना ।**
**तया ज्ञान हें अन्न पोटीं जिरेना ।।१५९।।**

ज्ञानसंपन्न वेदवेदांत व बोलका शेष इत्यादिकांनाहि ज्या ब्रह्मस्वरूपाचें वर्णन करितां न आल्यामुळें मौन स्वीकारावें लागतें तें ब्रह्मस्वरूप मी जाणतों, असा ज्ञानाचा अहंकार बाळगणें योग्य नव्हे, असें मागील श्लोकांत सांगितलें. ज्ञानाभिमान हा घातक असल्यामुळें तो ज्ञान पचनीं कसें पडूं देत नाहीं. हें एका व्यावहारिक दृष्टान्ताने या श्लोकांत सांगतात.

सुंदर पक्वान्नाचें भोजन करितांना चुकून जर पोटांत माशी गेली तर लगेच जिभेची चव जाऊन अन्नाचा वीट येऊन पोट ढवळूं लागतें व खाल्लेले अन्न उलटून पडतें. एका माशीचा हा एवढा प्रताप. याप्रमाणें ब्रह्मज्ञानासारिखें अमृतमय भोजन घेत असतांना 'मी ब्रह्मज्ञानी आहें' अशी अभिमानवृत्तिरूप माशी चित्तांत शिरली कीं ती आत्मज्ञान होऊ देत नाहीं व असलेलें ज्ञान चित्तांत मुरूं देत नाहीं. ज्ञानाहंकाराची ही माशी मोठी विचित्र आहे. अज्ञानी मनुष्याला ती फारशी बाधत नाहीं, पण ज्ञानाला मात्र ती छळते. **नवल**

**अंहकाराची गोठी । विशेषें न लगे अज्ञानापाठीं । सज्ञानाचें झोंबे कंठीं । नाना संकटीं नाचवी ।।** (ज्ञा. १३-८२)

अज्ञानी मनुष्य आपणास फारसें कळत नाहीं या जाणिवेमुळें अभिमान सोडून जाणत्याकडून आपलें समाधान करून घेतो. परंतु ज्ञानी मनुष्याला इतरांपेक्षा मलाच सर्व कांहीं अधिक समजतें असे वाटत असतें ही अभिमानाची माशी अमृतमय अशा ज्ञानभोजनाबरोबर चित्तांत शिरली कीं कालवाकालव सुरू होऊन चित्ताला ती अस्वस्थ करिते. **अभिमानें उठे मत्सर। मत्सरें ये तिरस्कार। पुढें क्रोधाचा विकार। प्रबळें बळें।।** (दा. १-१-२३) अशा नासलेल्या अंत:करणांत ज्ञान शिरावें तरी कसें व शिरलें तरी पचावें कसें?

अभिमानरहित चित्त, अहंकार विरघळून गेल्यामुळें शुध्द होऊन आत्मस्वरूपाशीं एकरूप होतें, चिदाकार होतें. परंतु अभिमानयुक्त चित्तांत व्दैताची दृढ गांठ तशीच राहात असल्यामुळें तें आत्मस्वरूपाशी तादात्म्य पावत नाहीं, चिन्मय होत नाहीं. **अहंकार शत्रु व्दैतासी कारण । होऊं नेदी ज्ञान स्वरूपाचें ।।** अहंकार हाच व्दैताला व जीवभावाला कारण असल्यामुळें तो नष्ट झाल्याशिवाय मी ज्ञानी असें म्हटलें तरी स्वरूपस्थिति प्राप्त होत नाहीं. इतकेंच काय पण - **मीपणें वस्तु नाकळे । मी पणें भक्ति मावळे । मीपणें शक्ति गळे । वैराग्याची ।।** (दा. ७-७-४६)

★ ★ ★

**नको रे मना वाद हा खेदकारी ।**
**नको रे मना भेद नानाविकारी ।**
**नको रे मना सीकवूं पूढिलांसीं ।**
**अहंभाव जों राहिला तूजपासीं ।।१६०।।**

पोटांत माशी गेली म्हणजे ती जशी अन्न पचूं देत नाहीं, तसें ज्ञानाभिमान असला म्हणजे तो आत्मकल्याणार्थ चित्तांत ज्ञान रुजूं देत नाहीं, असें मागील श्लोकांत सांगितलें. माशीनें जशी अन्नाची उलटी होते, तसें ज्ञानाभिमानामुळें काय घडतें हें सांगून तो सोडावा, असे मनाला या श्लोकांत उपदेश करितात.

ज्ञानाचा अभिमान स्वस्थ बसूं देत नाहीं. असलेलें ज्ञान तोंडावाटें वाद अथवा उपदेशरूपानें बाहेर पडूं लागतें. द्रव्यासाठीं हलवाई आपल्या मिठाईचें प्रदर्शन मांडतो. पण त्या मिठाईतील एक घाससुध्दां स्वत: सुखानें



तो खात नाहीं. तसेंच या ज्ञानाअभिमान्याचें होतें. ज्या ब्रह्मज्ञानानें स्वत:चा उध्दार करून घ्यावयाचा तें ज्ञान लौकिकांसाठीं वादविवादांत आणि परोपदेशांत खर्ची पडतें.

वादामुळें व्देष, कलह, कामक्रोधादिं विकार उत्पन्न होऊन अहंकार वाढतच जातो. **मीपणें विकल्प उठे। मी पणे कलह सुटे। मीपणें संमोह फुटे। ऐक्यतेचा।।** (दा. ७-७-४९) म्हणून हे मना, विचाराची देवघेव असावी, पण वाद नको. कारण त्यामुळें शेवटीं असमाधानच उत्पन्न होतें. **घालूं नये वाद वाऊगा वेवाद। तेणें गुणें खेद होत आहे।।**

वादानें भिन्नत्व किंवा भेदभावना दृढ होते. ब्रह्मज्ञान हें अनेकांत एकत्व, वैषम्यांत साम्य, भेदांत अभेद जाणून निर्विकार चित्तानें स्वरूपाची ओळख पटवून घेण्यासाठीं आहे. व्दैतभावनेमुळें मीतूंपणाची व षड्विकारांची उत्पत्ति होऊन देहबुध्दीहि दृढ होत जाते. भेद मायेंत आहे. पण ब्रह्माकडे पाहूं गेल्यास भेदाला जागाच नाहीं. **सकळ करणें ईश्वराला। म्हणोनि भेद निर्माण केला। ऊर्ध्वमुख होतां भेदाला। ठाव कैचा।।** (दा. २०-८-१६) म्हणून हे मना, तुला जर मायेकडून परब्रह्माकडे वाटचाल करावयाची असेल तर विकार उत्पन्न करणारा व्दैतभाव तुझ्या ठिकाणीं असतां कामा नये.

पूढिलासी म्हणजे दुसऱ्यास. हे मना, तुझ्या ठिकाणी जोपर्यंत अहंकार म्हणजे देहबुध्दि आहे तोपर्यंत दुसऱ्याला ब्रह्मज्ञान शिकवण्याच्या भानगडींत पडूं नकोस. कारण जेथे तुझाच अहंकार नष्ट झाला नाहीं, तेथें तुझ्या उपदेशानें दुसऱ्यावर परिणाम काय होणार? ज्ञातेपणाचें सोंग जगाला दिसलें तरी आपण आहोंत तसेच जीवभावांत आहों, असा पश्चाताप करण्याची पाळी मात्र शेवटीं म्हणजे अंतकाळीं तुझ्यावर येईल. म्हणून हे मना, अहंकार असेपर्यंत गुरुत्व मिरवूं नकोस.

★ ★ ★

**अहंतागुणें सर्वही दु:ख होतें ।**
**मुखें बोलिलें ज्ञान ते वेर्थ जातें ।**
**सुखी राहंता सर्वही सुख आहे ।**
**अहंता तुझी तूंचि शोधूनि पाहे ।।१६१।।**

ज्ञानाचा अहंकार असला म्हणजे तें ज्ञान आंगी न बाणतां वाद किंवा अनावश्यक उपदेश या रूपानें तोंडावाटें कसे बाहेर पडतें तें सांगून अभिमान

असेपर्यंत दुसऱ्यास उपदेश करूं नये म्हणजे गुरूत्व मिरवूं नये, असें मागील श्लोकांत मनाला सांगितलें, अहंता असतांना केलेल्या उपदेशाचा काय परिणाम होतो, अहंतेमुळें दु:ख कसें ओढवतें व ती नसली म्हणजे सुख कसें होतें, याचा विचार मनाला या श्लोकांत सांगतात.

देहाभिमान हाच सर्व दु:खाचें मूळ आहे. जीवनांत तो असंख्य अनर्थ उत्पन्न करितो. याच्यामुळेंच अनेक विकल्प उठतात व मोह उत्पन्न होतो. **मीपणें मीत्री तुटे । मीपणें प्रीति आटे । मीपणें लिगटे । अभिमान आंगी ।।** (दा. ७-७-४८) त्यामुळें प्रपंचहि सुखाचा होत नाहीं व परमार्थहि साधत नाहीं आणि जीवभाव मात्र दृढ होतो. गुणानुसार हा तीन प्रकारचा होतो आणि गुण व अहंकाराची ही घट्ट गांठ म्हणजेच संसार किंवा जीवदशा होय. **जीव ज्ञानस्वरूप चोखडा। तो करोनि जड मूढ वेडा। दृढ घाली हाडांचे खोडां। तो हा धडफुडा। अहंकारू।।** (ना. भा. २४-१२१) संसार व जीवभाव यांमुळेच सर्व दु:ख.

अशा या घातकी अहंकारामुळें ज्ञानी मनुष्याच्या बोलण्याचा दुसऱ्यावर परिणाम होत नाहीं. ''आहेत झाले अहंमन्य शिष्ट'' अशा शब्दांत त्याची बोळवण होते, त्यामुळें बोललेलें ज्ञान फुकट जातें. असा हा दु:खदायक अहंकार स्वत:च्या ठिकाणीं आला कसा याचा नीट शोध घेऊन त्याचा त्याग कर, अहंकार विवर्जित होऊन राहा म्हणजे तूं सुखरूप होशील, असें उत्तरार्धांत मनाला सांगतात. **मी कोण हें जाणावें । मीपण त्यागूनि अनन्य व्हावें । मग समाधान तें स्वभावें । आंगीं बाणें ।।** (दा. ६-८-५०)

ब्रह्मदेवापासून तों मुंगीपर्यंत सर्व प्राणिमात्रांत गुरगुरणारा हा अहंकार आला कोठून? याचें उत्तर भगवंतांनींच गीतेंत दिलें आहे. **यच्चपि सर्वभूतानां बीजं तदहमर्जुन ।।** (भ. गी. १०-३९) **अहमात्मा गुडाकेश ।।२०।।** जगाच्या बुडाशी ''मी'' हें एक तत्त्व आहे. सृष्टि नसतांना एकाकी ब्रह्माच्या ठिकाणीं ''मी ब्रह्म आहे'' असें जें स्फुरण झालें तीच मूळ माया. **तेथ मी ब्रह्म हें स्फुरे जें स्फुरण । तेंचि मायेचें मुख्य लक्षण ।।** (ना. भा. २४-७५) हेंच 'मी' चे स्फुरण गढूळ होत होत जीवापर्यंत येऊन पोहोंचलें. ब्रह्मांडातीत, गुणरहित ब्रह्म 'मी' ब्रह्मांडांत शुध्द सत्त्वगुणसंपन्न ईश्वर 'मी' आणि पिंडांत मलिन त्रिगुणयुक्त जीव 'मी' असें हें अहंतत्त्व खालपर्यंत पसरलें आहे.

हे मना, तुझा अहंकार दुसऱ्याने कोणी दाखविल्यास तूं चिडतोस. म्हणून आत सांगितल्याप्रमाणें तुझा तूंच जर विचार करशील तर तुला कळेल कीं मुळांत अहंकार हा तुझा नव्हे. तो आहे त्या आत्माराम देवाचा आणि



त्या उसन्या अहंकारावर तूं नाचत आहेस. उसनवारीचें जिणें कधीं सुखाचें होत नाहीं. वास्तविक देहामध्यें भोगी, त्यागी किंवा वीतरागी तो एक आत्मा आहे परंतु त्याच्याकडे दुर्लक्ष होऊन देहांचेच स्तोम माजलें. **प्राणी साभिमानें भुलले । देहाकडे पाहात गेले । मुख्य अंतरात्म्यास चुकले । अंतरीं असोनी ।।** (दा. १८-१-२१) म्हणून मी नाहीच, सर्व कांहीं तो आत्मारामच, या भावनेनें हे मना, तूं आपला अहंकार ज्याचा त्याला समर्पण करून स्वस्थ राहशील तर सुखरूप होशील. **जेथें मुरालें मीपण । तेचि अनुभवाची खूण । अनुर्वाच्य समाधान । या कारणें बोलिजे ।।** (दा. ६-१०-१७)

★ ★ ★

**अहंतागुणें नीति सांडी विवेकी ।**
**अनीतीबळें श्लाघ्यता सर्व लोकीं ।**
**परी अंतरीं सर्वही साक्ष येते ।**
**प्रमाणांतरे बुध्दि सांडोनि जाते ।।१६२।।**

अहंता ही सर्व दु:खाचें कारण असून तिच्यामुळें ज्ञानोपदेशहि फुकट जातो, असें सांगून तिचा उगम लक्षांत घेऊन आत्मस्वरूपांतच ती लीन करुन सुखी व्हावे, असे मागील श्लोकांत मनाला सांगितले. या अहंतेमुळें विवेकी मनुष्यहि नीतिभ्रष्ट कसा होतो, हें या श्लोकांत सांगतात.

विवेक म्हणजे सारासार किंवा आत्मानात्म विचार. अहंतेमुळें पारमार्थिक विचारी मनुष्यहि नीतिभ्रष्ट होतो, म्हणजे वेदमर्यादा किंवा श्रेष्ठांनीं सांगितलेला आचार तो पाळीत नाहीं. जाणतेपणामुळें त्याचा लौकिक वाढतो, मान्यता मिळते व आपण परिपूर्ण झालों असें वाटून तो मोहांत सापडतो; त्यामुळें तो अनितीनें वागूं लागतो. सुक्ष्म होऊन आत्मस्वरूपांत लीन होण्याऐवजी अहंमन्यतेनें फुगून तो लौकिकांत अडकून राहतो. समुद्रजलांतून निघालेलें मीठ जलांत विरघळून जलरूप होतें. पण समुद्रांतच उत्पन्न झालेला मोती जलांत न मिसळतां स्त्रीच्या नाकातील नथेंत सुवर्णसूत्रांत अडकून मिरवीत राहतो. **तेवीं अज्ञानअभिमान आहे । तो सर्वथा तत्काळ जाये । ज्ञानाभिमान कठिण पाहे । गोविंताहे मुक्तत्वें ।।** (ना. भा. १२-६१०) अज्ञानामुळें असलेला देहअहंकार ज्ञानानें घालविता येतो. पण ज्ञानाचा ताठर अहंकार मुक्तावस्था नसतांहि आपण मुक्त आहों, कसेंहि वागावें, अशा मोठेपणाच्या घमेंडींत बध्द करून ठेवितो. अनुचित वर्तन असलें तरी लोकांत मान्यता मिळते

व लौकिकहि वाढतो. कारण बहुजनसमाज बहिरंगाला भुलणारा असतो आणि कांहीं हुषार मतलबी लोक वाहवा करून आपला स्वार्थ साधून घेणारे असतात.

बाहेर लौकिक वाढत असला तरी विवेकी मनुष्यास त्याचें मन आंतून बोंचतच असतें. आपण बाहेर दाखवितों तसे खरोखर नाहीं, याची साक्ष त्याला अंत: करणांत पटत असते. वेद किंवा श्रेष्ठांचीं प्रमाण वचनें आपणांस माहीत असूनहि त्याकडे आपलें दुर्लक्ष होत आहे, याची जाणीव त्याच्या मनाला असते. परंतु अहंकाराचा विवेकावर पगडा बसल्यामुळें प्रमाण वचनांकडे तो दुर्लक्ष करितो आणि मन मानेल त्याप्रमाणें वागूं लागतो. यामुळें विवेक असूनहि चित्ताला समाधान वाटत नाहीं. समर्थ म्हणतात, - **''प्रमाणोत्तरीं चित्त तेंही न घाली । तया पापरूप्यास कां रांड व्याली ।।''** शिवाय अंतर देव, आत्माराम दुरावतो तो दुरावतोच. भगवान् म्हणतात - **''तिळभरी राखोनि अभिमान । जरी मज रिघसी शरण । तरी माझी प्राप्ती नव्हे जाण । अभिमान विघ्न प्राप्तीसी ।।''** (ना. भा. १२-२४६) विवेक असूनहि अहंतेनें आयुष्य फुकट गेल्यामुळें अंतसमयीं पश्चाताप पावल्याची उदाहरणें आपणांसहि दिसतात. म्हणून परमार्थाचा विचार करणाऱ्यांनीं अहंकाराबद्दल विशेष सावध राहिलें पाहिजे. **अहं खवळल्या दारूण । शिवासी विसरवी शिवपण । देहात्मवादे भुलवी पूर्ण । जन्ममरण भोगावी ।।** (ना. भा. २४-११३)

★ ★ ★

**देहेबुध्दिचा निश्चयो दृढ जाला ।**
**देहातीत तें हीत सांडीत गेला ।**
**देहेबुध्दि ते आत्मबुध्दी करावी ।**
**सदा संगती सज्जनाची धरावी ।।१६३।।**

अहंतेमुळें विवेकी मनुष्यहि नीतिभ्रष्ट कसा होतो व लोकांत मान्यता मिळाल्यामुळें स्वत:चे मन खात असतांहि वेद व श्रेष्ठांच्या वचनाकडे दुर्लक्ष होऊन त्याची देहबुद्धि अधिक दृढ कशी होत जाते, हें मागील श्लोकांत सांगितलें, या श्लोकानें ''मना संगती सज्जनाची धरावी'' या पांच श्लोकांच्या गटास सुरूवात होते. या पांच श्लोकांत सत्संगमाहात्म्य वर्णन केले आहे. सत्संगतींत दृढ असलेली देहबुद्धि आत्मस्वरूपीं लीन करून परम पारमार्थिक कल्याण साधावें, असें या श्लोकांत सांगतात.

देहाभिमान सुटणें हे विवेकी मनुष्यासहि जेथें अवघड जातें, तेथें



सामान्य मनुष्याची काय कथा? देह तोच मी असा त्याचा दृढ निश्चय असतो. असा निश्चय झाला कीं देहापलीकडे कांहीं सुख असेल असें त्याला वाटतच नाहीं. जे देहाला सुखाचें तेंच हिताचें, असें त्याला वाटतें. म्हणून विषयानें इंद्रियांचे लळे पुरविण्यासाठीं तो जन्मभर धडपडतो. मरेपर्यंत हा देहाभिमान सुटत नाहीं व जन्ममरण टळत नाही. स्वत:ला विशेष ज्ञान असूनहि याप्रमाणें त्याचें अनहित होतें. संत सांगतात कीं चिरंतन हिताचें व सुखाचे स्थान देहापलकिडे आहे. **हित आहे देहातीत। म्हणोनी निरोपिती संत।।** (दा. ७-२-३७) परंतु देहबुद्धीमुळें या संतवाणीकडे लक्ष जात नाही व चुकून गेलें तरी त्यावर विश्वास बसत नाहीं. एखाद्या मृगाने खऱ्या जलाकडे दुर्लक्ष करून ऊर फुटेपर्यंत मृगजळामागें धावत सुटावें अशीच या जीवाची अवस्था होते. **मुक्त होता परी बळें जाला बद्ध। घेऊनियां छंद माझें माझे।।१।। पाप पुण्य अंगीं घेतलें जडून। वर्म नेणें कोण करिता तो।।२।। तुका म्हणे गेले व्यर्थ गेले बा यावीण। जैसा मृग शीण मृगजळीं।।** (गा. ३३०६) पापपुण्यातीत देहापासून अलिप्त अशा आत्मस्वरूपाकडे धाव न घेता नाशवंत देहाकडे धाव घेतल्यामुळे तो शिणतो व आत्महिताला मुकतो.

यासाठीं देह तोच मी अशी जी अज्ञान किंवा अशुद्ध बुद्धी ती ''अहमात्मा'' या ज्ञान किंवा शुद्ध बुद्धीने नष्ट करावी व शेवटीं ''अहमात्मा'' या ज्ञानबुद्धीचाहि विसर पडावा. अशुद्ध अज्ञानाचा असो किंवा बुद्ध ज्ञानाचा असो, अभिमानाचा समूळ त्याग करण्यातच मानवाचे परम कल्याण आहे. **जेथवर अहंपण । तितुकेही बाधक जाण । शुद्धाशुद्ध अभिमान । नि:शेष सज्ञान सांडिती ।।** (ना. भा. १२-६१४) उपजत देहबुद्धीच्या ऐवजी सहज आत्माबुद्धी असावी.

पण असा बुद्धीत पालट होऊन समूश अभिमान नाहींसा होण्यास सत्संगच पाहिजे. मीपण हें फोडतां येत नाहीं, शस्त्रानें तुटत नाहीं व सोडूं म्हटले तरी कांहीं केल्या सुटत नाहीं. सत्संगति हेंच त्यावर औषध आहे. सज्जनांच्या संगतींत सतत श्रवण घडतें व त्यामुळें योग्य तो बोध होतो. म्हणून शहाण्यानें नेहमीं सज्जन सहवासांत असावें. **जें वित्पत्तीनें न कळे । तें सत्समागमें कळे । सकळ शास्त्रार्थ आकळे । स्वानुभवासी ।।** (दा. ७-१-३९)

''देहबुद्धि ते आत्मबुद्धी करावी'' हें समर्थांच्या उपदेशाचे सार आहे. याचा सुक्ष्म विचार त्यानीं सहज एका सोप्या ओवींत सांगितला आहे तो पाहिला म्हणजे त्यांच्या सहवासांत राहिलेले साधक खरोखर धन्य होत असें

वाटतें. ती ओवी अशी - **देह देऊळ आत्मा देव । कोठें धरू पाहतां भाव । देव वोळखोन जीव । तेथेंचि लावावा ।।** (दा. १४-८-२९) देवाच्या स्थूल मूर्तिध्यानापेक्षां मूर्तींत वसत असलेल्या चैतन्याचें ध्यान होय, हें समजावून देण्यासाठीं ही ओवी आहे. पण याच ओवींचें स्वदेहाला म्हणजे स्वमूर्तीला अनुसरून थोडेंसें निराळ्या प्रकारें चिंतन केल्यास देहबुद्धि ते आत्मबुद्धि होण्यास सोपें जातें.

तुम्हाला देवावर प्रेम करावयाचें आहे कीं देवळावर? ध्यान देवळाचें धरणार कीं देवाचें? याचा थोडा विचार करा आणि देव ओळखून तेथें जीवभावानें प्रेम करा. आत्मा सोडून अनात्म्यांचें ध्यान करण्यांत दोष असून पदरीं शीणच पडतो. म्हणून चिंतन असें असावें की स्वदेह हें एक चालतें बोलतें देऊळ आहे. हृदयस्थ आत्माराम हा त्यांत देव आहे आणि अहंजीव हा त्याचा पुजारी आहे. पुजाऱ्यानें देवळांत न हिंडता देवासन्निध राहण्यातच त्याचें हित आहे. म्हणून देहदेवळांत न रमतां आत्मदेवाजवळ राहण्याची त्यानें हळूहळू सवय केली पाहिजे. जसजसा देवाजवळ राहण्याचा छंद वाढेल तसतसें देवाशीं सख्यत्व जडेल व त्याच्या कृपेनें त्याला अनुभवाला येईल कीं अहं असा अन्य कोणी नसून चालता बोलता, देता घेता, कर्ता करविता सर्व काहीं तो एक आत्मारामच आहे. देहदेवळांतील सर्व व्यापार त्याच्या सत्तेखालीच चालू आहे. बुद्धीचा असा निश्चय झाला कीं शुद्ध अशुद्ध कोणतीच अहंता बोचक न होतां सहजासहजी देहबुद्धि ही आत्मबुद्धि होते. सज्जनसंगतींत सहज बोलण्यांतून असा हिताचा उपदेश होतो. त्याचें श्रवणमनन करून देहबुद्धि सोडून आत्मबुद्धि धरणारा हा खरा साधक होय. **देहबुध्दि विवेकें वारी। आत्मबुद्धि सदृढ धरी। श्रवण मनन केलेंचि करी। या नांव साधक।।** (दा. ५-९-८)

★ ★ ★

**मनें कल्पिला वीषयो सोडवावा ।**
**मनें देव निर्गूण तो वोळखावा ।**
**मनें कल्पितां कल्पना ते सरावी ।**
**सदा संगती सज्जनाची धरावी ।।१६४।।**

सत्संगामुळें देहबुध्दि नष्ट होऊन आत्मबुध्दि स्थिर होते व देहातीत आत्मस्वरूपाशीं ऐक्य होऊन मानवांचे परम हित साधतें, असें मागील श्लोकांत



सांगितलें. सत्संगामुळें सर्व कल्पनांचा निरास होऊन कल्पनातीत अशा निर्गुण देवाची ओळख पटते, असें या श्लोकांत सांगतात.

निद्रावस्था सोडली तर मन हें कोणत्या ना कोणत्या तरी विषयकल्पनेंत वावरतच असतें. तें मनुष्याला स्वस्थ बसू देत नाहीं. केव्हा कल्पना बऱ्या केव्हा वाईट इतकाच फरक. कल्पना हेंच त्याचें जीवन असल्यामुळें त्यांच्या अभावी तें नाहींसें होते म्हणजे स्वरूपीं लीन होतें. विषयापासून त्याला सोडविण्यास हाच एक उपाय होय. देवाची ओळख करून घ्यावयाची, तो तर सर्व कल्पनांच्या पलीकडे, इतकेंच नव्हे तर तो बुद्धीच्याहि पलीकडे. **'यो बुद्धेः परतस्तु सः ।।** काळे असोत अगर पांढरे असोत, ढग बाजूला झाल्याशिवाय सूर्यदर्शन कसें होणार? ढग सूर्यामुळेंच प्रकाशित होतात व त्याच्यामुळेंच डोळयाला दिसतात. ढग बाजूला झाले की पलीकडे सूर्य आहेच. त्याप्रमाणें सर्व कल्पना आत्मस्वरूपामुळें दृश्य होऊन मनाला भासतात. कल्पना दूर झाल्या कीं आत्माराम आहेच. सारांश, कोणतीहि कल्पना नसेल तेव्हांच आत्मदर्शन घडत असल्यामुळें निर्विकल्प स्थितींत गेल्याशिवाय आत्मानुभव नाहीं.

ही निर्विकल्पावस्था एकदम प्राप्त होत नाहीं. त्यासाठीं श्रवण, मनन, साधनादि अभ्यास करावा लागतो. तात्त्विक दृष्टीनें कल्पनेचे दोन प्रकार आहेत. एक व्दैत म्हणजे अशुद्ध कल्पना व दुसरी अद्वैत म्हणजे शुद्ध कल्पना. अशुद्ध कल्पना म्हणजे मायिक कल्पना व शुद्ध म्हणजे ब्रह्मवस्तूसंबंधी कल्पना. अशुद्ध कल्पनेमुळें व्दैत भाव वाढतो व शुद्ध कल्पनेमुळें अद्वय ब्रह्मबोध होतो. **शुद्ध कल्पनेचा अर्थ। अद्वैताचा निश्चितार्थ। आणि सबळ ते वेर्थ। द्वैत कल्पी ।।**(दा.७-५-३६) मन हें नेहमी अशुद्ध, मायिक कल्पनेतच चरत असतें, त्याची ती सवय गेल्यावर शुद्ध कल्पनांचे घास घालावे लागतात. पण ही सवय गेल्यावर शुद्ध कल्पनांची चटकहि राहतां उपयोगी नाहीं, तरच निर्गुण देवाची ओळख व्हावयाची, एरवीं नाही. चढलेली भांग उतरवण्यासाठीं दुसरें उताऱ्याचें औषध द्यावयाचें असतें. पण शुद्धि आली कीं उताऱ्याचें औषधहि थांबविलेच पाहिजे. भांग काय किंवा उतारा काय दोन्हीहि औषधेंच. औषधविरहित स्थिति तेंच खरें स्वास्थ होय. तसेंच अशुध्द कल्पना नष्ट करण्यासाठीं शुध्द कल्पना पाहिजे. पण ती शुद्ध कल्पनाहि तद्रूपता प्राप्त होऊन स्वरूपांत लीन झाली पाहिजे. **शुध्द कल्पनेचें रूप। तेंचि तें कल्पी स्वरूप। स्वरूप कल्पितां तद्रूप। होये आपण।।** (दा. ७-५-३९) अव्दितीय ब्रह्माची शुद्ध

कल्पना करितां करितां त्या कल्पनेलाहि मिथ्यत्व येऊन ती नाहींशी व्हावी व केवळ निर्विकल्प स्वरूप उरावें. **निर्विकल्पासी कल्पितां। कल्पनेची नुरे वार्ता। नि:संगास भेटों जातां। नि:संगा होईजे॥** (दा. ७-३-५१)

पण हें होण्यासाठीं शुद्ध अशुद्ध कल्पनांचा बोध झाला पाहिजे. तो होण्यासाठी सज्जनांच्या अद्वैत निरूपणाचें श्रवण झालें पाहिजे व श्रवणानंतर मनन-निदिध्यासन व ध्यानादिकांचा अभ्यास झाला पाहिजे. **श्रवण आणि मनने। निजध्यासें समाधान। मिथ्या कल्पनेचें भान। उडोने जाये॥** (दा. ७-५-२७) यासाठी सदा संगती सज्जनाची धरावी.

★ ★ ★

**देहादीक प्रपंच हा चिंतियेला।**
**परी अंतरीं लोभ निश्चित ठेला।**
**हरीचिंतनें मुक्तिकांता वरावी।**
**सदा संगती सज्जनाची धरावी॥१६५॥**

सत्संगामुळें मनांतील अशुद्ध कल्पना शुद्ध कल्पनांनी नाहींशा होऊन कल्पनतीत देवाची ओळख कशी पटते हें मागील श्लोकांत सांगितलें. सज्जनसंगतीमुळें देह प्रपंचादिकासंबंधी वैराग्य उत्पन्न होऊन मुक्त स्थितीची जाणीव येते असें या श्लोकांत सांगतात.

देह व तत्संबंधी प्रपंच किंवा मी व माझें याचें कितीहि चिंतन केलें तरी शेवटी फळ काय ? अंत:करणांत लोभाचें ठाणें दृढ होऊन राहणें हेंच होय. त्या लोभासाठीं पुन्हा देह व पुन्हा मरण. **दह्यते त्रिविधतापैस्तद्देह:॥** अशी देहाची व्याख्या आहे. त्रिविध तापानें पोळत राहणारा तो देह; आणि पंचज्ञानेंद्रियांच्या शब्द - स्पर्शादि विषयांचा येणारा जो अनुभव तो प्रपंच. **कीं प्रपंच म्हणावें तया। जो अनुभव ये पांचा इंद्रियां। शब्द स्पर्श रूप रस गंध या। वेगळा प्रपंच काय असे ?॥** (य. दी. ६-११३५) वास्तविक देह काय, प्रपंच काय, दोन्हीहि नासकीं व नश्वर. परंतु या मृत्युलोकीची समजूतच उलटी असल्यामुळें या दोहोचेंच चिंतन सतत चालूं असतें. विषयसुखभोगांत गुंतून पडलेल्यास या लोकीं सुखी समजतात आणि लोभाखाली दडपून गेलेल्यास शहाणा मानतात. **जो बहुवे विषयविलासें गुंफे। तो म्हणती उवायें पडिला सापें। जो अभिलाषभारें दडपे। तयातें सज्ञान म्हणती॥** (ज्ञा. ९-५०९) उवाई - उत्कर्ष-सापे-सांप्रत. या विपरीत समजुतीमुळें देह व प्रपंचलोभ वाढतच



जातो. पूर्वी श्लोक १६ मध्यें सांगितल्याप्रमाणें तो पुन्हा जन्माला कारण होतो. होणारे विषयोपभोग कधी मनाविरुद्ध म्हणजे कधी सुखाचे तर कधीं दुःखाचे असतात. आणि ज्या देहासाठीं त्यांचा लोभ धरावयाचा तो देह तर घाणेरडा व कालाधीन. **तरी भोग्यजात जेतुलें। तें एका देहाचिया निकिया लागले। आणि येथ देह तंव असे पडिलें। काळचां तोंडीं॥** (ज्ञा. ९-४९५) म्हणून या देहप्रपंचादिकांचें चिंतन न करितां पापहारक हरीचें चिंतन करून मुक्तिकांतेचा अंगीकार करावा, असें उत्तरार्धांत सांगतात.

हरिचिंतनाने मुक्तिकांता कशी वरतां येते हें स्वतः भगवंतांनींच गीतेंत सांगितलें आहे. ते म्हणतात- अर्जुना, तूं विपरीतज्ञान असलेल्या या अनित्य, दुःखरूप मृत्युलोकांत जन्मला आहेस. या कचाट्यांतून तुला जर मुक्त व्हावयाचे असेल तर त्याला एकच उपाय आहे. तो म्हणजे- **मन्मना भव मत्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु॥** (भ. गी. ९-३४) माझ्या अनुसंधनानें सर्व प्रापंचिक कल्पना जाळून माझ्या भावनेनें तूं जर भरून जाशील तर तूं मत्स्वरूप होशील. हे माझ्या अंतरंगांतील गुह्य तुला सांगतों. **तूं मन हें मीचि करी। माझ्या भजनीं प्रेम धरी... । ऐसा मियां आथिला होसी। तेथ माझिया स्वरूपा पावसी। हें अंतःकरणींचें तुजपासीं। बोलिजत असे॥** (ज्ञा. ९-५१७,५१९)

वास्तविक कुलशीलवान् मुक्ति ही वेदशास्त्रांनीं जीवासाठीं निश्चित केलेली वधू होय. पण जबरदस्त अहंकाराच्या तावडींत सापडल्यामुळें मोहित होऊन जीवाचें प्रेम जडलें अमंगळ कायेवर आणि या धूर्त भद्रेश्वर दीक्षित अहंकारानें त्यांच्या या प्रीतिविवाहाची गांठ घट्ट बांधून टाकली. **नवल अहंकाराची थोरी। सचेतना अचेतन नोवरी। स्वयें लग्न लावी प्रीतीवरी। चिदचिद् ग्रंथी। पुरी पाडुनी॥** (ना. भा. २४-११९) चैतन्यस्वरूप जीवाची जड कायेशी लग्नगांठ बांधून हा अहंकार मोकळा होतो. आता ही प्रीतिविवाहाची गांठ सज्जनावांचून दुसरा कोण सोडविणार? तात्पर्य देहप्रपंचादिकांचा लोभ सुटून विषयवैराग्य उत्पन्न होऊन हरिभजनाकडे वृत्ति वळणें, हा वृत्तिपालट सत्संगावाचून होणारा नसल्यामुळें ''सदा संगती सज्जनाची धरावी.''

★ ★ ★

**अहंकार विस्तारला या देहाचा।**
**स्त्रियापुत्रमित्रादिकें मोह त्यांचा।**
**बळें भ्रांति हे जन्मचिंता हरावी।**
**सदा संगती सज्जनाची धरावी॥१६६॥**

सज्जनसंगतीमुळें देहप्रपंचादिकांचा लोभ सुटतो, विषयवैराग्य प्राप्त होतें, हरिचिंतनाकडे वृत्ति वळते व हरिकृपेमुळें मुक्तिकांता वरता येते, असें मागील श्लोकांत सांगितलें. विस्तार पावणारा व मोह आणि भ्रम उत्पन्न करणारा देहअहंकार सत्संगामुळें दूर होऊन भ्रमनिरास होतो व जन्ममरणाचिंता नाहींशी होते, असें या श्लोकांत सांगतात.

या अहंकाराचें मूळ शुद्ध व टवटवीत असल्यामुळें त्याचा विस्तार फार झपाट्यानें होतो. त्याचें मूळ आहे परब्रह्माच्या ठिकाणीं ''अहं ब्रह्मास्मि'' या सृष्टीपूर्वी झालेल्या प्रथम स्फुरणात. (श्लोक १६१ पाहा) अहं हें स्फुरण प्रथम उमटलें व हृदयस्थ परमात्म्याबरोबर तें अंतःकरणापर्यंत पसरत आलें. या शुद्ध अहंचें स्फुरण तेंच आत्म्याचें स्वरूप होय आणि आत्मा व ब्रह्म एकच होय. या शुद्ध अहंच्या अस्तित्वाला **अहंभाव** असें म्हणतात. नामरूपाला सोडून असलेला हा अहंभाव मोक्षाला उपकारकच आहे. परंतु अज्ञानामुळें म्हणजे स्वरूपविस्मृतिमुळें हा अहंभाव जेव्हा अंतःकरणाच्या तंत्रानें वागूं लागतो तेव्हां तो चित्तचतुष्टयांतील अहंकार बनतो व देहाशी तादात्म्य पावून जीवाबरोबर सुखदुःख भोगितो, मग ज्या ज्या तत्त्वांत तो प्रवेश करेल तें तें तत्त्व मीच असें म्हणत सुटतो. **अहमिति प्रथमाध्यासें। जीवाशीं जीवत्व आभासे। तो जें जें तत्त्वीं प्रवेशे। तें मी ऐसें म्हणतचि॥** (ना. भा. १२-३०९) स्वतःच्या चिद्रूपाचें विस्मरण व देहाशी तादात्म्यामुळें जें दिसेल तें मी, असें भ्रमानें त्याला वाटूं लागतें. अंतःकरणातील संकल्प-विकल्प करणारें मन तें मीच असें वाटून तो मन होतो, विषयचिंतन करणारें आपणच असें वाटून तो चित्त होतो. आणि निश्चय करणारा शहाणा मीच असें वाटून तो बुद्धीहि होतो. **एवं देहाभिमानाचे माथां। चित्तचतुष्टय अवस्था। मुख्य संसाराचा कर्ता। जाण तत्त्वतां देहाभिमानु॥** (ना. भा. ३-११२)

हा अभिमान जसजसा फोफावत जाईल तसतसा तो स्थूल व सूक्ष्म देहापुरताच मर्यादित न राहतां देहाशीं संबंध असलेल्या बाह्य जड व चेतन वस्तूहि माझ्याच, असा तो आग्रह धरून बसतो. मातापिता, बहिणभाऊ, स्त्रीकन्या, पुत्रमित्र, धनधान्य, गृहजमीन, पशु इत्यादि सर्व माझेंच असें त्याला वाटू लागतें. परमेश्वरानें स्वाधीन केलेल्या वस्तूंचें विश्वस्तपण विसरून त्यांच्यावर तो मालकी हक्क सांगू लागतो.

याप्रमाणें मी व माझें म्हणून स्त्रीपुत्रादिकांचा मोह धरणें हा केवळ भ्रम होय. या भ्रमामुळेंच वासनेंत गुंतून जन्ममरण मागें लागतें म्हणून



निग्रहपूर्वक नित्यानित्य विवेकबळानें या भ्रमाचें निरसन केलें पाहिजे व जन्ममरणचक्रांतून सुटलें पाहिजे. मी व माझें असें कितीहि म्हटलें तरी मृत्यु आला कीं सर्व थांबते. माझें म्हटलेलें सर्व राहतें येथें व आपण जातो कोठे याचा पत्ताहि नाहीं. अनेक जन्म झाल्यामुळें मायबापेंहि अनेक झालीं, परंतु आपणाबरोबर त्यांतील सतत असें कोणीच नाहीं. मग माझें असें कोणाला म्हणावें ? **तुवां भोगिल्या पुनरावृत्ति। ऐसीं मायबापें कितीं। स्त्री कन्या पुत्र होती। लक्षानलक्ष॥** (दा. ३-१०-५१) असा मुद्दाम विवेक केल्यानें मनांत वैराग्य उत्पन्न होतें, पण तें क्षणिक न राहतां दृढ होण्यासाठीं सत्संगाचीं जरूरी आहे. देहाभिमान खोल मुळांत असल्यामुळें त्याचें समूळ उच्चाटन सज्जनसहवासांत मिळणाऱ्या ज्ञानानेंच होतें. **तो दुर्धर देहाभिमान। ज्ञातेपणीं अति दारूण। याचें समूळ निर्दळण। सत्संग जाण स्वयें करी॥** (ना. भा. २८-३८) म्हणून **''सदा संगती सज्जनाची धरावी.''**

★ ★ ★

**बरा निश्चयो शाश्वताचा करावा।**
**म्हणे दास संदेह तो वीसरावा।**
**घडीनें घडी सार्थकाची करावी।**
**सदा संगती सज्जनाची धरावी॥१६७॥**

देहअहंकारामुळें स्त्रीपुत्रादिकांविषयीं होणारा मोह दूर करून विवेकबळानें सज्जनसंगतींत भ्रमनिरास करावा व जन्ममरणापासून मुक्त व्हावें, असें मागील श्लोकांत सांगितलें. सज्जन-संगतींत मुख्यत्वेकरून 'आपण कोण' याबद्दलचा संशय दूर करून घेऊन आपल्या शाश्वत स्वरूपाचा निश्चय करून घ्यावा व नरदेहांचे सार्थक करावें, असें या समारोपाच्या श्लोकांत सांगतात.

अज्ञानानें मी म्हणजे देह अशी दृढ बुद्धि झाली असल्यामुळें मला जन्म आहे, मरण आहे अशा भ्रमांत मनुष्य आपलें जीवन कंठीत असतो. स्वतःचें अमर असें आत्मस्वरूप असतांहि देहाभिमानामुळें तो संशयांत, असमाधानांत वावरतो. देहाला आडवणाऱ्या विषयसुखांत तो रंगून गेला कीं आपण कोण याचें ज्ञान करून घ्यावें असें त्याला वाटतच नाहीं. आत्मज्ञान विरहित संशयी जीवन हें घोर पाप होय, असें ज्ञानोबा म्हणतात. **म्हणऊनि संशयाहूनि थोर। आणिक नाहीं पाप घोर। हा विनाशाची वागुर। प्राणियासी॥** (ज्ञा. ४-२०३) यासाठीं शाश्वताचा म्हणजे आत्मत्वाचा, आत्मत्वाचा म्हणजे

सिद्ध असलेल्या आपल्या आत्मस्वरूपाचा आत्मज्ञानानें निश्चय करून घेऊन निःसंदेह होऊन मानवानें चिरंतन समाधानांत रहावें, असें न झाल्यास तो आत्महत्यारा ठरतो. **ज्ञानेविण प्राणियांसीं । जन्ममृत्यू लक्ष चौऱ्यांसी। तितुक्या आत्महत्या त्यासी। म्हणोन आत्महत्यारा।।** (दा. ८-७-२४) मानवाची सर्व धडपड सदा सुखी असावें यासाठीं आहे. ही त्याची ईच्छा नश्वर विषयोपभोगानें पूर्ण होत नाहीं, पण ती आत्मनिश्चयानें पूर्ण होते. म्हणून शाश्वताचा बरा निश्चय करावा असें सांगतात. **सिध्द असतां आत्मज्ञान। संदेह वाढवी देहाभिमान। याकारणें समाधान। आत्मनिश्चयें राखावें।।** (दा. ५-१०-३६)

जीव हा ब्रह्मच आहे असें ज्ञान एका नरदेहांतच होतें. आणि नरदेह हा वरचेवर प्राप्त होत नाहीं. यासाठीं मानवानें आयुष्याचा प्रत्येक क्षण मोलाचा समजून सार्थकीं लावावा. ज्याच्या करितां जें नियत आहे तें करण्यांत गेलेला काळ सार्थकीं लागला असें समजावें. अनियत कर्मांत गेलेली घडी ही व्यर्थ गेल्यासारखी होय. मानवजन्म हा नराचा नारायण होण्यासाठीं आहे. म्हणून आयुष्य संपण्यापूर्वी आत्महित साधणें हें त्याचें आद्य कर्तव्य होय. हें हित सहज साधता यावें, प्रत्येक घडी सार्थकीं लागावी म्हणून दयाळू संतानीं भक्तिला प्राधान्य दिलें आहे. समर्थ म्हणतात - **हरिभक्तिवीणें जाऊं नेदी क्षण। या नांव लक्षण सार्थकाचें।।** कंजूष मनुष्य आपलें रोजचें कर्म करीतच असतो. परंतु त्याचें सर्व लक्ष असतें तिजोरीतील धनाच्या ठेवीकडे. तद्वत नित्य व्यवहार चालूं असला तरी आपले लक्ष असावें हृदयस्थ आत्मारामाकडे. **चालतां बोलतां धंदा करीतां। खातां जेवितां सुखी होतां। नाना उपभोग भोगितां। नाम विसरूं नये।।** (दा. ४-३-७)

या नामचिंतनानें साधक नवव्या आत्मनिवेदन भक्तीचा अधिकारी होतो. ही शेवटची भक्ति घडल्याशिवाय सुटका नाहीं. **नवमी भक्ति आत्मनिवेदन। न होतां न चुके जन्ममरण। हें वचन सत्य प्रमाण। अन्यथा नव्हे।।** (दा. ४-९-२५) हें आत्मनिवेदन होण्यासाठीं सज्जनसंगतीची आवश्यकता आहे. आत्मस्वरूपाविषयीं शाब्दिक बोध कितीहि झाला तरी निःसंदेह वृत्ति होऊन अनुभवाचें ज्ञान होण्यासाठीं सत्संग हा आवश्यकच आहे. दासबोधाचें निरूपण करूनहि समर्थ म्हणतात, **''निरोपिलें निश्चयाचें लक्षण। परी हें न कळे सत्संगेविण। संतासी गेलीयां शरण। संशये तुटती।।''** (दा. ५-१०-३९)

★ ★ ★



**करी वृत्ति जो संत तो संत जाणा।**
**दुराशागुणें जो नव्हे दैन्यवाणा।**
**उपाधीं देहेंबुद्धितें वाढवीते।**
**परी सज्जना केवि बाधूं शके ते।।१६८।।**

सज्जनसंगतींत आपले संशय दूर करून घेऊन आपल्या आत्मस्वरूपाचा निश्चय करून घ्यावा व मानवी जीवनाचें सार्थक करावें, असें मागील श्लोकांत सांगितलें. पण ज्याची संगत धरावयाची तो सज्जन असतो कसा, हें या श्लोकांत सांगतात.

शाश्वत आणि अशाश्वत अशा वस्तूंचा आपल्या मनाशीं निवाडा करून जो आपली वृत्ति शाश्वत अशा ब्रह्मस्वरूपीं स्थिर करितो तो संत जाणावा. संत या शब्दाचे शांत व परब्रह्म असे दोन अर्थ आहेत. म्हणून जो ब्रह्मनिष्ठ असतो व गोड वाणीनें लोकांचेंही समाधान करितो तो संत होय. **जो जाणेल भगवंत। तया नांव बोलिजे संत। जो शाश्वत आणि आशाश्वत। निवाडा करी।** (दा. ६-१-१६) खरें संतत्व बहिरंगावरून कळण्याजोगें नसल्यामुळें नीट लक्ष ठेवूनच त्याची पारख करावी लागते. जेथें मुख्यत्वेंकरून दोन लक्षणें दिसून येतात तेथें संतत्व आहे असे समजावें.

संत हा जनामध्यें वागतो, वावरतो, पण जनावेगळ्या गोष्टी सांगतो. भक्तिनीति, ज्ञान, धर्म, आचार याविरहित अन्य गोष्टी तो बोलत नाही. जें बोलावयाचें तें आत्महिताचें, नाहीं तर मौन स्वीकारून शांतचित्त असावयाचें, असा त्याचा स्वभाव असतो.

पण मुख्य लक्षण म्हणजे चित्ताच्या समाधानतेमुळें तो निरिच्छ, निःस्पृह असतो. दुराशा म्हणजे दुष्ट आशा, प्रपंचाविषयीं स्वार्थपर आशा. हीच दैन्याला कारण होते. कांहीं अपेक्षेनें हात पुढें झाला कीं दैन्य आलेंच.

पण त्रिभुवनांतहि न मिळणाऱ्या अशा परमानंद सुखांत निमग्नअसलेल्या संतास अपेक्षा कशाची असणार, आणि दैन्य कोठून येणार ? म्हणून निरपेक्षता हे संताचें मुख लक्षण होय. जो प्रत्यक्ष भगवद्रूप होऊन राहिला त्याच्या ठिकाणीं दैन्य कसें उरेल ? श्रीकृष्ण उद्धवाला म्हणतात, **''निरपेक्ष जो माझा भक्त। तो मजसमान समर्थ। हेंही बोलणे आम्हाच येथे। तो मिचि निश्चित चिद्रूपें।।''** (ना. भा. २०-४१५)

कशीहि परिस्थिती आली तरी तो डगमगत नाहीं. कारण त्याची देहबुद्धि समूळ नष्ट झालेली असते. मला म्हणजे देहाला बरे वाटावें म्हणून

मनुष्याचा सर्व खटाटोप चालू असतो. त्यासाठीं अनेक प्रापंचिक वस्तु गोळा करून त्यांचा संग्रह तो करीत असतो. पाहिजे असलेल्या वस्तु मिळत गेल्या कीं देहबुद्धि कमीं न होतां ती वाढतच जाते. थंडीचे फाजील लाड करूं नयेत अशी एक म्हण आहे. ते केल्यास पांघरूणांची वाढ तर होत जातेच, पण शेवटीं कितीहि पांघरूणें घेतलीं तरी थंडी वाजतेच. याप्रमाणें देहबुध्दिमुळें उपाधि वाढते व उपाधींच्या वाढीबरोबर देहबुध्दि वाढत जाते.

ज्यास देह हीच उपाधि वाटते तो संत अन्य उपाधींच्या मागें कशाला लागेल? स्वरूपस्थिति बाणलेल्या सज्जनांच्या ठिकाणी ''मी देह नव्हे'' हा निश्चय बाणलेला असतो. त्यामुळें देहाबद्दल त्याला चिंता नसते. जें व्हावयाचें असेल तें होईल व जें जावयाचें असेल तें जाईल, या विचारानें देह व प्रारब्ध यांची गांठ घालून तो निश्चित असतो. जेथें देहबुध्दीच नाहीं तेथें उपाधींची बाधा काय होणार? **स्वरूपीं लागतां बुध्दि । तुटे अवघी उपाधी । याकारणें निरोपाधी । साधुजन ।।** (दा. ८-९-५०) मागील पांच श्लोकांत **सदा संगती सज्जनाची धरावी** असें जें पालुपद सांगितलें, तो सज्जन असतो. **ऐसें ज्यापाशीं ज्ञान । तोचि जाणावा सज्जन । तयापाशीं समाधान । पुशिलें पाहिजे ।।** (दा. ६-१-२४)

ब्रह्मस्वरूपीं वृत्ति स्थिर झाल्यामुळें देहबुद्धि नष्ट होऊन ज्याच्या अंगीं नि:स्पृहता बाणली आहे तोच संत जाणावा, असें मागील श्लोकांत सांगितलें. असा संत भेटल्यास त्याला काय विचारावें हें सांगून त्याच्याकडून निश्चित झालेल्या निर्गुण आत्मस्वरूपाचें चिंतन करून देह-बुद्धि समूळ नष्ट करावी, असें या श्लोकांत सांगतात.

★ ★ ★

**नसे अंत आनंत संता पुसावा ।**
**अहंकारविस्तार हा नीरसावा ।**
**गुणेंवीण निर्गूण तो आठवावा ।**
**देहेबेध्दिचा आठवो नाठवावा ।।१६९।।**

ब्रह्मनिष्ठ व नि:स्पृह असा सत्पुरुष भाग्यानें भेटल्यास प्रश्नरूपानें त्याच्याकडून ज्याला अंत नाहीं, जें शाश्वत व सदोदित आहे अशा ब्रह्मस्वरूपाचा म्हणजेच आपल्या स्वरूपाचा निश्चय करून घ्यावा. कारण आत्मा हा बह्मच आहे. **अंतचि नाहीं तें अनंत । शाश्वत आणि सदोदित ।।** आपले शाश्वत स्वरूप समजून घेण्यांत चिरंतन सुखाचा लाभ असल्यामुळें



त्याला अन्य प्रापंचिक प्रश्न विचारू नयेत. सत्संग हा प्रपंच थाटून होण्यासाठीं नसून परमार्थाची विस्कटलेली घडी बसवून घेण्यासाठीं आहे हें लक्षांत असावें. समर्थ म्हणतात कीं, सज्जन भेटल्यास त्याला दोनच गोष्टी विचाराव्यात. **दोनी गोष्टी त्या कोण। देव कोण आपण कोण। या गोष्टींचे विवरण । केलेंची करावें ।।** (दा. १२-३-४) या दोनबद्दलच प्रश्न विचारून आपलें समाधान करून घ्यावें. त्यांच्या बोधामुळें देहबुद्धिला अनुसरून असलेला अहंकार हा कसा पसरत जातो, हें कळून येतें. श्लोक १६६ मध्यें याचें विवेचन झालें आहे.

संत हा आपल्या निरूपणानें एकाच गोष्टीचा निश्चय करून देतो. तो असा कीं सर्वत्र व्यापक असें जे निरुपाधिक ब्रह्मचैतन्य तेंच जीवाचें स्वरूप असून जगांत तेंच एक सत्य आहे. त्यावर भासमान होणारे सर्व चराचर हें केवळ कल्पनारूप आहे. **साधु निश्चय करिती येक। आत्मा सर्वत्र व्यापक। येर हे अवघेंचि मायिक। सचराचर।।** (दा. ६-४-१३) स्वप्नावस्थेंत सर्व स्वप्नसृष्टि खरी भासली तरी सत्य भासलें तरी जागृतावस्था आली कीं ती सर्व खोटी ठरते, त्याप्रमाणें अज्ञानावस्थेमध्यें सर्व जग जरी सत्य भासलें तरी ज्ञान प्राप्त झालें कीं तें केवळ कल्पनारूप आहे हे कळून येतें. साधूकडून असें निश्चयात्मक ज्ञान झालें म्हणजे तें दृढ होऊन अनुभवांत उतरण्यासाठीं गुणरहित अशा आत्मस्वरूपाचें चिंतन करावें.

याला निर्गुण ध्यान असें म्हणतात. अज्ञानदशेंत मूर्तिध्यान, ज्याला समर्थ दंडक ध्यान असें म्हणतात, हें आवश्यकच आहे. परंतु सत्पुरुषाकडून खरा देव कोणता हे कळल्यानंतर, निश्चित झाल्यानंतर, अंतरनिष्ठांनीं या आत्मचिंतनांत असावें. संपूर्ण देहास आत्मचैतन्य व्यापून राहिलें असल्यामुळें त्याचें ध्यान सहज आहे, त्यासाठीं एखादी अनात्म वस्तु चित्तांतआणून त्याचें कष्टानें ध्यान धरण्याचें कारण नाहीं. देहरूपी देवळांत देऊळ व्यापून तोच एक आत्माराम आहे, असें सतत अनुसंधान ठेविले म्हणजे झालें. हें सहजध्यान आहे. यामूळें देहबुद्धीचें स्फुरण कमी होत जाऊन जीवात्यमैक्य सहज साधतें. **सहज सांडून सायास। हाचि कोणी एक दोष। आत्मा सांडून अनात्म्यास। ध्यानीं धरिती।।** (दा. १४-८-२५) म्हणून शरीरस्थ आत्मचैतन्याच्या ठिकाणीं चित्त स्थिर करण्याचा अभ्यास करावा. याला ज्ञानोबा सदभ्यास असें म्हणतात. **जें नानागती पावतें। तें चित्त वरील आत्मयातें। मग कवण आठवी देहातें। गेलें कीं आहे।।** (ज्ञा. ८-८३) चित्त हेंच जीवाला नाना प्रकारच्या अवस्था प्राप्त करून देणारें आहे. खळखळणारा

ओढा नदीला मिळून तिच्या ओघाबरोबर समुद्रांत जाऊन पडला कीं तो पूर्व स्थितीला येत नाहीं. त्याप्रमाणें चंचल चित्त हें निरंतर आत्मस्वरूपीं रममाण झालें कीं तें चैतन्यरूप होऊन परमानंद स्वरूपांत मिळून जातें. मग देहबुध्दीचा आठव कसा होणार ? **तेंवि सदभ्यासें निरंतर । चित्तासि परमपुरुषाची मोहर । लावीं मग शरीर । असो अथवा जावो ।।** (ज्ञा. ८-८२)

★ ★ ★

**देहेबुद्धि हे ज्ञान बोधें त्यजावी ।**
**विवेकें तयें वस्तुची भेटि घ्यावी ।**
**तदाकार हे वृत्ति नाहीं स्वभावें ।**
**म्हणोनि सदा तेंचि शोधित जावें ।।१७०।।**

देव कोण व मी कोण या दोन गोष्टींबद्दल संताकडून निश्चय करून घ्यावा व आपण ब्रह्मच आहों असा त्यानीं निश्चय करून दिला म्हणजे देहभाव न आठवितां आत्मभाव स्थिर होत जाईल असा अभ्यास करावा, असें मागील श्लोकांत सांगितले. अशा अभ्यासाची आवश्यकता कां आहे, हें या श्लोकांत सांगितात.

अनेक जन्मांतील संस्कारामुळें मी म्हणजे देह व देहाला आवडणारे शब्दस्पर्शादि पंचविषय हें माझें सुख आहे, असा बुद्धिचा निश्चय झालेला असतो हेंच अज्ञान होय. हें अज्ञान संताकडून मिळालेल्या ज्ञानानेंच दूर होतें. पण संताकडून आत्मज्ञान झालें तरी बुद्धीची देहाकडे व विषयाकडे धावण्याची प्रवृत्ति लगेच बंद होत नाहीं. यासाठीं गुरुपासून श्रवण केलेल्या आत्मज्ञानाचा नीट विचार करून आत्मस्वरूपीं बुद्धि स्थिर करण्याचा अभ्यास करावा लागतो. जसजशी ही स्थिरता वाढत जाते, तसतशी देहबुद्धि कमी होत जाते.

विवेकानें ब्रह्मरूप होण्यासाठीं आपण पंचकोशातीत आहो, असें ज्ञान नित्य जागृत ठेवणें हें महत्त्वाचें आहे. पंचकोशानें आच्छादित झालेला आत्मा स्वत:च्या स्वरूपविस्मरणामुळें संसारात अडकतो. म्हणून या पंचकोशाचें ज्ञान आवश्यक आहे. याचा थोडक्यांत विचार पाहूं.

असंख्य क्लेश देणारे म्हणून यांना कोश असें म्हणतात. हे कोश पांच आहेत. (१) अन्नमय कोश - अन्नामुळें शुक्र व शोणित उत्पन्न होतें. त्यामुळें देहाची उत्पत्ति होते व अन्नावरच देहाची वाढ होते. म्हणून स्थूल देह हा अन्नमय कोश होय. (२) प्राणमय कोश - कर्मेंद्रियांसह जो प्राण तो प्राणमय



कोश. (३) मनोमय कोश - ज्ञानेंद्रियें व मन मिळून होतो तो. (४) विज्ञानमय कोश-ज्ञानेंद्रियें व बुध्दी मिळून होतो तो. प्राणमय, मनोमय व विज्ञानमय या तीन कोशांचा समावेश सूक्ष्म देहांत होतो. (५) आनंदमय कोश - प्रिय, मोद, व प्रमोद या तीन वृत्तींने युक्त जें जें ज्ञान तो आनंदमय कोश होय. प्रिय म्हणजे पाहिजे असलेल्या वस्तूच्या दर्शनानें होणारा संतोष. मोद म्हणजे ती वस्तु प्राप्त झाल्यानें होणारा संतोष व प्रमोद म्हणजे त्या वस्तूच्या उपभोगानें होणारा संतोष. या कोशाचा समावेश कारण देहांत होतो. याप्रमाणें तीन देहांत पांच कोश समाविष्ट होतात.

गुरूकडून या पांच कोशांचें विवरण ऐकून विचार केला असतां स्थूल, सूक्ष्म व कारण या तीन देहांचे आपण द्रष्टे आहों, जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तीन अवस्थांचे आपण साक्षी आहों, व अन्नमय, प्राणमयादि पंचकोशाहून आपण निराळे असून सच्चिदानंद आत्मस्वरूप आहों असें ठरतें. या ज्ञानानें देहबुध्दीचा विसर पाडीत जावें. **देहभान हें ज्ञानशस्त्रें खुडावें ।।** असें पुढें १८८ व्या श्लोकांत म्हटले आहे. आपली वृत्ति स्वभावत: देहाकार आहे, तदाकार म्हणजे आत्माकार नाहीं. म्हणून प्रयत्नांची आवश्यकता आहे. सत्पुरुषांनीं जो साधन मार्ग सांगितला आहे त्या मार्गानें जाऊन परब्रह्माचा शोध घ्यावा व तेथें वृत्ति स्थिर करावी. **बुद्धिनिश्चयें आत्मज्ञान । ब्रह्मरूप भावी आपणा आपण । ब्रह्मनिष्ठा राखे पूर्ण । तत्परायण अहर्निशीं ।।** (ज्ञा. ५-८७)

★ ★ ★

**असे सार साचार तें चोरलेंसे ।**
**इहीं लोचनीं पाहतां दृश्य भासे ।**
**निराकार निर्गूण तें आकळेना ।**
**अहंता गुणें कल्पितांही कळेना ।।१७१।।**

आत्मज्ञानानें देहबुध्दीचा हळूहळू त्याग करीत विवेकानें परब्रह्मस्वरूप अशा आत्मस्वरूपाची भेट घ्यावी. चित्तवृत्ति ही स्वभावत: तदाकार नसल्यामुळें असा प्रयत्न करावा लागतो, असें मागील श्लोकांत सांगितलें. तदाकार वृत्ति न होण्यामध्यें मुख्य अडचण अहंवृत्ति म्हणजे देहअहंता हीच आहे, असें या श्लोकांत सांगतात.

जगांत सत्य अशी जी वस्तु आहे ती गुप्त आहे. चर्मचक्षूनें ती पाहूं गेल्यास बाह्य दृश्य म्हणजे जग तेवढें दिसतें, परंतु खरी वस्तु अनुभवाला येत

नाहीं. जगांत सुद्धां पुष्कळ ठिकाणीं मुख्य ग्राह्य भाग चोरून असल्याचें दिसून येतें. भुसांत धान्य, करवंटीत खोबरें, सोपटांत कणीस, टरफलांत बदाम बी हीं गुप्तपणेंच असतात. नश्वर पदार्थांची जर ही स्थिति तर सुक्ष्म, शाश्वत, सर्वाधार असें परब्रह्म दृष्टिआड दडून राहिल्यास त्यांत नवल तें काय? डोळ्यानें तें पाहूं गेल्यास पिंड व ब्रह्मांड हा बाह्य दृश्य देखावा तेवढा दिसणार.

ज्या पदार्थांच्या ठिकाणीं गुण व आकार असतात ते चर्मचक्षूंना दिसूं शकतात. परंतु परब्रह्म हें निर्गुण निराकार असल्यामुळें डोळ्यांचा विषय होऊं शकत नाहीं. तसेंच गुण व आकार पदार्थ कल्पनेंत येऊं शकतो. पण परब्रह्म हें निर्गुण व निराकार असल्यामुळें त्याची कल्पना करितां येत नाहीं. कल्पना केली कीं माया पुढें उभी राहतें. **देहबुद्धी केली बळकट । आणि ब्रह्म पाहों गेला धीट । तों दृश्यानें रुधिली वाट । परब्रह्माची ॥** (दा. ६-८-४३)

देहबुद्धि म्हणजे अहंता कायम ठेवून त्या ब्रह्माविषयी कितीहि कल्पना करीत राहिलें, कितीहि धडपडलें तरी तें मुळींच कळावयाचें नाहीं - कल्पनातीत वस्तूशीं कल्पनातीत होऊनच तादात्म्य साधावें लागतें. ब्रह्म हीं कांहीं तरी एक अनिर्वाच्य वस्तु आहे, ती जाणणारे आपणहि कोणी तरी एक देहधारी निराळे आहों, अशी भेदकल्पना जवळ बाळगून त्या आत्मस्वरूपाचें आकलन कसें होईल? आत्मकल्याणार्थ योगमार्गाचें अनुष्ठान करणाऱ्या योग्यासहि आपण सामर्थ्यसंपन्न झालो असें थोडेंसे वाटूं लागलें तरी ही अहंता बाधक ठरून देहबुद्धि वाढविते. अशी ही घातक अहंता जवळ ठेवून ब्रह्मस्वरूपाचें आकलन केव्हांहि होणार नाहीं. **म्हणोनि देहबुद्धि हे झडे । तरीच परमार्थ घडे । देहबुध्दीनें विघडे । ऐक्यता ब्रह्माची ॥** (दा. ७-२-३९)

★ ★ ★

**स्फुरे वीषयीं कल्पना ते अविद्या ।**
**स्फुरे ब्रह्म रे जाण माया सुविद्या ।**
**मुळीं कल्पना दोरुपें तेचि जाली ।**
**विवेकें तरी स्वस्वरूपीं मिळाली ॥१७२॥**

सत्य असें जें ब्रह्मतत्त्व तें निराकार निर्गुण व गुप्त असल्यामुळें चर्मचक्षूंना त्याचे खरे स्वरूप कळत नाहीं आणि कितीहि कल्पना केल्या तरी अहंता असेपर्यंत त्याचें आकलन होत नाहीं, असें मागील श्लोकांत सांगितलें.



परंतु विवेकयुक्त ब्रह्मभावनेनें अहंकार दूर करीत गेल्यास स्वस्वरूपसाक्षात्कार होतो, असें या श्लोकांत सांगतात.

अविद्या म्हणजे काय याचें स्पष्टीकरण ''अविद्या गुणें मानवा ऊमजेना'' या १४३ व्या श्लोकांतील चरणांत झालें आहे. म्हणून या श्लोकापुरता तिचा विचार पाहूं. या अविद्येचीं दोन कार्यें आहेत. (१) आवरण - हें स्वस्वरूपावर पांघरूण घालून त्याला झाकून टाकितें. त्यामुळें आपलें स्वरूप काय, आपण कोण, हे कळत नाहीं. हेंच अज्ञान होय (२) विक्षेप - म्हणजे एक असतां भलतें भासवितें त्यामुळें विपरीत ज्ञान होतें. आपण स्वत: सुखस्वरूप अकाम ब्रह्मरूप आहोत याचें विस्मरण होऊन आपण देह आहो, असें समजून मनुष्य विषय सुखाच्या कल्पना करीत राहातो. म्हणून विषयाच्या ठिकाणी स्फुरण पावणारी कल्पना ती अविद्या असें म्हटलें आहे. हाच विकल्प व हीच अशुध्द: कल्पना होय. सारांश, मी म्हणजे देह असें वाटणें हीच अविद्या होय.

जड देहाहून आपण कोणीतरी वेगळे आहों, जागृति, स्वप्न, व सुषुप्ति या तीन अवस्थांचें आपण साक्षी आहों, केवळ एका देहांतच आपलें वास्तव्य नसून सर्व चराचर सृष्टि व्यापून असणारे ब्रह्म आपण आहो, अशा श्रवणमननादिकानें मनाच्या ठिकाणीं दृढ होत जाणाऱ्या कल्पना ही माया सुविद्या होय. या सुविद्येचें दोन प्रकार आहेत. (१) व्यतिरेक बोध :- सर्व जड वस्तूंचा निरास करून आपण स्वत:चें आत्मचैतन्य जाणणें (२) अन्वय: बोध :- जड असें काहीं नसून सर्व कांहीं एक ब्रह्मरूपच आहे. **जडभाग अवघा निरसावा । तेव्हां आत्मा ब्रह्मत्वें समजावा । प्रथम अनुभव हा म्हणावा । व्यतिरेक बोध ॥ या नांवें अन्वय । कीं आपण ब्रह्म चराचरमय । ध्यानें बाणतां हा निश्चय । जड ही ब्रह्म असा बाणें समाधि ॥** ( य. दी. ४-७४६,७४८) व्यतिरेकबोधानें अविद्येचें आवरण नष्ट होतें व अन्वयबोधानें विक्षेप नष्ट होतो. म्हणून हिला सुविद्या, संकल्प, शुध्द कल्पना असें म्हणतात. **कीं अविद्येचीं रूपें दोनी । एक आवरण एक विक्षेप म्हणोनि । आवरण नासे व्यतिरेक विद्येकरूनी । विक्षेप नासे अन्वयें ॥** (य. दी. १३-१०६९)

मूळच्या एकाच कल्पनेची शुध्द व अशुध्द अशीं हीं दोन रूपें आहेत. ती मूळ कल्पना म्हणजे ''हरिसंकल्प'' होय. कल्पना ही वासनारूपानें जन्म घेते. आपण बहू व्हावें, या एकाच अव्यक्त इच्छेंतून प्रकृतिपुरुषात्मक व्दैत व्यक्त झालें. **कल्पना तेचि अष्टधा प्रकृति । अष्टधा तेचि कल्पना मूर्ति ॥** (दा.

११-१-६) म्हणून कल्पनेमुळें पाप, कल्पनेमुळें पुण्य, कल्पनेमुळें बंधन, कल्पनेमुळें समाधान असा हा एकाच मूळ कल्पनेचा दोन रूपांत खेळ चालू आहे. मन हें तिचें क्रिडास्थान आहे. अशुध्द अविद्यारूपानें ती विषयचिंतन करिते तर शुद्ध सुविद्यारूपानें ती ब्रह्मचिंतन करिते. विषयचिंतनाचा मनाला स्वाभाविक छंद असतो व त्यांच्या वासनामुळें सतत जन्ममरण मागें लागतें.

हीं टाळण्यासाठीं विवेकानें मनाला विषयावरून ब्रह्मचिंतनाकडे न्यावें लागतें. विवेक करितां करितां मन आत्मस्वरूपी लीन झालें म्हणजे तें उन्मन होतें. मन हें केवळ कल्पनारूप असून परब्रह्म तर कल्पनातीत आहे. तेव्हां कल्पना समूळ नष्ट झाल्याशिवाय तें स्वरूपाकार कसें व्हावें? **कल्पनारूप मन पाहीं। ब्रह्मी कल्पनाचि नाहीं।** (दा. ७-२-११) कल्पना गेल्या कीं मनाचें मनपण नाहींसे होऊन तें आत्मस्वरूपीं लीन होतें. यासाठीं अशुध्द विषयकल्पना जाण्याकरितां ब्रह्मविद्येच्या शुध्द कल्पना या ब्रह्मस्वरूपाला अनुसरून असल्यामुळें हळूहळू मन तद्रूप होऊं लागतें व त्या शुध्द कल्पनाहि शेवटीं नाहींशा होतात व मन आत्मस्वरूपीं लीन होतें. **जयास व्दैत भासलें। तें मन उन्मन जालें। व्दैताव्दैताचें तुटलें। अनुसंधान।।** (दा. ७-५-१२) अशी केवळ स्वस्वरूपस्थिति राहते.

★ ★ ★

**स्वरूपीं उदेला अहंकारराहो।**
**तेणें सर्व आच्छादिलें व्योम पाहो।**
**दिशा पाहतां तें निशा वाढताहे।**
**विवेकें विचारें विवंचूनि पाहें ।।१७३।।**

एकाच मूळ संकल्पांतून निर्माण होणाऱ्या अविद्या व सुविद्या यांचें लक्षण सांगून शुद्ध कल्पनेनें अशुद्ध कल्पना नाहीशी करावी म्हणजे शुद्ध कल्पनाहि शेवटी ब्रह्मस्वरूपीं लीन होते, असें मागील श्लोकांत सांगितलें. या साधनमार्गांत आड येणार मुख्य पापग्रह म्हणजे राहूरूपी देहअहंकार होय. म्हणून त्याकडे विशेष लक्ष द्यावें, असें या श्लोकांत सांगतात.

आकाशासारख्या व्यापक अशा ब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणीं अहंकाररूपी राहु उदयाला येऊन तो या व्योमाकार स्वरूपालाहि झाकून टाकितो. त्यामुळें दिशा पाहावयास जावें तर सर्व जगांत अज्ञानरूप अंधकार पसरलेला दिसतो. म्हणजे स्वस्वरूपसाक्षात्कार होण्याला अहंकाराचें मोठें विघ्न आड येतें.

एवढासा हा देहअहंकार व्योमाकार परब्रह्माला कसा आच्छादून



टाकितो ? याचें उत्तर असें आहें कीं, दृढ असलेली देहबुद्धि जें जें काही भासतें तेवढेंच सत्य मानितें. दृश्यापलीकडे कांहीं सूक्ष्म श्रेष्ठ, व्यापक अशी वस्तु असेल असा तिचा विश्वासच नसतो, त्यामुळें एक दृश्य सृष्टी किंवा एक देंह एवढेंच सत्य होय, असें तिला वाटतें. आणि दृश्यापलीकडे तिला सर्व अंधार भासतो. **आतां असो हें बोलणें। ब्रह्म न पाविजे मीपणें। देह बुद्धीची लक्षणे। दृश्य भाविती।।** (दा. ६-८-४५) याचा परिणाम असा होतो कीं दिसणारा देह तेवढा मी जीव आहे, मला जन्ममरण आहे, मी कर्मकर्ता असल्यामुळे पापपुण्यादि केलेल्या कर्माचीं फळें मला भोगावीं लागणार म्हणून मला बंधन आहे इत्यादि कल्पना ही देहबुद्धि दृढ धरून असते. देहांत असूनहि देहापासून अलिप्त, अमर, असें आपलें आत्मस्वरूप आहे, हा विचारच तिला सहन होत नाहीं. **मी जीव मज बंधन। मज आहे जन्ममरण। केल्या कर्माचें फळ आपण। भोगीन आतां।।** (दा.८-७-६) एवढ्याशा या कोत्या बुध्दीनें आपल्या व्यापक व शाश्वत स्वरूपाला प्राणी मुकतो व संसृतीच्या फेऱ्यांत अडकून राहतो. **मी जीव ऐसा संकल्प। दृढ धरितां गेले कल्प। तेणें प्राणी जाला अल्प। देहबुध्दीचा।।** (दा. ८-७-५) स्वस्वरूपाच्या आड येणारा, त्याला ग्रासून टाकणारा असा हा अहंकाररूपी राहु आहे म्हणून आत्मसाक्षात्कार होत नाहीं.

यासाठीं विवेकानें म्हणजे आत्मनात्म विवेकानें, विचारानें म्हणजे ब्रह्मांडाचा सारासार विचार करून आणि विवंचूनि म्हणजे साधकबाधक गोष्टींची चिकित्सा करून आत्मसाक्षात्कार करून घ्यावा. विवेकांतील राजमार्ग म्हणजे आपण कोण याचा निश्चय करून घ्यावा. **आपण कोण कोठें कैंचा। ऐसा मार्ग विवेकाचा।।** (दा. ११-८-२४) शितावरून जशी भाताची परीक्षा होते, त्याप्रमाणें स्वत:तील आत्मचैतन्य अनुभवाला आलें म्हणजें ब्रह्मांडांतील अनेक प्राणिमात्रांत तेंच एक शाश्वत स्वरूप असल्याचें कळून येतें. यासाठीं मीच्या शोधांत स्वत:च्या देहांतील सर्व तत्त्वाचा झाडा घेत गेलें म्हणजें मी असा कोणीच नसून पंचकोशातीत एक आत्मचैतन्यच आहे व तेंच आपलें स्वरूप होय, हें कळून येतें व देहबुद्धि नष्ट होते. **तत्त्वें तत्त्व जेव्हां उडे। तेव्हां देहबुद्धि झडे। निर्मळ निश्चळ चहूंकडे। निरंजन।।** (दा. ११-८-२३)

★ ★ ★

**जया चक्षुनें लक्षितां लक्षवेना।**
**भवा भक्षिता रक्षितां रक्षवेना।**
**क्षयातीत तो अक्षयि मोक्ष देतो।**
**दयादक्ष तो साक्षिनें पक्ष घेतो।।१७४।।**

अहंकाररूपी राहू उदयाला येऊन तो आत्मसूर्याला आच्छादून टाकीत असल्यांमुळे आत्मदर्शन होत नाहीं. यासाठीं काळजीपूर्वक तत्वविवंचना करून देहबुद्धि नष्ट करावी व आत्मसाक्षात्कार साधावा, असें मागील श्लोकांत सांगितले. या आत्मदर्शनामुळें साधकाचें कोणते हित साधतें हें या श्लोकांत सांगतात.

हा आत्मदेव निराळेपणानें पाहता येण्याजोगा नाहीं. अहंकाराचें निर्मूलन झाल्यानेंच त्याच्याशीं तादात्म्य होऊन साक्षात्कार होतो. तसेंच चर्मचक्षूना तो दिसत नाहीं व ज्ञानचक्षूहि प्रत्यक्ष अनुभवाच्या वेळीं दिपून जातात. हें पूर्वी १४९ व्या श्लोकांत सांगितलेंच आहे. मग अशा या निराकार, निर्गुण, सूक्ष्म अशा स्वरूपाशीं तादात्म्य साधून किंवा आत्मनिवेदन भक्ति करून (तत्वझाडाकरून) साधकाचें कोणतें हित साधातें? असा स्वभाविकच प्रश्न येतो. याचें उत्तर पुढील तीन चरणांत देतात.

जन्ममरणरूपी भवाचें म्हणजे संसाराचें तो भक्षण करितो. त्यांचें रक्षण करूं म्हटलें तरी तें होत नाही. मला जन्म आहे व मरण आहे असें सत्यत्वानें वाटणें हाच संसार व हीच जीवदशा होय. आत्मारामाची भेट झाली कीं ही जीवदशा नाहींशी होऊन आत्मारामशिवाय मी असा अन्य कोणी उरतच नाहीं, तर जन्म मरण कोणाला? **तत्त्वें साक्षत्वें वोसरतीं। साक्षत्व नुरे आत्मप्रचितीं। आत्मा असे आदिअंतीं। आपण कैंचा ।।** (दा. ४-९-१४) साक्षी राहून आपण देहाचीं तत्त्वें बाजूला केल्यानंतर शेवटीं आपणही आत्मस्वरूपांत नाहींसे होतों व एक आत्माच उरतो. इतर तत्वांप्रमाणें मीपणहि नाहीसें होतें जो आत्मरूप झाला त्याला जन्ममरण कोठचें?

देहाचा अंत होईपर्यंत तो संसारांत वागत असला तरी त्याला अहंकारविरहित देहभान असतें. त्याचा असा दृढ निश्चय असतो कीं, **साधन आलें देहाच्या माथां । आपण देह नव्हे सर्वथा । ऐसा करूनी अकर्ता । सहजचि जाला ।।** (दा. ७-७-६) नाटक कंपनींत नट एकदा सामील झाला म्हणजे जें पडेल तें उच्च नीच सोंग घ्यावे लागतें. पण तें सोंग म्हणजे आपण नव्हे या निश्चयानें तो जसा कंपनींत वावरतो. तसेंच याचें संसारांत वागणें असते. म्हणून एकांतात तो आत्मारामशी तद्रूप होतो व रामभजनांत रंगून लौकिक गलबल्यांतहि भाग घेतो. अशा या थाटांत अनुकूल अथवा प्रतिकूल संसारिक परिस्थिती ही आत्मकृपाच होय अशी त्याची धारणा असते. तुकोबा आपला अनुभव सांगतात. **देहभक्तालागीं करूं नेदी संसार। अंगें वारावार करुनि ठेवी।।**



**भाग्य द्यावें तरी अंगेभरे ताठा । म्हणोनि करंटा करोनि ठेवी ।। स्त्री द्यावी गुणवंती तीपें गुंते आशा । म्हणोनी कर्कशा करुनि ठेवी ।।** (गा. १२७२)

अशा उत्कट वैराग्ययुक्त भजनानंदामुळें स्वतःच्या संसारासह सर्व सृष्टि हें जगन्नाटक होय असें त्याला ज्ञान होते. **सकळ मिथ्या होऊनि जातें। हें रामभजनें कळों येतें । दृश्य ज्ञानियांचेनि मतें। स्वप्न जैसें।।**( द. ६-७-४३) सृष्टिच जेंथें मिथ्या तेथें संसार कोठचा? या भावानें भवा भक्षिता रक्षितां ''रक्षवेना'' असे म्हटलें आहे.

शाश्वत स्वरुपाचा हा आत्मराम आत्मनिवेदनभक्तीमुळें भक्ताला ''आक्षै'' मोक्ष म्हणजे अविनाशी म्हणून निर्भय अशी सायुज्यमुक्ति देतो. सलोकता, समीपता, सरूपता आणि सायुज्यता अशा चत्वार मुक्ति शास्त्रानें सांगितल्या आहेत. परंतु पहिल्या तीन मुक्तींना नाश असून चौथी सायुज्य- मुक्तीच शाश्वत स्वरुपाची आहे. **आवघीया चत्वार मुक्ति । हें वेदशास्त्रें बोलती। तयामधें तीन नासती । चौथी अविनाश।।** (दा. ४-९-२८ )

आत्मदेव हा निराकार, निर्गुण, अज, अक्रिय असा जरी असला तरी सृष्टिकार्यांत मायेचा आश्रय करून तो ईश्वर बनतो व साक्षीरूपानें सर्व जग जाणतो. सर्वज्ञतेमुळें सज्जन कोण व दुर्जन कोण हें त्याला कळतें. म्हणून भक्तकैवारी होऊन दुर्जनांपासून तो त्याचें रक्षण करितो. यासाठीं निरनिराळे अवतार धारण करूनही भक्तावर दया करण्यास तो तत्पर असतो.

आत्मनिवेदनभक्तीमुळें संसारविरक्ति, सायुज्यमुक्ति व पाठीशी भगवत्शक्ति असा तिहेरी लाभ साधकाच्या पदरीं पडतो. म्हणून समर्थ म्हणतात- **''आत्मा निर्गुण निरंजन । तयासी असावें अनन्य। म्हणिजे नाहीं अन्य। आपण कैंचा तेथें ।।''** (दा. ४-९-१७)

★ ★ ★

**विधी निर्मिता लीहितो सर्व भाळीं।**
**परी लिहितो कोण त्याचे कपाळीं।**
**हरू जाळितो लोक संहार काळीं ।**
**परी सेवटीं शंकरा कोण जाळीं ।।१७५।।**

डोळ्यानें न दिसणारा पण शाश्वत स्वरुपाचा आत्मदेव भक्तांचे संसारमूळ नाहींसे करितो, सायुज्यमुक्ति देतो आणि भक्त कैवारी असतो, असें मागील श्लोकांत सांगितलें. असा हा सर्व देवांचाहि मुख्य देव असून त्यांचें

स्वरूप काय, लोक देव कोणाला समजतात, खरा देव गुरूशिवाय कसा कळत नाहीं इत्यादि शाश्वत देवासंबंधींचें विचार या श्लोकापासून १७९ श्लोकापर्यंत सांगतात. ब्रह्मा, विष्णु व महेश या लोकपरीचित असलेल्या तीन देवांच्या पूर्वीचा हा आदिदेव आहे, असें या श्लोकांत सांगतात.

या श्लोकांत विचारलेले प्रश्नच अगदी सोप्या व स्पष्ट भाषेंत दासबोधांत वर्णन केले आहेत. त्या ओव्या पाहिल्या म्हणजे सहजच श्लोकाचा भावार्थ समजेल. **ब्रह्मयानें सकळ निर्मिले। ब्रह्मयास कोणे निर्माण केलें। विष्णूने विश्व पाळिलें। विष्णूस पाळिता कवणु॥ रुद्र विश्वसंहारकर्ता। परी कोण रुद्रास संव्हारिता। कोण काळाचा नियंता। कळला पाहिजे॥** (दा. ९-५-२४, २५ )

कपोळ म्हणजे कपाळ. त्रिगुणात्मक माया उत्पन्न झाली कीं सृष्टिकार्यांत तिच्या तीन गुणांचे द्योतक असे तीन देव निर्माण होतात. रजोगुणी ब्रह्मदेव सृष्टींतील असंख्य जीवांचें प्रारब्ध लक्षांत घेऊन त्यांना निरनिराळ्या योनीमध्यें जन्मास घालतो. पण त्याचें सृष्टिकार्यहि शाश्वत स्वरूपाचें नसतें. कारण त्यानें उत्पन्न केलेल्या जीवाचां तमोगुणीं शंकर संहार करीत असतो. महाकल्पाच्या अंती सृष्टिकर्ता ब्रह्मदेव व सृष्टिसंहारक शंकर हे दोघेहि नाहीसे होतात. परंतु ब्रह्मदेव आणि शंकरासह सृष्टि पुन्हा निर्माण होतेच.

या श्लोकांत सृष्टिकर्ता ब्रह्मा व सृष्टिसंहारक शंकर या दोन देवांचाच उल्लेख असून सत्त्वगुणी विष्णूचा उल्लेख नाहीं. धर्मग्लानीमुळें सृष्टींची बिघडलेली घडी नीट बसवून अवतार संपवून विश्रांतीस जाणें एवढेंच तात्पुरते सृष्टिकार्य असल्यामुळें त्याचा उल्लेख न करितां सतत कार्यरत असलेल्या दोन देवांचाच उल्लेख समर्थांनी केला असावा. ते म्हणतात. ''**नाना अवतार धरणें। दुष्टांचा संव्हार करणें । धर्म स्थापायाकारणें । विष्णूस जन्म ॥**'' (दा. १०-४-४१)

तात्पुरतें असो किंवा सततचे असोत कोणताही सृष्टिकार्य करणारा देव कल्पांतीं जर नाहींसा होतो व सृष्टिचें रहाटगाडगें जर चालूच राहतें तर या तीनहि देवांचा उत्पत्ति, स्थिति व लय करणारा काळाचा नियंता या तीन देवांहून वेगळा असा कोणी तरी मुख्य देव असलाच पाहिजे. **ब्रह्मा विष्णु आणि हर। त्यांसी निर्मिता तोचि थोर। तो वोळखावा परमेश्वर। नाना यत्नें ॥** (दा. ६-१-१२) जो सर्व निर्माण करितो, परंतु ज्याला निर्माण करणारा कोणीच असत नाहीं; जो सर्वां वडील असून शाश्वत आहे तोच सर्वाचा मूळ वेदप्रतिपाद्य आद्य देव होय. **सकळांसी निर्मिता देव। देवासी निर्मिता नसे।**



**सर्वांसी मूळ तो देवो । देवासी मूळ नाडळें॥**

★ ★ ★

**जगीं द्वादशादित्य हे रुद्र अक्रा ।**
**असंख्यात संख्या करी कोण शक्रां ।**
**जगीं देव धुंडाळितां आढळेना ।**
**जनीं मुख्य तो कोण कैसा कळेना ॥१७६॥**

सृष्टिउत्पत्तिकर्ता ब्रह्मदेव व संहारक शंकर या दोन बड्या देवांचीहि कालमर्यादा ठरविणारा कोणी तरी अन्य मुख्य शाश्वत देव आहे, असें मागील श्लोकांत सांगितले. सृष्टिकार्यात असलेल्या इतर खालच्या देवताहि कालाच्या ओघांत नाहींशा होणाऱ्या असल्यामुळें त्यांच्यांत शाश्वत देवाचा शोध घेतला तरी त्याचा थांग पत्ता लागणार नाहीं असें या श्लोकांत सांगतात.

जगांत आदित्य बारा आहेत व रुद्र अकरा आहेत. सहस्त्र युगापर्यंत असणाऱ्या ब्रह्मदेवाच्या एका दिवसांत देवाधिदेव इंद्र जर चौदा होऊन जातात तर त्यापुढें इतर देवतांचें आयुष्य तें किती ? सारांश, सर्व देवांना जर पुनरावृत्ति दिसते, तर ती घडविणारा सर्व देवांच्या पलिकडे शाश्वत देव कोणी तरी असला पाहिजें. **बारा आदित्य अक्रा रुद्र । नव नाग सप्त ऋषेश्वर । नाना देवतांचे अवतार । ऐलीकडे॥** (दा. ८-४-५२ ) पुनरावृत्ति होणारे सर्व देव मायिक असल्यामुळें शाश्वत होत. त्या देवांच्या नामरुपांत कितीहि धुंडाळलें तरी मायेपलीकडील अशाश्वत देव सापडणार कसा ? नामरुपात्मक उपाधि दूर केल्याशिवाय म्हणजे माया ओलांडल्याशिवाय मुख्य देव कळणार नाही. **महाद्वार ओलांडावे । मग देवदर्शन घ्यावें। तैसें दृश्य तें सांडावें । जाणोनियां ॥** (दा. ८-४-५८) म्हणून उत्तरार्धांत म्हणतात कीं दृश्य जगाकडे पाहांवें तर देव कोठें आढळत नाही आणि देहधारी जनाकडे पाहावें तर ब्रह्मनिष्ठ कोण तेंहि कळत नाहीं.

★ ★ ★

**तुटेना फुटेना कदा देवराणा।**
**चळेना ढळेना कदा दैन्यवाणा ।**
**कळेना कळेना कदा लोचनासी ।**
**वसेना दिसेना जनीं मीपणासी ॥१७७॥**

आदित्य, रुद्र, इन्द्रादि नश्वर देवांतहि मुख्य देवाचा शोध लागत नाहीं, असें मागील श्लोकांत सांगितले. त्या शाश्वत देवांचे स्वरुप सांगून अहंता असेपर्यंत तो अनुभवाला येत नाहीं, असें या श्लोकांत सांगतात.

हा देवांतील धुरंधर देव कधी तुटत नाही, फुटत नाही, चालत नाही व हालत नाही. असें विवेचन श्लोक १४७ मध्यें झालें आहे. तो सच्चिदानंदस्वरुप, सर्वसमर्थ असा देव असल्यामुळें कदा दैन्यवाणा नाहीं म्हणजे त्याच्या ठिकाणीं पूर्णत्वामुळें दैन्य हा शब्दच उत्पन्न होत नाहीं.

त्याचें स्वरुप दृष्टिआड चोरुन आहे. ''अहंतागुणें कल्पितांही कळेना'' असें त्याचें वर्णन श्लोक १७१ मध्यें झालें आहे.

येथे इतकेंच सांगितले म्हणजे पुरे कीं नसलेलें मीपणाचें म्हणजे देहबुध्दीचें पांघरूण केवळ कल्पनेनं धारण करून जोपर्यंत आपण अज्ञान अंधकारांत वावरत आहों तोपर्यंत त्या मुख्य देवाचें आकलन होणार नाहीं. विवेकानें हे पांघरूण दूर झालें कीं देवाची ओळख पटून तो व आपण एक आहोत हें समजून येतें. **आपण कल्पिलें मीपण। मीपण शोधितां नुरे जाण। मीपण गेलियां निर्गुण। आत्मा स्वयें।।** (दा. ६-३-२९) समर्थ म्हणतात कीं कोणींहि कधीहि या देवाधिदेवांचे उच्छादन करूं शकत नसल्यामुळें व तेंच आपले स्वत:चें स्वरुप असल्यामुळें रामदास हा या शाश्वत देवाचा निश्चय करून त्याचीच उपासना करितो. **निरंजना देवा कोणी उच्छेदीना। फुटेना तुटेना कदा काळी। कदाकांळीं देव पडेना झडेना। दृढ उपासना रामदासी।।** (स्फू. श्लो.)

★ ★ ★

**जया मानला देव तो पूजिताहे ।**
**परी देव शोधून कोणी न पाहे ।**
**जगीं पाहतां देव कोट्यानकोटी ।**
**जयामानली भक्ति जे तेचि मोठी ।।१७८।।**

शाश्वत देव हा न तुटणारा, न फुटणारा, सर्व समर्थ असा असून मीपण दूर झाल्याशिवाय तो कळणार नाहीं, असें मागील श्लोकांत सांगितलें. पण देवाचें खरें स्वरूप न जाणतां मन मानेल तो देव समजून बहुजन देवपूजन किंवा भक्ति कशी करितात, हें या श्लोकांत सांगतात.

आस्तिक मनुष्य हा त्याच्या ठिकाणीं असलेल्या स्वाभाविक श्रध्देला अनुसरून त्याला आवडणाऱ्या देवांचें भजन - पूजन करीत असतो.



मनुष्यस्वभावाचें जसे अनेक विचित्र प्रकार आहेत. तसेच देवहि अनेक विचित्र प्रकारचे आहेत. चोराचा देव म्हसोबा, तर सावाचा विष्णु, गोंधळ्याची देवी तर वाघ्याचा खंडोबा, कोणाला शंकर आवडतो तर कोणाला विठ्ठल, कोणाला मारुति तर कोणाला गणपति, कोणी प्रत्यक्ष असलेले अग्नि, सूर्य चंद्रादि देव मानतात तर कोणी होऊन गेलेल्या अवतारांचे पूजन करितात. जसे देव अनेक तशीं त्यांचीं प्रतीकेंहि अनेक. मातीचे देव, पाषाणांचे देव, धातूंचे देव, काष्ठांचे देव, चित्रलेप, टाक, नाणीं अशीं पूजेचीं अनेक प्रतीकें आहेत. **उदंड उपासनेचे भेद। किती करावे विशद। आपलालेआवडीचा वेध। लागला जनीं।।** (दा. १९-५-४)

सामान्यत: नामरूपधारी मनुष्याला प्रथमत: निराकार निर्गुण देवाची कल्पना झेपत नाही. त्याला नामरूपधारी देवच आवडतो. व्यावहारिक सत्तेंत असलेल्या भक्ताला व्यावहारिक सत्तेंतील देवच मानवतो. प्रतीक नसेल तर त्यानें देवपूजन कसें करावें ? गंध कोणाला लावावें ? फुलें कोठें वाहावीत ? नैवेद्य कोणाला समर्पण करावा ? म्हणून भिन्नरूचिप्रमाणे व अधिकारानुसार अनेक देवांचे अनेक प्रतीकांच्या द्वारा पूजन झालें म्हणून कांही बिघडत नाहीं. इतकेच नव्हे तर हें गौण पूजन निष्कामपणें व खऱ्या देवाचें ज्ञान होऊन झाल्यास श्रेष्ठ प्रतींचे ठरतें. अधिकारानुसार सर्वांना भक्ति करितां यावी म्हणून गीतेंत म्हटले आहे कीं **यो यो यां यां तनुं भक्त: श्रद्धयार्चितुमिच्छति। तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम्।।** (भ. गी. ७-२१) जो ज्या देवतेचें पूजन श्रद्धेनें करितो त्याची त्या देवावरील श्रद्धा मी स्थिर करितो, असें भगवान म्हणतात. निरनिराळ्या देवतांच्या रूपानें झालेलें हें पूजन शेवटीं मुख्य देवासच पोहोचत असल्यामुळें या सर्व देवांना मानलें पाहिजे असें समर्थहि म्हणतात. **नाना देवीं भजन केलें। तें मूळ पुरूषासी पावलें। याकारणें सन्मानिले। पाहिजे सकळ कांहीं।।** (दा. १९-५-१४) परंतु या निरनिराळ्या देवांच्या रूपानें पूजा घेणारा देव एकच असल्यामुळें त्यांची ओळख जोपर्यंत होत नाहीं तोपर्यंत हें पूजन गौण आहे, अज्ञानद्योतक आहे, अविधिपूर्वक झालेलें पूजन आहे. म्हणून दुसऱ्या चरणांत ''परी देव शोधूनि कोणी न पाहे'' असें म्हणतात. राजा कोण हें माहित नसतांना पुढें दिसणाऱ्या मोटारच्या तांबड्या पाटीस केलेला नमस्कार हा अप्रत्यक्षपणें राजाला असला तरी प्रत्यक्षपणें तांबड्या पाटीला होतो. म्हणून देव ओळखून नमस्कार केला पाहिजे व त्याचें भजन केलें पाहिजे. भगवान् म्हणतात कीं अन्य देवतांचे पूजन करणारे सुद्धा अज्ञानपूर्वक

माझेंच पूजन करितात. **येऽप्यन्य देवता भक्ता यजंते श्रद्धयान्विता:। तेऽपि मामेव कौंतेय यजंत्यविधिपूर्वकम्॥** (भ. गी. ९-२३) शरीरांतील दशेंद्रियांनी सेवन केलेले विषय शेवटीं एके ठिकाणी म्हणजे भोक्त्यालाच पोहोचतात. हें खरें असले तरी अन्न खायचें तें मुखानेंच खाल्ले पाहिजे, वास हा नाकानेंच घेतला पाहिजे, त्याप्रमाणें माझें पूजन आत्मत्वेंकरून म्हणजे माझ्याच भावनेनें जाणूनच केलें पाहिजे, असें भगवान म्हणतात. **तेथ रसु तो मुखेंचि सेवावा। परिमळू तो घ्राणेंचि घ्यावा। तैसा मी तो यजावा। मीचि म्हणोनी ॥** (ज्ञा. ९-३४९)

परमात्मभाव न जाणतां अज्ञानानें होणाऱ्या या अनेक देवांच्या भक्तीमुळें कांहीं पुण्य संचय होईल, तात्पुरतें भजनसुख वाटेल, कांही कामनाहि सिद्धीला जातील. परंतु **उपासनेचे शेवटीं। देवां भक्तां अखंड भेटी॥** (दा. १८-२-३०) हें जें उपासनेचें वर्म तें कळणार नाही व मुक्तस्थिति प्राप्त होणार नाहीं. भाताची कांजी पिऊन अमृतकळा कशी येणार ? **तैसें स्थूलाकारीं नाशिवंते। भरंवसा बांधोनि चित्तें। पाहती मज अविनाशातें। तरी कैंचा दिसें ? ॥** (ज्ञा. ९-१५२) असें भगवान म्हणतात.

आत्म्याचें व्यापकत्व न कळल्यामुळें अज्ञान भक्तींत आणखीहि एक दोष उत्पन्न होण्याजोगा असतो. तो हा कीं भक्ताला जड प्रतीकांत जेवढें महत्व व प्रेम वाटते तेवढें चैतन्ययुक्त प्राणिमात्राच्या ठिकाणीं वाटत नाहीं। उदाहरणार्थ - तो देव्हाऱ्यांतील देवासाठीं पक्वान्नाचा नैवेद्य दाखवील. परंतु दारीं आलेल्या दरिद्रीनारायणाच्या पदरांत एखादा घास टाकीलच असें नाही. त्यामुळें ही संकोचित भक्ति होते, परंतु व्यापक उपासना होत नाहीं. या भावार्थानें भक्ति चालू आहे. **परी देव शोधूनि कोणी न पाहे** असें म्हटलें आहे. सारांश, प्रतीक पूजन. पण त्या द्वारा आपला हृदयस्थ आत्मा जागृत होऊन त्याचें आपल्या ठिकाणीं व सर्वत्र दर्शन घडलें पाहिजे. म्हणून आत्म्याचें व्यापकत्व जाणून भक्ति व्हावी.

★ ★ ★

**तिन्ही लोक जेथूनि निर्माण जाले।**
**तया देवरायासि कोणी न बोले।**
**जगीं थोरला देव तो चोरलासे।**
**गुरूवीण तो सर्वथाही न दीसे॥१७९॥**

खऱ्या देवाचा निश्चय न करितां अज्ञानी जन सर्व देवांत एकच



मुख्य देव व्यापून आहे हें न जाणून मन मानेल त्या देवांची ते सर्व निराळें असे समजून, भक्ति करीत असतात, असें मागील श्लोकांत सांगितलें, थोरला म्हणजे खरा देव सृष्टिवेगळा व झाकलेला असल्यामुळें गुरूकृपेशिवाय कळण्याजोगा नाही, असें या श्लोकांत सांगतात.

ज्याच्या सत्तेमुळें स्वर्ग, मृत्यु व पाताळ हे तीन लोक निर्माण होतात त्या श्रेष्ठ देवास कोणी ओळखीत नसल्यामुळे त्यांच्या संबंधी कोणी शब्दही काढीत नाही.

थोरला देव म्हणजे केवल ब्रह्म होय. तोच निरूपाधिक आत्मा. त्यालाच परमेश्वर म्हणतात. मायेची उपाधि स्वीकारली की शुद्ध ब्रह्म शबल होते व त्याला ईश्वर हें नांव प्राप्त होतें. मायावी ईश्वर, सृष्टींतील ब्रह्मा, विष्णु व महेश हे तीन देव व त्या खालच्या अनेक देवता, या शाश्वत स्वरूपाच्या नाहीत. **अवघी सृष्टी जो कर्ता। तो ते सृष्टींहूनि पर्ता। तेथें संशयाची वार्ता। काढूंचि नये॥** (दा. ८-१-३४) ब्रह्म या शब्दाचा अर्थ व्यापक असा आहे. हें शुद्ध शाश्वत, व्यापक चैतन्यच सर्व प्रपंचाचें आणि त्याला कारण असणाऱ्या मायेचें अधिष्ठान आहे म्हणून त्याला थोरला देव असें म्हटले आहे. हाच व्यापक निरूपाधिक आत्मा जीवाचें स्वरूप आहे. मायिक सर्व देव नश्वर असल्यामुळें समर्थ म्हणतात, **''म्हणोनि जग मिथ्या साच आत्मा। सर्वांपर जो परमात्मा। अंतर्बाह्य अंतरात्मा। व्यापूनि असे॥ तयास म्हणावें देव। येर हें अवघेंचि वाव॥ ऐसा आहे अंतर्भाव। वेदांतीचा॥''** (दा. ८-१-४४,४५)

मनुष्याला डोळ्याने दिसणारा मायेचा दृश्य पसारा तेवढा सत्य भासतो. तिनें आपल्या आवरण व विक्षेप शक्तीच्या पांघरूणाखाली चोरून झाकून ठेवलेला थोरला देव लोकांना दिसत नाहीं त्यामुळे असंख्य मायिक देवांच्या मागे लोक लागतात. परंतु या झाकलेल्या थोरल्या देवाकडे कोणाचेंच लक्ष जात नाहीं व त्याची विचारपूसही कोणी करीत नाही. मायेची आवरण व विक्षेप हीं दोन पांघरूणे एक वेदशास्त्रसंपन्न ब्रह्मनिष्ठ सद्गुरूच दूर करू शकतो. दिव्यानें जसा दुसरा दिवा लागतो, त्याप्रमाणें सद्गुरू बोधानें शिष्यबुद्धि प्रज्वलित झाली म्हणजे या मुख्य देवाचें आकलन होतें, अन्यथा नाही. मीपण म्हणजे देहबुद्धि ही जर नष्ट व्हावयास पाहिजे असेल, मायेच्या पडद्याआड लपलेल्या थोरल्या शाश्वत देवास जर जाणावयाचें असेल, आणि त्या देवाचें रूप तेंच आपले स्वरूप होय, हें जर अनुभवावयाचें असेल तर हें सर्व एका सद्गुरूकृपेनें साधतें. **मी पाहातां आडळेना। निर्गुण ब्रह्म तें चळेना।**

**आपण तेंचि परी कळेना। सद्गुरुवीण॥** (दा. ६-३-२५)

★ ★ ★

**गुरु पाहतां पाहतां लक्ष कोटी।**
**बहूसाल मंत्रावळी शक्ति मोठी।**
**मनीं कामना चेटकें धातमाता।**
**जनीं व्यर्थ रे तो नव्हे मुक्तिदाता॥१८०॥**

सर्व मायिक प्रपंचाचें अधिष्ठान जें शुध्द ब्रह्म यालाच थोरला देव म्हणतात व तो गुप्त असल्यामुळें गुरुशिवाय त्याचें ज्ञान होत नाही, असें मागील श्लोकांत सांगितलें. गुरु हा शब्द व्यापक अर्थानें वापरला जात असल्यामुळें मोक्षदात्या गुरुचीं लक्षणें कोणतीं हें या श्लोकापासून १८४ श्लोकापर्यंत चार श्लोकांत सांगतात.

ज्ञान देणारा तो गुरु असें म्हटलें जातें. सृष्टींत ज्ञान अनेक प्रकारचें असल्यामुळें तें देणारे गुरुहि अनेक आहेत. माता-पिता, विद्यादाता, पोटभरू, कला शिकविणारा मंत्र-यंत्र-तंत्र सांगणारा व ब्रह्मज्ञान बोलणारा या सर्वांना जरी गुरु म्हटलें तरी मोक्षदाता गुरु या सर्वांहून वेगळाच असतो. त्याला सद्गुरु म्हणतात, **''असो ऐसे उदंड गुरू। नाना मतांचा विचारू। परी जो मोक्षदाता सद्गुरु। तो वेगळाची असे॥''** (दा. ५-२-७२) परंतु आपणास सद्गुरु म्हणवून घेणारे लोकहि अनेक असल्यामुळें त्यांच्या मधून मोक्षदाता सद्गुरु निवडतां यावा म्हणून हीं लक्षणें सांगितलीं आहेत.

मोक्षासंबंधीं समर्थांनीं दासबोधांत दोन महत्त्वाचें सिध्दान्त सांगितले आहेत. ते असे कीं, ज्ञानावांचून मोक्ष नाहीं आणि सद्गुरुवाचून ज्ञान नाहीं. मोक्ष म्हणजे जन्ममरणांतून सुटका. **असो जयासि मोक्ष व्हावा। तेणें सद्गुरु करावा। सद्गुरुविण मोक्ष पावावा। हें कल्पांती न घडे॥** (दा. ५-१-४४) येथें सद्गुरु भेटावा असा शब्द नसून सद्गुरु ''करावा'' असा शब्द आहे हें लक्षांत यावें. हा शब्दहि योग्यच आहे; कारण तीव्र मुमुक्षूला सद्गुरुची उत्कट जरूरी वाटते. **पुण्यमार्ग पोटीं धरी। सत्संगाची वांछा करी। विरक्त जाला संसारीं। या नांव मुमुक्ष॥** (दा. ५-८-२४) अशा वेळीं निरनिराळें चमत्कार ऐकून किंवा पाहून, आतुर होऊन तो कोणीतरी भोंदू गुरुच्या नादीं लागून फसण्याचा संभव असतो. अशी फसवणूक न व्हावी, आपली बुध्दि वापरून अत्यंत जागरूकतेनें अनेक गुरूंतून योग्य तो मोक्षदाता सद्गुरु मुमुक्षूनें शोधून घ्यावा यासाठीं हे चार महत्त्वाचें श्लोक आहेत.



मंत्रशक्तीनें अचाट कार्य करून दाखविणारे गुरु अनेक आहेत. मनांत द्रव्य अथवा स्त्रीकामना धरून जादूटोणा, जारणमारण, भानामती इत्यादि विद्यांमध्ये प्रवीण असे पुष्कळ लोक आहेत. वासनेमुळें भीड बाळगून शिष्याच्या तंत्राने चालणारें गुरुहि पुष्कळ आहेत. धात म्हणजे गीत प्रबंध आणि मात म्हणजे ग्रंथ पाठांतर किंवा मुखानें गोष्टी सांगणे. आशाळपणें ईश्वरभजन गाणारे किंवा संतांचा उपदेश गोष्टीरूपानें सांगणारे असेहि अनेक लोक आहेत. हे सर्व गुरु म्हणवून घेणारे असले तरी व्यर्थ होत; कारण यांच्यामध्ये कोणीहि मोक्षदाता गुरु नसतो. **जे करामती दाखविती। ते हि गुरु म्हणिजेती। परंतु सद्गुरु नव्हेती। मोक्षदाते॥** (दा. ५-२-१)

★ ★ ★

**नव्हे चेटकू चाळकू द्रव्यभोंदू।**
**नव्हें निंदकू मत्सरू भक्तिमंदू।**
**नव्हे उन्मतू वेसनी संगबाधू।**
**जनीं ज्ञानिया तोचि साधू अगाधू॥१८१॥**

नाना करामती करून आपणास गुरु म्हणवून घेणारे किंवा गुरु म्हटले जाणारे लक्षावधि लोक असले तरी ते मोक्षदाते गुरु नव्हेत, असें मागील श्लोकांत सांगितलें. सद्गुरुच्या ठिकाणीं कोणताहि अवगुण नसतो व तो ब्रह्मज्ञानी, सद्गुणी साधू असतो, असें या श्लोकांत सांगतात.

सद्गुरुपदास योग्य असा सतूपुरूष अंगारे-धुपारे उधळून चेटकें किंवा करणी करण्याच्या भानगडींत पडत नाहीं. चाळकू म्हणजे चाळविणारा किंवा फसविणारा. तो निरनिराळ्या थापा मारून कोणाला झुलवीत नाहीं. साधूचें सोंग दाखवून तो कोणाकडून पैसे उकळीत नाहीं. तो कोणाचीं निंदा करीत नाहीं किंवा कोणाचा मत्सर करीत नाहीं. तो भक्तिहीन असत नाहीं. परमेश्वरावर त्याचें नितांत प्रेम असतें. तो उन्मत्त नसतो. प्राणिमात्राच्या ठिकाणीं भगवद्भाव असल्यामुळें तो सदासर्वदा नम्र असतो. त्याला कोणतेंहि व्यसन नसतें. त्याला स्वस्वरूपाचें ज्ञान असल्यामुळें तो अंतर्बाह्य निर्मळ झालेला असतो. त्यामुळें त्याची संगत कोणासहि बाधक किंवा हानिकारक होत नाहीं. **स्वरूपीं न साहे मळ। म्हणून साधु तो निर्मळ। साधु स्वरूपचि केवळ। म्हणोनियां॥** (दा. ८-९-५३) असा प्रत्ययज्ञानी तोच साधु. तो सहजासहजीं ओळखण्याजोगा नसतो.

★ ★ ★

**नव्हे वाउगी चाहुटी काम पोटीं।**
**क्रियेंवीण वाचाळता तेचि मोठी।**
**मुखें बोलिल्यासारिखें चालताहे।**
**मना सद्गुरु तोचि शोधून पाहे।।१८२।।**

सद्गुरुपदास पात्र अशा साधूच्या ठिकाणीं कोणताहि दुर्गुण नसतो व तो आत्मज्ञानी असतो, असें मागील श्लोकांत सांगितले. त्याचीं आणखी काहीं लक्षणें सांगून अशाच सद्गुरुचा शोध घ्यावा, असें मनाला या श्लोकांत सांगतात.

तो वाह्यात किंवा फटकळ व्यर्थ बडबड करीत नाहीं. जें बोलावयास पाहिजे तेवढेंच नेमकें बोलतो. कारण वासनाक्षय झाल्याशिवाय मोक्ष नाहीं, याची त्याला जाणीव असते. स्वत: काहीच साधनमार्ग न करतां, असें करावें, तसें करावें, असें वायफळ बडबडणारेच पुष्कळ लोक असतात. म्हणून उत्तरार्धांत मनाला सावध करण्यासाठीं सांगतात कीं, हे मना, जो तोंडाने बोलतो तसा वागतो त्याचाच उपदेश लोकांच्या मनावर ठसतो. म्हणून तशाच सद्गुरुचा शोध घे. **बोलण्यासारिखें चालणें। स्वयें करून बोलणें। तयाचीं वचने प्रमाणें। मानिती जनीं।।** (दा. १२-१०-३९)

हा मनाला दिलेला इशारा नेहमीं लक्षांत ठेविला पाहिजे. याचें कारण असें कीं निरनिराळ्या करामतींना किंवा चमत्कारांना पाहून मनुष्य जसा भाळतो, तसा मिठ्ठास बोलण्यालाहि भाळतो. चमत्कार व गोड तत्वज्ञानाची भाषा या दोन गोष्टी परमार्थप्रेमी मनुष्याला नेहमीं मोहांत गुंतवितात व फसवितात. म्हणून ज्या मनुष्याच्या ठिकाणीं या दोन गोष्टी दिसतील तेथें तो निरिच्छ, वैराग्यसंपन्न आहे कीं नाहीं व त्याचें स्वत:चें वर्तन कसें आहे हें पाहूनच पुढचें पाऊल टाकिलें पाहिजे. **अद्वैतनिरूपणें अगाध वक्ता। परी विषयीं लोलंगता। ऐसिया गुरूचेनि सार्थकता। होणार नाहीं।।** (दा. ५-२-३१) म्हणून चकार घालून मनाला - 'मना सद्गुरू तोचि शोधूनि पाहे' असें सांगतात.

★ ★ ★

**जनीं भक्त ज्ञानी विवेकी विरागी।**
**कृपाळू मनस्वी क्षमावंत योगी।**
**प्रभु दक्ष व्युत्पन्न चातुर्य जाणे।**
**तयाचेन योगे समाधान बाणे।।१८३।।**



सद्गुरु नसतो कसा, हें मागील श्लोकांत निषेध लक्षणांनी सांगितले. तो असतो कसा हें स्पष्ट शब्दांत या श्लोकांत सांगतात.

तो भगवंताचा प्रेमळ भक्त असतो तसाच आत्मज्ञानी असतो. आत्मज्ञान झालें तरी सगुणभक्तीचा तंतू तो तोडीत नाहीं. तो आत्मविवेकी व विरक्त असतो. वैराग्य विवेकयुक्त असल्यामुळें तें कधींहि न ढळणारें, उत्कट असतें. दुसऱ्याला सुखी पाहण्यांतच त्याला सुख होत असल्यामुळें तो स्वभावत:च दयाळू व कृपाळू असतो. **तुका म्हणे सुख पराविया सुखें। अमृत हे मुखें स्रवतसे।।** सद्गुरुच्या ठिकाणीं अनेक विद्या असतात, परंतु त्याच्या ठिकाणीं असलेल्या या कृपाळूपणामुळें लोककल्याण साधत असल्यामुळें समर्थ या गुणाला फार महत्त्व देतात. **नाना सद्विद्येचे गुण। याहीवरी कृपाळूपण। हें सद्गुरुचें लक्षण। जाणिजे श्रोतीं।।** (दा. ५-२-७३) तो उदार मनाचा व मन स्वाधीन ठेवणारा असतो. अंगांत शिक्षा करण्याचें सामर्थ्य असतांहि तो मातेप्रमाणें शिष्याचे अपराध पोटांत घालतो. तो जितेंद्रिय द्वंद्वसहिष्णु व सदा संतुष्ट असा योगी असतो. त्याच्या ठिकाणीं ममत्व असतें. तो वेदशास्त्र पारंगत, सामर्थ्यसंपन्न, सावध व चतुर असतो. सद्गुरु हा असा बहुगुणी असतो. मुमुक्षूला चटदिशी शोध घेतां यावा म्हणून समर्थांनी एका ओवींत सद्गुरुची बारा लक्षणे सांगितलीं आहेत. त्यांत एक लक्षण कमी असणें हें सद्गुरुला कमीपणा आणणारें आहे, असें तें म्हणतात. **म्हणोनि ज्ञान, वैराग्य आणि भजन। स्वधर्मकर्म आणि साधन। कथा निरूपण श्रवण मनन। नीति न्याय मर्यादा।। यामध्यें एक उणें असे। तेणें तें विलक्षण दिसे। म्हणौन सर्व ही विलसे। सद्गुरुपासीं।।** (दा. ५-२-५२-५३) संदेहरहित ज्ञान होऊन शांतचित्त होण्यासाठीं अशा सद्गुरुला नम्रभावानें शरण जावें. जो स्वत:च अतृप्त असतो तो दुसऱ्याची तृप्ति कशी करणार? स्वरूपस्थितीमुळें जो स्वत: समाधानी असतो तोच दुसऱ्याचें समाधान करूं शकतो. **मुख्य सद्गुरूचें लक्षण। आधीं पाहिजे विमळ ज्ञान। निश्चयाचें समाधान। स्वरूपस्थिती।।** (दा. ५-२-४५)

★ ★ ★

**नव्हें तेंचि जालें नसें तेंचि आलें।**
**कळों लागलें सज्जनाचेनि बोंलें।**
**अनिर्वाच्य तें वाच्य वाचें वदावें।**
**मना संत आनंत शोधीत जावें।।१८४।।**

सद्‌गुरूची स्पष्ट लक्षणें सांगून अशा सद्‌गुरूपासून समाधान प्राप्त होतें, असें मागील श्लोकांत सांगितले. समाधान त्या सज्जनाकडून ब्रह्मविचार कळल्यामुळें होतें, असें सांगून तो विचार सतत जागृत ठेवावा, असें या श्लोकांत मनाला सांगतात.

पहिल्या ओळीचा अन्वय 'तेंचि जालें नव्हे, तेंचि आलें नसे, असाच केला पाहिजे. परब्रह्म उत्पन्न झालें असें नाहीं व कोठून आलें असें नाहीं. तें अज, शाश्वत, स्वयंभू, आहे तसेंच आहे. पण तें कसें आहे हें सांगतांहि येत नाहीं व मनाच्या कक्षेंत येत नसल्यामुळें कळण्या जोगेंहि नाहीं. **यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनासासह।।** अशी श्रुति आहे. तें एखाद्या पदार्थासारखें असतें तर सांगता आलें असतें. पण तें सर्वांहून निराळेंच आहे तर सांगणार कसें? तसेंच तें कल्पनातीत असल्यामुळें कल्पनारूप मनाला त्याचें आकलन होत नाहीं. मन नि:संकल्प झालें म्हणजे त्याचा अनुभव येतो.

जें वाणींनें सांगता येत नाही व ज्याचें मनाला आकलन होत नाही त्या परब्रह्मस्वरूपाचा अनुभव यावा कसा असा सहजच प्रश्न येतो. त्याचें उत्तर समर्थ असें देतात कीं हें कोडें एक सद्‌गुरुच सोडवूं शकतो व त्यासाठीं सद्‌गुरुवचनावर विश्वास ठेवणारा व अभ्यासू असाच शिष्य लागतो. **आतां मनासि जें अप्राप्त। तें कैसें होईल प्राप्त। ऐसें म्हणाल तरी कृत्य। सद्‌गुरुविण नाहीं।।** (दा. ७-२-१२) सद्‌गुरुचें जरी हें कृत्य असलें तरी शिष्यही अभ्यासू पाहिजे. शिकवणारा शिक्षक जरी तज्ज्ञ असला तरी विद्यार्थीहि सांगितलेला अभ्यास मन लावून करणारा पाहिजे.

परमार्थाच्या बाबतींत पुष्कळांची अशी समजूत असते कीं गुरु केला कीं झालें, सर्व जबाबदारी त्याच्यावर. आपणास कांहीं करण्याचें कारण नाहीं परंतु ही समजूत बरोबर नाहीं. गुरूनें ज्ञानबोध केला व तो कळला तरी ते ज्ञान दृढ होण्यासाठीं व अनुभवांत उतरण्यासाठीं शिष्यानें साधन हें केलेंच पाहिजे. शेत पेरलें व उगवलें तरी फोफावून येण्यासाठीं त्याची निगा राखण्याचें श्रम करावेंच लागतात. तसेंच येथें आहे. **सेत पेरिलें आणि उगवलें। परंतु निगेविण गेलें। साधनेविण तैसें जालें। साधकांसी।।** (दा. ५-३-९)

यासाठीं सद्‌गुरुकडून ब्रह्मस्वरूप कळलें व तें जरी बोलून दाखविण्याजोगें नसलें, म्हणजे अनिर्वाच्य असलें तरी तें वाच्य करून बोलावें. म्हणजे त्याचा श्रवण-मननादिद्वारा अभ्यास करून त्या संत, अनंत अशा परब्रह्माचा शोध घेत राहावें. **ब्रह्म शब्दीं ऐसें तैसें। बोलिजे त्याहूनि अनारिसें।**



**परी तें श्रवणअभ्यासें। पाविजे ब्रह्म।।** (दा. ७-२-७) जसें ब्रह्मस्वरूप हें अनिर्वाच्य आहे तसेंच ब्रह्मज्ञानानंतर होणारें समाधान हेंहिं अनिर्वाच्य आहे. परंतु दुसऱ्यास प्रोत्साहन देण्यासाठीं तें समाधानहि जितकें शब्दानें सांगता येईल तितकें सांगितलें पाहिजे. अनिर्वाच्य असें ब्रह्मस्वरूप किंवा त्यामुळे होणारे समाधान शब्दानें व्यक्त झाले म्हणून नाहीसें होत नाहीं उलट ही वाढतातच. **अनिर्वाच्य समाधान जालें। तें पाहिजे बोलिलें। बोलण्यासाठीं समाधान गेलें। हें तो घडेना।।** (दा. २०-७-१)

'संत आनंत' यांचे विवरण पूर्वी झालें आहेच. (श्लोक १४६ ते १६० पहा.)

अनिर्वाच्य ब्रह्मांचे वाच्यकरून विवरण हें जसें सद्‌गुरुकडून होतें तसेंच प्रत्ययाचें संत जेव्हां एकत्र मिळतात तेव्हाहि तें होतें. त्यांच्या प्रश्नोत्तर रूपानें झालेल्या संवादामुळें ज्ञान दृढ होऊन समाधान प्राप्त होतें. **मिळतां प्रत्ययाचे संत। येकांतापरी येकांत। केली पाहिजे सावचीत। नाना चर्चा।** (दा. २०-७-२४)

★ ★ ★

**लपावें अती आदरें रामरूपीं।**
**भयातीत निश्चिंत ये स्वस्वरूपीं।**
**कदा तो जनीं पाहतां ही दिसेना।**
**सदा ऐक्य तो भिन्नभावें वसेना।।१८५।।**

शाश्वत, स्वयंभु अशा परब्रह्माचें स्वरूप जरी शब्दातीत असलें तरी त्याचें ज्ञान सद्‌गुरूकडून कळतें व तें दृढ होण्यासाठीं अनिर्वाच्य अशा ब्रह्माची चर्चा वाच्य करून करावी, असें मागील श्लोकांत सांगितलें, परंतु झालेलें ज्ञान केवळ बोलण्यानें अनुभवाला येण्यासारखें नसल्यामुळें नवव्या म्हणजे आत्मनिवेदनभक्तीनें आत्मस्वरूपी तद्रूप होऊन राहावें असें या श्लोकांत सांगतात.

'अती' हा शब्द 'लपावें' या शब्दाला जोडून आणि 'आदरें' याही शब्दाला जोडून घेतां येतो. 'लपावें अती' आणि 'भयातीत रामरूपीं अती आदरें' असें येथें म्हटलें आहे. सद्‌गुरुकडून आत्मज्ञान झालें तरी प्रथमत: निराकार, निर्गुण अशा आत्मदेवावर प्रेम जडणें कठींण असतें. त्यासाठीं सगुणाचा आधार घ्यावा लागतो. म्हणून मनाला सांगतात कीं हें मना, श्रीरामरूपानें नटलेल्या त्या आत्मराम स्वरूपांत तूं प्रेमानें असा बुडून रहा कीं

तुझें मी पणाचे डोकेंहि वर दिसू नये. त्या स्वरूपप्रेमाच्या डोहात बुडण्याचें मुळींच भय नाहीं, हें १३६ व्या श्लोकात सांगितलेंच आहे. म्हणून भिण्याचें कारण नाही. तसेंच जें रामरूप तेंच तुझें स्वत:चें स्वरूप आहे. म्हणून भिण्याचें कारण नाहीं. भीतीनें घाबरून रामावर प्रेम करण्यापेक्षा निर्भय होऊन रामरूपात रंगावें. रामावर केलेलें प्रेम हें तुझ्या स्वत:वरच केलेलें प्रेम होय. तो आत्मदेव जसा श्रीरामरूपानें नटतो तसाच तो तूं धारण केलेल्या रूपानें नटलेला आहे. पिंडब्रह्मांडाचा सर्व खेळ पाहणारा जो चैतन्यस्वरूप आत्मा तो एकटाच असून प्रकृतीच्या भिन्नत्वामुळे तो निरनिराळ्या स्वरूपांनी भिन्न भासतो. **मुळीं पाहाणार तो येकला। सकळां ठाईं विभागला। देहप्रकृतीनें जाला। भिन्न भिन्न।।** (दा. १४-८-९) रामरूपांत तुझा देहभाव लोपला कीं तूं व राम एकच. म्हणून मीपणा सोडून तद्रूप होऊन रहा. देह असेपर्यंत कर्म हे कोणाला सुटत नसल्यामुळे प्रापंचिक असो किंवा पारमार्थिक असो, विधिनिषेध पाळून तुझा व्यवहार चालूं दे. परंतु मीपणानें त्याच्या कर्तेपणाचें ओझें मात्र डोक्यावर घेऊ नकोस. जें जें घडते तें तें त्या रामसत्तेमुळें आहे, याचें सतत स्मरण ठेवून व्यवहार चालूं दे, **म्हणोनि प्रवृत्ति आणि निवृत्ति। इये वोझीं नेघें मती। अखंड चित्तवृत्ति । आठवीं मातें।।** (ज्ञा. १२-१२२) असें भगवान सांगतात. याप्रमाणें जीवन जगणें म्हणजे आदरानें रामरूपी लपणें होय आणि असें विभक्तपणे नसणें म्हणजे भक्त होय. ज्या रामरूपांत तूं दडी मारून बसणार तें रूपच जर मुळांत नित्य, सर्वगत व अचल असें आहे, तर तुला भिण्याचें कारण काहीच नाहीं. जो देहानें रामदास होतो व जीवभावानें आत्माराम असतो त्याला भीति कशाची व कोणाची असणार ? तुकोबा आपला अनुभव सांगतात कीं **भयाची तों आम्हां चित्तीं। राहो खंती शकेना।।१।। समर्पिलो जीवे भावें। काशा भ्यावें कारणें।।२।।** (गा १६१९)

आत्मस्वरूपाशीं ऐक्य झालेला, अद्वैत बोधाचा साक्षात्कारी पुरूष शोधूनहि सांपडणें कठीण असतें. आत्मतृप्त असल्यामुळे तो जनसंपर्कापासून दूर असतो व कधीं कधीं समाजांत वावरला तरी बाहेरून एखाद्या साध्या माणसासारखा दिसतो. त्याच्या अंतरीचें स्वरूपैक्य बाहेरून समजण्यासारखें नसतें. त्याचा थोडासा सुगावा लागतो - **परी तो कोठें आडळेना। कोणें स्थळी सापडेना। वेष पाहातां हीनदीना। सारिखा दिसें।।** (दा. १५-२-२०) 'आधी केलें, मग सांगितले' अशा समर्थांचे या श्लोकानें स्मरण झाल्याशिवाय राहात नाहीं.

★ ★ ★



**सदा सर्वदा राम सन्नीध आहे।**
**मना सज्जना सत्त्य शोधून पाहे।**
**अखंडीत भेटी रघूराजयोगु।**
**मना सांडि रे मीपणाचा वियोगु।।१८६।।**

निर्भय व शाश्वत रामरूपांत दडी मारून बसलेला सत्परूष हुडकूनहि न सापडणारा असल्यामुळें त्या स्वरूपांत तू लपून रहा, असें मागच्या श्लोकांत मनाला सांगितलें. तो राम कोठें दूर नसून तुझ्या अगदीं जवळच आहे, इतकेंच काय पण त्याचा व तुझा वियोग कधी नाहीच, सदा योगच आहे, असे मनाला या श्लोकांत सांगतात.

हे मना, हा आत्माराम सतत तुझ्या जवळच आहे. या रामाबद्दल कोणी नीट विचारच करीत नाही. म्हणून तो जवळ असूनहि सापडत नाही. अनुभवाला येत नाही. देव हा आपल्यापासून वेगळा असून कोठें तरी दूर आहे, तो येऊन भेटावा किंवा आपण कोठे तरी गेल्याने त्याची भेट होईल. असे जें मनुष्याला वाटतें तें अज्ञानामुळे वाटतें. सर्व देवांचा देव हा आत्मारामच आहे. म्हणून हे सज्जन मना, योग्य तो विचार करून त्याचा शोध घे. त्या स्वरूपाचा थोडासा विचार केल्यास तुला कळून येईल की तुझी व त्या राजारामाचीं सतत भेट आहे. कधी वियोग नाहींच; सतत योगच आहे. ज्या आत्मस्वरूपावर सर्व सृष्टीचा उदय, भास व अस्त भासतो, तोच आत्मा तुझ्याहि ठिकाणी आहे. **देवाभक्तांचे मूळ। शोधून पाहातां सकळ। उपाधी वेगळा केवळ। निरूपाधी आत्मा।।** (दा. १२-३-२७) लाटा पाण्यावरच उठतात, त्यावरच नाचतात व पाण्यातच विलीन होतात. जसें पाणीं हे त्यांचें जीवन तसेंच आत्मसत्तेवर तुझे अस्तित्व व तुझा सर्व कारभार चालू आहे. सर्व प्रकाशाचा तोच प्रकाश असून तुझ्या शरीरेंद्रियांना प्रकाशित करणारा तोच आत्माराम आहे. त्याच्या प्रकाशानेंच त्याला जाणतां येते व त्याच्या कृपेनेंच तो होणें घडतें. **हा स्वप्रकाश सहज निजें। यासी प्रकाशी ऐसें नाही दुजें। याचेंनि प्रकाशे हा देखिजे। याचेनि होइजे याऐसें।।** (ना. भा. २२-३४५)

तुझी व राजारामाची अशी जवळीक असताहि तुला जो वेगळेपणा वाटतो तो अज्ञानामुळे तुझ्या ठिकाणी असलेल्या देहबुद्धीमुळे आहे. म्हणून हे मना, मी पणामुळें, वाटणारा हा वियोग सोडून दे आणि त्याचें व आपलें अखंड ऐक्य असल्याचा निश्चय कर. निश्चय करण्याच्या दृष्टीनें खालील अभंग लक्षांत ठेवण्यासारखा आहे. **तुम्हा आम्हा मुळीं जाली नाही तुटी।**

**तुटीवीण भेटी इच्छितसा। इच्छितसा योग नसता वियोग। तुम्हा आम्हा योग सर्वकाळ।। सर्वकाळ तुम्ही आम्ही एके स्थळीं। वाया मृगजळीं बुडो नये।।** (स्फु. श्लो).

★ ★ ★

**भुतें पिंड ब्रह्मांड हें ऐक्य आहे।**
**परी सर्वहीं स्वस्वरूपी न साहे।**
**मना भासलें सर्व कांही पहावें।**
**परी संग सोडूनि सूखी रहावें।।१८७।।**

राम हा तुझ्या अगदीं जवळ आहे. परंतु देहबुद्धीमुळें आपण त्याच्यापासून दूर, वेगळे आहो असें तुला वाटतें. म्हणून मीपण सोडून त्या सद्वस्तूचा शोध घे, असें मागील श्लोकांत मनाला सांगितलें आहे. ज्या आत्मारामाचा शोध घ्यावयाचा तो सर्वांत असून सर्वाहून वेगळा असा असल्यामुळे त्या नि:संगाची भेट नि:संग झाल्यानेंच होते, असे या श्लोकापासून चार श्लोकांत सांगतात. आत्मानुसंधान साधण्यासाठी बाह्य दृश्य पदार्थांचा संग सुटला पाहिजे. असें मनाला या श्लोकांत सांगतात.

**भुते पिंड ब्रह्मांड –** पिंडी तें ब्रह्मांडी असे वरचेवर लोक बोलतात. तत्त्वज्ञ व शास्त्रेंहि असेंच सांगतात. पणे हें म्हणणे अनुभवाच्या कसाला उतरत नाहीं. निरनिराळे देव, पशुपक्षादि योनी, तीर्थक्षेत्रें, बहुविध औषधी हे निरनिराळ्या प्रकारचे ब्रह्मांडांतील पदार्थ पिंडात कोठें आहेत ? जर तसे ते नाहींत तर पिंडीं ते ब्रह्मांडीं असे श्रेष्ठ लोकहि का म्हणतात ? याचें उत्तर असें आहे कीं, असंख्य पदार्थांचे ब्रह्मांड काय किंवा निरनिराळ्या इंद्रियावयवांचा देह काय, ही दोन्हीहि पंचभूतांचींच बनलेलीं आहेत; म्हणून पिंडी ते ब्रह्मांडी म्हणण्याचा प्रघात आहे. **जें चि पिंडीं तेंचि ब्रह्मांडी। प्रचित नाहीं कीं रोकडी। पंचभूतांची तातडी। दोहीकडे।।** (दा. ९-५-४०) सारांश. पंचमहाभूतें, पिंड व ब्रह्मांड यांचे ऐक्यच आहे.

**परी सर्वही –** परंतु शुद्ध आत्मस्वरूप किंवा ब्रह्म हें या सर्वापलिकडे आहे. तेथें या त्रिगुण, पंचभूतांची लटपट खटपट कांही चालत नाही. त्या शुद्ध आत्मस्वरूपाचा जर अनुभव घ्यावयाचा असेल तर या पंचभूतात्मक पिंडब्रह्मांडदृश्याचा नाद सोडून त्याच्यापासून अलग झालें पाहिजे. **ये प्रकृतीचा निरास। विवेके करावा सावकाश। मग परमात्मा परेश। अनन्यभावें भजावा।।**



(दा. ९-६-५४) हा प्रकृतीचा निरास करावा कसा हें उत्तरार्धात सांगतात.

(३-४) **मना भासलें। परीसंग...।।** ईश्वरनिर्मित सृष्टि ही कांही कोणाला मोडतां येत नाही व या सृष्टीत वावरणारा मनुष्य हा कांही डोळें झांकून चालत नाहीं. म्हणून सृष्टि ही भासणारच. परंतु या सृष्टीचें व आपले स्वरूप काय हें ज्ञान विवेकानें ठाऊन झाल्यास, भासणाऱ्या दृश्यामध्यें वृत्ति गुंतून रहात नाही. पाहुणा हा परक्या घरी वावरत असला व तेथील सर्व व्यवहार त्याला दिसत असले तरी आपण वेगळें आहोत या जाणिवेमुळें तो कशांतहि गुंतून न राहतां मोकळ्या वृत्तीनें सुखात राहतो. त्याप्रमाणे बा मना, हे पिंडब्रह्मांड तुला जरी भासलें तरी भासूं दे, तें पहा, पण आपलें स्वरूप पंचभूतातीत म्हणजे दृश्यभासातीत आहे याची जाणीव ठेव म्हणजे वृत्ति आपोआप अंतर्मुख होऊन तूं स्वस्वरूपांत सुखानें राहशील. **मिथ्यत्त्वें वृत्ति फिरे। तों दृश्य असतांच वोसरे। सहजचि येणें प्रकारें। जालें आत्मनिवेदन।।** (दा. ५-६-५१)

★ ★ ★

**देहभान हें ज्ञानशस्त्रे खुडावें।**
**विदेहीपणे भक्तिमार्गेचि जावें।**
**विरक्तीबळें निंद्य सर्वें त्यजावें।**
**परी संग सोडूनि सूखें रहावें।।१८८।।**

पंचभूतात्मक दृश्य सृष्टि जरी भासली तरी पहावी, पण विवेकानें तिचें नश्वरपण जाणून, तिच्यापासून अलिप्त राहून स्वस्वरूपांत सुखानें राहावें, असें मागील श्लोकांत सांगितलें. देह हाहि पंचभूतात्मक असल्यामुळें त्याचा ज्ञानानें निरास करून, विरक्त होऊन अलिप्तपणें भक्तिमार्गानेंच विदेहावस्थेंच सुखाने राहावें, असे या श्लोकात सांगतात.

देहेभान हे..। विदेहीपणें...।। देह हा मला दृश्य असल्यामुळें 'मी' हें भान त्यापासून वेगळें कसे आहें याचा सविस्तर विचार श्लोक १२ मध्यें झाला आहे. म्हणून या श्लोकापुरताच त्याचा थोडक्यांत विचार पाहू.

अज्ञानदशेत देहाशी तादात्म्य असल्यामुळें जीवाला देह म्हणजेच मी, असें वाटत असतें. आत्मानात्मविवेक झाला म्हणजे जड देहापासून आपण म्हणजे 'मी' वेगळा आहे हें मनुष्याला कळून येते आणि मी असा कोणी वेगळा नाहींच, सर्व कांही तो एक आत्माच आहे, हे नवव्या आत्मविनेदन

भक्तीनें कळून येतें. या भक्तीने आत्मस्वरूपाशी अनन्य झालें की, तो देहावेगळा, विदेही होऊन चिरंतन सुखांत राहतो. म्हणून ज्ञानशास्त्रानें मी देहीं हे भान नष्ट करून, भक्तिमार्गानेच जाऊन विदेहावस्था प्राप्त करून घ्यावी, असें पूर्वार्धात म्हटले आहे. ज्ञानानें विदेहावस्था प्राप्त करून देणारी ही निर्गुण भक्ति आहे. श्लोक १६९ मधील 'गुणेवीण निर्गुण तो आठवावा', असा हा आठव आहे. किंवा ज्ञानोबांनी सांगितलेला हा सदभ्यास आहे. (श्लो. १६९ पहा)

याप्रमाणेंच वद्धावस्थेतून विदेहमुक्तावस्था सहज प्राप्त कशी होते, याचें विवेचन समर्थांनी केवळ दोन ओव्यांत फार मार्मिकपणे सांगितले आहे. त्या दोन ओव्या पाहिल्या म्हणजे श्लोकाचा पूर्वार्ध सहज ध्यानात येईल. **तत्वी गुंतला म्हणे कोहं। विवेक पाहातां म्हणे सोहं। अनन्य होता अहं सोहं। मावळली।। याउपरी उर्वरित। तेंचि स्वरूप संत। देहीं असोनि देहातील। जाणिजे ऐसा।।** (दा. ६-३-३५,३६)

जीवन्मुक्ति व विदेहमुक्ति असें मुक्तिचें दोन प्रकार सांगितले आहेत. जीवनमुक्ति ही शरीरावस्थानुरूप म्हणजे शरीर जिवंत असे तोपर्यंतची असून, विदेहमुक्ति ही, देहप्रारब्धाचा अडथळा असल्यामुळे, शरीरपातानंतरची ब्रह्मावस्थानुरूप आहे, असे अद्वैतग्रंथकारांचे म्हणणे आहे. समर्थांनी या श्लोकांत 'विदेहीपणे भक्तिमार्गेंचि जावें' व बाराव्या श्लोकांत 'विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी' असें म्हटलें आहे. विदेहीपणें या शब्दप्रयोगावरून असें दिसतें की विदेहमुक्ति ही जरी देहपातानंतरची अशरीरी असला तरी मुक्तावस्था, विदेहावस्था, सहजावस्था इत्यादि सुखरूप अवस्थांचा अनुभव देह असतांना होतो. म्हणून समर्थांनी सप्तअवस्था एकरूनहोत असें म्हटले आहे. **संगत्याग आणि निवेदन। विदेहस्थिति अलिप्तपण। सहजस्थिति उन्मनी विज्ञान। हे सप्तहि येकरूप।।** (दा. ४-४-८)

(३/४) विरक्तींबळे -। परीसंग -। विदेहस्थिती ही सुखरूप असली तरी, प्रारब्धभोगानुसार ती खंडित होऊन देहभान येतें अशा वेळीहि दृढ वैराग्यानें निषिद्धाचार टाळला पाहिजे. ज्ञान झाले, अनुभव आला, आता कसेहि वागावें, असें वाटतां उपयोगीं नाही. ज्ञानीच जर निंद्य कर्माचरण करूं लागला तर जगाला सन्मार्ग दाखविणारा दुसरा कोण ? आणि मलिन चित्तानें ब्रह्मैक्य तरी कसे होणार ? **ज्ञानी भिडेनें दडपला। निश्चल परब्रह्म कैंचे त्याला। उगाच करितो गलबला। मायेमध्यें।।** (दा. १५-४-२८) यासाठी देहभान आलें



कीं कटाक्षानें उचित कर्मच केलें पाहिजे. परंतु त्या कर्मकचाट्यातहि गुरफटून उपयोगी नाही. म्हणून अलिप्तपणा ठेवून चितकें राहाता येईल तितके देहभान विसरून आत्मस्वरूपीं सुखानें रहावें.

★ ★ ★

**मही निर्मिली देव तो वोळखावा।**
**जया पाहतां मोक्ष तत्काळ जीवा।**
**तया निर्गुणालागी गूणीं पहावें।**
**परी संग सोडूनि सूखें रहावे।।१८९।।**

ज्ञानानें आपलें स्वरूप जाणून, देहभान सोडून, निर्गुण भक्तीनें आत्मस्वरूपीं अनन्य होऊन विदेहावस्थेत रहावें आणि देहभान असतांना अभिमान सोडून, वैराग्यबलानें निंद्य कर्म टाळावें, म्हणजे सत्कर्मच करावें, असें मागील श्लोकात सांगितले. ज्याला मोक्षाची इच्छा असेल त्यानें या निर्गुण देवाला ओळखून त्याच्याशीं अनन्य असलें पाहिजे. पण त्याचबरोबर सगुणीं जनाकडेहि दुर्लक्ष होऊ देतां कामा नये, असें या श्लोकात सांगतात.

(१-२) मही निर्मिली ...। जया पाहतां...।। स्वइच्छेनें मायेचा स्वीकार करून ज्यानें आपल्या विचित्र कलेनें या सृष्टीचा देखावा उत्पन्न केला आहे त्या मुख्य देवाला ओळखावें. त्याची ओळख होऊन त्याचे दर्शन झालें तरच जीवाच्या मागें लागलेली संसारपीडा सुटून त्याला मोक्ष प्राप्त होतो.

परंतु सृष्टीपूर्वी असलेल्या; सृष्टि निर्माण करणाऱ्या आदिदेवाला अज्ञानामुळें न जाणता सृष्टीच्या पोटीं उत्पन्न झालेल्या पाषाणादि पदार्थास लोक देव समजतात. खऱ्या देवाचा विचार करणारा सहस्रामधें एखादाच असतो. **देवें निर्मिली हे क्षिती। तिचे पोटीं पाषाण होती। तयासचि देव म्हणती। विवेकहीन।।** (दा. ८-१-२९) कुंभार हा गाडग्या-मडक्यापूर्वीचा व त्यांच्याहून वेगळा आहे. तीं भांडी म्हणजे कुंभार नव्हे. तसें देह हा सृष्टीपूर्वीचा, सृष्टीहून वेगळा असून सृष्टि म्हणजे देव नव्हे. सृष्ट पदार्थांचा कल्पनेने देव बनवून त्याचें भजन केलें तर त्यानें कल्पित फळ मिळेल. परंतु संसार-निवृत्ति होऊन मोक्ष मिळणार नाही. **परी ते भक्त मातें नेणती। जे कल्पनेबाहेरी न निघती। म्हणोनि कल्पित फळ पावती। अंतवंत।। किंबहुना ऐसें जें भजन। तें संसाराचेंचि साधन।।** (ज्ञा. ७-१४७,४८) म्हणून मोक्ष हे फळ पाहिजे असेल तर जीवानें निर्गुण, कल्पनातील देव ओळखला पाहिजे.

निर्गुणात्मक, सृष्टि निर्माण करणारा देव सृष्टीहुन वेगळा व निर्गुण आहे. त्या शाश्वत देवास ओळखल्यानेंच मोक्ष प्राप्त होतो. असें पूर्वार्धात सांगितलें. परंतु त्या त्रिगुणातील देवाचें ज्ञान होण्यासाठीं ज्ञानपूर्व म्हणजे ज्ञान होण्यापूर्वी सगुणाचा आधार ध्यावा लागतो. आणि निर्गुणज्ञानानंतरहि कृतघ्नत्वाचा दोष लागूं नये म्हणून सगुण भजन सुटतां कामा नये. यासाठी 'तया निर्गुणालागि गुणी पहावें', असें उत्तरार्धात सांगतात.

(३-४) तया निर्गुणालागि...। परी संग...॥ - तो निर्गुण देवच गुणांनी युक्त अशा सर्व पदार्थांना व्यापून पण वेगळा असा असल्यामुळें सगुणांत निर्गुणहि समाविष्ट आहे. म्हणून सगुण भजनहि टाळतां कामा नये. ब्रह्मज्ञान झालें, आता सगूण भजन काय करावयाचें असें वाटणें हा दोष होय. हें भक्ताचें अध:पतन होय. **ज्ञानबळें उपासना। आम्ही भक्त जरी मानूं ना। तरी या दोषाच्या पतना। पावों अभक्तपणें।।** (दा. ६-७-४०)

अज्ञानदशेंत होणाऱ्या उपासनेपेक्षा ज्ञानोत्तर उपासना ही वास्तविक अधिक प्रेमस्वरूपाची व्हावयास पाहिजे. कारण ज्ञानोत्तर उपासनेंत उपास्यउपासकांचें स्वरूप व संबंध ठाऊक असतात. जें गुणातीत तें गुणानें भासलें म्हणून बिघडलें कोठें ? गुणातीत व गुणांत जें शाश्वत आहे त्यात कोणतीच घडामोड होत नाही. सतत सोनेपणानें असणारें सोनें अलंकाररूपांत दिसलें तर असलेला आनंद द्विगुणित व्हावयास पाहिजे. कारण सोने जसेंच्या तसें राहूनच्या राहून वर भोग पदरी पडतो. तसें गुणांत आलेल्या निर्गुण देवाच्या भजनानें सगुण भक्तिप्रेमसुख भोगतां येतें व प्राणिमात्रांतहि भगवद्भाव उत्पन्न होतो, पूजोपचार करता येतो व भूतमात्रीं प्रेम जडतें. म्हणून निर्गुण ज्ञान व सगुण भजन हीं दोन्हींहि असावी.

तया निर्गुणालागी जर गुणी पहावयाचें असेल तर, त्याचें सर्वश्रेष्ठ प्रतीक म्हणजे सद्गुरू होय. 'गुरू: साक्षात्परब्रह्म'असें तें प्रतीक आहे. पण अशा गुरूची भेट होईपर्यंत प्रकृतींतील सगुण जड प्रतीकाच्याद्वारें निर्गुणाकडे वाटचाल करावी लागते. यासाठी ठिकठिकाणी श्रीराममूर्तींची स्थापना समर्थांनी केली. समर्थ म्हणतात, **भजनरहीत ज्ञानें मोक्ष होणार नाही। सकळ निगम त्यांचें सार शोधूनि पाही।। सगुण भजन मागें रक्षिलें थोरथोरी। अधम नर तयांचे ज्ञान संदेहकारी।।''**

पूर्वश्लोकानुसंधान लक्षात घेता सारांश असा दिसतो की विदेहावस्था असेल तेव्हा निर्गुणाशी (निर्गुण आत्मस्वरूपी) अनन्य असावें व देहभान असेल



तेव्हा रामभजनांत रंगावें. **कर्ता राम मी नव्हे आपण। ऐसें सगुणनिवेदन। निर्गुणी तें अनन्य।निर्गुणचि होईजे।।**(दा. ६-७-३४) संग सोडून शुद्ध आत्मचैतन्याशीं अनन्य होऊन सुखांत रहावें. **देवपद आहे निर्गुण। देवपदी अनन्यपण। हाचि अर्थ पाहाता पूर्ण। समाधान बाणे।** (दा. ६-९-३२)

★ ★ ★

**नव्हे कार्यकर्ता नव्हे सृष्टिकर्ता।**
**परेहून पर्ता न लिंपे विवर्ता।**
**तया निर्विकल्पासि कल्पीत जावें।**
**परी संग सोडूनि सूखें रहावें।।१९०।।**

ज्यानें सृष्टि निर्माण केली त्या मुख्य देवाला ओळखल्यानें मुक्ति हें फळ मिळते. म्हणून त्या निर्गुण देवाशी अनन्य असावें, पण सगुण देवाचें महत्व कमी लेखूं नये, असें मागील श्लोकांत सांगितलें. जो सृष्टीच्या पूर्वीचा पण जो सृष्टीवेगळा. परंतु ज्याला उपाधीमुळें सगुणत्व व सृष्टिकर्तृत्व चिकटते, त्या व्यापक आत्मदेवाचें निरूपाधिक स्वरूप सांगून, तो निर्विकल्प असला तरी, अभिमान सोडून त्याची कल्पना करीत जावें कल्पनातीत होऊन सुखांत रहावें, असें या श्लोकांत सांगतात.

**(१) नव्हे कार्यकर्ता -** हा निर्गुण देव ब्रह्मदेवाप्रमाणें सृष्टिकर्ता किंवा विष्णूप्रमाणें तिचा पालनकर्ताहि नाहीं. हें अवाढव्य सृष्टिकार्य त्याच्या सत्तेवर चाललें असलें तरी त्या कार्याशी या देवाचा कांही संबंध नाही. तो साकाराबरोबर साकार दिसतो, पण आपले निराकारत्व सुटूं न देतां. त्याला सृष्टीचा उत्पत्तिकर्ता, पालनकर्ता व संहारकर्ता असें समजणें हें अज्ञान होय. **जगाच्या जीवीं आहे। परी कवणाच्या कहीं नोहे। जगाचें हे होय जायें। तो शुद्धीही नेणे।। तो सृष्टी पाळी संहारी। ऐसें बोलती जें चराचरी। तें अज्ञान गा अवधारी पंडुकुमरा।।** (ज्ञा. ५-७९,८२)

**(२) परेहून पर्ता -** असें हे अतर्क्य स्वरूप असल्यामुळे तें असें अगर तसें आहे, हें निश्चितपणें वाणीनें सांगतां येत नाही. म्हणून जेथून शब्द उमटावयाचा त्या परावाणी पलीकडचा तो आहे, वाचातील आहे, परात्पर आहे. **परेहून जो पर्तापरात्परचि बोलिजे। उन्मेश ते परावाचा। वाचातीत निरंजनु।।**

हा विवर्ता न लिंपे - विवर्त म्हणजे माया, भ्रम. त्याला माया स्पर्श

करू शकत नाही. माया ही कल्पनारूप असल्यामुळें हा देव कल्पनेंत सांपडत नाहीं. **जे बोलास आकळेना। बोलल्याविणहि कळेना। जयासी कल्पितां कल्पना। हिंपुटी होये।।**(दा. ६-१०-७) असें हे निरूपाधिक रूप आहे. तें वाचातीत असलें तरी बोलल्याशिवाय जसें कळत नाहीं तसें तें कल्पनातीत असलें तरी. कल्पना केल्याशिवाय ते अनुभवाला येत नाही. म्हणून उत्तरार्धांत 'तया निर्विकल्पासि कल्पीत जावे' असे म्हटले आहे.

त्या शुद्धस्वरूपासंबंधी कल्पना होण्यास मुख्य अडचण कोणती आहे. हें मागें श्लोक १७१ मध्ये सांगितले आहे, 'अहंतागुणे कल्पिताही कळेना' असे तेथे म्हटले आहे. अहतेमुळे त्या स्वरूपाची कल्पना नीट होत नाही, म्हणून मीपणाचा संग सोडून त्या निर्विकल्पास कल्पीत जावे आणि कल्पनातील स्वरूपांत सुखाने रहावे असे येथें म्हणतात.

मीपण सोडून त्या निर्विकल्पास कसें कल्पीत जावे हें समर्थांनी एका ओवीत फार मार्मिकपणे सांगितले आहे. ती ओवी अशी - **निर्विकल्पासी कल्पावें। परी कल्पिते आपण न व्हावे। मीपणासि त्यागावें। येणें रिती।।** (दा. ७-७-५६)

त्या शुद्ध आत्मस्वरूपाविषयी कल्पना करीत जावें, पण त्या कल्पनांचे वेगळेपणानें आपण द्रष्टे अगर साक्षी बनूं नये, जें निर्विकल्प तेंच सर्वसाक्षी, व्यापक, प्रकाशक व सर्वचालक माझ्या देहांत भरलें आहे, अशी कल्पना करावी, पण देहाचा अथवा साक्षित्वाचा अहंभाव सोडावा.

कल्पनाच नाहीं असें कल्पनाशून्यत्व आलें की शुन्यत्वाची कल्पनाहि नाहीं, तें शुद्ध स्वरूप होय व तीच तद्रूपता. याप्रमाणे मीपणाचा समूळ संग सोडून स्वस्वरूपी सुखानें रहावें.

★ ★ ★

**देहेबुद्धिचा निश्चयो ज्या ढळेना।**
**तया ज्ञान कल्पांतकाळी कळेना।**
**परब्रह्मा तें मीपणें आकळेना**
**मनीं शून्य अज्ञान हें मावळेना।।१९१।।**

ज्याच्या ठिकाणी सृष्टिकर्तृत्व किंवा भोक्तृत्व नाहीं, ज्याला माया स्पर्श करूं शकत नाहीं, जो वाचातीत आहे अशा निरूपाधिक, निर्विकल्प देवाची मी पणा सोडून कल्पना करीत जावें आणि कल्पनातीत होऊन



स्वस्वरूपांत सुखानें रहावें, असें मागील श्लोकांत सांगितलें, परंतु ज्याची देहबुद्धि नष्ट होत नाहीं त्याला कधीहि आत्मज्ञान होत नाही आणि मी पणा सुटून ब्रह्मत्मैक्य जोपर्यंत होत नाही तोपर्यंत अज्ञान दूर होत नाही, असा या श्लोकात सिद्धांत सांगतात.

(१-२) देहबुद्धिचा...। तया ज्ञान....।। - १३८ व्या श्लोकांत ज्याची देहबुद्धि सुटत नाहीं त्याला आपलें जुनें ठेवणें सांपडत नाहीं, असें सांगतांना या श्लोकांतील प्रथम चरणाचे विवेचन सविस्तर झालें आहे. त्या श्लोकांतील तृतील चरण असाच आहे, तसेंच येथेंहि सांगतात की ज्यांची 'देह म्हणजे मी' ही आत्मघातकी बुद्धि सुटत नाही. त्याला कधीहि आत्मज्ञान होणार नाही.

जीव हा वास्तविक मुक्त असून बंधन असे कोणासच नाही. पण अनादिकालच्या स्वस्वरूपाच्या अज्ञानामुळें देह म्हणजेच आपण होय. असा भ्रमनिश्चिय दृढ झालेल्या असतो. **कोणासीच नाही बंधन। भ्रांतिस्तव भुलले जन। दृढ घेतला देहाभिमान। म्हणौनियां।।** (दा. ५-६-५७) ही देहाभिमानाची भूल जोपर्यंत नाहींशी होत नाही. तोपर्यंत आपलें अन्य असें कांहीं शाश्वत स्वरूप असेल अशी जाणीवच उत्पन्न होत नाहीं आणि मनुष्य विषयकल्पना करीत व अविद्येंत राहून आपला स्वत:चा स्वत: घातच करून घेतो. **म्हणऊनि आपणचि आपणपेया। घातु किजतु असे धनंजया। चित्त देऊनि नाथिलिया। देहाभिमाना।।** (ज्ञा. ६-७०)

(३-४) परब्रह्म तें ... । मनीं शून्य...।। बुद्धीनें जोपर्यंत देहाभिमान घट्ट धरून ठेविला आहे जोपर्यंत तिला परब्रह्माचें आकलन होणार नाही हा सिद्धांत सतत जागृत रहावा म्हणून 'जुने' ठेवणें मीपणें आकळेना' या १३४ ते १४१ श्लोकांच्या गटांत तो मांडून पुन्हां येथेंहि तो सांगतात. परंतु साधुवचनाकडे दुर्लक्ष करून ''माझ्यासारख्या बुद्धिवानाला काय आकलन होत नाहीं ?'' अशा घमेंडीने जर कोणी तें परब्रह्म पाहूं गेला तर तें पहाणेंहि शून्यत्वाचें म्हणजे अज्ञानाचें ठरतें व पदरींहि शून्य म्हणजे अज्ञानच पडतें. जें काहीं नाही तें शून्य परब्रह्म होय, असें बुद्धीला वाटून ती अज्ञानांत तशीच राहते. आपण कोणीं तरी साडेतीन हाताचा एक देहधारी आहोत व पहावयाचें परब्रह्महि कांहीं तरी एक अफाट, अवाढव्य वस्तू आहे अशा द्वैत, वेगळेपणाच्या भावनेनें इतर वस्तूप्रमाणें तें पाहूं गेल्यास सर्व शून्यत्वच दिसणार. **वेगळेपणें पाहाणें घडे। तेणे वृत्ति सून्यत्वीं पडे। पोटी संदेह पवाडे।**

**सून्यत्वाचा**॥ (दा. ८-१०-७१)

★ ★ ★

**मना नाकळे नाढळे रूप ज्याचें।**
**दुजेवीण तें ध्यान सर्वोत्तमाचें।**
**तया खूण ते हीन दृष्टांत पाहे।**
**तेथें संग नि:संग दोनी न साहे ॥१९२॥**

देहबुद्धि असेपर्यत ब्रह्मज्ञान कदानि प्राप्त होत नाही. मीपणानें तें जाणूं गेल्यास वृत्ति शुन्यांत पडून अज्ञान तसेंच राहतें, असें मागील श्लोकात सांगितलें. ब्रह्मस्वरूप हें मनाला न कळणारें अनिर्वचनीय व एकमेकद्वितीय आहे, असें सांगून १८९ श्लोकापासून प्रारंभ केलेला मुख्य देव वोळखणें' हा विषय या श्लोकानें पुढें चालूं करतात.

(१/३) मना ना कळे...। तया खूण...। सर्वां वडिल तसाच सर्वोत्तम जो अंतरात्मा त्याचें स्वरूप मनाला आकलन होण्याजोगें नाही. मन तें पाहूं गेल्यास त्याला सर्व शून्यच भासतें. **जेथे वाचा निवर्तत्ती। मनासी नाही ब्रह्मप्राप्ती। ऐसें बोलिली श्रुती। सिद्धांतवचन॥** (दा. ७-२-१०) मनाला तें रूप भासत नाहीं म्हणून तें नाहींच असें म्हणावें तर तसेंहि नाही. तें सदोदित सर्वत्र संचलें आहे, जर सर्वत्र संचलें आहे तर त्या सर्वोत्तमाचें ध्यान आहे तरी कोणासारखें ? अशासारखे म्हणून दृष्टांत देऊन सांगावें म्हटलें तर त्यासारखा दुसरा पदार्थच नसून तें एक अद्वितीय आहे. म्हणून दृष्टांत देऊन तें सांगता येत नाहीं. **ब्रह्मासाररिखें दुसरें। पाहातां काय आहे खरें। ब्रह्मा दृष्टांत उत्तरें।कदा न साहे॥** (दा. ७-२-९) त्याची खूण पटविण्यासाठी जो जो दृष्टांत घ्यावा तो तो हिणकसच ठरतो. त्याला जवळचा दृष्टांत म्हणजे आकाशाचा देतात. परंतु **आकाश अनुभवा येतें। स्वरूप अनुभवापरतें। म्हणोनियां आकाशातें। साम्यता न घडे॥** (दा. ८-५-६८)

(२/४) दुजेवीण तें...। तेथें संग...॥ अशा या स्वरूपाचें ध्यान तरी कसें व्हावे ?' 'सर्वोत्तमाचें ध्यान दुजेवीण' आहे असें सांगतात. जेव्हां ध्यान धरणारा ध्याता ध्येयांत नाहीसा होऊन, केवळ एक ध्येयच बाकी उरतें तेव्हां त्याचें ध्यान होते. म्हणजे मी, ध्यान धरणारा ध्येयांत केव्हा नाहींसा झालों याचें भानहि राहात नाहीं, तेव्हा हें ध्यान होतें. सारांश. ब्रह्म होऊनच ब्रह्म अनुभवाला येतें. **देहबुद्धीचें थोरपण। परब्रह्मी न चले जाण। तेथें होतसे**



**निर्वाण। अहंभावासी॥** (दा. ७-२-२३) त्या स्वरूपाच्या ठिकाणीं संग किंवा नि:संग हे दोन्हीहि सहन होत नाहींत. मी ध्यान धरणारा आहे किंवा मी ध्यान धरणारा नव्हे, या दोन्हीहि कल्पना संपून, कल्पनातीत असें जें न सांगता येण्याजोगें उरतें तें त्या सर्वोतमाचें ध्यान होय. **कल्पना जेथ सांडोनी जाये। तेथें सिद्धस्वरूपचि होये। तें हातीं देता नये। मौनेंचि उमजावें॥** (हंसराज) कोणत्याहि कल्पनेचा संग न राहतां, कल्पनातीत होऊन स्वस्थ होणारा हाच सर्वोत्तमाच्या ध्यानाचा अधिकारी होय. **सोडितां तया संगासी। ऐक्य होय नि:संगासी। कल्पनेविण प्रप्तीसी। अधिकार ऐसा॥** (दा. ७-२-२१)

★ ★ ★

**नव्हे जाणता नेणता देवराणा।**
**न ये वर्णितां वेदशास्त्रां पुराणां।**
**नव्हे दृश्य अदृश्य साक्षीं तयाचा।**
**श्रुतीं नेणती नेणती अंत त्याचा ॥१९३॥**

त्या सर्वोत्तमाचें रूप मनाला न कळणारें, अवर्णनीय व सदोदित संचलेलें असें आहे; त्याचें ध्यान द्वैतकल्पना सोडून त्याच्याशी एकरस झाल्यानेंच होतें, असें मागील श्लोकांत सांगितले. त्या परब्रह्माची आणखी कांही लक्षणें सांगून वेदशास्त्र पुराणेंहि त्याचें वर्णन करण्यास असमर्थ आहेत, असें या श्लोकांत सांगतात.

ब्रह्म इंद्रियांनी जाणतां येत नाहीं; परंतु तें मुळीच जाणता येत नाहीं असेहि नाहीं, असा श्री. देव यांनी प्रथम चरणाचा अर्थ दिला आहे. तर कोणी 'परब्रह्म जाणतां येते व जाणता येत नाहीं, असेंहि म्हणतां येत नाहीं'.असा अर्थ दिला आहे.

परंतु येथें मुमुक्षूस तें जाणतां येतें किंवा जाणतां येत नाही, हें सांगावयाचें नसून, त्याच्या ठिकाणी कोणतेंच द्वैत सहन होत नाहीं, तें 'एकमेवाद्वितीयम्' कसें आहे, हें त्याचें स्वरूप लक्षण सांगण्याचा विषय चालू आहे. मागच्या श्लोकांत तेथें संग किंवा नि:संग हे दोन्हीहि सहन होत नाहीत, हें जसें सांगितलें तसेंच या चरणांत जाणीव-नेणीव हें द्वैत परब्रह्मीं नाहीं, हे सांगावयाचें आहे असें वाटतें. येथें 'न ये जाणता नेणता' असें शब्द नसून 'नव्हे जाणतां-नेणतां' असे शब्द असल्यामुळे 'देवराणा जाणता नेणता नव्हे' असा सरळ अन्वयार्थ होतो. परब्रह्मी किंवा शुद्ध आत्मरूपी जाणीवहि नाहीं

आणि नेणीवहि नाहीं. **जाणणें म्हणिजे स्मरण। नेणणें म्हणणिजे विस्मरण।।**(दा. ९-४-४०) जाणीव म्हणजे जाणणें किंवा स्मरण आणि नेणीव म्हणजे न जाणणें किंवा विस्मरण. जाणीव ही वायुरूप चंचल असल्यामुळें वायुरूप, चंचल मायेंत ती आहे. पण निश्चल परब्रह्मी ती नाही. **जाणीव म्हणिजे जाणतें चळण। तेंचि वायोचें लक्षण।।** (दा. ९-६-१९) विस्मरण हें अज्ञान असल्यामुळें तें मायेंत आहे पण परब्रह्मीं नाही. जाणीव नेणीव, स्मरण-विस्मरण, प्रकाश-अंधकार इत्यादि द्वैत मायेंत आहे, पण हें द्वैत परब्रह्मीं नाहीं. जाणीव ही सत्वगुणी आहे. नेणीव ही तमोगुणी आहे व कांही जाणीव व कांही नेणीव हे मिश्रण रजोगुणात्मक आहे. हे त्रिगुण मायेंत आहेत पण निर्गुण परब्रह्माच्या ठिकाणीं तें कसे संभवणार ? **कांहींचं नेणिजे तें अज्ञान। सकळ जाणिजें तें ज्ञान। जाणीव राहातां विज्ञान। स्वयेंचि आत्मा।।** (दा. ९-७-५१) सारांश, चंचल व त्रिगुणात्मक मायेंत द्वैत असतें; परंतु निश्चल निर्गुण परब्रह्मात तें नसतें. म्हणून 'नव्हे जाणता नेणता देवराणा,' असें म्हटलें आहे. **जाणता नेणता प्राणी। जन्मतो मरतो सदा। जाणणें नेणणें नाहीं। ते ब्रह्म जाणते भले।।** (स्फु.)

तें ब्रह्म दृश्यहि नाहीं व अदृश्यहि नाहीं, किंवा दृश्यदृश्याचें तें साक्षीहि नाहीं. दृश्य-स्थूल आदृश्य-सूक्ष्म सृष्टींतील पदार्थाप्रमाणे तें स्थूल किंवा सूक्ष्म दोन्हीहि नाहीं. स्थूल सूक्ष्म पदार्थांत तें व्यापून आहे. भ्रमरूप दृश्याचा साक्षीहि भ्रमरूपच ठरले, म्हणून तें साक्षीहि नाहीं. **दृश्य ना भास साक्षी। ज्ञानाज्ञान असेचि ना। वृत्ती निवृत्तिही नाहीं। शब्द मौन घडेचि ना।।** अशा या विलक्षण मायेपरत्या वस्तूचें मायिक शब्दाने कसें वर्णन करणार ? म्हणून वेदशास्त्रपुराणदिकांना त्या अपार वस्तूचा अंत लागत नाहीं व तिचें वास्तव वर्णन करण्यास हीं सर्व असमर्थ ठरतात.

★ ★ ★

**वसे हृदयी देव तो कोण कैसा।**
**पुसे आदरें साधकू प्रश्न ऐसा।**
**देहे टाकितां देव कोठें रहातो।**
**परी मागुता ठाव कोठें पहातो ।।१९४।।**

ब्रह्मास्वरूपीं जाणीव नाहीं नेणीव नाहीं, तें दृश्य नाहीं अदृश्यहि नाहीं, तें एकमेवाद्वितीय, विलक्षण असें असल्यामुळे श्रुतिशास्त्रपुराणादिकांना त्याचें वर्णनहि करता येत नही, असें मागील श्लोकांत सांगितलें. मनुष्य ज्ञानी



असो किंवा बद्ध असो, त्याच्या हृदयांत वास्तव्य करणाऱ्या देवाचें स्वरूप काय ? देहपातानंतर तो कोठें राहतो ? देहाबरोबर पुन्हां कसा येतो ? इत्यादि साधकाला येणाऱ्या शंका प्रश्नरूपानें या श्लोकांत मांडतात.

साधकाची प्रामाणिक शंका अशी आहे की प्राणीमात्राच्या ठिकाणी देवाचें वास्तव्य आहे, असें तर थोर म्हणतात. तो देव अमर आहे. पण पहावें तर प्रत्येक प्राणीमात्राला जन्ममरण आहे. मग मरणानंतर देहामध्यें वास्तव्य करणारा देव कोठे जातो ? पुन्हा जन्म येईपर्यंत तो कोठे रहातो ? व पुन्हा जन्मल्याबरोबर तो कोठून येतो ? ज्ञानी जन्ममरणापासून सुटतो म्हणजे काय होतों ? या साधकाच्या सर्व शंकांचे समाधान एका वाक्यांत आहे. तें असें की देहांतरगमन हें देवाला कधीच नसतें. तो जशाचा तसा सदोदित संचलेलाच असतो, हें उत्तर पुढील १९५ श्लोकांत दिलें आहे. तेथें याचा विचार पाहू.

देहांतरगमन हें जर देहाला नसतें तर कोणाला असतें, कशामुळे होतें ? ही शंका पुन्हा राहतेच. ही शंका राहू नये व पुढील श्लोकांर्थ स्पष्ट व्हावा म्हणून वासनात्मक लिंगदेहामुळे देहांतरगमन कसें होतें याचा थोडक्यात विचार पाहूं.

जीव हा वासनेने बद्ध असल्यामुळे वासनाक्षय होईपर्यंत त्याचा पुनर्जन्म सुटत नाहीं. भोग्य भोगांचा क्षय झाल्यामुळे स्थूल देहाचें अत्यंत विस्मरण होऊन मरणानंतर तो भूमीवर पहतो. परंतु सूक्ष्म किंवा लिंग देह पंचप्राणाबरोबर स्थूल देहाबाहेर पडून वायुरूपांत राहतो. पंचज्ञानेंद्रिये, पंचकर्मेंद्रिये, पंचप्राण व मन असा सोळा कळांचा सूक्ष्मदेह स्थूल देह सोडून वायुरूपांत राहतो. इंद्रियें ही मनाच्या स्वाधीन असल्यामुळें वायुरूप मनाचें या देहांत प्राधान्य असतें. मनासच देहाभिमान व वासना असतात. सारांश. **पंचप्राण स्थळे सोडिती। प्राणरूप वासनावृत्ती वासनामिश्रीत प्राण जाती। देह सोडूनियां।।** (दा. ९-८-४) याप्रमाणे वासना वायुरूपांत राहते.

मन हें भोगवासना घट्ट धरून ठेवितें. अंतकालीं जी भोगवासना प्रबल होऊन राहते, तद्रूप मन होतें व ती वासना पूर्ण होण्याच्या दृष्टीने कर्मानुसार जो देह बरा वाटतो. त्या स्थूल देहांत तें प्रवेश करितें. **विषयवासनारूप मन। जिनकर्मतंत्रे जाण। देहांतरीं करी गमन। तेथ सप्राण संचरें।।** (ना. भा. २२-४३५) तात्पर्य, वासनांच्या, प्रवाहामुळेंच जन्म-मरण मागें लागतें.

वासनाच एक देह सोडून दुसरा धरिते. **वायोसरिसी वासना गेली।**

**ते वायुरूपेचि राहिली। पुन्हां जन्म घेऊनि आली। हेतुपरत्वें॥**(दा. ९-८-५) आत्मज्ञान झालें म्हणजे जीवाला आपल्या अखंड सच्चिदानंदस्वरूपाची, आपल्या पूर्णत्वाची जाणीव येते व नि:शेष वासनाक्षय होतो. भाजलेलें बीज ज्याप्रमाणे उगवत नाही त्याप्रमाणे ज्ञानानें भर्जित झालेला लिंगदेह पुन्हा जन्माला कारण होत नाही. म्हणून ज्ञानी जन्ममरणापासून सुटतो.

वासनापूर्तीसाठी देहधारण करणारें हे मन वास्तविक आत्मस्वरूपाहून अलिप्त व भिन्न आहे. पण असे असूनहि देहांतरगमन हें आपलें नसून आत्म्याचें आहे, असें भासविणें ही या मनाची अतर्क्य अशी करामत आहे. **आत्मा यासी अलिप्त भिन्न। परी देहासवें दावी मगन। हे अतिअतर्क्य विंदान। ऐक लक्षण तयाचें॥** (ना. भा. २२-४२५) म्हणूनच मनुष्य भ्रमानें आत्मा आला आणि गेला असें म्हणतो.

★ ★ ★

**वसे हृदयी देव तो जाण ऐसा।**
**नभाचें परी व्यापकू जाण तैसा।**
**सदा संचला येत ना जात कांहीं।**
**तयावीण कोठें रिता ठाव नाहीं॥१९५॥**

देव कोठें जात येत नाही, जाणें येणें हे वासनेला असतें हें स्पष्ट होण्यासाठीं स्थूल देह सुटला म्हणजे त्यांतून वासना बाहेर जाते, वायुरूपानें राहते व तीच जन्माला कारण होऊन पुन्हा देह धारण करते, असें मागील श्लोकांत सांगितलें. ज्याचें हृदयामध्ये वास्तव्य आहे असा देव तो कोण व कसा आहे ? या मागील श्लोकांत विचारलेल्या साधकाच्या प्रश्नास या श्लोकाच्या पूर्वार्धात उत्तर आहे आणि देहपातानंतर तो देव कोठे राहतो, पुन्हा देहधारण करतो काय ? या दुसऱ्या प्रश्नास या श्लोकाच्या उत्तरार्धात उत्तर आहे.

(१-२) वसे हृदयी –। नभाचे परी – ॥ – हृदयांत वास्तव्य करणारा देव कसा आहे हें ऐक, जाणून घे. तो देव मर्यादित नसून आकाशाप्रमाणे पिंडब्रह्मांडाला अंतर्बाह्य व्यापून असणारा असा व्यापक आहे. पृथ्वीच्या कणाकणालाहि रहावयास जागा लागते. म्हणून पृथ्वीच्या अंतर्बाह्य ज्याप्रमाणें हे आकाश व्यापून आहे., त्याप्रमाणें प्राणिमात्राला हा देव अंतर्बाह्य व्यापून आहे. येथून उठून दुसरीकडे बसलें किंवा पळत सुटलें तरी बसणें,



पळणें हे सर्व आकाशांतच असतें व तें सन्मुख असतेंच, तसेच या देवाचें स्वरूप व्यापक आहे. **पक्षी अंतराळीं गेलां । भोंवतें आकाशचि तयाला । तैसें ब्रह्म प्राणीयाला । व्यापून आहे ॥**(दा. २०-१०-९) हेंच व्यापक चैतन्य अति स्वच्छ व योग्य अशा अंत:करणांत भासमान होतें. यालाच अंतर्साक्षी असें म्हणतात. अंत:करणवृत्तींना हे चैतन्य प्रकाशित करतें व त्यामुळेंच प्राणिमात्राला इंद्रियद्वारा विषयाचें ग्रहण होतें. भगवान उद्धवाला म्हणतात- **मजवेगळा रिता कांही । अणुभरी ठाव उरला नाहीं । मी सर्वात्मा सर्व देहीं । सर्वगत पाहीं सर्वदा ॥** (ना. भा. १०-६९५) मठाच्या आकारांत सांपडलेल्या महदाकाशाला ज्याप्रमाणे मठाकाश असें म्हटले जाते, त्याप्रमाणें देहाच्या आकारांत सांपडलेल्या या विश्वव्यापक चैतन्यास देही असें नांव प्राप्त होतें. **एवंरूप पैं आत्मा । देहीं जे म्हणती प्रियोत्तमा । तें मठाकारें व्योमा । नांम जैसें ॥** (ज्ञा. १३-१११४) जसें मठाकाश तेंच महदाकाश असतें, तसें हृदयस्थ देव तेंच हे सर्वगत विश्वचैतन्य होय.

(३/४) सदासंचला... । तयावीण ... ॥ हे विश्वव्यापक चैतन्य म्हणजे ब्रह्म कल्पकालींहि नाहींसें न होणारें असें सदोदित व्यापून असल्यामुळे त्याच्या अस्तित्वावर अनेक देहांचे आकार निर्माण होतात व नाहींसे होतात. परंतु तें चैतन्य देहाकृति घेतही नाहीं व टाकीतहि नाहीं. तें जसेंच्या तसे देहांना अंतर्बाह्य व्यापून अलिप्त असतें. **तैसें तयाचिये अनुस्पूर्ती। होती जाती देहाकृती । तो घे ना सांडी सुमती। जैसा तैसा॥** (ज्ञा १३-१११५) मातीचें गाडगें इकडून तिकडे ठेविलें तरी त्याबरोबर आकाश हें असतेंच. त्यांत अमृत भरलें किंवा खत ठेविलें तरी त्यातील आकाश हें त्या दोन्ही पदार्थापासून अलिप्तच राहतें. तें मडकें फुटून चूर झालें तरी आकाशाला कांही तडा जात नाहीं. आकाश जशाचें तसे रहातें व नवीन घट निर्माण झाला कीं त्याला तें व्यापतें. तसेंच या हृदयस्थ आत्मदेवाचें आहे. शरीरें निर्माण झालीं, राहिली आणि गेली तरी त्या देवास जाणषें-येणे नाही. तो जशाचा तसा, अखंड अलिप्त असा सर्वांना व्यापून असतोच. **तेवीं देहाचें नश्वरपण। आत्मा अखंडत्वें परिपूर्ण। आत्म्यासी देहांतरगमन। जन्ममरण असेना॥** (ना. भा. २२-४३०)

★ ★ ★

**नभी वावरे जो अणूरेणू कांही।**
**रिता ठाव या राघवेवीण नाहीं।**
**तया पाहतां पाहतां तेंचि जालें।**
**तेथे लक्ष आलक्ष सर्वे बुडालें॥१९६॥**

ज्याचें हृदयांत वास्तव्य आहे तो देव आकाशाप्रमाणें व्यापक असून तो विश्वांत जशाचा तसा घनदाट भरून राहिलेला आहे. तो कोठें जात येत नाहीं, असें साधकाच्या प्रश्नास मागील श्लोकांत उत्तर दिलें. हृदयस्थ देव आकाशातील अणुरेणूमध्येहि भरलेला असून तोच राघव, होय आत्मा होय. या राघवाचा शोध घेत गेले की मनुष्य तद्रूप होऊन स्वत:ला विसरून जातो, असें या श्लोकांत सांगतात.

(१/२) नभी वावरें ...। रिता ठाव ....॥ आकाशांत सूक्ष्म असे अनेक जीव वावरत असतात. ते डोळ्यांना सहजासहजी दिसत नाहींत. पण घरात पडलेल्या उन्हाच्या कडोशांत त्यांची हालचाल दिसते. त्या सूक्ष्म जीवांतहि राम-आत्मा भरून राहिला आहे. त्याच्याशिवाय रिकामी अशी जागाच नाही.

(३/४) तया पाहतां....। तेथें लक्ष ...॥ अशा या राघवाचें दर्शन घेतां घेतां दर्शन घेणाराच तद्रूप होऊन जातो आणि त्या स्वरूपांतच सर्व दृश्यादृश्याचा लय होऊन जातो. दृश्य, द्रष्टा आणि दर्शन ही त्रिपुटी नाहींशी होते.

अलक्ष म्हणजे ज्यांत लक्ष मुरतें तें परब्रह्म लक्षावें. म्हणजे सूक्ष्म ज्ञानदृष्टीनें अनुभवून लक्ष मावळलें की तेंच असें लक्षावें, चर्मदृष्टीनें किंवा सूक्ष्म ज्ञानदृष्टीनें आत्माच पाहातो. म्हणून **डोळियाचा डोळा। पहा नारायण।**असे संत म्हणतात. असें पाहतां पाहतां मनोलय होऊन दृश्यादृश्य मावळतें. **जयावीण कोठें रिता ठाव नाहीं। तया शोधितां तोचि होऊनि राही। म्हणे दास विश्वास भावें धरावा। खरा देव तो आदरें वोळखावा॥** (क. अ.)

हा श्लोकार्थ झाला. परंतु या व पुढील कांही श्लोकावरून चिकित्सकाच्या मनांत एक स्वभाविक शंका उत्पन्न होण्याजोगी आहे किंवा एखाद्याच्या विचारांत गोंधळ उत्पन्न होण्याचा संभव आहे. मनोबोधाचा शेवटहि जवळ आल्यामुळें कोणतीहि शंका तशींच राहणें इष्ट नाहीं म्हणून त्या शंकेचे स्वरूप काय, तिचें समाधान कोणते हें पाहूं. श्लोक १८९ पासून मुख्य देव कोण, देवराणा कोणाला म्हणावें ? या विषयास सुरूवात होते. तो देव सृष्टिकर्ता पण सृष्टिपर्ता, परेहून पर, निर्गुण, निर्विकल्प, जाणीव-नेणीव रहित, हृदयस्थ, अणुरेणूंना व्यापून सदोदित असा आहे, अशी त्याची ओळख या श्लोकापर्यंत करून दिली आहे. हें सर्व वर्णन परब्रह्म किंवा निरूपाधिक, शुद्ध आत्मस्वरूपाचें आहे. १९१ श्लोकांत 'परब्रह्म ते मी पणें आकळेना' असें म्हटलेंहि आहे. असें असतांना या श्लोकापासून पुढील चार श्लोकात राघव,



रघुपति, राम ही सगुण ब्रह्मवाचक नांवे कशासाठी योजिलीं आहेत ? श्लोक २०० मध्ये तर सर्व ठिकाणी ब्रह्म पहा, असें न म्हणता 'तो गे तोचि तो राम सर्वत्र पाहे' असें म्हटलें आहे. सगुण हें नाशवंत असें सांगतात. अवतारी देव होऊन गेले म्हणून नश्वर होत, असें म्हणतात. **अथवा नाना अवतार।ऐकोनी धरिती निर्धार। परी ते अवघे सविस्तर। होऊन गेलें॥ येक ब्रह्माविष्णुमहेश। ऐकोन म्हणती हे विशेष। गुणातील जो जगदीश। जो पाहिला पाहिजे॥** (दा. १९-५-१९,२०) प्रकृतीमधील देव प्रकृतीसारखे होत, असेंहि बोलतात. असें जर आहे तर 'तया निर्गुणालागिं गूणीं पहावें' (श्लोक १८९) 'तया निर्विकल्पासि कल्पीत जावें' (श्लोक १९०) हें कशासाठीं ? सत्य सांडून नाशवंताच्या मागें कां लागावयाचें ? निर्गुण ज्ञानाने जर मोक्ष मिळतो तर निर्गुण ब्रह्मस्वरूपवर्णनांत नाशवंत सगुण कशाला ? **सगुण नासिवंत ऐसे सांगता। पुन्हा भजन करावें म्हणतां। तरी काशासाठी आतां। भजन करूं॥ स्वामीचे भिडेनें बोलवेना। येऱ्हवीं हें कांहीच मानेना॥** (दा. ६-७-७,८) अशी मनाची अवस्था होऊन या ठिकाणीं गोंधळ होण्याचा संभव आहे. म्हणून समर्थांच्या रामउपासनेचें रहस्य जाणून अधिकारानुरूप उपासना करीत तिचा शेवट गांठला पाहिजे. तो शेवट म्हणजे **उपासना सेवटीं। देवां भक्ता अखंड भेटी॥** (दा. १८-२-३०) हा होय.

समर्थांचा राम कळण्यासाठीं सगुण व निर्गुण या शब्दांच्या त्यांनीं केलेल्या व्याख्या पहाव्या. **चंचळपणें विकारलें। सगुण ऐसें बोलिलें। येरे तें निर्गुण उरलें। गुणातीत॥** (दा. १६-९-१३) निश्चळ, शुद्ध अशा परब्रह्मस्वरूपीं त्रिगुणात्मक मायेच्या उपाधीमुळें चंचलत्व भासू लागलें कीं त्यालाच सगुणत्व येतें. शुद्ध परब्रह्म गुणामुळें शबल भासते. शुद्ध ब्रह्माच्या ठिकाणीं जें प्रथम 'अहं ब्रह्मास्मि' असें स्फुरण झालें, म्हणजे चंचलत्व भासलें तीच माया, तोच अंतरात्मा, आत्माराम किंवा समर्थांचा राम होय. तोच ईश्वर तोच अवतारी देव, तो सर्वदेव व तोच जीवात्मा होय. **आत्मा अंतरात्मा विश्वात्मा। द्रष्टा साक्षी सर्वात्मा। क्षेत्रज्ञ शिवात्मा जीवात्मा। देही कूटस्थ बोलिजे॥** (दा. १०-१०-१८) सृष्टीतील जडचेतनात्मक सर्व तमाशा या अंतरात्म्याच्या सत्तेवर चालतो. **सकळ चाळिता येक। अंतरात्मा वर्तवी अनेक। मुंगीपासून ब्रह्मादिक। तेणेंचि चालती॥** (दा. १०-१०-३५)

सर्व सृष्टिखेळ जर या आत्मदेवाचाच तर अवतारधारकहि तोच, मग जो अवतार सर्वोत्तम गुणांनी मंडित आहे तोच आदर्श मानणें, त्याचे दैवी

गुण घेणें व त्यावर प्रेम करणें हें योग्यच ठरतें. शरीरधारी भक्ताला शरीरधारी अंतरात्म्याशिवाय भजनपूजन होत नाहीं व भजनपूजनाशिवाय भक्ताला समाधान नाहीं. **म्हणोनी देह्याविण अडतें। साकडेंचि पडतें। देह्याकरिता घडतें। भजन कांहीं॥** (दा. १९-५-१२) यासाठीं सगुण श्रीराममूर्तींची आवश्यकता आहे. तोच अंतरात्मा श्रीराममूर्तीतहि आहे व भक्तांतहि आहे. मूर्तीचा आकार व भक्ताचा देह हे वेगळे झाले कीं एक निरूपाधिक आत्माच राहतो. आत्मानात्मविवेकानें भक्ताची देहबुध्दि नाहींशी होऊन देहनिरास झाला कीं चंचल देवाचें अंतरात्मपण नाहींसें होतें व निरुपाधिक, निश्चल परब्रह्मच उरतें. तेंच आपलेंहि शाश्वत रूप होय. **देहमात्र निरसुनि गेला। तेथें अंतरात्मा कैसा उरला। निर्विकारीं विकारला। ठाव नाहीं॥** (दा. १०-१०-४८) सारांश, अंत:करणांत द्वैत-बुद्धि व देहस्मरण असतांना 'रघुपतिराघव राजाराम' म्हणून रामभजन करावें आणि देहनिरासाने देहभाव हरपला कीं निरूपाधिक श्रीरामाशीं अनन्य व्हावें. अवतारकार्योपाधिवेगळा श्रीराम म्हणजे ब्रह्मच होय. या दृष्टीनें परब्रह्मस्वरूपवर्णनांत राघव, रघुपति, राम हे शब्द श्लोकांमधून आले आहेत. **कर्तृत्व वेगळें करावें। मग त्या देवासी पाहावें। तरीच कांहींयेक पडे ठावें। गौप्यगुह्य॥** (दा. १९-५-२४)

★ ★ ★

**नभासारिखें रूप या राघवाचें।**
**मनीं चिंतितां मूळ तूटे भवाचें।**
**तया पाहतां देहबुद्धी उरेना।**
**सदा सर्वदा आर्त पोटीं पुरेना॥१९७॥**

या राघवानें अणुरेणूंनाहि व्यापिलें असून तो नाहीं असें रिकामें ठिकाणच नाहीं. त्या राघवाचें मूळ स्वरूप सांगून तो पाहूं गेल्यास दृश्यादृश्य सर्व मावळते, असें मागील श्लोकांत सांगितलें. अशा राघवाच्या चिंतनानें कोणतें फल प्राप्त होतें, हें या श्लोकांत सांगतात.

(१/२) नभासारिखें...। रघूनायका...॥ राघवस्वरूपाची शुध्द कल्पना यावी या दृष्टीने अगदी योग्य म्हणून आकाशाचा दृष्टांत देतात. 'खंब्रह्म' अशी श्रुतीहि आहे. आकाश हें व्यापक, निर्मळ व निश्चळ असल्यामुळें तें स्वरूपासारखें होय, असें म्हटलें जातें. परंतु निर्विकार, शुद्ध आत्मस्वरूप हें परब्रह्मच असल्यामुळें उपमेरहितच आहे. इतर कवी ज्याला आकाश म्हणतात



त्याला समर्थ अंतरात्मा म्हणतात. कारण सृष्टि उत्पत्तीपूर्वी जें प्रथम स्फुरण झालें तें वायु व जाणीवरूपाचें असल्यामुळें त्याला मुळांतच चंचलत्व आहे. आणि आकाश हें स्तब्ध आहे. **चंचळ तो अंतरात्मा। आकाश न चळे कदा।** म्हणून पंचमहाभूतांची उत्पत्ति सांगतांना आकाशापासून वायु झाला असें समर्थ म्हणतात. **आकाश म्हणिजे अंतरात्मा। प्रत्यये पाहावा महिमा। त्या आकाशापासून जन्मा। वायो आला॥** (दा. १२-६-१२) सारांश, आकाश हें व्यापक, निर्मळ व निश्चळ असल्यामुळें श्रीरामरूपाला त्याची उपमा जरी दिली असली तरी ती अपुरी व हिणसकच आहे. आकाश व श्रीरामरूप यांत जमीन-अस्मानाचें अंतर आहे. तें असे :- १ 'श्रीरामरूपांत (आत्मा) वर्ण नाहीं. आकाश हें श्यामवर्णांचे आहे. २ आकाश पोकळ, अवकाशरूप आहे; श्रीरामरूप सर्वत्र, सदोदित संचलें आहे, त्याच्याशिवाय रिकामें ठिकाण नाहीं. ३ आकाश हे तमोगुणापासून झाले असल्यामुळें त्यात कामक्रोधादि विकार आहेत, स्तब्धतेंमुळें त्याच्या ठिकाणीं जडत्व, शुन्यत्व आहे आणि शुन्यत्वामुळें अज्ञान आहे, याप्रमाणे आकाशाचा सप्तविध स्वभाव आहे असें शास्त्र सांगतें. **कामक्रोध शोक मोहो। भव अज्ञान सून्यत्व पाहो। ऐसा सप्तविध स्वभाव आकाशाचा॥** (दा. ८-५-४१) अशा या सप्तगुणांनीं युक्त पंचमहाभूतांतील एका भूताची उपमा निर्गुण व पुरातन रामरूपाला कशी शोभेल ? ४ आकाश हे दृश्य असल्यामुळें होते. **आकाश वेगळेपणें पाहावें। स्वरूपीं स्वरूपचि व्हावें। वस्तूचें पाहाणें स्वभावें। ऐसे असे॥** (दा. ८-५-६६)

★ ★ ★

**नभें व्यापिलें सर्व सृष्टीस आहे।**
**रघूनायका उपमा ते न साहे।**
**दुजेवीण जो तोचि तो हा स्वभावें।**
**तया व्यापकू व्यर्थ कैसें म्हणावें॥१९८॥**

वस्तुत: श्रीरामरूपावांचून दुसरें असें कांहींच नाहीं. तेंच एक अद्वयरूप सर्वत्र, सदोदित आहे. परंतु अज्ञानजन्य भ्रांतिमुळें सृष्टीचा दृश्य पसारा सत्य भासतो. म्हणून त्या गुणातीत स्वरूपावर सृष्टिकर्ता, भर्ता, भोक्ता इत्यादि गुणांचा आरोप केला जातो. जोपर्यंत दृश्य जग हें खरें भासतें, तोपर्यंत

ब्रह्मानें तें व्यापिलें आहे, असें म्हणावें लागतें. परंतु श्रोतेच नसेल तर वक्ता कोणाला म्हणणार ? तसें रामरूपावांचून दुसरें काहीं नाहींच, असें सत्यज्ञान झाल्यानंतर, जेथें व्यापावयास अन्य पदार्थच नाहीं तेथें त्या रूपाला व्यापक हा शब्द तरी कसा शिवणार? म्हणून त्या रूपाला आकाशाचा दृष्टांत देऊन व्यापक असें म्हणता येत नाहीं. **ब्रह्म व्यापक हें तो खरें। दृश्य आहे तों हें उत्तरें। व्यापेंविण कोण्याप्रकारें। व्यापक म्हणावें॥** (दा. २०-१०-२३)

★ ★ ★

**अती जीर्ण विस्तीर्ण तें रूप आहे।**
**तेथें तर्क संपर्क तोही न साहे।**
**अती गूढ ते दृश्य तत्काळ सोपें।**
**दुजेवीण जें खूण स्वामीप्रतापें॥१९९॥**

श्रीरामरूपास आकाशाची उपमाहि साजत नाहीं. कारण आकाश सर्व सृष्टीला व्यापितें, पण श्रीरामरूपावाचून अन्य कांहींच नसल्यामुळें व्याप्यांवाचून त्यास व्यापक म्हणतां येत नाहीं, असें मागील श्लोकांत सांगितलें. त्या राघवरूपाचें वर्णन याहि श्लोकांत चालू ठेवून त्या रूपाची 'एकमेवाद्वितीयम्' ही खूण सद्गुरूबोधानेंच कळते, असें या श्लोकांत सांगतात.

(१) अतीजीर्ण...। - असा जो रघुनायक त्याचें रूप जीर्ण म्हणजे जुनाट किंवा पुरातन आहे. जुनाट पुरुष असें त्याचें वर्णनहि समर्थांनी केलें आहे. सर्व सत्ताधारी, चालक, सुत्रधार, असा असूनहि ज्याचा एकांत मोडत नाहीं, असें जें ब्रह्म तोच जुनाट पुरूष होय. तें स्वरूप अति विस्तीर्ण म्हणजे फार मोठें, चहूंकडे पसरलेले, ज्याचा पार लागत नाही असें व सदोदित असलेले असें आहे. **सृष्टीपूर्वी सृष्टि चालतां। सृष्टि अवघी संहारतां। शाश्वत देव तत्त्वता। आदिअंतीं॥** (दा. ६-६-४८)

(२) तेथें तर्क... ।असें हें विलक्षण स्वरूप असल्यामुळें त्याच्यासंबंधीं किंचितहि तर्क करतां येत नाहीं. तर्क जेथें पोहोचूं शकत नाहीं, आपोआप मावळून जातो असें हें अतर्क्य स्वरूप आहे. **आहे तितुकें नाहींसें जालें। नाहीं नाहींपणें निमालें। आहे नाहीं जाऊनि उरलें। नसोन कांहीं॥** अशा या अनिर्वाच्य वस्तूपर्यंत तर्क पोचावा तरी कसा ?

(३/४) अती गूढ....। दुजेवीण....॥ - असें हें अतर्क्य व गूढ रूप असलें तरी अशा गुरुप्रतापानें त्याच्या अति सुलभपणें निश्चय होतो.



मुख्य परमात्मा अनुभवाला येऊन तेंच आपलें स्वरूप आहे, असें कळून येणें यालाच परमार्थ असें म्हणतात. तो वास्तविक सुगम आहे, परंतु त्यांतील वर्म माहीत नसल्यामुळें, अनेकांना तो सोपा असूनहि अवघड, दुर्गम वाटतो. तो सोपा होण्याचें वर्म सत्संगात आहे. **आहे तरी परम सुगम। परी जनासी जाला दुर्गम। कां जयाचें चुकलें वर्म। सत्समागमाकडे॥** (दा. १-९-२) या भावार्थानें 'अती गूढ तें दृश्य तत्काळ सोपें' असें श्लोकांत म्हटलें आहे. आपल्या बालकाचा स्वभाव जाणून माता ज्याप्रमाणे त्याची समजूत घालते, त्याप्रमाणें शिष्याचा अधिकार लक्षांत घेऊन योग्य त्या मार्गानें सद्गुरु त्याचें समाधान करतात. म्हणून गुह्य परमार्थ सुगम होतो. हें गुह्य स्वरूप पटण्यासाठीं त्याची कांहीं खूण सांगावी म्हटलें तर त्याच्यासारखा दुसरा पदार्थच नाहीं. एकमेव तेंच रामस्वरूप सर्वत्र आहे, हीच त्याची खूण असल्यामुळें सामर्थसंपन्न सद्गुरुशिवाय ती कोणालाहि पटवून देता येण्यासारखी नाही. **सांगता न ये तें सांगणे। गोडी कळावया गूळ देणें। ऐसें हें सद्गुरुविणें। होणार नाहीं॥** (दा. ६-१०-१०)

★ ★ ★

**कळे आकळे रूप तें ज्ञान होतां।**
**तेथें आटली सर्वसाक्षी अवस्था।**
**मना उन्मनी शब्द कुंठीत राहे।**
**तो गे तोचि तो राम सर्वत्र पाहे॥२००॥**

श्रीरामरूप हे पुरातन, अतर्क्य व अति गूढ असलें तरी सद्गुरूसामर्थ्यानें तें तत्काळ सुगम होतें, असें मागील श्लोकांत सांगितलें. सद्गुरुकडून प्राप्त झालेल्या ज्ञानामुळें त्या शुद्ध स्वरूपांचे आकलन होऊन अवस्थातीत अशी स्वरूपस्थिति कशी प्राप्त होते व सर्वत्र रामदर्शन कसें घडतें तें या श्लोकांत सांगतात.

(१) कळे आकळे...। - जें सांगता येत नाहीं तें सांगण्याचें सद्गुरूच्या ठिकाणीं सामर्थ्य असल्यामुळें त्यांच्या कृपेनें त्या रामस्वरूपाचें ज्ञान होऊन तें प्रत्ययास येतें. हा अनुभव अवस्थातीत असा असल्यामुळें तो सांगतां येत नाहीं, त्या स्थितींचें वर्णन करितांच येत नाहीं.

(२) तेथें आटली...॥ - मनुष्याला जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तीन अवस्थांचा अनुभव असतो. परंतु या तीन अवस्थावेगळी एक चौथी

अवस्था आहे. तिची जाणीव मनुष्याला नसते. या अवस्थेला तूर्या किंवा सर्वसाक्षी अवस्था असे म्हणतात. ही अवस्था सर्व जाणीवस्वरूप किंवा ज्ञानस्वरूप आहे. या अवस्थेलाच महाकारण देह म्हणतात. ही शुद्ध सत्वगुणरूप अवस्था आहे. **जाणे ब्रह्म जाणे माया। ते येक जाणावी तूर्या। सर्व जाणे म्हणोनिया। सर्वकसाक्षिणी।।** (दा. ७-५-५) जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तीन अवस्था बुद्धीच्या आहे. या तीन अवस्था ज्याच्या योगानें जाणल्या जातात, तो या तीन अवस्थांचा साक्षी या अवस्थाहून अगदीं निराळा आहे, त्याला तुरीय म्हणतात. हें साक्षीचैतन्य शुद्ध ज्ञानस्वरूप, सच्चिदानंदरूप आहे,

या शुद्ध चैतन्याला तुरीय व साक्षी हीं जीं विशेषणें लागतात तीं तीन अवस्थाच्या अपेक्षेनें आहेत. वास्तविक तीं खरीं नाहींत. हें समजण्यासाठीं एक सुंदर गुजराथी दोहा आहे. त्यांत शिष्य आपला स्वरूपानुभव सांगतो, तो असा, **तुर्या साक्षी तो कोय कहे, साक्ष्य पदारथ होय।। उपाधिरहित स्वरूप हूं, नही साक्ष्य साक्षी दोय।।** जर साक्ष्य म्हणजे जाणले जाणारे पदार्थ यांना सत्यत्व असेल तर आत्म्याला साक्षी, तुरीय इत्यादि विशेषणें लागूं शकतील. पुतण्या असेल तर काका, भाचा असेल तर मामा, प्रतिबिंब असेल तर बिंब असें म्हणणें योग्य ठरतें, पण पुतण्या भाचा नसेल, पाणी किंवा आरसा नसेल तर काका, मामा, बिंब इत्यादि नांवें कल्पित व फोल ठरून मूळ पुरूष तेवढा खरा राहतो. असेंच येथें आहे. जागृतादि अवस्था व स्थूल पदार्थ हीं पारमार्थिकदृष्या जर सत्य नाहींत. तर आत्म्याला साक्षी, तुरीय असें कसें म्हणतां येईल ? म्हणून स्वरूपस्थितींत साक्षित्वहि उरत नाहीं, आटून जातें, असें म्हटलें आहे. सर्वच नाहीं तर साक्षित्व कशाचें ? **जंव खरेंपण मायेसी। तंवचि साक्षत्व ब्रह्मासी। माया अविद्येचे निरासीं। द्वैत कैचें।।** (दा. ७-५-१०)

(३) मना उन्मनी...।- संकल्पविकल्पात्मक, द्वैत सृष्टीचा खेळ खेळणारें मन उन्मन म्हणजे आत्माकार झाल्यावर (श्लो. १३० पहा) साक्षित्व कशाचें ? **म्हणोनि सर्वसाक्षी मन। तेंचि जालिया उन्मन। मग तूर्यारूप ज्ञान। तें मावळोन गेलें।।** (दा. ७-५-११)

(४) तो गे तोचि...।- सारांश, ज्या स्वरूपीं वृत्तिशुन्यत्वामुळें साक्षित्व संपतें, मन उन्मन होतें व शब्द कुंठित होतो तें शुद्ध, स्वसंवेद्य हेंच रामरूप होय. हे मना, हेंच रामरूप सर्वत्र पहा. या स्वरूपाचा अनुभव घेणें म्हणजे आपणच आपणास, अद्वैत भावनेनें पाहणें होय. **आपणचि आपणयातें। पाहिजे जें अद्वैतें। तें ऐसें होय निरूतें। बोलिजतु असे।।** (ज्ञा. १५-२७४)



साधकाच्या दृष्टीनें हा श्लोक उपसंहारात्मक वाटतो. २०१ श्लोकांतील स्वरूपस्थिति ही सिद्ध कोटींतील आहे. ही सिद्धकोटि प्राप्त होण्यासाठीं, म्हणजे झालेला साक्षात्कार दृढ होण्यासाठीं, झालेलें आत्मज्ञान दृढ होण्यासाठीं २०२, २०३ व २०४ हे श्लोक साधन सुचविणारे असून, २०५ व्या श्लोकांत फलश्रुति आहे.

राघव पंथ म्हणजे ब्रह्मविद्येचा अनादि पंथ व तो जाणण्यासाठीं प्रथम श्लोकांत गणेशस्तवन झाल्यानंतर लगेच दुसऱ्या श्लोकांत समर्थांनीं **मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें** अशी भक्तिसाधनाची वाट दाखविली व मनाला, याच वाटेला लाग, असें सांगून रामोपासना सांगितली. ही भक्ति उत्कट व्हावी यासाठीं तिला पोषक असे अनेक विषय जरी मध्यंतरी येऊन गेले तरी भक्तीचे अखंड सुत्र मधून मधून डोकावतेंच. भक्तीच्या वाटेला लागलेलें मन वाटचाल करीत करीत शेवटीं या श्लोकांत ब्रह्मस्वरूपीं, श्रीरामरूपांत विरून गेलें, अद्वैत भक्तींत सुखावलें.

कोणी म्हणेल कीं जेथें देव व भक्त असें व्दैतच नाहीं, अशा अद्वय स्थितींत भक्ति कशी संभवते ? याचें उत्तर असें आहे कीं, आत्मप्रेम हें स्वाभाविक आहेच, परंतु त्या प्रेमाची जाणीव नसल्यामुळें, ती उत्पन्न होण्यासाठी प्रथम द्वैत स्वीकारावें लागतें. वास्तविक विभक्त नव्हे तोच भक्त होय. **भक्त म्हणिजे विभक्त नव्हे। आणी विभक्त म्हणिजे भक्त नव्हे। विचारेंविण कांहींच नव्हे। समाधान।।** (दा. ४-९-६) ज्ञानोबा म्हणतात कीं अद्वैतांत भक्ति आहे **तैसी क्रिया कीर न साहे। तऱ्हीं अद्वैतीं भक्ति आहे। हें अनुभवाचिजोगें नव्हे। बोलाऐसें।।** (ज्ञा. १८-११५१)

दासबोधांत समर्थांनीं ''येथें बोलिला भक्तिमार्ग'' आणि ''बहुधा अध्यात्मनिरूपण निरोपिलें'' असें ज्याप्रमाणें म्हटलें आहे त्याचप्रमाणें या श्लोकांचेंहि स्वरूप आहे. दोनशे समासांचा जसा ओवीबद्ध दासबोध तसाच दोनशें श्लोकांचा श्लोकबद्ध हा मनोबोध होय.

★ ★ ★

**कदा वोळखीमाजि दूजें दिसेना।**
**मनीं मानसीं द्वैत काहीं वसेना।**
**बहुतां दिसा आपुली भेटि जाली।**
**विदेहीपणें सर्व काया निवाली।।२०१।।**

सद्‌गुरुपासून मिळालेल्या ज्ञानामुळें अवस्थातीत असें रामरूप अनुभवाला येतें. त्याचा निश्चय करून तेंच सर्वत्र पहा, असें मागील श्लोकांत मनाला सांगितलें. आत्मसाक्षात्कार झाला तरी ती अवस्था अपुरीच आहे. झालेला साक्षात्कार अंगवळणीं पडून त्या आत्मस्वरूपाचें अखंडत्व व व्यापकत्व अनुभवाला आलें म्हणजे पूर्णत्व येऊन सिद्धावस्था प्राप्त होते. या सिद्धावस्थेचें वर्णन या श्लोकांत केलें असून जन्माचें सार्थक झाल्याचें समाधान व्यक्त केलें आहे.

(१/२) कदा वोळखी...। मनीं मानसी...। - रामरूपाचा साक्षात्कार झाला असतांहि तेंच रूप सर्वत्र पहा, असें मनाला मागील श्लोकांत सांगितलें आहे याचा प्रथम विचार केला म्हणजे या श्लोकांतील भावार्थ अधिक स्पष्ट होईल.

'सत्य ब्रह्माचा संकल्प' व 'मिथ्या मायेचा विकल्प' हा सर्व द्वैताचा व्यापार मनाचा आहे. तें मन उन्मन होऊन साक्षित्व संपलें कीं आत्मसाक्षात्कर होतो. म्हणजे आपण हा संशय फिटून, आपण आत्मस्वरूपच आहों हें प्रत्ययास येतें. त्यामुळें मायेच्या दोन शक्तीपैकीं आवरणशक्ति (स्वरूपाचें अज्ञान) ही दूर होते. परंतु उन्मन झालेलें मन पूर्वस्थितीला येऊन दृश्य सृष्टीकडे पाहूं लागले कीं साक्षीरहित अवस्थेच्या अभ्यासामुळें मायेची आवरणशक्ति जरी दूर झाली तरी दुसरी, विक्षेपक्ति नष्ट झालेली नसतें. ती नष्ट करण्यासाठीं साक्षीरहित अशा एकांतात अनुभवाला आलेलें आत्मारामरूप दृश्य सृष्टींत पहाण्याचा अभ्यास करावा लागतो. तात्पर्य 'अहं ब्रह्मास्मि' हा अनुभव जसा व्यतिरेक अभ्यासानें घ्यावा लागतो. तसाच 'सर्वं खल्विदं ब्रह्म' हा अनुभव अन्वय अभ्यासानें घ्यावा लागतो. (श्लो. १७२ पहा) या अभ्यासानीं पूर्णत्व प्राप्त झालें म्हणजे अन्वय व्यतिरेकबोध हा पूर्वपक्षहि मावळतो आणि सिद्धांतरूप एक निःसीम ब्रह्मस्थितीच राहते. **अन्वये आणि व्यतिरेक। हा पूर्वपक्षाचा विवेक। सिद्धांत म्हणिजे शुद्ध एक। दुसरें नाहीं॥** (दा. २०-३-२१) ही सिद्धस्थिति प्राप्त होण्यासाठीं साक्षित्वरहित अवस्थेंत अनुभवलेलें रामरूप सर्वत्र पहा असें मागील श्लोकांत सांगितलें आहे. अशी सिद्धस्थिति प्राप्त झाली म्हणजे चर्मचक्षूंना दृश्य सृष्टींत रामरूपावाचून अन्य कांहीं दिसत नाहीं व बुद्धींतहि द्वैतभाव रहात नाहीं. कारण आत्मज्ञानानें अज्ञानभ्रांति दूर झालेमुळें अंतर्बाह्य दृष्टी शुद्ध झालेली असते. मृगजळ



डोळ्यांना जलरूपानें भासत असलें तरी ज्ञानामुळें बुद्धि त्याचें सत्यत्वानें ग्रहण करीत नाहीं व डोळ्यांचेहि लक्ष सूर्यकिरणाकडेच जातें. तसेंच सृष्टि द्वैतरूपानें भासली तरी बुद्धि तिचें सत्यस्वरूपानें ग्रहण करीत नाहीं; डोळ्यांवाटे तिला सर्वत्र सर्वकाळीं एक मूळ आत्मारामरूपच दिसतें. ''तुका म्हणे केली वोळखण'' या तुकोबांच्या उक्तीप्रमाणे ज्ञानदृष्टीला रामरूपाची ओळख झाली कीं सर्व कांहीं, सर्वत्र, सकळ इंद्रियांना तेंच एक पहावयाचें वळण लागतें व द्वैतभाव समूळ नाहींसा होतो. **पडिलें वळण इंद्रियां सकळां। भाव तो निराळा नाहीं दूजा॥ पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनी...** असें एकविध म्हणजे एकनिष्ठ मन होतें. या भावार्थानें पूर्वार्धांत 'दूजें दिसेना' व 'द्वैत कांहीं वसेना' असें म्हटलें आहे.

(३-४) बहूतां दिसां... । विदेहीपणे ...॥ - हे प्रभो, अनेक जन्मांनी कां होईना, आपली भेट झाली, असें वाटून मन गहिवरतें. वास्तविक हा आत्माराम सतत, सर्व जन्मांत आपल्या अगदीं जवळ, बरोबर असतो. परंतु असा जवळ असूनहि देहबुद्धीमुळें त्याची ओळख पटली नव्हती. परंतु आज बहुत दिवसांनी म्हणजे अनेक जन्मानंतर समर्थ सद्‌गुरुकृपेनें या मुख्य देवाची भेट झाली व त्यामुळें आपलें देहावेगळें तेंच शाश्वत स्वरूप आहे, हें कळलें. त्यामुळें मनाला समाधान वाटून तें प्रसन्न झालें व जन्माचें सार्थक झाल्याबद्दल त्याला धन्यता वाटली.

**वोळखतां ज्ञान वोळखी मोडली। भेटी हे जोडली आपणासी॥ आपणासी भेटी जाली बहु दिसां। तुटला वळसा मीपणाचा॥ मीपणाचा भाव भावें केला वाव। दास म्हणे देव प्रगटला॥** (स्फु. श्लो.)

★ ★ ★

**मना गूज रे तुज हें प्राप्त जालें।**
**परी अंतरी पाहिजे येत्न केले।**
**सदा श्रवणें पाविजे निश्चयासी।**
**धरी सज्जनसंगती धन्य होसी॥२०२॥**

श्रीरामरूपावाचून कोठेंहि अन्य असें कांहिंच दिसेना. त्यामुळें मनांतील द्वैतभाव नाहींसा होऊन आपलेंहि देहावेगळें तेंच एक शाश्वत रूप आहे. असें कळून जन्माचें सार्थक झाल्याचें समाधान प्राप्त झालें. ही मनाची प्रसन्नता प्रभुचरणीं मागील श्लोकांत विदित केली. आत्मज्ञान झाल्यामुळें अशी

सिद्धावस्था प्राप्त होऊन धन्यता वाटली तरीहि ती सहजस्थिति होईपर्यंत साधनांत असावें, साधन सोडूं नये, असें या व पुढील दोन श्लोकांत मनाला बजावतात.

(१-२) मना गूज...। परी अंतरीं...॥ - हे मना, हे अति गुप्त असें आत्मज्ञान व त्या ज्ञानाचा अनुभव म्हणजे विज्ञान हीं दोन्हीहि जरी तुला प्राप्त झालीं तरी तुला सहजसिद्धस्थिति प्राप्त होण्यासाठीं अजून निष्ठेनें प्रयत्न केलेच पाहिजेत. ज्ञान झालें व अनुभवहि आला, आतां कशाला दगदग करा, असें म्हणून चालणार नाहीं. मुमुक्षावस्थेंतून साधकावस्था व साधकावस्थेंतून सिद्धावस्था हीं प्राप्त होण्यासाठी जसे साधनाचे श्रम घ्यावे लागतात तसें सिद्धावस्थेची सहजसिद्धावस्था होण्यासाठी साधन सोडतां कामा नये. **सेविलेंच सेवावें अन्न। घेतलेंचि घ्यावें जीवन। तैसें श्रवण मनन। केलेंचि करावें॥** (दा. ७-८-४७) आत्मानुभव आला तरी तो अंगवळणी पडून मुरावा लागतो. राजेपण प्राप्त झालें तरी आपण राजा आहों हे विसरलें जाऊन राजभोग भोगण्यात सहजावस्था आहे. आलेला आत्मानुभवहि ब्रह्मस्वरूपात विरून जावा लागतो. **जेथें अज्ञान सरे। ज्ञान तेंही नुरे। विज्ञानवृत्ति मुरे। परब्रह्मीं॥ ऐसें ब्रह्म शाश्वत॥** (दा. ७-४-५१, ५२) अशी शाश्वत स्वरूपस्थिति बाणली पाहिजे. म्हणून हे मना, तुला अजूनहि यत्न केला पाहिजे. सिद्धदशा प्राप्त होण्यासाठीं ज्या दोन महत्त्वाच्या साधनांचा तूं आश्रय केला होतास तीं तशींच जर तूं चालूं ठेवशील तर तुला धन्यत्व प्राप्त होईल. ती दोन साधनें म्हणजे श्रवण व सत्संग हीं होत.

(३-४) सदा श्रवणें...। धरी सज्जन...॥ - श्रवणानें स्वरूपनिश्चय दृढ होतो व सज्जनसंगतींत श्रवण घडतें. समर्थ म्हणतात कीं कल्पनातींत अशा आत्मस्वरूपाचा निश्चय जर ढळूं द्यावयाचा नसेल तर द्वैतकल्पना उठतांच उपयोग नाही. सूर्य अस्तमान झाला कीं मागोमाग जसा अंधार येतोच तसेंच स्वरूपनिश्चय ढिला पडला कीं अज्ञान उसळी मारतेंच हें न होण्यासाठीं श्रवण हाच एक उपाय आहे. **तैसें ज्ञान होतां मळिण। अज्ञान प्रबळे जाण। याकारणे श्रवण। अखंड असावें॥** (दा. ७-५-४२) श्रवणमननादि साधनाबद्दल श्लोक ४३ मध्यें विवेचन झालें आहे. येथें इतकेंच सांगितलें म्हणजे पुरे कीं सिद्धदशा जरी प्राप्त झाली तरी श्रवणमननादि साधनांची आवश्यकता आहे. **मुमुक्षु साधक अथवा सिद्ध। श्रवणेंविण तो अबद्ध। श्रवणमननें शुद्ध चित्तवृत्ति होये॥** (दा. ७-८-४३)



वेदांतविषयाचें श्रवण सत्संगावाचून घडत नाहीं म्हणून सतत श्रवणार्थ सतत सत्संग पाहिजे. सत्संग असेल तर श्रवण घडणारें असल्यामुळें सत्संग पाहिजे. सत्संग असेल तर श्रवण घडणारें असल्यामुळें सत्संग हा परमार्थाचा पाया आहे. आत्मानुभव जरी आला तरी जोपर्यंत देह प्रपंचांत वावरत असतो तोपर्यंत 'अहं' खवळून विपरीत बुद्धि केव्हां होईल हें सांगतां येत नाही. म्हणून सतत सत्संग असावा. शिवाय आत्मस्थिति प्राप्त होण्यासाठी ज्यांचें साह्य झालें अशा वेदांतशास्त्र, गुरु व ईश्वर या तिघांबद्दल केव्हांच अनादर होता उपयोगीं नाहीं. त्याची उपेक्षा झाल्यास तो कृतघ्नपणा ठरतो. **यावदायुस्त्रयो वंद्या वेदान्तो गुरुरीश्वरः। आदौ ज्ञानप्रसिव्यर्थं कृतघ्नत्वापनुत्तये॥** मरेपर्यंत खाणें, पिणें, वावरणें इत्यादि देहाच्या क्रिया जर चालूच राहतात तर त्या देहाच्या मागें साधन लागलें म्हणून बिघडलें कोठे ? सारांश, श्रवण, मनन निदिध्यासादि अभ्यास व सत्संग या दोन साधनांत देह पडेपपर्यंत मनुष्यानें काल कंठावा.

★ ★ ★

**पडेपर्यंत मनुष्यानें काल कंठावा.**

**मना सर्वही संग सोडूनि द्यावा।**
**अती आदरें सज्जनाचा धरावा।**
**जयाचेनि संगें महादुःख भंगे।**
**जनीं साधनेवीण सन्मार्ग लागे॥२०३॥**

आत्मज्ञान प्राप्त होऊन त्याचा अनुभव जरी आला तरी तें ज्ञान दृढ होण्यासाठीं व अनुभव मुरण्यासाठीं श्रवण व सत्संग करीत रहा, स्वस्थ राहूं नकोस, असें मागील श्लोकांत मनाला सांगितलें. सर्व संगाचा त्याग कर परंतु सत्संगामुळें साधनाशिवायहि संसारदुःख नाहींसें होऊन सन्मार्ग लागत असल्यामुळें त्याबद्दल कधींच अनादर करू नकोस, असे या श्लोकांत मनाला सांगतात.

(१/२) मना सर्वही... । अती आदरें..॥ - हे मना, सर्वसंगपरित्याग कर. परंतु सज्जनसंगतीबद्दल कधींच अनादर उत्पन्न होऊं देऊ नकोस. सर्व संग म्हणजे प्रपंच व देह यांचा संग सोड, असें मनाला सांगितलें आहे. (१६५ श्लोकांत प्रपंच या शब्दाची व्याख्या पहा.) ध्यान किंवा समाधिकालीं देह व विषय यांचा विसर पडल्यामुळें त्या दोहोंचा संग सुटेल परंतु इतर वेळीं या दोहोंचाहि संग मरेपर्यंत राहणारच. म्हणून त्यांचा संग सोडून द्यावा, म्हणजे प्रपंच व देह यांच्या संबंधी आसक्ति सोडून उदासीन

वृत्ती ठेवावी. परंतु सज्जनसंगतीची मात्र उपेक्षा करूं नये; तिची आसक्ति असावी.

३) जयाचेनि संगें .. । - याचें कारण असे कीं या सज्जनांचा महिमा फारच मोठा आहे. त्याचें वर्णनहि करता येणार नाहीं. त्यांच्या संगतीमुळें जन्ममरणरूप संसारासारखें महादु:ख नाहीसें होतें. त्रैलोक्यांत न होणारें मुक्तिदान हें केवळ त्यांच्यकडून होते. **जें त्रैलोकीं नाहीं दान। तेंचि करिती संतसज्जन। तयां संतांचे महिमान। काय म्हणौनि वर्णावें॥** (दा. १-५-२४) केवळ मनुष्यच नव्हे तर कोणताहि जीव त्यांच्या सहवासांत आल्यांस त्याचा उद्धार होतो; पक्षी, हत्ती, दानव, स्त्रिया, पापी, धर्मव्याध इत्यादि सत्संगामुळेंच उद्धरून गेले. **प्रतिकूल कोणा न होती। म्हणोनि सर्वांचे सुहृदयस्थ होती॥ उपकार नापेक्षूनि उपकार करिती। सोडविती भवबंध॥** (रं. यो. पा. १-५२२)

(४) जनीं साधने ...। - ज्याप्रमाणें कोणत्याहि जीवाचा सत्संगतीनें उद्धार होतो त्याप्रमाणे कोणतेंहि साधन न करतां सत्संगानें मुक्तावस्था प्राप्त होते. योग, याग व्रत, दान, वेदाध्ययन, तप, तीर्थ, ज्ञान, ध्यान, आदरपूर्वक संन्यासग्रहण इत्यादि नाना साधनें निर्बंध पाळून निष्ठेनें जीवभावानें जरी केलीं तरी जी भगवत्प्राप्ति होत नाही, ती माझी प्राप्ती केवळ सत्संगानें होते, असें स्वत: भगवंतच उद्धवाला सांगतात. **यापरी शिणतां साधनेंसीं। माझी प्राप्ती नव्हे अतिप्रयासी। ते गोपी पावल्या अप्रयासीं। सत्संगासी लाहोनी॥** (ना. भा. १२-१२१) कोणत्याहि साधनाचे कष्ट न घेतां केवळ सत्संगानें जीवाचा उद्धार कशामुळें होतो ? याचें कारण सज्जनांच्या वाणीत असलेलें सामर्थ्य होय. अधिकारानुसार मुमुक्षूच्या मनांत ठसावेत असेच त्यांचे सहज बोल असतात. त्यांच्या श्रवणानें सन्मार्ग लागून आत्महित साधतें. **संतांचे जें सहज बोलणें। तें महावाक्यासी करी ठेंगणे॥** (यो. वा. १-५७६) कोणत्याहि साधनानें दूर न होणारें असें जें अज्ञान तें सज्जनशब्दश्रवणानें दूर होतें. म्हणून हे मना, **आलया रे संग साधूचा करावा। संसार तरावा साधुसंगें॥** सत्संग धर, तरच तूं धन्य होशील.

★ ★ ★

**मना संग हा सर्व संगास तोडी।**
**मना संग हा मोक्ष तात्काळ जोडी।**
**मना संग हा साधकां सीघ्र सोडी।**
**मनां संग हा द्वैत नि:शेष मोडी॥२०४॥**



प्रपंच व देह यांचीहि उपेक्षा करून अती आदरानें सज्जनसंगति करावी; त्यामुळें संसारासारखें महादु:ख नष्ट होतें व साधनाशिवाय सन्मार्ग लागतो, असे मागील श्लोकांत मनाला सांगितलें. सत्संगामुळे साधकाच सर्वसंगपरित्याग होऊन त्याचें कोणतें हित साधतें, तो या श्लोकांत सांगतात.

(१) मना संग हा सर्व...। - देहप्रपंचाकडे बळानें दुर्लक्ष करून सज्जनसंगति कर असें जें मागील श्लोकांत मनाला सांगितलें तो बोध मुमुक्षु अवस्थेंत असलेल्या मनाला आहे. सज्जनसंगत लाभून मुमुक्षूला साधकावस्था प्राप्त झाली म्हणजे कशाचाहि संग बळानें म्हणजे स्वप्रयत्नानें सोडावा लागत नाहीं. सहजासहजीं सर्वसंगपरित्याग होतो. म्हणून 'मना संग हा सर्व संगास तोडी' असें प्रथम चरणांत म्हटलें असून तिसऱ्या चरणात 'साधक' हा शब्द वापरला आहे. **जो संतांसी शरण गेला। संतजनीं आश्वासिला। मग तो साधक बोलिला। ग्रंथांतरीं॥** (दा. ५-९-३) म्हणून सत्संगाने साधकाला प्राप्त होणारे लाभ या श्लोकांत मनाला सांगितले आहेत. सज्जनांच्या ठिकाणी चातुर्य असतें, **जीव येकदेसी बापुडें। तयांस ब्रह्म चि करी रोकडें। फेडी संसारसांकडें। वचनमात्रें॥** (दा. ५-२-१६)

(२) ... मोक्ष तत्काळ जोडी॥ - जो धनिक व दाता असतो तोच दुसऱ्याचें दारिद्र्य दूर करूं शकतो. सज्जन हे मोक्षरूपी संपत्तीनें स्वतः श्रीमंत व उदार असतात. त्यामुळें दरिद्री जीवाला ब्रह्मज्ञानद्वारा मोक्षदान देऊन स्वानंदसाम्राज्यावर बसवितात. **मोक्षश्रिया आळंकृत। ऐसे संत श्रीमंत। जीव दारिद्री असंख्यात। नृपती केले॥** (दा. १-६-२१) म्हणून त्यांच्या संगतीनें साधकाला मुक्तावस्था सहज प्राप्त होते.

(३/४) ... सीघ्र सोडी। द्वैत मोडी। - सज्जनसंगतींत होणाऱ्या श्रवणामुळें साधक संसारबंधापासून सुटून कशा पद्धतीनें मुक्त होतो हें एका छोट्याशा संस्कृत सूत्रांत सांगितलें आहे; तें असें, **सत्संगत्वात् निर्मोहत्वं निर्मोहत्वात् निश्चलचित्तं, निश्चलचित्ते जीवनमुक्तिः** सज्जनसंगतींत श्रवणामुळें देहप्रपंचादिकाविषयीं अंतःकरणांत स्वाभाविक असलेला मोह प्रथम नष्ट होतो. जसजसा मोह नष्ट होत जाईल तसतसें चित्त वैराग्यसंपन्न होऊं लागतें. पूर्ण विरक्त झालेलें चित्त शेवटीं राघवरूपांत म्हणजे शुद्ध आत्मस्वरूपांत स्थिर होतें. **संतसंगें जन्म चुकती यातना। आणि जनार्दना भेटी होय॥** राघवाची भेट झाली

कीं आपलें व राघवरूप एकच होय, असा साधकाला प्रत्यय येऊन त्याचा द्वैतभाव नाहींसा होतो व सर्वत्र एक राघवरूपच संचलें आहे, या अद्वयबोधांत तो राहतो. **भेटी होय संतसंगें राघवाची। आणिक भावाची शांति होय॥** आत्मस्वरूपीं स्थिर झालेल्या चित्तानें जगांत वावरलें तरी सर्व वासनांचा क्षय झाला असल्यामुळें जगांत असून जगापासून अलिप्त अशा जीवन्मुक्त स्थितींत तो राहतो. या श्लोकानें मनोबोध संपला, पहिल्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें या अनंत राघवपंथाला लागलेला, स्वस्वरूपापासून भ्रष्ट झालेला जीव सज्जनांच्या सोबतीनें शेवटीं राघवरूपांत म्हणजे स्वस्वरूपांत विसरून जातो व दुःखाची आत्यंतिक निवृत्ति होऊन त्याला चिरंतन सुख प्राप्त होतें. कर्तव्य व प्राप्तव्य पूर्ण झाल्यानंतर सांगण्यासारखें कांहीं उरतच नाहीं.

★ ★ ★

**मनाचीं शतें ऐकतां दोष जाती ।**
**मतीमंद ते साधना योग्य हाती ।**
**चढे ज्ञानवैराग्यसामर्थ्य अंगीं ।**
**म्हणे दास विश्वासतां मुक्ति भोगी ॥२०५॥**

मागील श्लोकानें मनोबोध संपला. या श्लोकांचें श्रवण झाल्यास कोणतें फल प्राप्त होतें, हें या शेवटच्या श्लोकांत सांगतात. पहिल्या व शेवटच्या चरणांत सांगितलेलें गुण जर श्रोत्यांच्या ठिकाणीं असतील तरच मधल्या दोन चरणांत सांगितलेलें फल पदरीं पडेल. ते दोन गुण म्हणजे श्रवण व श्रद्धा हे होत.

समर्थ ज्याला ऐकणें म्हणतात तें केवळ कानांनीं ऐकणें नव्हे. मनाला केलेला उपदेश कानाच्या द्वारें मनापर्यंत पोहोंचला पाहिजे, म्हणजे खरें श्रवण होय. **श्रवणाचा विचार कळे। तरीच भाग्यश्री प्रगटे बळें। मुख्य परमात्मा आकळे। स्वानुभवासी।.** (दा. ७-८-३८) असें श्रवण होण्यासाठीं शांत वेळी एक दोन श्लोक वाचून त्याचें नित्य नेमाने स्वतत्र मनन करणें आवश्यक आहे.

अशा श्रवणाप्रमाणेंच ज्यांनी हे श्लोक लिहिले त्या सद्गुरु समर्थ रामदासांवर नितांत श्रद्धा पाहिजे. श्रद्धा हें परमार्थाचें मूळ आहे. न दिसणाऱ्या, कल्पनतीत, अनिर्वचनीय अशा शुद्ध आत्मस्वरूपाचें ज्ञान श्रेष्ठांच्या शब्दावर विश्वास ठेविला तर होणारें आहे. म्हणून श्रद्धा असेल तरच तो ज्ञानाचा अधिकारी होतो. **बुद्धीस आस्तिकता। ते श्रद्धा म्हणावी**



**तत्त्वंतां। आस्तिक्य म्हणजे सत्यता। भल्याच्या वाक्याची मानणें॥ तोचि अधिकारी ज्ञानासी ...।** (य. दी. ४-१२८६)

समर्थांनी मनाचे श्लोक लिहिले ते कांहीं लोकेषणेसाठी किंवा कांहीं प्राप्तव्यासाठीं नसून 'अवघेचि सुखी असावे' या कळवळ्यानें लिहिले आहेत. लोकोद्धाराची तळमळ त्यांच्याच खालील उद्गारावरून दिसून येईल. **राघवाचा दास मी झालो पावन। पतित कोण उरो शके॥ उरो शके ऐसें कल्पांती घडेना। जें कोण्ही पुसेना त्याची उणें। येणें काळें मोक्ष जरी मी देईना। दास म्हणवीना राघवाचा॥** (स्फु. श्लो.) ही प्रतिज्ञा पहिली म्हणजे चौथ्या चरणाचें महत्त्व लक्षांत येईल.

(१-२) मनाची शतें.... मतीमंद.... ॥ जो कोणी श्रद्धेनें या श्लोकांचें वर सांगितल्याप्रमाणें श्रवण करील त्याचे दुर्गुण नाहींसें होतील व कोणी मंद बुद्धीचें असतील तरी ते परमार्थसाधनाला पात्र होतील. हा दुसरा चरणहि त्यांचा श्रेष्ठ अधिकार व श्रद्धेची आवश्यकता दर्शवितो. तीक्ष्ण बुद्धीचा मनुष्य परमार्थ विचार सहज ग्रहण करूं शकेल. परंतु शिष्य मंद बुद्धीचा किंवा कसाहि असो, सद्गुरुवचनावर त्याचा विश्वास असेल तर त्यांच्यात पालट घडवून त्याला परमार्थाचा अधिकारी बनविणें हें सामर्थ्य सद्गुरूचें आहे, असें समर्थांचें म्हणणें आहे. **येथें (परमार्थात) शब्द नाहीं शिष्यासी। हें अवघें सद्गुरूपासीं। सद्गुरु पालटी अवगुणासी। नाना येत्नेंकरूनि॥** (दा. ४-३-१५) म्हणून मूढानेंहि या श्लोकांचें विश्वासयुक्त अंतःकरणानें श्रवण केल्यास त्याला कांहीं परमार्थ- साधन करावें असें वाटले व त्याची प्रगति होईल. परमार्थांत क्रमाने प्रगति कशी होत जाते हें तिसऱ्या चरणांत सांगतात.

(३) चढे ज्ञान ......! - या श्लोकांच्या श्रवणामुळें कांहीं परमार्थ साधावा असें वाटूं लागतें, असें वाटू लागलें कीं मनुष्य प्रथम भक्तिमार्गाकडे वळतो व सोप्या अशा नामसाधनाकडे त्याचें लक्ष जातें. नामसाधन निष्ठेनें चालूं झालें कीं भगवत्प्रेम वाढूं लागतें. भगवत्प्रेम वाढू लागलें कीं हळूंहळूं विषयवैराग्य उत्पन्न होते. वाढत्या वैराग्याबरोबर भक्तिप्रेम वाढूं लागतें व संतांच्या ग्रंथामुळें भक्तीला पान्हा फुटून ती उत्कट होऊ लागते. त्यामुळें ईशकृपेनें सज्जनसंग लाभून निराकार निर्गुण आत्मस्वरूपाचें म्हणजे सत्य देवाचें ज्ञान होतें. सज्जनाकडून मिळालेल्या ज्ञानामुळें देहप्रपंचादिकांचें नश्वरत्व, मिथ्यत्व मनाला पटतें. त्यामुळें तीव्र वैराग्य येऊन वासनाक्षय होतो व

वासनाक्षयामुळें जन्ममरण टळतें म्हणजे मोक्ष-लाभ होतो. अशी क्रमाने चित्ताची उन्नत्ति होते. म्हणून उत्तरार्धात चढे ज्ञान-मुक्ति भोगी असें म्हटलें आहे.

विवेकयुक्त वैराग्य हेंच मोठें सामर्थ्य आहे. जगतांत धन, बल, रोग, शत्रु इत्यादि सर्व वस्तु भयावह आहेत. फक्त एक वैराग्य निर्भय आहे. पूर्ण विरक्ताला कशाचेंहि भय नसतें. बऱ्या वाईट कोणत्याहि मायिक वस्तूंचे मिथ्यत्व बाणल्यानंतर कशाची इच्छा होईल व कोणाचि भीति वाटेल ? म्हणून ज्ञानयुक्त वैराग्य हेंच मोठें सामर्थ्य होय. **म्हणौन विवेक आणि वैराग्य। तेंचि जाणिजे महद्भाग्य। रामदास म्हणे योग्य। साधू जाणती।।** (दा. १२-४-२०) अशा विरक्त पुरूषाच्या मनांत येईल तें घडू शकतें - **मनमी धरावें तें होते.**

★ ★ ★



# उपसंहार

मनोबोध म्हणजे मुखांत राहील असा दासबोधच होय. जसे दासबोधाचे २०० समास तसे मनाचें हें २०४ श्लोक आहेत. दोन्हींतील निरूपणाचें स्वरूप एकच आहे. **येथें बोलिला विशद। भक्तिमार्ग। बहुधा अध्यात्म निरोपण। निरोपिलें।।**हें जसें दासबोधांत समर्थांनी म्हटलें आहे तसेंच या मनोबोधांतील निरूपण आहे.

राघवपंथ म्हणजे ब्रह्मविद्येचा अनादिपंथ. त्या मार्गाला प्रवृत्त झालेल्या मनाला दुसऱ्याच श्लोकांत 'भक्तिपंथेचि जावे' असा भक्तिसाधनाचा राजमार्ग समर्थांनी दाखविला. **'सगुणाचेनि आधारें। निर्गुण पाविजे निर्धारें।।'** हा त्यांचा प्रत्यय असल्यामुळें त्यांनी सगुण रामोपासनेचें महत्व मनाला पटवून दिलें. आणि सोपें व प्रभावी असे नामसंकीर्तन हें साधन मनाला सांगितलें, भक्ताला बाळसें येऊन ती उत्कट व व्यापक स्वरूपाची व्हावी या हेतूनें सदाचार, गोड भाषण, वादविवाद न करणें, बोलिल्यासारखें वागणें, परद्रव्य, परस्त्रीचा अभिलाष न धरणें, अहंकार सोडणें इत्यादि अनेक विषय मधून मधून सांगितले आहेत पण या सर्व विषयांत भक्तीचें सूत्र शेवटपर्यंत अखंड कायम ठेविलें असून 'देहबुद्धि तें आत्मबुद्धि करावी'ही महत्वाची जाणीव मनाला वरचेवर दिली आहे. दुसऱ्या श्लोकांत भक्तीच्या वाटेला लागलेलें मन रामकृपा व सज्जनसंगति यामुळें ज्ञानयुक्त होऊन २०० व्या श्लोकात आत्मस्वरूपीं विरून जातें. हा आत्मानुभव स्वत: व्यक्तीपुरताच मर्यादित न राखता त्याचा सर्वत्र अनुभव घ्यावा असा याच श्लोकांत मनाला दिलेला इशारा २०१ श्लोकांत पूर्ण होऊन, 'सर्वं खल्विदं ब्रह्म' हा अनुभव मनाला येऊन आत्मतुष्टीमुळें प्राप्त झालेली धन्यता व प्रसन्नता व्यक्त केली आहे. याप्रमाणें भक्तीच्या वाटेला लागलेलें मन शेवटपर्यंत भक्तींतच राहून शेवटीं ब्राह्मस्वरूप श्रीरामरूपाशी ऐक्य पावलें आहे.

अद्वय स्थितींत जेथें भज्यभजक हा भावच रहात नाही तेथें शेवटपर्यंत भक्ति कशी संभवते ? असा कोणी एखादा प्रश्न करील. याचें उत्तर असें आहे कीं द्वैतअद्वैत हा मनाचा खेळ असून, आत्मप्रेम म्हणजे भक्ति ही स्वाभाविकच आहे. परंतु या प्रेमाची जाणीव नसल्यामुळें ती उत्पन्न होण्यासाठी प्रथम रामरूपासारख्या प्रतीकोपासनेचा आधार घेऊन देव व भक्त असें द्वैत स्वीकारावें लागतें. त्या उपासनेमुळें सद्गुरू भेटून ज्ञान झालें म्हणजे

आपलें व रामरूप हीं दोन्हींही एक विश्वात्मक चैतन्यच होय, असा निश्चय होतो. आत्मज्ञान झालें तरी देहदृष्टच्या 'आपण मिथ्या। साचदेव' या स्वरूपांत अहंकारविवर्जित होउन द्वैतांत सुरूं झालेली भक्ति अद्वैत स्वरूपांत चालूं राहते. भक्त देवांत नाहीसा होऊन केवळ देवच उरतो. या दृष्टीनें भक्ताची व्याख्या करतांना समर्थ म्हणतात. **भक्त म्हणिजे विभक्त नव्हे। आणि विभक्त म्हणजे भक्त नव्हे। विचारेविण कांहींच नव्हे। समाधान॥** (दा. ४-९-६) भक्ताबद्दल हे जसें समर्थ म्हणतात तसेंच भक्तीबद्दल ज्ञानोबा म्हणतात - **तैसी क्रिया कीर न साहे। परी अद्वैतीं भक्ति आहे। हें अनुभवाचिजोगें नव्हे। बोला ऐसें॥** (ज्ञा. १८-११५१)

सत्संग हा ज्ञानासाठी प्रारंभी व ज्ञान झाल्यानंतर त्याच्या दृढतेसाठी असा सतत आवश्यक असल्यामुळें त्याचें महत्व २०२ ते २०४ श्लोकांत सांगितलें असून, २०५ श्लोकांत ग्रंथाची फलश्रुति सांगितली आहे.

टाकीच्या घावांनी दगडालाहि ज्याप्रमाणें देवकळा येते त्याप्रमाणें मूढालाहि मोक्षाचा अधिकारी बनविण्याचें सामर्थ्य या श्लोकांमध्यें आहे. म्हणून जाणत्यांनीं तरी या श्लोकांची उपेक्षा करूं नये, अशी शेवटची विनवणी आहे.

**'देह तंव पांचा भूतांचा। कर्ता आत्मा तेथींचा। आणि कवित्वप्रकार मनुशाचा। काशावरूनी॥''** (दा. २०-१०-३४)

★ ★ ★

**लेखनकाल :-**
**दासनवमी, शके १८८६ ते अश्विन शु. एकादशी, शके १८८९**



श्री दासबोधांतर्गत

# दशबोध

(संक्षिप्त दासबोध - प्रत्येक समासातील एकच ओवी)

*संकलन*

**कै. डॉ. रा. द. प्राणी**

## (१) गुरूबोध

तेथें (गुरूगीता) निरोपिलें बरवें। पार्वतीप्रती सदाशिवें।
या कारणें सद्भावें। सद्गुरूचरण सेवावें॥ ७-१०-४४ ॥
असो जयासि मोक्ष व्हावा। तेणें सद्गुरू करावा।
सद्गुरूविण मोक्ष पावावा। हें कल्पांतीं न घडे॥ ५-१-४४ ॥
म्हणोनि ज्ञान वैराग्य आणि भजन। स्वधर्मकर्म आणि साधन।
कथा निरूपण श्रवण मनन। नीति न्याये मर्यादा॥ ५-२-५२ ॥
तया देहामध्यें नरदेहो। त्या नरदेहांत ब्राह्मण देहो।
तया ब्राह्मणदेहास पाहो। अधिकार वेदीं॥१०-२-१७ ॥
हृदई वेदगर्भ विलसे। मुखीं सरस्वती विळासे।
साहित्य बोलतां जैसे। भासती देवगुरू॥ १-६-६ ॥
युक्तिवंत गुणवंत वरिष्ठ। बुद्धिवंत बहुधारिष्ट।
दीक्षावंत सदा संतुष्ट। निस्पृह वीतरागी॥ २-८-२९ ॥
बोलण्यासारिखें चालणें। स्वयें करून बोलणे ।
तयाची वचनें प्रमाणें। मानिती जनीं॥ १२-१०-३९ ॥
जाणोन पाहिजेत सर्व । हेंचि तयाचें अपूर्व।
ज्याचें त्यापरी गौरव। राखों जाणे॥ १२-१-२० ॥
ऐसा गणेश मंगळमूर्ती।तो म्या स्तविला यथामती।
वांछ्या धरून चित्तीं। परमार्थाची॥ १-२-३० ॥

आरे या आत्मयाची चळवळ पाहे। ऐसा भूमंडळीं कोण आहे।
अगाध पुण्यें अनुसंधान राहे। कांहींयेक॥ १८-१-२२ ॥
कीं हा परलोकींचा निजस्वार्थु। कीं हा योगियांचा गुप्त पंथु।
नाना ज्ञानियांचा परमार्थु। रूपासि आला॥ १-७-७ ॥
म्हणोनी बोलतां चालतां। निचेष्टित पडिलें नस्तां।
मुक्ति लाभ सायोज्यता। सद्गुरूबोधें॥ ७-६-४४ ॥
लोहो परिसेसी लागला। थेंबुटा सागरीं मिळाला।
गंगे सरिते संगम जाला। तत्क्षणी॥ ८-६-४३ ॥
ऐसी सूक्ष्म स्थिति गती। कळतां चुके अधोगती।
सद्गुरूचेनि सद्गति। तत्काळ होतें॥ १९-५-३० ॥
तेथें जाणीव राहिली। आणि जगज्जोती निमाली।
शुद्ध सारांश उरली। स्वरूपस्थिती॥ १०-५-२६ ॥
म्हणोनि सर्वसाक्षी मन। तेंचि जालिया उन्मन।
मग तुर्यारूप ज्ञान। तें मावळोन गेले॥ ७-५-११ ॥
सगुण भक्ति ते चळे। निर्गुण भक्ति ते न चळे।
हें आवघें प्रांजळ कळे। सद्गुरू केलियां॥ ४-१०-३१ ॥
बहुत जनास चालवी। नाना मंडळें हालवी।
ऐसी हे समर्थपदवी। विवेकें होते॥ १८-१०-४६ ॥
उपासनेचा गजर। स्थळोस्थळीं थोर थोर।
प्रत्ययानें प्राणिमित्र। सोडविले॥ १५-२-२८ ॥
म्हणौनि सद्गुरू वर्णवेना। हे गे हेचि माझी वर्णना।
अंतरस्थितीचिया खुणा। अंतर्निष्ठ जाणती॥ १-४-३१ ॥

### (२) ब्रह्मबोध

आदि अंतीं ब्रह्म निर्गुण। तेचि शाश्वताची खूण।
येर पंचभूतिक सगुण नासिवंत॥ ६-२-८ ॥
तो विश्रांतीचा विश्राम। आदिपुरूष आत्माराम॥
तें येकचि परब्रह्म दुसरें नाही॥ ७-२-५३ ॥



भ्रमरूप विश्व स्वभावें। तेथे काय म्हणोन सांगावें।
निर्गुण ब्रह्मावेगळे आघवें। भ्रमरूप॥ १०-६-३६ ॥
देव सदोदित संचला। लोकीं बहुविध केला।
परंतु बहुविध जाला। हें तो घडेना॥ ९-३-३१॥
केलें तें अवघेंचि लटिकें। तरी कर्ता हे बोलणेंचि फिकें।
वक्ता म्हणे रे विवेकें। बरें पाहा॥ १३-८-३५ ॥
दृश्य हलकालोळें नेलें। जड चंचळ वितुळलें।
या उपरी शाश्वत उरलें। परब्रह्म तें॥ १३-४-२४ ॥
जेथें ज्ञानचि होतें विज्ञान। जेथें मनचि होतें उन्मन।
तेथें कैचें चंचळपण। आत्मयासी॥ १०-१०-५२ ॥
जेथें अज्ञान सरे। ज्ञान तेंहि नुरे।
विज्ञानवृत्ति मुरे। परब्रह्मी॥ ७-४-५१ ॥
ब्रह्म जाणावें शाश्वत। माया तेचि अशाश्वत।
चौदा ब्रह्मांचा सिद्धांत। होईल आतां॥ ७-३-२३॥
म्हणोनि हें दृश्यजात। आवघेंचि आहे अशाश्वत।
परमात्मा अच्युत अनंत। तो या दृश्यावेगळा॥ ६-९-२२ ॥
मिथ्या शब्दीं कांहींच नाहीं। तेथें केलें कोणें काई।
करणें निर्गुणाचा ठाई। हेंहि अघटित॥ ८-२-५४ ॥
भासाकरितां भास भासे। दृश्याकरितां दृश्य दिसे।
अदृश्यास उपमा नसे। म्हणोनि निरोपम॥ ८-३-९ ॥
सकळ उपाधीवेगळा। तो परमात्मा निराळा।
जळीं असोनि नातळे जळा। आकाश जैसें॥ ६-५-२४ ॥
विवरोन पाहातां अष्टदेह। पुढें सहजचि निःसंदेह।
अखंड निरूपणें राहे। समाधान॥ १३-५-२३ ॥
ऐसा पांचा भूतांचा विस्तार। नासिवंत हा निर्धार।
शाश्वत आत्मा निराकार। सत्य जाणावा॥ १३-६-११ ॥
परा पश्यंती मध्यमा वैखरी। जेथें वोसरती च्यारी।
तेथें शब्दकळाकुसरी। कोण काज॥ ९-२-२६ ॥

शब्दमौन्याचा विचार। व्हावया मूळ वोंकार।
तो वोंकार गेलिया उच्चार। कैसा करावा॥ ६-१०-३२ ॥
जिकडे जिकडे प्राणी पाहे। तिकडे ते सन्मुखचि आहे।
समस्तांचे मस्तकीं राहे। माध्यानी मार्तंड जैसा॥ २०-१०-५ ॥
आधीं दृश्य सोडिले। मग शून्यत्व वोलांडिले।
मूळ माये-परतें देखिलें। परब्रह्म॥ ८-१०-७० ॥
परब्रह्म म्हणिजे सकळांपरतें। तया पाहता आपणचि तें।
हें कळे अनुभवमतें। सदगुरू केलियां॥ ९-१-२९ ॥

### (३) साधुबोध

पृथ्वीमधें बहुत जन। त्यामध्यें असती सज्जन।
परी साधूस जाणतो कोण। साधुवेगळा॥ २०-३-२५ ॥
पतितपावनाचे दास। ते हि पावन करिती जगास।
ऐसी हे प्रचित मनास। बहुतांच्या आली॥ १२-३-३३ ॥
सदा स्वरूपानुसंधान। हें मुख्य साधूचें लक्षण।
जनीं असोन आपण। जनावेगळा॥ ८-९-९ ॥
ब्रह्मज्ञानी आत्मज्ञानी। तत्वज्ञानी पिंडज्ञानी।
योग्याभ्यासी योगज्ञानी। उदासीन॥ १-८-१५ ॥
जो जाणेल भगवंत। तया नांव बोलिजे संत
जो शाश्वत आणि अशाश्वत। निवाडा करी॥ ६-१-१६॥
ज्ञात्याची उगवली वृत्ती। बद्धाऐसी न पडे गुंती।
भुकेल्याची अनुभव प्राप्ती। धाल्यास नाही॥ ९-७-५६॥
म्हणौन सगुणभजन। वरी विशेष ब्रह्मज्ञान।
प्रत्ययाचें समाधान। दुर्लभ जगीं॥ १०-७-३१ ॥
सांकडीमधे वर्तो जाणे। उपाधीमधे मिळों जाणे।
अलिप्तपणें राखों जाणे। आपणासी॥ ११-६-१३ ॥
आपण विवेकें विशाळला। मर्यादेवेगळा जाला।
मग ब्रह्मगोळ देखिला। वटबीजन्यायें॥ ९-९-३२ ॥



साध्य करावें साधनासी। ध्येयें धरावें ध्यानासी।
उन्मनें आवरावे मनासी। कोण्या प्रकारें॥ ९-१०-३७ ॥
तैसा हरिदास आणि विरक्त। ज्ञाता आणि प्रेमळ भक्त।
व्युत्पन्न आणि वादरहित। तरी हे ही अपूर्वता॥ १४-५-४ ॥
या कारणें मनोगत। राखेल तो मोठा महंत।
मनोगत राखतां समस्त। वोढोन येती॥ १३-१०-२९ ॥
लोक संकल्प विकल्प करिती। ते अवघेचि निर्फळ होती।
जनाची जना लाजवी वृत्ती। तेव्हां योगेश्वर॥ ११-१०-१५ ॥
उदंड प्रगटला विचार। धर्मस्थापना तदनंतर।
तेथेंच पूजेस अधिकार। पुण्यशरीरीं॥ १८-४-३६ ॥
साधु निश्चय करिती येक। आत्मा सर्वत्र व्यापक।
येर हें अवघेंचि माइक। सचराचर॥ ६-४-१३ ॥
आत्मारामउपासना। तेणें पावलें निरंजना।
नि:संदेहे अनुमाना। ठावचि नाहीं॥ २०-६-३० ॥
परमार्थ सकळांस विसांवा। सिद्ध साधु महानुभावां।
सेखीं सात्विक जडजीवां। सत्संगेंकरूनी॥ १-९-२० ॥
विवेकें अंतरी सुटला। वैराग्यें प्रपंच तुटला।
अंतर्बाह्य मोकळा जाला। नि:संग योगी॥ १२-४-१२ ॥
ज्ञाता तत्वें सांडून पळाला। तुर्येपैलीकडे गेला।
आत्मनिवेदनें जाला। ब्रह्मरूप॥ १८-९-२४ ॥
जै त्रैलोकीं नाहीं दान। तें करिती संतसज्जन।
तयां संतांचे महिमान। काय म्हणौनि वर्णावें॥ १-५-२४ ॥

### (४) ईश्वरबोध

येक नाना प्रतिमा। दुसरा अवतार महिमा।
तिसरा तो अंतरात्मा। चौथा तो निर्विकारी॥ ११-२-३३ ॥
पिंडी देहधर्ता जीव। ब्रह्मांडी देहधर्ता शिव।
ईश्वरतनुचतुष्टय सर्व। ईश्वरधर्ता॥ १३-१-२४ ॥

मायाब्रह्मीं जो समीर। त्यात जाणता तो ईश्वर।
ईश्वर आणि सर्वेश्वर। तयासीच बोलिजे॥ १०-४-१६ ॥
येवं कल्पनेरहित। तया नांव भगवंत।
देवपणाची मात। तेथें नाहीं॥ ८-१-५२ ॥
निश्चळ ब्रह्मीं चंचळ आत्मा। सकळां पर जो परमात्मा।
चैतन्य साक्षी ज्ञानात्मा। षड्गुणैश्वरू॥ १७-१-१ ॥
प्रकृतिपुरूष शिवशक्ती। अर्धनारीनटेश्वर म्हणती।
परी ते आवघी जगज्जोती। मूळ त्यासी॥ १५-७-३ ॥
ते मुंगीसमान शरीरें। उदंड असती लहानथोरें।
समस्तांमध्यें जीवेश्वरें। वस्ती कीजे॥ १५-८-५ ॥
ऐसा हा सविता सकळांचा। पूर्वज होय रघुनाथाचा।
अगाध महिमा मानवी वाचा। काय म्हणोनि वर्णावी॥ १६-२-१९ ॥
जीवात्मा शिवात्मा परमात्मा। जगदात्मा विश्वात्मा गुप्तात्मा।
आत्मा अंतरात्मा सूक्ष्मात्मा। देवदानवमानवी॥ १६-८-६ ॥
तस्मात् वडिल अंतरात्मा। जेथें चेतला तेथें महिमा।
हें तों प्रगटचि आहे आम्हां। शब्द नाहीं॥ १५-३-१९ ॥
ईश्वरें मोठें सूत्र केलें। मनुष्यमात्र गुंतोन राहिलें।
लोभाचें गुंडाळें केलें। उगवेना ऐसें॥ १७-२-३० ॥
आवर्णोदकीं हटकेश्वर। त्यासी घडे नमस्कार।
महिमा अत्यंतचि थोर। तया पाताळलिंगाचा॥ १७-१०-१ ॥
सत्ता पृथ्वीमध्यें वांटली। जेथें तेथें विभागिली।
कळेनें सृष्टी चालिली। भगवंताचे॥ २०-४-६ ॥
तया गुणामधें सत्वगुण। निखळ जाणीवलक्षण।
त्याचा देहधारी आपण। विष्णु जाला॥ १०-९-१२ ॥
जगदीश आहे जगदांतरी। चेटकें करावीं कोणावरी।
जो कोणी विवेकें विवरी। तोचि श्रेष्ठ॥ १५-१-१० ॥
नाना नामें भगवंताचीं। नाना ध्यानें सगुणाचीं।
नाना कीर्तनें कीर्तीचीं। अद्भुत करावीं॥ १४-४-५ ॥



धर्मस्थापनेचे नर। ते ईश्वराचे अवतार।
जाले आहेत पुढें होणार। देणे ईश्वराचें॥ १८-६-२० ॥
म्हणौनि थोराहूनि थोर। जे ईश्वराचा ईश्वर।
तयेसी माझा नमस्कार। तदंशेंचि आतां॥ १-३-२६ ॥
अकार उकार मकार। अर्धमात्रा तो ईश्वर।
ऐस्या मात्रा चत्वार। चौदेहाच्या॥ १७-९-४ ॥
निर्गुण म्हणिजे बहुगुण। बहुगुणी अंतरात्मा जाण।
सकळ त्याचे अंश हें प्रमाण। प्रचित पाहा॥ १६-९-४ ॥

### (५) जीवबोध

येच क्षणीं मरोन जासी। तरी रघुनाथीं अंतरलासी।
माझें माझें म्हणतोसी। म्हणौनियां॥ ३-१०-५०॥
निजेलें असतांचि मेले। पुन्हा उपजतांचि निजेले।
ऐसे आले आणि गेले। बहुत लोक॥ ७-१-२४॥
वायोसरिसी वासना गेली। ते वायोरुपेंचि राहिली।
पुन्हां जन्म घेऊन आली। हेतुपरत्वें॥ ९-८-५॥
गर्भी म्हणे सोहं सोहं। बाहेरी पडतां म्हणे कोहं।
ऐसा कष्टी जाला बहु। गर्भवासी॥ ३-१-४७॥
जनाचा लालची स्वभाव। आरंभीच म्हणती देव।
म्हणिजे मला कांहीं देव। ऐसी वासना॥ १८-७-१॥
देह देऊळ आत्मा देव। कोठें धरुं पाहतां भाव।
देव वोळखोन जीव। तेथेंचि लावावा॥ १४-८-२९।
घटीं व्यापक जें आकाश। तया नाव घटाकाश।
पिंडी व्यापक ब्रह्मांश। त्यास जीवात्मा बोलिजे॥ ८-७-४९॥
ऐक्य जीव तो ब्रह्मांश। जेथें पिंडब्रह्मांडनिरास।
येथें सांगितला विशेष। चत्वार जीव॥ ११-१-३५॥
मुख्य सच्छिष्याचें लक्षण। सद्गुरुवचनीं विश्वास पूर्ण।
अनन्यभावें शरण। त्या नांव सच्छिष्य॥ ५-३-१९॥

सकळ उपदेशीं विशेष। आत्मज्ञानाचा उपदेश।
ये विषईं जगदीश। बहुतां ठाईं बोलिला॥ ५-४-३३॥
ऐक शुद्ध ज्ञानाचें लक्षण। शुद्ध स्वरुपचि आपण।
या नांव शुद्ध स्वरूपज्ञान। जाणिजें श्रोतीं॥ ५-६-१०॥
देहबुद्धि विवेकें वारी। आत्मबुद्धि सुदृढ धरी।
श्रवण मनन केलेंचि करी। या नांव साधक॥ ५-९-८॥
पिंडी नित्यानित्य विवेक। ब्रह्मांडी सारासार अनेक।
सकळ शोधूनिया येक। सार घ्यावें॥ १८-५-३१॥
धरितां सो सांडितां हं। अखंड चाले सोहं सोहं।
याचा विचार पाहतां बहु। विस्तारला॥ १७-५-११॥
ब्रह्मींचा अंश आकाश। आणि आत्म्याचा अंश मानस।
दोहींचा अनुभव प्रत्ययास। येथें घ्यावा॥ २०-१-१८॥
सोहं हंसा तत्वमसी। तें ब्रह्म तूं आहेसी।
विचार पाहतां स्थिति ऐसी। सहजचि होते॥ १३-२-२०॥
ऐसें जाणोनियां जीवें। याचें सार्थकचि करावें।
जनी मरोन उरवावें। कीर्तिरूपे॥ ३-९-४४॥
संतकृपा होय जयास। तेणें उद्धरिला वंश।
तो ईश्वराचा अंश। सत्वगुणें॥ २-७-७८॥
परमेश्वरास वोळखिलें। आपण कोणसें कळलें।
आत्मनिवेदन जालें। म्हणिजे बरें॥ १०-८-२२॥
तत्वांमध्यें मीपण गेलें। तरी निर्गुण सहजचि उरलें।
सोहंभावें प्रत्यया आलें। आत्मनिवेदन॥ ६-३-३१॥

### (६) साधनबोध

सन्मार्ग तो जीवीं धरणें। अनमार्गाचा त्याग करणें।
संसारिका त्याग येणें। प्रकारे ऐसा॥ ५-१०-२॥
स्वार्थ सांडून प्रपंचाचा। हव्यास धरिला परमार्थाचा।
अंकित होईन सज्जनाचा। म्हणे तो मुमुक्षु॥ ५-८-४३॥



आळसाचे संरक्षण। परमार्थाची बुडवण।
याकारणें नित्य श्रवण। केलेंचि पाहिजे॥ ७-८-४९॥
म्हणोनि नित्यानित्यविचार। जेथें बोलिला सारासार।
तोचि ग्रंथ पैलपार। पावावी विवेकें॥ ७-९-६०॥
हें आवघें आपणांपाशीं। येथें बोल नाहीं जनांसी।
सिकवावें आपल्या मनासी। क्षणक्षणा॥ १२-२-२३॥
मुख्य हरिकथा निरूपण। दुसरें तें राजकारण।
तिसरें तें सावधपण। सर्वविषईं॥ ११-५-४॥
आहे तितुकें देवाचें। ऐसें वर्तणें निश्चयाचें।
मूळ तुटें उद्वेगाचें। येणे रीतिं॥ ११-३-२८॥
गुणमाया मूळमाया। परब्रह्मीं पावती लया।
तें परब्रह्म विवराया। विवेक पाहिजे॥ १४-९-१०॥
पदार्थ जड आत्मा चंचळ। विमळब्रह्म तें निश्चळ।
विवरोन विरे तत्काळ। तद्रूप होय॥ १२-५-१५॥
निश्चळ चंचळ आणि जड। पिंडी करावा निवाड।
प्रत्ययावेगळें जाड। बोलणें नाहीं॥ २०-७-१३॥
समजलें तरी उमजेना। उमजलें तरी समजेना।
प्रत्ययेंविण अनुमानेना। सकळ कांहीं॥ १५-५-१७॥
सबळ विषय त्यागणें। शुद्ध कार्यकारण घेणें।
विषयत्यागाचीं लक्षणें। वोळखा ऐसीं॥ १२-७-२७॥
श्रवणमननाचा विचार। निजध्यासें साक्षात्कार।
रोकडा मोक्षाचा उधार। बोलोंचि नये॥ १७-३-३॥
अखंड येकांत सेवावा। ग्रंथमात्र धांडोळावा।
प्रचीत येईल तो घ्यावा। अर्थ मनीं॥ १८-३-२०॥
कांहीं गल्बला कांहीं निवळ। ऐसा कंठीत जावा काळ।
जेणेंकरितां विश्रांती वेळ। आपणासी फावे॥ १९-८-२९॥
दुर्जन प्राणी समजावे। परी ते प्रगट न करावे।
सज्जनापरीस आळवावे। महत्त्व देउनी॥ १९-९-२३॥

अभ्यासें प्रगट व्हावें। नाहीं तरी झांकोन असावें ।
प्रगट होऊन नासावें। हें बरें नव्हे॥ १९-७-१७ ॥
नेणतपण सोडू नये। जाणपणें फुगों नये ।
नाना जनांचें हृदये। मृदूशब्दें उकलावें॥ १९-२-१० ॥
पदार्थी असावें उदास। विवेक पाहावा विशेष सावकास ।
येणेंकरितां जगदीश। अलभ्य लाभे॥ १२-८-२९ ॥
शाहण्यानें ऐसें न करावें। सुख होय तेंचि करावें ।
देवासी धुंडित जावें। ब्रह्माडापरतें॥ १३-७-२६ ॥

### (७) प्रकृतिबोध

उपाधीविण जें आकाश। तेंचि ब्रह्म निराभास।
ते निराभासीं मूळमायेस। जन्म जाला॥१०-३-१॥
केवळ अचंचळी निर्माण जाली। अधोमुखें बळें चालिली।
अखंड वाहे परी देखिली। नाहींच कोणीं॥११-७-२॥
येथून पाहातां येथवरी। चत्वार जीनस अवधारीं।
येक चौदा पांच च्यारी। ऐसें आहे॥२०-५-१॥
पुरुषइच्छेमधें प्रकृती। प्रकृतीमधें प्ररुषवेक्ती।
प्रकृतीपुरुष बोलती। येणें न्यायें॥१६-७-४०॥
भूतें गुण मेळविजे। त्यासी अष्टधा बोलिजे।
पंचभूतिक जाणिजे। अष्टधा प्रकृती॥ ८-४-४२॥
च्यारि खाणी च्यारि वाणी। चौऱ्यांसी लक्ष जीवयोनी।
निर्माण जाले लोक तिनी। पिंडब्रह्मांड॥१३-३-१५॥
निर्विकल्प जें स्फुरण। उगेंच असतां आठवण।
तें जाणावें अंत:करण। जाणतीकळा॥ १७-८-४॥
किडामुंगीपासून ब्रह्मादिक। समस्तांत अंत:करण येक।
ये गोष्टीचें कौतुक। प्रत्ययें जाणावें॥१०-१-२३॥
पृथ्वीचें मूळ जीवन। जीवनाचें मूळ दहन।
दहनाचें मूळ पवन। थोराहून थोर॥१६-४-३०॥



ऐसा हा समर्थ पवन। हनुमंत जयाचा नंदन।
रघुनाथ स्मरणीं तनमन। हनुमंताचें॥१६-६-२४॥
जेंचि पिंडी तेंचि ब्रह्मांडीं। प्रचित नाहीं कीं रोकडी।
पंचभूतांची तांतडी। दोहीकडे॥९-५-४०॥
चौखाणीचे प्राणी असती। अवघे उदकेंचि वाढती।
ऐसे होती आणि जाती। असंख्यात॥१५-९-१॥
येका उदकाचे विकार। पाहातां दिसती अपार।
पांचा भूतांचे विस्तार। चौऱ्यासी लक्षयोनी॥९-६-४३॥
मनुष्यें मरतांच ऐका। कृमि भस्म कां मृत्तिका।
ऐशा काया पडती अनेका। पुढें पृथ्वी॥१५-४-५॥
ऐसा पृथ्वीचा महिमा। दुसरी काये द्यावी उपमा।
ब्रह्मादिकांपासुनी आम्हां। आश्रयोचि आहे॥१६-३-३०॥
पहिला देह स्थूळकाया। आठवा देह मूळमाया।
अष्ट देह निरसलियां। विचार कैचा॥११-४-११॥
भोवंडीनें पृथ्वी कलथली। कामिणीनें पिवळी जाली।
सन्निपातस्थां अनुभवली। तैसी माया॥१४-१०-२०॥
गुप्तरुपें गुणसौम्य। म्हणौनि बोलिजे गुणसाम्य।
सूक्ष्म संकेत अगम्य। बहुतांस कैंचा॥२०-२-२५॥
साधुसंत महानुभाव। त्यांचा ऐसाचि अनुभव।
पंचभूतातीत देव। सृष्टि मिथ्या॥६-६-४७॥
सकळ माया गथागोवि। संतसंगे हे उगवावी।
पाविजे मोक्षाची पदवी। सत्समागमें॥८-५-७०॥

### (८) देहबोध

देहसंगे विषय भोगिले। देहसंगे प्राणी मिरवलें।
देहधर्त्यास चुकलें। नवल मोठें॥११-८-१५॥
भक्तिहीन भावहीन। ज्ञानहीन वैराग्यहीन।
शांतिहीन क्षमाहीन। सर्वहीन क्षुल्लकु॥२-३-३७॥

नेणोनियां परमात्मा। सकळ पदार्थी प्रेमा।
बलात्कारें घाली जन्मा। तो रजोगुण॥२-५-३३॥
देवाची जो निंदा करी। तो आशाबद्ध अघोरी।
जो संतसंग न धरी। तो तमोगुण॥२-६-३७॥
देवद्रोही गुरुद्रोही। मातृद्रोही पितृद्रोही।
ब्रह्मद्रोही स्वामीद्रोही। तो येक मूर्ख॥२-१-४४॥
नाहीं भक्तीचें साधन। नाहीं वैराग्य ना भजन।
क्रियेविण बोले ब्रह्मज्ञान। तो येक पढतमूर्ख॥२-१०-२३॥
देह इंद्रिय आणि प्राण। यांचेंनि योगें आपण।
सुखदुःखे सिणे जाण। या नांव आध्यत्मिक॥३-६-१३॥
सर्व भूतांचेनि संयोगें। सुख दुःख उपजों लागे।
ताप होतां मन भंगे। या नांव आदिभूतिक॥३-७-२॥
शुभाशुभ कर्मनें जना। देहांतीं यमयातना।
स्वर्ग नर्क भोग नाना। या नांव आदिदैविक॥३-८-२॥
स्त्रीकारणें परमार्थ बुडविला। प्राणी स्वहितास नाडला।
ईश्वरीं कानकोंडा जाला। स्त्रीकारणें कामबुद्धी॥३-२-५५॥
विषयसुख तें राहिलें। वांजपणें दुःखी केलें।
तंव तें कुळदैवत पावलें। जाली वृद्धी॥३-३-३४॥
ऐसें आपुलें सुख पाहाती। परी त्याचें दुःख नेणती।
आणि शक्ती गेलिया अंती। कोणीच कामा न येती॥३-४-२०॥
अविद्येनें अविद्या देखिली। म्हणोनि गोष्टी विश्वासली।
तुझी काया अवघी संचली। अविद्येची॥६-८-४०॥
काया वाचा आणि मन। चित्त वित्त जीव प्राण।
द्रव्यदारेचें करी भजन। या नांव बद्ध॥५-७-४१॥
म्हणौनि मागुतें जन्मांतर। प्राप्त मातेंचे उदर।
संसार हा अति दुस्तर। तोचि ठाकून आला॥३-५-५५॥
असो सकळ कळाप्रवीण। विद्यामात्र परिपूर्ण।
तरी ते कौशल्यता परी ज्ञान। म्हणोंचि नये॥५-५-३२॥



जनाचें समाधान राहावें। आपुलें पारिखें वोळखावें।
आणि भजनचि मोडावें। हें कोण ज्ञान॥६-७-१७॥
येक (देह+आत्मा) अस्तां उदंड घडे। वेगळे पाहतां कांहींच न घडे।
विवेकें त्रिलोकी पवाडे। देहात्मयोगें॥१३-९-४०॥
देह परमार्थी लाविलें। तरीच याचें सार्थक जालें।
नाहीं तरी हें वेर्थचि गेलें। नानाआघातें मृत्युपंथें॥१-१०-६१॥
आपणास नुमजे बरवें। म्हणोनि मिथ्या कैसें म्हणावें।
नातरी सुदृढ धरावें। सद्गुरुमुखें॥७-७-४१॥

## (९) *विहितकर्मबोध*

वाल्मीक ऋषी बोलिला नसता। तरी आम्हांसी कैंची रामकथा।
म्हणोनियां समर्था। काय म्हणोनी वर्णावें॥१६-१-१८॥
ऐसा ग्रंथ जपोनी ल्याहावा। प्राणिमात्रांस उपजे हेवा।
ऐसा पुरुष तो पहावा। म्हणती लोक॥१९-१-१२॥
जगीं भेद कामा नये। वर्ण संकर करूं नये।
आपला धर्म उडवूं नये। अभिमान खोटा॥१४-१-७६॥
आधीं कर्माचा प्रसंग। कर्म केलें पाहिजे सांग।
कदाचित पडिले व्यंग। तरी प्रत्यवाय घडे॥११-९-१॥
ज्या इंद्रियांस जो भोग। तो तो करी येथासांग।
ईश्वराचें केलें जग (भेदयुक्त)। मोडितां उरेना॥१७-४-२८॥
कर्मविधी उपासनाविधी। ज्ञानविधी वैराग्यविधी।
विशाळ ज्ञातृत्वाची बुद्धी। चळेल कैंसी॥१९-४-२०॥
प्रपंच अथवा परमार्थ। जाणता तोचिं समर्थ।
नेणता जाणिजे वेर्थ। निःकारण॥९-४-१९॥
अपकीर्ति ते सांडावी। सत्कीर्ति वाढवावी।
विवेकें दृढ धरावी। वाट सत्याची॥२-२-४१॥
प्रातःकाळीं उठत जावें। प्रातःस्मरामि करावें।
नित्य नेमें स्मरावें। पाठांतर॥१२-९-९॥

नरदेहीं विशेष ब्राह्मण। त्याहीवरी संध्यास्नान।
सद्वासना भगवद्भजन। घडे पूर्वपुण्यें॥२-४-२॥
ब्राह्मणास तनुमनु। सूर्यदेव हुताशनु।
येतद्विषईं अनुमानु। कांहींच नाहीं॥१६-५-१७॥
असो ऐसा भगवद्भक्त। जो ये संसारीं विरक्त।
तयास मानिती मुक्त। साधुजन॥१४-३-३३॥
येणेंचि न्यायें अन्न वसन। येणेंचि न्यायें देवतार्चन।
येणेंचि न्यायें ब्रह्मज्ञान। प्राप्तव्यासारिखें॥१७-६-२४॥
उत्तम संगती धरावी। आपली आपण चिंता करावी।
अंतरी बरी विवरावी। बुद्धि जाणत्याची॥१७-७-१२॥
विरक्तें उत्तम गुण घ्यावे। विरक्तें अवगुण त्यागावे।
नाना अपाय भंगावे। विवेकबळें॥२-९-३९॥
कांही नेमकपण आपुलें। बहुतजनासी कळों आलें।
तेंचि मनुष्य मान्य जालें। भूमंडळी॥१९-३-२३॥
संतासंत जे जन। तेथे कोरान्न मागोन करी भोजन।
तेणें केलें अमृतप्राशन। प्रतिदिनीं॥१४-२-३॥
भूमंडळी सकळांत मान्य। तो म्हणो नयें सामान्य।
कित्येक लोक अनन्य। तया पुरुषासी॥१५-६-२९॥
अध्यात्मश्रवण करीत जावें। म्हणिजे सकळ कांहीं फावें।
नाना प्रकारींचे गोवे। तुटोनि जाती॥२०-९-१८॥
कांहीं अनुमानिलें विचारें। देव आहे जगदांतरे।
सगुणाकरितां निधरिं। निर्गुण पाविजे॥१८-८-२२॥

## (१०) भक्तिबोध

सर्वप्रकारें नेमक। शास्त्रोक्त करणें कांहींयेक।
त्याहिमध्यें अलौकिक। तो हा भक्तिमार्ग॥१४-७-६॥
वेद शास्त्रें आणि पुराणें। माहावाक्याचीं विवरणें।
तनुचतुष्टयनिर्शनें। कैसीं तें ऐकावी॥४-१-२९॥



सगुणकथा या नाव किर्तन। अद्वैत म्हणिजे निरुपण।
सगुण रक्षून निर्गुण। बोलत जावें॥४-२-२३॥
चालतां बोलतां धंदा करितां। खातां जेवितां सुखी होतां।
नाना उपभोग भोगितां। नाम विसरों नये॥४-३-७॥
पादसेवन (सद्‌गुरुपाय) चौथी भक्ती। पावन करितसे त्रिजगती।
जयेकरिता सायुज्यमुक्ती। साधकास होये॥४-४-२५॥
काया वाचा आणि मनें। चित्तें वित्तें जीवें प्राणें।
सद्भावें भगवंत अर्चणें। या नांव अर्चनभक्ती॥४-५-२९॥
सर्व देवांस नमस्कारिलें। ते येका भगवंतास पावलें।
येदर्थीं येक वचन बोलिलें। आहे तें ऐका॥ (आकाशत्पतितं)॥४-६-११॥
सातवें भजन तें दास्य जाणावें। पडिलें कार्य तितुकें करावें।
सदा सन्निधचि असावें। देवद्वारीं॥४-७-२॥
देवाच्या सख्यत्वाकारणें। आपलें सौख्य सोडून देणें।
अनन्यभावें जीवें प्राणें। शरीर तेंही वेचावें॥४-८-६॥
त्वंपद तत्पद असिपद। निरसुनि सकळ भेदाभेद।
वस्तु ठाईंची अभेद। आपण कैंचा॥४-९-२०॥
आत्मनिवेदनाचे अंतीं। जे कां घडली अभेद भक्ती।
तये नांव सायोज्यमुक्ती। सत्य जाणावी॥८-८-१९॥
उपासनेचें सेवटीं। देवांभक्तां अखंड भेटी।
अनुभवा जाणेल गोष्टी। प्रत्ययाची॥१८-२-३०॥
उपासनेचें उत्तीर्ण व्हावें। भक्तजनें वाढवावें।
अंतरी विवेकें उमजावें। सकळ कांहीं॥१५-१०-३३॥
शाहाणे करावे जन। पतित करावे पावन।
सृष्टिमधें भगवद्भजन। वाढवावें॥१४-६-३३॥
उत्कट भक्ति उत्कट ज्ञान। उत्कट चातुर्य उत्कट भजन।
उत्कट योग अनुष्ठान। ठाईं ठाईं॥१९-६-२२॥

आद्य मध्य अवसान। जे शाश्वत निरंजन।
तेथें लावावें अनुसंधान। जाणते पुरुषीं॥१२-६-२०॥
आपण करावें करवावें। आपण विवरावें विवरवावें।
आपण धरावें धरवावें। भजनमार्गासी॥१९-१०-१७॥
आवाहन विसर्जन। हेंचि भजनाचें लक्षण।
सकळ जाणती सज्जन। मी काय सांगों॥२०-८-३०॥
भजन साधन अभ्यास। येणें पाविजे परलोकास।
दास म्हणे हा विश्वास। धरिला पाहिजे॥१६-१०-३१॥
भक्तिचेन योगें देव। निश्चयें पावती मानव।
ऐसा आहे अभिप्राव। इये ग्रंथीं॥१-१-४॥

***



# आमचे दादा



मना चंदनाचे परी त्वां झिजावे।
परी अंतरी सज्जना नीववावे॥
या समर्थांच्या आदेशाप्रमाणे जीवन कृतार्थ करणारे
वंदनीय कै. डॉ. रामचंद्र दत्तात्रेय तथा दादासाहेब प्राणी
एम्. बी. बी. एस्.

*यांच्या भक्तिजीवनाचा अल्प परिचय*

**लेखक : कै. श्री केशव गोविंद गोखले**

## पवित्र कुल

समर्थ रामदासांच्या पदस्पर्शानें पावन झालेलें आणि त्यांनी स्थापन केलेल्या मारुतीरायाच्या मंदिरामुळे महत्त्व पावलेलें मसूर हें प्राणी घराण्याचें मूळ गाव. कांहीं आपत्ति आल्यामुळे डॉ. दादांच्या वडिलांना मसूर सोडावें लागलें. आप्तांच्या आधारानें कोल्हापूर येथे त्यांचे बी. ए. व एल्. एल्. बी. पर्यंत शिक्षण पूर्ण होऊन मिरज येथें संस्थानाच्या सरन्यायाधीशाच्या अधिकारावर ते अधिष्ठित झाले. अत्यंत धर्मनिष्ठ, कर्मनिष्ठ, सत्यनिष्ठ ब्राह्मण आणि नि:स्पृह न्यायाधीश असा लौकिक, असा दरारा, असा आदर त्यांच्याविषयीं त्या काळीं निर्माण झालेला होता. त्यांच्याविषयीं आत्यंतिक आदरानें व आपुलकीनें बोलणारे लोक आजही आढळतात. त्यांच्या नि:स्पृहतेचे आणि न्यायप्रियतेचे कित्येक प्रसंग अजूनहि लोकांच्या स्मरणांत साठवलेले आहेत.

देवकार्य व पितृकार्य यांसाठी त्यांच्या घरीं प्रसंगानुसार येणाऱ्या दोन माननीय वैदिकांमधील वाद त्यांच्या न्यायासनासमोर आला असतांना त्या दोघांची चांगलीच कानउघडणी करून वाद तडजोडीनें मिटविण्यास त्यांनी भाग पाडलें. त्यांच्या नातीच्या बारशाच्या निमित्ताने एका गृहस्थानें वाजतगाजत आहेर आणला. परंतु त्यांच्या न्यायासनासमोर त्या गृहस्थाचे काम चालू असल्यानें त्या आहेरापैकी फक्त खण-नारळ आणि हळद-कुंकू आग्रहाखातर स्वीकारून बाकीचा सर्व आहेर त्यांनी परत केला. घरीं चालत आलेल्या लक्ष्मीचा अव्हेर केला म्हणून कांहीं आप्त सुहृद् नाराज झाले. पण न्यायदानाच्या वेळीं हें विष जिभेवर बसेल, तो प्रसंग न यावा म्हणूनच हृदयस्थानें त्यांना ही सद्बुद्धि दिली असावी. यानंतर कांहीं काळानें श्रीमंत कुरुंदवाडकर यांच्या संस्थानांतील कांहीं बिकट न्यायप्रकरणीं त्यांची नेमणूक झाली व तें काम समाधानकारक पूर्ण झालें. श्रीमंत कुरुंदवाडकर यांनी त्यांच्या कामगिरीबद्दल देऊं केलेला मेहनताना त्यांनीं साभार व सादर नाकारला. आपण श्रीमंत मिरजकर सरकारांच्या सेवेंत आहोंत व त्यांच्या आज्ञेवरून आपण हें कार्य केलें म्हणून त्याबद्दल आपण कांहींच स्वीकारूं शकत नाहीं, असें त्यांनी कळवलें. पुढें उभयतां श्रीमंतांच्या भेटी झाल्यावर श्रीमंत कुरुंदवाडकरांनी श्रीमंत मिरजकरांच्या अनुज्ञेसह सुवर्णमुद्रांकित आहेर घरीं पाठवला. तेव्हां त्यांनी तो स्वीकारला आणि पूर्वी नाराज झालेल्या आप्त सुहृदांना सांगितलें कीं पहा ही घरीं आलेली लक्ष्मी कशी सर्वसंमत आणि पवित्र आहे!



नित्यकर्म आचरून न्यायालयांत जायला त्यांना थोडा उशीर होत असे. श्रीमंत सरकारांना हें आवडणार नाहीं आणि त्यांची नाराजी होईल, असें एका जबाबदार गृहस्थानें त्यांना सुचविलें तेव्हा श्री अंबाबाईच्या देवळांत रोज पुराण सांगितलें तर चरितार्थ चालू शकेल आणि नित्यकर्मही यथासांग आचरतां येईल, असें सडेतोड उत्तर त्यांनी दिलें. परंतु श्रीमंतांना त्यांच्या सदाचाराची आणि नि:स्पृहतेची चांगली जाणीव होती म्हणून नाराजीचा प्रसंग कधींच आला नाहीं. उलट प्राणी रावसाहेबांच्या घरीं नवरात्रांत त्रिकाळ पूजा असे, त्यावेळीं प्रसादासाठीं श्रीमंत एक दिवस प्रतिवर्षी नियमाने येत असत. ही प्रथा अजूनही चालू आहे.

## शुचीनां गेहे

अशा पवित्र पित्याच्या पोटीं डॉ. दादांचा जन्म दिनांक २३ जून १८९२ या दिवशीं झाला. त्यांच्या पूर्वीचीं दोन तीन मुलें गेलेलीं असल्यानें त्याच्या मातोश्रींनीं अनेक नवससायास केले व श्रीकृपेनें त्यांना हा पुत्रलाभ झाला होता. नवसफेडीसाठीं दादांचे नाक उजव्या बाजूला टोचलेलें होतें. मातृसूख मात्र त्यांना फार दिवस लाभले नाहीं. मातृवियोगानंतर त्यांच्या मावशीनें त्यांचे संगोपन केलें.

वडील कोल्हापुरीं असेपर्यंत दादा बालपणीं तेथेंच होते. त्यांचा आवाज फार सुरेल होता. कोल्हापुरांत त्यावेळीं गणपति उत्सवांत श्री. पिशवीकरांच्या मेळ्यांतील दादांची पदें लोकांना फार आवडत. अशाच एका प्रसंगी तेथील प्रसिद्ध सत्पुरुष कृष्णसरस्वती यांच्या समोर दादांनी पदें म्हटलीं, तेव्हां प्रसन्न होऊन स्वामींनीं त्यांना आपल्या मांडीवर बसवून मुखीं प्रसाद घातला आणि आपली टोपी दादांच्या डोक्यावर घालून त्यांचें फार कौतुक केलें. सत्पुरुषाच्या या कृपाप्रसादानें पुढील आध्यात्मिक जीवनाचें बीजारोपण त्यावेळीं झालें असें मानलें पाहिजे.

## साधनपूर्वक जीवन

प्राथमिक शिक्षणानंतर दादांचे पुढील शिक्षण मिरज येथील प्रशालेंत सुरू झालें. त्यांच्या संगीत कलेला मिरजेलाहि चांगली संधि मिळाली. स्नेहसंमेलनांत झालेल्या 'सुमति' या मराठी नाटकांत आणि 'प्रसन्नराघव' या संस्कृत नाटकांत त्यांचें संगीत व अभिनयकौशल्य यांची त्यावेळी फार प्रशंसा झाली. मैदानी व मर्दानी खेळांतहि दादा चांगलें तरबेज होते. त्यांचे शालेय मित्र श्री. विनायकराव साठे, श्री. दत्तोपंत सरवटे, श्री. गंगाधरपंत फणसाळकर, श्री. लक्ष्मणराव सिन्नरकर,

श्री. तात्या शिखरे इत्यादिकांशीं त्यांचे मित्रत्वाचे संबंध अखेरपर्यंत टिकले होते. 'स्वाध्याय मनोबोधाचे' बरेंच हस्तलिखित श्री. सिन्नरकर यांनीं केलेलें आहे.

दादांचें महाविद्यालयीन शिक्षण बडोद्याला आणि वैद्यकीय शिक्षण मुंबईला ग्रँट मेडिकल कॉलेजमध्यें झालें. त्यांच्या गायन अभिनय कलांना महाविद्यालयांतहि अवसर मिळाला. संशयकल्लोळांतील भादव्या, त्राटिका नाटकांत पिल्या आणि एकच प्याल्यांतील तळीराम या त्यांच्या भूमिकामधून दादांच्या अंगभूत नाट्यगुण आणि विनोद यांचा प्रभाव प्रकर्शानें दिसला. हे गुण पुढें त्यांनी भजन- कीर्तनांत ईश्वरसेवेसाठीं राबविले. वैद्यकीय शिक्षण चालूं असतांनाच त्यांचा विवाह भोर संस्थानांतील मामलेदार श्री. वासुदेवराव महाजनी यांची कन्या, दुर्गाबाई यांच्याशीं झाला. १९२२ सालीं दादा डॉक्टर झाले आणि त्याच वर्षी, पहिल्या दोन मुलींच्या पाठीवर पुत्रप्राप्तीचा लाभ झाला. डॉ. भडकमकर यांच्या आग्रहानें आणि श्रीमंत मिरजकर सरकारांच्या आशीर्वादानें १९२३ सालीं दादांनी मिरजेस खाजगी दवाखाना भडकमकरांच्या वाड्यांत सुरू केला.

## पितृवियोग

याच सुमारास दादांचे धाकटे बंधू श्री. बाबुराव तथा विनायक दत्तात्रेय प्राणी यांचा विवाह झाला. त्यानंतर थोड्या दिवसांनी न्यायालयांतून परत येत असतांना दुपारीं ११ च्या सुमारास श्री बालाजी मंदिरासमोर छातींत कळ येऊन रावसाहेब खालीं बसले. शिपायानें त्यांना पाठकुळीवरून घरी आणलें. वैद्यकीय उपचारांना अवकाश नव्हताच. मिरजेचे पहिले सरन्यायाधीश, स्वकर्तृत्वानें लोकदरास पात्र झालेले रावसाहेब श्रीचरणीं विलीन झाले. घराण्यांत कोल्यापूरवासिनी श्रीमहालक्ष्मीची आराधना आणि देहपात श्रीविष्णुस्वरूप बालाजीसमोर हा मोठाच योगायोग नव्हे काय?

राजवाड्यावर ही वार्ता गेली. श्रीमंत गहिंवरले व म्हणाले, ''संस्थानाचा शिरपेच गेला.'' सरकारस्वारी लगेच दादांच्या घरी यावयास निघाली. कोल्हापुरचे एक मुत्सद्दी सज्जन राजवाड्याच्या वाटेवर उभे होते. त्यांनीं श्रीमंतांना नमस्कार केला. मोटार त्यांना घेण्यासाठी थांबली तेव्हां ते गृहस्थ म्हणाले, ''सरकारचे सरन्यायाधीश कर्जांत वारले यांचे फार दुःख वाटतें,'' लाखांचा पोशिंदा, चतुर, गुणज्ञ राजानें या उद्गारांतील इंगित जाणलें. सरकार आले तेव्हां घरासमोर तुफान गर्दी होती. पायउतार होऊन श्रीमंत घरांत आले. आपल्या संस्थानच्या दिवंगत



सरन्यायाधिशाचें दर्शन घेण्यासाठीं ते खोलींत आले तेव्हां मिशनरी डॉक्टर व्हेलसाहेब इंजेक्शन देण्याच्या तयारींत होते. श्रीमंतांनीं विचारलें, ''डॉक्टर, याचा निश्चित उपयोग होईल काय?'' डॉक्टरची मान नकारार्थीं हलली असें पाहून तें म्हणाले, ''मग शरीराची विटंबना करूं नये.''

## तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्

पुढील संस्कार सुरू झाले. महायात्रा निघण्यापूर्वी श्रीमंतांनीं दादांना एकीकडे घेऊन सांगितलें की स्मशानातून परततांना प्रथम राजवाड्यांत भेटून जावें. कारणाचा कांहींच खुलासा नसल्याने दादा बुचकळ्यांत पडले, पण आज्ञेप्रमाणें ते राजवाड्यावर गेले तेव्हां रावसाहेबांना असलेल्या कर्जाचा सर्व हिशेब दहा दिवस होण्यापूर्वी लेखी कळवा, असें त्यांना सांगण्यात आलें. दहा दिवसांत कर्ज फिटलेंच पाहिजे असा श्रीमंताचा निर्धार होता.

अंकलखोप येथील सावकार श्री. गोगटे व रावसाहेब प्राणी या दोन घराण्यांचे परस्पराशीं इतके आपुलकीचे संबंध असत कीं एकमेकांच्या विचाराशिवाय त्यांचें कोणतेंहि कार्य होत नसे. श्री अण्णासाहेब गोगटे यांना दादा आपले वडील बंधु मानीत असत. श्रीमंतांची आज्ञा दादांनी अण्णासाहेबांना कळविली. कारण घरांतील पैशांच्या व्यवहाराची दादांना कांहींच माहिति नसे, उलट रावसाहेबांच्या आर्थिक ओढघस्तीची अण्णासाहेबांना पूर्ण माहिती होती. गांवांतील गोरगरीबांचा रावसाहेबांवर एवढा विश्वास होता कीं, सुरक्षिततेसाठीं हीं मंडळी आपला पैसा-अडका व दाग-दागिने रावसाहेबांजवळ ठेवीत. प्रत्येकाच्या पुरचुंडीत बांधून या ठेवी त्यांच्या घरांत ठेवलेल्या असत. तसेंच त्यांच्या पतीवर बाजारांतील खरेदी अगर हातउसन्या रकमांचीही नोंद ठेवलेली असे. अण्णासाहेबांनी सर्वांच्या ठेवी आणि देणीं दोनतीन दिवसांत भागवून प्रत्येकाकडून लेखी पावत्या घेतल्या व सर्व हिशोबाचें टांचण घेऊन ते राजेसाहेबांना भेटले आणि रावसाहेबांच्या कर्जाबाबत श्रीमंतांच्या आज्ञेप्रमाणें एकूण देणें किती आहे?'' अण्णासाहेबांनीं उत्तर दिलें, ''आजमितीस काहींहीं देणें शिल्लक नाहीं.'' श्रीमंतानीं उत्तराचा अर्थ ओळखला. ते म्हणाले, ''म्हणजे तुम्ही सर्वांची देणीं स्वतः भागविलींत. पण याचा लेखी पूरावा काय?'' अण्णासाहेबांनी सर्वांच्या पावत्या आणि एकूण हिशोबाचें टिपण पुढें केलें. तें पाहून श्रीमंतांनी आज्ञा केली, ''सावकार गोगटे यांनी दिलेल्या हिशोबाची रक्कम आजच्या आज चुकती व्हावी.'' नंतर ते अण्णासाहेबांना म्हणाले, ''तुम्ही सर्वाचें

देणें भागविल्यानें आमचें काम सोपें झालें. आम्हांला फक्त एकाच सावकाराचा हिशेब भागवून रावसाहेबांचे सुतक संपण्यापूर्वी त्यांना ऋणमुक्त करतां आलें. यामुळें आम्हांलाही फार समाधान वाटलें.''दादांनी ही हकीकत अनेकदा सांगितली होती. सदाचारी भक्ताचे संकट निवारण करण्याची ईश्वराची तऱ्हा अतर्क्य आहे!

## *मी माझीयां मजकडे आणोनि घाली !!*

या प्रसंगानंतर नवरात्राच्या उत्सवाच्या खर्चाची तजवीज कशी करावीं ही चिंता लागली होती. अगदीं ऐन वेळीं परगांवचा एक श्रीमंत रुग्ण दादांचेंच औषध घेण्याचा आग्रह धरून आला आणि औषधासाठीं त्यानें दिलेल्या रकमेने उत्सव व्यवस्थितपणें पार पडला. दादा भक्तिमार्गाकडे ज्या प्रसंगांनीं ओढले गेले त्यांपैकीं हे दोन प्रसंग वरचेवर त्यांच्या बोलण्यात येत असत.

एरवीं दादा वृत्तीनें आनंदि, प्रेमळ, विनोदी असत. संध्याकाळीं ते क्लबांत जात. मित्रपरिवारांत काव्यशास्त्रविनोदाच्या चर्चेत रंगत. त्यांना नाटकांची आवड फार, गाण्याबजावण्यांत मैफलींत ते रंगून जात असत. पण वडिलांच्या निर्याणानें ते एकदम गंभीर झाले. संसाराचा भारहीं त्यांच्यावर एकदमच पडला होता. त्यांना झोपण्यापूर्वी रात्रीं वाचनाची सवय होती. मनाची अशी गंभीर अवस्था असतांना एका रात्रीं एक अध्यात्मिक ग्रंथ-बहुधा दासबोध वाचावयास घेतला. तो वाचतां वाचतां झोप लागली. दुसऱ्या दिवसाचा सूर्य उगवला तो आत्मप्रबोधाचीं किरणें दादांच्या अंतरंगात उधळीतच! तेव्हांपासून त्यांची वृत्ति हळू हळूं भक्तिमार्गाकडे, निवृत्तीकडे वळली. चांगल्या संस्कारांत राहून आणि बालपणींच सत्पुरुषाची कृपा अयाचितपणें लाभूनही मन परमार्थात रमावयास वयाचीं ३१ वर्षे लोटलीं. इतका उशीर कां व्हावा? सत्कर्म फलोन्मुख होण्यास, सत्पुरुषानें पेरलेलें परमार्थ-बीज रुजून त्याच्या वृक्षाला सद्भक्तींचें फल येण्यासहीं **''कालस्तवात्-प्रतीक्ष्यताम्।''**

**''तुका म्हणे तेथें न चले तांतडी। प्राप्तिकाल घडी आल्याविणे॥''**

## *तत्र तं बुद्धिसंयोगंऽलभते पौर्वदेहिकम्।*

दादांना आध्यात्मिक वाचनाची गोडी लागली. त्याबरोबर मनन होऊं लागलें, विचारांचें मंथन होऊं लागलें. संगीतप्रेमी मित्रमंडळींबरोबर भजनाचा फड रंगू लागला. टाळ-पखवाजांच्या साथींत **'जय जय राम कृष्ण हरि'** गजर सुरू



झाला. सर्वश्री बंडोपंत करमरकर, भाऊराव पवार, अंदुबोवा गुरव, अप्पा दिवेकर अणि अनेक. श्रीमंताच्या कानी वार्ता गेली. श्रीमंतांनी वीणा दादांच्या गळ्यात घालून सांगितलें, ''मुख्य हरिकथा निरूपण. तेंच करा.'' बीजरूपानें असलेले संस्कार आकार धरूं लागले. क्रमाक्रमानें दासबोध, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत आदि ग्रंथांची पारायणें सुरू झालीं. रात्रीं स्वत:च्या ओसरीवर प्रवचन चाले. त्या वेळी सर्वश्री गणपतराव जोशी, तात्या शिखरें, लक्ष्मणराव पवार आणि कांही मंडळी श्रवणास येत असत. आणि सगळ्यांत नवलाची गोष्ट, एक मुका श्रोताही त्यात असे - टॉमी कुत्री. प्रवचनाची वेळ झाली की ती ओरडूं लागे. सोडल्यावर ती ठरलेल्या खांबाजवळ बसून जागेवर जाई. मुकें जनावर, पण त्यालाही श्रवणाची गोडी लागली होती. ही कुत्री शेवटी एकादशीला वैकुंठास गेली.

## *सतां सद्भिः संगः।*

श्री समर्थांच्या काळीं समर्थपंचक प्रसिद्ध होतें; त्याच प्रमाणें श्री. अण्णासाहेब गोगटे, संत अप्पा गुळवणी, श्री. तात्या दिवेकर, डॉ. देशपांडे, श्री. भाऊसाहेब मोघे आणि या सर्वांचे वर्तुळामध्ये आमचे दादा. दोन कोकणस्थ, दोन देशस्थ आणि दोन कऱ्हाडे असा हा उपासकांचा षट्कोन तयार झाला होता. या सर्वांना एक स्नेहसूत्रांत बांधले अण्णासाहेबांनी. अण्णासाहेब म्हणजे दादांच्या आध्यात्मिक जीवनांतील एक अविभाज्य घटक. यांच्यामुळेंच अनेक साधुसंतांचा सहवास दादांना व त्यांच्या कुटुंबियांना घडला. या उपासकांच्या मेळाव्यांतील प्रत्येक जण मोठ्या जाणत्या, ज्वलंत निष्ठेचा आणि डोळस श्रद्धेचा होता. दादांच्या चरित्राचा विचार करतांना यांतील प्रत्येक व्यक्तीच्या चरित्राचा थोडाबहुत भाग विचारांत घ्यावाच लागेल.

१. श्री. अण्णासाहेब गोगटे :-अत्यंत व्यवहारकुशल, हिशेबी आणि चिकित्सक बुध्दींचे. परमार्थांतसुद्धां चिकित्सा आणि हिशेबीपणा नेहमीं प्रत्ययास यावयाचा. साधुसमागमांत देखील याच ईश्वरदत्त बुद्धिसामर्थ्याने अनेक थोर संतांचा सहवास त्यांना व त्यांच्या मित्रवर्गास लाभला. प. प. अवधूतस्वामी महाराज नेहमीं म्हणत, ''मी केवळ अण्णासाहेबांच्या प्रेमासाठींच या प्रांतात आलों''.

२. डॉ. देशपांडे :- यांचा मूळ पिंड भक्तिभार्गी नव्हेच. परंतु श्री दत्तप्रभूंची इच्छाच अशी कीं ते या मार्गाकडे वळावे. त्यांच्या पत्नीला

निद्रानाशाचा रोग जडला. वैद्यकीय उपचार थकले. हवापालटाकरितां श्रीक्षेत्र औदुंबर येथें आले. देवावर विश्वास म्हणून नव्हे. परंतु श्रीगुरूचरित्र सप्ताह वाचल्यास बरें वाटेल, पहा करून, असें काहीं हितचिंतकांनी सांगितलें व त्यांनींही पाहूंया करून अशा सदरांत सप्ताह करविला. वाचन ऐकतां ऐकतां मंडळी घोरू लागली. अगदी निवांत झोप. डॉक्टरांना आश्चर्य वाटलें व क्रमाक्रमाने ते पूर्ण ईश्वरनिष्ठ बनले.

**३. संत अप्पा गुळवणी :-** पंढरीच्या वारीचा नियम. देवाजवळ मागणें हेंच **''केला नेम चालवी माझा''** आणि श्रद्धा अशी **''वारी चुकों नेदी हरि''**. अगदीं हाडाचे वारकरी. जबरदस्त पाठांतर. गोष्टी सांगाव्यात त्या अप्पांनींच. वेदांताचें सार गोष्टीत भरलेलें असायचे.करूणरस असो, भक्तिरस असो, वीररस असो नाहींतर श्रृंगाररस असो, अगदी रंगून जात असत. श्रोते आणि वक्तेही!

**४. श्री. तात्या दिवेकर :-** रंग गोरा, सतेज डोळे, केस व दाढी वाढलेली, अगदी वेदकालीन ऋषीच दिसावयाचे. फार शांत स्वभाव, राग माहीतच नव्हता त्यांना. एकदां अण्णासाहेब गोगटे त्यांच्याकडे भोजनास होते. जेवायला बसल्यावर तात्या म्हणाले ''अण्णा, आमचं कुटुंब म्हणजे लाखांत एक. माझें परम भाग्य म्हणून अशी सोबत मला मिळाली.'' अण्णांनी त्यांच्याकडे पाहिलें ''अहो, तुमच्या सारखा पाहुणा आला कीं लोक फार तर पंचपक्वान्नें करतील. पण तुम्ही माझे प्राणप्रिय मित्र, अगदी मानसीचे राजहंसच. तुमच्या स्वागतासाठीं आमच्या कुटुंबानें आज मोत्यांची चटणी केली आहे. पहा बरं तिची केवढी श्रद्धा आहे ती.'' हे शब्द ऐकल्याबरोबर त्यांच्या पत्नीनें कानाला हात लावून पाहिलें तों खरोखरीच कुडीचे मोती नाहींत! त्यांना वाईट वाटलें आणि डोळे भरून आले त्यांचे. तात्या म्हणाले, ''वाईट कां वाटून घेतेस. तूं स्वयंपाकांत इतकी तल्लीन झाली होतीस कीं तुला याचें भानहि नाहीं. अशी तल्लीनता ईश्वराच्याठायी असावी. मोती दुसरे आणूं.'' दुसरा माणूस असता तर फार रागवला असता अगदीं अण्णासाहेब देखील.

**५. श्री. भाऊसाहेब मोघे :-** सातारा येथील कोर्टात सब् रजिस्ट्रारची नोकरी करीत असतांना गुरूचरित्राचें नियमित वाचन चालूं असें. स्वभावानें गंभीर आणि श्रद्धा फार खोल. श्री गुरूदत्ताजवळ मागणें एवढेच कीं जीवित असेपर्यंत गुरूचरित्राचें वाचन चालूं रहावें. श्रीगुरूंनी त्यांची ही कामना पूर्ण केली.

भक्तिनभांतील हे सर्व तेजस्वी तारे दादांच्या आधींच अस्ताला गेले.





अशीं ही सर्व एक दिलाची माणसें वर्षातून एक दोन वेळा कोठें तरी यात्रेस जात असत. कार्यक्रम डॉ. देशपोंडे ठरवीत व व्यवस्था अण्णासाहेबांच्याकडे असे. सर्वजण मिरजेस जमत व तेथून यात्रा निघे. एकदां सर्वजण गाणगापुरीं गेले होते. उद्देश पुढें कुरवपुरीं जाण्याचा होता. त्यावेळीं श्रीक्षेत्रीं तेलंगणांतील एक संन्यासी होते. ते श्रीक्षेत्रीं आले तेव्हा प्रथम त्यांची कोणीहि वास्तपुस केली नाही. परंतु भक्तकीर्तिविवर्धन ही प्रभूंची बिरूदावली! प्रभूंनी स्वामींच्या स्वरूपांत सेवेकऱ्यांना आणि पुजाऱ्यांनाही दृष्टांत देण्यास सुरवात केली. यशावकाश स्वामीजींचा किर्तीसुगंध दरवळूं लागला. अण्णासाहेबांनी पहिल्याच भेटींत स्वामीजींची कृपा संपादन केली व त्यांच्यासह सर्वजण कुरवपुरीं मार्गस्थ झाले. क्षेत्रोपाध्यायांनी अण्णांना विनंतिपूर्वक सांगितलें, ''लौकरांत लौकर स्वामींना येथें परत पोचवा.''

त्यावेळी कुरवपुरांत दत्तप्रभूंच्या परमभक्त 'साबाजी' होत्या. त्या प. प. वासुदेवानंद सरस्वतींच्या आधींपासूनच तेथें सेवेस राहिलेल्या होत्या. त्यांचें प्रेमळ भजन ऐकण्याचा योग या मंडळींना आला. येथील एक हकींकत फार हृदयस्पर्शी आहे. एका साधकानें येथें राहून श्री गुरूचरित्राची हस्तलिखित प्रत तयार केली होती. एक संन्यासी येथें येतील त्यांच्या हातून पोथीचा प्रसाद घ्यावा असा दृष्टांत त्या साधकास झालेला होता. तेथील पुजारी वे. केशवभटजीकडे त्यांनी चौकशी केली तेव्हां मिरजेहून डॉक्टर मंडळी येत असल्याचें त्यांना कळले. संन्याशाबद्दल कांहीं कळलें नव्हते. पण आलेल्या मंडळीबरोबर एक दंडधारी यति आहेत असें पाहून दृष्टांताची प्रचिती आली. स्वामींनी आपल्याकडे भिक्षेस यावें अशी त्याची आग्रहाची विनंति प्रथम या मंडळींनीं नाकारली. परंतु पुजाऱ्याकडून दृष्टांताची सर्व हकीकत कळल्यावर श्रीस्वामीजी त्यांच्याकडे भिक्षेस गेले. भक्तकामकल्पद्रुम दत्तप्रभूंनींच हा प्रसंग घडवून आणला असेल का ?

असे अनेक प्रसंग गाठी पडतां पडतां श्रद्धेच्या गांठी दृढतर होत गेल्या. याच सुमारास स्नेह्यांच्या प्रयत्नांमुळें दादांना उपसंघचालकत्वाची जबाबदारीं स्वीकारावी लागली. तथापि रा. स्व. संघाचे कार्य तत्परतेनें करीत असतांनाही त्यांच्या आध्यात्मिक आचारविचारांत मुळींच फरक पडला नाहीं. तें यथापूर्व चालूंच राहिले. परंतु श्रीगुरूकृपेचें शिक्कामोर्तब अजून व्हावयाचें राहिले होते.

## गुरूकृपा

दादांचे स्नेही श्री. वामनबोवा ब्रह्मचारी यांनी कल्याण मासिकातील एक लेख वाचला. परमपूज्य श्री. गुळवणी महाराजांचा 'शक्तिपातसे आत्मसाक्षात्कार' हा लेख व सर्व माहिति त्यांनी अण्णासाहेब गोगटे यांना कळविली. अण्णासाहेब पुण्यास दाखल झाले व श्री. गुळवणी महाराजांबरोबर यासंबंधी चर्चा करून मार्गदर्शन करण्याबद्दल त्यांना विनंति केली. श्री दत्तप्रभूजवळ अण्णांचा वशिला फार मोठा. श्री. गुळवणी महाराजांनी त्यांना प. प. लोकनाथतीर्थ यांचे दर्शन घडविले. स्वामीजीं तेव्हों पुण्यातच होते. एका दृष्टीक्षेपांतच अण्णासाहेबांची योग्यता स्वामींजीनी ओळखली व दुसऱ्या दिवशी प्रात:काली अण्णासाहेब दीक्षेनें कृतार्थ झाले. हा गुरूकृपेचा रसगुल्ला चाखतांना अण्णांच्या मनांत बाकीच्या पंचकडीचें स्मरण झालें असेलच. त्यांनी आपल्या अनुभवांची दिंडे मिरजेस दादांच्या समोर खोललीं. पुढें संघशिक्षावर्गासाठी पुण्यास गेले असतांना दादा श्री. गुळवणी महाराजांच्या सेवेस रूजू झाले. त्यानंतरची गुरूद्वादशी झाल्यावर औदुंबर क्षेत्राजवळील अंकलखोप येथे श्री. अप्पा संत, वामनोबा आणि दादा श्री. गुळवणी महाराजांकडून दीक्षांकित झाले. त्या वेळेपासून आजपर्यंत वाडीस जातां येतां गुरूद्वादशीच्या सुमारास श्री. गुळवणी महाराजांचा मुक्काम दादांच्या घरी मिरजेंत होत असतो.

## पारमार्थिक अधिकार

दादांची जेष्ठ कन्या सौ. मनूताईना त्यांच्या दीर्घ आजारांत दादांच्या सत्संगाचा लाभ झाला व अखंड नामजपाचे महत्व कळून तसें अनुष्ठानही घडलें. ''देह नश्वर आहे. तो कधीं तरी जाणारच. म्हणजे देह येथें टाकून देहाचा अहंकारी जात असतो. तो अविद्योपाधीनें युक्त असल्यानें त्यास जीव ही संज्ञा प्राप्त झाली. उपाधिरहित जीव हा मूळ ब्रह्मस्वरूपच आहे.'' हे तत्वज्ञान निरनिराळ्या उदाहरणांनी आणि दासबोध, ज्ञानेश्वरी इत्यादि ग्रंथांच्या श्रवणानें समजल्यावर वृत्ति श्रीकृष्णचरणीं रंगून गेली. **'जयासी उपासना जैसी। तेणे भजावें आपुल्या देवासी। निदिध्यास लागलिया नेमेसी। साक्षात्कर होय'**॥ ही समर्थवाणी खरी झाली. श्रीकृष्णाचें त्यांना सगुण स्वरूपांत दर्शन झालें. शेवटच्या रात्रीं दादांना मुद्दाम जवळ बोलावून त्यांच्या नीट लक्षांत येईल इतक्या स्पष्ट शब्दांत त्यांनी सांगितले. ''मी, तुम्ही, हें, तें वगैरे कांही नाही.'' वेदान्ताचें सारवाक्य याच अर्थाचें आहे. **''नेह नानास्ति किंचन।''** हा आपला अनुभव त्या सांगत होत्या. दादांच्या नित्य वाचनाचा प्रभाव त्यांच्या आर्तभक्तीच्या भूमिकेंत असा रूजला. याहून श्रेष्ठ अनुभव अध्यात्मांत नाही



आणि या अनुभवाची प्रचीति आणून देणाऱ्याहून जास्त मोठा सत्पुरूषही असू शकत नाही.

प. पू. अवधूतस्वामी महाराज तथा प. पू. शंकरानंदतीर्थ यांच्याशीं दादांचा प्रथम परिचय अण्णासाहेबांमुळेच झाला. त्यानंतर त्यांचे दादांवर इतकें प्रेम जडलें कीं प्रतिवर्षी महिना दोन महिने त्यांचा मुक्काम दादांच्या घरी होत असे. त्यांचें वास्तव्य असे तेव्हां दादांच्या घरीं दसरा दिवाळी असायची. रोज मिष्टान्न भोजन आणि कर्म-उपासना-वेदान्त-भक्ति यांवरील चर्चेची मेजवानी. हा क्रम कित्येक वर्षे चालू होता. त्यांच्या संगतीत कुरवपुर, गरूडेश्वर, धारेश्वर अशा दूरच्या यात्राहि मोठ्या मेळाव्यानिशीं झाल्या. श्रीनृसिंहवाडी, औदुंबर येथील यात्रा व मुक्काम तर आठवड्या पंधरवड्याला घडत असे. त्यांच्या सत्संगतीत सदाचाराचें प्रत्यक्ष शिक्षण सर्वांना मिळत असे. प. पू. अवधूतस्वामींनी ब्रह्मचर्याश्रमांत आपले गुरू शिनोरचे श्रीमौनीस्वामी यांची एकनिष्ठ सेवा केली होती. त्यांनी तीन-चार नर्मदा परिक्रमा केल्या होत्या. **'अजीवि तो त्रय: सेव्या वेदान्तो गुरूरीश्वर.'** असेंच त्यांचे सर्व आयुष्य गेलें. समाधिसमयीं त्यांचे वय सुमारे १३० वर्षांचे असावे असे अंदाजानेंच म्हणावें लागते. एरवीं त्यांचे जन्मस्थान, जन्मकाळ, पूर्वाश्रमीचें नांवसुद्धा त्यांच्या अगदी निकटवर्तीयांनाही कधीं कळलें नाहीं ! १९६७ साली काशीस जाऊन ते विश्वेश्वराशी एकरूप झाले व देह गंगार्पण झाला. प. पू. अवधूतस्वामींचें औदुंबर येथील श्रेष्ठ अधिकार शिष्य प. पू. नारायणानंदतीर्थ यांनी स्वामींच्या ८, ९ व १० व्या दिवशींची आराधना आणि त्यांच्या पुण्यतिथीला तीर्थपूजा औदुंबर येथें दादांकडून करविली.

## भक्तीची परीक्षा

श्रीदत्तप्रभूच्या मनांत सद्भक्ताची कसोटी पाहावी असें आलें असेल **''राम जपे त्याचें चित्त पाहतो। जप करितां शीण येतो। विकल्प अंतरी प्रवेशतो। तरी ढळे ना मेरू जैसा।।''** पण दादांच्या चित्तवृत्तीत आता विकल्पाला प्रवेश मिळणें शक्य नव्हतें. संकल्पविकल्पांचें खबडब नाहींचें होऊन मनोभूमि अगदी समान झाली होती. मग हा कसली कसोटी पाहणार? सन १९४८ सालीं महाराष्ट्रभर ब्रह्मवृंदावर आलेलें संकट! घरें दारें भस्मसात् होत होतीं. मिरज त्यांत अपवाद कसें ठरावे ? त्यांतून दादा संघचालक ! ते राहात असलेला डॉक्टर भडकमकरांचा वाडा जळून खाक झाला. सुदैवाने दादा मिरजेंत नव्हते. श्री. प. पू. अवधूत स्वामीबरोबर मुंबईत गेले होते- मुद्दाम आग्रहाने त्यांना नेले होते. घरी होत्या सौ. आईसाहेब आणि त्यांच्या दोन लहान नाती.

त्यांना मोठ्या शर्थीने वाड्याबाहेर काढलें. देव बरोबर घ्यावे अशी त्यांची इच्छा. पण बरोबरचे लोक म्हणाले, ‘‘आईसाहेब, प्राण आधीं वाचवा, देव दुसरें घेऊं’’ देह दुसरा धारण केल्याचें ऐकिवांत आहे. पण देव दुसरा! अशक्यच. तीन मजली वाडा जळून भस्म झाला. त्यातून काय राहिले असेल बरें ? काय राहणार ? राख आणि कोळसे. परंतु त्या अग्निदिव्यातून सुरक्षित राहिली ती ब्रह्म आणि माया! श्रीदत्तप्रभूंच्या पादुका आणि श्री जगदंबेची मूर्ती अगदीं सालंकार. कशी राहिली असेल बरे ती ? ईश्वरी मायेचें कौतुक ब्रह्मादिकां नेणवे.

## *संपत्तौच विपत्तौच महतामेकरूपता*

दादा मुंबईहून परत आले. सगळे व्यवहार यथापूर्व चालूं झाले. वृत्तींत कांहींही चलबिचल नाहीं. एके दिवशी सौ. आईसाहेबांनी प्रश्न केला, ‘‘आजपर्यंत केलेल्या ईश्वर सेवेचें हेंच फल काय ?’’ पान कुटतां कुटतां दादा हसले आणि त्यांनी एक गोष्ट सांगितली. अर्जुनानें असाच प्रश्न श्रीकृष्णाला विचारला होता .... गोष्ट संपली. सर्वजण भारावून गेले. तंबाखूची चिमूट तोंडात टाकतां टाकतां दादा सौ. आईना म्हणाले, ‘‘हा नश्वर पसारा घेऊन का तूं देवाकडे जाणार आहेस. अग्निप्रलयांतून आपली उपास्य देवतेची मूर्ती मिळाली ना ? मग ती आपल्या पाठीशी उभी आहे हें निश्चित समज.’’

पुन्हां नवीन जोमानें नवी मांडणी सुरू झाली. बिऱ्हाड नवें, दवाखाना नवीन, अगदी भांडीं, बैठकी, अंथरुणें, पांघरूणें सुद्धा नवीन. जणूं काहीं आपत्ति आलेलीच नव्हती इतक्या शांत चित्तानें सर्व व्यवहार चालू झाले. भागानगर आंदोलनाच्यावेळी आणि नंतर संघबंदीच्या वेळीं असा दोन वेळा कारावास सहन करूनहि दादांची शांत, समाधानी वृत्ति ढळली नाहीं. ‘समाधान साधू जनांचेनि योगें’ सत्संगतींत चित्तावर झालेले संस्कार आचरणांत उतरले.

१९५६ सालीं दादांचे धाकटे चिरंजीव डॉक्टर झालें व त्यांनी स्वत:चा स्वतंत्र दवाखाना मिरजेस वेगळ्या वस्तींत सुरु केला. दवाखान्याचे उद्‌घाटन श्री. गुळवणी महाराजांनीं केलें. दुसरा आशीर्वाद अण्णासाहेबांचा. औषध देऊन त्याचें बिल आपणाकडून घ्यावे असा त्यांचा आग्रह. त्यांना औषधाचा पेला भरून दिला. त्यांनी औषधाचा घोटा घेतला व ते मनापासून हसले. पेल्यांत चहा होता!

नवीन दवाखान्यास सुरुवात झाल्यानंतर कांहीं दिवसांनी अण्णासाहेबांनीं एक बंद पाकीट दादांना दिलें व दवाखान्याला एक वर्ष पूर्ण झाल्यावर तें उघडावें असे सांगितलें. पाकिट उघडल्यावर त्यांत अण्णांनीं भविष्य व सदिच्छा लिहून ठेवल्याचें



आढळलें. एका वर्षात चिरंजीवांचा जम उत्तम बसेल आणि दादा व्यवसायातून पूर्ण निवृत्त होतील ही भविष्य वाणी खरी ठरली. दादांनीं आणि अण्णासाहेबांनीं कोकणांत रम्य ठिकाणीं एकत्र राहून ईश्वर सेवेंत काल कंठावा ही त्यांची सदिच्छा मात्र अर्धीच सफल झाली. कारण त्यापूर्वीच श्री दत्तसेवेसाठीं अण्णांनी महाप्रयाण केलेलें होते! व्यवसायांतून पूर्ण मुक्त झाल्यानंतर दादांनी लेखन - वाचन-मनन यांत कालव्यय करून, पूर्वीच मैदान श्री दत्तमंदिरांत सुरु झालेल्या ज्ञानसत्रांत मुक्त हस्तें ज्ञानदान केलें. श्री दत्तमंदिरांतील योगवासिष्ठ्य, दत्तमाहात्म्य, दासबोध व शेवटी मनाचे श्लोक इतक्या ग्रंथांचा श्रोत्यांना आनंद लाभला.

## *दासबोधाचे १३ वें पारायण*

दादांचा सर्वात आवडीचा ग्रंथ दासबोध त्याचें १३ वें पारायण सज्जनगडावर करावें व त्यावेळीं ओळखीचा उपसर्ग न व्हावा अशी त्यांची इच्छा. अगदी जरूरीपुरतें सामान घेऊन तापसी वेशांत पारायण समाप्ति दासनवमीला झालीं - अगदीं त्यांच्या इच्छेप्रमाणें कोणीहि त्यांना ओळखता. पण दासनवमीला रात्रीं कीर्तनाच्या वेळीं श्री. चाफळकरांनींच त्यांना न ओळखले व स्वत: शेजारीं बसवून त्यांची चौकशी केली. त्यामुळे डॉक्टर प्राणी गडावर आहेत हें विदित झालें. दुसऱ्या दिवशी जो तो प्रकृतींच्या तक्रारी घेऊन त्यांच्याकडे येऊं लागला! इच्छेप्रमाणें अज्ञातवासांत पारायण पार पडलें. नंतर श्री समर्थांनी त्यांची ओळख लोकांना दिली! हाच निरोप समजून दादांनी गडावरून मुक्काम हलविला.

## *तीर्थयात्रा*

मद्रासला ज्येष्ठ चिरंजीवांच्या बिऱ्हाडी दादांचा व सौ. आईंचा मुक्काम असतांना १९६३-६४ सालांत उभयतांनीं दक्षिणेतील प्रमुख क्षेत्रांची यात्रा केली. या यात्रेंत श्री. गुळवणी महाराजांचे शिष्य श्री. श्रीपादराव तथा मामा देशपांडे यांची संगत फार उपयोगाची झाली. तीर्थविधिसह सर्व यात्रा यथासांग पार पडली. यात्रा करून परत आल्यावर श्री. गुळवणी महाराजांच्या आज्ञेवरून त्रिस्थळी काशीयात्राही घडली. प. पू. अवधूत स्वामी महाराजांचा मुक्काम नर्मदेतील व्यास बेटावर असतांना उभयंता कन्यापुत्रांसह तेथें सत्संगतींत कांहीं काळ राहिले होते. व्यास बेटावरींल अनसूयेच्या स्थानाचें दर्शन घेतांना आपण आपल्या खऱ्या घरी असल्याचा आनंद वाटला, असें सौ. आई सांगत. त्यांचे गोत्र अत्रि असल्याने

अनसूयेचें स्थान हेंच आपलें खरें घर, अशी त्यांची श्रद्धा होती. दादांचें एक स्नेहि श्री. बंडोपंत पोतनीस यांच्या आग्रहानें काश्मीरचाहि प्रवास उभयतांनी केला व परत येतांना हरिद्वार, ऋषीकेश हीं पवित्र स्थानें पाहिलीं.

## *जगदंबा मालकीच्या घरीं आलीं*


दादांच्या वडिलांनी मसूर सोडल्यापासून १९६५ सालापर्यंत कोणालाहि स्वत:च्या मालकीचें असे घर नव्हतेंच. तो योग आता आला. ज्या घरीं प. पू. अवधूत स्वामी महाराजांचे प्रथमदर्शन झालें, प. पू. गुळवणी महाराजांचा कृपाप्रसाद झाला, भजनप्रवचनाची सुरवांत ज्या वास्तूंत झाली, ती वास्तु दादांच्या चिरंजीवानीं विकत घेऊन नवरात्रोत्सव फार थाटांत केला. सर्वात समाधान झालें ते सौ. आईना. स्वत:चें घर झालें. त्यांची श्रीजगदंबा मालकीच्या घरीं आली.

मिरजेच्या प्राचींन भवानी मंदिरांत पंचवीस वर्षे अव्याहत भजन निरूपणें चालत. ही प्रथा दादांनीं व श्री. बोडस यांनीं सुरू केली होती. त्या निमित्तानें या दोघांचा सत्कार आणि त्यांच्या प्रवचनांची आणि निरूपणांची ग्रंथरूपानें प्रसिद्धि व्हावी या हेतूनें 'विद्वत सत्कार समिति' स्थापन झाली. या सत्कारसमारंभाची सविस्तर हकीकत 'स्वाध्याय मनोबोध' भाग पहिला या समितीनें प्रकाशित केलेल्या पुस्तकांत आलेलीं आहे.

## *जीवनसाथी*

दादांचा मित्रपरिवार फार मोठा. शिवाय संघचालक असल्यामुळें घरीं सारखी वर्दळ असायची. संसाराचा हा सगळा भार वाहायला दुसरें चाकहि तसेंच भक्कम होतें. कोणीही येवोत, कितीही येवोत, आणि केव्हांही येवोत, सर्वांचे स्वागत हसतमुखानें करून आत्मीयतेनें आदरातिथ्य करावें तें सौ. आईसाहेबांनींच. कपाळावर अठी किंवा शब्दांत कटुता कधीं दिसलीच नाहीं. पहाटे चार वाजल्यापासून रात्रीं अकरा वाजेपर्यंत त्यांचा खडा पहारा सुरू असायचा. आपपरभावाचा अभाव हाच त्यांच्या स्वभावाचा स्थायीभाव होता. दादांच्या पारमार्थिक जीवनांतही सौ. आईसाहेबांनीं बरोबरीनें साथ केली. ''**संतसमागम अर्चा। सारासार ज्ञानचर्चा। इतुकें दे मजला दे मजला। मागतसे हरि तुजला।।**'' ही दादांची मागणी, ''**संत गृहाप्रति येती। भक्तिभावें शरण तयाप्रति। इतके दे मजला दे मजला। मागतसे हरि तुजला।।**'' ही आईसाहेबांची प्रार्थना. हेंच मागणें देवाजवळ मागून ही जोडी जन्मास आली असावी एरवी असे एकजीव संसार फारच क्वचित्.





*कै. सौ. जानकीबाई प्राणी*

स्वामीवियोगें पळही गमेना।
तुजवीण रामा मज कंठवेना।।

दादा, तुमच्या सुखी आणि समाधानी जीवनाचें खरें श्रेय सौ. आईनाच, त्यांच्या सोबतीमुळेंच तुमचा ऐहिक आणि अध्यात्मिक पथ सुकर झाला. ''**स्वयं पंचानानो पुत्रौ गजाना - षडाननौ। कपर्दी तु कथं जीवदन्नपुर्णा गृहे न चेत्।।**

आईसाहेब, हें सर्वश्रेय तुम्हालाच, नि:संशय तुमचेंच. 'भवानी त्वत्पाणिग्रहणपरिपाटीफलमिदम्.''

सन १९४२ पासून १९६९ पर्यंत सत्तावीस वर्षे मातृपितृ प्रेमाची उणीव ज्यांनीं भरून काढली आणि हें शब्दपाल्हाळ लिहून घेतलें त्या कै. ती. दादा कै. सौ. आई यांच्या चरणी ही वाक्पूजा समर्पण करतांना वाचकांना विनंती एवढीच कीं

**''धी शुद्धयै प्राक्चरितार्थ एष संगृह्यते स्फुट:।**

**प्राज्ञै: प्रेक्ष्योऽत्र तत्सारो दर्पणेऽल्पे यथा मठ:।।**

सर्व पूजेच्या शेवटीं मंत्रपुष्पांजलि समर्पण करायचीं असते. तदर्थ कै. दादांच्या ज्येष्ठ चिरंजीवांनी त्याच्या अंतकाळच्या स्थितीचें हृदयस्पर्शी सविस्तर निवेदन केलें आहे, त्यांतून एक उतारा येथे उद्धृत करतो.

## साक्षात्कार

''चि. अरविंदानें ती. दादांचे डोकें मांडीवर घेतलें. सर्व शक्ति एकवटून, थरथरते हात उंच करून, दोन्ही हात जोडून नमस्कार करण्याचा ती. दादांचा प्रयत्न चालला होता. डोळे घट्ट मिटले गेले. उघडें तोंड बंद झालें. नुपेक्षी कदा ही त्यांची खात्री होती, श्री दत्तमाऊलीच्या दर्शनासाठीं अट्टाहास चालूं होता. त्या उपास्यमाऊलीला या भक्त बाळाची कां बरें दया येणार नाही ? डोळ्यांत दर्शन झाल्याची साक्ष प्रेमाश्रूंनी पटवली. अंगावर आनंदाचे रोमांच उठले. **''सद्गदित कंठ दाटो।। येणे फुटो हृदय।। नेत्रीं जळ वाहो सदा। आनंदाचे रोमांच। तुका म्हणे कृपादान। इच्छी मन हे जोडी।।''** देवाला मिठी मारण्याचा हा सोहळा सुमारे एक मिनिट शेवटीं त्यांच्या भोंवती असलेल्यांना पहायला मिळाला. सर्वांनी नामाचा मोठ्यानें गजर केला. चि. अरविंद त्यांच्या उजव्या कानांत **''गुरुदेव दत्त''** हा मंत्र उच्चारित होता. ज्येष्ठ शुद्ध दशमी शके १८९१ दि. २६ मे १९६९ या दिवशीं दुपारी साडेपाचच्या सुमारास ती. दादा श्रीदत्तस्वरूपीं लीन झाले. ज्यांनी ती. दादांचे जीवन जवळून पाहिलें त्यांनाच त्यांच्या शेवटीच्या कृतीचा अर्थ समजेल. **''उपासनेच्या शेवटीं। देवा भक्ता अखंड भेटी। अनुभवी जाणेंल गोष्टीं। प्रत्ययाची।। या समर्थोक्तीची प्रचीति दिसली. ज्यासाठीं एवढा अट्टाहास केला होता, तो शेवटचा दिवस गुरूकृपेनें गोड झाला.''**

ॐ ॐ ॐ